मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर



छत्रपति संभाजी

-प्रा. श. श्री. पुराणिक

मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर

(१६८१–१७०७)

पूर्वार्ध

छत्रपति संभाजी

(१६८०–१६८९)

लेखक

प्रा. श. श्री. पुराणिक

काळ प्रकाशन, पुणे

प्रथमावृत्ति १९८१; जून
मूल्य ३० रुपये

मुद्रक : प्रकाशक : शं. रा. दाते, काळ प्रकाशन; १८३५, सदाशिव, पुणे ३०.

मातृपितृचरणौ

प्रस्तावना

आठ वर्षांपूर्वी मी अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी पाहण्यास गेलो होतो. त्या वेळी वेरूळपासून दोन मैलांवर असलेल्या खुल्दाबादला गेलो आणि तेथे असलेली औरंगजेबाची कबर पाहिली. जिवंतपणी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत एकछत्री राज्य करणाऱ्या त्या शहेनशहाची ती कमालीची साधी आणि अनलंकृत कबर पाहून औरंगजेबाचा आपणा मराठ्यांशी उभा दावा असला तरी व्यक्ति या दृष्टीने तो किती अलौकिक माणूस होऊन गेला, असा विचार माझ्या मनात आला. त्या वेळी मला असेही वाटले की, रायगडावर छत्रपति शिवाजीमहाराजांची समाधि आहे आणि खुल्दाबादला औरंगजेबाची कबर आहे; या दोन टोकांना सांधणारा सत्तावीस वर्षांचा म्हणजे १६८० ते १७०७ हा कालखंड, हा मराठ्यांच्या इतिहासातला पराकाष्ठेचा उज्ज्वल कालखंड आहे; त्यांचा आपण इतिहास लिहावा. यापूर्वीही ही कल्पना दहा बारा वर्षे मनात घोळत होतीच, पण इतके दिवस अबोध असलेल्या त्या कल्पनेला औरंगजेबाच्या कबरीच्या दर्शनाने आकार आला. ठिणगी पडावी तसे झाले. अशा प्रकारे जवळ जवळ दीड तपापूर्वी मनात पडलेल्या बीजाला अंकुर फुटले, वाचनाने व अभ्यासाने त्याचा वृक्ष झाला. त्या वृक्षाला आलेले फळ म्हणजे हा ग्रंथ होय.

मला इतिहास लिहावयाचा होता. कादंबरी लिहायची नव्हती. कादंबरी लिहिणे सोपे नाहीच, पण इतिहास लिहिणेही फार कठीण आहे. त्यामुळे या कालखंडावर जेवढे म्हणून ग्रंथ मला उपलब्ध झाले, ते सर्व मी कसोशाने अभ्यासिले. त्यांची यादी सोबत जोडलेली आहेच. या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत ऋणी आहे. माझ्या समजुतीप्रमाणे मी उपयोगात आणिलेल्या सर्व ग्रंथकारांची नावे दिली आहेत व समुच्चयाने त्यांचा ऋणनिर्देशही केलेला आहे. तरी सुद्धा कोणाचा उल्लेख चुकून राहिला असल्यास त्यांनी क्षमा करावी अशी विनंती येथेच करून ठेवितो. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'अहि–नकुल' या कवितेतील चार कडवी मी वापरलेली आहेत. कारण औरंगजेबाचे पाशवी आक्रमण, मराठ्यांचा कडवा प्रतिकार व औरंगजेबाची दुर्दैवी अखेर, हे या संग्रामाचे टप्पे त्या कडव्यांतून उत्कृष्ट रीतीने व्यक्त होतात. अर्थात्, कविता लिहिताना कुसुमाग्रजांपुढे औरंगजेब व मराठे हा विषय नसावा, असलाच तर तो शोषक आणि शोषित असा असावा असा माझा तर्क आहे. पण आक्रमक व आक्रमणाचा प्रतिकार करणारे स्वातंत्र्यरक्षक यांचेही संबंध 'अहिनकुलवत्' असल्यामुळे प्रस्तुत 'अहि–नकुल' कविता औरंगजेब व मराठे यांच्याही संबंधांना लागू पडेल असे माझे मत आहे. या चार कडव्यांचा मला उपयोग करता आला याबद्दल मी कविवर्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत ग्रंथ लिहिताना ज्या ग्रंथकारांचा मला विशेष उपयोग झाला, त्याच्यामध्ये श्री. सेतुमाधवराव पगडी यांचे नाव मूर्धस्थानी आहे. खाफीखान, साकी, मुस्तैदखान, भीमसेन सक्सेना, ईश्वरदास नागर यांच्या फारशी ग्रंथांच्या, आणि औरंगजेब दरबारच्या बातमीपत्रांच्या अनुवादाने, आणि ' महाराष्ट्र आणि मराठे ' यासारख्या स्वतंत्र लेखसंग्रहांनी श्री. सेतुमाधवराव यांनी मराठी-भाषिक इतिहासाच्या अभ्यासकावर खरोखर डोंगराएवढे उपकार करून ठेवले आहेत जे कार्य राजवाडे यांनी मराठी पत्रांच्या बाबतीत केले, ते सेतुमाधवराव यांनी फारशी इतिहास वाङ्मयाच्या बाबतीत केले, यात शंका नाही. त्याचप्रमाणे श्री. वा. सी. बेंद्रे यांचे 'संभाजी चरित्र' व 'राजाराम चरित्र' म्हणजे माहितीने गडगंज भरलेली भांडारे म्हटली पाहिजेत. संभाजीच्या चरित्राचा सम्यक् अभ्यास व मूल्यमापन करणारे डॉ. सौ. कमल गोखले यांचे 'शिवपुत्र संभाजी ' हे पुस्तक म्हणजे शास्त्रीय पद्धतीने लिहिलेल्या ऐतिहासिक चरित्राचा उत्कृष्ट नमुना समजावा लागेल. तीच गोष्ट प्रा. जयसिंगराव पवार यांच्या ' महाराणी ताराबाई ' या चरित्रग्रंथाबद्दल. मराठीतले ताराबाईचे हे सुसंगत व ऐतिहासिक माहितीने भरलेले चरित्र पहिलेच म्हणावे लागेल. शेजवलकरांचा 'श्रीशिवछत्रपति ' अपूर्ण असला तरी चिकित्सेच्या दृष्टीने अभ्यसनीय आहे. सरदेसाई आणि राजवाडे आणि सरकार या पूर्वसूरींप्रमाणे या उपरिनिर्दिष्ट ग्रंथकारांना ' वाट पुसल्याशिवाय ' या कालखंडात एक पाऊल सुद्धा टाकता येणार नाही अशी वस्तुस्थिति आहे. हीच त्यांच्या ऋणाची पावती.

अर्थात्, या थोर ग्रंथकारांची माहिती जरी मी घेतली, तरी त्यांचे निष्कर्ष मी घेतलेले नाहीत हे सांगण्याची जरूर आहे, असे नाही. कारण, इतिहासाच्या शास्त्रात निष्कर्षाचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे, इतकेच नव्हे तर त्याने स्वतंत्र बुद्धीने व तर्कशुद्ध पद्धतीने आपले मत मांडावे, अशीच अपेक्षा असते. बौद्धिक ऋण निराळे व बौद्धिक गुलामगिरी निराळी. म्हणून हे उदारात्मे माझ्यावर रुष्ट होणार नाहीत, अशी माझी अपेक्षा आहे. त्या दृष्टीने, शिवाजी-संभाजी संबंध, संभाजी व कविकलश यांचे संबंध, कविकलश, संभाजी व इतर मंत्री यांचे संबंध, या बाबतीत किंबहुना संभाजीच्या एकंदर मूल्यमापनाबाबतच मी थोडे वेगळे विचार व्यक्त केलेले आहेत. संभाजी हा दुरात्मा, दुराचारी, शिवाजीला न शोभणारा मुलगा, हा एक दृष्टिकोन आहे; तर संभाजी हा दुर्दैवाचा वळी, मंत्र्यांनी छळलेला, महाराष्ट्राचा उपेक्षित वीरपुरुष, असा दुसरा दृष्टिकोन आहे. या दोन्ही टोकांमध्ये सत्य आहे, असे मला वाटते. संभाजी हा दुर्दैवी असेल, उपेक्षितही असेल, पण त्याच्या दुर्दैवाला व उपेक्षेला काही प्रमाणात का होईना तो जबाबदार आहे आणि मंत्री म्हणजे केवळ दुष्ट दुर्जन नव्हेत, असे माझे मत आहे. संभाजीचे व्यक्तिमत्त्व फार गुंतागुंतीचे आहे. त्या वेळच्या अनेक घटना अद्याप

पूर्ण माहीत नाहीत. पण इतिहास म्हणजे सुटया घटनांची जंत्री नव्हे, त्या घटनांचा अन्वय लावण्याचा, त्यांची साखळी जोडण्याचा शक्य तितका तर्कशुद्ध प्रयत्न होय असे मला वाटते. त्या दृष्टीने संभाजीच्या चरित्राचे स्पष्टीकरण करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे इतकेच.

'ज्ञाताकडून अज्ञाताकडे' हा अनुमानाचा राजमार्ग आहे. या अनुमानाच्या साहाय्याने व ' प्रतिष्ठित ' तर्काच्या आधारे घटनांचे अन्वयार्थ उलगडून सांगणे आणि इतिहासातील व्यक्तींच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे, एवढीच झाली तरी कोणाही इतिहासकाराची स्वतःची अशी म्हणता येण्यासारखी धनदौलत असते. या दृष्टीने विचार केला म्हणजे इतिहासकाराला शास्त्रज्ञाच्या तर्कशक्तीप्रमाणे कादंबरीकाराची ऐतिहासिक कल्पनाशक्ति Historical Imagination सुद्धा आवश्यक असते, असे म्हणणे भाग आहे. कारण, इतिहास म्हणजे गेलेल्या काळाची व मेलेल्या माणसांची कथा असली, तरी एके काळी तो काळ वर्तमानकाळ होता, आणि ती माणसे जिवंत होती, खलबते करीत होती, लढत होती, भांडत होती, हसत होती, रडत होती, बोलत होती, चालत होती, या गोष्टीचा इतिहासकाराला विसर पडता कामा नये. इतिहास हा तसा फार जुना नसतो. कालचे राजकारण हा आजचा इतिहास असतो व आजचे राजकारण हा उद्याचा इतिहास असतो. माणसाचे बाह्य रंगरूप बदलले, तरी रागद्वेष तेच असतात. म्हणूनच वर्तमानकाळाची मुळे ही भूतकाळात दडलेली असतात — ' The roots of present are imbedded in past' आणि इतिहास म्हणजे भूतकाळचे राजकारण History is past politics ' असे म्हटले जाते. ते आपण आहोत व आपण तेच आहोत. एक आधी जन्मला म्हणून पूर्वज व एक मागून जन्मला म्हणून वंशज इतकाच फरक.

इतिहासकाराला जर अंतःकरण असेल, जर तो सहृदय असेल, जर एकाच वेळी तो तटस्थही राहू शकत असेल, व तद्रूपही होऊ शकत असेल, जर त्याच्यापाशी ही ऐतिहासिक कल्पना शक्ति असेल, जर त्याला प्रतिभेच्या जोरावर परकायाप्रवेशाची विद्या येत असेल तर या Imaginative Sensibility किंवा Sympathetic imagination–सहानुभावजन्य कल्पना शक्तीच्या साहाय्याने तो स्थळकाळाचे अंतर तोडील आणि त्या मेलेल्या माणसांच्या शरीरांत प्राण फुंकील आणि त्यांना सजीव करील. त्याला त्यांचे गुणच दिसणार नाहीत तर दोषही दिसतील, दोषच दिसणार नाहीत तर गुणही दिसतील. त्याला मोठयांचा लहानपणा दिसेल, लहानांचा मोठेपणा दिसेल; शहाण्यांचा वेडेपणा दिसेल, वेडयांचा शहाणपणा दिसेल; स्वजनांचा क्षुद्रपणा दिसेल आणि शत्रूची उत्तुंगता दिसेल; त्याला यशातले अपयश दिसेल आणि अपयशातले यश दिसेल. ही भूतकाळातील व्यक्तिरेखांची पुर्निनिमिति हीच

इतिहासातली कला होय; केवळ उपमालंकारांची आतषबाजी म्हणजे कला नव्हे.

आपला समाज हा अत्यंत व्यक्तिनिष्ठ आहे. त्या दृष्टीने तर याचे महत्त्व विशेषच आहे. एखादा शिवाजी, एखादा संभाजी, एखादा औरंगजेब, एखादे टिळक व एखादे गांधी या राष्ट्राला गति देतात. लहान व मोठ्या व्यक्तींच्या रागद्वेषाच्या गुंतागुंतीतून इतिहासातील घटनाची निर्मिति होते म्हणून प्रामाणिक व्यक्तिदर्शन व यथार्थ मूल्यमापन हे इतिहासाचे प्रधान अंग समजले पाहिजे. इतिहासकाराला शत्रुमित्र कोणी नसतात. कारण त्याला इतिहास प्रस्तुतासाठी राबवायचा नसतो, त्याने संभाजीचा दोषही सांगितला पाहिजे व औरंगजेबाचा गुणही सांगितला पाहिजे. हे इतिहासाचे शास्त्र आहे व ही इतिहासाची कला आहे, अशी माझी समजूत आहे. अर्थात् माझा हा प्रयत्न म्हणजे पूर्णपणे सिद्धीस गेलेला आहे असा दावा मला दूरान्वयाने सुद्धा करावयाचा नाही. पण माझ्या प्रयत्नांची दिशा कोणती आहे हे कळण्याच्या दृष्टीने माझ्या इतिहासविषयक कल्पनेचे हे दिग्दर्शन केले इतकेच. अशा प्रकारच्या इतिहासाला लालित्याचे व कलेचे वावडे तर नाहीच नाही, उलट त्यामुळे 'अधिकस्याधिकं फलम् ।' या न्यायाने इतिहासाची गुणवत्ता अनेक पटींनी वाढेल असे माझे मत आहे.

अर्थात्, अशा प्रकारे इतिहास लिहावा की नाही, हा मोठा प्रश्न आहे. इतकेच नव्हे तर कलेच्या संपर्काने इतिहासाची प्रतिष्ठा ढळेल, व धड ती कादंबरीही होणार नाही, व तो धड इतिहासही होणार नाही. म्हणून इतिहास हा शास्त्र म्हणूनच लिहिला पाहिजे, असे म्हणणारे पंडित आहेत याची मला जाणीव आहे व मला त्यांच्याबद्दल आदर आहे. तरीसुद्धा अखेर या प्रश्नाचे उत्तर ज्याने त्याने स्वत:च्या अंत:करणप्रवृत्तीला शरण जाऊन ठरविण्याशिवाय गत्यंतर नाही. त्या बाबतीत माझे मत मी सांगितलेच. हा वाद जुनाच आहे. त्या संदर्भात प्रसिद्ध चरित्रकार लिटन स्ट्रॅची याचा उतारा वाचण्यासारखा आहे. गिबनवरच्या आपल्या लेखात स्ट्रॅची म्हणतो—

That the question has ever been not only asked but seriously debated, whether history was an art, is certainly one of the curiosities of human ineptitude. What else can it be ? It is obvious that history is not a science. It is obvious that history is not accumulation of facts, but the relation of them. Only the pedantry of incomplete academic persons could have given birth to such a monstrous supposition. Facts relating to the past, when they are collected without art, are compilations; and compilations may no doubt be useful but they are no more history

than butter, eggs, salt, and herbs are an omlette. That Gibbon was a great artist is implied in the statement that he was a great historian.

('इतिहास ही कला आहे की काय,' हा प्रश्न केवळ विचारला गेलेला नाही, तर गंभीरपणाने त्याच्यावर चर्चा करण्यात आलेली आहे, ही गोष्ट मानवी बुद्धीच्या विसगतीचे एक विलक्षण उदाहरण म्हणावे लागेल. इतिहास कला नाही तर दुसरे काय ? इतिहास हे शास्त्र नाही, हे उघडच आहे. इतिहास ही घटनांची जंत्री नाही तर घटनांचे निवेदन आहे हेही उघडच आहे. ही विलक्षण कल्पना म्हणजे अध्यापकच्च्या पंडितांच्या पढिकपणाचा परिपाक म्हटला पाहिजे. कलाहीन रीतीने जमविलेल्या भूतकालीन घटना म्हणजे संकलन होय; आणि संकलन उपयुक्त असतेच; पण ज्याप्रमाणे लोणी, अंडी, मीठ व कोथिंबीर म्हणजे, आम्लेट नसते, त्याप्रमाणे संकलन म्हणजे इतिहास नसतो. गिबनला मोठा इतिहासकार म्हटला म्हणजे तो मोठा कलावंत होता, हे ् मुळे आपोआपच निष्पन्न होते.)

इंग्रजीमध्ये अशा प्रकारचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मेकॉलेने केला हे प्रसिद्धच आहे. पण मेकॉलेचा इतिहास चित्रमय व रंजक असला अरी चिंतनशीलता त्यात कमी आहे असे पंडितांचे मत आहे. कार्लाईलच्या 'फ्रेंच रेव्होल्यूशन'मध्ये काव्य आहे, चित्रमयता आहे व चिंतनशीलता आहे, पण मेकॉलेप्रमाणे त्याची शैली प्रसादपूर्ण नाही. हे सर्व गुण इतिहासकारांचा मुकुटमणी असलेल्या गिबनमध्ये जवळ जवळ पूर्णावस्थेस गेले आहेत, तरीही त्याच्यात भावनोत्कटता कमी आहे असा आक्षेप आहेच. मराठीमध्ये सावरकरांचा 'सत्तावनचे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ शास्त्र व कला या दोन्ही दृष्टींनी वैशिष्टचपूर्ण आहे. दुसरा असाच सुंदर ग्रंथ म्हणजे वि गं. लेले यांचा 'शिवशाहीचा अस्त' हा होय.

लिटन स्ट्रॅचो ज्या वेळी लिहीत होता त्याच वेळी महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे लिहीत होते. त्यांचीही इतिहासाबद्दलची कल्पना मुद्दाम देत आहे. या उद्देशाने की, कलात्मक इतिहासाची कल्पना ही पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे सारखीच असू शकते. बाकी चांगली कल्पना पाश्चात्यांची असली म्हणजे ती वाईट होते असे थोडेच आहे ! भावे म्हणतात—

'इतिहासाच्या योगे त्यांच्या दृष्टीला नवीन किरण दिसू लागतील. महाराष्ट्रातील डोंगर आणि नद्या, मैदाने आणि किल्ले त्यांच्याशी बोलू लागतील आणि या अचेतन सृष्टीची भाषा त्यांच्यात चैतन्य खेळवील, व परलोकात गेलेले पूर्वज त्यांच्याशी पुन्हा पुन्हा संभाषण करू लागतील; चित्त उदास झाले असता त्यांचे पूर्वज ते उल्हसित करतील; मन हताश झाले तर ते त्यास धीर देतील; आणि कार्यविन्मुख होऊन चिताग्रस्त झालेल्याना कार्यक्षम करून त्यांच्यात पुन्हा नवी तरतरी आणतील यात संशय नाही. ही जादू, ही जागृतीची करामत महा-

राष्ट्राच्या इतिहासात पूर्णपणे भरलेली आहे. या इतिहासरसायनाचा हा चैतन्य गुण घालवून, त्याचा निःसत्व, निर्जीव, शिथिल, निर्विकार व बेचव चोथा बनविण्याकरिता परकीयांनी जे श्रम घेतले, व जे द्रव्य खर्च केले त्याचे शतांश श्रम व द्रव्य आपण खर्ची घातले तर निःसंशय शक्तिवर्धक व स्वातंत्र्यदायक असे सुंदर ऐतिहासिक रसायन आपण निर्माण करू शकू.'

पण इतिहास ही कला असली, तरी ती 'कलेसाठी कला' नसून 'जीवनासाठी कला' आहे. इतिहासकार हा भूतकाळच्या शिळ्या स्वप्नांच्या धुंदीत झिंगून जाणारा कमलभक्षक उमरखय्याम नसून, भूतकालाच्या घटनांच्या मननाने मुनि आणि राष्ट्राच्या आत्म्याच्या दर्शनाने ऋषि झालेला द्रष्टा आहे – इतिहासाचा उद्देश रंजन नसून प्रबोधन हा आहे. पण इतर सर्व कलांप्रमाणे इतिहासाच्या कलेच्याही बाबतीत बोध हे कारण नसून कार्य आहे. म्हणजे, लोकांना जागे करावे म्हणून सूर्य उगवत नाही, सूर्य उगवला म्हणजे लोक जागे होतात, परिमळ द्यावा म्हणून फूल फुलत नाही, फूल फुलले म्हणजे आपोआप परिमळ दरवळतो, त्याप्रमाणे बोध करावा म्हणून इतिहास लिहिला जात नाही, इतिहास लिहिला म्हणजे त्यातून आपोआप प्रबोधन होते. आता प्रश्न असा आहे की, बोध हे जर इतिहासाचे कार्य असेल, तर हिंदुस्थानच्या विशेषतः मराठ्यांच्या इतिहासापासून कोणता बरे बोध घेता येण्यासारखा आहे? यादवांच्या वेळी मराठ्यांचे स्वराज्य होते. अलाउद्दिनाने त्यांना गुलाम केले. शिवाजी महाराजांनी स्वतंत्र केले. इंग्रजांनी त्यांना परतंत्र केले. आज ते परत स्वराज्यात आहेत. स्वराज्य कसे मिळते हे शिवछत्रपतींचा काळ दाखवतो. स्वराज्य कसे राखता येते हे त्याचे स्वातंत्र्ययुद्ध दाखवते स्वराज्य वाढते कसे हे पेशवाई दाखवते व स्वराज्य जाते कसे हे दुसऱ्या बाजीरावाचा काळ दाखवतो असे स्थूलमानाने म्हणता येईल. आज आपण स्वराज्याचे सुख भोगीत आहोत. त्या दृष्टीने अनेक वेळा स्वराज्य आणि पारतंत्र्य भोगलेल्या मराठ्यांचा इतिहास फारच बोधप्रद आहे. त्यांच्या इतिहासातून कोणता बोध निष्पन्न होतो?

प्रश्न तर मोठा गहन आहे. त्याचे उत्तर माझ्यासारख्याने देणे हे केवळ धाष्टर्य आहे त्यापेक्षा ज्या थोर इतिहासकाराने छत्तीस वर्षांच्या मराठ्यांच्या इतिहासाच्या तपश्चर्येने ऋषिपदवी प्राप्त करून घेतली त्या वासुदेवशास्त्री खऱ्यांच्याच शब्दात ते उत्तर देतो. १९१८ साली मराठशाहीचे शंभरावे श्राद्ध न. चिं. केळकरांनी 'मराठे व इंग्रज' हा ग्रंथ लिहून केले त्याला खरेशास्त्र्यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्या प्रस्तावनेत त्यांनी मराठी राज्य बुडण्याची मीमांसा केलेली आहे. राजवाड्यांच्या पहिल्या खंडाची प्रस्तावना, शेजवलकरांची नानासाहेब पेशव्यांच्या चरित्राची प्रस्तावना, त्याप्रमाणे खरेशास्त्र्यांची ही प्रस्तावना मराठी वाङ्मयात चिरंतन महत्त्वाची आहे. विशेषतः पुढे दिलेला त्यातला शेवटचा परि-

च्छेद वाचला म्हणजे इतिहासकार केवढा द्रष्टा असू शकतो याची प्रतीति आल्याशिवाय राहत नाही. उतारा काहीसा मोठा असला तरी महत्त्वाचा आहे आणि विशेषतः स्वतंत्र भारताच्या प्रत्येक नागरिकाने तर तो पाठ करण्यासारखा आहे.

'आमचा पुणे–सातारा इंग्रजांनी कां घेतला आणि त्यांचा मद्रास–कलकत्ता आम्ही कां घेऊ शकलो नाही, याचा संक्षेपाने येथपर्यंत विचार केला. देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याची सवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगी जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झालेले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्राशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता, त्यातले कोणते फुटावयाचे, मातीचे की लोखंडाचे, हे ठरलेलेच आहे! हल्लीचा काळ असा आला आहे की, आम्ही पाश्चात्यांची बरोबरी तरी करावी, नाही तर त्यांचे मजूर तरी होऊन राहावे, राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिक शास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टीत हीच स्थिति आहे. जर आम्हांस पाश्चात्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल, तर या लेखात वर्णिलेले आमचे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होते ते याच दुर्गुणांमुळे गेले, हे समजून जर आम्ही सावध झालो नाही तर, नवीन स्वराज्य मिळून सुद्धा व्यर्थच आहे, हाच इतिहास–डिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानी घुमत राहिला पाहिजे!'

हा इतिहासाचा बोध आहे, हे इतिहासाचे शास्त्र आहे, ही इतिहासाची कला आहे.

राजस्थान आणि कर्नाटक वगळता हिंदुस्थानात इतर कोणत्याही प्रांताला न लाभलेली, शालिवाहनापासून झाशीच्या राणीपर्यंत हजार वर्षांची उज्ज्वल इतिहासाची परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. महाराष्ट्र हे इतिहासदेवतेचे निवासस्थान आहे. आपल्या ओजस्वी इतिहासाची व इतिहास पुरुषाची महाराष्ट्राला कितपत अभिरुचि आहे?

राजगडची शिवाजी महाराजांची सदर पडून गेलेली आहे. कर्नाटकात होदिगिरीला शहाजीराजांच्या समाधीच्या आसपास डुकरे घोटाळत आहेत. त्यांचे फोटोच श्रीधर तेलकर यांनी आपल्या शहाजी चरित्रांत छापले आहेत. जिज्ञासूंनी ते पहावेत आणि शंकासमाधान करून घ्यावे. पन्हाळ्याला रामचंद्रपंत अमात्याची समाधि कष्टाने शोधावी लागते, मेणवलीला नाना फडणिसाच्या वाड्यात गवत वाढते आहे.

नेपोलियनवर एक लाख पुस्तके आहेत, तरी दरवर्षी नवी पुस्तके लिहिली जातच आहेत. शिवछत्रपतीवर मोजून शंभर चरित्रे तरी असतील की नाही याची

शंका आहे. — केळुसकर, सरदेसाई, पुरंदरे, पगडी, कवडे, बेंद्रे, हरदास, गोखले— संपली लेखकांची श्रेयनामावली. नाना फडणिसाचे एक चरित्र नव्वद वर्षांपूर्वी खरेशास्त्र्यांनी लिहिले तेवढेच. सखाराम बापूंवर एक (कानिटकर), राघोबावर एक (सुंठणकर), महादजी शिंद्यांवर एक (नातू), संभाजीवर तीन (बापट बेंद्रे, सौ. गोखले), थोरल्या बाजीरावावर तीन (बापट, बेहेरे, दीक्षित), नाना साहेबावर एक (सरदेसाई), राजारामावर एक (बेंद्रे), थोरल्या माधवरावावर एक (सहस्रबुद्धे) अशी ठळक ग्रंथनिष्पत्ति आहे. ज्या विषयावर प्रस्तुत ग्रंथ आहे त्यावर मराठीत 'हिंदवी स्वराज्य आणि मोगल' एवढे एकच पुस्तक आहे. ज्यांनी हाडाची काडे करून इतिहास रचले, त्यांची नांवे विसरली जात आहेत हातातोंडाशी आलेला एकुलता एक मुलगा वार्धक्यात मृत्यु पावल्यावर इतिहासालाच मुलगा मानणारे सरदेसाई! समईच्या उजेडात चार लाख पत्रे वाचणारे खरेशास्त्री! कोकणच्या दऱ्याखोऱ्यात कागदपत्रे मिळवण्यासाठी पायपीट करणारे आवळसकर! मधुमेहाने चक्कर येत असतानाही शिवचरित्र लिहिणारे शेजवलकर! रक्तदाब व मधुमेह यांच्याशी झुंजत इतिहास लिहिणारे गोव्याचे पिसुर्लेकर! पुरंदरे दप्तर प्रसिद्ध करणारे पुरंदरे मास्तर! मूठभर अभ्यासक सोडले तर बहुजनांच्या कानापर्यंत यांची नावे तरी गेली असतील की नाही याचीच वानवा!

ज्या शिवाजीने महाराष्ट्राला 'महाराष्ट्र' केले, त्या शिवाजीचे चित्रपट त्यांच्या महाराष्ट्रात चालू शकत नाहीत. 'सिंहगड' 'प्रतापगड' 'पावनखिंड' 'राजा शिवछत्रपति' हे शिवाजीचे चित्रपट शिवाजीच्या छाप्याप्रमाणेच केव्हा येतात व जातात हे कळतही नाही. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धावर 'धन्य ते संताजी धनाजी' 'महाराणी येसूबाई' हे फक्त दोन चित्रपट मराठीत आहेत. त्या संताजी धनाजी प्रमाणे त्यांचे चित्रपटही आता इतिहसजमा झालेले आहेत.

रॉकेलपासून फॅशनपर्यंत सर्वच वस्तु ज्यांच्याकडून आपण उसन्या आणतो, त्या इंग्लड अमेरिकेकडून इतिहासाची उपेक्षा करण्याची ही 'फॅशन' आपण उसनी घेतलेली नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. बाकी इतर कोणत्या बाबतीत असो की नसो, या एका बाबतीत मात्र आपण अगदी 'स्वयंपूर्ण' आहोत. कारण इतिहास जपण्याच्या बाबतीत प्रतिगामी म्हणण्याइतके ते लोक जागरूक आहेत. अजून त्यांच्याकडे नेपोलियनवरचे, किंवा दोनशे वर्षांपूर्वीच्या फ्रेंच राज्यक्रांतीवरचे चित्रपट चालतात. अजून ते स्कॉटलंडमध्ये जुने किल्ले दुरुस्त करतात. अजून ते त्यांच्या शेक्सपीअरची खुर्ची आणि त्यांच्या डिकन्सची शाईची दौत आणि त्यांच्या कार्लाईलचा सोफा वर्षांमागून वर्षे गेली तरी जपून ठेवतात. त्यांनी त्यांचा इतिहास तर जपलाच, पण आपलाही जपला. आपल्या मराठ्यांचा पहिला इतिहासकार ग्रँट डफ हा इंग्रज होता तो अकरा हजार रुपयांना बुडाला पण त्याने मराठ्यांचा इतिहास प्रसिद्ध केला. आपल्या पेशव्यांचे दोन कोटी कागदपत्रांचे दप्तर इंग्रजांनी

जपून ठेविले. आपले शिवाजी-तानाजीचे पोवाडे गोळा करून प्रसिद्ध केले शाळिग्राम नावाच्या शिक्षकाच्या मदतीने, ऑक्वर्थसाहेबाने !

तेव्हा इतिहासाबद्दल आपला जो सध्या 'स्वतंत्र' दृष्टिकोन आहे त्या बाबतीत आपण कोणाचेही ऋणी नाहीत हे उघड आहे. पण केलेल्या कर्माचे फळ चुकत नाही हा इतिहासाचा दंडक इतिहासाच्या उपेक्षेलाही लागू आहे. राजवाडे यांनी म्हटले आहे की, 'विष हे जाणून खा की नेणून खा, त्याचा परिणाम होणारच.' त्याच न्यायाने एक इंग्रज ग्रंथकार म्हणतो – 'The nation that does not know its history is fated to repeat it-' ज्या राष्ट्राला आपला इतिहास माहीत नसतो, त्या राष्ट्राच्या कपाळी इतिहासाची पुनरावृत्ति लिहिलेली असते.

१९२२ साली वि. ल. भावे यांनी ऐतिहासिक ग्रंथाची महाराष्ट्राला कितपत अभिरुचि आहे याबद्दल लिहिले की 'आपल्या पूर्वजांचे पराक्रम ऐकण्याची हौस महाराष्ट्राला थोडीफार आहे, पण त्यासाठी काही द्रव्य खर्चावे व पदराला चट्टा लावून घ्यावा ही इच्छा महाराष्ट्राची दिसत नाही.' 'इतिहास व ऐतिहासिक' सारख्या मासिकाला पुरे दोनशे वर्गणीदारही मिळू नयेत, 'रामदास रामदासी' तोटा खाऊन चालविणे भाग पडावे, 'ऐतिहासिक लेखसंग्रहा'च्या संपादकाला माराकुटीने तोंडमिळवणी करता यावी व स्वतःच्या उदारनिर्वाहासाठी नाटके लिहिण्याची पाळी यावी या गोष्टी शरमेच्या आहेत....आपल्या पूर्वजांनी स्वतंत्रतेसाठी काय हाल सोसले, किती यत्न केले व कसे पराक्रम केले हे जाणण्यासाठी जो दमडी खर्चू इच्छीत नाही त्या पाप्याच्या वंशजांना स्वतंत्रता कोठून मिळेल ?' 'त्यानंतर चोवीस वर्षांनी १९४६ साली पानिपत'च्या प्रस्तावनेत शेजवलकरांनी उद्‌गार काढले की, 'महाराष्ट्रात आज काळ असा आला आहे की इतिहासाचे पुस्तक प्रसिद्ध झाले तर त्यावर दोन ओळी लिहिणारा शोधून काढावा लागतो, व त्याची आर्जव करावी लागते.' जी गोष्ट शेजवलकरांची तीच सरदेसायांची. त्यांनी उभी हयात रियासती लिहिण्यात खर्च केली. स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर रियासतीचे चरित्रात्मक नवे खंड लिहिण्याचा उद्योग त्यांनी नव्वदीत सुरू केला त्यांना प्रकाशक मिळेनात. १९५५ च्या जून महिन्यात माडखोलकरांना त्यांनी खेदाने लिहिले की, 'इतउत्तर रियासतीचे भाग प्रकाशक छापतील असे दिसत नाही. समाधान हे की झाले ते काम केले.' समाधान एवढेच. अलीकडे ढवळे प्रकाशनाने रियासतीची पुनरावृत्ति काढण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे हे आवर्जून सांगितले पाहिजे. पण मुख्य मुद्द्याला त्यामुळे बाध येत नाही. सरदेसायांनी लिहिले त्यालाही आता जवळजवळ पंचवीस वर्षे होत आली. या काळात क्रमिक पुस्तकांचा व्यवहारही प्रकाशकांच्या हातांतून गेलेला असल्यामुळे त्यांची स्थिति ऐतिहासिक ग्रंथाच्या प्रकाशनाच्या बाबतीत किती कठीण झाली असेल याची कल्पनाच केली पाहिजे. आर्यभूषण आणि चित्रशाळा या दोन छापखान्यांनी हरिभाऊ आपटे व

शिवरामपंत परांजपे, विष्णुशास्त्री चिपळूणकर व लोकमान्य टिळक, खाडिलकर आणि राजवाडे या स्वातंत्र्यभक्तांचे ओजस्वी वाङ्मय प्रसिद्ध केले. पारतंत्र्यात ते शंभर वर्षे टिकले. आज स्वराज्यात ते बंद पडलेले आहेत ! छापखान्यांची अवस्था अशी झाली, तेथे प्रकाशनाच्या व्यवसायाबद्दल काय बोलावे !

अशा प्रतिकूल परिस्थितीत इतिहासावरचा ग्रंथ प्रसिद्ध करू पाहणाऱ्या प्रकाशकाचे धाडस सामान्य म्हणता येणार नाही. त्या इतिहासग्रंथांत वर्णन केलेल्या वीरपुरुषांचीच उपमा त्याला शोभू शकेल. ज्यांना श्री. शंकरराव दाते यांच्या कार्याची जवळून माहिती आहे, त्यांना या वर्णनात अतिशयोक्ति वाटणार नाही असे मला वाटते. कारण गेली साठ वर्षे, राजकीय, सामाजिक व धार्मिक आघाड्यांवर प्रतिकूल प्रवृत्तींशी ज्या निर्भय आणि तत्त्वनिष्ठ वृत्तीने ते झुंजत आहेत ते पाहिले, म्हणजे ही उपमा किती समर्पक आहे हे सहज लक्षात येईल. त्यांच्यासारख्या टिळकांपासून इंदिरा गांधींपर्यंतचा काळ पाहिलेल्या, सावरकर, मुंजे, अणे, भोपटकर, केळकर, माटे, मोरारजी देसाई यांच्याशी परिचय असलेल्या, परिणतप्रज्ञ विचारवंताच्या पसंतीला, प्रसिद्ध होण्यापूर्वीच हा ग्रंथ उतरला तेव्हा माझ्या श्रमांचे सार्थक झाल्यासारखे मला वाटले. त्यांच्यासारखा प्रकाशक मिळाला हे माझ्यापेक्षा माझ्या ग्रंथाचे भाग्य म्हटले पाहिजे. हा ग्रंथ इतक्या शुद्ध स्वरूपात छापून प्रसिद्ध होत आहे याचे सारे श्रेय श्री. शंकरराव दाते, त्याचे चिरंजीव व त्यांचे काळ मुद्रणालयातील सर्व सहकारी यांच्या परिश्रमांना आहे. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथासाठी मी वापरलेली अनेक पुस्तके आमच्या चाळिसगावच्या आर्टस् कॉमर्स व सायन्स कॉलेजच्या ग्रंथालयातून उपलब्ध झाली. काही पुस्तके येथील ना. बं. वाचनालयातून मिळाली. ताराबाईकालीन कागदपत्रे हा ग्रंथ येथील आ. बं. हायस्कूलच्या ग्रंथालयातून श्री. भय्यासाहेब अडावदकर यांनी उपलब्ध करून दिला. या सर्व संस्थांच्या अधिकारीवर्गाचा व सेवकवर्गाचा मी आभारी आहे. त्याचप्रमाणे श्री. भय्यासाहेब अडावदकर यांचाही मी आभारी आहे. या ग्रंथात वर्णन केलेल्या संभाजीच्या समकालीन चित्रांची माहिती मला 'नगरजिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाचे अध्यक्ष श्री. जोशी यांच्याकडून मिळाली. त्याचप्रमाणे त्यांच्याशी केलेल्या चर्चेचाही मला फार उपयोग झाला. त्यांचे ऋण मी येथे आनंदाने नमूद करून ठेवितो. त्याचप्रमाणे येथील महाराष्ट्र बँकेतील श्री. पाठक यांनी बऱ्हाणपूर-दर्शन ' हे पुस्तक दिले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

परंतु ज्यांचा नामोल्लेख करता येत नाही किंबहुना तो केला जाऊ नये अशीच ज्यांची इच्छा आहे आणि ज्यांनी कसलीही अपेक्षा न करिता स्वतः मागे राहून माझा ग्रंथ पुढे यावा म्हणून परोपरीचे उत्तेजन दिले आणि मदत केली त्या

निर्हेतुक स्नेही सुहृदाचे ऋण कसे फिटावे ! ते ऋण कधीही फिटले जाणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. कारण पूर्वजन्मीचे ऋणानुबंध यालाच म्हणतात. तरीसुद्धा यश एकाचे असले तरी त्याचे श्रेय अनेकाचे असते, हे विसरता येणार नाही.

असो. शेवटी इतकेच सांगायचे उरले की योगायोगाचा चमत्कार वाटल्याशिवाय राहात नाही. कारण या ग्रंथाचा विषय आहे, औरंगजेबाच्या आक्रमणाचा मराठ्यांनी केलेला प्रतिकार. या ग्रंथाचे प्रकाशन वर्ष आहे १९८१ की ज्या वर्षी औरंगजेबाच्या त्या ऐतिहासिक आक्रमणाला बरोबर तीनशे वर्षे पूर्ण होतात; या ग्रंथाचे प्रकाशन स्थळ आहे पुणे की जे पूर्वी मराठ्यांच्या पराक्रमाचे केंद्र होते व आज विद्येचे माहेरघर आहे व या ग्रंथाचे प्रकाशक आहेत श्री. शंकरराव दात्यांसारखे चारित्र्यसंपन्न देशभक्त ! हा सर्व दुर्लभ संगम पाहिला म्हणजे 'रत्नावली'त श्रीहर्षदेवाने म्हटल्याप्रमाणे म्हणावेसे वाटते की, 'यातली एक एक गोष्ट सुद्धा इच्छित फळ मिळवून देण्यास समर्थ आहे; येथे तर माझ्या भाग्यामुळे या सर्व गुणांचा गण एकत्र आलेला आहे, मग काय बोलायचे आहे ?

'वस्त्वैकमपीह वाञ्छितफलप्राप्तेः पदं किं पुनः ।
मद्‌भाग्योपचयादयं समुदितः सर्वो गुणानां गणः ।।'

जोशी बिल्डिंग
हनुमानवाडी, चाळिसगांव

ऋणनिर्देश

1 History of Aurangzeb vol. I to V – J. N. Sarkar
2 Anecdotes of Aurangzeb – J. N. Sarkar
3 Rukait–1 – Alamgiri
4 Storia de Mogal Vol. I and II – Manuchi
5 Travels in the Mogul Empire – Bernier
6 The First Nizam – Dr. Usuf Husain
७ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह – शं. ना. जोशी
८ शिवपुत्र संभाजी – डॉ. सौ. कमल गोखले
९ छत्रपति संभाजी महाराज – वा. सी. बेंद्रे
१० पोर्तुगीजांशी रणसंग्राम – शं. रा. देवळे
११. पोर्तुगेज–मराठे–संबंध – पिसुर्लेकर
१२ मराठ्यांचा इतिहास – करकरे
१३ विजापूरची आदिलशाही – वा. सी. बेंद्रे
१४ गोवळकोंड्याची कुतुबशाही – वा. सी. बेंद्रे
१५ मराठे व औरंगजेब – सेतुमाधवराव पगडी
१६ मोगल–मराठा संघर्ष – सेतुमाधवराव पगडी
१७ मोगल व मराठे – सेतुमाधवराव पगडी
१८ महाराष्ट्र व मराठे – सेतुमाधवराव पगडी
१९ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध – सेतुमाधवराव पगडी
२० श्रीछत्रपति व त्यांची प्रभावळ – सेतुमाधवराव पगडी
२१ छत्रपति राजाराम महाराज – वा. सी. बेंद्रे
२२ खंडो बल्लाळ –
२३ बाळाजी आवजी चिटणीस – प. रा. दाते
२४ करवीर रियासत – स. मा. गर्गे
२५ मराठ्यांचे सागरी प्रदेशावरील सीमोल्लंघन – डॉ. रवींद्र रामदास
२६ मोगल दरबारची बातमीपत्रे (नवभारत) – सेतुमाधवराव पगडी
२७ औरंगजेबाच्या दरबारचे अखबार–खंड १ – कुलकर्णी, खरे
२८ स्वराज्याचे तीन दुर्ग – ग. ह. खरे
२९ महाराणी ताराबाई – प्रा. जयसिंगराव पवार
३० ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ – आ. गं. पवार
३१ मराठेकालीन समाजदर्शन – शं. ना. जोशी

३२ मुसलमानी रियासत खंड १ व २ } गो. स. सरदेसाई
३३ मराठी रियासत – सर्व खंड
३४ ब्रिटिश रियासत पूर्वार्ध
३५ Tarabai and Her Times – Braj Kishor
३६ राजाराम चरितम् – वा. सी. बेंद्रे
३७ रायगडची जीवनकथा – शां. वि. आवळसकर
३८ पन्हाळडगड
३९ संस्कृतिकोश–पं. महादेवशास्त्रीजोशी
४० बऱ्हाणपूर दर्शन
४१ श्रीशिवछत्रपति – त्र्यं. शं. शेजवलकर
४२ निजाम–पेशवे संबंध – त्र्यं. शं. शेजवलकर
४३ शेजवलकर लेखसंग्रह – त्र्यं. शं. शेजवलकर
४४ मराठ्यांच्या इतिहासाची साधने } स. शं. देसाई
पोर्तुगीज दप्तर खंड ३
आशिया विभाग खंड १ ते ५
४५ असे होते मोगल – चौबळ
४६ विजापूर वर्णन
४७ महाराष्ट्र दर्शन – गो. नी. दांडेकर
४८ दुर्गदर्शन – गो. नी. दांडेकर
४९ महाराष्ट्राची धारातीर्थे – महादेवशास्त्री जोशी
५० कर्नाटक – महादेवशास्त्री जोशी
५१ तामिळनाडु – महादेवशास्त्री जोशी
५२ स्वराज्यावरील संकट – नाथमाधव
५३ स्वराज्यातील दुफळी – नाथमाधव
५४ केवळ स्वराज्यासाठी – ह. ना. आफ्टे
५५ महापर्व – स. शं. देसाई
५६ शहेनशहा – ना. सं. इनामदार
५७ राजा शिवछत्रपति – ब. मो. पुरंदरे
५८ पुरंदऱ्यांची दौलत – ब. मो. पुरंदरे
५९ पुरंदऱ्यांची नौबत – ब. मो. पुरंदरे
६० हिंदवी स्वराज्य आणि मोगल – सेतुमाधवराव पगडी
६१ वाटचाल – रा. भि. जोशी
६२ बारा गावचं पाणी – वसंत बापट
६३ मजल दर मजल – रा. भि. जोशी
६४ भूतावर भ्रमण – य. न. केळकर

६५ विशाखा – कुसुमाग्रज
६६ आज्ञापत्र – रामचंद्रपंत अमात्य
१ प्र. न. जोशी
२ वि. भि. कोलते
३ पांढरी पांडे
४ श्री. ना. बनहट्टी यांच्या आवृत्या
प्रसंगोपात्त उपयोगात आणलेली मासिके
(१) नवभारत
(२) इतिहास व संस्कृति
(३) निबंधसंग्रह (महाराष्ट्र इ. परिषद)
(४) भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक इ.
६७ संशोधन मुक्तावलि – वा. वि. मिराशी
६८ सभासद बखर
६९ चिटणीस बखर – संभाजी राजाराम चरित्र
७० चिटणीस बखर (शिवाजी)
७१ कळस – म. श्री. दीक्षित
७२ इतिहास–विचार–तरंग – दि. के. देशपांडे
७३ जीवनसेतु – सेतुमाधवराव पगडी
७४ स्वर्गनगरी (खुल्दाबाद) लेख – रा. भि. जोशी (किशोर, जानेवारी, १९७५)
७५ श्रीसमर्थ चरित्र – स. खं. आळतेकर
७६ श्रीसमर्थचरित्र प्रथम खंड – शं. श्री. देव
श्रीसमर्थावतार
७७ मराठ्यांच्या राज्यकथा – गो. स. सरदेसाई

विषयानुक्रम

पूर्वार्ध

उत्तरार्ध

छत्रपति संभाजी

(पूर्वार्ध)

(१३ नोव्हेंबर १६८१ ते ११ मार्च १६८९)

चालला पुढे तो काय ऐट, आनंद !
अग्नीचा ओघळ ओहळतो जणु मंद !
टाकली यमाने कटचार वा कनकाची
चालली बळीचा वेध घेत ती धुंद !

— कुसुमाग्रज
(अहि-नकुल)

मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर

(१६८१ ते १७०७)

(१)

चार एप्रिल सोळाशे ऐंशी, शनिवार, चैत्री पौर्णिमा या दिवशी दोन प्रहरी रायगडावर सिंहासनाच्या मागील खास महालात छत्रपति शिवाजी महाराज अवघ्या आठ दिवसांच्या आजाराने निधन पावले.

महाराजांचे निधन अगदी अकाली आणि अकस्मात् झाले. महाराजांचे वडील शहाजीराजे सत्तर वर्षे जगले आणि त्यांना मृत्यु आला तोही होदेगिरीच्या जंगलात शिकार करताना झालेल्या अपघातामुळे. महाराजांचे आजोबा मालोजीराजे लवकर गेले, पण ते लढाईत मारले गेले. महाराजांच्या मातुश्री जिजाबाई साहेब यांना चौऱ्याहत्तर वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. त्या मानाने महाराजांना आता कोठे नुकतेच पन्नासावे वर्ष पुरे होत होते. कर्तृत्वाचा आता कोठे मध्याह्न झालेला होता. अजून पुष्कळ दिवस बाकी राहिला होता. नुकतेच महाराजांनी उत्तरेच्या मोगली आक्रमणाला तोंड देण्यासाठी पेशवे आणि सेनापति यांना दारूगोळा व फौज सिद्ध ठेवण्याचे हुकूम दिले होते. पन्हाळगडावर युवराज संभाजीची भेट घेतली होती. धाकट्या राजारामाचे लग्न उरकले होते. फाल्गुनी अमावास्येला सूर्यग्रहण आले त्या वेळेला परम श्रद्धेने दानधर्मादि धर्मकृत्ये केली होती, आणि कोणाच्या ध्यानीमनी नसता या चैत्री पौर्णिमेला महाराजांच्या आयुष्याची दोरी एकाएकी तुटली होती.

खरे पाहता जीवनात कोणतीच गोष्ट एकाएकी घडत नाही. नदीच्या तटावर वर्षानुवर्ष उभा असलेला महावृक्ष एकाएकी नदीत कोसळतो, पण त्यापूर्वी क्षणाक्षणाने त्याची मुळे जमिनीपासून निसटत असतात आणि त्याला आतून कीड लागून तो पोखरला जात असतो. गेली चारपाच वर्षे महाराजांच्या जीवनवृक्षाला अशीच आतून कीड लागत चालली होती आणि त्यांची प्रकृति झपाट्याने खचत चालली होती. त्यांची तेजस्वी अंगकांति, त्यांचे गरुडासारखे नाक, त्यांची समोरच्या माणसाच्या अंतरंगाचा ठाव घेणारी भेदक नजर, शब्दाशब्दाला मुखावर प्रतीत होणारा मंदहास्याचा आभास, त्यांच्या मुद्रेवरील त्वरा, निश्चय, धैर्य ही पूर्वीप्रमाणेच होती; पण या सर्वांच्या मुळाशी असलेला जीवनाचा झरा झपाट्याने आटत चालला होता. पस्तीस वर्षांपूर्वी "हे महाराष्ट्र राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे" असा उग्र संकल्प त्यांनी रायरेश्वराच्या साक्षीने सोडला आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करून त्यांनी या संकल्पाची सांगता केली. पण त्यांना एका क्षणाचीही

विश्रांति मिळाली नाही. ऊन, थंडी, पाऊस, वारा, दिवस, रात्र कशाचीही तमा बाळगता आली नाही. पन्हाळचाहून विशाळगडावर गेले ते अंधार, वादळ, पाऊस, विजा यांच्या तांडवनृत्यातून! शाईस्तेखानावर छापा घातला तो ऐन मध्यरात्री. प्रतापगडावर अफझुलखानाशी झुंज घेतली ती अगदी समोरासमोर. आग्र्याच्या तुरुंगातून निसटून आले ते वेष पालटून, पेटाऱ्यात बसून, हजार मैलांची घोडदौड व पायपीट करून व औरंगजेबाचे पहारे चुकवून! या जिवावरच्या प्रसंगात महाराजांना यश मिळाले पण त्यांना त्याबद्दल जी शारीरिक आणि मानसिक किंमत द्यावी लागली ती जबरदस्त होती. आग्र्याहून महाराज राजगडावर आले आणि दोन महिने ते अंथरुणाला खिळून होते. स्वराज्य त्यांनी मिळविले, पण स्वराज्यानेही त्याची किंमत पुरेपूर वसूल केली. स्वराज्य आले, पण महाराज गेले! 'गड आला पण सिंह गेला' हे त्यांचे तानाजीबद्दलचे उद्गार त्यांना स्वतःलाही लागू पडले. तानाजी विजेप्रमाणे चमकून क्षणात गेला. महाराज दीपज्योतीप्रमाणे वर्षानुवर्ष जळत राहिले. पण स्वराज्य दीर्घायुषी झाले तरी त्याने महाराजांचे आयुष्य घेतले, महाराज अल्पायुषी झाले.

पण कवीने म्हटले आहे – "क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते" – अशा सर्व शारीरिक व मानसिक यातनांचे परिमार्जन यशाने होते. पण महाराजांच्या जीवनात अशी काही दुःखे होती, की कोणत्याही यशाने त्याचा चटका कमी होणे शक्य नव्हते. तीन तपांपूर्वी महाराजांनी स्वराज्याच्या या साधनेला प्रारंभ केला. त्या महासंग्रामात त्यांच्या बरोबर असलेले किती तरी सोबती आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरच त्यांचा निरोप घेऊन निघून गेले होते. महाराजांची आज्ञा प्रमाण मानून मुलाचे लग्न टाकून, अर्ध्या रात्री डोणागिरीचा बेलाग कडा चढून जाऊन कोंडाणा सर करणारा नरसिंह तानाजी! पुरंदरच्या समरभूमीवर दिलेरखानाने मस्तक उडविले तरी ज्याचे कवंध लढले अशी ज्याची कीर्ति, तो मुरारबाजी देशपांडे! गजापूरच्या खिंडीत अवघ्या तीनशे मावळ्यांनिशी ज्याने धडकावर धडका देणारे मोगली सैन्याचे लोट तासन् तास झुंजून अडवून धरले आणि खेळण्यावर पोचलेल्या महाराजांची तोफ ऐकल्यावरच प्राण सोडला, तो बाजी प्रभु! काय. सावंतांशी लढताना पंचवीस जखमा लागून धारातीर्थी पडलेला बाजी पासलकर! 'जय मिळाल्याविना आम्हांस तोंड दाखवू नये' हे महाराजांचे शब्द जिव्हारी लावून घेऊन अवघ्या सहा स्वारांनिशी नेसरीच्या खिंडीत बहलोलखानाच्या सेनासागरावर, दिव्यावर झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणे, झडप घालून भस्मसात् झालेला तो वेडा तरीही शहाणा प्रतापराव गुजर! असे किती वीर वर्णावे, किती जणांचे पोवाडे गावे! हे सारे गेले होते. परत न येण्यासाठी गेले होते. त्यांच्या जाण्याचे दुःख महाराजांनी हालाहल गिळणाऱ्या शंकराप्रमाणे पचविले होते; पण त्या दुःखाने त्यांच्या अंतःकरणाला घरे पडली होती. त्या दुःखाचे सांत्वन कशानेही होणार नव्हते.

आणि महाराजांचा दैवयोग असा विलक्षण की इतक्या प्राणार्पणाची सांगता झाली आणि हिंदवी स्वराज्याचे स्वप्न मूर्त झाले. या युगात सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा असताना मराठा बादशहा झाला ही गोष्ट सामान्य झाली नाही. क्षत्रिय कुलावतंस महाराज सिंहासनाधीश्वर झाले. सफलतेच्या समाधानाने रामदासासारख्या विरक्त साधूने सुद्धा उद्गार काढले की, "बुडाला औरंग्या पापी, म्लेंच्छसंहार जाहला। मोडिली मांडिलीं क्षेत्रे, आनंदवन भूवनी ॥" महाराजांच्या कर्तृत्वाने, यशाने आणि भाग्याने पराकाष्ठा गाठली आणि योगायोग असा, की त्यानंतर केवळ बारा दिवसांनी महाराजांच्या मातुश्री जिजाबाई साहेब कैलासवासी झाल्या! या मानवी जीवनात सुखानंतर दुःख आणि दुःखानंतर सुख चक्राप्रमाणे एकामागून एक अखंड फिरत असते, हे खरे आहे. परंतु एवढ्या मोठ्या सुखानंतर एवढे मोठे दुःख आणि तेही अकस्मात् जणू पूर्वीच्या सुखाचा सूड घेतल्यासारखे कोसळावे हे नियतीचे निर्घृण लीलाकैवल्य म्हटले पाहिजे.

जिजाबाईने दुःख फार पाहिले. निजामशाहीतल्या लखूजी जाधवराव या सिंदखेडच्या बलाढ्य आणि तालेवार जहागीरदारची ही लाडकी लेक आणि निजामशाहीतल्या वेरूळच्या मालोजी राजे भोसले या मातबर सरदारची ही सून; पण आयुष्यात सुख कशाला म्हणतात ते तिला शोधूनही सापडले नाही. तिच्या माहेरचे जाधव आणि सासरचे भोसले या दोघांचेही हाडवैर होते; आणि एका धुमश्चक्रीत तिचा चुलत दीर संभाजीराजे भोसले याने तिचा भाऊ दत्ताजी जाधवराव याचा वध केला. त्याचा सूड म्हणून तिच्या बापाने संभाजीला ठार मारले आणि प्रत्यक्ष तिच्या नवऱ्यालाही तो मारणार होता, पण लढाईत तो बेशुद्ध होऊन खाली कोसळला म्हणून वाचला. तिचा बाप लखूजीराजे जाधवराव हा निजामशाहीचा कदीम सेवक होता; पण निजामशहाने दगाबाजीने तो मुलासह मुजऱ्यास आला असता दरबारात सरदारांकडून त्यांची खांडोळी उडविली. एका दिवसात जिजाबाई आपला बाप लखूजी जाधवराव आणि हत्तीसारखे एकापेक्षा एक प्रतापी तिघे भाऊ अचलोजी, रघोजी आणि यशवंतराव यांना मुकली. तिचा नवरा शहाजीराजे भोसले हा सासऱ्यासारखाच प्रतापी, पण त्यालाही निजामशाही, आदिलशाही, मोगलाई यांच्या सेवेत कृतघ्नतेचा आणि विश्वासघाताचा अनुभव घेत काळ कंठावा लागला. फार फार उशीरा, आयुष्याच्या अखेरच्या पर्वात त्याला स्वतंत्रता लाभली तीही मर्यादितच. नवऱ्याचा सहवासही तिला म्हणावा तसा मिळाला नाही. तो तुकाबाईसह बंगलोरला आणि ही शिवाजीला घेऊन पुण्याला अशी वर्षानुवर्ष राहात असत. तिचा थोरला मुलगा संभाजी याला अफझुलखानाने विश्वासघाताने कनकगिरीच्या मोहिमेत ठार मारले. तिच्या नवऱ्याला हरामखोरी करून अफझुलखान आणि मुधोळचा बाजी घोरपडे यांनी साखळदंडांनी बांधले आणि विजापूरला मिरवीत नेले. तिचा मुलगा शिवाजी याच्यावर क्षणोक्षणी, अफझुल-

खानाच्या भेटीच्या वेळेस, आग्र्याला औरंगजेबाच्या कैदेत पडल्यावर, पन्हाळगडावरून निसटताना, प्राणसंकट कोसळले. तिच्या आधी शहाजीराजे अपघाताने दूर मृत्यु पावले आणि तिला एकटीला मागे राहावे लागले. या प्रत्येक प्रसंगी तिच्या जिवाला ज्या कळा लागल्या असतील त्या तिला माहीत की त्या ईश्वराला माहीत! लहानपणी लग्न होऊन नवी नवरी म्हणून भोसल्यांच्या घरात नांदायला आल्यापासून तो रायगडावर केस पिकून पांढरे झालेली वृद्ध राजमाता होईपर्यंत मुलगी म्हणून, बहीण म्हणून, बायको म्हणून, आई म्हणून, असे एक म्हणजे एक स्त्रीच्या जीवनातले दुःख नव्हते की ज्याने जिजाबाईच्या अंतःकरणाला पोळून काढले नव्हते. तिच्या जन्माची कहाणी ही साऱ्या स्त्रीजन्माची सनातन कहाणी होती,— करुण, कोमल आणि उदात्त !

तरीही जिजाबाई भाग्यवान् होती. कारण शिवाजीने तिच्या साऱ्या मनीषा पूर्ण केल्या आणि तिचे सारे पांग फेडले. "तुझ्या वंशात शककर्ता राजा जन्माला येईल" हा वेरूळच्या घृष्णे वराने मालोजीराजांना दिलेला दृष्टान्त तिच्या पोटी येऊन त्याने सार्थ करून दाखविला होता. तिने लहानपणापासून त्याच्या मनावर ठसविलेले हिंदवी स्वराज्याचे ध्येय त्याने प्रत्यक्षात आणिले होते. तिच्या थोरल्या मुलाचा कपटाने घात करणाऱ्या अफझुलखानाचा कोथळा वाघनखाने बाहेर काढून आणि त्याचे मस्तक तिला दाखवून फार दिवस तिच्या मनात धगधगत असलेला वैराग्नि त्याने शमविला होता. शहाजीला विश्वासघाताने पकडणाऱ्या बाजी घोरपडयाला त्याने ठार मारले, त्याचे मुधोळचे घरदार जमीनदोस्त केले आणि त्याच्या कुटुंबाची कत्तल करून सूड घेण्यासाठी तळमळणाऱ्या आपल्या मेलेल्या बापाच्या आत्म्याला आणि जिवंत राहिलेल्या आईला संतुष्ट केले. स्वतंत्र भूपति म्हणून रायगडच्या स्वतंत्र राजधानीत त्याच्या मस्तकावर छत्र-चामरे ढाळलेली तिने पाहिली. पाहण्यासारखे सर्व पाहिले, आता डोळ्यांचे पारणे फिटले, कोणती इच्छा राहिली नाही. अशा कृतार्थतेच्या जाणिवेने आनंदाने तिने डोळे मिटले. जन्मभर अनंत दुःखे भोगलेल्या जिजाबाईचा शेवटचा दिवस गोड झाला. ती सुखात गेली.

परंतु असा कितीही विवेक केला तरी त्यामुळे मातृवियोगाच्या दुःखाचा आवेग थोडाच कमी होणार होता ! महाराज परम मातृभक्त होते. 'न मातुः परं दैवतम् ।' वडिलांची अवज्ञा क्वचित् राजकारणप्रसंगाने नाइलाज म्हणून झाली असल्यास असेल. पण मातेचे मन त्यांनी कदापि मोडले नाही. महाराजांचे वडील शहाजीराजे हे प्रतापी. महाराजांना त्यांच्याबद्दल निःसीम आदर होता. पण पितापुत्रांचा ग्रहयोगच असा की एकमेकांचा सहवास फार घडू नये. लहानपणी महाराज आईबरोबर वडिलांच्या बंगलोरच्या जहागिरीवर आणि विजापूरला गेले होते. त्यानंतर बापाचो कर्नाटकात आणि मुलाचो महाराष्ट्रात राजकारणे

इतकी वाढली की दोघांची भेट चोवीस वर्षांनी झाली. या प्रसंगी शहाजीराजे मुद्दाम मुलाच्या भेटीसाठी कर्नाटकातून आले होते. इतक्या प्रदीर्घ कालानंतर भेट झाली म्हणून जेजुरीच्या खंडोबाच्या देवळात प्रथम काशाच्या ताटात पिता-पुत्रांनी परस्परांची प्रतिबिंबे पाहिली आणि मग प्रत्यक्ष भेटी झाल्या. या वेळी महाराजांनी स्वतः पायउतार होऊन जोडा न घालता, शहाजीराजांची पालखी आपल्या खांद्यावर घेऊन मोठ्या मर्यादेने लष्करात डेऱ्यास आणली. मुलाला बापाबद्दल आणि बापाला मुलाबद्दल कमालीचा जिव्हाळा होता. पण राजकारणाच्या सोयीसाठी म्हणून कां होईना, त्याचे उघड प्रदर्शन करणे हिताचे नव्हते; व उभयतांनी एकमेकांच्या नेहमी जवळ राहणे सोयीचे नव्हते. कारण कर्नाटकात ते जवळजवळ स्वतंत्र राजे असले, तरी बाह्यात्कारी आदिलशाहीचे ताबेदारच होते. पण दूर असले तरी शहाजीराजांची नजर सदैव महाराजांच्या राजकारणावर खिळलेली होती. त्यात यश यावे म्हणून जेजुरीच्या खंडोबाला लक्ष रुपयांच्या चांदीच्या मूर्ति वाहण्याचा नवस त्यांनी केला होता. कर्नाटकातल्या कारागिराकडून आणविलेल्या त्या मूर्ति वाहून तो नवस त्यांनी याच प्रसंगी फेडला. पण महाराजांच्या कार्याला त्यांचा आशीर्वाद लाभला, तरी त्यांची प्रत्यक्ष संगत महाराजांना लाभली नाही. महाराज पुण्याला महाराष्ट्रात आणि शहाजीराजे दूर कर्नाटकात. बंगलोरला होदेगिरीच्या जंगलात जंगली श्वापदाचा पाठलाग करताना एका विवरामध्ये शहाजीराजांच्या घोड्याचा पाय अडखळला. राजांचा आणि घोड्याचा दोघांचा तोल गेला. शहाजीराजांच्या मानेला जबर मार बसला. एक पाय रिकिबीत अडकला होता. त्यामुळे धावणाऱ्या घोड्याबरोबर शहाजीराजे तसेच फरफटत गेले. फर्लांगभर अंतर पळून घोडा 'लायदा होळा' नांवाच्या जागेवर थांबला. तोपर्यंत शहाजीराजांचे प्राण निघून गेले होते. वडिलांच्या या अखेरच्या क्षणीही महाराज जाऊ शकले नाहीत. ते सुरतेवर छापा घालण्यास गेले होते. महाराजांचे सावत्र बंधु एकोजीराजे यांनी वडिलांची उत्तरक्रिया केली आणि समाधि बांधली. महाराजांनी त्या समाधीसाठी छत्री पाठवून दिली. शहाजीराजे गेल्यानंतर महाराजांना अत्यंत दुःख झाले की "त्यांच्यामागे आपणास वडील कोणी राहिले नाही." पण महाराजांचे दैव असे की त्यांच्या जन्मापासून तो वडिलांच्या मृत्यूपर्यंत वडिलांची संगत अशी त्यांना फारशी लाभलीच नाही.

पण जिजाबाईची गोष्ट तशी नव्हती. महाराजांचे थोरले बंधु संभाजीराजे हे वडिलांबरोबर कर्नाटकात असत आणि त्यांना धाकटा सख्खा भाऊ कोणी नव्हता. त्यामुळे लहानपणापासून मुलाला आई आणि आईला मुलगा हेच एकमेकांचे सर्वस्व होऊन राहिले होते. महाराजांच्या आयुष्यातला एकही प्रसंग असा नव्हता की ज्याच्यावर जिजाबाईचा ठसा उमटलेला नव्हता. बाळपणी तिने त्यांना रामायण–महाभारतांच्या कथा सांगितल्या आणि धर्मराज्य उभे करण्याची

स्फूर्ति दिली. त्या कथांचा ठसा महाराजांच्या मनावर इतका खोल उमटला होता की चाळीस वर्षांनंतर एकोजीराजांना उपदेश करताना त्यांना त्या कथांची आठवण झाली व त्यांनी लिहिले – "गृहकलह वाढवू नये. वाढविल्याने पहिले युगी पांडव कौरव बहुत बहुत कष्टी झाले. ते सारी भारताची कथा मनात आणून गृहकलह वाढविलियास उभयपक्षी कष्टी होईजेत असे जाणून मागे बहुता रीती सांगून पाठविले की, तुम्ही आम्ही वाटे करून घेऊ; परस्पर समाधाने राहू, परंतु तुम्ही दुर्योधनासारखी दुष्ट बुद्धि धरून संधि न करावा, युद्ध करावे ऐसेच मनीं धरिले."

महाराजांच्या जिवावर कोसळलेल्या प्रत्येक संकटाच्या वेळेस महाराजांच्या मागे आईचा आशीर्वाद उभा होता. अफझुलखानाला भेटायला निघताना त्यांनी तिच्या पायांवर मस्तक ठेवले, आणि यश मिळवून ते परत आले. तिचा आशीर्वाद हे आपले वज्रकवच आहे अशी त्यांची श्रद्धा होती. आग्र्याहून महाराज बैराग्याच्या वेषात राजगडला जिजाबाईच्या दर्शनाला आले, पण तीही त्यांना प्रथम ओळखू शकली नाही, इतके महाराजांनी बेमालूम वेषान्तर केले होते. मस्तकावरची धाबळी दूर केली आणि जेव्हा अफझुलखानाने पूर्वी केलेल्या कटयारीच्या जखमेची खूण दिसली तेव्हा आईसाहेबांना आनंदाश्रु आवरेनात ! त्या अद्भुत आणि गोड प्रसंगाची आठवण कधी तरी विसरणे शक्य होते काय? पन्हाळयावर सिद्दी जौहरच्या वेढयात महाराज कोंडले गेले, कोणीही ती कोंडी फोडण्यास धजेना, तेव्हा जिजाबाई स्वत: तलवार घेऊन रणांगणावर निघाली. राज्याभिषेकाच्या वेळी मातुश्रीची पूजा करून महाराज परम कृतज्ञतेने म्हणाले की, "आपले आशीर्वादें मनोरथ सिद्धीस गेले." जिजाबाई म्हातारी झाली, तिला रायगडची थंडी आणि वारा सहन होईना, तेव्हा महाराजांनी रायगडच्या उतरणीवर पाचाड येथे भव्य वाडा बांधून दिला आणि येता जाता तिचा आशीर्वाद घेऊन कार्योपक्रम करण्याचा परिपाठ ठेवला. एखादा कृपण जसा आपल्या धनास जपतो, तसे महाराज आपल्या आईस जपत होते; कारण ज्या जगात आई नाही त्या जगाची कल्पनाच त्यांना करता येत नव्हती. दहा वर्षांपूर्वी शहाजीराजे गेल्यानंतर जिजाबाई सती जाण्यास निघाली होती, तेव्हा महाराजांनी मोठ्या प्रयासाने आपली शपथ घालून तिला परतविले होते. पण आज आई गेली होती, आणि कोणत्याही उपायाने ती परत येणार नव्हती. महाराजांचे भाग्य की वयाची पंचेचाळीस वर्षें होईपर्यंत त्यांच्या मस्तकावर आईचे छत्र राहिले. पण ते सुख कुणाला पुरे झाले आहे ! जिजाबाईच्या मृत्यूने महाराज पोरके झाले. ते एकाकी, निराधार झाले. त्यांना दिशा ओस झाल्या. जीवन उदास वाटू लागले. कशात रस राहिला नाही.

दु:खे कधीं एकेकटी येत नाहीत, ती नेहमी जथ्याने येतात असे म्हणतात. त्या न्यायाने याच वेळी दु:खात भर म्हणूनच की काय, महाराजांचे राजकीय

ऐश्वर्य कळसास पोचले असताना दुर्दैवाने त्यांच्या घरात गृहकलहाने पेट घेतला. त्यांची धाकटी असलेली, पण आता पट्टराणी झालेली सोयराबाई हिने आपला मुलगा राजाराम याला राज्य मिळावे म्हणून हट्ट धरला. त्यांचा थोरला मुलगा संभाजी याचे अण्णाजी दत्तो सचिव, मोरोपंत पिंगळे, राहुजी सोमनाथ या महाराजांच्या जुन्या मंत्र्यांशी पटेना. आणि त्याहीपेक्षा विशेष म्हणजे संभाजीच्या चारित्र्याबद्दल तक्रारी आणि बोभाटे महाराजांच्या कानावर येऊ लागल्यामुळे त्यांचे मन:स्वास्थ्य पार ढासळून गेले. ते जबरदस्त आजारी पडले.

वस्तुत: ही अतिशय खेदाची गोष्ट होती. कारण महाराजांनी संभाजीचे लालनपालन मोठ्या दक्षतेने केले होते. त्याला मुलकी व लष्करी कारभाराचेही शिक्षण मुद्दाम दिले होते. राजनीतीचे प्रत्यक्ष धडे शिकविले होते. ते या उद्देशाने की आपल्यानंतर राज्याचा उत्तराधिकारी म्हणून त्याच्यावरच भार सोपवायचा. संभाजीची आई सईबाई ही फलटणच्या वणगोजी नाईक निंबाळकर याची नात; ती महाराजांची पहिली बायको. सईबाईला सकबारबाई, राजूबाई व अंबिकाबाई या तीन मुलींच्या पाठीवर मुलगा झाला तो संभाजी होय. संभाजीला आईचा सहवास फार थोडे दिवस लाभला. तो दोन वर्षांचा असतानाच सईबाई मृत्यु पावली. या वेळी अफझुलखानाचा आणि महाराजांचा संघर्ष अगदी निकराला आलेला होता. महाराजांच्या वाट्याला अनेक दु:खे जीवनात आली. त्यात हे ज्येष्ठ पत्नीच्या चिरवियोगाचे दु:ख होते; आणि भोसल्यांच्या कुळातले पहिले मूल म्हणून ज्याचे कौतुक, तो आईविना पोरका झालेला त्यांना पाहावा लागला.

पण जिजाबाईने आपल्या लाडक्या नातवाचा सर्वतोपरी सांभाळ केला आणि महाराजांप्रमाणेच त्याला शिक्षण दिले. सईबाई असतानाच तिला दूध नसल्यामुळे जिजाबाईने मौजे नसरापूर कापूरव्हाळ येथील गाडे घराण्यातील धाराई नावाची बाई संभाजीकरिता दाई म्हणून ठेविली. या बाईला जिजाबाईने सालिना पंचवीस होनांची तैनात करून दिली. आई असताना जिची एवढी माया, ती आई गेल्यावर त्या मुलाला कसे सांभाळील हे काय सांगावयास पाहिजे? जिजाबाई असेपर्यंत संभाजीला आईची फारशी उणीव भासली नाही.

त्या काळी राजकारणात भाग घेणे हेच राजकारणाचे शिक्षण असे. महाराज आग्र्याला गेले तेव्हा संभाजीला बरोबर घेऊन गेले. त्या वेळी त्याला पंचहजारी मनसब मिळाली. तेथून परत येताना मथुरेला मोरोपंत पिंगळे यांचे त्रिवर्ग मेहुणे राहत होते. त्याला त्यांच्याकडे ठेवून आले. सहा महिन्यांनंतर त्यांनी त्याला सुखरूप परत आणल्यानंतर कृष्णाजी विश्वासराव त्याची आई व काशी त्रिमल या त्रिवर्गास महाराजांनी रोख पन्नास हजार रुपये बक्षीस दिले. नंतरच्या तहान्वये संभाजीस पंचहजारी मनसब व वऱ्हाड खानदेशाचा मोकासा औरंगजेबाने दिल्यामुळे संभाजी येऊन जाऊन औरंगाबादेस शहा आलम याच्याकडे असे व त्याच्यातर्फे प्रतापराव

गुजर काम पाही. शहाजादा शहा आलम आणि संभाजी यांची मैत्री फारच जमली. शहाजादा औरंगजेबाविरुद्ध असंतुष्ट होता. त्याचा हा असंतोष उत्तेजित करण्याची महाराजांनी संभाजीस सूचना केली, व परसत्तेच्या वारसास फोडण्याच्या भेदनीतीचा पहिला पाठ संभाजीस दिला असा काही पंडितांचा तर्क आहे. हा तर्क कितपत युक्तिसंगत आहे हे सांगणे कठीण आहे. पण औरंगाबादेत शहाजाद्याच्या संगतीत मोगली कारभाराचे स्वरूप पाहण्याची संधि महाराजांनी संभाजीस दिली त्यामागील उद्देश त्याला प्रत्यक्ष राजकीय शिक्षण मिळावे हाच होता हे मात्र खरे. तो साध्य झाला हे निर्विवाद होय.

संभाजी या वेळी पंधरा वर्षांचा होता. महाराजांनी त्याला कारभारात घेतले व स्वतंत्र लेखकही नेमून दिला. वेळोवेळी एखाद्या मोठ्या तुकडीचे नेतृत्व त्याला करायला सांगितले जाई, हेतु हा की त्याला लष्करी शिक्षणही मिळावे. यांही बाबतीत संभाजी बापाच्या पूर्ण पसंतीस उतरला. संभाजीने आपल्या सैनिकांची मने पूर्ण जिंकली होती. त्याचा बांधा मजबूत होता आणि रूपाने तो अतिशय देखणा होता. त्याचे अप्रतिम सौंदर्य हाच सैनिकांना त्याच्याकडे आकर्षित करणारा प्रमुख गुण होय. आपल्या छोट्या सेनापतीची आज्ञा पाळण्यात त्याच्या सैनिकांना धन्यता वाटे. त्याला ते महाराजांइतकाच मान देत. कुणी कर्तबगारी दाखविली तर त्याचे चीज करण्यात संभाजी नेहमी पुढे असे. अगदी थोड्या काळात रणांगणावरही संभाजीची इतकी वाहवा झाली की, एका मार्मिक प्रवाशाने म्हटल्याप्रमाणे, खुद्द महाराजांना सुद्धा, त्याचा हेवा वाटला असता – जर मुलाचा हेवा करण्याइतके त्यांचे मन हलके असते तर !

केवळ लष्करी नव्हे, केवळ मुलकी नव्हे किंवा दोन्हीही नव्हेत, तर या दोहो-बरोबर संस्कृत विद्येमध्ये सुद्धा संभाजी पंडित होत चालला होता. त्या धाम-धुमीच्या काळात संस्कृत विद्येत इतका रस राजकारणी माणसाला असणे ही काहीशी अपूर्वाईचीच गोष्ट म्हणावी लागेल. संभाजीने शृंगारपूरच्या केशवभट्टा-कडून रामायण श्रवण केले होते. त्याने स्वतः पुढे बुध-भूषण नांवाचा संस्कृत ग्रंथ रचिला. त्याच्या प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे त्याला काव्य येत होते; अलंकार-शास्त्र येत होते; संगीत समजत होते; पुराणे अवगत होती; व धनुर्वेद संपूर्ण माहीत होता. त्याला धर्मशास्त्र समजत होते व धर्मनिर्णय करता येत होता. एका वादीने संभाजीकडे तक्रार केली, त्यात 'साहेबां'च्या म्हणजे संभाजीच्या शास्त्र-पांडित्याबद्दल निर्वाळा दिला आहे. ''साहेब सर्वज्ञ, शास्त्रार्थाचा अर्थ स्वतः पंडिताचा निशा होय ऐसा करिताती.''

असा हा सतरा वर्षांचा तरणाबांड मुलगा. रूपाने मदनासारखा देखणा तो शस्त्रात पारंगत झाला. तो शास्त्रात प्रवीण झाला. राजकारणाचे चातुर्य त्याला येऊ लागले, मोगली दरबारात दोन वेळा जाऊन त्याने जगाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

तेव्हा या मुलावर राज्याचा कारभार सोपवावा, ती धुरा वाहण्यास तो सर्वतोपरी योग्य आहे असा विचार महाराजांच्या मनात येणे अगदी साहजिक आहे. संभाजीकडे प्रथमपासून ते त्याच दृष्टीने पाहात होते, व त्याची तयारीही त्यांनी त्याच दृष्टीने करून घेतली होती. म्हणून राज्याभिषेकाच्या वेळेस संभाजीला युवराजपदाचा मान त्यांनी दिला. संभाजी त्या वेळी युवराज म्हणून सिंहासनाच्या पायरीवर बसला होता व इंग्रज वकिलानेही त्याला दोन लालखचित सलकडी व एक आठ हिऱ्यांची कंठी यांचा जो आहेर केला, तोही युवराज म्हणूनच. युवराज म्हणजेच उत्तराधिकारी होय.

परंतु राज्याभिषेकानंतर लवकरच जिजाबाई वारली आणि सगळीच परिस्थिति बदलली. जिजाबाईच्या मृत्यूने महाराजांच्या संसारात एक प्रकारची निर्नायकी माजली. महाराज जबरदस्त होते; पण घरातल्या बायकांच्या राजकारणावर नजर ठेवणारी, आणि लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना धाकात राखणारी शुभ शक्ति जिजाबाईच्या मृत्यूने नष्ट झाली. महाराजांचा बहुतेक काळ बाहेर जाणार, ते घरात पाहणार काय आणि किती ? त्यांनी घरातली राजकारणे करावीत की बाहेरची करावीत? त्यामुळे जिजाबाईचा धाक नाहीसा झाल्यावर सोयराबाईच्या महत्त्वाकांक्षेला पालवी फुटली. आणि हे मनुष्यस्वभावाला अगदी धरून होते. कारण ती पट्टराणी असली तरी तिचा मुलगा राजाराम हा युवराज नव्हता. सावत्र मुलगा संभाजी हा युवराज होता. संभाजी अठरा वर्षांचा व राजाराम चार वर्षांचा, तेव्हा "ज्येष्ठ पुत्र दौलतीचे अधिकारी आहेत, त्यांचे व पदरच्या मनुष्याचे बनत नाही, माझा मूल लहान आहे, याजवरी सरकारचा लोभ आहे, त्यास संस्थान, त्याजला अधिकार द्यावयाचा किंवा वडिलांचा वडिलांकडे सोपवायचा हे सांगावे" अशा प्रकारचा हट्ट महाराजांपाशी तिने धरला. यात स्त्रीसुलभ सापत्नभाव, पुत्रप्रेम व महत्त्वाकांक्षा या सर्वच भावनांची गुंतागुंत झाली होती. पण सर्वांची फलनिष्पति एकच होती. सोयराबाईला राजारामासाठी राज्य हवे होते

बिचारा संभाजी ! त्याची अगदी दुर्दशा होऊन गेली होती. आई पूर्वीच गेली होती. आता आजीही गेली. त्यामुळे राणीवंशात त्याला पाठीराखा कोणीच राहिला नाही. तो एकाकी पडला. याच वेळी त्याच्या दुर्दैवाने म्हणा कीं सोयराबाईच्या सुदैवाने म्हणा, त्याच्या स्वभावातल्या आजवर नजरेस न आलेल्या प्रवृत्ति एकदम उफाळून वर आल्या आणि त्याच्या दिगंतकीर्ति बापालाही हताश होऊन कपाळाला हात लावण्याची वेळ आली.

आजपर्यंत संभाजीचे चांगलेच गुण दिसत होते. आता वाईट गुण पाहण्याची वेळ आली. तो उग्र, हट्टी एककल्ली, भांडखोर होता. पंचवीस पंचवीस वर्षे महाराजांच्या खांद्याला खांदा लावून ज्यांनी कामे केली होती, त्या अण्णाजी दत्तो, राहुजी सोमनाथ, मोरोपंत पिंगळे अशा मंत्र्यांशी संभाजीचे पटेना. तक्रार

अशी होती की, करवसुलीच्या कामात संभाजी मंत्र्यांना अडथळे आणतो; व मंत्र्याविरुद्ध प्रजेला अभय देतो. राजाचा मुलगा जर प्रत्यक्ष मंत्र्यांविरुद्ध प्रजेला आश्रय देऊ लागला, तर मंत्र्यांची किंमत प्रजेत काय उरणार, प्रजा कर काय देणार व कर दिला नाही तर राज्य चालणार कसे ?

पण त्याहीपेक्षा अधिक दु:खाची गोष्ट अशी की संभाजीच्या बदफैली वर्तनाच्या कागाळ्या महाराजांच्या कानांवर येऊ लागल्या आणि त्यामुळे ते अत्यंत अस्वस्थ झाले. संभाजी रात्री महाराजांच्या प्रमुख ब्राह्मणांपैकी एकाच्या मुलीला भेटण्यासाठी किल्ल्याखाली उतरत असे आणि तिच्याशी त्याचा अनैतिक संबंध होता. इंग्रजांच्या अस्सल कागदपत्रांतही रायगडच्या परिसरात पसरलेली बातमी देऊन पुढे म्हटले आहे की, " संभाजी किल्ल्याखाली उतरण्याची आपली खोड न सोडील तर त्याचा बेलाशक कडेलोट करावा अशी पहारेकऱ्यांना महाराजांनी आज्ञा दिली होती." या बातमीतील महाराजांचा गडाखाली राहणारा एक प्रमुख ब्राह्मण म्हणजे कदाचित् अण्णाजी दत्तो सचिव असणे शक्य आहे. कारण जिजाबाई व सर्व मंत्री पाचाडात गडाखाली राहात व संभाजी व निवडक नोकर व खजिना गडावर असावयाचा हा शिरस्ताच होता. असे असेल, तर संभाजीची व अण्णाजी दत्तोची तेढ बरीच समजू शकते. राजकारणातल्या वैराची कारणे अनेक वेळा अत्यंत वैयक्तिक असतात ही प्रसिद्ध गोष्ट आहे.

'बसातिस्सुलातीन' हा विजापूरचा इतिहास लिहिणारा लेखक स्पष्ट म्हणतो की, "संभाजी शिवाजीच्या शेरेनविसाच्या मुलीवर लुब्ध होता." शेरेनवीस म्हणजे सचिव अर्थात् अण्णाजी दत्तो. पण हा तर्क फार दूरान्वयाचा. तितका तो नसला तरी, व म्हणून सोडला तरी अगदी एकमेकांच्या विरुद्ध असलेल्या लेखकांचे संभाजीच्या चारित्र्यहीनतेबद्दल एकमत असल्याचे स्पष्ट दिसून येते. मनूची हा इटालियन प्रवासी म्हणतो " संभाजी हा मनावर वा सवयींवर ताबा राखू न शकणारा तरुण असून तो दुसऱ्यांच्या बायका पळवी. लोकांच्या बायकांवर नजर ठेवतो म्हणून संभाजीचे अंमलदार त्याच्यावर अत्यंत नाराज झाले." चिटणिसाने शीतलागौरीच्या निमित्ताने वाड्यात सुवासिनी आल्या असता एका रूपवान् स्त्रीला महालात नेऊन संभाजीने बलात्कार केला अशी हकीकत देऊन म्हटले आहे, " हे वृत्त महाराजांसही समजले. ते समयी बहुत तिरस्कार येऊन बोलले जे– 'राज्याचे अधिकारी हे, अगम्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायी झाले, सर्व प्रजा हे राजाचे कुटुंब आप्तसमान, हे पुत्र जाले तरी काय करावयाचे ? यांचा त्याग करीन, शिक्षा करीन." संभाजीबद्दलच्या दंतकथांतही त्याच्या चारित्र्यहीनतेचेच प्रतिबिंब पडले आहे. गोदावरी नावाच्या एका ब्राह्मण स्त्रीच्या अंगावर संभाजीने हात टाकला. थोरात नावाच्या कुलीन मराठा घराण्यातील कमला नावाच्या लावण्यवतीला त्याने फसविले व तिने प्रतिष्ठा राखण्यासाठी कड्यावरून उडी टाकून जीव दिला. अशा कथा संभाजी-

बद्दलच प्रचलित असाव्यात आणि शिवाजी महाराजांबद्दल मात्र एकही प्रचलित असू नये, असलीच तर कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला, "आमच्या मासाहेब सुंदर असत्या तर आम्हीही असेच सुंदर झालो असतो" असे म्हणून त्यांनी सन्मानाने परत पाठविले अशी असावी यात अर्थ आहे, आणि तो अर्थ असा आहे की, दन्तकथांत एखाद्या व्यक्तीबद्दलचे सामान्य सामाजिक सत्य प्रतिबिंबित झालेले असते. पण याहीपेक्षा खाफीखानाचा अभिप्राय तर फारच बोधप्रद आहे. तो शिवाजी व संभाजी दोघांचीही मनसोक्त निंदा करतो; पण दोघांच्या चारित्र्याबद्दल मात्र वेगळे अभिप्राय नमूद करतो. "त्याचे हातांत सापडलेल्या मुसलमान जातीच्या बायकामुलांच्या अब्रूस त्याने कधीही धक्का लागू दिला नाही. ह्या बाबतीत त्याचे हुकूम इतके सक्त होते की ते मोडणारास तो शिक्षा दिल्याशिवाय राहात नसे." महाराजांची अशी प्रशंसा करणारा हा मुसलमान इतिहासकार संभाजीबद्दल मात्र काय म्हणतो पहा, "संभाजीचा बाप हा श्रमसाहस करणारा आणि काटक होता. संभाजीची वागणूक त्याच्या अगदी उलट होती. दारू पिणे आणि पुष्पासारखे गाल असलेल्या आणि चंद्राप्रमाणे ज्यांचा भालप्रदेश आहे अशा स्त्रियांचा सहवास याची त्याला फार आसक्ति होती."– खाफीखान हा औरंगजेबाचा कामगार महंमद मुरादखान याच्या पदरी होता. त्याला शिवाजी काय किंवा संभाजी काय, कोणाबद्दलच ममत्व वाटण्याचे कारण नव्हते. तसे त्याला ते वाटलेले नाही. दोघांची त्याने सडकून निंदा केलेली आहे. पण द्वेषाच्या भरात सुद्धा, या यवन इतिहासकाराला सुद्धा महाराजांच्या चारित्र्याबद्दल मुक्तकंठाने प्रशंसा केल्यावाचून राहवले नाही. तशी प्रशंसा तो संभाजीची करीत नाही. अनेक वेळा शत्रुपक्षाचा पुरावा फार विलक्षण रीतीने ग्राह्य ठरू शकतो. तसेच खाफीखान हा मुसलमान, मनूची हा इटालियन, इंग्रज बातमीदार, बसातिस्सुलातीनकार हा मुसलमान, चिटणीस हा प्रभू या भिन्न देशांच्या, भिन्न काळांतल्या लोकांच्या अभिप्रायांत संभाजीच्या विषयासक्तीबद्दल जी एकवाक्यता आढळते, तिचा उलगडा अन्य कोणत्याही रीतीने होणे शक्य दिसत नाही. या सर्वांनी संभाजीला बदनाम करण्याचा कट केला होता असले फसवे समाधान करून घेण्याऐवजी आपलेच नाणे खोटे या न्यायाने दुःखाने का होईना, पण संभाजीला दोषी धरणे प्राप्त आहे. फार तर हा सारा यौवनाचा दोष आहे, 'यौवनमत्र अपराध्यति।' असे म्हणून संभाजीच्या दोषांकडे सदय वृत्तीने पाहता येईल. पण ज्याला राज्य चालवायचे आहे, त्याला अशी भलत्या ठिकाणी दया दाखवून चालत नाही.

महाराज अशा अर्थाने मुळीच दयाळू नव्हते. संभाजीच्या वर्तनाने त्यांना मनस्वी दुःख झाले. कारण अशा गोष्टी आपल्या राज्यात घडलेल्या पाहण्याची त्यांना सवय नव्हती. राजाला राण्या आणि उपस्त्रिया असाव्यात याला त्यांची हरकत नव्हती. कारण तो त्या काळचा प्रघातच होता. त्यात वावगे काहीच

नव्हते. उलट ती एक प्रतिष्ठेची व घरंदाजपणाची खूण समजली जाई. पण या व्यतिरिक्त कोणीही आपल्या स्थानाचा गैरफायदा घेऊन अबलांना नाडण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना ते मंजूर नव्हते. त्यांच्या स्वतःच्या सैन्यात बायकांना नेण्यास सक्त मनाई होती. महाराज सर्व जातींबद्दल समभाव बाळगणारे असले तरी वर्णांचा तरतमभाव त्यांनाही मान्य होता. ब्राह्मण स्त्रीवर बलात्कार व तो क्षत्रिय कुमाराकडून हा त्यांना अधर्म वाटला. नेताजी पालकरासारख्या बाटलेल्या हिंदूला शुद्ध करून स्वधर्मात घेण्याइतके महाराज प्रागतिक होते. पण चातुर्वर्ण्याने घडविलेल्या हिंदुसमाजाच्या मर्यादेतच त्यांची प्रगति होती. राजकारण करताना ब्राह्मणाच्या किंवा कोणच्याही जातीला ते अवास्तव महत्त्व देत नसत. प्रभावळीचा ब्राह्मण सुभेदार जिवाजी विनायक याने पद्मदुर्गावर झुंजणाऱ्या आरमाराला वेळेवर रसद पुरविली नाही असा बोभाटा आला, तेव्हा महाराजांनी त्याच्या ब्राह्मण्याची पर्वा न करता त्यास जरबेचे पत्र लिहिले की, "अजब वाटले की ऐसे नादान थोडे असतील. ऐशा चाकरास ठिकेठीक केले पाहिजेत. ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो? या उपरि बोभाट आलियावरी तुमचा मुलाहिजा करणार नाही. गनिमाचे चाकर गनीम जालेस, ऐसे जाणून बरा नतीजा तुम्हांस पावेल. ताकीद असे." पण श्रेष्ठ वर्ण म्हणून तत्कालीन समजुतीप्रमाणे महाराजांचे ठायी ब्राह्मणाविषयी पूज्य बुद्धि असे. ब्रह्महत्या घडू नये, त्यास उपद्रव होऊ नये ही त्यांची दृष्टि असे. अफझुलखानाच्या वधाचे वेळी त्याचा ब्राह्मण वकील कृष्णाजी भास्कर याने महाराजांवर तलवारीचा वार केला. पण महाराजांनी त्याला प्रथम शस्त्राने उत्तर दिले नाही. ते म्हणाले, "ब्राह्मणास शिवाजी मारणार नाही. शिवशंकर आम्हांस हसेल." तो जेव्हा तरीही ऐकेचना. तेव्हाच महाराजांनी नाइलाज म्हणून, त्याच्या ब्राह्मण्याचा विचार न करिता त्याला कापून काढले. एरवी ब्राह्मणास मारणे म्हणजे ब्रह्महत्या हे पाप आहे अशीच त्यांची समजूत होती. प्रभावळीच्या सुभेदाराला त्यांनी एक ताकीदपत्र लिहिले. त्यात ते म्हणतात "बापूजी नलवडा याने कल्हावती करून तरवारेचा हात टाकिला आणि अखेर आपलेच पोटात सुरी मारून घेऊन जीव दिल्हा. मराठा होऊन ब्राह्मणावरी तलवार केली. याचा नतीजा तोच पावला. तुम्ही ऐसे बेकैद लोकांस होऊ न देणे." ब्राह्मण पुरुषाच्या जीविताबद्दल जर ही आस्था, तर ब्राह्मण स्त्रीच्या शीलरक्षणाबद्दल महाराजांची दक्षता काय असेल ते काय सांगावयास हवे ? म्हणूनच संभाजीच्या हातून "अगम्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायी झाले" म्हणून महाराज अत्यंत क्षुब्ध झाले.

पण स्त्री म्हटले म्हणजे, मग ती ब्राह्मण असो की कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेसारखी किंवा खाफीखान म्हणतो, त्याप्रमाणे लढाईत सापडलेली मुसलमान असो, स्त्री म्हणूनच ती महाराजांना पूज्य असे. या बाबतीत स्त्रीकडे केवळ मातृरूपाने व आदिशक्तींच्या रूपाने पाहण्याची त्यांची वृत्ति होती. त्यामुळे स्त्रीच्या नैसर्गिक

असहायतेचा फायदा घेऊन तिचा मानभंग करण्याच्या प्रवृत्तीची त्यांना परा-काष्ठेची चीड होती. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना त्यांच्या लेखी जास्तीत जास्त कठोर शिक्षा दिली जाई. पुणे प्रांताचे शासन त्यांनी हातात घेतल्यावर ऐन उमे-दीच्या काळात, पुण्यापासून नऊ कोसांवर असलेल्या रांझे गावच्या पाटलाला, त्याने बदकर्म केले म्हणून, कोपरापासून दोन्ही हात व गुडघ्यापासून दोन्ही पाय तोड-ण्याची जबर शिक्षा फर्माविली होती. या प्रसंगाला तीस वर्षे झाली तरी महा-राजांची प्रवृत्ति या बाबतीत तीच होती. कर्नाटकाच्या स्वारीत बेलवडीची ठाणेदारीण सावित्रीबाई देसाई हिच्याशी महाराजांच्या लोकांची लढाई झाली. बाई मोठी कजाख आणि मेहनतीची होती. नवरा मेल्यावर तिने लढाई पुढे चालू ठेविली. तिच्या घोड्याचे दोन्ही मागील पाय तोडले, तेव्हा पाय उतारा होऊन ती जिद्दीने लढू लागली. अखेर तिचा उजवा हात तुटला तेव्हा तिचा पाडाव झाला. तिच्या सर्व धनसंपत्तीसह तिला महाराजांकडे आणण्यात आले. तेव्हा महाराजांनी या बहादुर महिलेचा मुक्तकंठाने गौरव केला. तिला नेमणूक करून दिली, व "या मराठी राज्याचे अभीष्टचिंतन करीत राहा" असे सांगून तिला सन्मानाने बेलवडीला परत पाठविले. पण या गोष्टीतले खरे मर्म निराळेच आहे. बाईला पकडल्यावर महाराजांच्या माणसांपैकी शकूजी गायकवाड नावाच्या इसमाने तिची बेइज्जत केली. महाराजांनी त्याचे डोळे काढले आणि पन्हाळगडच्या अंधार कोठडीत त्याला जन्मभर डांबून टाकले.

स्त्रीच्या दृष्टीने तो काळच दुर्दैवी होता. दिल्ली, सुरत, राजापूर, लाहोर अशा ठिकाणी उघड्या बाजारात स्त्रियांचे लिलाव करण्याचा तो काळ! सुंदर स्त्रीची किंमत अलाउद्दिनाच्या काळी पाचशे टंका असे. बऱ्या नीटस गोऱ्या जातिवंत कुणबिणी "पंचवीस होनास पाच" विकत मिळत होत्या. बाळाजी आवजीची आई गुलबाई हिलाही असेच राजापूरच्या बाजारात उभे करण्यात आले होते. त्या सैल नीतिमत्तेच्या काळात असला करडा राजा आढळणे हा एक अपवाद होता. आणि हेच संभाजीचे दुर्दैव होते व महाराजांचेही दुर्दैव हेच होते. इतक्या शुद्ध नीतीचा कठोर आग्रह धरणारा बाप मिळावा हे स्वैर संभाजीचे दुर्दैव, व ज्या अपराधा-साठी आपण इतरांचे हात पाय छाटले व डोळे काढले, तो अपराध प्रत्यक्ष आपल्या मुलाने केलेला पाहावयाचे नशिबी यावे हे महाराजांचे दुर्दैव ! संभाजीच्या बाबतीत निर्णय घेणे हे सोपे नव्हते. त्याचा शिरच्छेद करणे शक्य होते, पण सोपे नव्हते. कारण राज्यात त्याच्याशिवाय कर्ता राजपुत्र नव्हता. पण त्याच्यावर उत्तराधिकारी म्हणून जबाबदारी टाकणेही सोपे नव्हते. कारण जबाबदारीची जाणीव त्याला दिसत नव्हती. मंत्र्यांशीही त्याचे पटत नव्हते. त्याच्या हाती स्त्रीचे शील सुरक्षित राहणे शक्य नव्हते. "रयतेस काडीइतका आजार द्यावया गरज नाही" हे महाराजांचे सूत्र. संभाजीस अधिकार दिला, तर ते कुंपणच शेत खाईल

व "मोगल मुलकात आले, त्याहून अधिक" असा रयतेचा तळतळाट होईल. त्यात पुन्हा घरात सोयराबाईशी कलह चालूच होता. असे सर्वच बाजूंनी संभाजीचे दुखणे महाराजांना मोठे अवघड होऊन बसले. धरले तर चावते व सोडले तर पळते असे झाले. संभाजीला काही उपदेश करण्यात अर्थ नव्हता. कारण दुसऱ्याला उपदेश करण्याइतकी शास्त्रे पुराणे पंडित संभाजी स्वतःच पढलेला होता, आणि उपदेशाने तो सुधारेल, बिथरणार नाही याची खात्री नव्हती. कारण त्याची प्रकृति एककल्ली आणि उग्र होऊन बसली होती. एकीकडे सोयराबाई, एकीकडे मंत्री, एकीकडे संभाजी असा हा सगळाच तिढा गुंतून पडला होता, आणि त्यातून मार्ग काढणे सामान्य बुद्धीचे काम नव्हते.

कोणतीही गोष्ट विकोपाला जाऊ न देता त्यांच्या नेहमीच्या शहाणपणाने या घरगुती आणि राजकीय पेचप्रसंगातून महाराजांनी मार्ग काढला. सोयराबाईच्या म्हणण्यात त्यांना तथ्य जरूर वाटत होते, आणि एकोजीकडे ते स्वतःच वाटणी मागण्यासाठी निघाले होते, त्यामुळे राज्यामुळे गृहकलह कसा होऊ शकतो याची त्यांना चांगली कल्पना होती, आणि राजारामाचा प्रश्न त्यांच्यापुढे होताच. त्यांनी प्रथम कर्नाटकाच्या स्वारीचे प्रस्थान ठेवले, व मनाशी ठरविले की, दक्षिणेकडे नवे राज्य जिंकून ते संभाजीला द्यावे म्हणजे ज्याप्रमाणे आज उत्तरेत आपण व दक्षिणेत एकोजी आहोत, त्याप्रमाणे आपणानंतर महाराष्ट्रात राजाराम, मंत्री, सोयराबाई आणि दक्षिणेत संभाजी अशी आपल्या हयातीतच व्यवस्था करता येईल, म्हणजे संघर्ष करणारे दोन पक्ष दूर राहिल्यामुळे राज्यातली बेकैद आपोआपच कमी होईल. रायगडाहून कर्नाटकाकडे निघताना महाराजांनी गोड बोलून संभाजीला आपणाबरोबर रायगडातून बाहेर काढले. कारण आपली पाठ फिरल्यानंतर संभाजीला रायगडातून बाहेर काढण्याचे धाडस मंत्री किंवा सोयराबाई यांपैकी कोणालाही होणार नाही हे त्यांना चांगले माहीत होते. रायगड सोडताना त्यांनी आपला प्रतिनिधि म्हणून राहुजी सोमनाथची नेमणूक केली. हा फार दिवस त्यांच्याबरोबर मेहेनत केलेला राज्यातील वजनदार माणूस होता. तो कुडाळचा सुभेदार होता. महाराजांबरोबर बाजी घोरपड्यांवरील स्वारीत तो होता. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की हा राहुजी सोमनाथ संभाजीच्या विरुद्ध पक्षाचा होता. संभाजीचा चरित्रकार 'अनुपुराणा'चा लेखक त्याला राहुची उपमा देतो (राहु प्रतिनिधिः स्मृतः ।) यात पुष्कळच अर्थ आहे. त्याला महाराजांनी आपला प्रतिनिधि म्हणून नेमावे आणि त्याच्या स्वाधीन रायगड, सोयराबाई, राजाराम करावेत याचा अर्थ महाराजांचा मंत्र्यावर विश्वास होता व संभाजीवर नव्हता असा आहे. एरवी राजाच्या गैरहजेरीत युवराजाने राजधानीत राहावयाचे व कारभार पहावयाचा हा नेहमीचा शिरस्ता मोडण्याचे महाराजांना काही कारण नव्हते. पण या वेळी

त्यांनी तो जाणूनबुजून मोडला. कारण संभाजीवरील त्यांचा विश्वास निदान सध्या तरी उडाला होता.

पण संभाजीला अन्याय करावा असे त्यांच्या मनातही नव्हते. आपल्याबरोबर त्याला नेऊन त्यांनी प्रभावळीचा, दक्षिण कोकणचा विस्तीर्ण सुभा त्याच्या स्वाधीन केला आणि त्याची शृंगारपूरला स्थापना केली. उद्देश हा की, आपण परत येईपर्यंत संभाजी व मंत्री यांचे कलह होणार नाहीत, व या प्रदेशात संभाजीला जबाबदारीने कारभार करावयाची संधि मिळून त्याच्यात काही सुधारणा होईल.

याप्रमाणे सोयराबाईची, मंत्र्याची व संभाजीची व्यवस्था लावून महाराज दक्षिणेकडे निघाले; पण संभाजी कोणत्या वेळी काय करील ही चिंता त्यांना अंतर्यामी छळीत होतीच. मार्गावर श्रीशैल मल्लिकार्जुनाच्या दर्शनास महाराज गेले असता, आपल्या लौकिकात सफल दिसणाऱ्या जीवितातही एखाद्या विषनदीप्रमाणे गुप्त वाहणारी विफलतेची जाणीव त्यांना स्पर्शून गेली. एकंदर मानवी जीवन किती असार आहे व माणसाचे प्रयत्न नियतीपुढे किती केविलवाणे आहेत, या जीवितात आईबापांचे वियोग कसे आहेत, मित्रांचे मृत्यु कसे पाहावे लागतात हे त्यांना अनुभवाने समजतच होते. उतार वयात, हातातोंडाशी आलेला मुलगा बेबंद झाला म्हणजे बापाला केवढे दुःख होते व पुढच्या चिंतेने तो कसा खंगून जातो हे तर ते दरक्षणी अनुभवीतच होते. महाराज परमपुरुषार्थी होते. पण या विषादाने त्यांचे मन या वेळी व्यापून गेले आणि त्यांना वाटले की या नितान्त शांत स्थळी शिवचरणांवरती स्वतःचे शिरकमल अर्पण करावे. कर्तव्यबुद्धीने त्यांनी स्वतःला आवरले हा त्यांचा मोठेपणा. पण बंगलोर, होसकोटे, शिरे, कोप्पळ, वेलोर, अरणी, जिंजी, बाळापूर असे कर्नाटक-मद्रासचे समृद्ध राज्य जिंकून व हा दक्षिण दिग्विजय आवरता घेऊन ते महाराष्ट्रात पन्हाळचाला घाईघाईने परत आले. कारण, त्यांना रायगडची चिंता नव्हती, राहुजी सोमनाथाची नव्हती, कारण आग्र्यास ते गेल्यानंतरही मंत्र्यांनी कारभार उत्तम सांभाळला होता. त्यांना चिंता होती संभाजीची. तो त्यांचा हृद्रोग होऊन बसला होता.

त्यांच्या दुर्दैवाने त्यांची भीति खरी ठरली. दीड वर्षांत संभाजीत काहीही सुधारणा झाली नव्हती. उलट त्याला स्वातंत्र्य मिळाल्यामुळे तो जास्त बहकू लागला होता. मंत्र्यांच्या त्याच्याबद्दलच्या तक्रारी तशाच होत्या. मंत्री नमस्कार करावयास आले म्हणजे, "हे पहा, आले लबाडमंत्री" म्हणून त्यांचा तो उपहास करी. मंत्र्यांविरुद्ध प्रजेला संरक्षण देण्याचा त्याचा क्रम पूर्वीप्रमाणेच चालू होता आणि त्यामुळे करवसुलीत अडथळे निर्माण होत होते. आपण कोण आणि काय करीत आहोत याचा विचार न करता दिल्लीहून नुकत्याच दक्षिणेत आलेल्या औरंगजेबाच्या दिलेरखान या सरदाराशी त्याने पत्रव्यवहार सुरू केला होता.

दिलेरखानाने त्याला आपणास मिळण्याचे आमंत्रण दिले होते व संभाजीने इतक्यातच आपणांस येता येणार नाही असे त्यास कळविले होते. शृंगारपूरच्या वास्तव्यात संभाजी हा जास्त कर्मठ व अंधश्रद्ध बनत चालला होता. त्याने 'पुत्र कामेष्टि' नावाचा यज्ञ केला होता. पण एक वेळ तेही चालले असते, कारण दशरथ राजानेही असा यज्ञ केला होता. चिंतेची बाब अशी होती की संभाजी हा केवळ यज्ञयाग करीत नव्हता तर तो शाक्त पंथाच्या वर्चस्वाखाली जात चालला होता.

ज्या भागात संभाजी राहात होता तो भाग कऱ्हाडे ब्राह्मणांच्या वस्तीचा होता आणि त्या काळी यांपैकी बरेच लोक बंगाल काशीकडून तंत्रमार्ग शिकून आलेले होते. संगमेश्वर व तेथून सात कोसांवर असलेल्या शृंगारपुरात त्यांचे प्रस्थ फारच माजले होते. त्यांच्यापैकी शिवयोगी नावाचा ब्राह्मण संभाजीचे गुरुपद पावला होता. दुसऱ्या कविकलश नावाच्या इसमाने संभाजीला स्वयंपूर्ण होण्यासाठी व राज्यपदप्राप्तीसाठी तांत्रिक पद्धतीने 'कलशाभिषेक' नावाचा अभिषेक महाराज येण्यापूर्वी अवघा एक महिना आधी केलेला होता म्हणजे आता संभाजी व्यवहार सोडून गूढ अध्यात्माकडे आणि त्यातही सात्त्विक वैदिक मार्गापेक्षा तामसी तंत्रमार्गाच्या आहारी जात चालला होता. ह्या तंत्रमार्गाच्या पकडीतून आणि अघोर सल्लागारांच्या तांड्यांतून त्याला सोडविण्यासाठी महाराजांनी संभाजीला परळी सज्जनगडावर जाऊन राहण्याचा हुकूम केला. कारण शृंगारपूरचे वामाचारी वातावरण आणि तेथील शिवयोगी, कविकलश यांच्यासारखे 'अघोरघट कापालिक' आणि सज्जनगडचे सात्त्विक वातावरण आणि रामदासांसारखा विरक्त संत यांच्यात जमीनअस्मानाचा फरक होता. संभाजीचे भावनाप्रधान व संस्कारक्षम मन बदलत्या वातावरणात कदाचित् बदलेल असा महाराजांचा तर्क होता.

पण संभाजीच्या बाबतीत महाराजांनी जो जो उपाय करावा तो तो अपायच व्हावा असे होऊ लागले. संभाजीच्या मनाने पक्के घेतले की, मंत्री आणि सावत्र आई यांनी आपल्या बापाचे मन आपणाविरुद्ध कलुषित केले आहे; आपणाला राज्य काही मिळत नाही. येथे पदोपदी मानखंडना सहन करण्यापेक्षा आपण सरळ दिलेरखानाकडे मोगलाईत जावे आणि नशिबाची परीक्षा पाहावी असे विचार त्याच्या मनात घोळत असतानाच त्याने परळीच्या सुभेदाराला सांगितले की, "आज पर्वणी आहे, मी संगमस्नानासाठी जात आहे." कृष्णा–वेण्णा यांच्या संगमावर संभाजीने स्नान केले, दाने केली, पूर्व संकेताप्रमाणे दिलेरखानाचे लोक त्याला नेण्यासाठी आले होते, त्यांना तो जाऊन मिळाला. परळीहून बरोबर आलेल्या लोकांना त्याने सांगितले की, "तुम्ही परत जा. मी दिल्लीपतीच्या सैन्यास मिळण्यास जात आहे. आणि परत येईन तो सह्याद्रि जिंकण्यासाठीच येईन असा माझा निरोप तुम्ही परळीच्या सुभेदाराला आणि महाराजांना जाऊन सांगा . . ."

अशा प्रकारे शिवाजी महाराजांचा पुत्र महाराजांच्या हाडवैऱ्याला अगदी "राजीखुषीने आणि अक्कल हुशारीने" जाऊन मिळाला! ही बातमी ऐकल्यावर महाराजांच्या अंतःकरणाला केवढ्या यातना झाल्या असतील याची कल्पनाच केली पाहिजे. त्यांच्या राज्याचा वारस त्यांच्या डोळ्यांदेखत, त्यांच्यापासून फोडून शत्रूने राजकारणाच्या बुद्धिबळात त्यांच्यावर मात केली होती. मुलाच्या मूर्खपणामुळे, हेकटपणामुळे, एककल्लीपणामुळे तो अशा शत्रूच्या जाळ्यात सापडला होता की ज्यातून जिवंत सुटणे दुरापास्त होते. संभाजीच्या जीविताची चिंता त्यांचे मन जाळीत होती आणि त्याचा अधःपात पाहून दिङ्मूढ झालेली त्यांची बुद्धि व्याकूळ झाली होती. आजपर्यंत त्याचे सावत्र आईशी पटत नव्हते, मंत्र्यांशी पटत नव्हते, तो बापाला जुमानीत नव्हता, तो स्त्रियांवर हात टाकीत होता, पण या सर्व पापांवर, आज त्याने स्वराज्याच्या शत्रूंना जाऊन मिळण्याच्या पापाने कळस चढविला होता. दख्खनची प्रचंड ढाल अशी ज्याची कीर्ति, त्या आपल्या स्वनामधन्य बापाला त्याने खेदाने व शरमेने मान खाली घालण्याची वेळ आणली होती.

दिलेरखानाला मात्र आनंदाचे भरते आले. त्याच्या जाळ्यात मासा तर— मोठाच देवमासा कां म्हणानात—सापडला होता. त्याने संभाजीला सप्तहजारी मनसब देवविली, हत्ती दिला, खानदेश वऱ्हाडचा सुभा बहाल करविला, आणि माणसाळलेल्या हत्तींकडून ज्याप्रमाणे जंगली हत्ती पकडवितात, किंवा काट्यानेच ज्याप्रमाणे काटा काढतात, त्याप्रमाणे महाराजांच्या या राजपुत्राला सैन्याच्या अग्रभागी ठेवून महाराजांचा मुलूख जिंकण्याचा त्याने उपक्रम सुरू केला.

जतच्या वायव्येस वीस मैलांवर भूपाळगड म्हणून एक अतिशय मजबूत किल्ला महाराजांनी मोक्याच्या ठिकाणी बांधला होता. त्या ठिकाणी त्यांनी उत्तम शिबंदी ठेविली होती. किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा हा किल्लेदार आणि विठ्ठल भालेराव सबनीस हा अधिकारी होता. या किल्ल्यात आसपासची अनेक कुटुंबे सुरक्षिततेसाठी येऊन राहिली होती. दिलेरखानाला फिरंगोजीने बराच वेळ दाद दिली नाही; पण जेव्हा संभाजी पुढे येऊन उभा राहिला व म्हणाला की, "दरवाजा उघडावा, नाही तरी शिरच्छेद करीन, सर्व लोक मारीन." तेव्हा त्याचे अवसान गळाले. समोर प्रत्यक्ष धनी उभा, गोळा कसा टाकावा — या चिंतेने त्या रात्री सबनीस व किल्लेदार किल्ला टाकून निघून गेले. ज्या फिरंगोजी नरसाळ्याचे अलौकिक शौर्य पाहून चाकणच्या वेढ्याच्या वेळेस शाहिस्तेखानाने सुद्धा तोंडात बोट घातले, तो फिरंगोजी संभाजीला केवळ समोर पाहूनच गायीहून गाय झाला! किल्ल्यात शिरल्यावर संभाजीने आणि दिलेरखानाने क्रूरपणाने कत्तल केली. सातशे मराठ्यांचे एक हात व एक पाय तोडले. बाकीच्यांना गुलाम केले. भूपाळगडचा बळकट किल्ला दिलेरखानाने जमीनदोस्त केला. पाण्यासारखा पैसा खर्चून बापाने बांधलेला किल्ला मुलाने खणून काढला.

महाराजांना जेव्हा ही बातमी कळली तेव्हा त्यांच्यापुढे नवाच प्रश्न उभा राहिला. प्रत्येक ठिकाणी संभाजी असेच करू लागला व प्रत्येक ठिकाणी धन्याचा मुलगा, त्यावर हत्यार कसे धरावे म्हणून शिपाई कच खाऊ लागले तर कसे व्हावयाचे? म्हणून त्यांनी सर्व किल्ल्यांना सक्त आदेश दिला की, "गोळा वाजवावा, लढावे, किल्ले सोडू नयेत."

भूपाळगडानंतर दिलेरखानाने विजापुरावर स्वारी केली. विजापूरचा वजीर मसाउदखान याची अगदी पाचावर धारण बसली आणि त्याने महाराजांची मदत मागितली. दोन महिने दिलेरखान आणि संभाजी विजापूरला वेढा घालून बसले, पण इलाज चालेना. महाराजांनी विजापूरला धान्य पोचवून तेथे नेहमीची सुबत्ता कायम ठेविली, आणि बाहेरून दिलेरखानाच्या सैन्यावर छापे घालून त्याला अगदी जेरीला आणले. अखेर चडफडत दिलेरखानाने विजापूरचा वेढा उठविला. युवराज संभाजीने त्याचे सांत्वन केले की, विजापूरचा वचपा आपण पन्हाळ्यावर काढू.

आपले चिरंजीव दिलेरखानासह पन्हाळ्यावर येत आहेत याची जाणीव महाराजांना होती. त्यांच्या स्वागतासाठी त्यांनी बारा हजार घोडेस्वार जय्यत तयार ठेवले होते. पन्हाळ्याची उत्तम मजबुती त्यांनी केली होती. कोकणातील बऱ्याच किल्ल्यांतील तोफा काढून आणून त्यांनी त्या पन्हाळ्यावर चढविल्या होत्या. त्याशिवाय फ्रेंचांकडून चाळीस मोठ्या तोफा विकत घेतल्या होत्या व राजापुराहून रोज खटपट करून त्या पन्हाळ्यावर नेण्यात येत होत्या.

विजापूरच्या अपयशाने दिलेरखान आता चिडला होता. पन्हाळ्याकडे जाताना त्याने वाटेत जाळपोळ, लुटालूट, कत्तली यांचा तडाखा लावला. तिकोटा व अथणी येथे हिंदु स्त्रीपुरुषांवर अत्याचारांचा त्याने कहर केला. "गाव असा लुटून फडशा पाडला की त्या गावात कोणी एक जिन्नस बाकी ठेविला नाही." तिकोटा येथे अनेक श्रीमंत लोक राहात होते. दिलेरखानाने तेथले सोने नाणे धुऊन काढले. तिकोट्याहून अथणीला ही धाड आली, वाटेत होनवड, तेलंग येथेही लूट केलीच. अथणीला दिलेरखानाने तीन हजार हिंदु लोक कैदी म्हणून पकडले. हे सर्व लोक विकून पैसे उकळण्याचा उद्योग त्याने सुरू केला, आता मात्र संभाजीला आपण हिंदु असल्याची जाणीव झाली, व त्याचे दिलेरखानाशी कडाक्याचे भांडण झाले. संभाजीचे डोळे खाडकन् उघडले. आपण हिंदुत्वाचा अभिमानही राखू व औरंगजेबाची चाकरीही करू व परत स्वतंत्रही राहू या कल्पना, स्वभावतःच अंधार आणि प्रकाश यांच्याप्रमाणे परस्परविरुद्ध आहेत, याचा त्याला साक्षात्कार झाला, व दिलेरखानाकडे येण्यात आपण आपल्या बापालाच फसविले असे नाही, तर स्वतःचीही केविलवाणी वंचना केली याची त्याला प्रतीति आली.

केवळ केविलवाणीच नव्हे, तर क्रूरही. कारण विजापुरास अपयश आल्यामुळे दिलेरखानावर नाराज झालेल्या औरंगजेबाने त्याला परत बोलाविले आणि हुकूम

पाठविला की, "शिवाजीचा मुलगा तुमच्याजवळ आहे, त्याला कैद करून ताबडतोब आमच्याकडे पाठवा." संभाजीला या निरोपाची कुणकूण कळताच तो अगदी घाबरून गेला. हा दिलेरखान हे काय प्रकरण आहे हे खरे म्हणजे त्याला माहिती असावयाला हवे होते. पूर्वी महाराजांबरोबर आग्र्याला तो गेला होता, तेव्हा जयसिंगाबरोबर हा दिलेरखानच इकडे आला होता. यानेच मुरारबाजीचा लढाईत शिरच्छेद केला होता. हा दिलेरखान दाऊदजाई जातीचा रोहिला होता. शौर्यामध्ये तो अद्वितीय होता तो धर्मनिष्ठ होता. हे गुण असूनही तो अत्यंत क्रूर आणि कठोर म्हणून प्रसिद्ध होता. अशा माणसाला संभाजीबद्दल सहानुभूति वाटायचे कारणच काय? बादशहाचा हुकूम तो तंतोतंत पाळण्यात मुळीच कसूर करणार नाही हे उघड होते.

संभाजीचे मन त्याला खाऊ लागले. भीति आणि शंका यांनी तो हैराण झाला. दिलेरखानाच्या छावणीतही अनेक लोकांना संभाजीचे महाराजांना सोडून येण बिलकूल आवडले नव्हते. प्रत्यक्ष त्याचा मेव्हणा महादजी नाईक निंबाळकर त्याला स्पष्टपणे म्हणाला की, "तू कां आलास?" संभाजीने महादजीचे हे बोलणे दिलेरखानाला सांगितले. त्यावर दिलेरखानाने महादजीला काही दिवस अटकेत सुद्धा ठेवले.

आता संभाजीची जाळ्यातून सुटण्यासाठी धडपड सुरू झाली. महाराजांनी अनेक दिवस त्याला आणण्याचे प्रयत्न चालूच ठेवले होते. अथणीच्या जंगलात महाराजांचे लोक होते. एके रात्री अवघ्या दहा लोकांनिशी दिलेरखानाच्या कडेकोट बंदोबस्तातून संभाजी निसटला व त्या लोकांस जाऊन मिळाला. त्यांनी त्याला विजापूरला पोचविले. विजापूरचा मसूदखान हा महाराजांचा अलीकडेच मित्र झाला होता, त्याने संभाजीचे उत्तम स्वागत केले.

दिलेरखान मार्गात ऐनापूर येथे असता त्याला संभाजी पळून गेल्याची बातमी समजली. त्याच पावली तो माघारी फिरला आणि मसूदखानाकडे त्याने संभाजीची मागणी केली. अब्दुल रज्झाकला त्याने विजापूरवर पाठविले. तो आलेला कळल्यावर संभाजी विजापुराहून निघाला. त्याला आणण्यासाठी महाराजांनी सैन्याची एक तुकडी पाठविली होती. त्या तुकडीबरोबर लांबलांबच्या मजला करीत ४ डिसेंबर १६७९ रोजी संभाजी पन्हाळ्यास पोचला. परळीहून तो दिलेरखानाकडे पळाला, तो बरोबर वर्षाने स्वराज्यात पन्हाळ्याला परत आला. एका वर्षाच्या अवधीत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते.

संभाजी परत आला या गोष्टीने महाराजांना आनंदाचे पर्वत झाले. मुलाच्या चिंतेने, स्वराज्याच्या काळजीने खंगलेल्या त्यांच्या मनाला परत टवटवी आली. काळाच्या दाढेतून कर्ता सवरता मुलगा डोळ्यांदेखत जिवंत सुटून आला ही गोष्ट सामान्य न झाली. पूर्वी आग्र्याहून तसाच तो सुटला होता. आज दुसऱ्यांदा सुटला. ही सारी अंबाभवानीची कृपा असे त्यांना वाटले. पश्चात्तापाने विदीर्ण

झालेल्या मुलाला कटु बोलून त्यांनी जास्त दुखविले नाही. त्याला ते इतकेच म्हणाले–" लेकरा, मजला सोडू नकोस. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता, परंतु श्रीनें कृपा करुन सोडून आणिला. थोर कार्य जाले."

पण त्यांचा आनंद त्यांच्या अंतःकरणात मावेना. टकमकीच्या कड्यावरून कोसळत जाणारा त्यांचा वेडा तरीही लाडका मुलगा ऐन वेळेला थोडक्यात बचावला होता, तंजावरला राहणाऱ्या एकोजी राजांना त्यांनी लिहिले :

" चिरंजीव राजश्री संभाजीराजे मोगलाईत गेले होते, त्यांस आणावयाचा उपाय बहुत प्रकारे केला. त्यासही कळो आले की ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही. ऐसे जाणोन त्याणी आमचे लिहिण्यावरुन स्वार होऊन आले. त्याची आमची भेटी झाली. घरोब्याचे रीतीने जैसे समाधान करून ये तैसे केले."

संभाजीला भेटण्यासाठी महाराज रायगडहून पन्हाळ्याला गेले. तेथे त्यांनी महिनाभर वास्तव्य केले आणि आपल्या मनात घोळत असलेली दोन राज्यांची योजना संभाजीच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला.

" आता तू ज्येष्ठ पुत्र, थोर झालास आणि सचंतर राज्य कर्तव्य हे तुझ्या चित्ती आहे असे आपणास कळले तर मजला हे अगत्य आहे. तरी तुजलाही राज्य एक देतो. आपले पुत्र दोघेजण, एक तू संभाजी व दुसरा राजाराम. ऐसियास हे सर्व राज्य आहे. याचे दोन भाग करितो. एक चंदीचे राज्य. याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हे एक राज्य आहे. दुसरे तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत एक राज्य आहे. ऐसी दोन राज्ये आहेत. तू वडील पुत्र. तुजला कर्नाटकीचे राज्य दिधले. इकडील राज्य राजारामास देतो. तुम्ही दोघे पुत्र. दोन राज्ये करणे."

पण संभाजीला ते पटले नाही. तो स्वराज्यात परत आला आणि मोगलाईत आपल्या मर्जीप्रमाणे वागता येणार नाही हे त्याला कळून चुकले इतकेच. पण त्याच्या स्वभावातला हेकटपणा काही कमी झाला नव्हता. महाराजांची जरब मोठी म्हणून इतकेच बोलून त्याने वेळ मारून नेली की, "आपणास साहेबांचे पायाची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायांचे चिंतन करून राहीन." संभाजीची मुग्धता व उडवाउडवी महाराजांच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नाही. परत त्यांनी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आपल्या समग्र राज्याची, मोजदाद त्यांनी करून दाखविली. एक माणूस आपल्या कर्तृत्वावर काय करू शकतो हे त्यांनी आपले उदाहरण घेऊन दाखविले. " पुणे महाल चाळीस हजार होनांची आपली जहागीर होती, त्यावर आपण एक कोटीची दौलत कमावली, महाराष्ट्रात व कर्नाटकात राज्य जिंकले, एक लाखाचे लष्कर केले, अडीचशे किल्ले बांधले." नाना प्रकारे बोध करण्याचा प्रयत्न केला, पण संभाजीची समजूत काही पटेना. महाराज पराकाष्ठेचे कष्टी झाले. आपण रायगडावर जाऊन राजारामाचे

लग्न करून परत येतो' असे सांगून व पुन्हा एकदा प्रयत्न करण्याचे ठरवून महाराजांनी संभाजीचा निरोप घेतला. जाताना त्यांनी पन्हाळगडचा बंदोबस्त केला. म्हालोजी घोरपडे याला सरनोबत करून पन्हाळगडावर संभाजीजवळ ठेवले. पन्हाळ्याचा कारभार बाजी मुरार देशपांडे याचा नातू विठ्ठल त्रिंबक, हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक या विश्वासू मंडळींकडे सोपविला. इतकेच नव्हे तर अष्टप्रधानांतला एक डबीर जनार्दनपंत हणमंते हा खाली कोप्पळाकडे होता, त्यालाही कोल्हापूर प्रांती येऊन संभाजीवर नजर ठेवण्याचा हुकूम दिला.

आपल्या उतारवयात पुढे येऊन ज्याने आपला भार हलका करावयाचा, त्या मुलावर पहारे बसविण्याची वेळ यावी याचा महाराजांना मनस्वी खेद झाला. रक्ताचे पाणी करून हजारोंनी वाढविलेल्या या स्वराज्याचे पुढे काय होणार ही चिंता त्यांना छळू लागली. धाकटा राजाराम तर केवळ दहा वर्षांचा होता. त्याचा कारभारात काहीच उपयोग नव्हता. संभाजी त्याला पुढे कसा वागवील ही काळजीच होती. घरात सोयराबाईची धुसफूस चालूच होती. अष्टप्रधानांत मोरोपंत पिंगळे आणि अण्णाजी दत्तो यांचा द्वेष जाहीर होता. उत्तरेकडून मोगल स्वराज्याचा घास घेण्यास टपले होते. आपण असताना ही स्थिति, तर आपल्यानंतर काय या प्रश्नाचे उत्तर महाराजांना काही सापडेना. त्यांची बुद्धि कुंठित झाली. त्यांच्या उज्ज्वल जीविताची संध्याकाळ विषादाने काळवंडून गेली.

रायगडावर आल्यानंतर त्यांनी राजारामाचा व्रतबंध आणि विवाह केला. वधू प्रतापराव गुजराची मुलगी जानकीबाई नेमस्त केली. नेताजी पालकरानंतर प्रतापराव गुजराला महाराजांनी स्वराज्याचा सरनौबत केले. महाराजांच्या खांद्याला खांदा लावून तो लढला होता. वणीदिंडोरीच्या लढाईत एखलासखानाचा त्याने पाडाव केला. दिलेरखानाला त्याने धूळ चारली व साल्हेर व मुल्हेर जिंकले, उमराणीवर बहलोलखानाला त्याने जेरीस आणले आणि दया दाखवून जिवानिशी सोडून दिले. प्रतापरावाने नागाला पाजलेले हे दूध, ही वेडी दया महाराजांना मुळीच आवडली नाही; त्यांनी त्याला ठपका दिला. बहलोलखान परत धुमाकूळ घालू लागल्यावर महाराज चिडले व त्यांनी प्रतापरावाला लिहिले "हा घडोघडी येतो तुम्ही लष्कर घेऊन जाऊन बहलोलखान येतो याची गाठ घालून, बुडवून फत्ते करणे, नाही तर तोंड न दाखविणे." महाराजांचे हे जळजळीत शब्द प्रतापरावाच्या मर्मी लागले. त्याला ध्यानी मनी स्वप्नी बहलोलखान दिसू लागला. मनाच्या अशाच बेभान अवस्थेत नेसरीच्या खिंडीत प्रतापरावाने अवघ्या सहा स्वारांनिशी बहलोलखानाच्या अफाट सेनेवर झडप घातली व प्राणार्पण केले. तो शिवरात्रीचा दिवस होता. राज्याभिषेकापूर्वी केवळ चार महिने महाराजांचा सरसेनापति त्यांच्या शब्दासाठी धारातीर्थी पतन पावला. प्रतापरावाच्या मृत्यूने महाराज अतिशय

हळहळून म्हणाले "आज एक बाजू पडली. प्रतापराव यास लेहून पाठविले की फत्ते न करिता तोंड दाखवू नये! त्यासरिखे करोन बरेच म्हणविले. आता लष्कराचा बंद कसा होतो?" राजारामाच्या लग्नात आपल्या दिवंगत सरनौबताला आपला व्याही करवून घेऊन महाराज त्याच्या ऋणातून मुक्त झाले. त्याची मुलगी छत्रपतींची सून झाली. सुनेचे नाव जानकीबाई होय. राजारामाचे लग्न हे महाराजांच्या हातून झालेले त्यांच्या घरातले शेवटचे मंगलकार्य. या शेवटच्या मंगलकार्याला संभाजीला आमंत्रण नव्हते, त्याला पन्हाळ्यावर ठेवण्यात आले होते. या गोष्टीत फार फार अर्थ होता.

राजारामाचे लग्न झाले आणि थोड्याच दिवसांनी महाराजांना ज्वर येऊ लागला. उपचारांची शिकस्त झाली. पण आजारास उतार म्हणून पडेना. आपल्या जीविताचा शेवट जवळ आला हे महाराजांनी ओळखले. त्यांच्या अखेरच्या घटका सुखाच्या झाल्या नाहीत. जीवन आणि मृत्यु यांच्या अंधुक सरहद्दीवर घोटाळत असता त्यांच्या मनावर संभाजीच्या उच्छृंखलपणाबद्दल विषाद, धाकट्या मुलाची चिंता आणि स्वराज्याच्या भवितव्याची विवंचना यांची दाट आणि गंभीर छाया पडली होती. निर्णय करणेच जेथे कठीण होऊन बसले होते, तेथे निर्णायक म्हणून सांगणार तरी काय व कसे? दुःखाने अवघडून उभ्या असलेल्या आपल्या सुहृदांना निर्वाणीचा निरोप म्हणून महाराज इतकेच म्हणाले– "तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे. यामागे किती उत्पन्न झाले तितके गेले. आता तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीने असणे. आता अवघे बाहेर बैसा. आपण श्रींचे स्मरण करितो." महाराजांची ही शेवटची आज्ञा. सर्वजण बाहेर बसले. आत महाराज एकटे राहिले, व श्रींचे स्मरण करू लागले.

महाराजांचे देहावसान झाले. त्या वेळी दुपारचे बारा वाजले होते. रौद्र संवत्सरातील चैत्री पौर्णिमेचा तो दिवस होता.

महाराजांचे निधन काहीसे एकाएकी झाले. इतक्या लवकर आपण जाऊ असे त्यांचे त्यांनाही वाटले नसावे. इतरांना तर ती कल्पनाही नव्हती. कारण महाराज फक्त सात दिवस आजारी होते. यापूर्वी चार वर्षे साताऱ्याला ते दोन महिने आजारी होते. आग्र्याहून परत आल्यानंतरही ते असेच आजारी पडले होते; त्यातून ते बरे झाले होते. त्यामुळेही कदाचित् असेल, पण महाराज मृत्यु पावले तेव्हा त्यांच्याजवळ अष्ट प्रधानांतील एकही जबाबदार अधिकारी हजर नव्हता. पेशवे मोरोपंत पिंगळे हे उत्तरेला मोंगलांच्या तोंडावर होते. सचिव अण्णाजी दत्तो फोंडा–कारवारकडे कोकणात होते. सेनापति हंबीरराव मोहिते कऱ्हाडकडे होते. डबीर जनार्दनपंत सुमंत कोल्हापूर प्रांती होते. रायगडावर सोयराबाई, धाकटा पुत्र राजाराम, राहुजी सोमनाथ, रामचंद्र नीलकंठ, निळो

मोरेश्वर, गंगाधरपंत हे ब्राह्मण व बाळाजी आवजी, सूर्याजी कंक, हिरोजी फर्जंद, महादाजी नाईक पानसंबळ इत्यादि काही प्रतिष्ठित इतर होते.

महाराजांचे देहावसान झाल्यानंतर चंदनकाष्ठे, बेलकाष्ठे आणवून महाराजांचे उत्तरकार्य करण्यात आले. सर्व राजपत्न्या, हुजरे व कारकून यांनी सांगितले की, 'धाकटे पुत्र राजाराम यांनी क्रिया करावी.' तेव्हा उत्तरक्रिया साबाजी भोसले सिंगणापूरकर यांजपासून राजाराम यास समीप बसवून करण्यास प्रारंभ केला. "वडील पुत्र संभाजीराजे वेळेस नाहीत, याकरिता धाकट्यांनी क्रिया केली."

□

(२)

थोरले पुत्र संभाजीराजे वेळेस नाहीत याकरिता उत्तरक्रिया धाकटे पुत्र राजाराम यांजकरवी करण्यात आली.

कारण अगदी उघड होते. रायगडावर संभाजी त्या वेळी अनेकांना नको होता. त्यामुळे २४ मार्चला महाराजांना नवज्वराचा ताप येऊ लागला, त्या वेळी त्याला कोणताही सुगावा लागू देऊ नये याची काळजी घेण्यात आली. महाराजांचे निधन झाले त्याचीही वार्ता त्याला कळविण्यात आली नाही. मग उत्तरक्रियेसाठी बोलावणे करणे तर दूरच! प्रारंभापासून अखेरपर्यंत या बाबतीत जाणूनबुजून एक प्रकारची चोरटी मुग्धता पाळण्यात आली. निवर्तलेल्या पित्याची उत्तरक्रिया करण्याचा अधिकार ज्येष्ठ पुत्राला शास्त्राने दिलेला आहे, पण संभाजीच्या बाबतीत या वेळी तो कटाक्षाने व मुद्दाम डावलण्यात आला.

रायगडावर या वेळी सोयराबाई आणि राजाराम सोडता राहुजी सोमनाथ, प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीलकंठ हीच काय ती कर्ती माणसे होती. या मंडळींनी महाराजांच्या मृत्यूची बातमी फुटणार नाही याची दक्षता घेण्याचा प्रयत्न केला आणि रायगडचा कडेकोट बंदोबस्त केला. गडाची रखवाली हवालदार कान्होजी भांडवलकर, आणि शहाजी सरनोबत यांच्याकडे दिली. किल्ल्याचे दरवाजे बंद ठेवून फक्त दिंड्या तेवढ्या उघड्या ठेवल्या; पहारा कडक केला. रायगडच्या उतरणीवरील पाचाड येथे मंत्र्यांची कुटुंबे व इतर लोक राहात. या ठिकाणी मालसावंताच्या हाताखाली दहा हजार मावळे ठेविले. मालसावंताने महाराजांच्या कारकीर्दीत, अण्णाजी दत्तोबरोबर फाल्गुन वद्य त्रयोदशीच्या किर्र अंधारात पन्हाळ्याचा बेलाग कडा कोंडाजी फर्जंदासह हाताने चढून जाऊन गड सर केला होता. तेव्हा त्याच्या इमानाबद्दल आणि शौर्याबद्दल प्रश्नच नव्हता. गडावरचा व गडाखालचा बंदोबस्त इतका कडेकोट होता की नजर चुकवून मुंगीसुद्धा जाणे किंवा येणे शक्य नव्हते. ("अज्ञाता नैव निर्याति न चायाति पिपीलिका।") मग माणसाची काय कथा?

महाराजांची उत्तरक्रिया संपल्यानंतर तेराव्या दिवशी म्हणजे १६ एप्रिलला मंत्र्यांनी सोयराबाईची भेट घेतली व पुढील व्यवस्थेची तिच्याशी वाटाघाट केली. या भेटीत मुख्यतः अण्णाजी दत्तोच्या विचाराने असे ठरले की, संभाजीला राज्य देऊ नये. तो पन्हाळगडावर आहे, तेथेच अधिक बंदोबस्तात ठेवावे. राज्य राजारामाला द्यावे. कारण उत्तरेकडून औरंगजेबाच्या आक्रमणाचे संकट टांगत्या तलवारीप्रमाणे भेडसावीत असताना, संभाजीसारख्या उग्र-प्रकृति व्यक्तीच्या हाती

राज्य दिले, तर त्याच्याने राज्य आवरणार नाही, तो स्वतःचाही नाश करील व इतरांचाही नाश करील.

हा प्रस्ताव सोयराबाईच्या पुढे ठेवताना अण्णाजी दत्तोने मनुष्य-स्वभावाचे जे ज्ञान प्रकट केले त्याबद्दल त्याची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. त्याला माहीत होते की, या गोष्टीला सोयराबाईकडून मुळीच नकार येणार नाही. संभाजीबद्दल तिचा सापत्नभाव किती तीव्र होता, आणि महाराजांच्या हयातीतच, आपण कर्नाटकात गेल्यावर, मागे दोघांचे संघर्ष टाळण्यासाठी त्यांनी तिला रायगडला व त्याला शृंगारपूरला कसे ठेवले होते हे त्याला माहीत होते. आपल्या मुलाला राज्यपद मिळावे याबद्दल तिची इच्छा किती जबर होती, आणि महाराज असतानाच त्यांच्यापाशी ती कसा हट्ट धरून बसली होती, याचेही त्याला ज्ञान होते. पण त्याला हेही ज्ञान होते की, लोभाप्रमाणे भीति हीही मानवी स्वभावातली एक प्रबळ प्रेरणा आहे. महाराज एकाएकी वारले, त्यांच्या मृत्यूनंतर रायगडावर बंदोबस्त फार कडक झाला, अनेकांना त्यांचे अंत्यदर्शनही झाले नव्हते. या साऱ्या गोष्टी रायगडच्या परिसरात चर्चेचा विषय झाल्या होत्या आणि 'सोयराबाईने महाराजांना राज्यलोभास्तव विषप्रयोग केला' अशी अफवा उठली होती. ही अफवाही अण्णाजी दत्तोने सोयराबाईच्या कानावर घालण्याची संधि घेतली. आणि आपल्या बेताला संमति दिली नाही, तर तिची काय स्थिति होईल याचे भेसूर चित्र तिच्या डोळ्यापुढे उभे केले. तेव्हा राज्यलोभाने, सापत्नभावाने, लोकापवादाच्या भीतीने सोयराबाईने राजारामास राज्य द्यावे या अण्णाजी दत्तोच्या विचारास संमति दिली. पण सोयराबाईने महाराजांना विषप्रयोग केला या विधानास ऐतिहासिक आधार नाही. ते बखरीत नमूद आहे इतकेच. तर्कशुद्ध कल्पना इतकीच की राज्यप्राप्ति व सापत्नभाव या दोन कारणांमुळे सोयराबाईने अण्णाजी दत्तोच्या विचारास संमति दिली असावी.

स्वतः तो सुद्धा भीति आणि लोभ यांच्यापासून मुक्त होता असे मुळीच नाही. संभाजीची भीति त्यालाही होतीच. त्याचे व संभाजीचे पूर्वीपासून वाकडे होते. महाराज असतानाच तो अण्णाजी दत्तो प्रभृति मंत्र्यांचा चारचौघांत असा उपहास करीत असे की, "अपश्यतः पश्यतामूनमात्यान्पश्यतो हरान्" (पहा, डोळ्यांदेखत पैसे पळविणारे हे अमात्य आले.) आणि ही सर्व थट्टा मंत्री त्यास वंदन करण्यास आले असताना चाले. असा हा संभाजी राज्यावर आला, व त्याच्या हाताखाली आपणांस काम करावे लागले तर आपली काही धडगत नाही हे अण्णाजी दत्तोला स्पष्ट दिसत होते. त्याच्यापेक्षा राजाराम फार बरा. कारण तो राजा असला तरी लहान आहे, त्याची आई राजमाता असली तरी शेवटी एक स्त्रीच आहे, त्यामुळे राजारामाच्या कारकीर्दीत सत्ता जरी राजाची असली तरी ती नावापुरती राहील, खरी सत्ता मंत्र्यांच्या म्हणजे आपल्याच मुठीत राहील असा त्याचा

कयास होता; आणि सामान्यतः तो चूक होता असे म्हणवत नाही. 'अबला यत्र प्रबला बालो राजा –' असे मुळी निर्नायकीचे वर्णन करणारे सुभाषितच आहे. एकाच कृतीने अण्णाजी दत्तोने सोयराबाईलाही खूष केले, संभाजीचाही काटा काढला व स्वतःचेही आसन बळकट करून घेतले. एकाच दगडात त्याने तीन पक्षी मारले, असे हे राजकारण होते.

पण लोभ आणि भय यांनी अण्णाजी दत्तो अगदी अंधळा झालेला होता व त्याला राज्यहिताची दरकार नव्हती असे समजणे म्हणजेही त्याच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. कसेही असले तरी, तो महाराजांच्या विश्वासातला, त्यांच्या जवळ वागलेला, त्यांचे विचार जाणणारा, स्वराज्याचा जुना कारभारी होता. संभाजीला राज्य देऊ नये असा आग्रह धरण्यात महाराजांच्या इच्छेला आपण मान देत आहोत, असे त्याला वाटले तर त्यात काही चूक नव्हते. प्रत्यक्ष महाराजांनी आपल्या हयातीत संभाजीला आपणानंतर राज्य द्यावे असे कधीही म्हटले नव्हते. आठ दिवस ते आजारी होते. ते शेवटपर्यंत शुद्धीवर होते. त्यांच्या मनात असते तर ही व्यवस्था करण्यास त्यांना कोणाचीही आडकाठी नव्हती. पण त्यांनी तसे तर काही केले नाहीच, उलट अखेरच्या आजारातही संभाजीला जवळ बोलावून घ्यावे असे त्यांना वाटले नाही. उलट त्याला पन्हाळ्यावर नजरकैदेत ठेवले होते तसेच ठेवले. या सर्व गोष्टी पुरेशा सूचक होत्या, आणि त्याचा अभिप्राय हा होता, की आपल्या मृत्यूपर्यंत महाराजांच्या मनात संभाजीबद्दल अविश्वास कायम होता, व आपणानंतर राज्याचा हा अवजड भार तो जबाबदारीने सांभाळील याची त्यांना खात्री नव्हती.

महाराज मनुष्य स्वभावाचे मर्मज्ञ होते. त्यांना स्वतःला पोटच्या मुलाबद्दल इतका अविश्वास वाटला. मग अण्णाजी दत्तोसारख्या त्यांच्या सहकाऱ्यांना जर त्याच्याबद्दल विश्वास वाटला नाही तर त्यांना दोष देणे न्यायाचे नाही. संभाजीचे पूर्ववृत्त त्याच्याबद्दल अनुकूल पूर्वग्रह निर्माण करणारे नव्हते. त्याचे सावत्र आईशी पटत नव्हते. त्याची मंत्र्यांशी भांडणे होती. तो महाराजांची अवज्ञा करीत होता. त्याचे चारित्र्य संशयास्पद होते. महाराष्ट्राला परक्या वाटणाऱ्या तांत्रिकाच्या भजनी तो लागला होता. आणि या सर्वांपेक्षा म्हणजे महाराजांच्या हयातीत तो दिलेरखानाला जाऊन मिळाला होता. महाराजांनी बांधलेला भूपाळगड त्याने जमीनदोस्त केला होता. स्वराज्याचा यापेक्षा मोठा द्रोह कोणता असेल!

पूर्वी एकदा असाच एक प्रकार घडला होता. अफझुलखान चालून आला, त्या वेळी उत्रवळींचा देशमुख खंडोजी खोपडे खानास महाराजांच्या विरुद्ध सामील झाला. खानाच्या वधानंतर जावळीच्या किर्र जंगलातून, अंधारातून खंडोजी खोपड्याने खानाचा मोठा मुलगा फाजलखान याला सुरक्षित बाहेर काढले व कऱ्हाडपर्यंत सुखरूप पोचवून दिले. खानाचे दोन मुलगे मराठ्यांनी पाडाव केले, पण

थोरला फाजलखान मात्र खोपड्यांच्या हरामखोरीमुळे सुटला. पुढे स्थिरस्थावर झाल्यावर खंडोजी परत उत्रवळीला आला. त्याने आपला जावई हैबतराव शिलीमकर व कारीचे प्रतिष्ठित देशमुख कान्होजी जेधे यांचेमार्फत महाराजांकडे प्राणाची भीक मागितली. कान्होजी जेधे अनेक वर्षे स्वराज्यासाठी खपलेले, त्यांच्या शब्दाला महाराजांपाशी किंमत मोठी, पण खोपड्याबद्दलची रदबदली ऐकल्याबरोबर महाराज कडाडले– "तो हरामखोर! त्यास वतनास ठिकाण नव्हता; त्याची वतनदारीवर स्थापना आम्ही केली. निमे वतन सिका आम्ही दिला. यैसे असोन, त्याणे बेईमानी करून अफझलखानाकडे जाऊन लबाडी केली आणि हतेर धरिले! तो हरामखोर! त्याची चार धडे चौमार्गी टाकावी! त्याची रदबदली तुम्ही न करणे. त्यास आम्ही कौल देत नाही." पण कान्होजी जेध्याची भीड महाराजांना पडली. त्यांचा नाईलाज झाला. खंडोजी खोपडे रोज मुजऱ्यास येऊ लागला. महाराजांच्या मनात अंगार धगधगतच होता. एकदा एकाएकी त्यांनी आज्ञा केली की, "या हरामखोर दगलबाजाचा उजवा हात व डावा पाय कलम करा!" खंडोजीचा डावा पाय व उजवा हात तोडल्याचे कळल्यावर रुष्ट झालेल्या कान्होजी जेध्याने महाराजांना विचारले– "खंडोजीस अभय देऊन शास्ती केली! आमचे रदबदलेची भीड काय राहिली?" त्यावर महाराजांनी उत्तर केले– "नाईक, तुमचे भिडेकरिता खंडोजी जिवे मारिला नाही. त्याने ज्या हाते तरवार धरिली, तो हात कापिला; ज्या पायाने चालोन गेला तो पाय कापिला!"

महाराजांच्या धर्मशास्त्रात स्वराज्यद्रोहाच्या पापाला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरे प्रायश्चित्त नव्हते. खंडोजी खोपडा आणि युवराज संभाजी यांच्यात तसे डावे–उजवे करण्यासारखे काहीच नव्हते. खंडोजी अफजलखानाला मिळाला. संभाजी दिलेरखानाला मिळाला. ज्या पातकाबद्दल खंडोजी खोपड्याचे हात-पाय तोडण्यात आले, तेच पातक करणाऱ्या संभाजीला मात्र, केवळ तो महाराजांचा ज्येष्ठ पुत्र म्हणून छत्रपतिपद द्यावयाचे हे कोण शहाणपण व ही कोण नीति, असे जर महाराजांबरोबर स्वराज्याचा कारभार तीस तीस वर्षे केलेल्या बुजुर्ग कारभाऱ्यांना वाटले, तर त्यात मनुष्यस्वभावाला तर राहोच, पण व्यवहारज्ञानाला सोडून तरी काय आहे?

पण अण्णाजी दत्तो सचिवाची मसलत कितीही मुत्सद्दीपणाची असली, तरी त्या योजनेचे सर्व यश तिच्यात सहभागी होणाऱ्या लोकांच्या एकमतावर आणि प्रामाणिक पाठिंब्यावर अवलंबून होते. आणि दुर्दैवाने या लोकांच्यात असे एकमत मुळीच नव्हते. सचिवाइतकाच स्वराज्यातला वजनदार कारभारी म्हणजे पेशवा मोरोपंत पिंगळे हा होय. परंतु पेशव्याचा आणि सचिवाचा द्वेष फार जुना होता आणि तो जगजाहीर होता. महाराजांच्या कारकीर्दीत औरंगजेबाच्या भेटीला आग्र्यास जाण्याच्या वेळी, आपणांमागे स्वराज्याची सारी जबाबदारी त्यांनी

पेशवा आणि सचिव यांच्यावर सोपविली होती. पण महाराजांचे नियंत्रण नाहीसे झाल्याबरोबर दोघांचे हेवेदावे अगदी कळसास पोचले. असे विधान, जपून विधान करण्याबद्दलच प्रसिद्ध असलेल्या खरेशास्त्र्यांनी 'मराठे व इंग्रज' या केळकरांच्या ग्रंथास लिहिलेल्या विख्यात प्रस्तावनेत केलेले आहे, ते चिंतनीय आहे. हा इतिहास तसा काही फार जुना झालेला नव्हता. महाराजांना या गोष्टीची उत्तम कल्पना होती. त्यामुळेच सामान्यतः ते पेशवा व सचिव यांना बहुधा एकाच प्रदेशात मुलुखगिरीवर पाठवीत नसत. उत्तरेत कोळवण–बागलाणाकडे पेशवा असेल तर त्या वेळी दक्षिणेत कारवार–कुडाळकडे सचिव पराक्रम गाजवीत असत. त्यामुळे केवळ सचिवाने ही मसलत काढली, एवढ्याच कारणाने या वेळी पेशव्याने त्याला 'खो' घातला असता. पण त्याला रायगडला यावयास उशीर झाला; हनुमंतगडावर मोगलांनी हल्ला चढविल्यामुळे त्याला तातडीने निघता आले नाही. तो आला, तेव्हा सोयराबाई आणि सचिव यांचे कारस्थान शिजून तयार झाले होते. त्यामुळे त्याचा निरुपाय झाला. मनातून त्याचा ओढाही संभाजीकडे होता. पण या वेळी परिस्थितीच्या रेट्यापुढे नाइलाजाने त्याला शरणागति पत्करावी लागली. राजकीय डावपेचात रायगडवर येण्यात त्याच्या आधी आघाडी मारून त्याच्यावर सचिवाने मात केली होती; याबद्दल त्याच्या मनात जळफळाट होत होता; त्यामुळे त्याची संमति म्हणजे मोठ्या नाखुषीने दिलेला होकार होता. सचिवाबद्दल असूया, संभाजीबद्दल ओढा आणि परिस्थितीपुढे नाइलाज अशा संमिश्र प्रवृत्तींच्या पेशव्याचे या मसलतीतले सहकार्य कितपत मनापासून असेल हे उघडच आहे.

प्रल्हाद निराजी हा न्यायाधीश त्याचे मत डळमळीत होते. रामचंद्र नीलकंठ हा अमात्य. त्यालाही निश्चित मत असे कोणतेच नव्हते. पेशव्याची ती तशी कथा होती. सोयराबाई, अण्णाजी दत्तो व राहुजी सोमनाथ यांचेच काय ते खरे एकमत होते. पण या योजनेच्या यशाला आणखी एका व्यक्तीच्या अनुकूलतेची नितांत गरज होती. ती म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस होय. बखर प्रमाण समजणे असेल तर, अण्णाजी दत्तोच्या मसलतींतील पहिला महत्त्वाचा भाग असा होता की, पन्हाळ्यावर संभाजीची कैद अधिक कडक करावी. त्यासाठी पन्हाळ्याचे अधिकारी व जनार्दनपंत सुमंत यांना तशी पत्रे लिहावयाची, संभाजीला गाफील ठेवण्यासाठी महाराजांच्या प्रकृतीची कुशल वार्ता कळविणारे खोटेच पत्र तयार करावयाचे व ते त्याला द्यावयाचे. त्याचा बंदोबस्त पुरेसा झाला म्हणजे त्याला खरी बातमी कळवावयाची. आता अशी राजकार्याची सरकारी पत्रे लिहिण्याचा अधिकार फक्त बाळाजी आवजीचा होता; कारण तो सगळ्या स्वराज्याचा चिटणीस होता. त्याच्या हस्ताक्षराशिवाय कोणीही पत्रांवर विश्वास ठेवला नसता. आणि या राजकारणाला बाळाजी आवजीची संमति मिळणे ही गोष्ट कल्पान्ती सुद्धा शक्य नव्हती.

कारण बाळाजी आवजी चिटणीस हा चांद्रसेनीय कायस्थ प्रभु; त्याचा आणि अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे प्रभृति ब्राह्मण मंत्र्यांचा पराकाष्ठेचा द्वेष होता. बाळाजी आवजीच्या मुलांच्या मुंजी करण्यास सुद्धा ब्राह्मणांचा विरोध होता. कलियुगात क्षत्रियच नाहीत, चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हे तर क्षत्रिय नाहीतच नाहीत, म्हणून कोणत्याही ब्राह्मणाने प्रभूंच्या घरी वेदोक्त कर्मे करता कामा नयेत हा आग्रह करून बाळाजीच्या मुलांच्या मुंजींना बाळंभट्ट चितळे नांवाच्या एका भटजीने विरोध केला, व त्याला मोरोपंत वगैरे ब्राह्मण मंत्र्यांनी पाठिंबा दिला. बाळाजीने त्या मुंजी पुढे गागाभट्टाकरवी करवून सर्वांचा नक्षा उतरविला हे निराळे. पण ही गोष्ट बाळाजी कसा विसरेल !

ब्राह्मण आणि प्रभू यांच्यातील जातिमत्सराप्रमाणेच बाळाजी व इतर मंत्री यांच्यात वैयक्तिक मत्सराचीही भर पडली होती. राजापूरहून आपणांबरोबर बाळाजीला व त्याच्या दोघा भावांना आणताना महाराजांनी त्यांच्या मातुश्रीला सांगितले होते की, 'मी तुमचा चवथा मुलगा आहे, आपला तो शब्द त्यांनी मरे-पर्यंत पाळला होता. राज्याभिषेकाच्या वेळेस त्यांनी रायगडची व सर्व राज्यातील चिटणिसी कारखानिसी व जमेनिशी वंशपरंपरा बाळाजीला करार करून दिली होती. त्यामुळे प्रत्येक किल्ल्यावर चिटणीस, कारखानीस व पोतनीस प्रभू जातीचे असत, व ते नेमण्याचा अधिकार बाळाजीचा असल्यामुळे त्याच्या मागे त्याच्या जातीच्या लोकांची बळकट फौज तयार झाली होती. बाळाजीचा हा अमर्याद अधिकार, त्याचे वैभव, आणि महाराजांची त्याच्यावरील अपरंपार कृपा या मुळे इतरांच्या जाति-मत्सराच्या आगीत तेल पडून त्यांनी त्याला विष-प्रयोग करण्याचाही प्रयत्न केला होता. त्यातून बाळाजीचा कल सर्वस्वी संभाजीकडे होता. असा हा माणूस– जो व्यक्ति म्हणून, जात म्हणून, पक्ष म्हणून आजपर्यंत आपल्या डोळयांत कुसळासारखा सलत होता, त्याचे सहकार्य मागण्याची वेळ अण्णाजी दत्तोवर येऊन ठेपली.

अपेक्षेप्रमाणे बाळाजीला पन्हाळ्यावर बंदोबस्ताची पत्रे लिहिण्याची सूचना सोयराबाई व अण्णाजी दत्तोने केल्यावर त्याने पहिल्या सपाटयाला ती धुडकावून लाविली. तो म्हणाला, "आम्ही दरखदार राजाचे. खावंद वडील संभाजी महाराज असता अशी पत्रे आम्ही लिहिणार नाही. तेव्हा तुम्हांस हा आग्रह करण्याचे कारण नाही." त्यावर सोयराबाई म्हणाल्या, "तुमचे हातचे पत्र नसल्यास लोकांस पत्राचा विश्वास पडणार नाही. यास्तव तुम्हाकडे दरख ; त्या अर्थे बरी वाईट पत्रे तुम्ही लिहावी, हे तुम्हास प्राप्त, लिहून द्यावी." यावर बाळाजीचा नाइलाज झाला. सोयरा-बाई रुष्ट, संभाजी दूर पन्हाळयावर, येथे रायगडावर मंत्री सगळेच विरुद्ध, आपण एकाकी, पाठिंबा कोणाचाच नाही. पण पत्रे लिहिण्यास त्याचे मन होईना. त्याने पर्याय सांगितला "मी लिहित नाही. मूल आवजीबावा आहे. त्यास स्वाधीन करितो.

पाहिजे तसे करवा. इतके बोलून अगदी खिन्न अंतःकरणाने बाळाजी बैठकीतून उठून गेला.

अण्णाजी दत्तोचे काम झाले. बाळाजीचा मुलगा आवजी बल्लाळ याचेकडून त्याने पन्हाळगडचा हवालदार बहिरजी नाईक, सोमाजी नाईक बंकी, कृष्णाजी नाईक बंकी, हिरोजी फर्जंद, यांस आणि कोल्हापुरास जनार्दनपंत सुमंत यास पत्रे लिहून घेतली की, "येथील प्रसंग एक प्रकारचा आहे. संभाजी महाराज यांस कैद करून बहूत सावधपणे असावे. महाराजांचे वर्तमान फुटू देऊ नये. संभाजीलाही पत्र लिहिले पण बंदोबस्त झाल्यानंतर ते द्यावयाचे होते. ताबडतोब जासुदाचा नाईक खंडोजी नाईक व गणोजी कावळा यांजबरोबर ही पत्रे पन्हाळा व कोल्हापूर येथे रवाना करण्यात आली.

एवढ्या गोष्टी झाल्यानंतर २१ एप्रिल १६८० रोजी महाराज मृत्यु पावल्यानंतर अठराव्या दिवशी अण्णाजी दत्तोने राजारामाचे मंचकारोहण केले. हा सविध राज्याभिषेकाचा पूर्वावतार होय. सोयराबाईचे मनोरथ सफल झाले. अण्णाजी दत्तोचे घोडेही गंगेत न्हाले. राजारामाचे मंचकारोहण झाले त्या दिवशी अक्षयतृतीया होती. साडेतीन मुहूर्तातल्या या अलौकिक मुहूर्तावर हाती घेतलेल्या कार्यात यश आल्याशिवाय राहात नाही असा सामान्य समज आहे. तसाच तो अण्णाजी दत्तोचाही असेल यात शंका अर्थात् नाहीच.

रायगडचा बंदोबस्त झाला. पन्हाळ्याला पत्रे गेली. राजारामाचे मंचकारोहण झाले. आता संभाजीचा अधिक बंदोबस्त करण्यासाठी स्वतः पन्हाळ्यावर चालून जावे असे अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांनी ठरविले. पण त्याला सैन्याची जरूर होती. आजपर्यंत बुद्धिबळाचे डाव खेळले. आता बाहुबळाशिवाय चालणार नव्हते. त्यासाठी सेनेची म्हणजेच सेनापतीची अनुकूलता अत्यंत आवश्यक होती. या वेळी स्वराज्याचे सेनापति हंबीरराव मोहिते होते. आणि त्यांचा मुक्काम कऱ्हाडला होता.

हंबीरराव मोहिते हा कोल्हापूर जिल्ह्यातील कसबे तळबीडचा राहणारा. प्रतापराव गुजर हा नेताजी पालकरानंतर सरनौबत झाला. नेसरीच्या लढाईत तो पडल्यानंतर महाराजांना मनस्वी खेद झाला; आणि चिपळूण मुक्कामी हंसाजी मोहिते याला 'हंबीरराव' हा किताब देऊन सरनौबतपदाचा बहुमान त्याला त्यांनी बहाल केला. आपल्या कर्तृत्वाने हंबीररावाने महाराजांनी दिलेला बहुमान सार्थ केला आणि प्रतापरावाची वाण भासू दिली नाही. आजपर्यंत त्याने अनेक रणांगणात तलवार गाजविली होती. कोप्पळच्या लढाईत त्याने हुसेनखान मियानाला कैद करून आणिले; कर्नाटकच्या स्वारीत एकोजीराजांचा पराजय केला; जालन्याच्या लढाईत लढत असता त्याला जखमा झाल्या होत्या. त्याच्या छावणीत या वेळी त्याच्याबरोबर रूपाजी भोसले आणि मकाजी आनंदराव

यांच्यासारखे नामांकित लढवय्ये होते. रूपाजी भोसल्याने साल्हेर व उमराणी येथल्या लढाईत पराक्रम गाजविला होता. मकाजी आनंदरावाने उमराणीवर बहलोलखानाला जेरीस आणले होते व वेलोरचा अजिंक्य किल्ला हस्तगत केला होता. असे धुरंधर योद्धे ज्याच्या हाताखाली आहेत तो हंबीरराव जर अनुकूल झाला तर संभाजीचा बंदोबस्त होण्यास उशीर लागणार नाही असे अण्णाजी दत्तोला वाटले. तो अनुकूल कां होऊ नये याला काहीच कारण नव्हते. सोयराबाईचा तो भाऊ होता आणि राजारामाचा तो मामा होता. आपल्या भाच्याला राज्य मिळाले तर हंबीररावाला केव्हाही आनंदच होईल अशा विचाराने रायगडावरून अण्णाजी दत्तोने हंबीररावाला संदेश पाठविला की, आम्हांस मिळावे. राजारामाचा कार्यभाग साधावा.

हंबीररावाचे उत्तर आले. त्याने पेशवा आणि सचिव या दोघांच्या आशेला पालवी फुटली. त्याने लिहिले होते,

"जेथे जेथे तुम्ही जाल तेथे तेथे मी येईन. तुमच्या प्रवासात मीही एक सोबती होईन. तुम्हांला सोडून जायला मला दुसरा रस्ता आहे कोणता?" ("तत्र तत्र समेष्यामि यत्र यत्रागमिष्यथ। पथिकीभूयतेऽस्माभिर्भवन्मुक्तस्य किं पथः।")

सेनापतीचे असे उत्तर आल्यानंतर पेशवे आणि सचिव दोघेही पन्हाळ्याकडे निघाले. बरोबर न्यायाधीश प्रल्हाद निराजी होता. स्वारीत पेशवे घोड्यावर होते. सचिवाचे शरीर फार स्थूल त्यामुळे त्यांना मात्र पालखी करावी लागली.

□

(३)

बिचारा अण्णाजी दत्तो! महाराजांच्या मृत्यूची बातमी फुटू देऊ नये म्हणून त्याने आपल्या बाजूने आटोकाट प्रयत्न केला. पण बातमी फुटायची ती फुटलीच. " लोकोत्तर अशी कौतुकवती वार्ता आणि विमल अशी विद्या स्वतःच आपोआप जगात पसरतात " अशा अर्थाचे एक वचन आहे. महाराजांच्या मृत्यूच्या बातमीपेक्षा अधिक लोकोत्तर आणि कौतुकवती वार्ता ती कोणती असणार ! नाही म्हटले तरी रायगडावरील कारभाऱ्यांना ही बातमी पेशवा व सचिव यांना कळवावी लागली होतीच. पेशवा व सचिव यांनाही ती जनार्दनपंत सुमंताला कोल्हापूरला व पन्हाळगडावर कळविण्याशिवाय इलाज नव्हता. महाराजांचा मृत्यु झाल्यावर रायगडचे दरवाजे जरी बंद केले तरी कारकुनांची कुटुंबे खाली पाचाडात राहात होती. त्यांना ही बातमी कळलीच. फार काय राजापूरच्या इंग्रजांना सोळाव्या दिवशी हे वृत्त समजले. कर्णोपकर्णी ही वार्ता संभाजीला कळली तर त्यात आश्चर्य काहीच नव्हते. आश्चर्य हे होते की आपणच गप्प बसलो म्हणजे बातमी कळणार नाही अशी सोयराबाईने व तिच्या पदरच्या मंडळीनी जी स्वतःची फसवणूक करून घेतली होती. मांजर डोळे मिटून दूध पिते म्हणून इतरांना ते दिसत नाही असे थोडेच आहे? महाराजांनीच औरंगजेबाला पूर्वी एकदा पत्र लिहिताना पदरचे लोक उच्चपदस्थांची कशी दिशाभूल करतात याचे मार्मिक वर्णन केले होते. "पदरची मंडळी ही तृणाने अग्नि झाकतात याचे आश्चर्य वाटते." तसाच हा प्रकार होता. एरवी एवढी थोरली गोष्ट काय दबून थोडीच राहते ? महाराजांच्या मृत्यूनंतर दहा दिवसांच्या आत संभाजीला त्यांच्या निधनाची बातमी समजली.

संभाजीचा मुक्काम या वेळी पन्हाळ्यावर सज्जा कोठीत होता. तो नजरकैदेत असला तरी ती युवराजाची नजरकैद होती. त्याच्या खर्चाला तीन लक्षांचा तालुका महाराजांनी तोडून दिला होता. दक्षिणेकडील कारभार त्याच्याकडे सोपविला होता. जनार्दनपंत सुमंताला त्याचा बंदोबस्त सांगितला होता, तो इतक्याच मर्यादेपर्यंत की, त्याने पूर्वीसारखे काही गैरकृत्य केले तर त्याला प्रतिबंध करावा. बाकी इतर बाबतीत पन्हाळ्याच्या चतुःसीमेत संभाजीला पूर्ण संचारस्वातंत्र्य होते. बातमी काढण्यासाठी त्याचे स्वतःचे हेर होते. या हेरांनी महाराजांच्या मृत्यूची बातमी तर त्याला दिलीच, पण याखेरीज रायगडावर अण्णाजी दत्तो वगैरे मंत्र्यांनी सोयराबाईबरोबर कारस्थान करून, राजारामाचे मंचकारोहण करविले आहे आणि संभाजीला पक्क्या बंदोबस्तात ठेवण्याचा घाट घातला आहे येथपर्यंत इत्थंभूत वृत्तान्त निवेदन केला. त्यामुळे रायगडावरचे जासूद येण्याआधीच संभाजी हुशार आणि सावध होऊन बसला.

पन्हाळचाच्या उतरणीवर घोडा फिरवावयास संभाजी खाली आला असता रायगडचे जासूद खंडोजी नाईक व गणोजी कावळा लगबगीने येताना दिसले. जवळ बोलावून पत्रे कसली म्हणून विचारता संभाजीच्या नावाचे पत्र त्यांनी दिले. त्यात मजकूर होता, की, "वाखा आहे. आरोग्य होईल" दुसरे लखोटे कोणाचे म्हणून विचारले. संभाजीला 'नाही' म्हणण्याची चाकर माणसांची काय प्राज्ञा होती? ते गडावरच्या हवालदार व सुभेदाराच्या नावाचे होते. संभाजीने ते फोडून वाचले. त्यातला मजकूर "फार घाबरे आहेत. पुढे बंदोबस्त ठरेल तसे लिहू. परवानगीशिवाय संभाजी महाराजांस उतरू जाऊ-येऊ देऊ नये." संभाजीचा स्वभाव आधीच रागीट. त्यात या फसवाफसवीने तो जास्तच चिडला, व जासुदास म्हणाला, "आबासाहेब कसे आहेत ते खरे सांगा, नाहीतर पारिपत्य करीन." त्या वेळी जासुदांचा धीर सुटला आणि त्यांनी सारा खरा प्रकार सांगून टाकला.

लगेच संभाजीने किल्लेदार विठ्ठल त्र्यंबक व हवालदार बहिरजी नाईक यांना बोलावून आणिले व त्यांच्यादेखत जासुदांना परत तेच प्रश्न विचारले आणि त्यांच्याकडून त्यांच्या समक्ष खरा प्रकार वदवून घेतला. अशा प्रकारे गुन्ह्याचे माप पदरात घातल्यानंतर संभाजीने किल्लेदार आणि हवालदार यांच्या पायांत बेड्या ठोकल्या. त्याच्या बंदोबस्तासाठी नेमलेले सोमाजी नाईक बंकी आणि सूर्याजी कंक यांना ठार मारले. या गडबडीत हिरोजी फर्जंद काही जवाहिर व खजिना घेऊन चिपळूणला पळून गेला म्हणून तो तेवढा बचावला. अशा प्रकारे आपणांला अटक करण्याचा ज्यांचा मनसुबा होता, त्यांच्याच हातां-पायांत 'अलंकार' चढवून व त्यांना बंदीखाना दाखवून, आपणांस कैद करण्याचा अण्णाजी दत्तोचा डाव संभाजीने उधळून लावला आणि पन्हाळ्यावर त्याने आपली सत्ता प्रस्थापित केली.

यापुढे संभाजीने साऱ्या हालचाली विजेच्या चपळाईने केल्या. त्याने राजापुरातले धान्य अडकवून ते सर्व पन्हाळ्यावर पाठविण्याचा हुकूम केला. त्याने सर्व सुभेदार, हवालदार, कारकून, नोकर, चाकर यांना भेटावयास बोलाविले. त्याने सैन्य जमवायलाही सुरुवात केली आणि या बाबतीत तो फार भाग्यवान् ठरला. त्याला भेटण्यासाठी सैन्य आणि सरदार यांची पन्हाळ्याकडे रीघ लागली. कारण, या बाबतींत संभाजीची पूर्व पुण्याईच तशी होती. कारभाऱ्यांचे त्याच्याविषयी काहीही मत असले तरी सैन्यामध्ये तो अतिशय लोकप्रिय होता. त्याचे शौर्य व त्याची तयारी एखाद्या कसलेल्या सेनापतीलाही लाजविण्यासारखी होती. लढाईत कर्तबगारी गाजविणाऱ्या शिपायाचे कौतुक करण्यात तो कधी मागे नव्हता. तो थोरल्या महाराजांचा पुत्र होता. त्याचे रूप अलौकिक सुंदर होते. महाराजांच्या कारकीर्दीत शिपायांच्या खांद्याला खांदा लावून तो रणांगणात लढला होता. मागे एकदा म्हटल्याप्रमाणे या छोट्या सेनापतीवर सैनिकांचे प्रेम एवढे होते, आणि

त्याची ते एवढी वाहवा करीत की प्रत्यक्ष महाराजांनाही त्याचा हेवा वाटला असता, त्यामुळे त्याच्या शब्दासरशी सैनिकांचे थवेच्या थवे त्याच्याकडे जाऊ लागले तर त्यात काय आश्चर्य !

सैन्यावर असलेल्या या वजनामुळे संभाजीचा मार्ग फार सुकर झाला. पन्हाळा त्याच्या ताब्यात आला तरी त्याच्या बंदोबस्तासाठी नेमलेला जनार्दनपंत हणमंते हा अष्ट प्रधानांतला सुमंत खाली कोल्हापुरातच होता. संभाजीने त्याच्या फौजेत राजकारणाचे सूत्र लावले. संभाजी मोठा मुलगा, त्यामुळे राज्यावर कायदेशीर हक्क त्याचाच आहे असे मानणारे लोक सुमंताच्या फौजेत फार होते. त्यामुळे त्याच्या फौजेत फितुरी माजविणे संभाजीला फार सोपे गेले. एवढी सिद्धता झाल्यावर संभाजीने एका रात्री कोल्हापुरात सुमंताच्या छावणीवर छापा घातला आणि त्याला कैद करून पन्हाळ्यावर आणून ठेवले. राजकीय डावपेचातला संभाजीचा हा मोठा विजय होय. यानंतर संभाजीने राज्यकारभार हाती घेतला व 'राजा' ही पदवीही धारण केली.

पण, "शत्रूंचा संहार केल्याशिवाय आणि जग जिंकल्याशिवाय केवळ 'मी राजा आहे' असे म्हणण्याने काही कोणी राजा होत नाही." असे शंकराचार्यांनी म्हटले आहे ते खरे आहे– (अकृत्वा शत्रुसंहारमगत्वाखिलभूश्रियम् । राजाहमिति शब्दान्नो राजा भवितुमर्हति ।) पूर्वी एकदा जावळीच्या चंद्रराव मोऱ्यानेही शिवाजी महाराजांना असाच जबाब पाठविला होता,–"तुम्ही काल राजे जाहला ! तुम्हांस राज्य कोणी दिधले ? मुस्तफद राजा आपले घरी म्हटलियावर कोण मानितो ?" संभाजीचीही अशीच परिस्थिति होती. स्वतःला 'राजा' म्हणून त्याने जाहीर केले असले, व काही सैन्य जरी त्याने जमविले असले तरी साऱ्या सैन्यावर ज्याची हुकमत, त्या सेनापतीची अनुकूलता असल्याशिवाय, त्याचे कोणतेही बेत सिद्धीस जाणे अशक्य होते. या अटीतटीच्या संघर्षात ज्याच्या पारड्यात सेनापति आपले वजन टाकणार त्याचे पारडे जड होणार होते, इतके त्याचे मत निर्णायक होते. त्यामुळे अण्णाजी दत्तोप्रमाणे संभाजीनेही सेनापति हंबीरराव मोहिते याला पत्र लिहिले की, "महाराजांनी निधनापूर्वी राज्य माझ्या स्वाधीन केले आणि दिल्लीश्वराला तोंड देण्याची जबाबदारीही माझ्यावर टाकली. पण दुष्ट मंत्री माझ्यावर कुरघोडी करीत आहेत. धाकट्या भावाचा मी द्वेष करितो असे त्यांनी त्याच्या आईच्या मनात भरवून दिले आहे. मोगल जर टपलेले नसते, तर मला दिलेल्या या राज्यावर त्या पोराला केव्हाच या दुष्ट मंत्र्यांनी बसवून टाकले असते. माझ्या द्वेषाने अंध होऊन हे यवनांना येथे येण्याचे आमंत्रण देण्यास सुद्धा कमी करणार नाहीत. पण राज्य राजा मिळवत नाही, राजा राज्य मिळवितो. या मंत्र्यांना मी वाबरत नाही. सध्याच या दुष्टांना मी जेरबंद केले आहे. तुम्हीही

मला मिळून त्यांचे पारिपत्य करावे आणि असाच सल्ला तुम्ही मकाजी आनंदराव व मानाजी मोरे यांना द्यावा."

संभाजीच्या हेरांनी त्याला पूर्वीच बातमी दिली होती की, सेनापति हंबीरराव मोहिते याला आपली बहीण सोयराबाई आणि भाचा राजाराम यांच्याबद्दल कितीही प्रेम असले, तरी राज्याचा ज्येष्ठ व कायदेशीर वारस म्हणून त्याला संभाजीबद्दलच पक्षपात होता. हंबीरराव हा जात्या शिपाईगडी होता, त्याला राजकारणातले डावपेच फारसे कळत नव्हते; संभाजीसारख्या जातीच्या शूराने केलेले आवाहन त्याच्यासारख्या जातीच्या शूराला चटकन् समजले. संभाजीचे शौर्य त्याने पूर्वी पाहिले होतेच, पण आताहा ज्या चातुर्याने व तडफेने त्याने पन्हाळा काबीज केला आणि सुमंतासारख्या एका प्रधानाला कैद केले, त्याची त्याच्या मनावर मोठीच छाप पडली, व संभाजीच्या अंगी बापाप्रमाणेच शौर्य आणि धाडस आहे हे त्याच्या लक्षात आले. आणखी थोडासा स्वार्थाचा भाग असा की, कारभाऱ्यांच्या करड्या नियंत्रणाखाली राहण्यापेक्षा संभाजीसारख्या शूर, उदार पण ढिल्या आणि भोळ्या राजाच्या हाताखाली काम करणे केव्हाही जास्त सुखाचे व फायद्याचे होते. असा साराच विचार करून हंबीररावाने आपला कौल संभाजीच्या बाजूने दिला. त्याची अनुकूलता मिळाल्याबरोबर पन्हाळ्यावर चालून येणाऱ्या अण्णाजी दत्तो आणि मोरोपंत पिंगळे यांच्या पारिपत्याचे काम संभाजीने प्रथम त्याच्यावर सोपविले.

हे दोघे आणि प्रल्हाद निराजी तिसरा, असे रायगडावरून निघाले तेव्हा त्यांना हंबीररावाचा निरोप आला होता की, 'तुम्ही जेथे जेथे जाल, तेथे तेथे मी येईन.' वस्तुतः हंबीरराव या वेळी संभाजीला मिळाला होता व त्याच्या निरोपाचा खरा अर्थ, 'तुम्ही जेथे जेथे जाल तेथे तेथे मी तुमचा पाठलाग करीन' असा होता. पण यांनी त्याचा फक्त अनुकूल तेवढाच अर्थ काढला. रायगडावरून ते प्रतापगडावर आले आणि त्यांना अपशकुन होऊ लागले. प्रल्हाद निराजीचे मन आधीच हेलकावे खात होते ते या अपशकुनांनी जास्तच भांबावले. तो म्हणू लागला—"आपण करीत आहो ते काही चांगले नाही. आपण संभाजीला पूर्वी विरोध केला आणि त्याचा परिणाम तो दिल्लींद्राकडे जाण्यात झाला. त्याच्याशी आज वैर मांडणे म्हणजे समर्थाशी वैर मांडण्यासारखे आहे. शिवाय हंबीरराव वगैरे सरदार त्याला अनुकूल आहेत. अशा स्थितीत आपण त्याच्या कलाने घेणे हे बरे असे मला वाटते." पण प्रल्हाद निराजीचे हे म्हणणे त्यांना पटले नाही. त्यांनी त्याला पन्हाळ्यावर संभाजीकडे वाटाघाटीसाठी पाठविण्याचे ठरविले. वाटाघाटीचे स्वरूप सांगताना ते त्याला म्हणाले, "थोरल्या महाराजांनी आम्हांला मुलासारखे वागविले. दैवयोगाने ते दिवंगत झाले, पण त्यांचा हा लहान मुलगा ठेव म्हणून आमच्यापाशी ठेवून गेले. त्या धाकट्याचे हे सारे राज्य आहे. वडिलांच्या

आज्ञेप्रमाणे फार तर तू कर्नाटकाचे राज्य कर. जर उर्मटपणान त्याने या उचित गोष्टी ऐकल्या नाहीत, तर दिल्लीश्वराकडे जाण्याशिवाय त्याला दुसरा मार्ग नाही." प्रल्हाद निराजी वाटाघाटींसाठी म्हणून गेला तो परत आलाच नाही. आपण सुटलो असे त्याला वाटले.

पेशवे आणि सचिव प्रतापगडावरून पुढे चालले. कऱ्हाडपाशी येतात तो हंबीररावाच्या छावणीतून एक दूत त्यांच्याकडे आला व हंबीरराव आपणास एकान्तात भेटू इच्छितात असा निरोप त्याने आणिला. त्याप्रमाणे भेट झाल्यावर एकाएकी हंबीररावाने रुद्रावतार धारण केला व त्या दोघांची अगदी शेलक्या शब्दांत सडकून हजेरी घेतली. "तुम्ही कोण? कसले हे सैन्य? तुम्ही चालून जात आहात तरी कुणावर? तुम्ही दोघांनी या कसल्या माकडचेष्टा चालविल्या आहेत? ज्याचे अन्न जन्मभर तुम्ही खाल्ले, तो गेल्याबरोबर त्याच्या मुलाला तुम्ही कैद करायला उठलात! खरोखर, तुमच्यासारखे नीच तुम्हीच!" सेनापतींनी आजपर्यंत अनेक वेळा तोफा डागल्या होत्या पण त्या रणांगणावर, पण त्या तंबूत, त्या एकांतात, त्यांनी ही असली तोफ डागल्याबरोबर पेशवे आणि सचिव या दोघांचीही धाबी दणाणली आणि हात जोडून ते सेनापतीची माफी मागू लागले. हंबीररावाने अधिक बोलून त्यांना लाजविले नाही. मेलेल्याला मारण्यात अर्थ नाही हा रणांगणातला त्याचा जुना अनुभव होता. त्याने त्यांना निःशस्त्र केले. व कडक पहाऱ्यात बंदोबस्ताने संभाजीकडे पन्हाळ्याला रवाना केले. संभाजीनेही त्यांचा यथोचित सत्कार केला. पेशव्याला त्याने कैदेत ठेवले आणि अण्णाजी दत्तो हा या बंडवाल्यांचा शिरोमणि, म्हणून त्याच्या पायांत जड 'अलंकार' घातले. हे लोक पन्हाळ्याला बंदोबस्तासाठी गेले होते. त्याप्रमाणेच झाले. ते पन्हाळ्याला ठरविल्याप्रमाणे गेलेच. बंदोबस्तही झाला. फरक इतकाच की, तो संभाजीचा न होता त्यांचाच झाला. वाघ होता, पिंजरा होता, पारधीही होता. इतकेच झाले की पारध्यानें वाघाला पिंजऱ्यात कोंडण्याऐवजी वाघानेच पारध्याला पिंजऱ्यात कोंडले.

एखाद्याचा पिच्छा पुरवायचे ठरविले की संभाजी त्याला सोडत नसे. हिरोजी फर्जंद चिपळूणला पळून गेला होता. ते संभाजीच्या लक्षात होते. याच वेळी त्याने त्याला धरून आणिले त्याच्याकडून सगळे जवाहिर व खजिना काढून घेतला आणि पन्हाळ्यावर त्याला कैद करून ठेवले. या बातम्या रायगडावर पोचून सोयराबाईच्या पक्षात फितूर झाला. सरनोबत शहाजी भोसले व नाइकवाडी यांनी पेशवा व सचिव यांची घरे लुटली व चौक्या बसविल्या. इतके केल्यावर आपल्या कृत्याला त्यांनी संभाजीची संमति मागितली. संभाजीने ती ताबडतोब दिली हे सांगणे नकोच.

आता संभाजीला सर्वत्र 'निर्विघ्नमुर्वीतलम्' झाले. त्याने सुमंताला कैद केले, पेशव्याला कैद केले, सचिवाच्या पायांत बेड्या ठोकल्या, सेनापति फोडला,

आणि सोयराबाईचा आपणांस स्थानबद्ध करण्याचा डाव पार उधळून लावला. त्याने पाच हजार सैन्य जमा केले. त्यांना दोन महिन्यांचा पगार आगाऊ दिला. कारण या सैन्याच्या बळावरच त्याला राजपद मिळवावयाचे होते. सर्वत्र आपले सुभेदार व अधिकारी नेमले. पन्हाळचाचा कारभार म्हाळोजी घोरपडे यास सांगितला. आपला सासरा पिलाजीराजे शिर्के याच्याबरोबर पंधरा हजार लोक देऊन रायगडच्या बंदोबस्तास पुढे पाठविले, आणि रायगडला जाण्यासाठी पन्हाळगडावरून प्रस्थान ठेविले.

संभाजी हा अतिशय धर्मनिष्ठ मनुष्य होता. रायगडास जात असता वाटेत कोरटी मुक्कामी मल्हार गोसावी नावाच्या एका सत्पुरुषाची त्याची भेट झाली. संभाषण प्रसंग झाला. भेटीत हा माणूस मोठा प्रामाणिक ईश्वरभक्त आहे असे त्याला दिसून आले. त्यावर संतुष्ट होऊन संभाजीने नाडोली गांव हा अग्रहार म्हणून गोसाव्याकडे चालवावा असा कऱ्हाडच्या देशाधिकाऱ्यांना हुकूम दिला. वस्तुतः हा गांव पूर्वीपासून त्याचेकडेच होता. पण शिवाजी महाराजांनी वतन देण्याची आपल्या राज्यात रीत नाही म्हणून तो अमान्य केला होता. संभाजीने परत तो चालू करून दिला.

कऱ्हाड सोडल्यावर वाटेत प्रतापगडला संभाजी थांबला. तेथे त्याने भवानीची पूजा केली व दुसऱ्या दिवशी तो रायगडास जाण्यास निघाला. १८ जून १६८० रोजी तो रायगडास पोचला. किल्ल्यावर जाण्यास त्याला कोणताही अडथळा आला नाही. कारण, सर्वत्र त्याचेच लोक होते.

गडावर पोचल्यावर संभाजीने पहिली गोष्ट कोणती केली असेल, तर ती ही की, रायगडचा हवालदार कान्होजी भांडवलकर कचेरीत बसला होता, त्याला कैद केले, आणि पाचाडच्या बंदोबस्तासाठी कारभाऱ्यांनी मालसावंताला नेमले होते त्या मालसावंताला कडेलोट करून दहा पंधरा जणांसह देहान्त प्रायश्चित्त दिले.

४

मालसावंत निष्कारण प्राणास मुकला.

तो संभाजीच्या बाजूलाही नव्हता की विरुद्धही नव्हता. अण्णाजी दत्तो आणि सोयराबाई यांनी दिलेल्या हुकुमाची इमाने इतबारे तामिली त्याने केली आणि त्याबद्दल त्याला प्राण गमवावे लागले. एके काळी या मालसावंताने अण्णाजी दत्तो बरोबर पन्हाळचाचा बुलंद गड जिकताना मोठी कठीण कामगिरी पार पाडली होती. त्याच्या लोकांतले जे संभाजीकडे फुटले ते वचावले, तो मात्र मारला गेला पण संभाजीचा स्वभावच मुळी असा होता, की तो संतापाच्या एकदा आहारी गेला की त्याचा सारासार विवेक नाहीसा होऊन जाई. मग आपण कोठे आहोत, कोणत्या माणसाबद्दल काय हुकूम देत आहोत, त्याचे परिणाम काय होतील, त्या माणसाचा दर्जा काय, पूर्व कर्तृत्व काय, त्याच्याबद्दल मिळालेली बातमी खरी कीं खोटी याचा विचार त्या क्षणापुरता तरी त्याच्या मनातून अगदी नाहीसा होऊन जाई. गंधकासारखा ज्वालाग्राही असलेला त्याचा क्रोध म्हणजे दारूचे कोठार होते. त्यावर कोणी जाणून किंवा नेणून ठिणगी टाकण्याचा अवकाश की, भडका उडायला वेळ लागत नसे. याही वेळी त्याने पेशव्याला व सचिवाला कैद केले, मालसावंताला ठार केले, रायगडचा हवालदार कान्होजी भांडवलकर यालाही चतुर्भुज केले, आणि राहुजी सोमनाथ याला कामावरून काढून टाकले. या त्याच्या रागीट स्वभावामुळेच संभाजी रायगडावर येत असल्याचे कळल्यावरच सोयराबाई वगैरे मंडळींची पाचांवर धारण बसली. कारण महाराज असताना आणि नसताना संभाजीविरुद्ध नाना तऱ्हेची कारस्थाने करून या लोकांनी खरोखरच नागाच्या शेपटीवर पाय देऊन त्याला डिवचले होते.

रायगडला आल्यानंतर संभाजी काही दिवस धुमसतच होता. त्याने महाराजांच्या अस्थींचे दर्शन घेऊन विधिपुरःसर सर्व क्रिया परत केली. संभाजी केवळ धर्मश्रद्धच नव्हता तर पक्का कर्मठ होता. यज्ञयाग, नवस-सायास, कर्मकांड ह्या गोष्टी तो श्रद्धेने करी. या सुमारास, शिवाजीमहाराजांची बायको मोहिते घराण्यातली पुतळाबाई ही २७ जून १६८० रोजी सती गेली. संभाजीने या प्रसंगी मोठा दानधर्म केला.

पुतळाबाईच्या सती जाण्याची कथा थोडी चमत्कारिक आहे. महाराजांच्या मृत्यूनंतर २७ जून रोजी म्हणजे दोन महिने तेवीस दिवसांनी तिने आपले सार्थक करून घेतले. इतका प्रदीर्घ काळ तिने थांबण्याचे कारण कळत नाही. एकतर महाराजांच्या मृत्यूच्या प्रसंगी ती रायगडावर नसावी असा तर्क आहे. दुसरे असे की,

महाराजांच्या मृत्यूपासून हा काळपर्यंत गडावरची परिस्थिति अस्वस्थ होती. अशा अनिश्चित वातावरणात सहगमनाचा विचार करणे सुद्धा दुष्कर होते.

हळूहळू संभाजीचा राग शांत होत गेला. आपणाला विरोध कोणाचाच होत नाही हे पाहून गवत नसलेल्या जागेवर पडलेल्या अग्नीप्रमाणे त्याचा आवेश आपो-आप ओसरला. त्याने कैद केलेल्या कान्होजी भांडवलकराला मोकळे केले व कृपाळु होऊन रायगडची हवालदारी त्यालाच परत सांगितली. सोयराबाई वगैरे सावत्र मातांचे गोड शब्दांनी त्याने सांत्वन केले आणि आपला सावत्र भाऊ राजाराम याच्याशी त्याने अतिशय प्रेमळपणाचे वर्तन केले. त्याच्याबद्दलचा सापत्नभाव संभाजीच्या मनाला शिवलासुद्धा नाही. तो आपणाला राज्यपदासाठी प्रतिस्पर्धी होता व त्याचे मंचकारोहण झाले होते याची ओळख सुद्धा संभाजीने त्याला कधी दिली नाही. त्याला नजरकैदेत मात्र ठेविले, ते एवढ्याचसाठी की, त्याला हाताशी धरुन उपद्व्यापी मंडळींनी आणखी काही कारस्थाने करू नयेत. एरवी इंग्रजा-सारख्या परक्यांना सुद्धा कौतुक व आश्चर्य वाटावे इतक्या आपलेपणाने संभाजीने व येसूबाईने राजारामाला वागविले. येसाजी दाभाडे, जो त्याच्या खास तैनातीस होता, तो रायगडावर आल्याबरोबर राजारामाच्या तैनातीस संभाजीने दिला. राजारामाचे लग्न महाराजांनी प्रतापराव गुजर याची मुलगी जानकीबाई हिच्याशी करून दिले होते. संभाजीने त्याची आणखी तीन लग्ने करून दिली. सेनापति हंबीरराव मोहिते याची मुलगी ताराबाई हिच्याशी, कागलकर घाटगे यांजकडील राजसबाई हिच्याशी आणि अंबिकाबाई ऊर्फ अहिल्याबाई हिच्याशी. सामान्यतः राज्य असो वा नसो, सावत्र भाऊ सर्वत्र एकमेकांचा दुःस्वास करताना दृष्टीस पडतात; पण संभाजीच्या जीवनात कितीही चढउतार पुढे जरी आले, तरी राजारामाच्या बाबतीतील त्याच्या प्रेमळ औदार्यात कलासही फरक पडला नाही. संभाजीचे राजारामाशी संबंध हा संभाजीच्या संमिश्र व्यक्तिमत्त्वातील परा-काष्ठेचा हृदयंगम भाग आहे; याचा विसर पडता कामा नये.

लौकरच म्हणजे नागपंचमीच्या मुहूर्तावर श्रावण शुद्ध पंचमीला, २० जुलै १६८० रोजी संभाजीने मंचकारोहण केले. मंचकारोहणालाच प्रथमाभिषेक किंवा आसंदी-आरोहण म्हणतात. अधिष्ठित राजाच्या मृत्यूपूर्वी किंवा मृत्यु होताच, प्रतिष्ठित केलेले राजसिंहासन मोकळे राहता कामा नये या हेतूने, युवराजाला हा अभिषेक किंवा मंचकारोहण करतात. हे जर ताबडतोब होऊ शकले नाही तर मृत राजाच्या श्राद्धानंतर साठ दिवसांचा काळ योग्य व शंभर दिवसांचा काळ मध्यम समजला गेला आहे. संवत्सराभिषेक दरवर्षी केला जातो व महाभिषेक किंवा ऐंद्रयाभिषेक हा महाराजांनी करविला होता. संभाजीने तो माघ शुद्ध ७ (१६ जानेवारी १६८१) रोजी केला. सध्या नागपंचमीच्या मुहूर्तावर

मंचकारोहण करून विधिपूर्वक आपला राज्यपदावर अधिकार संभाजीने प्रस्थापित केला.

जुलै महिन्यात मंचकारोहण झाल्यानंतर ऑगस्टमध्ये संभाजीने रायगडावरील संपत्तीची मोजदाद आणि जामदारखान्यांची संपूर्ण तपासणी स्वत: जातीने केली. ती प्रचंड संपत्ति म्हणजे थोरल्या महाराजांच्या कर्तृत्वाचे मूर्तिमंत स्मारक होते. रायगडच्या खजिन्यात काय होते यापेक्षा काय नव्हते असेच विचारणे जास्त समर्पक ठरेल. त्यातील निरनिराळ्या रत्नांची व वस्तूंची संख्या व विस्तार पाहिला तर छाती दडपून जाते. सोने तीन खंडी, होन पांच लक्ष, तांबे तीन खंडी, शिसे साडेचारशे खंडी, लोखंड वीस खंडी, जस्त व शिसे यांची मिश्र धातु चारशे खंडी, चांदी साडेपाच खंडी, ब्राँझ दोनशे बहात्तर खंडी. निरनिराळ्या किल्ल्यावर तीस लक्ष होनांची संपत्ति ठेवली होती ती निराळीच. मसाल्याचे पदार्थ, सुगंधी पदार्थ प्रचंड प्रमाणात होते. भात सतरा हजार खंडी, तेल सत्तर हजार खंडी, सैंधव दोनशे खंडी, गोपीचंदन दोनशे खंडी, गंधक दोनशे खंडी, कापडाची ठाणी चार हजार होती, एक लक्ष तागे हलके कापड होते, धान्य, डाळी, तंबाखू, साखर इत्यादि वस्तूंची तर गणतीच नव्हती. दुसऱ्या एका हिशेबाप्रमाणे नऊ कोट रुपयांची सोन्याची नाणी, एकावन्न हजार तोळे सोने, दोनशे तोळे माणके, एक हजार तोळे मोती, पाचशे तोळे हिरे, तीस हजार तलवारी, चाळीस हजार भाले, साठ हजार ढाली, चाळीस हजार धनुष्ये, अठरा लक्ष बाण इत्यादी संपत्ति महाराजांच्या मृत्यूच्या वेळी रायगडावर होती. राज्यकर्त्या माणसाने लहान-मोठ्या प्रत्येक वस्तूचा किती साक्षेपाने संग्रह करावा लागतो, याचा तो एक वस्तुपाठच होता. या संपत्तीशिवाय गड, कोट दुर्ग, प्रांत, घोडे, हत्ती, उंट, पालख्या, माणसे, सैन्य ही संपत्ति होती ती तर निराळीच. ती जामदारखान्यात बंदिस्त नव्हती. ती सिंधुतीरावर, पर्वत राजीवर मैदानावर धावत होती, लढत होती, जिंकत होती. तिची गणना करणारा कोण आहे? तूर्त संभाजीने पाहिली ती जामदारखान्याची संपत्ति.

ते ऐश्वर्य पाहून संभाजीला पराकाष्ठेची कृतार्थता वाटली असेल तर नवल नाही. गेल्या पाच सहा वर्षांत त्याच्या राज्यसंपादनाच्या मनोरथांना इतके काही उलट सुलट हेलकावे मिळाले होते, दिलेरखानाकडे जाताना, तेथून परत येताना व पन्हाळ्यावर प्रतिबंधात असताना विषाद आणि निराशा यांची एवढी दाट छाया त्याच्या मनावर पडली होती की कधी काळ बदलेल व आपण महाराष्ट्राच्या छत्रपतिपदी विराजमान होऊ ही आशा त्याने जवळ जवळ सोडून दिली होती; पण अघटितघटनापटु नियतीच्या लीलाकैवल्याने घटना इतक्या अतर्क्य रीतीने घडल्या की असाध्य वाटलेले साध्य झाले आणि राज्यलक्ष्मीने संभाजीला माळ घातली. संभाजीची मनोरचना ही श्रद्धावंताची होती त्यामुळे आपणास प्राप्त झालेले ऐश्वर्य हे सत्पुरुषांच्या आशीर्वादाचे व ईश्वरी कृपेचे फळ आहे असे त्याला वाटल्यास आश्चर्य

नाही. म्हणून या मंचकारोहणाच्या निमित्ताने त्याने अनेक सत्पुरुषांना व देवस्थानांना दाने व इनामे करून दिली. त्यातली काही वैशिष्टचपूर्ण आहेत.

तुकाराममहाराजांचे देहूला वास्तव्य करणारे चिरंजीव महादोबा यांस वर्षासनाची मोईन पातशाही होन एक आणि लुगडियाबद्दल गला जोरी बारुले महालमापे खंडी एक मोईन करून दिली. पाटगाव, कुडाळ येथील ईश्वरस्वरूप मौनी गोसावी यांस पालखीस भोई आणि वाजंत्री यासाठी वाजंत्री यांस वर्षास पंचवीस आणि भोई यास शंभर होन अशी वर्षाची नेमणूक मौनीबुवाचे शिष्य तुरुतगिरी याजवळ दिली. तुळजापूरच्या देवीस शृंगारलेला हत्ती, सालंकार पाच घोडे आणि वीस हजार होनाचे वार्षिक दान देण्यात आले. तुळजापुरच्या महालक्ष्मीप्रमाणेच प्रतापगडच्या भवानीमातेच्या कृपाप्रसादाने आपणास राज्यश्रीचा लाभ झाला असे संभाजीला वाटले आणि तिला दरवर्षी दहा हजार होन देणगी दिल्याचे शिक्कामोर्तबाचे पत्र त्याने मंचकारोहणानंतर महिन्याभरात म्हणजे २३ ऑगस्ट १६८० रोजी करून दिले.

परंतु या सर्व दानापेक्षा संभाजीचे एक संस्कृत दानपत्र अतिशय बोधप्रद आहे. ते त्याच्या मनोव्यापारावर आणि जीवनाच्या पूर्वेतिहासावर थोडक्यात पण बराच प्रकाश टाकते. एका अर्थाने संभाजीने ही स्वतःची दिलेली लेखी कैफियत आणि आत्मचरित्र आहे. या दानपत्रावरून असे दिसून येते की, राज्यपद मिळविण्याच्या बाबतींत संभाजी फारच आतुर झालेला होता; त्याच्यावर मानसिक ताण बराच पडलेला होता. त्याच्यासाठी त्याने वैदिक देवता व सत्पुरुष यांच्याप्रमाणे मांत्रिकांचाही आश्रय केलेला होता. या बाबतीत कविकलशाने त्याला प्रोत्साहन दिलेले होते. हे दानपत्र राज्यपद मिळण्यासाठी संभाजीने केलेला नवस फेडण्यासाठी आहे. नवस फेडताना संभाजीने नवस करिताना आश्वासन दिल्याप्रमाणे दरवर्षी दहा हजार होनांचे दान श्रेष्ठ मांत्रिकमहाशय स्वामी बाकरे यांस वंशपरंपरा दिलेले आहे. हे मांत्रिक महाशय बाकरे आडनावाचे, नामदेव भट्टाचे पुत्र, कऱ्हाडे, जामदग्न्य गोत्री, कोकणातील कुडाळ गावचे राहणारे होते. कोकणातले काही कऱ्हाड ब्राह्मण मंत्र-तंत्रात प्रवीण होते, संभाजी त्यांच्या वर्चस्वाखाली गेला होता. कविकलश हा त्याचा या बाबतीत सल्लागार होता. या सर्व गोष्टींचा एकत्र उल्लेख करणारा संभाजीच्या हातचा हा पहिला लेख संस्कृतमध्ये आहे. याचा काल शके १६०२ भाद्रपद शुद्ध दशमी सोमवार, २४ ऑगस्ट १६८० असून त्यावर संभाजीचे "मतं मे शिवराजपुत्रस्य श्रीशंभुराजछत्रपते यदत्रोपरि लिखितम् ।" असे शब्द व त्याची मुद्रा आहे—"श्री । शंभो शिवजातस्य मुद्रा द्यौ । रिव जायते । यदं । कसेविनो लेखा । वर्तते कस्य नो । परि ॥" संभाजीचे मंचकारोहण २० जुलै १६८० रोजी झाले हे प्रसिद्धच आहे. त्यानंतर महिन्याने दिलेले हे दानपत्र. संभाजीने रायगडाला जाऊन स्वतःला राज्यभिषेक करून घ्यावा असा पन्हाळ्याला कविकलशाने त्याला

सल्ला दिला असे 'परमानंदकाव्य' म्हणते. त्याला या दानपत्राने पुष्टि मिळते. कारण यात आलेल्या उल्लेखावरून कविकलश व संभाजी यांचा संबंध निदान १६८० ऑगस्ट पूर्वीपासून बराच घनिष्ठ असला पाहिजे असा तर्क वाटतो.

परंतु संभाजीची मंत्रतंत्रावरील किंवा नवसावरील श्रद्धा आणि कविकलशाचा व त्याचा संबंध सिद्ध करणे एवढेच या दानपत्राचे महत्त्व नाही. त्यात संभाजीचे वर्णन करणारी जी संस्कृत विशेषणे आहेत, त्यांत त्याचे सर्व पूर्वचरित्र सूचित करण्यात आलेले आहे. ती विशेषणे अशी आहेत. "सुरू झालेल्या प्रबल वैरात ज्येष्ठ पुत्राला राज्यदान करू नये" या दुष्ट मंत्र्यांच्या सल्ल्यामुळे जिचे हृदय कलुषित झाले आहे, वस्तुतः निळ्या पिवळ्या पार्श्वभूमीत असलेल्या स्फटिकमण्याप्रमाणे जिचे हृदय स्वच्छ, सौजन्ययुक्त आहे, अशा राणीविषयी पक्षपातामुळे, शिवराजाचे मत आपल्या विरुद्ध असल्याचे समजून सुद्धा, केवळ तेवढ्याच कारणामुळे पितृभक्तीत अंतर पडू न देणारे, कर्तव्यपालनात दाशरथी रामाचा विक्रम गाजविणारे, पायाशी असलेली दीडकोटी संपत्ति, अनेक किल्ले आणि राज्यपद यांना तृणाप्रमाणे तुच्छ मानून त्याग करणारे, बरोबर थोडे घोडेस्वार घेतले होते, तथापि औरंगजेबाच्या घोडदळाच्या सेनापतीशी संगनमत करून त्याचेकडून सात हजार घोडेस्वार मिळवून त्यांच्या बळावर भूपाल किल्ला ज्यांनी सर केला, दलेलासुर (दिलेरखान) याने गुडघा लावल्यामुळे संतप्त झालेल्या, कविकलशाच्या प्रोत्साहनाने लाल झालेल्या डोळ्यांनी इष्ट देवतेची अनुज्ञा ज्यांनी मिळविली आहे अशा शंभुराजांनी राज्यप्राप्तीच्या वेळी आश्वासिलेले,... राज्याभिवृद्धि वगैरे फलांच्या सिद्धीसाठी श्री पादुकापूजनाच्या निमित्ताने केलेले, दहा हजार सुरती नाण्यांचे दान दरवर्षी स्वतः शंभूराजे व स्वामी यांच्या पुत्र-पौत्रादिपरंपरेने अनुक्रमे चालवावे व उपभोगावे. (यापूर्वीचे) स्वामींचे वर्षासन यातच अंतर्गत समजावे." या दानपत्रावर सचिव म्हणजे आबाजी सोनदेऊ याची सही आहे.

संभाजीच्या शृंगारपुरातल्या वास्तव्यापासून तो दिलेरखानाकडून तो परत येईपर्यंतच्या म्हणजे ऑक्टोबर १६७६ ते डिसेंबर १६७९ पर्यंत तीन वर्षे राज्यपदाचा जो संघर्ष घडला, त्या बाबतीत संभाजीचा स्वतःचा दृष्टिकोन व्यक्त करणारे हे उल्लेख आहेत. संभाजीच्या मताप्रमाणे सर्व अनर्थांचे मूळ दुष्ट मंत्री होते. वस्तुतः सोयराबाईचे मन स्फटिकाप्रमाणे निर्मळ होते पण या मंत्र्यांनी संभाजीविरुद्ध तिचे मन कलुषित केले. शिवाजीमहाराजांनी सोयराबाईचा पक्षपात केला, पण हे माहीत असून सुद्धा दाशरथी रामाप्रमाणे संभाजीने पितृभक्तीत अंतर पडू दिले नाही. वस्त्राला लागलेल्या गवताच्या कुसळाप्रमाणे त्याने लोभ न धरता राज्य झटकून दूर टाकले. ('राज्यं येन पटान्तलग्नवत् त्यक्तं गुरोराज्ञया') म्हणजे शिवाजीमहाराज दशरथ, सोयराबाई कैकेयी, आणि आपण राम—अर्थातच राजाराम म्हणजे भरत असे आपल्याही जीवनाचे रामायण घडले असे संभाजीचे मत

आहे. संभाजीला पुराणांची अतिशय आवड होती, केशवभटाने त्याला प्रयोगरूप रामायण ऐकविले होते, या गोष्टीचे हे निदर्शक आहे की आपल्या जीवनाचे वृत्त कथन करितानाही त्याला रामायणातले दाखले सुचतात. ऐतिहासिक दृष्टीने हे महत्त्वाचे आहे की सोयराबाईबद्दल संभाजीचे मत अद्याप चांगले होते. ती मनाने चांगली पण बदसल्ल्याने फसलेली अशीच त्याची तिच्याबद्दल धारणा होती. रामायणात कैकेयीला चिथविणारी मंथरा होती. येथे सोयराबाईला चिथविणारे मंत्री होते. बाकी संभाजी व राजाराम यांनी एकमेकांवर सापत्नभाव मनातही न आणता जे प्रेम केले त्याला उपमा नाही. संभाजीच्या मृत्यूनंतर केवळ त्याचा मुलगा शाहू याच्यासाठी राजारामाने, रामाच्या पादुकांची पूजा करणाऱ्या नंदिग्रामातील भरताप्रमाणे, राज्य राखले. संभाजी व राजाराम यांच्या या अशा प्रेमाला केवळ रामभरताची साम्यता !

औरंगजेबाकडे संभाजी स्वतः होऊन गेला. सात हजार घोडेस्वार मिळवून त्याने भूपाळगड जिंकला. दिलेरखानाशी त्याचे भांडण झाले. तेव्हा कविकलशाने प्रोत्साहन दिल्यामुळे इष्ट देवतेची अनुज्ञा संभाजीने मिळविली म्हणजे बहुधा हा नवस केला. म्हणजे ह्या मांत्रिक मार्गातील नवसाचा प्रवर्तक कविकलश होता हे उघड आहे. संभाजीच्या हातचा हा अस्सल दस्तऐवज असल्यामुळे त्याचे महत्त्व केवळ अनन्यसाधारण आहे. थोडक्या शब्दांत फार अर्थ सांगण्याबद्दल संस्कृत विशेषणांची प्रसिद्धि आहेच. पण या दानपत्रात ते वैशिष्टय विशेषच दिसून येते. किंबहुना असेही म्हणता येईल की साभिप्राय विशेषणांमुळे साधला जाणारा 'परिकर' नावाचा काव्यालंकारच या दानपत्रात न कळत सिद्ध झाला आहे. "विशेषणैर्या साकूतैरुक्तिः परिकरः स्तुतः ।" (साभिप्राय विशेषणांनी युक्त असलेली जी उक्ति तिला 'परिकर' म्हणतात.)

फार दिवस तुंबून राहिलेला पाणलोट एकाएकी अडथळा दूर होताच हजार धारांनी कोसळू लागावा, त्याप्रमाणे मनावरचे असह्य दडपण दूर झाल्याबरोबर संभाजीच्या स्वभावातला नैसर्गिक चांगुलपणा अनंत मार्गांनी व्यक्त होऊ लागला. त्याने कान्होजी भांडवलकराला रायगडची हवालदारी परत दिली होतीच. धाकट्या राजारामाला वात्सल्याने वागविले होतेच. सत्पुरुषांना व मांत्रिकांना इनामे दिलीच होती. देवस्थानांना त्याने दानपत्रें करून दिलीच होती. पण राजाच्या राज्यारोहणप्रसंगी बंदिवानांना बंधमुक्त करावे अशी सनातन रूढि आहे. त्या रूढीचेही त्याने प्रशंसनीय परिपालन केले. या प्रसंगी हरजीराजे महाडिक, अचलोजीराजे महाडिक, जोत्याजी केसरकर, गणोजीराजे शिर्के इत्यादि संभाजीच्या जिव्हाळ्याच्या मंडळींनी विनंती केली की, "साहेब सिंहासनाधीश होणार आणि प्रधान यांच्या घरी चौक्या हे विहित नव्हे." यावरून संभाजीने मोरोपंत पिंगळे, त्यांचा मुलगा निळोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी,

हिरोजी फर्जंद, जनार्दनपंत सुमंत या सर्वांना कैदेतून मुक्त केले. मुक्त केले इतकेच नव्हे तर त्यांची अधिकारपदावर पुन्हा स्थापना केली. मोरोपंताला पेशवेपद, अण्णाजी दत्तोला मुजुमदारी, जनार्दनपंत सुमंत याला डबीरपद, बाळाजी आवजीला चिटणिसी दिली. प्रल्हाद निराजीला न्यायाधिशी दिली. एके काळी या मंडळींनी आपणाला राज्य मिळू नये यासाठी नाना प्रकारच्या खटपटी केल्या होत्या या गोष्टीची आठवण सुद्धा संभाजीने मनात ठेविली नाही. या लोकांना जन्मभर कैदेत पिचत ठेवण्याची किंवा शिरच्छेद करण्याची सत्ता हातांत असताना, त्यांना धुळीतून उचलून परत हत्तीवरच्या अंबारीत स्थापन करण्याचे जे औदार्य संभाजीने दाखविले ते केवळ अलौकिक म्हणावे लागेल. राज्यपदावर असलेल्या व्यक्तींत मनाचा इतका मोठेपणा फारच क्वचित्.

नागपंचमीला संभाजीचे मंचकारोहण झाले. पण त्याच्या मनाचे खरे समाधान राज्याभिषेक झाल्याशिवाय होणार नव्हते. परंतु तो १८ जूनला रायगडावर आला. त्याने महाराजांचे श्राद्ध केले. २७ जूनला पुतळाबाई सती गेली आणि चातुर्मासाचा काल तर २७ जूनलाच सुरू झाला. राजकीय व कौटुंबिक अस्वास्थ्य आणि धार्मिक प्रतिबंध यांमुळे त्याचा नाईलाज झाला. आपद्धर्म म्हणून त्यातल्या त्यात चातुर्मासात सामान्य अपवाद म्हणून समजल्या गेलेल्या नागपंचमीला मंचकारोहण करवून घेऊन त्याला आपले समाधान करून घ्यावे लागले. त्याचा विधिपूर्वक राज्याभिषेक माघ शुद्ध सप्तमी रविवार १६ जानेवारी १६८१ रोजी झाला. त्या प्रसंगापूर्वीच कैदेतून सोडलेल्या कारभाऱ्यांची पूर्वीच्या पदावर स्थापना करण्यात आली. अपवाद फक्त मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो सचिव यांचा होता. मोरोपंत ऑक्टोबरातच मृत्यु पावल्यामुळे पेशवेपद त्याचा मुलगा निळो मोरेश्वर याला देण्यात आले; व अण्णाजी दत्तोकडे सचिव पदाऐवजी मुजुमदारी देण्यात आली.

संभाजीचा उदय झाल्यावर त्याच्या आश्रितांचाही उत्कर्ष व्हावा हे क्रमप्राप्तच होते. इतके दिवस ज्यांनी आपली पाठराखण केली, त्या आपल्या सहकाऱ्यांना आपल्या उत्कर्षाच्या काळात संभाजी विसरला नाही. त्यांच्यावरही त्याने मुक्तहस्ताने वैभवाची बरसात केली.

संभाजी शृंगारपुरास असताना त्याच्याजवळ केशवभट्ट पुरोहित नांवाचा एक कऱ्हाडा ब्राह्मण राहात असे. हा संगमेश्वर तालुक्यातील पुर्ये येथे राहणारा. याने संभाजीला दण्डनीति शिकविली आणि प्रयोगरूप रामायण ऐकविले. याने 'धर्मकल्पलता' नांवाचा ग्रंथ लिहिला; याने 'राजारामचरितम्' या आपल्या काव्यात "सकलशास्त्रविचारशील आणि धर्मज्ञ शास्त्रकोविद" अशा शब्दांत संभाजीची प्रशस्ति गायिलेली आहे. हा शिवाजीमहाराजांजवळ दानाध्यक्ष म्हणून काम करीत असे. संभाजीने पुराणश्रवणानंतर संतुष्ट होऊन केशवभट्टाला संगमेश्वर तालुक्यात

पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने धारादत्त भूमिदान दिले. त्याच्याकडे दानाध्यक्षाचे, इतकेच नव्हे तर मोरेश्वर रघुनाथाच्या मृत्यूनंतर पंडितराईचे काम देऊन त्याचा अष्टप्रधानात समावेश केला. अशी गुरुदक्षिणा देऊन संभाजीने आपल्या गुरुजींचे ऋण फेडले.

पूर्वीचा ऋणानुबंध लक्षात ठेवून आपल्या कारकीर्दीत संभाजीने मुद्दाम पुढे आणलेली प्रसिद्ध व्यक्ति म्हणजे कविकलश हा होय. संभाजीने त्याला 'छंदोगामात्य' चे पद दिले. 'छंदोगामात्य' म्हणजे 'सामवेदाध्यायी' प्रधान होय. सामवेदी ब्राह्मणांची व्यवस्था लावण्याचा याच्याकडे अधिकार होता. कविकलश हा शास्त्र पढलेला होता म्हणून साहजिकच संभाजीने त्याच्याकडे हे काम सोपविले. पण कविकलशासाठी एवढे करून संभाजीचे समाधान झाले नाही. वाकेनवीस पदावर पूर्वी दत्ताजी त्रिमल होता. त्याच्याकडे कुडाळचा सरसुभा होता. दत्ताजी त्रिमलच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रामचंद्र दत्तो याच्याकडे हे पद महाराजांनी दिले. या रामचंद्र दत्तोची कुतुबशाही व आदिलशाही यांच्याकडे संभाजीने नेमणूक करून त्याची वाकेनिसी व कुडाळचा सुभा कविकलशाला दिला. त्याला राजकारणात आणले आणि त्याचा अष्टप्रधानांत समावेश केला. अष्टप्रधानांत समावेश करणे हा राजाने सेवकाचा केलेला सर्वश्रेष्ठ सन्मान होय. तो सन्मान करून संभाजी धन्य झाला आणि तो सन्मान पावून कविकलशही धन्य झाला.

हे सर्व ठीक होते. पण संभाजीच्या या कृतीचे परिणाम फार वाईट झाले. केवळ आपला माणूस म्हणून कविकलशाला पुढे आणण्याचे जे नेटाचे प्रयत्न संभाजीने केले, त्यामुळे त्याच्या मंत्रिमंडळात दुफळी माजली, व त्याच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातही एक प्रकारचे विलक्षण अराजक उसळले. कारण संभाजीचे अण्णाजी दत्तो प्रभृति इतर मराठी मंत्री आणि कविकलश यांच्यात पूर्वीपासूनच एकमेकांबद्दल अढी होती; परस्परात शीत युद्ध चालूच होते. त्यात आता धूमकेतूप्रमाणे एकाएकी कविकलशाचा उदय होऊन त्याचा उत्कर्ष होऊ लागल्यामुळे दोन पक्षांमधला वैराग्नि उफाळून वर आला, व एकमेकांचा काटा केव्हा काढता येईल याची दोन्ही पक्ष वाट पाहू लागले.

याची कारणे अनेक होती. या मराठी मंत्र्यांच्या दृष्टीने पाहता कवि कलश हा मराठी माणूस नव्हता. महाराष्ट्राच्या मराठी जीवनात हा उत्तर प्रदेशातील कान्यकुब्ज ब्राह्मण केवळ एक उपरा परदेशी होता. असे त्याचे कोणते पूर्ववृत्त होते किंवा कर्तृत्व होते, की त्याचा अष्टप्रधानांत समावेश व्हावा? अष्टप्रधान मंडळात समावेश होणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. हजारो लोकांत चाळणी लावून मोठ्या शिकस्तीने आठ धुरंधरांना तेथे प्रवेश मिळत असे. एक पंडितराव आणि न्यायाधीश सोडला तर बाकी साऱ्या मंत्र्यांना मुलकी कारभाराप्रमाणे लष्करी कारभारही पहावा लागत असे. कवि कलशापाशी यांपैकी काय होते? त्याने पेशव्या-

प्रमाणे साल्हेरचा घनघोर संग्राम गाजविला होता काय? अण्णाजी दत्तोप्रमाणे एकीकडे जमीन मोजणारा व एकीकडे पन्हाळा जिंकणारा, 'इदं ब्राह्मं इदं क्षात्रम्' असा तो थोडाच सव्यसाची होता? काय त्याने सेनापति हंबीरराव मोहित्यांप्रमाणे जालन्यास झाले त्याप्रमाणे रणांगणावर तलवारीचे घाव झेलले होते? काय त्याने जनार्दनपंत सुमंताप्रमाणे आणि दत्ताजी त्रिमल वाकेनिसाप्रमाणे समरभूमीवर तलवार गाजविली होती? त्याच्यापाशी बाळाजी आवजीचे लेखणीचे कसब होते काय? मोगलांच्या बंदिखान्यातही सावलीप्रमाणे महाराजांबरोबर असलेल्या हिरोजी फर्जंदाची अलौकिक स्वामिनिष्ठा त्याच्यापाशी होती तरी काय? तो नाही तर निदान त्याच्या वाडवडिलांनी तरी स्वराज्याच्या सेवेत देह झिजवला होता काय? तसा मोरोपंत पिंगळयाने झिजविला होता म्हणून त्याचा मुलगा निळो मोरेश्वर पेशवा झाला. तसे कष्ट निराजी रावजीने केले होते म्हणून त्याचा मुलगा प्रल्हाद निराजी न्यायाधीश झाला. तशी तपश्चर्या जनार्दनपंत हणमंत्याने केली होती म्हणून त्याचा मुलगा वासुदेव जनार्दन सुमंत झाला. कविकलशाजवळ यांपैकी काय होते बरे? काही नव्हते. त्याच्यापाशी तलवारीचे कसब नव्हते की त्याच्याजवळ लेखणीचे कौशल्य नव्हते. त्याच्याजवळ स्वतःची पुण्याई नव्हती. त्याच्याजवळ बापाची पुण्याई नव्हती. हजारो वीरांनी रक्ताचा सडा शिंपून उभारलेल्या स्वराज्याच्या ऐन मोक्याच्या जागी हा आयत्या बिळावरचा नागोबा आलेला होता, आणि अष्टप्रधानांच्या पंक्तीत मांडीला मांडी लावून तो बसला होता. स्वराज्याच्या सेवेत ज्यांचे केस काळचाचे पांढरे झाले होते, त्या इतर मंत्र्यांना कविकलशाच्या या गुणांशी व्यस्त प्रमाण असलेल्या त्याच्या उत्कर्षाची जर मनस्वी चीड आली तर केवळ तो त्यांचा मत्सर होता, असे म्हणून त्याची वासलात लावता येणार नाही. सत्य त्यांच्याही बाजूला होते आणि ते गैरसोयीचे वाटावे इतक्या मोठ्या प्रमाणात होते.

प्रधानमंडळात प्रवेश देऊन संभाजीने कविकलशाला राजकीय दृष्ट्या 'पंक्तिपावन' केले याचे अष्ट-प्रधानांना वैषम्य वाटले हे तर खरेच; पण त्याहीपेक्षा मौजेची गोष्ट अशी की हे ब्राह्मण मंत्री कवि-कलशाला अक्षरशः 'अपंक्त' समजत असत. ते त्याच्याबरोबर भोजन करीत नसत. त्या काळच्या धार्मिक पूर्वग्रहाचा हा एक मासला आहे. तत्कालीन महाराष्ट्रीय ब्राह्मण उत्तरप्रदेशातील कान्यकुब्ज ब्राह्मणांना कमी लेखत असत, व बेटी व्यवहार तर राहोच, पण त्यांच्याबरोबर रोटीव्यवहारही त्यांना निषिद्ध असे. 'हे ब्राह्मण आपणाला कमी लेखतात' या गोष्टीची जाणीव कविकलशालाही उत्तम होती, व त्याचा त्याबद्दल मनातून मोठा राग असे. यासाठी त्याने उपाय काढला होता, की रोजगार मागायला जो ब्राह्मण येईल, त्याला आपल्या बायकोच्या हाते, आपल्या पंक्तीला घेऊन भोजन घालावयाचे, व पंक्तिपावन करून घ्यावयाचे आणि मगच त्याला रोजगार द्यावयाचा. कविकलशाचा हा नियम प्रसिद्ध होता. परंतु असे अनेक कडवे ब्राह्मण निघाले,

की त्यांनी कविकलशाच्या पंक्तीला जेवण्यापेक्षा रोजगारावर पाणी सोडण पसंत केले.

या बाबतीत बहिरो विठ्ठल लोणकर या ब्राह्मणाचे उदाहरण मोठे बोधप्रद आहे. या बहिरो विठ्ठलाकडे बारा मावळाचा मोहसबा तुकोजी कृष्ण लोणकर याने दिला होता. या तुकोजी कृष्णाने बारा मावळाचा मुजुमदार असताना बराच पैसा खाल्ल्यामुळे शिवाजीमहाराजांनी त्याची मालमत्ता जप्त केली, त्याच्यावर चाळीस हजार खंड बसविला आणि त्याची काशीयात्रेला रवानगी केली. पुढे संभाजीच्या कारकीर्दीत बहिरो विठ्ठल एक दोन ब्राह्मण घेऊन दाद मागण्यासाठी आला. पेशवे सचिव इत्यादीपुढे त्याने आपले गाऱ्हाणे गायिले. त्या सर्वांनी त्याला सांगितले की, "या राज्यात काही रदबदल चालत नाही. अवघी रदबदल कविकलस कबजी-बावा यांजकडे झाली आहे. त्याकडे जाणे, त्यांची उपार्जना करणे. ते रोजगार सांगतील." पण कविकलशाचा सहभोजनाचा करारप्रसिद्ध होता. त्याच्याबरोबर पंक्तिभोजन करून भ्रष्ट होण्यापेक्षा बहिरो विठ्ठलाने संभाजी गांगोलीस जात होता, त्याची घाटात समक्ष गाठ घेणे पतकरले.

परंतु यापेक्षाही कविकलशाबद्दल जी घृणा संभाजीच्या मराठी मंत्र्यांना वाटत होती, त्याचे मूलभूत कारण असे होते की, कविकलशाने संभाजीच्या मना-वर जे अनन्यसाधारण अधिराज्य मिळविले होते ते शब्दार्थाने आणि लक्ष्यार्थानेही वाममार्गाने मिळविले होते हे होय. कविकलश हा शाक्त पंथाचा आणि तंत्र-मार्गाचा उपासक होता, आणि आपल्या उदाहरणाने, उपदेशाने आणि संगतीने त्याने संभाजीलाही या मार्गात प्रवृत्त केले होते. त्यांच्या दृष्टीने संभाजीच्या या अधःपाताबद्दल आणि त्याला जबाबदार असलेल्या कविकलशाबद्दल जी चीड या मंत्र्यांना वाटत होती, त्यात त्यांच्या वैयक्तिक रागद्वेषाचा काही भाग नव्हता. महाराष्ट्रीय मनाच्या शाक्त पंथाबद्दलच्या धार्मिक प्रतिक्रियेचा तो प्रातिनिधिक आविष्कार होता.

संभाजी शृंगारपुरास राहात असताना कविकलशाने त्याची शिवयोगी या तांत्रिक गुरुशी भेट घडवून आणली. हा शिवयोगी मूळचा कोकणातला चित्पावन ब्राह्मण. याने बंगालकडे जाऊन तंत्रविद्येचा अभ्यास केला व परत येऊन कोकणात शृंगारपूर येथे आपला मठ स्थापन केला. त्याची कीर्ति ऐकून केशवभट्ट पुरोहित व गणेश अनंत जांभेकर हे दोघे कऱ्हाडे ब्राह्मण त्याचे शिष्य झाले. कविकल-शाच्या सल्ल्याने संभाजीने कलीची उपासना सुरू केली, आणि २३ मार्च १६७८ रोजी म्हणजे महाराज कर्नाटकातून परत येण्यापूर्वी महिनाभर आपणांस शाक्त पद्धतीने 'कलशाभिषेक' करून घेतला. याचे वर्णन करणारा श्लोक असा आहे– ("युग्माम्बरारिक्षिति वृत्तिचित्रे । चैत्रे सिते वत्सरकालयुक्तके । काम्यातिथौ तत्कलशाभिषेकः । कामं चमत्कारततिञ्चकार ॥") हा कलशाभिषेक गणेशभट

जांभेकर व केशवभट्ट पुरोहित यांनी संभाजीला केला. संभाजीला रामायण सांगणारा केशवभट्ट तो हाच. या कलशाभिषेकाने संभाजीला अतर्क्य असे चमत्कार घडून आले. तो चमत्कार म्हणजे महाराजांच्या मरणानंतर संभाजीला घडून आलेला राज्याभिषेक होय. कल्पना नसताना तीन वर्षांच्या आत शिवाजी मरून त्याच्या इच्छेविरुद्ध संभाजीला राज्यप्राप्ति झाली हा इच्छित चमत्कार या कुवेडामुळेच घडला ! असा पूर्ववृत्तान्त अरण्यात बसून पुरश्चरण करणाऱ्या, पुढे संभाजीच्या कारकीर्दीत छंदोगामात्य झालेल्या कविकलशाने सांगितला. पूर्वीचे सिद्धसाधक अनेक जन्मांनंतर यांच्या रूपाने पुढे आले आहेत. ("कथितः पूर्ववृत्तान्तश्छन्दोगामात्यमन्त्रिणा।") (हा पूर्ववृत्तान्त छन्दोगामात्य मंत्र्याने सांगितला.) महाराजांची इच्छा, प्रधानांचे वर्तन यांपैकी काहीही सिद्धीस न जाता, संभाजीस कल्पनेत नसताना सुद्धा राज्यप्राप्ति झाली हा त्याला स्वतःलाच चमत्कार वाटला. हा सारा कलशाभिषेकाचा, तंत्रविद्येचा व कविकलशाचा प्रभाव असे त्याला वाटले आणि तेव्हापासूनच मूळातच श्रद्धावान् असलेला संभाजी कविकलशाच्या भजनी लागला.

एवढेच नव्हे, तर संभाजीचा राज्याभिषेक झाल्यावर आपणांस युवराज नाही या गोष्टीचे त्याला मोठेच दुःख झाले. वैदिक ब्राह्मणांनी सांगितलेल्या व्रतवैकल्यांच्या योगाने आपणास पुत्रप्राप्ति होईल असे त्यास वाटेना. त्याची ही चिंता शिवयोगी यांनी दूर केली. त्यांनी त्याला कालीची पूजा बांधण्याचा सल्ला दिला. "समाराधय सर्वार्थसाधिनीं साधुनन्दिनीम् । एनाङ्गतैनां पश्चात्त्वं स्वाभिलाषामवाप्यसि। सर्व अर्थ सिद्ध करून देणाऱ्या, साधूंना आनंद देणाऱ्या कालीची आराधना कर; नंतर तुझी अभिलाषा पूर्ण होईल."

योगायोग असा की हा पूजेचा विधि झाल्यावर पुढच्याच वर्षी शाहूचा जन्म झाला व संभाजीचे मनोरथ सफल झाले. त्यामुळे त्याच्या दरबारात तांत्रिकांच्या उत्कर्षाचा कळस झाला; आणि संभाजी शाक्त पंथाचा निस्सीम भक्त झाला. त्या पंथाला राजाश्रय मिळाला.

तांत्रिकांचा इतका उत्कर्ष रायगडावर यापूर्वी कधी झाला नाही व यापुढेही कधी झाला नाही. संभाजीच्या पूर्वी महाराजांचा वेदोक्त राज्याभिषेक गागाभट्टाने केला होता, त्यात निश्चलपुरी नांवाच्या तांत्रिकाने अनेक चुका दाखविल्या आणि पूर्वी व नंतर यांची अनेक अनिष्ट फळे मिळतील असे महाराजांना सांगितले होते. कोकणचा संहारकर्ता भार्गव, वेताळ, हनुमान, गडावरची शिर्काई. देवी, यांची पूजा बांधण्यात आली नाही. महाद्वाराचे संरक्षण करणाऱ्या देवतांचे पूजन झाले नाही. भूत पिशाच्चांना संतुष्ट करण्यात आले नाही, सिंहासनावर अधिष्ठित होण्यापूर्वी सिंहासनास बळी देण्यात आला नाही. सिंहासनास आधार देण्यास मंत्रविद्येचा आश्रय घेण्यात आला नाही. सत्पात्र ब्राह्मणांचा अव्हेर झाला अशा त्याच्या मते चुका होत्या.

गागाभट्टाच्या या चुकांमुळे प्रत्यक्ष समारंभात अनेक अनिष्ट प्रकार घडले. सिंहासनारोहणाचा विधि चालला असता संभाजीच्या मस्तकावरून दोन मोत्ये ओघळली. राजाजवळील कटचार म्यानबद्ध नाही असे आढळून आले. राजा रथारूढ असता रथाचा आस वाकला. धनुष्याची प्रत्यंचा ओढीत असता राजाच्या बोटातील अंगठी गळून पडली.

एवढ्यानेच संपले नाही. राज्याभिषेकाच्या पूर्वी सरसेनापति प्रतापराव गुजर एका लहानशा लढाईत मारला गेला. राजपत्नी काशीबाई मृत्यु पावली. राज्यभिषेकानंतर तेराव्या दिवशी राजमाता जिजाबाई मृत्यु पावली. रायगडावर एक हत्ती निधन पावला. प्रतापगडावर आग लागून घोड्यांची पागा जळाली. निश्चलपुरीच्या भविष्याची प्रचिती आल्यावर महाराजांनी त्याला तांत्रिक पद्धतीने आपणांस पुन्हा राज्याभिषेक करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ललिता पंचमीच्या मुहूर्तावर २४ सप्टेंबर १६७४ रोजी हा अभिषेक झाला.

या प्रसंगी निश्चलपुरीने लाल आसनांवर बसलेल्या व लाल वस्त्रे परिधान केलेल्या ब्राह्मणांकडून मंत्रपठन करवून घेतले. शुभ मुहूर्त पाहिला. सिंहासनापाशी समंत्रक भूमि शुद्ध केली. नवे सिंहासन मांडले. सिंहासनाच्या सिंहांची पूजा केली. देवतांची शांति केली. सिंहासनाच्या सिंहास बलि दिले. राज्याभिषेकाच्या आसनावर निश्चलने यंत्र ठेविले व त्या आसनास एक बलि दिला. एका रत्नखचित उच्चासनावर रौप्य आसन ठेवून त्यावर राजास बसविले. लाल रेशमी वस्त्रे गुंडाळलेल्या व पांच पानांचे तुरे असलेले अष्ट कलश त्या आसनाभोवती होते व त्या वरून चंद्रकिरणांच्या धारा ओघळत होत्या. मस्तकावर अभिषेकाचे जलसिंचन झाले. सामवेदगायन झाले. राजाने शिजविलेल्या अन्नाचा प्रचंड ढीग रायरी पर्वतास अर्पण केला व मग राजाचे भोजन झाले. राज्याभिषेकाचा हा विधि तंत्रोक्त होता. निश्चलपुरीने केलेला महाराजांचा राज्याभिषेक हा महाराष्ट्रातील शाक्तांचा पहिला उल्लेखनीय विजय होय; म्हणून थोड्या विस्ताराचा दोष पत्करून त्याचे हे वर्णन दिले.

पण कोणाला कोणत्या मर्यादेपर्यंत वाव द्यावा या बाबतीत महाराजांची औचित्याची जाणीव तीव्र आणि सावध होती. निश्चलपुरीने केलेला राज्याभिषेक हे त्यांच्या जीवनातले तंत्रमार्गाच्या आचरणाचे एकमेव उदाहरण. तेच पहिले आणि तेच शेवटचे ठरले. त्याच्यापूर्वी आणि त्याच्यानंतर कधीही महाराजांनी तांत्रिकांना आपल्या जीवनात आणि राजकारणात ढवळाढवळ करू दिली नाही. संभाजीचा सगळाच प्रकार विपरीत होता. वयाच्या एकविसाव्या वर्षी व मनाच्या संस्कारक्षम अवस्थेत शृंगारपुरास तो शाक्तांच्या मेळाव्यात सापडला. केशवभट्ट शिवयोगी व कविकलश यांनी वामाचारास त्याला उत्तेजन दिले. आधी कलशाभिषेकामुळे

राज्यप्राप्ति झाली असे त्याला वाटले व नंतर 'हालवून खुंटा बळकट करावा' या 'स्थूणानिखननन्यायाने' तंत्रमार्गामुळे पुत्रप्राप्ति झाली त्यामुळे तो शाक्तांच्या पूर्ण आहारी गेला आणि कविकलश हा त्याचा 'कण्ठमणि' होऊन बसला. वैयक्तिक जीवनात तर तो त्याचा मित्र, गुरु, सल्लागार सर्व काही होताच, पण त्याच्या पूर्वपीठिकेचा, लोकमताचा किंवा त्याच्या राजकीय वकूबाचा फारसा विचार न करिता संभाजीने राजकारणातही त्याला उत्तरोत्तर अधिकाधिक, अधिकार बहाल केले. त्याला 'छंदोगामात्य' किंवा 'वाकेनवीस' करून संभाजीला त्याच्या ऋणातून मुक्त झालो असे वाटले नाही. परराष्ट्रीय राजकारणातही, अंबरचा राजा रामसिंग, इंग्रज, शहाजादा अकबर यांच्या बाबतीत वाटाघाटीचे अधिकार संभाजीने त्याला देऊन टाकले. पोर्तुगीजांशी तह करण्यासाठी सर्वाधिकारी म्हणजे 'कुलयेख्तियार' म्हणून संभाजीने त्याची नेमणूक केली. तंत्र-विद्येमध्ये कविकलशाची अलौकिक गति आहे, अशी संभाजीची जी समजूत होऊन बसली होती, त्या समजुतीव्यतिरिक्त कविकलशाने संभाजीच्या मनावर जे अनियंत्रित प्रभुत्व मिळविले होते, त्याचा उलगडा करण्यास सध्या तरी दुसरे कोणतेही साधन नाही की दुसरा कोणताही तर्क नाही. एरवी मराठी मुलुखात हा नवा आलेला, योद्धा नसलेला, मुत्सद्दी नसलेला, राजकारणी नसलेला, कनोजा ब्राह्मण एकाएकी एवढा 'राजवल्लभ' कसा होऊ शकतो या गोष्टीचा ग्रंथ लागत नाही.

संभाजी हा स्वतंत्र बुद्धीचा माणूस नाही, तो आपल्या तंत्राने चालणारा आहे, आपल्या हाती कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं सत्ता एकवटलेली आहे या गोष्टीची जाणीव तांत्रिक कविकलशाला जरूर होती. तितका तो धूर्त होताच. त्याची मुद्राच या गोष्टीची साक्ष देत आहे.

विधिरर्थिमनोषिणामवधिर्नयवर्त्मनां ।
शेवधिः कार्यसिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा ॥

(सर्व याचक लोकांची इच्छा पूर्ण करणारी, राज्यव्यवहाराचे नियंत्रण करणारी व कार्यसिद्धीचा निधि असलेली अशी मुद्रा कलशाच्या हातात आहे.)

परंतु आधीच म्हटल्याप्रमाणे हा काही संभाजी आणि कविकलश यांच्या परस्पर ऋणानुबंधाचा वैयक्तिक व्यवहार नव्हता. संभाजी राजा होता म्हणजे एक सार्वजनिक माणूस होता. त्यामुळे त्याची प्रत्येक कृति ही सार्वजनिक आशय असलेली घटना होती. ज्या तंत्रविद्येची मोहिनी संभाजीला घालून कविकलशाने त्याच्यावर एवढे वर्चस्व मिळविले. त्या तंत्रविद्येबद्दल, महाराष्ट्रात सामान्यतः तिरस्काराची भावना होती. त्यामुळे या वामाचाराला लागलेल्या कविकलशाबद्दल तर महाराष्ट्राच्या जनमानसात तिरस्काराची भावना निर्माण झालीच; पण त्याच्या नादाला लागून बहकल्याबद्दल 'संगतिः सङ्गदोषेण' या न्यायाने संभाजीलासुद्धा त्या तिरस्काराचे वाटेकरी व्हावे लागले.

केवळ शास्त्र या दृष्टीनेच विचार केला तर तंत्रशास्त्राला नावे ठेवण्यासारखे काहीही नाही. ते भारतीय परंपरेचेच एक अविच्छिन्न स्वरूप आहे. वेदान्त आणि सांख्य ही भारतीय दर्शने त्याचाही आधार आहेत. त्याची सृष्टिप्रक्रिया सांख्य स्वरूपाची आहे. सांख्याप्रमाणेच त्यांनी सत्त्व, रज व तम हे तीन गुण मानले आहेत आणि वेदान्ताप्रमाणे ब्रह्मसायुज्य किंवा अद्वैताचा साक्षात्कार हे त्याचेही ध्येय आहे. द्वैत आणि अद्वैत यांच्या पलीकडे असलेले सामरस्य किंवा महामीलन यांची अनुभूति घेणे हे तंत्रशास्त्राचे परमोच्च ध्येय आहे. कुलार्णव तंत्रात म्हटले आहे की

"अद्वैतं केचिदिच्छन्ति द्वैतमिच्छन्ति चापरे ।।
मम तत्त्वं विजानतो द्वैताद्वतविवर्जितम् ।।

(काहीजण अद्वैताची इच्छा करितात, काही द्वैताची इच्छा करितात; जाणत्या असलेल्या माझे तत्त्व द्वैत व अद्वैत या दोहोंनीही वर्जित म्हणजे वेगळे आहे.) वेदाप्रमाणेच तंत्रशास्त्र हेही ईश्वरप्रणीत शास्त्र आहे. ती परमपुरुष शिव, विष्णु, किंवा आद्यशक्ति देवी यांची वाणी आहे.

वैदिक ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या ज्ञानाचे क्रियात्मक रूप प्रकट करणे हा तंत्राचा हेतु आहे. विविध साधनांच्या द्वारे देवता आणि निसर्गशक्ति यांना स्वाधीन करून घेणे, योगाच्या द्वारे अंतःस्थ शिवशक्तीचे मीलन घडवून आणणे आणि मानवी जीवात्म्यावर विविध संस्कार करून त्याला पशुभावाच्या अवस्थेतून दिव्य भावाच्या अवस्थेत नेऊन अद्वैतरूप आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडविणे हा तंत्राचा उद्देश आहे.

येथपर्यंत तंत्रशास्त्राचे जे विवेचन केलेले आहे, त्यात आक्षेपार्ह असे काही नाही. तन्त्रमार्गावर मोठा आक्षेप आहे तो त्याच्या पंचतत्त्वांबद्दल आणि त्याच्या वामाचाराबद्दल. शाक्तांनी भ्रष्टाचार माजविला अशी महाराष्ट्रात व इतरत्रही त्यांच्याबद्दल जी प्रतिक्रिया झाली, ती याच दोन गोष्टींमुळे. त्यामुळे या बाबतीत तंत्राचार्यांचे म्हणणे काय आहे ते समजावून घेणे आवश्यक आहे.

यांपैकी पंचतत्त्वे म्हणजे मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मैथुन हे सुप्रसिद्ध पंचमकार होत. हे पंचमकार उपयोगात आणून इष्ट देवतेची तांत्रिक पूजा करावयाची असते. पंचमकारावाचून जर ती केलेली असेल तर ती निष्फळ होते असे 'वामाचारी' या तंत्रमार्गातील पंथांचे मत आहे.

वामाचारातले किळसवाणे विधि व पंचमकारांनी केलेली पूजा यांमुळे तंत्राचार म्हणजे वामाचार व वामाचार म्हणजे भ्रष्टाचार म्हणून तंत्राचार म्हणजे भ्रष्टाचार असे समीकरण जनसामान्यांत रूढ झाले व तंत्रशास्त्राची प्रतिष्ठा धुळीला मिळाली.

वस्तुतः वामाचार म्हणजेच केवळ तंत्राचार नव्हे; तंत्रशास्त्रात वर्णिलेल्या सात आचारांपैकी तो केवळ एक आचार आहे, आणि तेथेही पंचमकारांचे सेवन अधिकार न पाहता निरपवाद रीतीने सर्वांना सांगितलेले नाही. सांख्यांच्या

सत्त्व, रज, तम या गुणत्रयावर आधारून तंत्राचार्यांनी साधकांचे 'भावत्रय' कल्पिलेले आहे. 'पशु'भावातला साधक हा सर्वांत निम्न कोटीतला. त्याच्यात तमोगुणाचे प्राबल्य असते. यापेक्षा वरच्या पायरीचा साधक म्हणजे 'वीर'भावातील होय. याच्यात रजोगुणाचा उत्कर्ष झालेला असतो. यानंतरचा साधक म्हणजे 'दिव्यभावा'तील; याच्या ठिकाणी सत्त्वगुणाचा उत्कर्ष झालेला असतो. अधिकारपरत्वे ह्या तीन प्रकारच्या साधकांनी तीन प्रकारांनी पंचमकारांचे सेवन करावे असा नियम आहे. 'दिव्य' भावातले साधक त्यांचा आध्यात्मिक दृष्टीने प्रतीकात्मक अर्थ घेतात; व त्याप्रमाणे आचरण करितात.

'वीर' भावातल्या साधकाने मात्र या पंचमकारांचे सेवन वास्तव स्वरूपातच केले पाहिजे असा सक्त निर्बंध आहे. त्यामागील तंत्रशास्त्राची भूमिका अशी आहे की विषच विषाला मारक ठरते, या न्यायाने केवळ तमस्वरूप जे पंचमकार त्यांचाच उपयोग अशा कुशलतेने करावयाचा की त्यांच्यामध्ये असूनही त्यांच्या साक्षित्वामुळे कोणताही विकल्प मनात न येता साधक त्यांच्या मोहापलीकडे जाईल. तंत्रातील उपमा वापरावयाची तर ज्या जमिनीला अडखळून माणूस पडतो त्याच जमिनीचा आधार घेऊन तो उभा राहतो त्याप्रमाणे ज्या अज्ञानाने व तमोगुणाने माणसाचा अधःपात होतो, त्याचाच आधार घेऊन त्या अज्ञानाचा व तमोगुणाचा नाश करावयाचा असतो.

पशुभावातला साधक अत्यंत निम्नकोटीतला असल्यामुळे दिव्य भावातले पंचमकारांचे प्रतीकात्मक सेवन तर त्याच्या आटोक्याच्या बाहेरचे आहेच, पण वीरभावातल्याच साधकातला शक्य असलेले वास्तव सेवनही त्याला वर्ज्य सांगितलेले आहे. त्याच्यासाठी पंचमकारांचे अनुकल्प सांगितले आहेत.

"क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्ग पथः तत्कवयो वदन्ति।" (वस्तऱ्याच्या धारेवरून चालल्याप्रमाणे हा मार्ग चालण्यास कठीण आहे.) यातील कसरत पराकाष्ठेची नाजूक आणि अवघड आहे आणि थोड्याशा बेसावधपणामुळे स्वभावतःच वामशील असलेल्या मनुष्याचे स्खलन होण्याचा धोका या मार्गात फार मोठा आहे याची उत्तम जाणीव तंत्राचार्यांना होती. पशु, वीर आणि दिव्य हे साधकांचे भावत्रय म्हणजे तीन प्रकारचे अधिकारभेदच त्यांनी मानले व अधिकारभेदाने उपासनाभेद मानून, सर्वच भारतीय शास्त्रांना सामान्य असलेले 'अधिकार तसा उपदेश' हे सूत्र तंत्रशास्त्रात विशेष कटाक्षाने पाळण्याचा प्रयत्न केला, इतकेच नव्हे तर अनधिकारी व्यक्तीपासून हे तंत्रशास्त्र आईच्या दुराचाराप्रमाणे गुप्त ठेवावे असा कडक निर्बंध घातला. त्यांनी म्हटलेच आहे की 'गोपयेन्मातृजारवत्।' यापेक्षा अधिक खबरदारी ती काय घ्यावयाची?

पण सर्व धर्मपंथांप्रमाणे तंत्रशास्त्राचीही शोकांतिका होण्याचे टळले नाही. पूर्वाचार्यांनी घातलेल्या लक्ष्मणरेषेला न जुमानता दांभिक गुरु आणि दांभिक

शिष्य यांनी तंत्रशास्त्राचा बाजार मांडला आणि धर्माचाराच्या प्रच्छन्न आवरणाखाली तंत्राचार म्हणजे स्वैराचाराची सनद होऊन बसली. हा भ्रष्टाचार आणि तन्त्रमार्गात चातुर्वर्ण्यास स्थान नसल्यामुळे भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने होणारा वर्णसंकर यांमुळे समाजसंस्था उच्छिन्न होण्याची आपत्ति निर्माण झाली. सामाजिक विचारवंतांना हा चिंतेचा आणि नाटककारांना हा थट्टेचा विषय होऊन बसला. भवभूतीने 'मालतीमाधव' नाटकात मालतीसारख्या निष्पाप स्त्रीरत्नाला चामुण्डेला बळी देण्यास उद्युक्त झालेल्या अघोरघण्ट कापालिक आणि कपालकुण्डला या पात्रांच्या रूपाने शाक्तपंथाच्या अमानुष विकृतीवर विदारक प्रकाश टाकला आणि राजशेखराने 'कर्पूरमञ्जरी'त शाक्तांचा उपहास केला.

महाराष्ट्रामध्ये मराठी मनाची घडण संतांनी केली. मराठी मुलुखात संतांचा शब्द हा वेदवाक्यापेक्षाही अधिक होता. कारण ते त्यांचे नेते, समाजसुधारक, द्रष्टे, गुरु, मायबाप सर्व काही होते. या संतांचा शाक्त पंथाकडे पाहण्याचा दृष्टिकोण कोणता होता?

शाक्तांच्या तत्त्वज्ञानातील शिव आणि शक्ति यांच्या मीलनाबद्दल आणि शक्तीच्या उपासनेबद्दल मराठी संतांचा विरोध असण्याचा प्रश्नच नव्हता. कारण सर्वच संत अद्वैतवादी वेदांती आणि शक्तीचे उपासक होते. शिवशक्तीचे अद्वैत शाक्तांप्रमाणे ज्ञानेश्वरांनीही "अमृतानुभवा'त वर्णिले आहे–"जेणे देवे संपूर्ण देवी। जियें वीण काही ना तो गोसावी। किंबहुना येकोपजीवी। येकयेकांची॥" ज्ञानेश्वरांप्रमाणे एकनाथांनीही यवनांच्या भाराने आक्रांत झालेल्या महाराष्ट्रभूमीच्या दुःखाने विव्हल होऊन गोंधळी म्हणून आपली कुलदेवता माहूरची रेणुका हिची आळवणी केली की "नमो आदिमाया भगवती। अनादिसिद्ध मूळ प्रकृति। महालक्ष्मी त्रिजगतीं। बया दार उघड। दार उघड॥" एकनाथानंतर "प्रतापगिरीचे ठायी आदिशक्ती विराजते।" कारण 'पारघाटी जगन्माता सद्य येऊन राहिली" असे म्हणणाऱ्या समर्थांनी आपली कुलदेवता तुळजाभवानी हिला शिवाजी महाराजांचे वैभव वाढवावे अशी प्रार्थना केली. "येकचि मागणे आता द्यावे ते मजकारणे। तुझा तू वाढवी राजा सीघ्र आम्हांचि देखता।"

पण हे सर्व संत शक्तीचे व शिवाचे उपासक असले तरी त्यांच्या उपासनेत तंत्रमार्गातले पंचमकारांचे सेवन मुळीच अभिप्रेत नव्हते. इतकेच नव्हे तर हा मार्ग सामान्य जनांना न पेलणारा असल्यामुळे त्यांनी विठ्ठलभक्तीचा किंवा रामभक्तीचा सुलभ उपाय तर त्यांना सांगितलाच, इतकेच नव्हे तर शाक्तांच्या दंभाचारावर जळजळीत टीका केली आणि समाजास बुद्धिभेद, भ्रष्टाचार आणि वर्णसंकर यांच्यापासून परम कारुणिक बुद्धीने वाचविले.

उदाहरणार्थ, तुकारामांनी म्हटले आहे – "राजा प्रजा द्वाड देश । शाक्त वास करिती तो । अधर्माचे उबड पीक । धर्म रंक ते गावी । न पिके भूमि कापे भारे । मेघ वारे पीतील । तुका म्हणे अवघी दुःखे । येती सुखे वस्तीसी ॥" तुकारामानंतर समर्थांचा शिष्य दिनकर गोसावी याने आपल्या 'स्वानुभव दिनकर' या ग्रंथात समकालीन शाक्तांच्या अघोर लीलांचे वर्णन केले आहे—

बाह्याकारे शाक्तनाम मिरविती । आणि कर्म करू नये ते करिती ।
अभक्ष भक्षुनी अंगिकारिती । मद्य आणि उन्मत्त द्रव्ये ॥

संतांच्या या विचारप्रवर्तनाचा आणि शाक्तांवरच्या टीकेचा परिणाम असा झाला की महाराष्ट्रात शिव, शक्ति आणि महाराष्ट्राची कुलदेवता तुळजा भवानी यांची उपासना कमालीच्या शुद्ध स्वरूपात अवशिष्ट राहिली. त्यात मद्यमांसांचा उपयोग होत असला तरी शाक्तांच्या पंचमकारांचा भ्रष्टाचार आणि विकृति यांना अजिबात थारा राहिला नाही. शाक्तांना महाराष्ट्राच्या **जीवनात** कोणतेही स्थान राहिले नाही. इतकेच नव्हे तर संभाजी ज्याला गुरुस्थानी समजत होता तो शिवयोगी, व जो संभाजीचा कण्ठमणि होऊन बसला होता तो कविकलश, हे सारे शाक्त संगमेश्वर-शृंगारपूरच्या परिसरातल्या ब्राह्मणांचे व इतरांचे थट्टेचे व हेटाळणीचे विषय होऊन बसले होते. बिचारा संभाजी वैदिक व तांत्रिक या दोघांनाही सारखाच मान देत होता. तो तुकारामाच्या मुलाला इनाम देत होता, रामदासांच्या मठाला उत्पन्न लावून देत होता, तुळजापूरच्या भवानीला दान देत होता व त्याच वेळी शिवयोग्याला व कविकलशालाही भजत होता. हिंदुत्वाचा अभिमान त्याच्याही रोमरोमात भिनला होता, पण तंत्रमार्गाकडे त्याचा कल जास्त असल्यामुळे व कविकलशाच्या नादी लागून तो लोकांच्या मते बाहवल्यामुळे तो महाराष्ट्राच्या मनातून कविकलशाप्रमाणेच उतरला. महाराजांचा पुत्र म्हणून त्याच्याबद्दल आपुलकी जरूर होती, छत्रपति म्हणून त्याच्याबद्दल आदर अवश्य होता, पण महाराजांप्रमाणे मराठी माणसाचे मन त्याला जिंकता आले नाही. एक प्रकारचा परकेपणा व दुरावा शेवटपर्यंत राहिला. कारण सर्व संतांनी व मराठी जनतेनें त्याज्य ठरविलेल्या शाक्त पंथाला राजाश्रय देण्यात संभाजीचे वर्तन महाराष्ट्राच्या धार्मिक परंपरेविरुद्ध झाले. संभाजीचे राजकारण निराळे व त्याचे धर्मकारण निराळे असे म्हणून चालणार नव्हते. कारण शिवकालीन राजकारण व धर्मकारण हे शिवशक्तीप्रमाणेच अभिन्न होते. इतकेच नव्हे तर, प्रतच लावायची तर "मुख्य ते हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण" या न्यायाने धर्मकारणाच्या नंतरच राजकारणाचा क्रम लागत होता.

कविकलशाच्या संगतीचे इतके प्रदीर्घ आणि दूरगामी परिणाम संभाजीच्या वैयक्तिक आणि राजकीय जीवनावर झाले. संभाजीची सेवा कविकलशाने परा-काष्ठेच्या प्रामाणिकपणाने शेवटपर्यंत केली हा त्याचा चांगुलपणा होय. पण त्या-

मुळे संभाजीची प्रतिमा जनमानसात जी एकदा डागळली गेली होती ती काही परत उजळ होऊ शकली नाही. पण या फार पुढच्या गोष्टी झाल्या. आज घटकेला इतकेच झाले की, कविकलशावर संभाजीने जो कृपेचा वर्षाव केला, त्यामुळे मंत्रिमंडळातील दुही विकोपाला गेली. आधी हे मंत्री एकमेकांत भांडत होतेच, पण कविकलशाविरुद्ध आता त्यांची एक फळी उभी राहिली. कारण हे मंत्री सर्व वैदिक धर्माचे अनुयायी, शैव किंवा वैष्णव होते व कविकलश तेवढा एकटा त्यांच्यात वामाचारी शाक्त होता. मूळच्या वैयक्तिक आणि प्रांतीय तेढीला. आता धार्मिक द्वेषाचा घट्ट पीळ पडला आणि संभाजीच्या मंत्रिमंडळातले हे दोन पक्ष एकमेकांवर गुरगुरणाऱ्या वाघांप्रमाणे परस्परांवर झडप घालण्यासाठी दबा धरून राहिले.

धरणीकंपाच्या उमाठ्यावर उभ्या असलेल्या धरित्रीच्या पोटात खदखदणाऱ्या लाव्हारसाप्रमाणे आपल्या मंत्रिमंडळाच्या पोटात कोणता लाव्हारस उसळतो आहे याची बिचाऱ्या दिलदार पण भोळ्या संभाजीला काही कल्पनाही नव्हती. तो असेच समजत होता की राज्यारोहणप्रसंगी आपल्या संतोषाचे वाटेकरी करण्यासाठी मित्राप्रमाणे विरोधकांनाही 'अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशिल दो कराने' असे इच्छादान करून आपण संतुष्ट केलेले आहे. खरोखरच, त्याचे येथपर्यंतचे वर्तन इतके काही सौजन्याचे व समंजसपणाचे झाले की, जगभर हिंडून माणसे पारखण्यात पटाईत झालेल्या इंग्रजांनीही त्याला शिफारस पत्र दिले की संयम आणि सौजन्य या गुणांत संभाजीने महाराजांवरही 'बापसे बेटा सवाई' या न्यायाने ताण केली.

'Whose present proceedings seame to speake him to be of a contrary spiritt and temper to his father by a much more moderate and humane Government.'

(सध्याच्या त्याच्या वागणुकीवरून विचार करिता बापापेक्षा तो निराळ्या स्वभावाचा दिसतो. त्याच्या शासनात संयम व माणुसकी अधिक दिसते.)

८

संभाजी सावध आणि चौकस होता. मुंबईकर इंग्रजांनी त्याच्याबद्दल म्हटले होते की, 'Report speaks of him as very diligent and careful. (त्याच्या बद्दल असे ऐकिवात आहे की तो मोठा धूर्त आणि दक्ष आहे.) आपल्या आसपासच्या शत्रूवर त्याची चांगली नजर होती. त्याचे मंचकारोहण झाल्याबरोबर त्याने पहिले राजकारण हातात घेतले ते जंजिऱ्याच्या सिद्दीचे, आणि सिद्दीबरोबर इंग्रजांचेही हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे त्याला इंग्रजांशीही राजकारण करावे लागले.

वस्तुतः सिद्दीचे दुखणे मराठी राज्याला फार जुने होते. त्याचा मुलुख मराठी राज्यात ऐन मोक्याच्या जागी होता. 'हबसाण' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशात जंजिरा कोट, मुरूड, नांदगांव, मांडले, श्रीवर्धन, म्हसळे, गोवळे व पंचायतन असे महाल होते. सुमारे सव्वातीनशे चौरस मैलांच्या क्षेत्रफळाच्या या प्रदेशाच्या उत्तरेस कुंडलिका नदी किंवा रोहयाची खाडी, पूर्वेस कुलाबा जिल्हयातील रोहा, माणगांव व महाड तालुक्यांचा भाग, दक्षिणेस सावित्री नदी, किंवा बाणकोटची खाडी आणि पश्चिमेस अरबी समुद्र आहे. समुद्रकिनाऱ्याचा फायदा हे या प्रदेशाचे सर्वांत मोठे वैशिष्टच होते. पश्चिमेस चाळीस मैलांचा समुद्रकिनारा, दक्षिणेस बाणकोटच्या खाडीचा सतरा मैलांचा किनारा, उत्तरेस रोहयाच्या खाडीचा चारपाच मैलांचा किनारा, आणि शिवाय राजपुरीचे चौदा मैल लांब व बरेच रुंद असे मध्य आखात, यामुळे आरमाराच्या दृष्टीने हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा होऊन राहिला होता. या भागाचे मुख्य ठिकाण जो जंजिरा कोट तो अर्धवर्तुळाकृति असून उंच व मजबूत तट याच्यामुळे व अवघड जागी बांधल्यामुळे केवळ अजिक्य होऊन राहिला होता.

या मोक्याच्या ठिकाणी राहून आपल्या आरमाराच्या बळावर सिद्दी हा मराठी मलुखाला उपद्रव देत राहिला होता. उघाडीच्या दिवसांत समुद्रावर फिरत राहून लूटमार करावी व पावसाळयात मुंबईस इंग्रजांच्या आश्रयास येऊन राहावे, तेथे असतानाही मराठयांच्या मुलुखात शिरून पेण, नागोठणे, आपटे, बट्टो येथे जाळपोळ लुटालूट करावी, माणसे पळवून न्यावीत हा त्याचा क्रम चालत असे. इंग्रज हे जरी व्यापारी असले तरी राजकारणीही होतेच. त्यांचा जास्त ओढा सिद्दीकडे आणि मोगलांकडे होता. सुरतेला त्यांची सर्वांत मोठी वखार होती व सुरतेच्या मोगल सुभेदाराला दुखवून त्यांचे चालण्यासारखे नव्हते. त्यामुळे सिद्दीला मुंबईत त्यांच्याकडून दाणागोटा, पाणी, दारूगोळा यांचा पुरवठा होई व आरमारही ठेवण्यास

आसरा मिळ. पण सिद्दीला साहय देत असताना मराठ्यांनाही दुखवून त्यांना चालले नसते. त्यामुळे दोघांशीही त्यांचे दुटप्पी राजकारण चाले; पण त्यातल्या त्यात मराठ्यांचे त्यांना विशेष वैषम्य वाटे.

त्याचमुळे सिद्दीचे पारिपत्य करण्याची शिवाजी महाराजांची इच्छा पूर्ण करण्यास त्यांनी शक्य तितका अडथळा केला. त्यांच्या मदतीने सिद्दाचा जंजिरा जिंकण्याची महाराजांची इच्छा होती, पण इंग्रजांनी त्यांना सहकार्य दिले नाही. तेव्हा महाराजांनी स्वतःच नवे आरमार तयार केले आणि वेळोवेळी जंजिरा काबीज करण्याचा नेटाने प्रयत्न केला. सहा वर्षांत या कामात त्यांची पंधरा हजार माणसे आणि बराच पैसा खर्च झाला. तरीपण यश आले नाही. अखेर सिद्दी आणि इंग्रज यांच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी मुंबईपासून जवळच असलेल्या खांदेरी बेटावर कोट उभारण्यास त्यांनी १६७९ साली प्रारंभ केला. लगेच सिद्दीनेही शेजारच्याच उंदेरी बेटावर तळ ठोकला आणि खांदेरीवर तोफा डागण्याचा सपाटा चालू केला. त्याला इंग्रजांचीही प्रच्छन्न मदत होतीच. खांदेरी व उंदेरी या दोन खडकाळ बेटांतले अंतर फक्त पाऊण मैल आहे आणि खांदेरी हे बेट तर मुंबई बंदरानजीक एक नाक्याची व माऱ्याची जागा समजली जात होती. खांदेरीवर महाराजांनी किल्ला असा बांधला होता, की मुंबईहून जाणारे व येणारे कोणतेही गलबत तोफांच्या माऱ्यांतून सुटू शकणार नाही. उंदेरीचा खडक एका मैलावर खांदेरी व किनारा यांच्यामध्ये आहे. तेथे सिद्दीने तीन हजार माणसे व दहा मोठ्या तोफा नेऊन ठेवल्या पण सिद्दीचा गोळीबार आणि इंग्रजांचा विरोध यांपैकी कशालाही न जुमानता खांदेरीवर मराठ्यांचे ठाण बसलेच.

महाराजांनी आणखीही एक गोष्ट केली होती. त्यांनी १९ जानेवारी १६८० रोजी इंग्रजांशी तह केला आणि सिद्दीला आश्रय देता कामा नये अशी अट घातली. इंग्रज जरी राजकारणापासून अलिप्त असल्याचे सांगत असले व केवळ व्यापारी असल्याचा दावा करीत असले, तरी त्यांची ही बतावणी किती दांभिक आहे हे महाराज उत्तम ओळखून होते व एकदा त्याबद्दल त्यांनी त्यांना यथास्थित शासनही केले होते. पन्हाळगडच्या वेढ्यात याच राजापूरच्या इंग्रजांनी सिद्दी जौहरला तोफा आणि दारूगोळा पुरविला, इतकेच नव्हे तर त्याच्या सैन्यात उभे राहून बावटा फडकावून पन्हाळगडावर तोफ डागली. इंग्रजांच्या या उपद्व्यापाबद्दल महाराजांनी त्यांची राजापुरची वखार कुदळी लावून खणून काढली त्यांची चोवीस हजार होनांची संपत्ति लुटली, त्यांच्या हेन्री रेव्हिंग्टन. गिफर्ड वगैरे इसमांना कैदी म्हणून सोनगडावर व वासोटागडावर रवाना केले. ती नुकसानभरपाई मिळावी म्हणून इंग्रज खटपट करीत होते. पण महाराज त्यांना ती नुकसानभरपाई मागण्याचा हक्क आहे हेच कबूल करण्यास तयार

नव्हते; कारण इंग्लिश वखार बोलून चालून शत्रूच्याच प्रदेशात होती. शत्रूच्या प्रदेशातील लूटमारीबद्दल नुकसान भरपाई काय म्हणून द्यावयाची ? पण त्यांना इंग्रजांशी संबंध बिघडवायचेही नव्हते म्हणून नुकसान भरपाईचा हक्क म्हणून नव्हे, पण केवळ राजकारण म्हणून ते राजापूर प्रकरणाबाबत काही रक्कम देण्यास तयार होते; पण इंग्रज सिद्दीला मदत करीत असल्यामुळे महाराजांनी मुद्दामच हे बक्षीस देण्याची टाळाटाळ चालविली होती. कारण इंग्रज हे किती अप्रामाणिक आहेत याचा त्यांना पुरेपूर अनुभव आला होता. त्या अनुभवाच्या आधारावरच, व सिद्दी प्रकरणातील इंग्रजांच्या अंतःस्थ कारवायांमुळे त्यांनी इंग्रजांशी बंधनकारक असा तह केला.

या तहात पुढील अटी महत्त्वाच्या होत्या – १) ज्या अर्थी तुमच्या मदतीने सिद्दीचे आरमार उंदेरीवर येऊन बसले आहे, त्याअर्थी ते आरमार तुम्ही आपल्या आरमारावरोबर तेथून उठविले पाहिजे. जर सिद्दी तो मोगलांचा ताबेदार म्हणून तुमचे ऐकत नसेल तर त्याला पाणी, दाणागोटा, मनुष्ये, दारूगोळा, होड्या वगैरे काहीही साहाय्य देता कामा नये. जोपर्यंत सिद्दीचे आरमार तेथून हालणार नाही तोपर्यंत महाराजांचा एक सरदार मुंबईस राहून इंग्रज सिद्दीला मदत करतात किंवा काय यावर लक्ष ठवील. २) महाराजांच्या शत्रूला पेण व नागोठणे या किनाऱ्यावर जाऊ देऊ नये व जे लोक सिद्दीने तेथून नेले आहेत ते परत करावेत.

इंग्रजांची चिकाटी जबर. महाराज मृत्यु पावले आणि संभाजी रायगडावर येऊन दाखल झाला. त्याबरोबर इंग्रजांनी आपली माणसे त्याच्याकडे पाठवून राजापूरचे 'बक्षीस' ऊर्फ नुकसान भरपाई मिळण्यासाठी खेटे घालण्यास सुरुवात केली. पण संभाजीही काही कमी वस्ताद नव्हता त्याने सध्या तुमच्या तक्रारीचा विचार करण्यास सवड नाही असे सांगून काळकाढूपणाचे धोरण मुद्दाम स्वीकारले त्याला हे पाहावयाचे होते की महाराजांशी केलेला तह इंग्रज कितपत इमानाने पाळतात.

तसा तो त्यांनी पाळलेला नव्हता. सिद्दी त्यांच्या आश्रयाने मुंबईस राहिला होता. त्याचे आरमार माजगाव बंदरात होते. तो पेण, नागोठणा, बट्टी, आपटे येथे जाळपोळ, लुटालूट करीतच होता. युद्धात पकडलेल्या गलबतांचा तो उघड लिलाव करीत होता. पुढे संभाजीची भीति वाटली की स्वतःचीच लाज वाटली, कोणास माहीत, पण इंग्रजांनी सिद्दीचा दाणागोटा बंद केला; तेव्हा त्याने जेरीस येऊन पेण, नागोठणा भागात लुटालूट करणार नाही असा करार केला. पण परत त्याने ऑगस्टमध्ये आपले आरमार मुंबईच्या बाहेर काढलेच.

तेव्हा संतापून संभाजीने इंग्रजांना या गोष्टीचा जाब विचारला. एवढ्या-वरच संभाजी थांबला नाही. त्याने सिद्दीच्या उंदेरीवर हल्ला चढविण्याचा बेत

केला. १८ ऑगस्ट १६८० ला मराठ्यांचे दोनशे लोक अंधाऱ्या रात्री उंदेरीवर उतरले. पण त्यांचा हल्ला यशस्वी झाला नाही. बेटावरच्या खाणाखुणा त्यांना माहीत नव्हत्या. त्यात काळोखाची भर. सिद्दीच्या लोकांना त्यांची चाहूल लागली. त्यांनी त्यांच्यावर हल्ला केला आणि ऐंशी लोक मारले. सिद्दी एवढ्यावरच थांबला नाही. ती ऐंशी मुंडकी त्याने मुंबईला आणली. आणि समुद्रकिनाऱ्यावरच्या खांबांवर ही शिरे लटकावून दहशत निर्माण करण्याचा त्याने बेत केला. पण मुंबईकर इंग्रजांनी त्याला हरकत घेतली. कारण, कदाचित् त्यांचा चांगुलपणा असेल किंवा संभाजीचा वकील आवजी पंडित हा त्याच वेळी मुंबईत असल्यामुळे ते थोडेफार दबले असतील. कारण काही असो, पण मुंबईकरांनी सिद्दीला या अमानुष प्रदर्शनास परवानगी नाकारली. सुरतकरांनाही या गोष्टीचा राग आला व त्यांनीही सिद्दीला मदत न करता संभाजीशी सख्य राखावे असा मुंबईकरांना आदेश दिला.

परंतु सिद्दीवर संतापल्याचा इंग्रजांनी कितीही देखावा केला तरी त्यांची आतून त्याला फूस आहे ही गोष्ट संभाजी ओळखून होता. २५ ऑक्टोबर १६८० रोजी त्याच्याशी बक्षिसाच्या वाटाघाटी करण्यासाठी गेलेल्या इंग्रजांना त्यांनी साफ धुडकावून लावले आणि जोपर्यंत शिवाजी महाराजांशी केलेल्या तहातील अटी ते पाळीत नाहीत, आणि जोपर्यंत सिद्दीला मुंबईत आश्रय देण्याचा आणि दाणागोटा, दारूगोळा पुरविण्याचा त्यांचा क्रम बंद पडत नाही तोपर्यंत बक्षिसाचा विचारही होणार नाही असे त्याने त्यांस स्पष्ट शब्दांत बजावले. पण जर त्यांनी एवढे तहांतले कलम पाळले तर राजापूरच्याच काय, पण इतर लुटीचीही भरपाई करण्याची त्याने तयारी दाखविली. त्याचमुळे बक्षिसाबद्दल अनुकूल मत व्यक्त करूनही त्याने पद्धतशीर हुकूम कोणताही दिला नव्हता. इतकेच नव्हे तर, त्याने अशीही ताकीद दिली की, इंग्रजांनी सिद्दीला मुंबईतून बाहेर काढून लावले नाही तर इंग्रजांची पर्वा न करता मुंबईविरुद्ध कडक उपाय योजण्यास कमी करणार नाही.

रायगडावर गेलेल्या इंग्रजांनाच एवढे सांगून संभाजी थांबला नाही २० नोव्हेंबर रोजी त्याने आबजी पंडित नावाचा वकील इंग्रजांकडे बोलणी करण्यास पाठविला. त्या वकिलाने इंग्रजांना सांगितले की, " सिद्दीला मुंबईतून मदत दिली गेल्या कारणाने संभाजीच्या मुलुखात बराच उपद्रव दिला गेला आहे; तरी संभाजी इंग्रजांशी मैत्री राखण्यास तयार आहे. परंतु यापुढे तो हा उपद्रव सहन करण्यास मुळीच तयार नाही. जर इंग्रजांनी सिद्दीची मदत थांबवून त्यास व त्याचे आरमारास ताबडतोब बाहेर काढून दिले नाही व मुंबईतून कोणत्याही प्रकारचे साह्य करण्याचे बंद केले नाही, तर संभाजीने मुंबईवर स्वारी करण्याचा निर्धार केलेला आहे."

संभाजीची ही धमकी पोकळ नव्हती, हे इंग्रजांच्या लवकरच प्रत्ययास आले. त्याने स्वतःचे आरमार होते ते अधिक बलाढ्य करण्यास सुरुवात केली. राजापूरला त्याने साठ गुराबे व पाच हजार खलाशांची भरती आणि गलबते तयार केली, इतकेच नव्हे तर आणखी पाच हजार माणसे भरतीस ठेविली. हे सारे आरमार त्याने दर्यासागर दौलतखान याच्या आधिपत्याखाली दिले आणि डिसेंबरात खाली वेंगुर्ल्याकडे लुटालूट करण्यास गेलेल्या सिद्दीच्या आरमाराचे पारिपत्य करण्यास त्याला रवाना केले.

संभाजीचा हा निर्धार आणि हो आरमारी तयारी पाहून इंग्रज सुतासारखे सरळ आले आणि आता जर सिद्दीच्या बाबत आपण चालढकल केली तर 'इन्द्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायाने सिद्दीबरोबर आपलीही धडगत लागणार नाही याची खात्री पटून कॅ. गॅरी व रॉबर्ट थारविन यांना सिद्दीकडे बोलणी करण्यास पाठविले. त्यांना त्यांनी अशा सूचना दिल्या की, "सिद्दीला आपणावर ओढवत असलेल्या आपत्तीची कल्पना द्या. आपण बट्टी, नागोठणा, पेण, आपटे व इतर खेड्यांतील त्याच्या जाळपोळीला व लुटालुटीला आळा घातला नाही, तर संभाजी आपणाशी मैत्री न राखता लढाई पुकारील व शत्रु समजून आपले करता येईल तेवढे नुकसान करील. या प्रदेशात लूटमार न करण्याची पूर्वी दिलेली सारी तोंडी व लेखी वचने सिद्दीने मोडली आहेत याची त्याला जाणीव द्या. जर तो असेच करीत राहील तर आम्हांला त्याच्याशी शत्रुत्व स्वीकारावे लागेल व बादशहा-मधील व आमच्यामधील मैत्रीचा तहही मोडावा लागेल. तरी त्याच्याकडून लिहून घ्या की यापुढे तो वरील भागात म्हणजे करंजा ते कोळगावपर्यंतच्या समुद्रपट्टीत कोणत्याही प्रकारचा उपद्रव करणार नाही. जर तो याप्रमाणे लिहून देत नसेल तर त्याला सांगा की त्याला आरमारासह मुंबई बंदरातून बाहेर जाणे भाग आहे. तसेच त्याने पाणी व धान्य सामग्रीसाठी बोटीही पाठवू नयेत. पाठविल्यास त्यांची सरबराई न होता त्यास परत जावे लागेल."

इंग्रजांच्या या हालचालींचा बराच परिणाम झाला. सिद्दी हा संभाजीला भीतच होता. संभाजीचा वकील आलेला पाहून तो मुंबईबाहेर जाऊन राहिला. या वेळी संभाजीचेच आरमार समुद्रात वर्चस्व राखून होते. सिद्दी या वेळी पावसाळ्यात सुरतेला गेला. मुंबईत राहिला नाही. आबजी पंडित नोव्हेंबर १६८० ते मे १६८१ पर्यंत पाच महिने मुंबईत ठाण मांडून बसला होता. संभाजीचे आरमारही सज्ज झाले होते. त्यामुळे सिद्दी व इंग्रज या दोघांनाही जरब बसली व सिद्दीच्या उपद्रवाला तात्पुरता तरी पायबंद बसला. त्यामुळे समाधान पावून आबजी पंडित संभाजीकडे परत गेला.

पण जंजिरा प्रकरण एवढ्यावरच संपले नाही. ही केवळ सुरुवात होती.

६

खानजहान हा दक्षिणचा सुभेदार होता. त्याचे मूळचे नाव होते मीर मलिक हसन. पण औरंगजेबाने त्याला १६७५ साली 'खानजहान बहादूर जफरजंग कोकल ताश' असा किताब दिला. त्याला सात हजारी आणि पाच हजार स्वार (दो अस्पा) यांचा मन्सबदार केले. त्याचा भाऊ फिदाईखान मुजफ्फरहुसेन याला 'आज्जमखान' ही पदवी दिली. त्याला सहा हजारी मन्सब बहाल केली. इतकेच नव्हे तर बहादुरखानाची मुले अहसनखान यास 'मुजफ्फरखान' आणि मुहसिनखान यास 'नुस्त्रतखान' अशा पदव्या देऊन त्याच्या मनसबी वाढविण्यात आल्या. बादशहाने केलेल्या या गौरवाने बहादुरखानाचा आनंद गगनात मावेनासा झाला. आपल्या पेडगावच्या छावणीत बागलाणचा मुख्य अधिकारी नामदारखान याला बोलावून परस्पर मेजवान्या आणि बैठकी यांची एकच धूम त्याने उडवून दिली. या प्रसंगी त्याने आपल्या सरदारांना आणि सेवकांना ज्या देणग्या दिल्या त्यांत तीस हत्ती, पाचशे घोडे, दोन हजार वस्त्रे, तलवारी आणि इतर शस्त्रे यांचा समावेश होता. इतक्या बहुमोल वस्तु केवळ देणगीखातर जो देऊ शकतो, त्याचे ऐश्वर्य काय विचारावयाचे आहे!

बहादुरखान कर्तबगार आणि मेहनती माणूस होता. त्याने महाबतखान, दिलेर-खान, दाऊदखान कुरेशी आणि शहाजादा मुअज्जम यांच्याबरोबर मराठ्यांच्या वाढत्या सामर्थ्याला पायबंद घालण्याचा शिकस्तीने प्रयत्न केला. पण महाराजांपुढे त्याची डाळ शिजली नाही. त्याच्या डोळ्यांदेखत पेशवा मोरोपंत पिंगळे याने अहिवंतगड, साल्हेर, मुल्हेर, नासिक, रामनगर, जव्हार, कोळवण जिंकून घेतले. एकट्या मोरोपंताने उत्तर कोकण सर केले आणि स्वराज्याची उत्तर सरहद्द सुरते-पासून पंचवीस कोसांपर्यंत नेऊन भिडविली. याच्याच कारकीर्दीत वणी-दिंडोरी-आणि साल्हेरची घनघोर लढाई झाली. आणि मोगलांचा दारुण पराजय झाला. महा-राजांच्या राज्याभिषेकाने औरंगजेबाला पराकाष्ठेचा उद्वेग झाला आणि त्याच्या आज्ञेवरून त्या समारंभांत विघ्न आणण्यासाठी बहादुरखानाने पुष्कळ धामधूम माजविली. पण राज्याभिषेकातून मोकळे झाल्याबरोबर महाराजांनी त्याचा योग्य परामर्श घेतला. भीमेच्या काठावर पुण्यापासून पंचवीस कोसांवर दौंडच्या पूर्वेस आपल्या नावाने पेडगाव जवळ बहादुरगड नावाचे ठाणे वसवून बहादुरखानाने तेथे आपले कायमचे ठाणे वसविले होते. त्यावर दोन हजार मराठे तुटून पडले. त्याचा पाठलाग करीत बहादुरखान पंचवीस कोस गेला. तो दूर गेला असे पाहून सात हजार मराठी स्वारांनी त्याची छावणी लुटून फस्त केली. बादशहाकडे पोचविण्या-

साठी बहादुरखानाने एक कोटी रुपयांचा खजिना आणि दोनशे सुंदर घोडें जमविले होते. ते सारे मराठ्यांनी लुटले आणि त्याच्या तंबूंना आग लावून दिली. बहादूरखान घामाघूम येऊन पाहतो तो त्याची सगळी छावणी अग्निनारायणाला समर्पण झालेली त्याला दिसली.

बहादुरखानाची महाराजांनी पुन्हा एकदा फजिती केली. त्याला यथास्थित हैराण केल्यानंतर महाराजांनी त्याला तहाची हुलकावणी दाखविली की, आपण बादशहास सोळा किल्ले व भीमेच्या उत्तरेकडचा मुलूख देण्यास तयार आहोत; आपल्या मुलालाही बादशहाच्या सेवेस पाठविण्यास आपण सिद्ध आहोत; याबद्दल बादशहाने आपले आजवरचे अपराध माफ करून भीमेच्या दक्षिणेकडील मुलूख आपणांस बहाल करावा. महाराजांच्या या अकल्पित शरणागतीने बहादूरखान अतिशय प्रसन्न झाला आणि औरंगजेब पंजाबात होता, त्याच्याकडे महाराजांचा अर्ज मंजुरीसाठी त्याने पाठवून दिला. बादशहाची मंजुरी येईपर्यंत तीन महिने गेले. बहादुरखान स्वस्थ बसून होता. महाराजांना तेच पाहिजे होते. त्याला गाफील ठेवून या तीन महिन्यांत महाराजांनी फोंडा, कारवार, शिवेश्वर, काद्रा, अंकोला आणि पन्हाळा हा मुलूख काबीज केला. तीन महिन्यांनंतर बहादुरखानाचे वकील औरंगजेबाची मंजुरी घेऊन आले; व सोळा किल्ले ताब्यात देण्याची तजवीज करावी असे महाराजांना त्यांनी सांगितले. भेटीच्या पहिल्या दिवशी महाराजांनी त्यांची उत्तम बडदास्त ठेविली व उत्कृष्ट पाहुणचार केला. दुसऱ्या दिवशी महाराजांनी त्यांना बजाविले की, "तुम्ही काय पराक्रम गाजविला म्हणून मी तुमच्याशी तह करावा ? येथून लवकर चालते व्हा कसे ! नाहीतर तुमची फटफजिती होईल !" बिचारे वकील खाली माना घालून परतले व त्यांनी बहादुरखानाला घडलेली हकीकत सांगितली. बहादुरखानाला धरणी पोटात घेईल तर बरे असे झाले. महाराजांना शरण आणण्याची जी कर्तबगारी त्याने दाखविली होती त्याबद्दल खूष होऊन औरंगजेबाने त्याची मन्सब वाढविली होती व एक हत्तीही भेट पाठविला होता. तो हत्ती म्हणजे त्याच्या फजितीचा मूर्तिमंत साक्षीदार होऊन बसला. औरंगजेबाला जेव्हा ही सारी हकीकत त्याने कळविली, आणि कळविण्याशिवाय त्याला पर्यायच नव्हता, तेव्हा अगदी कडक शब्दात औरंगजेबाने त्याची खरडपट्टी काढली. इकडे महाराजांच्याकडे तर तो थट्टेचाच विषय होऊन बसला होता. 'बहादुरखान म्हणजे पेंडीचे गुरू' असे महाराज त्याच्याबद्दल उपहासाने म्हणत.

परंतु बहादुरखानावर औरंगजेबाचा इतबार मोठा होता. शिवाजीमहाराजांपुढे त्याला अपयश पत्करावे लागले, यांत त्याच्या कर्तबगारीला विशेष उणेपणा आला असे नाही. कारण विजापूरचा काय किंवा मोगलांचा काय कोणताच सरदार महाराजांच्या बुद्धिमत्तेपुढे व पराक्रमापुढें टिकलेला नव्हता. ही वस्तुस्थिति होती, मग

तो अफझलखान असो कीं शायिस्ताखान असो की सिद्दी जौहर असो की दिलेरखान असो. खुद्द औरंगजेबही याला अपवाद नव्हता आणि औरंगजेबाला याची चांगली जाणीव होती. साल्हेरला दिलेरखानाचा व बहादुरखानाचा मराठ्यांनी पराजय केला. तेव्हा औरंगजेबाने त्याची कानउघाडणी केली की, "साल्हेरच्या युद्धात तुम्ही मेला कां नाहीत ? शिवाजीने सारा शाही मुलूख लुटला, अतिविख्यात किल्ले घेतले व ही त्याची कृत्ये तुम्ही पहात बसलात ? त्या दुष्टाचे सर्व प्रदेश तुम्ही वेढल्यावर तो किल्ल्यावर बसून राहून काय करील ? तुम्ही त्याला सर्व बाजूंनी वेढा !" या पत्राला बहादुरखानाने फार मार्मिक उत्तर पाठविले की "आपली आज्ञा प्रमाण आहे. परंतु हा शिवाजी खुद्द आपल्या राजधानीत येऊनही नमला नाही आणि आपण त्याला इतक्या कडक बंदोबस्तात ठेवले होते तरीही तो पक्ष्यासारखा कसा झट्दिशी पळाला हे आपणच कृपा करून आठवावे म्हणजे आम्ही कर्तव्य करण्यात कसूर करीत नाही हे आपणांस पटेल." बहादुर खानाचे म्हणणे बरोबर होते. ते औरंगजेबालाही मनोमन पटल्याशिवाय राहिले नाही. इतक्या परखडपणाने तो औरंगजेबाला लिहू शकला याचे कारण तो औरंगजेबाचा दूधभाऊ होता हे होय.

हा आप्तसंबंध लक्षात घेऊन आणि त्याची कर्तबगारी आणि दक्षिणेतला जुना अनुभव विचारात घेऊन, जरी एकवार परत बोलाविले, तरी शहाजादा मुअज्जम याला राजपुतान्यात आपल्या मदतीला बोलाविल्यानंतर औरंगजेबाने परत दक्षिणच्या सुभ्यावर खानजहानचीच नेमणूक केली. 'मराठ्यांनी जिंकलेले किल्ले परत घ्यावेत' असा त्याला बादशहाचा सक्त हुकूम होता. त्याप्रमाणे ९ जून १६८१ ला औरंगाबादला दाखल झाल्याबरोबर साल्हेर, अहिवंतगड वगैरे किल्ल्यांना खानजहानने वेढे घातले.

या वेळी संभाजी रायगडाच्या वाटेवर होता. स्वराज्यावर होणारे हे उत्तरेकडचे आक्रमण त्याच्या नजरेतून सुटले नव्हते. या वेळी पावसाळा होता त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर बहादुरखानाबरोबर युद्ध देण्याचे ठरवून त्याप्रमाणे त्याने त्याला निरोपही पाठविला.

पावसाळा संपला. संभाजीचे मंचकारोहण झाले. राज्यात थोडी स्थिरस्थावरता झाली. जंजिऱ्याच्या सिद्दीची मसलतही मार्गाला लागली. तेव्हा विजयादशमी झाल्यानंतर आपल्या फौजा घेऊन संभाजीने खानजहानच्या सुभ्यात चारी दिशांना सीमोल्लंघन केले.

उस्मानाबादच्या वायव्येस तेहतीस मैलांवर असलेल्या परिंडा किल्ल्याच्या परिसरात लूटमार करून मराठ्यांनी तेथील किल्लेदार सोहराबखान याला सतावून सोडले, उस्मानाबादच्या आग्नेयेला तीस मैलांवर असलेल्या नळदुर्ग किल्ल्याभोवतालच्या प्रदेशावर मराठ्यांनी हल्ला चढविला. खानजहानने हा किल्ला

१६७७ साली जिंकून घेतला होता. नळदुर्गचा किल्ला हा दख्खनमधील सर्वांत उत्कृष्ट किल्ला होय असे ओरंगजेबाचे त्या किल्ल्याबद्दल मत होते. मराठे आल्याचे कळल्यावर नळदुर्गचा किल्लेदार कलंदरखान त्याच्यावर चालून आला. नळदुर्गच्या पलीकडे तीन कोसांवर लढाईस तोंड लागले. खानजहानने त्याच्या मदतीस रणमस्तखान वगैरे लोकांस पाठविले. मराठ्यांचा पराजय झाला पण बुलंदरखानाचेही बरेच लोक मारले गेले. मराठे कन्नडच्या पूर्वेस सहा मैलांवरील अंतूर उद्ध्वस्त करण्यास आले होते. तेव्हा खानजहानने त्याचा धाकटा मुलगा मुजफरखान याला त्यांचा बंदोबस्त करण्यास पाठविले. मराठे पळून गेले तेव्हा बादशाही फौजांनी त्यांचा पंचवीस कोसांपर्यंत पाठलाग केला; आणि मराठे कैदी व जनावरे लुटून नेत होते ती परत आणिली, तसेच त्यांचे निशाण, ढोल, व हत्यारेही हिसकावून घेतली.

अशा धावपळीच्या लढायांत पराजय झाला म्हणजे ती मराठ्यांची मोठी नामुष्की होती अशातला भाग मुळीच नव्हे. या गनिमी काव्यात जय–पराजय यांना फार थोडे महत्त्व होते. साधेल तितकी लूट करावयाची व जास्तीत जास्त विस्तृत प्रदेशात धामधूम उडवून देऊन मोगल सैन्याला आपणामागे धावायला लावायचे एवढाच त्यात मराठ्यांचा उद्देश असे. खानजहानच्या मनाला स्वस्थता मिळू द्यावयाची नाही, व त्यांचे चित्त नेहमी व्यग्र ठेवायचे हा त्यांचा हेतु होता व त्यात ते पूर्णपणे यशस्वी झाले. इतके की प्रथम खानजहानने धोडप, साल्हेर, अहिवंतगड इत्यादि किल्ल्यांना वेढे घातले होते ते काम त्याला तहकूब ठेवावे लागले आणि मलुखात वाऱ्याप्रमाणे सैरावैरा धावणाऱ्या मराठ्यांचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेणे भाग पडले. ते काम कधीच संपण्यासारखे नव्हते. कारण मराठ्यांचा बंदोबस्त करणे म्हणजे प्रायः वाऱ्याची मोट बांधण्यासारखीच जवळ जवळ अशक्य गोष्ट होती.

१६८० च्या डिसेंबरच्या सुमारास संभाजी स्वतः सहा हजार लोकांनिशी सोलापूरच्या किल्ल्यावर चालून गेला. तेथला किल्लेदार मनोहरदास गौड याने मराठ्यांचा प्रतिकार केला. रणमस्तखान वगैरे लोकांस खानजहानने तिकडे नेमले होते. लढाई झाली. मराठ्यांचा मोड झाला तरी मोगलांचेही नुकसान बरेच झाले. खानजहानने पंचवीस तोफा सोलापूरहून मागविल्या, व त्या आणण्यासाठी अली आका रूमी, जगत्सिंग हाडा व राजा जसवंतसिंग बुंदेला यांस पाठविले. रात्री लोकांनी तोफा किल्ल्यातून काढून आणल्या. या बातमीमुळे मराठ्यांनी लोक पाठविले व तोफा पळवून नेल्या. तेव्हा खानजहान स्वतः स्वारीस निघाला. पण रणमस्तखान व दाऊदखान यांनी त्याला थोपविले की, "मग आम्ही काय कामाचे ! ईश्वर न करो पण भलतेच काही झाले तर ! म्हणून फौजेच्या प्रमुखाने स्वार न व्हावे." तेव्हा खानजहानने रणमस्तखान व दाऊदखान यांच्याबरोबर दहा हजार स्वार दिले व

त्या सुभ्यातील दिवाणास कळविले की, 'ह्या तोफांची किंमत असेल ती अली आका, जगत्‌सिंग व जसवंत बुंदेला ' यांच्याकडून वसूल करावी. त्याप्रमाणे तिघां-कडून प्रत्येकी अठरा हजार रुपये वसूल केले. औरंगजेबाला हे कळल्यानंतर या तिघांची मन्सबही त्याने कमी केली. १६८१ च्या फेब्रुवारीत मराठ्यांनी धरणगाव लुटले आणि तेथील इंग्रज वखारीचेही फार नुकसान केले.

औरंगाबाद हे दक्षिणेतल्या मोगल सुभेदाराचे मुख्य ठाणे. त्याचा इतमाम मोठा होता कारण प्रत्यक्ष औरंगजेबाचा वरदहस्त त्या शहराला लाभला होता. मूळच्या खडकी या लहान गावाजवळ निजामशाहीचा विख्यात वजीर सिद्दी मलिक अंबर याने फत्तेनगर नावाच्या शहराची स्थापना केली, तेथेच आणखी काही इमारती बांधून औरंगजेबाने आपले नाव त्याला देऊन 'औरंगाबाद' वसविले. पण दक्षिणच्या सुभेदाराच्या ऐश्वर्याने आणि औरंगजेबाच्या दिगंतकीर्ति नांवाने धन्य झालेल्या त्या शहरावरही मराठ्यांनी हल्ला चढविण्यास कमी केले नाही. खानजहानला ही बातमी लागली तेव्हा तो औरंगाबादपासून बत्तीस मैलांवर वाभुळगाव येथे आपल्या छावणीत होता. रात्रीचा पहिला प्रहर झाला असताना त्याला बातमी समजली की मराठे अहमदनगर आणि मुंगीपैठण या मार्गाने औरंगाबादवर चाल करून येत आहेत. बाजार बुणगे मागाहून आणण्याची आज्ञा देऊन त्याने तातडीने औरंगाबादकडे कूच केले. तो औरंगाबादेत आला तेव्हा दुपार झाली होती. त्याला जे दृश्य दिसले ते विलक्षण होते. मराठ्यांनी बाई-पुऱ्यापर्यंत मजल मारली होती व जवळच्या साताऱ्याच्या खेड्यात धामधूम उडवून दिली होती. राजा अनूपसिंग याच्याकडे औरंगाबाद शहराच्या रक्षणाचे काम होते. त्याला 'राजा' ही पदवीही खानजहानच्याच विनंतीवरून बादशहाने दिली होती. पण त्याने या वेळेला कच खाल्ली. तो तयार होऊन आपल्या पुढ्यातच उभा राहिला. पण पुढे चाल करून जाणे त्याच्याने शक्य होईना. इतिहास-कार भीमसेन सक्सेना या वेळी खानजहानबरोबर होता. त्याने म्हटले आहे, "मी मध्यान्हाच्या वेळी औरंगाबादेत दाखल झालो, मला जे दृश्य दिसले ते विलक्षण होते. लोकांनी आपापल्या घराचे दरवाजे बंद केले होते. ते आपापल्या वाड्यात तयार होऊन उभे होते. बाजारात आणि गल्ल्यांतून एक मनुष्य दिसत नव्हता. कोतवालीच्या ओट्यावर मला फक्त तीन शिपाई बसलेले आढळले. खानजहान आल्यानंतर मराठे निघून गेले; आणि खानजहानने जसवंतसिंगाच्या तलावाच्या काठावर तळ दिला. पण मराठे केव्हा येतील याची धास्ती सारखी होती. तेव्हा औरंगाबाद शहराभोवती तट बांधावा अशी खानजहानला औरंगजेबाने आज्ञा केली, हाच मराठ्यांच्या स्वाऱ्याचा इत्यर्थ होता. शत्रूच्या मनात सतत धास्ती निर्माण करणे आणि त्याला अखंड अस्वस्थ ठेवणे.

१६८१ च्या १३ मे रोजी मराठ्यांच्या या औरंगाबादवरील आक्रमणाचा अधिकृत अहवाल खानजहानने पाठविला होता. तो औरंजेबास मिळाला. खानजहानने म्हटले होते, " गनिमांची फौज औरंगाबादभोवतालचा प्रदेश लुटण्यासाठी आली होती म्हणून खानाजाद मुझफ्फरखान, दाउदखान वगैरे बादशाही लोक स्वार होऊन तेथे पोहोचले. लढाई झाली. बादशाही सुदैवाने यांनी शत्रूचे पंधराशे लोक मारले व अनेकांना जखमी केले. त्यांनी पळ काढला. बादशाही फत्ते झाली. त्यांनी लुटलेले सामान परत आणले. शत्रूचे लोक पळून गेले. मुजफ्फरखानाने फौजेसह त्यांचा पाठलाग केला."

परंतु या सर्वांपेक्षाही बुऱ्हाणपूरवर मराठ्यांनी छापा घालून जी लूट केली ती केवळ 'न भूतो न भविष्यति' अशा कोटीतली होती. तिची तुलनाच करायाची तर सतरा वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांनी सुरतेवर धाड घालून तिची जी बेसुरत केली, त्या ऐतिहासिक लुटीशीच करावी लागेल.

सुरतेप्रमाणेच बुऱ्हाणपूर हेही मोगल साम्राज्यातील प्राचीन आणि धनाढ्य शहर होते. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी खानदेशच्या फारुकी नबाबांपैकी नासीर फारुकी याने बुऱ्हाणपूरची स्थापना केली. आपला बाप मलिक राजा फारुकी याच्यापासून आपल्या घराण्याशी निर्व्याज स्नेहाने वागत आलेल्या अशीरगडचा अहीर जातीचा श्रीमंत व बलाढ्य राजा आशा याचा त्याने विश्वासघात केला. "बागलाण व अंतूर येथील राजे माझ्याशी लढाई करण्यास उभे राहिले आहेत. माझ्या ताब्यात फक्त लळिंगचा किल्ला आहे; तोही सुरक्षित नाही. तेव्हा माझ्या बायकामुलांना आपल्या किल्ल्यात आश्रय द्यावा." अशी विनंती करून त्याने हत्यारबंद शिपायांच्या पडद्याच्या पालख्या अशीरगडात पाठविल्या. या शिपायांनी अशीरगडात शिरल्यावर आपल्या स्वागतासाठी किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर उभ्या असलेल्या आशा राजाची त्याच्या मुलाबाळांसकट कत्तल उडविली. नासीरच्या या विजयाचे अभिनंदन करण्यासाठी त्याच्या घराण्याचा धर्मगुरू झैनुद्दीन हा मुद्दाम दौलताबादेहून आला. त्याच्या आणि दौलताबादेचा सुप्रसिद्ध संत बुऱ्हाणुद्दीन याच्या स्मरणार्थ नासीर फारुकीने झैनाबाद आणि बुऱ्हाणपूर ही दोन शहरे तापी नदीच्या तीरावर समोरासमोर वसविली. ही घटना १३९९ साली घडली.

त्या वेळेपासून फारुकी नबाबांची व खानदेशची राजधानी झालेल्या बुऱ्हाणपूरची उत्तरोत्तर भरभराटच झाली. आदिलखान फारुकीने तापी तीरावर सुंदर वाडा बांधला. या वाड्यातील हवा आणि प्रकाश येण्याच्या सोयी इतक्या उत्कृष्ट होत्या की सर्व हिंदुस्थानात त्या काळी त्या तशा कोठे नव्हत्या. शहराच्या मध्यभागी आपल्या गगनचुंबी मनोऱ्यांनी चित्त वेधून घेणारी जामा मशीद त्याने बांधली. त्याखेरीज उपवने, मृगविहारवने, मृगया-मंदिरे यांची रचना त्याने केली. तापीच्या पश्चिम तीरावर त्याने बांधलेला शाही किल्ला आज उद्ध्वस्त

होऊन गेला असला तरी त्याच्या नजीकचा अवशिष्ट असलेला हमामखाना आपल्या संगमरवरी फरशीने आणि छतावरच्या नाजूक चित्रकलेने फारुकीच्या वैभवाची व कलाप्रियतेची ग्वाही देत अद्याप उभा आहे. त्याच्या कारकीर्दीत बुऱ्हाणपूरच्या व्यापारास अतिशय भरभराट आली. सोन्याचांदीचे काम, रेशमी वस्त्रे, मलमल, कलाबतूचे काम, कापडात सोन्याच्या तारा गुंफण्याचे काम या वेळेला बुऱ्हाणपुरात इतके उत्कृष्ट होत असे की साऱ्या हिंदुस्थानात त्या वेळी त्याला तोड नव्हती.

इ. स. १५९९ मध्ये जरी अकबराने अशीरगडाबरोबर बुऱ्हाणपूर आणि खानदेश जिंकून मोगल साम्राज्यात सामील केले, तरी मोगलांच्या अमदानीतही बुऱ्हाणपूरच्या उत्कर्षाची कमान अखंड चढतीच राहिली. ऐश्वर्य आणि कलेची अभिरुचि ही मोगलांच्या रक्तातच भिनलेली असल्यामुळे बुऱ्हाणपूरच्या अभिजात कलेची परंपरा अविच्छिन्न राहिली यात नवल नाही. त्या काळी निर्माण झालेल्या आहूखाना, अकबर सराई, तुर्की हमाम, महलगुलारा, बेगम शाह शुजा व दानियल यांचे मकबरे, रावरतनचा महाल आणि राजा जयसिंहाची छत्री ह्या इमारती म्हणजे स्थापत्यकलेचे उत्कृष्ट नमुने म्हणावे लागतील. बुऱ्हाणपूरला दक्षिणची बाजारपेठ म्हणत असत; इतकेच नव्हे तर उत्तरेची सुरक्षितता व दक्षिणेवरील वर्चस्व या दृष्टीने बुऱ्हाणपूर हे अत्यंत मोक्याचे ठिकाण असल्यामुळे त्याचे राजकीय महत्त्व अनन्यसाधारण होते. बादशहाचा जवळचा आप्त किंवा शहाजादा यांच्याशिवाय दुसऱ्याकडे बुऱ्हाणपूरचा कारभार दिला जात नसे. मोगल सुभेदारांपैकी अब्दुल रहीम खानखाना याने सातपुड्याच्या डोंगरातून मातीचे नळ आणून बुऱ्हाणपूरला उत्कृष्ट पाणी पुरवठा केला. त्याने बांधलेल्या जलसंचयांपैकी सूखा भंडारा, मूल भंडारा आणि चिंताहरण हे विद्यमान असून अद्याप त्या शहराच्या लालबाग व बहादरपूर या भागांना पाणी पुरवीत आहेत.

मोगलांच्या काळात बुऱ्हाणपूरचे ऐश्वर्य कळसास पोचले. हसनपुरा, खुर्रमपुरा, करणपुरा, शहाजहानपुरा, नबाबपुरा, शाहगंज, बहादुरपुरा, इत्यादि शहराचे सतरा पुरे होते. शहराच्या तटबंदीच्या बाहेर असलेले हे सतरा पुरे म्हणजे जणू काही शहराची केन्द्रेच होती. विशेषतः बहादुरपुरा म्हणजे बुऱ्हाणपुरातल्या लक्षाधीशांचे माहेरच होते. या सतरा पुऱ्यांतून समृद्धि नुसती ओसंडून वाहत होती. देशोदेशींचे जिन्नस, जडजवाहीर, सोने, नाणे रत्ने असा लक्षावधि रुपयांचा माल तेथील दुकानांतून साठविलेला होता.

बुऱ्हाणपूरला या वेळी खानजहान हा सुभेदार होता, पण प्रत्यक्ष बुऱ्हाणपुरात त्याचा नायब काकरखान अफगाण हा जिझिया कराच्या वसुलीच्या कामावर होता तोच हजर होता. त्याच्या पाशी फक्त दोन-तीनशे लोक होते. एवढ्यात २० जानेवारी १६८१ रोजी, निरभ्र आकाशात एकाएकी काळे ढग जमून यावेत

आणि विजेचा लोळ धरणीवर कोसळावा त्याप्रमाणे कसलीही कल्पना नसताना, वीस हजार स्वारांनिशी संभाजीने बुऱ्हाणपुरावर झडप घातली. मराठ्यांनी करणपुऱ्यातल्या रजपुतांना निःशस्त्र केले, सारे सतरा पुरे ताब्यात घेतले व विशेषतः बहादुरपुऱ्यावर तर ते इतक्या नेटाने व अनपेक्षितपणाने तुटून पडले की कोणाला एक सुतळीचा तोडा हलविता आला नाही की एका माणसाला निसटून जाता आले नाही. काही लोक बायकापोरांच्या अब्रूसाठी जिवावर उदार होऊन मराठ्यांशी लढता लढता मारले गेले. काही कसेबसे धडपडत तटाच्या आत शिरले. काही ईश्वरावर भरंवसा ठेवून स्वस्थ बसले. मराठ्यांनी तीन दिवसपर्यंत निःशंकपणे पुरे लुटले. त्यांनी घरे सुद्धा खणून काढली, आणि ज्या संपत्तीचा घरमालकांनाही पत्ता नव्हता, तीही हस्तगत केली. इतकी यथेच्छ लुटालूट केल्यानंतर मराठ्यांनी त्या सगळ्या पुऱ्यांना आग लावून दिली. त्या आगीच्या ज्वाळा आणि धूर जेंव्हा आकाशात पोचला, तेव्हा कोठे काकरखानाला व शहरातील इतर लोकांना मराठे आल्याची बातमी समजली. अर्थात् बातमी आधी समजून तरी काकरखानाने काय केले असते हा प्रश्नच होता !

तटाला शिडचा लावून मराठ्यांनी शहरात शिरण्याचा प्रयत्न केला. पण काकरखानाने व इतर मन्सबदारांनी वेशी, तट, बुरूज इत्यादि ठिकाणी मोर्चे बांधून त्यांचा निकराने प्रतिकार केला. त्यामुळे मराठ्यांनी तो प्रयत्न सोडून दिला. बाकी शहरात शिरून तरी त्यांना आता काय मिळवायचे राहिले होते म्हणा ! त्यांच्यापाशी इतकी लूट जमली होती की लुटीने लष्कर कुबेर झाले होते. सोने, चांदी जडजवाहिर, मूल्यवान् सामान तेवढे त्यांनी बरोबर घेतले आणि साल्हेरच्या दिशेने कूच केले, भांडी-कुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले हे सर्व लुटलेले जिन्नस त्यांनी फेकून दिले. ते गेल्यानंतर रस्त्यात जळालेल्या आणि इतर वस्तूंचा नुसता सडा पडला होता.

बुऱ्हाणपूरवरील मराठ्यांच्या आक्रमणाची बातमी कळल्यानंतर खानजहान औरंगाबादेहून तातडीने त्यांच्या पाठलागावर रवाना झाला. तीन चार दिवसांचे अंतर एका दिवसात त्याने आक्रमिले, फर्दापूरच्या घाटापाशी, औरंगाबादेहून बत्तीस कोसांवर पोचल्यानंतर जनावरांना विश्रांति देण्यासाठी तो तीन-चार प्रहर थांबला. पण तो मराठ्यांना गाठू शकला नाही. मराठे साल्हेरकडे फर्दापूरच्या डावीकडून धरणगाव-चोपडा मार्गाने गेले आणि खानजहान नेमक्या उलटचा मार्गाने म्हणजे उजवीकडून एदलाबादकडे रवाना झाला. यावरून खानजहानच्या हितशत्रूंनी उठविले की, त्याने मराठ्यांकडून भक्कम लाच खाल्ली आणि पाठलाग केल्याचे फक्त सोंग केले. आता खानजहानने पैसे खाऊन शहाणपणाने मुद्दाम मूर्खपणा केला कीं पैसे न खाता तो खरोखरच मूर्खासारखा वागला यातले खरेखोटे त्याला माहीत कीं परमेश्वराला माहीत; पण एवढे मात्र जगजाहीर झाले की, खानजहान हा

बादशाही सुभदार असूनही बुऱ्हाणपूर मराठ्यांच्या तावडीतून वाचू शकले नाही आणि बुऱ्हाणपूरचे वैभव बादशाहीच्या प्रतिष्ठेबरोबर धुळीला मिळाले.

उत्तरेस बुऱ्हाणपूर ते दक्षिणेस सोलापूर इतक्या अफाट प्रदेशात जाळपोळ, लुटालूट यांचा कहर उडवून देऊन मराठ्यांनी खानजहानला याप्रमाणे 'दे माय धरणी ठाय' करून सोडले होते. मोंगलांचे व मराठ्यांचे हे युद्ध कदाचित् अनंत काळ चालले असते. पण याच वेळी इतिहासाला कलाटणी देणारी एक विलक्षण घटना घडून आली. औरंगजेबाचा चवथा मुलगा शहाजादा अकबर याचे संभाजीला पत्र आले. औरंगजेबाविरुद्ध आपण केलेल्या अयशस्वी बंडाची हकीकत देऊन, आपण संभाजीकडे आश्रयास येत आहोत असे कळवून औरंगजेबाविरुद्ध आपणांस राज्य मिळविण्यास संभाजीने मदत करावी अशी विनंती अकबराने या पत्रात संभाजीस केली होती. औरंगजेबाचा आणि मराठ्यांचा उभा दावा. औरंगजेबाच्या मुलाचे आपणांस पत्र येईल आणि त्यातही अशा कारणासाठी पत्र येईल ह्या गोष्टीची संभाजीला स्वप्नातही कल्पना असणे त्यामुळे शक्य नव्हते. पण मानवी जीवन हे फार विलक्षण आहे. अनेक वेळा त्यात सत्य हे कादंबरीपेक्षाही अद्भुत असल्याची प्रतीति येते. त्यातलाच हा अकबराने संभाजीस पत्र लिहिण्याचा प्रकार म्हणावयाचा. अकबराने आपल्या उठावाची हकीकत देऊन लिहिले होते,

" तुमचे शौर्य आणि मर्दुमकी ही लक्षात घेऊन मी इकडे येण्याचे ठरविले. परमेश्वरकृपेने जमादिलावल महिन्याच्या पहिल्या तारखेस (९ मे १६८१) मी महेश्वर येथे नर्मदा नदी सुखरूप ओलांडली. दुर्गादास राठोड हा माझ्याबरोबर आहे. माझ्याबद्दल तुम्ही निःशंक राहा. परमेश्वरकृपेने मला राज्य प्राप्त झाले तर नाव माझे आणि राज्य तुमचे असे राहील. आलमगीर हा तुमचा आणि माझा शत्रु आहे हे लक्षात घ्या. त्यामुळे आपण दोघांनी मिळून आपले उद्दिष्ट साध्य होईल असे करण्याचा निश्चय करा.

कविता : हे जग चंचल आणि अस्थिर आहे. फक्त चांगले काम केल्याची कीर्ति तेवढी टिकून राहते. हीच मर्दाची व मर्दुमकीची कसोटी होय. जास्त काय लिहू ?

शहाण्या माणसांना विशेष सांगण्याची आवश्यकता नाही. साधा इशारा पुरे. तारीख जमादिलावल महिन्याची तिसरी तारीख. हिज्री १०९२ (११ मे १६८१)

७

शहाजादा महंमद अकबर हा औरंगजेबाचा चवथा मुलगा होय. अकबराच्या ठिकाणी विशेष कर्तृत्व कोणतेही नव्हते. पण औरंगजेबाचा तो विशेष लाडका मुलगा होता. हीच गोष्ट त्याच्या बाबतीत विशेष म्हणावी लागेल. कारण औरंगजेबाच्या निष्प्रेम आणि निर्विकार अंतःकरणात एवढे स्थान मिळणे ही केवळ आश्चर्यकारक गोष्ट होती. पण अकबराच्या बाबतीत ते अघटित घडले होते खरे. पण याही बाबतीत अकबराच्या स्वतःच्या गुणाचा काही संबंध नसून तो केवळ योगायोगाचा परिणाम होता. अकबराची रजपूत आई दिलरास बानू ही त्याच्या जन्मानंतर केवळ एका महिन्यात मृत्यु पावल्यामुळे या आईवेगळ्या मुलाबद्दल औरंगजेबाला एक प्रकारचा जिव्हाळा आणि अनुकंपा वाटत असे. पण हा अपवाद म्हणावा लागेल. कारण, मुअज्जम आणि आझम या मुलांच्या बाबतीत औरंगजेब इतका कठोर आणि संशयी होता की बापाचे पत्र आले की त्यांचे चेहरे राखेसारखे पांढरे फटफटीत पडत. कारण मुलांच्या बाबतीत औरंगजेबाला दयामाया माहीत नव्हती. त्याचा सर्वांत मोठा मुलगा महम्मद सुलतान याने त्याच्याविरुद्ध शुजाशी संगमनत केल्याबद्दल औरंगजेबाने त्याला ग्वाल्हेरच्या तुरुंगात अनेक वर्षे ठेविले होते, आणि मुलगी झेबुन्निसा ही अकबराच्या बंडात सामील झाल्याबद्दल तिची सारी मालमत्ता जप्त करून सलीमगडच्या किल्ल्यात मरेपर्यंत कैदेत ठेवण्याची शिक्षा औरंगजेबाने तिला केली होती. त्या कोठडीतल्या भयाण एकलकोंडीत तिळातिळाने झिजत एकवीस वर्षे तिने काढली आणि बापापेक्षा दयाळू असलेल्या मृत्यूनेच तिची अखेर सुटका केली. या दृष्टीने पाहता अशा निर्घृण बापाच्या प्रेमास पात्र होणारा अकबर खरोखरच भाग्यवान् म्हटला पाहिजे.

प्रेम अंधळे असते ही उक्ति प्रसिद्धच आहे; आणि इतर सर्व प्रकारच्या प्रेमाप्रमाणे पुत्र-प्रेमाच्या बाबतीतही ती तितकीच खरी आहे. त्यामुळे अकबराच्या ठिकाणी विशेष कर्तृत्व कोणतेही नाही, ही गोष्ट औरंगजेबासारख्या मर्मज्ञ आणि चतुर माणसाच्या जरी लक्षात आली, तरी एका सुभ्यावरून दुसऱ्या सुभ्यावर बदलो करीत कां होईना, अकबराला लष्करी आणि मुलकी कारभाराचा अनुभव देण्याचा क्रम त्याने चालू ठेविला. १६७२ साली राजपुतान्यात सतनामींचे बंड झाले ते मोडण्यास अकबराला इतर सरदारांबरोबर पाठविण्यात आले. दोन वर्षांनी आसदखानाबरोबर तो काबूलच्या स्वारीवर गेला. १६७६ मध्ये त्याला माळव्याच्या सुभेदारीवर धाडण्यात आले. पण दोन वर्षांनीच त्याला मुलतानला पाठविण्यात आले. एका वर्षाने लाहोरची सुभेदारी देण्यात आली, पण अवघ्या पाच

महिन्यांत त्याला तेथूनही बदलून १६७९ त अलाहाबादला पाठविण्यात आले. तेथूनही त्याला अवघ्या चार महिन्यांत काढून चाळीस हजारांची मनसब देऊन राजपूत-युद्धात चितोडवर पाठविण्यात आले. अकबराच्या या एका सुभ्यावरून दुसऱ्या सुभ्यावर ज्या वारंवार बदल्या होत होत्या, त्यावरून औरंगजेबाच्या चंचलपणापेक्षा अकबराच्या नाकर्तेपणाचीच प्रतीति जास्त येते. नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे चितोडलाही अकबराने पराक्रम काहीच केला नाही. राजपुतांनी त्याला सळो की पळो करून सोडले. परंतु या युद्धात तो मोठ्या चमत्कारिक रीतीने 'प्रसिद्ध' झाला. इतका प्रसिद्ध झाला की आपल्या कर्तृत्ववान् बापाबरोबर त्याने आपलेही नाव चिरंजीव करून टाकले. मुलाच्या आयुष्यात क्रांति करणारे पुष्कळ बाप जगाच्या पाठीवर सापडतील; पण आपल्या 'गुणांनी' बापाच्या आयुष्यात क्रांति घडवून आणणारा अकबरासारखा मुलगा हजारांत एखादाच.

ज्या युद्धात अकबर प्रसिद्धीस आला, त्या मोगल राजपूत युद्धाइतक्या औरंगजेबाच्या स्वभावावर आणि राजनीतीवर प्रकाश टाकणाऱ्या घटना थोड्याच असतील. मुळात हे युद्ध जोधपूरचा महाराजा जसवंतसिंह याच्या मृत्यूने सुरू झाले. मारवाडचा जसवंतसिंह हा जयपूरच्या जयसिंहाप्रमाणेच अग्रगण्य राजपूत संस्थानिक होता. अकबराच्या वेळेपासून मोगल साम्राज्याचे आधारस्तंभ असलेले हे राजपूत औरंगजेबाच्या डोळ्यांत सलत असत. त्यांपैकी जयसिंह दहा वर्षांपूर्वी मृत्यू पावला आणि जसवंतसिंह १६७८ साली अफगाणिस्तानात जमरूड येथे आपला मोठा मुलगा जगत्सिंह याच्यासह वाईट हवेमुळे मरण पावला. जसवंतसिंहाच्या मृत्यूनंतर जोधपूरच्या गादीवर कोणताही प्रबळ वारस येऊ नये की, ज्याच्या नेतृत्वाखाली राजपूत बळ धरू शकतील, अशा उद्देशाने औरंगजेबाने त्याचा पुतण्या इंद्रसिंग याच्याकडून पस्तीस लाख रुपयांचा नजराणा घेऊन त्याला जोधपूरच्या गादीवर बसविले. यांत केवळ राजकारण नव्हते, व्यक्तिद्वेषही होता. औरंगजेब फार दीर्घद्वेषी आणि आतल्या गाठीचा होता. एखाद्या व्यक्तीबद्दलचा राग वर्षानुवर्ष तो मनात साठवून ठेवी; बाहेरून त्याचा पत्ताही लागत नसे. पण वेळ आली की पुरेपूर वचपा काढल्याशिवाय तो राहत नसे. विसरणे आणि क्षमा करणे ह्या गोष्टी त्याच्या कोशातच नव्हत्या. वीस वर्षांपूर्वी शहाजादा असताना राज्यपद प्राप्तीसाठी औरंगजेब आग्ऱ्यावर चालून येत असताना शहाजहानच्या हुकुमाने का होईना, पण जसवतसिंगाने धर्मत येथे त्याच्याशी लढाई दिली होती. देवराईच्या लढाईत तो दाराच्या पक्षाला मिळण्याच्या बेतात होता, केवळ औरंगजेबाने त्याला चातुर्याने ऐन वेळी फोडले म्हणून निभावले. खाजव्याच्या लढाईत शुजाशी त्याचे आतून संगनमत होते, आणि एका रात्री तर औरंगजेबाची पिछाडीच त्याने लुटली होती. या गोष्टी जुन्या झाल्या होत्या पण औरंगजेब त्या विसरला नव्हता म्हणून जसवंतसिगानंतर जोधपूरवर त्याने

स्थापना केली इंद्रसिंहाची, जो केवळ त्याच्या हातातले बाहुले होता. जसवंतसिंगाचा मोठा मुलगा बापाबरोबरच मरून गेला होता त्यामुळे औरंगजेबाचा मार्ग अगदी निष्कंटक झाला होता.

पण जसवंतसिंगाचा एक मुलगा अद्यापि जिवंत होता, नव्हे तो नुकताच जन्मला होता ! जमरूड येथे जसवंतसिंग मृत्यु पावल्यानंतर त्याच्या पाच राण्या व सात रखेल्या जरी सती गेल्या तरी दोन राण्या हयात होत्या. त्यांना घेऊन त्याचा एकनिष्ठ सेवक दुर्गादास राठोड लाहोरला आला. तेथे या दोन्ही राण्यांनी मुलांना जन्म दिला. एक मेला पण दुसरा जिवंत राहिला, त्याचे नांव अजितसिंग. त्यांना घेऊन दुर्गादास दिल्लीला आला आणि अजितसिंगाला जोधपूरचे राज्य द्यावे अशी त्याने औरंगजेबाला विनंती केली. पण सरळपणाने वागेल तर तो औरंगजेब कसला ! दुर्गादासाची विनंती त्याने साफ धुडकावून लावली. इतकेच नव्हे तर अजितसिंगाला आपल्या ताब्यात द्यावे, तो वयात आला म्हणजे त्याला आपण जोधपूरचे राज्य देऊ असे सांगून मुलाचा तावा घेण्यासाठी त्याने सैन्यही पाठविले. दुर्गादास औरंगजेबाला चांगला ओळखून होता. बादशहाच्या ताब्यात गेल्यावर जोधपूरचे राज्य तर दूरच राहिले, अजितसिंगाचा धर्म व प्राण दोन्ही सुरक्षित राहणार नाहीत याची त्याला खात्री होती. अनेक राठोड वीरांच्या प्राणांचे मोल देऊन राणी व अजितसिंगाला सुरक्षित स्थळी ठेवून त्याने औरंगजेबाविरुद्ध बंड पुकारले. त्यात उदेपूरचा महाराणा राजसिंहही सामील झाला. कारण जोधपूरची राणी ही उदेपूरची राजकन्या होती हे एक; आणि याच वेळी औरंगजेबाने मंदिरे फोडण्याचा सपाटा चालविला होता, व त्याने समस्त हिंदूंवर जिझिया कर बसवून उदेपूरकडून त्याची मागणी केली होती, या संकटाच्या गांभीर्याची राजसिंहाला जाणीव झाली. आज मारवाड जात्यात असले व मेवाड सुपात असले तरी मारवाडानंतर मेवाडची वेळ येणारच; यात राज्यालाच नव्हे तर धर्मालाही धोका आहे हे समजून तो मारवाडच्या बंडात सामील झाला. मारवाडाचे राठोड आणि मेवाडचे सिसोदिया एक झाले; पाहता पाहता काटयाचा नायटा झाला, ठिणगीची ज्वाला झाली आणि तिने सगळा राजपुताना पेटून उठला !

औरंगजेब करायला गेला काय आणि झाले काय ? पण तो हटला नाही. असली अनेक वादळे त्याने पचविली होती. त्याने एक गवळयाचा पोर आपल्या जनानखान्यात आणिला, आणि " हाच खरा अजितसिंग आहे, दुर्गादासाजवळचा अजितसिंग खोटा आहे " असे जाहीर केले; इंद्रसिंगला पदच्युत करून जोधपूरचे राज्य ताब्यात घेतले व सरबुलंदखानाच्या हाताखाली मोठी फौज मारवाडमध्ये पाठविली. एवढयावरच तो थांबला नाही. अकबराला त्याने मारवाडवर स्वारी करण्यास पाठविले व युद्धावर देखरेख ठेवण्यासाठी तो स्वतः अजमीरला तळ

ठोकून बसला. मोगल सैन्याने जोधपूर उद्ध्वस्त केले. तीच स्थिति उदेपूरची झाली. ढगांमधून पावसाचा वर्षाव व्हावा, त्याप्रमाणे मोगल सैन्य राजपुतान्यावर कोसळले. मंदिरे जमीनदोस्त झाली आणि त्यांच्या जागी मशिदी उभ्या राहिल्या. सगळ्या मैदानी प्रदेशावर मोगलांचे स्वामित्व झाले. पण राजपुतांनीही तितकाच प्रखर प्रतिकार केला. मैदान सोडून ते पर्वतावर जाऊन राहिले, आणि खिडीत गाठून, रात्री बेरात्री हल्ले करून रसद लुटून त्यांनी मोंगल सैन्यात धास्ती निर्माण केली. कथा अशी सांगतात की खुद्द औरंगजेबालाच खिडीत गाठून राजसिंहाने कठीण वेळ आणली होती; पण राजपुतांच्या अभिजात सौजन्याने त्याला वाट करून दिली, आणि आपल्या राज्यातून निघून जावे आणि युद्ध थांबवावे अशी विनंती केली परंतु रजपुतांच्या प्रतिकाराचा आणि राजसिंहाच्या सौजन्याचा औरंगजेबावर काही एक परिणाम झाला नाही. त्याने मेवाडची दऱ्याखोरी जिंकण्यासाठी पूर्वेकडून चितोडच्या बाजूने शहाजादा आजम, उत्तरेकडून राजसमुद्र, तलावाच्या बाजूने शहाजादा मुअजम व पश्चिमेकडून मारवाडातून देवसूरी खिडीतून शहाजादा अकबर यांना चालून जाण्याचे हुकूम केले. राजपुतांची जिद्द आणि औरंगजेबाचा हट्ट ही दोन्ही इतकी तोडीस तोड होती की, त्या दोघांतून माघार कोण घेणार हे सांगणे फार कठीण होते. एवढ्यात औरंगजेबाच्या दुर्दैवाने रजपुतांनी अकबराला फोडले आणि त्यामुळे या युद्धाचे सारे स्वरूपच आमूलाग्र बदलून गेले.

अकबर मूळात फारसा पराक्रमी नव्हताच. मारवाडवर प्रथम त्याने स्वारी केली, तेव्हा राजपुतांना एकत्र येण्याइतका अवधि मिळाला नव्हता, त्यामुळे त्याला मनसोक्त जाळपोळ करता आली. पण चितोडवर जेव्हा तो गेला तेव्हा राजपुतांनी छापे घालून त्याची अक्षरशः लांडगेतोड केली. त्याबद्दल औरंगजेबाने त्याची सडकून हजेरी घेतली आणि चितोडहून त्याला काढून मारवाडवर त्याची नेमणूक केली. अपमानाने रंजीस आलेला अकबर आधीच औरंगजेबावर जळफळत होता. तशात उदेपूरचा महाराणा राजसिंह आणि जोधपूरचा दुर्गादास यांनी त्याला मसलत दिली की, औरंगजेबाचे राजपूतांचा समूळ उच्छेद करण्याचे जे धोरण आहे, त्याने मोगल साम्राज्यच धोक्यात येईल. म्हणून अकबराने त्याला पदच्युत करून स्वतः राजपद धारण करावे व पूर्वीच्या बादशहाचे शहाणपणाचे धोरण पुढे चालवावे. अकबर असे करण्यास तयार असेल तर त्याला शिसोदिया आणि राठोड या बलाढ्य राजपूत संघांचा संपूर्ण पाठिंबा देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

यापूर्वी दुर्गादासाने हा प्रयोग शहाआलमवर त्याच्या आईच्या मार्फत करून पाहिला होता. पण शहाआलम त्याला बधला नाही. परंतु अकबराला तो सल्ला मानवला. अपमानाने संतप्त झालेल्या त्याच्या मनोभूमीत दुर्गादासाने दिलेल्या या कानमंत्राने बळकट मूळ धरले. १ जानेवारी १६८१ रोजी त्याने औरंगजेबाला

पदच्युत केल्याचा जाहिरनामा काढला. स्वतःला राज्याभिषेक करून घेतला व दुसऱ्या दिवशी आपल्या राजपुत सहकाऱ्यांसह अजमीरवर चाल केली.

अकबराच्या बंडाची ही बातमी औरंगजेबाला प्रथम खरीच वाटेना. शहा-आलमने अकबराचा असा काही बेत असल्याची जाणीव त्याला दिली होती, पण त्या वेळीही हे शहाआलमने भावाच्या द्वेषाने रचलेले कुभांड आहे, असे समजून औरंगजेबाने त्याला धुडकावून लावले होते; इतका अकबरावर त्याचा विश्वास होता. पण आता जेव्हा बातमीदार आणि गुप्तहेर त्याच बातम्या आणू लागले, तेव्हा एकदा कां होईना पण मुलाच्या बाबतीत आपण फसलो हे त्याला स्वतःशी कां होईना पण कबूल करावे लागले. तो या वेळी इतक्या अडचणीत सापडला होता, की दुसरा तिसरा त्याच्या जागी असता तर त्याने हातपायच गाळले असते. त्याच्या सैन्याच्या सर्व मोठ्या तुकड्या चितोड व राजसमुद्राकडे होत्या. त्याच्या-जवळ जे दहा हजार लोक होते ते सारे बिनलढाऊ होते. उलट अकबरापाशी सत्तर हजार सैन्य असल्याची बातमी त्याला लागली होती, हे सर्व मनात येऊन, अकबराच्या विश्वासघाताने क्षणभर खचल्यासारखा होऊन तो म्हणाला, "मी अगदी उघड्यावर पडलो आहे. त्या कारट्याला संधि तर उत्तम मिळाली. मग तो माझ्यावर एकदम हल्ला कां नाही करीत ?"

अकबराने एकदम हल्ला केला नाही याचे कारण इतकेच की तो अकबर होता, औरंगजेब नव्हता. राज्याभिषेक करून घेऊन व बापाला पदच्युत केल्याचा जाहीर-नामा काढून तो चैन करण्यात दंग होऊन बसला. जाणारी प्रत्येक घटका जेव्हा मोलाची होती, तेव्हा आपल्या तळापासून अजमीरपर्यंत अवघे एकशेवीस मैलांचे अंतर कापण्यास त्याने पंधरा दिवस घेतले. हा काळकाढूपणा औरंगजेबाच्या पथ्यावर पडला. एवढ्या अवधींत त्याने आपल्या संरक्षणाची कडेकोट व्यवस्था केली. हमीदखान शिहाबुद्दीन व आझम यांचे सैन्यही त्याला येऊन मिळाले. तो अजमिरातून बाहेर पडून दोराहा या ठिकाणी युद्धाची वाट पहात बसला. तेथून तीन मैलांवर अकबराचा तळ पडला होता.

ती १५ जानेवारी १६८१ ची रात्र होती. दुसऱ्या दिवशी लढाईला तोंड लागणार होते. त्या रात्री औरंगजेबाने अकबराच्या नावाने एक पत्र तयार केले व रजपुतांच्या हातात ते पडेल अशी व्यवस्था केली. त्या पत्रात अकबराची प्रशंसा करून म्हटले होते की, "तुम्ही राजपूत बंडखोरांना जाळ्यात पकडून येथपर्यंत आणले हे फार उत्तम केले. आता एवढेच करा, की उद्या लढाई सुरू झाली म्हणजे त्यांना आघाडीला ठेवा, म्हणजे पुढून आम्ही आणि मागून तुम्ही त्यांना चिम-ट्यात पकडून त्यांचा संहार करू." हे पत्र दुर्गादासाच्या हातात ठरविल्याप्रमाणे पडले. त्याची चित्तवृत्ति भांबावून गेली. अकबराला या बाबतीत विचारण्यासाठी तो गेला तेव्हा अकबर झोपावयास गेला होता, व कोणालाही प्रवेश करण्यास किंवा

त्याची झोप मोडण्यास बंदी आहे असे त्याला सांगण्यात आले. औरंगजेबाचे पत्र आणि अकबराची झोप यांतला कार्यकारणसंबंध दुर्गादासाच्या ध्यानात आला. बापलेकांनी मिळून आपल्याला फसविण्याचा क्रूर घाट घातला होता, त्यातून केवळ दैवयोगाने आपण बचावलो असे त्याला वाटले. अकबराची राजकीय झोप घेण्यास त्याला सोडून आपल्या राजपुतांसह सूर्योदयाच्या पूर्वी तीन तास दुर्गादासाने अकबराच्या छावणींतून काढता पाय घेतला.

सकाळी अकबर जागा होऊन पाहतो तो तीस हजार राजपुतांपैकी एक जाग्यावर नाही. एका रात्रीत इकडचे जग तिकडे होऊन गेले. राज्य नाही, राजपद नाही, आता कृतांतापेक्षा कठोर अशा बापाच्या तावडीतून पळ काढण्यापेक्षा जीव वाचविण्यास दुसरा उपाय नव्हता. घाईघाईने तो पळून गेला. मागे औरंगजेबाने त्याचा तळ लुटून घेतला. त्याच्या बायका मुलांना कैद केले. त्याच्याशी सामील असल्याच्या अपराधाबद्दल त्याची बहीण झेबुन्निसा हिला सलीमगडची कोठडी दाखविली व अकबराच्या पाठलागावर सैन्य रवाना केले.

अवशिष्ट राहिलेल्या आपल्या साडेतीनशे निष्ठावंत अनुचरांसह पुरा एक दिवस, एक रात्र आणि आणि आणखी एक दिवस शिकारी कुत्रे मागे लागलेल्या हरिणाप्रमाणे अकबर सैरावैरा पळत होता. त्याच्या सुदैवाने दुसऱ्या दिवशी दुर्गादासाने त्याला गाठले. फार उशीरा कां होईना पण औरंगजेबाने आपणाला फसविले, आणि हजारो सैनिकांपेक्षा मातबर असलेल्या आपल्या कपटविद्येच्या बळावर रक्ताचा एक थेंब न सांडता आणि धनुष्यातून एक बाण न सोडता त्याने लढाई सुरू होण्यापूर्वीच जिंकली हे दुर्गादासाला समजले. पण लढाई हरली तरी शरणागताला राजद्वारात आणि स्मशानात जिवात जीव असेपर्यंत अंतर न देणारी अभिजात राजपूत नीति त्याच्या अंगात भिनलेली होती. आपल्या पाचशे राठोड स्वारांसह तो अकबराला सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी हिंडू लागला. पण त्याच्यामागे मुअज्जमचे सैन्य लागले होते. त्यामुळे मारवाड सोडून ते मेवाडकडे आले. उदेपूरच्या महाराण्याने त्यांचे स्वागत केले, पण उदेपूर जोधपूरइतकेच औरंगजेबापासून सुरक्षित होते म्हणजे मुळीच नव्हते. तेव्हा दक्षिणेकडे जाण्याचा दुर्गादासाने विचार ठरविला, पण या मार्गावरील सर्व ठाणेदारांना सावध राहण्याबद्दल औरंगजेबाची आधीच ताकीदपत्रे गेली होती. डोंगरातील एक खिंड अशी नव्हती किंवा नदीचा एक उतार असा नव्हता की जेथे अकबराच्या स्वागताला मोंगल स्वार सज्ज होऊन बसले नव्हते. पण या सर्वांना मोठ्या शिताफीने चुकवून दुर्गादास डोंगरपूर बन्सवाडा मार्गाने दक्षिण माळव्यातून पुढे निसटला आणि ९ मे १६८१ रोजी अकबरपूरच्या उतारावर महेश्वर येथे त्याने नर्मदा ओलांडली व दक्षिणेत तो उतरला. येथूनच ११ मे रोजी संभाजीला अकबराने पत्र लिहिले व औरंगजेबाविरुद्ध लढण्यास त्याच्या मदतीची याचना केली.

पण रोमच्या इतिहासात कथा आहे त्याप्रमाणे– सिसरोने हद्दपार केलेल्या मार्सेलसला जे म्हटले होते, तेच औरंगजेबाच्या तावडीतून निसटलेल्या अकबराच्या बाबतीत खरे होते. "तू कोठेही असलास तरी लक्षात ठेव की सगळीकडे सारखाच तू सम्राटाच्या हातात आहेस." (Wherever you are, remember that you are equally within the power of the conqueror.) दक्षिणेत आला म्हणून अकबर सुरक्षित होता असे मुळीच नाही. औरंगजेबाचे हात फार लांब होते. दक्षिणचा सुभेदार खानजहान आणि बागलाणचा फौजदार या दोघांनाही अकबर येण्यापूर्वीच औरंगजेबाचे हुकूम येऊन पोचले होते की अकबर कोठेही जात असला तरी त्याची वाट अडवा; त्याला शक्यतो जिवंत पकडा किंवा मारून टाका. त्यामुळे खानजहान व बागलाणचा फौजदार देवीसिंग बुंदेला दोघेही अकबराला पकडण्यासाठी टपून बसले होते. पण दुर्गादासाने त्यांना शर्थीने चुकविले आणि १८ मे रोजी नाशिक जिल्ह्यात त्रिंबक येथे संभाजीच्या राज्यात प्रवेश केला. संभाजीकडून बाळाजी आवजी आणि बहिरजी भोसले हे अकबराच्या स्वागतासाठी आले होते. त्यांनी त्याला कोकणात पाली येथे १ जून रोजी नेले आणि १६ जानेवारीपासून साडेचार महिने अकबराचा चाललेला जीवघेणा पाठलाग केवळ दुर्गादासाच्या चातुर्यामुळे एकदाचा संपला. त्याने सुटकेचा निःश्वास सोडला.

खरे म्हणजे संभाजीला अकबराचे त्याच्या राज्यात येणे फारसे आवडले नाही. बोलून चालून तो शत्रूचा मुलगा, काय उद्देशाने तो आला हे कळणेही कठीण होते. पण संभाजीने त्याला सौजन्याने वागविले. संभाजीचा मुक्काम या वेळी पन्हाळ्यास होता. अकबर पालीस आल्यानंतर थोड्याच दिवसांत हिरोजी फर्जंद त्याला नजराणा घेऊन आला. त्यात एक हजार पागोडे, एक रत्नजडित हार, आणि हिंदी व इराणी पद्धतीच्या काही वस्तु होत्या. संभाजीने हिरोजीबरोबर त्याला देण्यासाठी एक पत्रही पाठविले होते. त्याच्या रक्षणासाठी तीनशे हशम संभाजीने त्याच्या छावणीभोवती ठेवले होते. अकबराबरोबर पाचशे लोक, व काही घोडे आणि उंट होते. या सर्वांच्या व्यवस्थेसाठी आसपासच्या सुभेदारांना धान्य वगैरे पुरविण्याचा हुकूम होता. अकबराला त्या बाबतीत एक पैचाही खर्च संभाजी पडू देत नव्हता. उलट दररोज साठ होन संभाजीने त्याच्या खर्चासाठी मंजूर केले होते.

पालीजवळ धोंडसे या गावी एक मोठे घर त्याला राहण्यास दिले होते. ते पद्धतीने शाकारलेले होते. आणि सभोवार कॅलिको कापडाचे पडदे आणि छत लावले होते. घरात बसायला साधी सतरंजी होती. ज्याचा सगळा जन्म बादशाही महालात आणि गुडघाभर रुजाम्यात वावरण्यात गेला, त्याला या कोकणी खोपटात कितपत समाधान वाटले असेल हा प्रश्नच आहे. पण त्याला काही इलाज

नव्हता. इंग्रजांनी वर्णन केले आहे की "अकबर उघड्यावरच बसत असे. तो मध्यम बांध्याचा आणि गोरापान होता." अकबराच्या वास्तव्यामुळे कोकणातले ते चिमुकले धोंडसे खेडे 'पादशहापूर' या नावाने प्रख्यात झाले.

संभाजी सौजन्यशील असला तरी सावध होता. बरेच दिवस त्याने अकबराची भेटच घेतली नाही. कारण, अकबराच्या मनात काय आहे व तो कितपत विश्वासपात्र आहे याचा त्याला छडा लावावयाचा होता. पालीला राहून अकबर सैन्य जमवू लागला तेव्हा संभाजीने त्याला सांगून पाठविले की, "तू लोक जमा करीत असशील तर दुसऱ्या मुलखात जा. नाही तर आहेस त्याच प्रकारे माझ्या मुलखात राहावे. जे लोक रुजू झाले असतील त्यांस मना करावे." अकबर बसून बसून नुसता कंटाळून गेला. बाहेर पडावे तर औरंगजेबाच्या तावडीत सापडावे लागणार, आणि न पडावे तर संभाजी काहीच करू देत नाही, अशी त्याची 'इकडे आड व तिकडे विहीर' अशी स्थिति झाली. पण योगायोगाने त्याच्या पुढचा पेच एकाएकी सुटला आणि संभाजीची त्याच्या विश्वासपात्रतेबद्दल पूर्ण खात्री पटली.

ज्या प्रसंगामुळे अकबराच्या समोरील तिढा सुटला, तो प्रसंग केवळ संभाजीच्याच जीवनात नव्हे, तर मराठ्यांच्या इतिहासातही मनस्वी खेदाचा म्हणावा लागेल. अकबराच्या दिमतीला अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी आणि हिरोजी फर्जंद हे प्रमुख लोक संभाजीने नेमले होते. या मंडळींनी सोयराबाईच्या सहकार्याने पुन्हा एकदा राजारामाला राज्य मिळवून देण्याचा कट केला. त्यांनी अकबराला स्वदस्तूरचा लेख लिहून दिला की, संभाजीला पदच्युत करण्यास अकबर मदत करीत असेल, तर राजारामाला राज्याचा लहान भाग देऊन अकबरास मोठा भाग देण्यास आपण तयार आहो. अकबराने या बाबतीत दुर्गादासाचा विचार घेतला. दुर्गादासाने अकबराला कटात सामील होण्यापासून परावृत्त तर केलेच, पण वर असेही सांगितले की, कदाचित् हे पत्र संभाजीनेच अकबराच्या इमानाची परीक्षा पाहण्यासाठी लिहविले असेल. त्यामुळे हे पत्र संभाजीच्या हवाली करून त्याला आपली कृतज्ञता व इमान दाखविणे हा उत्तम मार्ग होय. दुर्गादासाच्या सल्ल्याप्रमाणे ते पत्र अकबराने ताबडतोब संभाजीकडे पाठविले.

संभाजी या वेळी पन्हाळ्यास होता. यापूर्वीच ऑगस्ट १६८१ मध्ये त्याच्याविरुद्ध विषप्रयोगाचा कट झाला होता. त्याच्या जेवणात मत्स्यान्नात विष कालविले होते; ऐन वेळेला त्याच्या एका इमानी नोकराने त्याला ते अन्न खाण्यापासून मना केले. संभाजीने त्या अन्नापैकी काही भाग एका कुत्र्याला व एका नोकराला घातला. दोघेही थोड्याच वेळात मृत्यु पावले. या कटात सामील असल्यावरून सूर्याजी निकम, बापू माळी आणि सोमाजी नाईक बंकी यांस ठार मारण्यात आले. एका जिवावरच्या संकटातून संभाजी नुकताच बचावला असताना या दुसऱ्या कटाची

बातमी पुराव्यानिशी त्याला समजली. संभाजीने ताबडतोब सर्व कटवाल्यांना देहान्त प्रायश्चित्त देण्याचा हुकूम फर्माविला.

'जेधे शकावली' या अस्सल साधनांत या प्रसंगाचा उल्लेख करताना, "संभाजीराजे यांणी कविकलशाचे बोलें मागती अण्णाजी दत्तो सचिव याजवर इतराजी करून मार दिल्हा. त्या माराने राजश्री अनाजी पंत व बाळप्रभु व सोमाजो दत्तो व हिरोजो फर्जंद परळीखाले कैद करून मारले. कर्नाटकात शामजी नाईक यांस कैद करविले" असा उल्लेख आहे. त्यावरून या कटात सामील असल्याचा आरोप अण्णाजी दत्तो प्रभृतींवर करण्यात व त्यांना शासन करण्याची संभाजीस भर देण्यात कविकलशाचा महत्त्वाचा वाटा होता हे उघड दिसते. कविकलश आणि ही मंडळी यांच्यातील द्वेषाग्नि धुमसत होताच, व एकमेकांस पाण्यात पाहणाऱ्या या दोन पक्षांपैकी एकाचा कायमचा निकाल लागल्याशिवाय संभाजीच्या मंत्रिमंडळातील ही अंतर्गत दुफळी संपणार नव्हती हे स्पष्ट होते. कविकलश आणि बाळाजी आवजी यांचा द्वेष प्रसिद्ध होता. कविकलशाने बाळाजीचा द्वेष करणाऱ्या दादाजी प्रभू कारखानीस यास हाताशी धरले व मुलाला पुढे करून बाळाजीने फितव्याचे राजकारण बळावले अशा प्रकारचे विष त्याच्या मनात पेरण्याचा प्रयत्न केला. कैलासवासी महाराजांनी बाळाजी आवजीस वंशपरंपरा जी चिटणीशी दिली, ती दादाजीस देण्यास संभाजीने साफ नकार दिला, पण बाळाजीबद्दल त्याच्या मनात विकल्प आला. मुलाला मारणार त्या आधी आपणास मारावे असा बाळाजीने आग्रह धरला, तेव्हा दोघांसही मारावे लागेल असे संभाजी बोलला. तेव्हा तीच परवानगी समजून बाळाजी आवजीस, त्याचा मुलगा आणि भाऊ यांच्यासह कबजीने मारविले असे चिटणीस म्हणतो. बखरीतील ही कथा काय किंवा जेधे शकावलीतल्या 'कविकलशाच्या बोले' हे महत्त्वाचे शब्द काय, याचा विचार करता बाळाजी प्रभृति लोकांना मारण्यास कविकलश कारणीभूत झाला हा तर्क फारसा चूक ठरू नये. संभाजीला राज्य मिळू नये म्हणून जरी या मंडळींनी प्रथम कट केला होता तरी संभाजीने त्यांना क्षमा करून पूर्वीची पदे बहाल केली होती, इतकेच नव्हे तर अकबराच्या मनाचा ठाव काढण्यासाठी त्याची नेमणूक केली होती; म्हणजे त्याच्या कर्तृत्वावर त्याचा विश्वास होता हे उघड आहे. दादाजीला संभाजीने बाळाजीच्या मृत्यूनंतरही चिटणिशी दिली नाही, त्याचा मुलगा खंडोबल्लाळ याला दिली. पन्हाळ्याच्या विषप्रयोगाच्या कटात बाळाजीचे व त्याच्या मुलाचे नांव कविकलशाने गोवून दिले व अण्णाजी दत्तोने तर अकबराशी कटच केला होता. या कटाचा उल्लेख मनुचीने, व मुंबईकर इंग्रजांनीही केलेला असल्यामुळे त्याची सत्यता नाकारता येत नाही, पण त्याच बरोबर हेंही सांगणे जरूर आहे की, शिवाजीमहाराजांच्या तालमीत तयार झालेल्या या माणसांनी आपल्या राज्याचा मोठा भाग अकबराला देण्याचे संगनमत केले असेल यावर विश्वास बसत नाही.

त्यांच्या जीवनक्रमाशी ही कृति सुसंगत नाही. यात त्यांच्या निष्ठेचा अपमान आहे व त्यांना वर आणणाऱ्या महाराजांच्या गुणज्ञतेचा गौरव नाही. पुन्हा संभाजीला पदच्युत करण्यात त्याचा द्वेष किती होता, आणि तो ज्याच्या आहारी गेला होता त्या कविकलशाचा किती होता हाही प्रश्नच आहे, पण त्याचबरोबर राजारामाला राज्य मिळवून देण्यासाठी त्यांनी परत एकदा उचल केली असणे अशक्य नाही. तात्पर्य, या बाबतीत निर्णय करणे मोठे दुर्घट काम आहे. तीनशे वर्षांपूर्वीच्या घटनेबद्दल अस्सल पुराव्याचे चिठोरे सुद्धा समोर नसताना निर्णायक काही सांगणे कठिण आहे. शक्य असले तर जास्तीत जास्त जपून केलेले अनुमानच होय. या पलीकडे काही नाही.

असो. पन्हाळ्याहून संभाजी रायगडाकडे निघाला. तो प्रथम कुलाबा जिल्ह्यातील परळी गावाहून सुधागड किल्ल्यावर गेला. दुर्गादास आणि अकबर यांचा मुक्काम परळीस होता. तेथून ते जवळच औंढागावी गेले. तेथे मोगल आणि मराठी सैन्याचा तळ पडला होता. कविकलश दादाजीसह तेथे आला आणि त्या सैन्याला त्याने सुधागडकडे कूच करण्याचा हुकूम केला. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून द्वादशीपर्यंत हे सैन्य चालत होते. मागे तळावर कैद केलेल्या लोकांना कविकलशाने संभाजीचा हुकूम वाचून दाखविला, आणि चाबकाने पाठ फुटेपर्यंत झोडपून काढले. त्या वेळी कविकलशाला केवढा आसुरी आनंद झाला असेल बरे ! त्या माराने अण्णाजी दत्तो आधीच मृत्यु पावला. नंतर बाळाजी आवजी, त्याचा भाऊ शामजी आवजी, मुलगा आवजी बल्लाळ, अण्णाजी दत्तोचा भाऊ सोमाजी दत्तो, आणि हिरोजी फर्जंद यांना हत्तीच्या पायी बांधण्यात आले आणि त्यांची शरीरे छिन्नभिन्न करण्यात आली. हे भीषण हत्याकाण्ड भाद्रपदी पौर्णिमेच्या दिवशी करण्यात आले. त्या दिवशी १६ सप्टेंबर १६८१ ही इंग्रजी तारीख होती.

ते औंढा गाव अजूनही उभे आहे. ज्या पूर्वेकडच्या प्रचंड माळावर अंगावर काटा आणणारे हे हत्याकाण्ड घडले तो माळ अद्यापही आहे. आजही अंबा आणि उरमोडी नद्यांचा प्रवाह तसाच खळखळ करीत वाहत आहे. त्या वैराण आणि उदास माळावर वर वाटोळे असलेले दीड फूट उंचीचे तीन चौकोनी दगड, एकमेकांपासून थोड्या अंतरावर उभे आहेत. हत्तीच्या पायांसारखे इंग्रजी T हे अक्षर असलेले हे तीन दगड ह्याच अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी व हिरोजी फर्जंद या शिवछत्रपतींच्या एकनिष्ठ सेवकांच्या समाध्या होत. औंढागावचे लोक अजूनही या बाबतीत बऱ्याच दंतकथा सांगतात आणि दरवर्षी भाद्रपद पौर्णिमेला सचिवांची समाधि म्हणून मानलेल्या या भाग्यशाली प्रस्तरांना पंचारतीने ओवाळतात, व फूलमाळा चढवून गावकीचा नारळ देतात. महाराष्ट्रातल्या प्रत्येक दगडाला इतिहास आहे, पण इतका करुण आणि खेदकारक इतिहास असणारे दगड फार क्वचित्.

या घटनेचे परिणाम संभाजीच्या जीवनावर फार दूरगामी झाले. त्याला मारणारे मेले आणि तो जिवंत राहिला हे खरे, पण त्याने मारलेली माणसे आपल्याबरोबर त्याचा लौकिकही घेऊन गेली. कारण संभाजीने मारलेली माणसे काही सामान्य नव्हती. ज्याला खुद्द शिवाजी महाराजांनी सचिवपदासारखे जबाबदारीचे पद बहाल केले होते, ज्याने महाराजांच्या कारकीर्दीत दक्षिण कोकणचा विस्तृत सुभा सांभाळण्याइतके कर्तृत्व दाखविले, आणि आग्र्याला जाताना मागे राज्याचा भार निश्चिंतपणे सोपवून जाण्याइतका ज्याच्या चातुर्यावर महाराजांचा इतबार होता, त्या अण्णाजी दत्तोला हत्तीच्या पायाखाली तुडविले जावे, हे केवळ त्याचेच नव्हे, तर संभाजीचेही दारुण दुर्दैव म्हटले पाहिजे. त्याचप्रमाणे बाळाजी आवजीच्या योग्यतेमुळे महाराजांनी त्याला तर वंशपरंपरा मराठी राज्याची चिटणिशी दिलीच, पण त्याच्या ज्ञातिबांधवांनाही समस्त गडकोटांची चिटणिशी बहाल केली. तो त्यांचा परराष्ट्रमंत्री होता, इतकेच नव्हे तर महाराजांचा बहिश्चर प्राण होता, एवढी त्याच्यावर महाराजांची कृपा होती आणि आग्र्याच्या सुटकेच्या महाराजांच्या रोमांचकारी कहाणीचे स्मरण जोपर्यंत राहील तोपर्यंत हिरोजी फर्जंदाच्या नावाला मरण नाही. त्याच्या कामगिरीबद्दल महाराजांनी त्याला पालखी आणि अब्दागिरीचा मान दिला होता, इतकेच नव्हे तर संभाजीवर देखरेख ठेवण्यासाठी पन्हाळ्यावर आपल्या विश्वासाची माणसे नेमली होती, त्यात त्याचा अंतर्भाव करून त्याच्यावरील विश्वासाची ग्वाहीच दिली होती· या माणसांत दोष नव्हते असे नाही. पण दोषापेक्षा गुण मोठे होते. आणि गुणज्ञ शिवछत्रपतींनी मोठ्या साक्षेपाने आणि मोठ्या मायेने जोडलेल्या या नररत्नांची संभाजीने, छत्रपतींच्या मृत्यूनंतर अवघ्या एका वर्षात, कविकलशाच्या आहारी जाऊन वाट लावली होती. अशी माणसे वारंवार होत नसतात. कारण माणसे म्हणजे कणसे नव्हेत की दरवर्षी नवी येतील. त्यामुळे शक्यता नाकारता येत नाही की या वेळी उभ्या महाराष्ट्रात संभाजीबद्दल आणि विशेषत: त्याला या दुष्कर्मास प्रवृत्त करणाऱ्या कविकलशाबद्दल तिरस्काराची लाट उसळली असावी. 'कविकलश हा तर कबजी कलुषा या नावाने कुप्रसिद्ध झालाच .

संभाजीच्या काळच्या नि:स्पृह हितचिंतकांचाही अभिप्राय असाच होता की संभाजीच्या या कृत्यात सारासार विवेक नव्हता. तो उग्र प्रकृतीचा अनावर आविष्कार होता, त्याचे शासन केवळ कठोरच नव्हे तर क्रूर होते. बाळाजीच्या मृत्यूनंतर येसूबाईने संभाजीचा कडक शब्दात निषेध केला· "बाळाजी प्रभू मारिले हे उचित न केले. बहुत दिवसांचे इतबारी व पोख्त थोरले महाराज कृपाळू त्यांचे सर्व अंतरंग त्यांजपाशी होते. चिटणीस आपले व राज्याचे प्राण ऐसे म्हणत आले. वंशपरंपरेने चिटणिशी देऊन पत्र शपथपूर्वक त्यास दिले ते माहीत असोन, त्यांणी

अपराधही काही केला नाही. – – – लहानाचे सांगण्यावर ही गोष्ट कशी केली ? सर्व कारकून गेले, मारिले, बेदील जाहले, अन्यायीही जाहले, एकएक होते, तेही ऐसे केले, पुढे राज्य कसे चालेल ? " असे येसूबाई बोलली तेव्हा संभाजी निरुत्तर झाला. काही बोलला नाही.

तंजावरचा सुभेदार रघुनाथ नारायण हणमंते, याला महाराज प्रत्यक्ष वडिलांचे ठायी मानीत असत. त्यालाही संभाजीने प्रारंभी कैद केले. पुढे सुटका झाल्यावर चाळीस लाखांचा नजराणा घेऊन तो संभाजीच्या भेटीस आला. संभाजीची भीति इतरांस; रघुनाथपंत ऐंशी वर्षांचा म्हातारा, शहाजी राजांपासून भोसल्यांचा ऋणानुबंधी, व्यंकोजीचा कारभारी, शिवाजी महाराजांचा विश्वासू ज्येष्ठ सहकारी, त्याला संभाजीची भीड कसली ? त्याने सरदारांच्या भर मजालशीत संभाजीस खडसावून विचारले, " राज्य दिवसेंदिवस वृद्धी व्हावी, ते कमीच होत चालले याचे कारण काय ? हबशी वगैरे पुंड पाळेगार बळावत चालले हे काय ? लोक बेदील, कित्येक ब्राह्मण वगैरे सरदार लोक हे अन्यायी, तरी त्यास किल्ल्यात ठेवून मारावे, ते शिरच्छेद करून कर्ते मारिले. असो. पुढे सबळ शत्रु औरंगजेब येऊन भिडला आहे याचा विचार काय केला आहे ? महाराज कैलासवासी होऊन बहूत दिवस जाहले नाहीत तो प्रांत उजाड झाले व पाळेगार बळाविले. महाराज काही घेऊन गेले नाहीत." पंतांचे परखड बोलणे संभाजीला बिलकूल आवडले नाही. पण बोलणार काय ? मनात उसळणारा राग कसाबसा आवरून संभाजीने इतकेच उत्तर केले **की**, " राज्याचा खर्च वाढला आहे. " रघुनाथपंत आणि येसूबाई यांच्याप्रमाणेच मराठी राज्याच्या उदयापासून आतापर्यंत त्याच्यावर जिव्हाळ्याने लक्ष ठेवणाऱ्या समर्थ रामदासांना सुद्धा संभाजीच्या या वर्तनाने मनस्वी उद्वेग वाटला. अण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी हे त्यांना राजद्रोही व राष्ट्रद्रोही वाटले नाहीत; इतका काळ स्वराज्यासाठी चंदनाप्रमाणे झिजलेल्या या माणसांची नियत महाराजांच्या मृत्यूनंतर शत्रूशी संगनमत करण्याइतकी बिघडेल असे त्यांना वाटले नाही. या बंडखोरांचे पारिपत्य केल्याबद्दल संभाजीला त्यांनी धन्यवाद दिले नाहीत. उलट, संभाजीच्या या उग्र आणि प्रलयंकर प्रवृत्तीमुळे राज्याला धोका आहे अशी चिंता वाटून त्यांनी त्याला " काही उग्रस्थिति सोडावी । काही सौम्यता धरावी " असा हितोपदेश मोठ्या कळकळीने केला. फार काय सांगावे, स्वतः संभाजीलाही आपण केले हे बरे केले नाही अशी टोचणी लागली होती. येसूबाईने त्याची बाळाजी आवजी ठार मारल्याबद्दल जेव्हा कानउघाडणी केली, तेव्हा त्याने कबूल केले की, 'आमचेही मनात ही गोष्ट नव्हती. पण रागाचे समयी बोललो तितक्यावर परवानगी सांगून जाले ते वाईट वाटून उठून आलो. वाईट गोष्ट झाली खरी. "तुम्ही त्याचे धाकटे

पुत्र दोघे आहेत ते खाजगीकडे ठेवून त्यांचा बंदोबस्त दरमहा देऊन चालवावा." त्याप्रमाणे येसूबाईने खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ यांचा प्रतिपाळ केला हे प्रसिद्धच आहे. कारण, संभाजी रागीट असला तरी वृत्तीने प्रेमळ व उदार होता आणि त्याचे अंतःकरण स्फटिकासारखे निर्मळ होते. त्याचमुळे क्रोधाचा आवेग जितका अनावर, तितकाच पश्चात्तापाचा उमाळाही उत्कट होता.

सप्टेंबर १६८१ मध्ये धडाडलेल्या या संहारसत्रात ऑक्टोबरात सोयराबाई-चीही आहुति पडली. विषप्राशनाने तिचा मृत्यु झाला. तिने विष घेतले असेल किंवा तिला घ्यावयास लावले असेल. अशा प्रकारे संभाजी राज्यावर येऊन एक वर्ष होते न होते तोंच सोयराबाई, अणाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद प्रभृति सारी शिवाजी महाराजांच्या प्रभावळीतील नामांकित मंडळी नामशेष झाली. ज्याला राज्य मिळवून देण्यासाठी कट केल्याचा या लोकांवर आरोप होता, त्या राजारामाला मात्र, सावत्र भाऊ आणि राज्याचा दायाद असूनही संभाजीने कसलाही धक्का लावला नाही, याबद्दल त्याच्या अंतःकरणाच्या औदार्याची प्रशंसा करावी तेवढी थोडीच.

या प्रसंगाचा संभाजीच्या मनावर फार खोल परिणाम झाला. पहिल्या-पासून हे लोक त्याच्याविरुद्ध होते, पण त्यांना त्याने औदार्याने क्षमा करून पूर्वीची प्रतिष्ठा व पदे दिली होती. त्या चांगुलपणाचा गैरफायदा घेऊन त्यांनी त्याच्याविरुद्ध परत प्राण घेण्यापर्यंत कट रचण्याचा विश्वासघात केल्यामुळे तो फार बिथरून गेला. यापुढे त्याला कोणाचा विश्वास वाटेना. संशयाने झपाटलेल्या त्याच्या मनाला जेथे तेथे शत्रूंचा आभास होऊ लागला; आणि या प्राणसंकटांतून सोडविणारा कविकलश हा त्याचा कंठमणि होऊन बसला. आजपर्यंत संभाजी एकाकीच होता. कविकलशही मंत्रिमंडळात एकटाच होता. यापुढे दोघांनाही एकमेकांशिवाय तिसरा आसरा राहिला नाही.

परंतु, वाईटातून चांगले निघते, या न्यायाने स्वजनांच्या संहार घडविणाऱ्या या दुर्घटनेतून ही चांगली गोष्ट निष्पन्न झाली की, या कटाची बातमी देणाऱ्या अकबराच्या प्रामाणिकपणाबद्दल संभाजीला शंका उरली नाही. अकबरावर तो अतिशय प्रसन्न झाला, आणि पावसाळा संपल्यानंतर रविवार कार्तिक शुद्ध त्रयोदशी दिनांक १३ नोव्हेंबर १६८१ रोजी संभाजीने पालीजवळ पादशहापूर येथे अकब-राची मोठ्या समारंभाने भेट घेतली. सेनासमुदाय, लष्कर आणि हशम देखील समागमे होते. उभयतांनी एकमेकांचा मोठा सन्मान केला. संभाजीने अकबरास केलेल्या साहाय्याबद्दल त्याने कृतज्ञता दाखविली व आपल्या सैन्यासह त्याच्या-बरोबर बऱ्हाणपूरपर्यंत जाऊन त्याच्या राज्यपदप्राप्तीच्या राजकारणात मदत देण्याचे आश्वासन दिले. अशा प्रकारे उत्तरेचा शहाजादा आणि दक्षिणेचा छत्रपति यांची अतर्क्य विधिघटनेने युति घडून आली.

......

होय, अतर्क्य विधिघटनेनेच म्हणावयाचे. संभाजी आणि अकबर यांचे ऋणानुबंध काही विलक्षण दिसतात. दोघांचाही जन्म १६५७ साली झाला. दोघांच्याही माता त्यांच्या लहानपणीच वारल्या. दोघेही आपल्या वडिलांचे लाडके होते. दोघांनीही बापाविरुद्ध बंड पुकारले. संभाजी शिवाजी महाराजांविरुद्ध बंड करून मोंगलास मिळाला आणि अकबर औरंगजेबाविरुद्ध मराठ्यांस सामील झाला. इतकेच नव्हे तर ज्या दिवशी संभाजीला राज्याभिषेक झाला त्याच दिवशी म्हणजे रविवार १६ जानेवारी १६८१ रोजी अजमीरच्या रणांगणावरून त्याने पळ काढला. उभयतांच्या जीवितातील हा चमत्कारिक योगायोग एवढ्यावरच थांबला नाही. ज्या दिवशी पादशहापूर येथे अकबर आणि संभाजी यांची ऐतिहासिक भेट झाली त्याच दिवशी म्हणजे रविवार कार्तिक शुद्ध त्रयोदशी १३ नोव्हेंबर १६८१ रोजी त्या दोघांचा समाचार घेण्यासाठी अजमीरहून चतुरंग दलासह निघालेला औरंगजेब बऱ्हाणपूरला दख्खनच्या दरवाजावर येऊन थडकला. हे सर्व पाहिले म्हणजे आंकडे जणू कट केल्यासारखे संगनमताने वागतात, Fate loves to play with figures (नियति आकड्यांशी खेळत असते) असे म्हणतात ते खरे वाटू लागते.

८

औरंगजेब या वेळी दक्षिणेत आला तो काही प्रथमच नव्हे. यापूर्वी शहाजादा असताना दोन वेळा तो दक्षिणचा सुभेदार म्हणून येथे येऊन गेला होता. दक्षिण देश जिंकण्याची, आणि काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंन्त अखंड आणि एकछत्री मोगल साम्राज्याची ध्वजा फडकवीत ठवण्याची महत्त्वाकांक्षा तेव्हापासून त्याच्या अंतःकरणात मूळ धरून राहिली होती. अर्थात् वेळोवेळी अपरिहार्य अडचणी आल्यामुळे त्याचे मनोरथ आजपर्यन्त सफल होऊ शकले नव्हते हा भाग निराळा! पहिल्या खेपेला आला, तेव्हा तो अवघ्या अठरा वर्षांचा होता. त्या वेळी त्याने बागलाण, औसा आणि उदगीर इत्यादि काही प्रदेश जिंकला आणि शहाजीचा चुलत भाऊ खेळोजी भोसले याचा पाडाव केला. मलिकंबराने वसविलेल्या खडकी शहराचा जीर्णोद्धार करून आपल्या नावाने 'औरंगाबाद' म्हणून याच वेळी त्याने त्या शहराला मोगलांच्या दक्षिणेतील राजधानीचे वैभव प्राप्त करून दिले. दुसऱ्या वेळी १६५३ ते १६५७ ही चार वर्षे तो दक्षिणेत होता. या वेळी विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही ही शियापंथी राज्ये नेस्तनाबूद करून दिल्लीच्या मोगल साम्राज्याला जोडण्याच्या अगदी बेतात त्याने आणिली होती. पण ऐन वेळेला या राज्यकर्त्यांच्या दिल्ली-दरबारातील कारस्थानांमुळे आणि औरंगजेबाचा मोठा भाऊ दारा याने बादशहाला दिलेल्या चिथावणीमुळे शहाजहानने तडकाफडकी युद्ध थांबवून तह करण्याचा हुकूम औरंगजेबास सोडला. त्यामुळे चडफडत का होईना, गोवळकोंड्याकडून मीर जुमला हा समर्थ वजीर आणि विजापूरकडून कल्याणी, परिंडा आणि बिदर हे किल्ले व एक कोटी रुपये युद्धखर्च एवढ्यावर त्याला समाधान मानावे लागले. या खेपेस नुकतेच डोके वर काढू लागलेल्या शिवाजी महाराजांच्या हालचाली औरंगजेबाच्या काकदृष्टीतून सुटलेल्या नव्हत्या. महाराजांनी एकीकडे त्याच्याशी विजापूरकरांविरुद्ध संगनमताचे बोलणे चालू ठेवले आणि दुसरीकडे जुन्नर शहरावर छापा घालून तीन लाखांची लूट केली, व अहमदनगरपर्यंत मोगलांच्या हद्दीत धुमाकूळ उडवून दिला. औरंगजेबाने नस्त्रतखान यास मराठ्यांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी रवाना केले. पण एवढ्यात पावसाळा सुरू झाला व दिल्लीस शहाजहान एकाएकी आजारी पडल्यामुळे वारसाहक्काचे युद्धही उपस्थित झाले. त्यामुळे महाराजांशी मिळते घेऊन औरंगजेबाने उत्तरेकडे प्रयाण केले. पण त्याही वेळी विजापूरच्या आदिलशहाला शिवाजी महाराजांपासून सावध राहण्याबद्दल बजावण्यास तो विसरला नाही. "तो कुत्रा संधीची वाट पाहात आहे. यावर लक्ष असू द्या" असे त्याचे वैशिष्ट्यपूर्ण शब्द होते.

तीन भाऊ आणि बाप यांची वाट लावून राज्यावर आल्यावर औरंगजेबाने शाइस्तेखानाच्या हाताखाली जय्यत फौज देऊन त्याला शिवाजीमहाराजांवर पाठविले, पण महाराजांनी त्याच्यावर छापा घालून त्याची बोटे तोडली, आणि त्याला पळता भुई थोडी केली, इतकेच नव्हे, तर गरुडाप्रमाणे सुरतेवर झडप घालून चार दिवस तेथे मनसोक्त जाळपोळ व लुटालूट करून सुरतेचा व्यापार, सुरतेचे वैभव व औरंगजेबाची प्रतिष्ठा यांची एकाच जबर तडाख्यात राखरांगोळी केली तेव्हा औरंगजेबाने राजनीति व दण्डनीति या दोहोंत अद्वितीय असलेल्या मिर्झाराजे जयसिंग यांना दिलेरखानासह महाराजांवर पाठविले. त्यांनी महाराजांना शरणागति पतकरावयास लाविली. पस्तीसपैकी तेवीस किल्ले व चार लाखांचा मुलूख द्यावयास लाविला, व औरंगजेबाचा ताबेदार म्हणून आग्र्यास त्याच्या भेटीस येण्यास भाग पाडले. हा दोघांच्या जीवनातील पहिला व शेवटचा प्रसंग की ज्या वेळी उत्तरेच्या दिल्लीपतीची दक्षिणच्या मराठा स्वातंत्र्यवीराशी समोरासमोर नजरानजर झाली. आग्र्याच्या या भेटीत औरंगजेबाचा महाराजांना ठार मारण्याचा बेत त्यांच्या बुद्धिचातुर्यामुळे सपशेल धुळीला मिळाला. ते सुखरूप दक्षिणेत जाऊन पोचले याबद्दल औरंगजेबाचा पराकाष्ठेचा जळफळाट झाला, पण इलाज नव्हता. पक्षी पिंजऱ्यातून उडाला होता.

काही काळ औरंगजेबाशी सलोख्याचे धोरण ठेवून महाराजांनी आपले राज्य स्थिरस्थावर केले आणि नंतर परत एकामागून एक गेलेले किल्ले परत घेण्यास प्रारंभ केला. त्यांनी रामनगर व जव्हार घेतले, कारंजा लुटले, सुरतेवर पुन्हा छापा घालून दीड कोटीची लूट केली. त्यांनी त्रिंबक, पट्टा, नासिक काबीज करून वऱ्हाड लुटले, त्यांच्यावर जो सरदार पाठवावा, तो अपयश घेऊन परत येऊ लागला. वणी–दिंडोरीच्या लढाईत त्यांनी दाऊदखान कुरेशी याचा फडशा पाडला. बागलाणात साल्हेरच्या घनघोर लढाईत प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे, यांनी एखलासखान आणि दिलेरखान यांचा पराजय केला. "शिवाजीची चिंता बादशहाच्या उरी सोसवेना." स्वतः सैन्य घेऊन जावे तर अफझलखान, शाइस्तेखान यांची दशा काय झाली हे मनात येऊन धीर होईना.शिवाजी म्हणजे औरंगजेबाला मोठा हृद्रोग होऊन बसला. त्यातच आजपर्यन्तच्या पराक्रमावर कळस चढवून, 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना करून १६७४ जूनमध्ये जेव्हा सिंहासनाधीश्वर म्हणून छत्र मस्तकी धारण करून महाराजांनी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला, तेव्हा तर औरंगजेबाच्या दुःखास पारावार राहिला नाही. "तख्तावरून उतरून अंतःपुरात गेले आणि दोन्ही हात भुईस घासून, आपले देवाचे नाव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्नउदक घेतले नाही आणि बोलिले की, खुदाने मुसलमानांची पादशाही दूर करून, तख्त बडवून मराठियास तख्त दिले. आता हद्द जाली!"

औरंगजेब दक्षिणेत सुभेदार असताना 'इवलेसे रोप' असलेल्या मराठ्यांच्या राष्ट्राचा हा वेल आता 'गगनावर' गेला होता. उत्तर आणि दक्षिण यांच्यावर एकछत्री मोगल साम्राज्याचा अंमल करण्याच्या औरंगजेबाच्या मनोरथात खरा अडथळा एवढा एकच होता. दक्षिणेतील गोवळकोंडा आणि विजापूर या शेवटची घरघर लागलेल्या जुनाट बादशाहयांना तो मुळी मोजतच नव्हता. पण नव्या जोमाने दिवसामासांनी तरारून वाढणाऱ्या या मराठी राष्ट्रापुढे त्याचा काही इलाज चालत नव्हता. त्याला सर्व धोका दिसत होता, कळत होता, पण उपाय चालत नव्हता. महाराजांच्या प्रतापापुढे, साक्षेपापुढे, चातुर्यापुढे त्याने हात टेकले होते. महाराजांना तो अत्यंत भीत असे, त्यामुळे ते जिवंत असे-पर्यंत दक्षिणेवर चालून येण्याची त्याची छाती झाली नाही. शिवाजीमहाराज मृत्यु पावले तेव्हा औरंगजेब अजमीरला राजपुतांशी लढण्यात गुंतला होता. महा-राजांच्या मृत्यूची बातमी ऐकून तो आनंदाने बेहोष झाला की, आजपर्यंत आपल्या सैन्याचे रथ आणि आपल्या अंतःकरणाचे मनोरथ जिच्यावर टकरा घेऊन हताश होऊन परत फिरत होते, ती शिवाजी महाराजांच्या रूपाने साक्षात् उभी असलेली, उत्तर आणि दक्षिण यांच्यामधली प्रचंड तटबंदी कोसळून पडली, त्याच्या मनावरचे दडपण एकदम नाहीसे झाले. आणि त्यामुळेच की काय, आपल्या या महाशत्रूबद्दल त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले ते केवळ निर्भेळ प्रशंसेचे – " शिवाजी हा फार मोठा सेनापति होऊन गेला. नवीन स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचे सामर्थ्य त्याच्यातच होते. हिंदुस्थानातील जुन्या सत्ता मोडून टाकण्याचे माझे प्रयत्न सारखे चालले आहेत. सतत एकोणीस वर्षं माझे सैन्य त्याच्याशी लढा देत असूनही त्याचे राज्य वाढतच आहे." तो या प्रसंगी असेही म्हणाला की "आपल्या हातात पडलेल्या शत्रूच्या स्त्रियांच्या अब्रूची कदर करणारा एक महावीर मरण पावला." औरंगजेबाच्या दरबारात असलेल्या पोर्तुगीज वकिलाने औरंगजेबाचे हे शब्द लिहून ठेविले आहेत. "Morreo Oum grande capiteao que senpre raspeitom a houra das Mulheres Cativas." औरंगजेबाने शिवाजी महाराजांच्या जीवनाचे केलेले हे मूल्यमापन इतके यथार्थ आहे की आपल्या मरणानंतरही आपल्या परम द्वेष्ट्या शत्रूच्या तोंडून अशी मानवंदना वदविणाऱ्या महाराजांचे जीवित खरोखरच धन्य आणि सफळ झाले असेच म्हटले पाहिजे.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूमुळे आपला दक्षिण दिग्विजयाच्या मार्ग निर्विघ्न झाला असे औरंगजेबाला वाटले. त्यांचा पराक्रम आणि चातुर्य त्यांच्या मागून येणाऱ्या त्यांच्या वारसात असेल अशी त्याची अपेक्षा मुळीच नव्हती. परंतु पाचसहा महि-न्यांच्या काळातच खाली सोलापूरपासून वर बुऱ्हाणपूरपर्यंत संभाजीने धामधूम उडविल्याच्या बातम्या त्याच्या कानावर येऊन तो अस्वस्थ झाला. विशेषतः संभाजीने

औरंगाबादवर हल्ला चढविला आणि बऱ्हाणपूरचा विध्वंस केला यामुळे तर तो विशेष दुखावला गेला. या बाबतींत खाफीखान म्हणतो तें काहीसे योग्य वाटते. " संभाजीच्या बापाने प्रसिद्ध परगणे व सरकारी वाडे यांवर छापे घालून लुटण्याची कधी कमतरता केली नव्हती. परंतु बादशहाची वंशपरंपरागत दख्खनची राजधानी जे बुऱ्हाणपूर व औरंगाबाद यावर कधीही घाला घातला नव्हता; उलट त्याला कोणी मंत्र्यांनी या शहरावर हल्ला करण्याचा सल्ला दिला तर त्यांना शहाणपणाने व दूरदर्शित्वाने तसे करू देत नसे. तो त्यास सांगे की या शहरांवर हल्ला चढविला तर औरंगजेब आपली मानहानि झाली म्हणून खासच चालून येईल आणि मग त्या भांडणाचे काय परिणाम होतील ते देव जाणे! औरंगाबाद आणि बुऱ्हाणपूर या शहरांबद्दल औरंगजेबाला एक विशेष महत्त्व वाटत असे. औरंगाबादचा जीर्णोद्धार त्याने स्वतःच केला होता. त्या शहराला स्वतःचे नाव दिले होते, तेथे आलमगिरी महाल म्हणून त्याचा राजवाडा होता; याहीपेक्षा त्याची सर्वांत मोठी बेगम दिलरास बानू ऊर्फ रबिया–उद–दुराणी हिचे निधन औरंगाबादला तो सुभेदार असताना झाले होते. तिच्या स्मरणार्थ पुढे दक्षिणचा ताजमहाल म्हणून विख्यात झालेली बिबी का मकबरा ही रमणीय इमारत त्याने तेथेच बांधविली होती. त्यामुळे केवळ मोगल साम्राज्याची प्रतिष्ठाच नव्हे, तर खुद्द औरंगजेबाचे वैयक्तिक जीवनही औरंगाबादशी निगडित झाले होते.

पण त्याहीपेक्षा बुऱ्हाणपूर म्हणजे औरंगजेबाच्या मर्मबंधांतली ठेव होती. पन्नास वर्षांपूर्वी ७ जून १६३१ रोजी येथेच औरंगजेबाची आई मुमताज महल हिचा प्रसूतिवेदनांनी देहान्त झाला होता. तिच्या मृत्यूनंतर सहा महिने येथल्याच जैनाबाद बागेत तिचे शव पुरले होते आणि नंतर येथल्याच उत्तरेकडील दरवाजातून ते आग्र्यास ताजमहालमध्ये नेण्यात आले होते. औरंगजेबाची धाकटी भावजय शाहशुजाची बेगम येथेच मृत्यु पावली होती व येथेच चिर विश्रांति घेत होती. रोशन आरा आणि गौहर आरा या औरंगजेबाच्या दोन्ही बहिणी येथेच जन्मल्या होत्या. आज्जम व मोअज्जम या औरंगजेबाच्या दोन्ही मुलांचे जन्म येथेच झाले होते. अशा प्रकारे त्याच्या कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे जन्म आणि मृत्यू या घटना बुऱ्हाणपूरशी कायमच्या संलग्न झाल्या होत्या. एवढेच नव्हे तर औरंगजेबाच्या कर्मठ आणि कठोर जीवनात प्रणयाचे एकुलते एक – पहिले आणि शेवटचे – फूल उमलले ते येथेच.

औरंगजेब त्या वेळी पसतीस वर्षांचा होता. दक्षिणचा सुभेदार म्हणून औरंगाबादेस जात असताना वाटेत बुऱ्हाणपूर येथे मावशीकडे व तिचा नवरा, बुऱ्हाणपूरचा सुभेदार मीरखलील याच्याकडे पाहुणा म्हणून १६५३ च्या जानेवारीत तो उतरला असताना, त्याची दासी हिराबाई हिला त्याने प्रथम पाहिले. हिराबाई ही गायनात आणि लावण्यात केवळ अद्वितीय होती. तिच्या पहिल्याच दर्शनात औरंगजेबाचे चित्त तिने आकृष्ट करून घेतले. इतके की, शहाजहानने दक्षिणेस

कामावर रुजू होण्याचे हुकुमावर हुकूम पाठविले तरी औरंगजेब बुऱ्हाणपूरलाच नऊ महिने हिराबाईच्या सहवासात रेंगाळत राहिला. फार काय सांगावे, त्याच्या आर्जवांना आणि विनवण्यांना भीक न घालता हिराबाईने पुढे केलेल्या मदिरेच्या चषकात आपली कट्टर धर्मनिष्ठा बुडवून टाकण्यासही तो तयार झाला होता. कारण, औरंगजेब कडवा मुसलमान होता आणि मदिरापान हे इस्लामला सर्वथा निषिद्ध असल्यामुळे त्याने उभ्या आयुष्यात दारूची चवही चाखली नव्हती. पण हिराबाईपुढे त्याचा नाइलाज झाला. अर्थात् दारूचा पेला त्याने तोंडाला लावण्यापूर्वीच, " मी केवळ तुमच्या प्रेमाची परीक्षा पाहिली; तुम्हांला दारू पिण्याच्या पापाचे धनी मला करावयाचे नव्हते," असे म्हणून हिराबाईने त्याला त्या धर्मसंकटातून सोडविले ही गोष्ट वेगळी. पण सारा सारासार विवेक विसरण्याइतका औरंगजेब हिराबाईच्या संगतीत स्वतःला हरवून बसला होता.

हिराबाईचा सहवास औरंगजेबाला फार काळ लाभला नाही. तिच्या तारुण्याला आणि सौंदर्याला फार लवकर काळाची दृष्ट लागली. औरंगजेबाने त्या रमणीच्या रमणीय देहाला औरंगाबादजवळच्या एका मोठ्या तलावाशेजारी अखेरची मूठमाती दिली. तिच्या मृत्यूने त्याला पराकाष्ठेचे दुःख झाले. त्या दिवशी तो शिकारीला जाण्यास निघाला आणि म्हणाला, "घरी बसून रुदन केल्याने मनाचे समाधान होत नाही. मनसोक्त रुदन विस्तीर्ण वनातच शक्य आहे."

"ना लाहाये रवानगी दिलरा
तसल्ली बख्श नीस्त
दर बियाबां मी तुषां
फर्याद खातिरख्वाह कर्द।"

औरंगजेबाच्या जीवनातले हे अद्वितीय पर्व होते. ते त्याचे पहिले आणि शेवटचे प्रेमप्रकरण होते. त्या वैराण वाळवंटात तो नाजूक फुलांचा ताटवा एकदाच फुलला. परत त्याला बहर आला नाही. औरंगजेबाने नंतर अनेक लग्ने केली. पण एक तर "त्या राजकीय सोयरिकी होत्या किंवा वंशसातत्यापलीकडे त्यांत अन्य हेतु नव्हता." प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः –(वंशाचा तंतु तोडू नकोस.) त्या संबंधांत औरंगजेबाचे चित्त कधीच नव्हते. उदेपुरीवर त्याचे बरेच प्रेम होते–अगदी तिच्या दारुडेपणाकडे दुर्लक्ष करण्याइतके होते. पण हिराबाईवरील प्रेमाची सर त्याला आली नाही. त्याचे उरलेले आयुष्य म्हणजे रस, रंग, रूप यांचा संन्यास केलेले विरक्त धर्मजीवन होते. त्याच्या चरित्रकाराने म्हटल्याप्रमाणे तेथे कामिनीही नव्हती आणि कविताही नव्हती. 'गजाल' ही नव्हती आणि 'गजल'ही नव्हता. " न चश्म सूये गजाल ब न गोश सूये गजल !"

ज्या ठिकाणी हिराबाईबरोबर नऊ महिने औरंगजेबाने स्वर्गसुखात घालविले ती 'आहूखाना' बाग अद्यापि आहे. बाग–ए–आलम आरा' किंवा 'बाग–ए–जैना-

बाद म्हणूनही ती ओळखली जाते. नव्हे, हिराबाईलाच 'जैनाबादी महल' असे दुसरे नाव होते. अशा प्रकारे बुऱ्हाणपूरच्या मातीत औरंगजेबाच्या जीविताचे नाजूक धागे गुंतले होते. त्या बुऱ्हाणपुरावर झडप घालून बेफाम हत्तीने जाईजुईचे ताटवे पायदळी तुडवावेत त्याप्रमाणे संभाजीने जाळ-पोळीचा कहर उडविलेला ऐकून औरंगजेब दुःखाने केवळ विव्हळ झाला यात नवल नाही. दक्षिणचा सुभेदार खानजहान याने कुचराई केली म्हणून तो त्याच्यावर अतिशय चिडला. त्याला मन्सबीची वाढ झाली होती. ती त्याने वहिवाटीविरुद्ध नामंजूर केली. आपल्या खास खजिन्यातून दहा हजार रुपये खैरात म्हणून मुहम्मद अश्रफ याच्या हवाली करून त्याने त्याला फर्माविले की बुऱ्हाणपूरच्या लोकांपैकी ज्यांची मालमत्ता संभाजीने लुटली असेल त्यांना जाऊन वाटावे. बुऱ्हाणपूरचे प्रतिष्ठित नागरिक व मौलवी यांनी त्याच्याकडे अर्ज पाठविला की काफराचा जोर झाला. आमची अब्रू आणि संपत्ति नष्ट झाली. यापुढे शुक्रवारची नमाज बंद पडेल. यावर औरंगजेबाने संतापून खानजहानला लिहिले की "दक्षिणच्या काफराचा बीमोड करण्यासाठी मी स्वतः येत आहे."

पण त्या वेळी राजपूत युद्धात गुंतला असल्यामुळे औरंगजेब तडकाफडकी दक्षिणेकडे निघू शकला नाही. परंतु एवढ्यात अकबराने त्याच्याविरुद्ध बंड केले. पण त्यात त्याचा पराजय होऊन तो दक्षिणेत संभाजीकडे पळाला. अकबराला पकडण्यासाठी औरंगजेबाने जंगजंग पछाडले. त्याने सैन्य पाठविले, जागोजागच्या ठाणेदारांना त्यास जिवंत पकडावे, न जमल्यास ठार मारावे असे कडक हुकूम पाठविले. त्याचप्रमाणे त्याचे मन वळून त्याने परत यावे म्हणून त्याच्याकडे विश्वासू माणसे पाठविली, पैसे पाठविले इतकेच नव्हे तर त्याची संशयनिवृत्ति होऊन त्याला विश्वास वाटावा या उद्देशाने गोड शब्दांनी भरलेली पत्रे स्वतः लिहिली. या पत्रात त्याच्या वेडेपणाने स्वतःवर ओढवून घेतलेल्या दुःखाबद्दल अनुकंपा होती. बेइमान राजपुतांवर विश्वासून आपली बायकापोरेसुद्धा त्यांच्यावर सोपविण्याच्या भोळेपणाबद्दल निषेध होता. बापाविरुद्ध युद्धास उभे राहिल्याबद्दल खेद होता. तथापि प्रेमापोटी साऱ्या अपराधाची क्षमा करण्याचे अभिवचनही होते. फक्त एकदाच त्याने समक्ष येऊन भेटावे एवढीच इच्छा व्यक्त केली होती. औरंगजेब लेखणीचा मोठा बांका होता. त्याने लिहिले होते –

"माझा प्रिय पुत्र, माझ्या काळजाचा भाग. माझ्या प्राणासमान असलेल्या महंमद अकबर यानें माझ्या कृपेची आशा धरून जाणावे की माझ्या सर्व मुलांपेक्षा मी तुला अधिक प्रिय मानतो. या गोष्टीला परमेश्वर साक्षी आहे. पण दुर्दैव तुझे त्या सैतान रजपुतांच्या सल्ल्याला बळी पडून तू येथील स्वर्गसुखापासून वंचित झालास; आणि आता तू रानावनातून आणि डोंगरदऱ्यांतून भटकत आहेस. यावर मी काय उपाय करावेत ? मी तुला काय आणि कशी मदत करावी ? तू या वेळी

अत्यंत दुर्दशेत आहेस. तुझे दारिद्र्य, तुझे वणवण भटकणे इत्यादींच्या बातम्या ऐकून मला अत्यंत दुःख झाले. इतकेच नव्हे तर ह्या माझा जीव मला नकोसा झाला. यापेक्षा अधिक काय सांगावे, तू एका सम्राटाचा पुत्र होतास. तू एक प्रतिष्ठित असा शहाजादा होतास. याचा तू विचार केला नाहीस. तुझा भोळेपणा किती म्हणून सांगावा ? तुला आपल्या तरुण वयावरही दया आली नाही. तू आपल्या बायकापोरांच्यावरही दया दाखविली नाहीस. त्यांना तू पशुतुल्य आणि क्रूर अशा रजपुतांच्या ताब्यात दिलेस आणि एखाद्या चेंडूप्रमाणे तू कधी उंच उधळत तर कधी जमिनीवर पडत भटकत आहेस.

"परमेश्वराने प्रत्येक पित्याच्या हृदयात आपल्या पुत्रासंबंधी प्रेमाची भावना निर्माण केली आहे. तू केलेले अपराध भयंकर आहेत. पण त्याची तुला अशी जबर शिक्षा मिळावी असे मला वाटत नाही. (कविता) हा मुलगा निवळ मातीचा ढिगारा का असेना,आईबाप काजळाप्रमाणे त्याला आपल्या डोळ्यात धारण करतात.

" जे झाले ते झाले. नशिबान तुला आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप होत असेल तर तुला वाटेल त्या ठिकाणीं येऊन मला तू भेटावे. तुला पूर्णपणे क्षमा करण्यात येईल. तुला कल्पनाही नसेल इतकी तुझ्यावर कृपा करण्यात येईल. तू आतापर्यंत इतके कष्ट भोगलेस त्याऐवजी तुला पूर्ण आराम मिळेल. यासाठी तू येऊन हजर झालेच पाहिजे असे नाही. पण ज्या अर्थी तू फजित पावला आहेस त्या अर्थी तू मला एकदा भेटून आपला झालेला दुर्लौकिक नाहीसा करावा हे योग्य होय. जसवंतसिंग हा रजपुतांचा पुढारी होता तो दारा शुकोहला जाऊन मिळाला पण शेवटी काय झाले? त्याने अपेक्षा केली, त्याच्या उलट त्याला फळ मिळून त्याला पश्तात्ताप करावा लागला. हे असेच होणार याची खात्री ठेव. नशीब तुझी साथ करो आणि परमेश्वर तुला योग्य मार्ग दाखवो."

या पत्राचा विशेष उपयोग झाला नाही. म्हणून औरंगजेबाने आणखी एक पत्र लिहिले.

" बादशहाची कृपा झालेला, भाग्यशाली अकबर याने जाणावे की ही किती दुःखाची गोष्ट आहे. तुझी बुद्धिमत्ता आणि शहाणपणा यांबद्दल मला अतिशय दुःख होत आहे. निष्ठेच्या आणि ताबेदारीच्या मार्गापासून तू भटकलास. तू कुटिल वृत्ति धारण केलीस. राज्याचा लोभ धरून तू आपल्या बापावरच तलवार उपसलीस. बादशहाच्या कोण्या मुलाने आपल्या बापाविरुद्ध लढण्याची तयारी केली ? तू अत्यंत उद्धटपणाने आणि अविचाराने पुढे चालून आला आहेस. मुलूख जिंकण्याची तुला इच्छा झाली असेल तर यापेक्षा अधिक चांगली अशी कोणती गोष्ट असू शकेल ? एकनिष्ठ सरदार आणि हितचिंतक सहकारी यांना घेऊन तू इराक (इराण) देशावर जा तेथील बादशहा अब्बास हा नेहमी युद्धात गुंतलेला असतो. तुझ्या पित्याचे कंधारवरील प्रभुत्व त्याने नाहीसे केले. तू जाऊन त्याचा

देश उद्ध्वस्त कर. सत्पुत्राचे हेच कर्तव्य होय. तख्तावर बसण्याच्या इच्छेने बापाबरोबर तू कां लढावेस? यशाची किल्ली परमेश्वराच्या हातात असते. राज्यपदाचा लाभ परमेश्वराच्या कृपेनेच होत असतो. यापेक्षा इष्ट अशी कोणती गोष्ट असू शकेल? म्हणून तू नम्रपणे आपला अविचार टाकून द्यावा आणि मला शरण यावे. तू नम्र होऊन मला शरण आलास तर मी कदाचित् कृपा करीन ही माझी तुला निक्षून केलेली ताकीद आहे असे समज. या बाबतीत मुळीच दिरंगाई करू नकोस."

याही पत्राचा काही एक उपयोग झाला नाही. अकबर आपल्या बापाला चांगलाच ओळखत होता. राज्य मिळविताना औरंगजेबाने कोणताही विधिनिषेध पाळला नव्हता. त्याने बापाला मरेपर्यंत तुरुंगात ठेवले; भावांपैकी दाराची हत्तीवरून उन्हात धिंड काढून त्याचा शिरच्छेद केला; मुरादला गोड बोलण्याने भुरळ पाडून ग्वाल्हेरच्या बंदिखान्यात ठार मारले आणि शुजाला आराकानमध्ये पळवून देशोधडीला लावले. फार काय सांगावे, प्रत्यक्ष त्याचा थोरला मुलगा सुलतान महंमद याला शुजाला सामील झाल्याबद्दल बारा वर्षे तुरुंगात ठेवले. या बाबतीत स्त्रीदाक्षिण्यही त्याला आडवे आले नाही. अकबराला सामील असल्याबद्दल मुलगी झेबुन्निसा हिची सारी मालमत्ता जप्त करून तिला सलीमगडच्या तुरुंगात त्याने ठेवून दिले. मीर जुमला सारखा मित्र, पण तो डोईजड होतोसे वाटल्याबरोबर आसामच्या रोगट हवेत त्याला स्वारीत पाठवून त्याचा त्याने काटा काढून टाकला. तात्पर्य, राज्यसाधन आणि राज्यरक्षण या बाबतीत आडवे येईल ते बेलाशक कापून काढावे या कणिक-नीतीचा औरंगजेबाने अत्यंत कठोरपणे अवलंब केला. "पुत्रः सखा वा भ्राता वा पिता वा यदि वा गुरुः। रिपुस्थानेषु वर्तन्तो हन्तव्या भूतिमिच्छता ॥" (मुलगा असो, मित्र असो, भाऊ असो की बाप असो, जर शत्रु असतील तर वैभव इच्छिणाऱ्या राजाने त्यांना ठार मारावे.)

अशा बापाचा मुलगा अकबर त्याला या साऱ्या गोष्टी उत्तम माहीत होत्या. त्याने औरंगजेबाकडून आलेले पैसे घेतले; पण त्याला भेटण्यास तो गेला नाही. उलट औरंगजेबाच्या पत्रास त्याने जे उत्तर पाठविले त्याने, त्याच्या बंडापेक्षाही औरंगजेबाला जबर धक्का बसला. या पत्रात प्रकट झालेले अकबराचे राजकीय शहाणपण जितके चकित करणारे आहे, तितकेच त्याने केलेले औरंगजेबाच्या स्वभावाचे व राजकारणाचे विश्लेषण स्तिमित करणारे आहे. मुलाने बापाला लिहिलेले असे परखड पत्र फार क्वचित.

अकबराने औरंगजेबास लिहिले "आपले फर्मान मिळाले. आपल्या पत्रात मला आपण अनेक प्रकारे उपदेश केला आहे. त्याचेच उत्तर मी देत आहे."

आपण लिहिले आहे, "मी तुला आपल्या इतर पुत्रांपेक्षा अधिक प्रिय समजत होतो. काय तुझे नशीब? तू सर्व सुखांना पारखा होऊन दुर्दशेत सापडला आहेस.

बादशहा सलामत, आपल्या पित्याची मर्जी संतुष्ट राखणे व त्याच्या आज्ञेचे पालन करणे हे प्रत्येक पुत्राचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे पुत्राच्या हिताची काळजी घेणे व त्याचा जो हक्क आहे तो त्याला मिळवून देणे हे पित्याचे कर्तव्य आहे. वडील माणसे नेहमी आपल्या लहान मुलांच्याकडे विशेष लक्ष देतात; पण हा शिरस्ता आपण सोडून दिला. आपल्या लहान मुलांच्याकडे आपण दुर्लक्ष केले. मोठ्या मुलाला आपण शहा ही पदवी दिली; आणि त्याला आपला युवराज म्हणून नेमले. आपले हे कृत्य कोणत्या अर्थाने न्याय्य म्हणता येईल ? सर्व पुत्रांना समान हक्क आहेत. एकाला वर चढविणे आणि इतरांना खाली पाडणे हे कोणत्या तत्त्वाप्रमाणे आहे ? आपण धर्मनिष्ठ आहात, आपण धर्मशास्त्राचे पालन करता, आपण सत्यनिष्ठ आहात असा आपला सर्वत्र लौकिक आहे. आपणच हा मार्ग स्वीकारला आहे. आता तो मार्ग निरर्थक आहे असे आपण कसे म्हणू शकता ?"

आपल्या दुर्दशेबद्दल औरंगजेबाने जे नक्राश्रु ढाळले आहेत ते अनावश्यक आहेत, आपल्या कष्टाचा आणि दुःखाचा शेवट विजयश्रीत होणार आहे, असे सांगताना अकबर म्हणतो–

" बादशहा सलामत, माणसे आपण होऊन कष्ट आणि श्रम आपल्यावर ओढून घेतात. अकबर, जहांगीर, शहाजहानसारख्या बादशहांनी अपार कष्ट केले तेव्हा कोठे त्यांना आपल्या ध्येयात यश आले. आत्यंतिक अशी संकटे सहन केल्याशिवाय अमृताचा लाभ होत नाही. या गोष्टी इतिहासावरून स्पष्ट होतात. प्रत्येक फुलाला काही काटे असतात आणि प्रत्येक खजिन्याच्या संरक्षणाला साप असतो. (कविता) पाणीदार तलवारीचे जो चुंबन घेऊ शकतो, हाताळू शकतो त्यालाच भाग्यवधू माळ घालते. कष्टानंतर सुख हा निसर्गाचा नियम आहे. त्याला अनुसरूनच माझ्या सांप्रतच्या कष्टाचे व श्रमाचे सार्थक होईल, माझ्या मनासारखे होईल. आणि हे सर्व त्या परमेश्वराच्या कृपेने घडून येईल अशी मला दृढ आशा आहे. सध्याच्या माझ्या श्रमांचा शेवट सुखात आणि आनंदात होईल अशी माझी श्रद्धा आहे."

जसवंतसिंग हा रजपुतांचा पुढारी. तो दाराशी बेइमान झाला. या जमातीचा कधीच विश्वास धरता येत नाही, अशा या बेभरंवशाच्या रजपुतांवर प्रत्यक्ष आपली बायकापोरे स्वाधीन करण्याइतका विश्वास अकबराने टाकला हा त्याचा घोर प्रमाद झाला, असे म्हणणाऱ्या औरंगजेबाला अकबर त्याच्या इमानाची, शौर्याची ग्वाही देताना म्हणतो–

" बादशहा सलामत, आपण योग्य तेच बोलतात. वस्तुस्थिति अशी आहे की दारा शुकोर हा रजपुत जमातीविषयी द्वेष बाळगीत असे. त्याची फळे त्याला भोगावी लागली. तो रजपुताशी प्रथमपासूनच गोडीने वागला असता तर त्याच्या योजनांचे

असे वाटोळे झाले नसते. यापूर्वी होऊन गेलेले अकबर आणि इतर बादशहा यांनी रजपुतांशी अतिशय घनिष्ठ असे संबंध जोडले. रजपुतांच्या पाठिंब्याने त्यांनी हिंदुस्थान आपल्या ताब्यात आणिला. या रजपूत जमातीच्या बळावरच महाबतखान याने जहांगीर बादशहाला आपल्या ताब्यात घेतले आणि कुटिल कारस्थाने करणाऱ्या लबाड लोकांना शिक्षा केली. आपण दिल्लीत होता त्या वेळी तेथे (दुर्गादास राठोड याच्या नेतृत्वाखाली) रजपूत तीनशेपेक्षा अधिक नव्हते. त्यांनी त्या वेळी जे अद्भुत शौर्य दाखविले ते जगप्रसिद्ध आहे. यापूर्वी असे शौर्य कोणी गाजविलेले ऐकिवात नाही.

"शुजाशी आपण युद्ध करीत होता. त्या वेळी जसवंतसिंगाने आपल्याविरुद्ध जी अमर्याद वागणूक केली ती पाहता त्याला क्षमा करणे शक्य नव्हते. पण आपण जाणूनबुजून त्याच्या अपराधाकडे कानाडोळा केला. याच जसवंतसिंगाला आपण गोड बोलून दारा शुकोहच्या पक्षातून फोडले आणि आपल्याला यश मिळाले. या रजपूत जमातीच्या इमानाची धन्य होय. आपल्या मालकाकरिता आपले प्राण अर्पण करण्यास रजपूत मागेपुढे पाहात नाहीत. गेली तीन वर्षे रजपुतांनी इतके शौर्य गाजविले आहे की, बादशहा, त्याचे प्रतापी पुत्र, नामांकित वजीर आणि प्रतिष्ठित उमराव यांच्याने रजपुतांचा मोड होऊ शकला नाही. यामुळे ते सगळे दिङ्मूढ झाले आहेत. मोहीम सुरू होऊन इतकी वर्षे झाली तरी अजून पहिलाच दिवस आहे असे म्हटले पाहिजे."

या परिस्थितीचे निदान करताना अकबराने औरंगजेबाच्या चारित्र्याचे व राज्ययंत्रणेचे जे निर्दय वाभाडे काढले आहेत, ते पाहता हे केवळ मुलाने बापास लिहिलेले पत्र आहे की मुलाने बापावर काढलेले आरोपपत्रक आहे असा संभ्रम पडतो. औरंगजेबाची एकतंत्री हुकूमशाही, त्याच्या कारभारात माजलेले दांभिकांचे बंड, त्याचा अंधळा धर्मद्वेष आणि वरपासून खालपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांत बोकाळलेला भ्रष्टाचार याने सगळी राज्ययंत्रणा मुळापासून सडून गेलेली आहे. अशा स्थितीत देश भिकेला लागला नाही तरच नवल. अकबराला ही सगळी राज्याच्या विनाशाची पूर्वचिन्हे वाटतात. त्या दृष्टीने हे पत्र म्हणजे केवळ औरंगजेबाच्या जीवनावरचे कठोर भाष्यच नाही तर भीषण भविष्याचा वेध घेणाऱ्या क्रांतदर्शी प्रतिभेचा विस्मित करणारा आविष्कार आहे असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. अकबर म्हणतो--

" आणि असे कां होऊ नये? आपल्या कारकिर्दीत आपल्या वजिरांना काही अधिकार नाहीत. आपल्या अमीर उमरावांवर आपला विश्वास नाही. आपले सैनिक दरिद्री बनले आहेत; कारकून बेकार झाले आहेत आणि सावकारांच्या पाशी भांडवल राहिले नाही.

" दक्षिण प्रांतांची अशीच दुर्दशा झाली आहे. वास्तविक पाहता हा विस्तीर्ण दक्षिण प्रदेश म्हणजे भूवरील स्वर्गच होय. आणि बुऱ्हाणपूर म्हणजे विश्वरूपी सुंदरीच्या गालावरील तीळ होय. पण ते शहर आज उद्ध्वस्त होऊन गेले आहे. औरंगाबाद शहर हे आपल्याच नावाने वसविण्यात आले आहे. पण शत्रुसैन्याच्या आघाताने ते पाऱ्यासारखे अस्थिर झाले आहे.

" हिंदु तर दुहेरी संकटांत सापडले आहेत. शहरांतून त्यांच्यावर जिझियाचे ओझे आणि बाहेर शत्रूंचे हल्ले अशी त्यांची स्थिति आहे. प्रजेवर चोहीकडून अशा प्रकारची संकटे कोसळत असता त्यांनी काय म्हणून आपल्याला दुवा (!) द्यावा आणि आपले गोडवे गावेत ? प्रतिष्ठित आणि मातबर माणसे नाहीशी झाली आहेत. आपला राज्यकारभार लबाड आणि हलकट लोकांच्या हाती आला आहे. विणकर, शिंपी, साबूविके अशा प्रकारची माणसे आता राज्य चालवीत आहेत. या लोकांच्या अंगावर लबाडीची कफनी आणि हातात विश्वासघाताची स्मरणी ही दिसून येतात. तोंडाने शुष्क वचने आणि परंपरा यांची ते बडबड करीत असतात. आणि आपण त्यांना मोठेपणा देऊन, त्यांना ग्याब्रेल आणि इस्त्राफीलसारखे चतुर समजून, त्या कारभाऱ्यांच्या पूर्ण आहारी गेला आहोत. गहू दाखवून जव विकणारी अशी लबाड माणसे आपल्याला पर्वत म्हणजे गवत असे सांगून बनवितात.

(कविता)"आलमगीर बादशहा गाजी याच्या राजवटीत साबूविके काजी आणि सदर बनले आहेत. विणकर आणि पिंजारी हे आम्ही बादशहाच्या बैठकीला असतो अशी बढाई मारीत आहेत. हलकट माणसांना विलक्षण अधिकार लाभले आहेत. आज विद्वान् प्रतिष्ठित माणसे त्यांच्या दारापुढे ताटकळत उभी असलेली आढळून येत आहेत. विद्वान् कल्पनाही करू शकत नाहीत, इतकी प्रतिष्ठा मूर्खांना लाभली आहे. अशा भयंकर काळापासून परमेश्वर आम्हांला वाचवो. या काळात गाढवाकडून अरबी घोडयांची विटंबना होत आहे. अधिकारी निरर्थक आणि वायफळ बडबड करतात. न्याय तर फिनिक्स पक्ष्याप्रमाणे दृष्टीस पडेनासा झाला आहे. कारभारी आणि सरकारी नोकरवर्ग तर अधिकारांच्या जागांचा व्यापार करीत आहे. हुद्दे आणि जागा यांचा व्यापार होत आहे. न्यायाने आणि निष्ठेने वागण्याऐवजी हे अधिकारी लोकांचा छळ करीत आहेत. राज्याचे मीठ खाणारेच मिठाची भांडी फोडू लागले आहेत, कृतघ्नपणे वागू लागले आहेत. हे राज्य मोडकळीस येण्याचे दिवस जवळ आले असे वाटू लागले आहे.

'राजा कालस्य कारणम् ।' या न्यायाने औरंगजेबामुळेच हा विपरीत काळ आला हे खरे असले तरी स्वभावाला औषध नसल्यामुळे, त्याच्या स्वभावात बदल घडून येईल व त्यामुळे ही परिस्थिति सुधारेल अशी वेडी आशा करणे व्यर्थ होते. त्यामुळे नाईलाजाने आपणालाच राज्यक्रांतीचे कार्य हाती घ्यावे लागले असे सम-

थंन करून आता राज्यकारभाराची दगदग पुरे झाली. आपण आता मक्केस जावे असा अकबराने औरंगजेबास सल्ला दिलेला आहे.

"ही परिस्थिति माझ्या पाहण्यात आली. आपल्या स्वभावात बदल घडून येईल अशी चिन्हे दिसेनात. शेवटी आपल्या कुळाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने मी असे ठरविले की, जुलुमी आणि गर्विष्ठ लोकांचा या राज्यातून काटा काढावा, विद्वान् आणि शहाणी माणसे यांना पुढे आणावे, या राज्यातील जुलूमजबरदस्ती मुळापासून नाहीशी करावी म्हणजे प्रजा आरामात राहील आणि माणसे निश्चित मनानी आपल्या उद्योगधंद्यात मग्न राहतील. असे केल्याने आपला सुलौकिक आणि सुकीर्ति हो जगात टिकून राहतील. हे काम आपण माझ्यावर सोपवून स्वतः मक्केच्या यात्रेला निघून जावे म्हणजे लोक आपल्याबद्दल धन्योद्‌गार काढतील. असे जर आपण केलेत तर किती बरे चांगले होईल !

"आपण आपले आतापर्यंतचे आयुष्य राज्यकारभारात व इतर ऐहिक गोष्टी करण्यात घालविले आहे. हे जग म्हणजे एक स्वप्न आहे. याचा काय भरंवसा धरावा. आता आपण पारलौकिक गोष्टीचा विचार करावा. परलोकांत श्रेय कसे मिळविता येईल याची आपण काळजी करण्याची वेळ आली आहे."

औरंगजेबाने आपल्या पत्राच्या अखेरीस अकबराने आपणास येऊन भेटावे अशी इच्छा प्रकट केली होती. औरंगजेबाला एकदा भेटले म्हणजे परत जिवंत सुटण्याची आशाच बाळगायला नको हे अकबर पक्के ओळखून होता. पण त्याने औरंगजेबाच्या आज्ञेचा प्रत्यक्ष अव्हेर न करिता, तिला युक्तीने बगल दिली. त्याने औरंगजेबालाच भेटण्यास येण्याची विनंती केली. ही विनंती करतानाच तो कधीही मान्य होणार नाही, हे अकबराला माहीत होते. कारण बापही मुलाला चांगला ओळखून होता. तात्पर्य, हा सगळा 'गाठ पडली ठकाठका' यातला प्रकार होता!

"आपण मला भेटीसाठी बोलाविले आहे. पण मी वयाने लहान आहे. शंके-कुशंकेने मी व्याकूळ झालो आहे. आपणच मोजकी माणसे बरोबर घेऊन एखाद्या ठरलेल्या ठिकाणी आलात तर मी भेटीस येईन आणि आपल्या आज्ञेचे निःशंकपणे पालन करीन. अधिक काय लिहावे ?"

माणसाला पुनर्जन्म आहे काय आणि असला तर पूर्वजन्मीच्या कर्मांची फळे या जन्मात त्याला भोगावी लागतात काय हा प्रश्न वादग्रस्त असला तरी कर्मविपाकाची कित्येक वेळा या जन्मातच अशी काही विलक्षण प्रतीति येते की माणूस थक्क झाल्याशिवाय राहत नाही. पंचवीस वर्षांपूर्वी औरंगजेबाने जे पेरले होते, ते आता उगवले होते. त्याने आपल्या बापाविरुद्ध बंड केले होते, आज अकबराने त्याच्याविरुद्ध बंड केले होते. औरंगजेबाने त्या वेळी शहाजहानवर जे आरोप केले होते तेच नेमके आज अकबर औरंगजेबावर करीत होता. औरंगजेबाने भावाभावांतील यादवी युद्धाची सारी जबाबदारी शहाजहानवर ढकलून म्हटले होते की, "इतर मुलांना

डावलून त्याने सर्वांत वडील मुलाला पक्षपाताने झुकते माप देण्याचा प्रयत्न केला नसता तर यादवी युद्ध न होता सगळे भाऊ गुण्यागोविंदाने एकमेकांबरोबर नांदले असते ! जर आपल्या सर्वांत मोठ्या मुलाला आपण नाना तऱ्हेने मदत करून वर आणले नसते–ज्याची ऐपत आणि पापभीरु वृत्ति एव्हांना आपणास समजली असेलच आणि केवळ त्याच्याबद्दलच्या आस्थेमुळे आपल्या इतर मुलांच्या सुरक्षिततेबद्दल तरतूद करण्यात कुचराई केली नसती–तर सारे भाऊ सुखाने एकोप्याने राहिले असते आणि यादवी युद्धाचा वणवा मुळी भडकलाच नसता." आज अकबर औरंगजेबाला हेच विचारीत होता. " आपल्या लहान मुलांच्याकडे आपण दुर्लक्ष केले. मोठ्या मुलाला शहा ही पदवी दिली आणि त्याला आपण आपला युवराज म्हणून नेमले. आपले हे कृत्य कोणत्या अर्थाने न्याय्य म्हणता येईल ? सर्व पुत्रांना समान हक्क आहेत. एकाला वर चढविणे आणि इतरांना खाली पाडणे हे कोणत्या तत्त्वाप्रमाणे आहे ?"

औरंगजेबाने आपल्या बंडाचे समर्थन असे केले की, मोठ्या नाखुषीने अगदी केवळ परिस्थितीची गरज म्हणून त्याला राज्यभार अंगावर घ्यावा लागला. कारण त्याशिवाय देशात इस्लामचे पुनरुज्जीवन आणि शांततेची प्रस्थापना केवळ अशक्य होती. असे जर केले तरच तो न्यायदानाच्या दिवशी परमेश्वरापुढे जबाब देऊ शकला असता आणि लोकांना विनाशापासून व त्याच्या पुरातन राज्याला गोंधळापासून वाचवू शकला असता. नेमके हेच समर्थन अकबराने केले आहे. "हे राज्य मोडकळीस येण्याचे दिवस जवळ आले असे वाटू लागले. ही परिस्थिति माझ्या पाहण्यात आली. आपल्या स्वभावात बदल घडून येईल अशी चिन्हे दिसेनात. शेवटी आपल्या कुळाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने मी असे ठरविले की जुलमी आणि गर्विष्ठ लोकांचा या राज्यातून काटा काढावा, विद्वान् आणि शहाणी माणसे यांना पुढे आणावे, या राज्यातील जुलमजबरदस्ती मुळापासून नाहीशी करावी म्हणजे प्रजा आरामात राहील आणि माणसे निश्चित मनांनी आपल्या उद्योगधंद्यात मग्न राहतील." औरंगजेबाने आपल्या बापाला धर्मचिंतन करण्याचा सल्ला दिला होता, त्याचप्रमाणे अकबराने औरंगजेबाला मक्केला जाण्याची विनंती केली होती.

ज्या औरंगजेबाने बापाविरुद्ध तलवार उपसली होती, त्याने अकबरला बादशहाच्या कोणत्या मुलाने आपल्या बापाविरुद्ध लढण्याची तयारी केली? तख्तावर बसण्याच्या इच्छेने बापाबरोबर तू लढावेस ? असा प्रश्न विचारणे यापेक्षा दुसरा विनोद नाही. हा शुद्ध दांभिकपणाचा कळस होता. पण अकबराला हवेच असले तर त्याही प्रश्नाच्या उत्तराची तरतूद औरंगजेबाने पूर्वीच करून ठेवली होती. शहाजहानने त्याच्यावर राज्यावर दरोडा घातल्याचा आरोप केला तेव्हा औरंगजेबाने उत्तर केले की, "आपण हे जाणावे की राजाचा खजिना, मालमत्ता ही लोकांच्याच

हितासाठी असतात. राजपद ही काही कोणाची वंशपरंपरा येणारी खाजगी मालमत्ता नाही. राजा फक्त लोकांच्या कल्याणासाठी परमेश्वराच्या संपत्तीचा ईश्वराने नेमलेला विश्वस्त आणि रखवालदार आहे."

आग्र्याला वेढा घालून बसलेल्या औरंगजेबाला शहाजहानने वारंवार भेटीस बोलाविले. पण भेटीत दगाफटका होईल, या संशयाने शेवटपर्यंत औरंगजेबाने बापाची भेट घेतली नाही. आज औरंगजेब अकबराला भेटीस बोलावीत होता, पण पूर्वी ज्या कारणाने औरंगजेब बापाला टाळीत होता, त्याच कारणाने अकबर औरंगजेबाला भेटण्यास टाळीत होता. फार काय सांगावे, औरंगजेबाच्या पितृद्रोहाने संतप्त झालेल्या शहाजहानने तळमळून त्याला जणू शापच दिला की, "दुष्टा, जसे तू मला वागविलेस तसेच तुझी मुले तुला वागवितील हे पक्के लक्षात ठेव." बापाचे हे बोलणे औरंगजेबाने थट्टेवारी नेले. त्याने उत्तर केले, "परमेश्वराच्या इच्छेशिवाय काहीच होत नाही. माझ्यापेक्षा मोठ्या लोकांना सुद्धा हा दैवाचा फेरा चुकविता आला नाही. मग मीच तेवढा ईश्वरी नेमानेम कसा बरे टाळू शकेन ? प्रत्येकाला परमेश्वर त्याच्या वासनेप्रमाणे फळे देतो. आणि माझी वासना चांगली असल्यामुळे माझ्या मुलांकडून मला चांगलाच प्रतिसाद मिळेल याची मला पुरी खात्री आहे.' पण औरंगजेबाचे शब्द खोटे ठरले होते व शहाजहानचे शब्द कानामात्रेसकट खरे ठरले होते. पंचवीस वर्षांपूर्वी औरंगजेबाने जो विषवृक्ष लावला होता. त्याची फळे त्याच्या डोळ्यांदेखत आली होती. त्याने आपल्या पत्रात अकबराला पुत्रधर्माचा उपदेश तर बहुतच केला होता, पण त्याचे स्वतःचे वर्तन पाहता कोणालाही वाटले असते की, "तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म !"

हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवर राज्यप्राप्तीसाठी 'राक्षसी महत्त्वाकांक्षेचे' जुनेच नाटक परत चालू झाले होते. नाटक जुने होते, पण प्रयोग नवा होता. पात्रे तीच होती—बाप आणि लेक; पण या वेळी त्यांचे कार्यभाग थोडे बदलले होते. पूर्वी शहाजहान बाप होता आणि औरंगजेब युवराज होता. आता औरंगजेब बाप होता आणि अकबर युवराज होता. बाकी सवाल-जबाब तंतोतंत तेच होते. आता फक्त ज्याप्रमाणे औरंगजेबाने शहाजहानचा पाडाव केला त्याप्रमाणे अकबराने औरंगजेबाचा पाडाव केला असता म्हणजे नाटकाचा शेवटचा अंक सुरू झाला असता, आणि बापाच्या करुणगंभीर शेवटाने या भीषण नाटकावर पडदा पडला असता. कारण आपल्या तावडीत सापडलेल्या वृद्ध आणि असहाय बापाला कसे वागवावे या बाबतीत औरंगजेबानेच पूर्वी उदाहरण घालून दिले होते. आग्र्याचा किल्ला ताब्यात यावा म्हणून औरंगजेबाने किल्ल्याचे पूर्वी पाणी तोडले होते. तेव्हा तहानेने तळमळणाऱ्या शहाजहानने त्याला लिहिले होते—"केवळ कालच मी नऊ लाख सैन्याचा अधिपति होतो, आणि आज मी पाण्याच्या एका घड्यालाही महाग झालो आहे ! आपल्या

दिवंगत पूर्वजांना जलांजलि देणारे हिंदु धन्य होत, आणि तू, माझ्या मुला, असा काही इरसाल मुसलमान आहेस की जिवंतपणी मला तू पाण्यासाठी तडफडायला लावतो आहेस! " या शहाजहानच्या करुण पत्राला, "हे आपल्याच कर्माचे फळ आहे" असा निर्दय जबाब औरंगजेबाने पाठविला. आग्र्याचा किल्ला ताब्यात आल्याबरोबर औरंगजेबाने सगळ्या संपत्तीच्या खोल्यांना कुलपे लावली, दाराने पळून जाताना सत्तावीस लाख रुपयांचे अलंकार जनानखान्यात लपवून ठेवले होते, ते देण्यास शहाजहानला भाग पाडले. त्याला बदलण्यास दुसरे कपडे लागले तरी नोकरांची आर्जवे करावी लागत, त्याच्या चपला फाटल्या, तर ज्यांना त्याच्या चपलांची सर नाही असे नोकर त्याला चार-आठ आण्यांच्या चपला पाठवून देत व एके काळच्या शहेनशहाची आपण कशी फजिती केली यात आनंद मानीत. औरंगजेबाच्या परवानगीशिवाय कुणीही त्याला भेटू शकत नसे. तो जे बोलेल ते अक्षरशः औरंगजेबापर्यंत पोचविले जाई. कोणास पत्रे स्वतः लिहिण्याची त्याला परवानगी नव्हती. त्याचे लेखनसाहित्यही हिरावून घेण्यात आले होते. त्याला काही लिहावयाचे असले म्हणजे एक नोकर हजर होई, त्याने तो मजकूर उतरून घ्यावयाचा. औरंगजेबाने त्याची सारी संपत्ति हिरावून घेतली. त्याच्या हातातली रत्नजडित अंगठीही त्याच्यापाशी राहू दिली नाही. फार काय चार लाख रुपयांची मोत्यांची त्याची स्मरणी होती, तिचीही त्याने मागणी केली. तेव्हा शहाजहानने उत्तर दिले, " ती माळ मी जपासाठी वापरतो. ती तुला मिळणार नाही. तू जर भलता हट्ट धरलास तर ती माळ मी उखळात घालून कुटून तिचे पीठ करीन आणि मग तुला देईन." तेव्हा प्रत्यक्ष औरंगजेबाला सुद्धा लाज वाटली आणि त्याने माघार घेतली. शहाजहान मेला तेव्हा औरंगजेब गेला नाही. त्याची सार्वजनिक प्रेतयात्रा त्याने काढू दिली नाही. आग्र्याच्या किल्ल्याच्या तटातील एक भिंत फोडून त्यातून एके काळच्या या सम्राटाचे प्रेत चोराप्रमाणे नेण्यात आले आणि गुपचूप पुरण्यात आले. बाप मरून त्याला मूठमाती मिळाली आणि सगळीकडे सामसूम झाले, तेव्हा एक महिन्याने बहिणीच्या समाचारासाठी औरंगजेब आग्र्याच्या किल्ल्यात आला.

या गोष्टी सगळ्या जगाला जाहीर होत्या आणि औरंगजेबाला स्वतः तर त्या उत्तम अवगत होत्या. त्यामुळे अकबराला यश येऊन जर का आपण त्याच्या तावडीत सापडलो तर आपण शहाजहानचे जसे धिंडवडे काढले, तसेच तो आपले काढील याबद्दल त्याला मुळीच शंका नव्हती. अकबराने अजमीरला बंड केले तेव्हा त्याला हे कळले होतेच. पण अकबराच्या मनात आपल्याविरुद्ध खदखदत असलेल्या ज्वालामुखीची खरी कल्पना अकबराचे पत्र वाचल्यावर त्याला आली आणि आपणावर हे केवढे मोठे संकट कोसळले आहे याची खरीखुरी प्रचिती त्याला येऊन दक्षिणेत अकबर पोचून संभाजीची आणि त्याची युति सुफलित होण्यापूर्वीच ती मूळापासून उपटून काढावी या उद्देशाने बिकानेरचा श्यामसिंह

याच्या मध्यस्थीने ऐन भरात आलेले हे राजपूत युद्ध मेवाडशी तसा म्हटले तर नामुष्कीचाच तह करून आणि मारवाडातील लढाई तशीच आपल्या अधिकाऱ्यांवर सोपवून कसेबसे घाईघाईने त्याने आवरते घेतले आणि ईदचा उत्सव संपल्यानंतर ६ सप्टेंबर १६८१ रोजी दक्षिणेकडे कूच करण्याचा आपल्या सैन्याला हुकूम केला. यापूर्वीच ३१ जुलै रोजी म्हणजे रजपुतांशी तह झाल्यापासून महिनाभरात त्याने आज्जमला दक्षिणेत रवाना केले होते. मेवाडशी औरंगजेबाने जो तह केला होता, तो काही आजपर्यंतच्या त्याच्या लौकिकाला, हेकटपणाला आणि परिश्रमांना मुळीच शोभण्यासारखा नव्हता. या तहात जिझिया कराऐवजी मण्डलपूर व बिदनोर हे परगणे मेवाडने बादशहाला कायमचे द्यावयाचे होते; मेवाडच्या राण्याला राणा ही पदवी व पंचहजारी मनसब बादशहाने द्यावयाची होती आणि मेवाडच्या राज्यातून बादशहाने आपले सारे सैन्य काढून घ्यावयाचे होते. मारवाडच्या राठोडांनी बादशहाशी तहही केला नाहीं. ते युद्ध तसेच चालू राहिले. ऋणाचा शेष, अग्नीचा शेष आणि शत्रूचा शेष अजिबात शिल्लक ठेवू नयें ही औरंगजेबाची राजनीति. पण मुलाने त्याचा गळाच आवळल्यामुळे बिचाऱ्याचा नाइलाज झाला. अकबराला दिल्लीचे राज्य काही मिळाले नाही. पण त्याने राजपुतांना औरंगजेबांच्या तावडीतून वाचविले एवढे मात्र खरे.

अजमीरहून औरंगजेब निघाला एवढ्यात त्याची मोठी बहीण जहानआरा ही आग्रा येथे मरण पावली व त्यामुळे त्याला कूच थांबवावे लागले. जहानआरा आणि औरंगजेब यांचे कधीच सख्य नव्हते. ती नेहमी दाराचा औरंगजेबाविरुद्ध पाठपुरावा करी; पण या पलीकडे तिच्यात दोष देण्यासारखे काही नव्हते. तिची आई मुमताजमहल हिच्या मृत्यूनंतर जनानखान्यावर तिची अनिर्बंध सत्ता होती, आणि बाप शहाजहान याच्यावर तिचे पराकाष्ठेचे वर्चस्व असल्यामुळे दरबारातही तिचे विशेष वजन होते. या कारणाने वेळोवेळी तिला ज्या देणग्या व नजराणे मिळत, त्यामुळे तिच्याजवळ अफाट संपत्ति साचली होती. पण या साऱ्या संपत्तीचा विनियोग तिने गरिबांच्या कल्याणासाठी केला. शहाजहानचे आपल्या मुलीवर निरतिशय प्रेम होते एकदा मेणबत्तीस तिचा झगा लागून ती फार भाजली, त्या अपघातातून ती बरी झाल्याबद्दल शहाजहानने तिला दहा लाखांची संपत्ति बक्षीस दिली तिने जन्मात लग्न केले नाही. आग्र्याच्या तुरुंगांत तिने स्वेच्छेने बापाबरोबर बंदिवास पत्करला आणि कन्येच्या प्रेमाने व मातेच्या वात्सल्याने आपल्या वृद्ध आणि अपंग पित्याची मरेपर्यंत शुश्रूषा केली. तिची गुणसंपदा औरंगजेब जाणून होता, त्यामुळे बापाच्या मृत्यूनंतर त्याने तिचे सर्व सन्मान व तैनात पूर्ववत् चालू ठेवली हे त्याला भूषणास्पद आहे. शेवटपर्यंत धर्मचिंतनात व परोपकारात जीवन वेचून ही धर्मशील साध्वी वयाच्या सदुसष्टाव्या वर्षी मृत्यु पावली. तिच्या शालीन आणि उदात्त जीविताला शोभेल असाच तिच्या कबरीवरच लेख आहे. तो असा "परमेश्वर चिरंतन

व स्वयंपूर्ण आहे. हिरव्या गवतापेक्षा दुसरे कोणतेही आच्छादन माझ्या कबरीवर नको. कारण गवत हेच पामर जीवांना पुरेसे आच्छादन होय."

आग्र्याहून औरंगजेब अजमीरला राजपुतांवर चालून गेला, तेव्हा जहानआराने त्याला या साहसापासून परावृत्त करण्याचा परोपरीने प्रयत्न केला होता. तिने त्याला सांगितले होते की, हे काम फार दुर्घट आहे. नव्हे, जवळजवळ अशक्यच आहे. पण औरंगजेबाने तिचा उपदेश धुडकावून लावला. परंतु तिचे शब्द खरे ठरले. राजपूत युद्धात औरंगजेबाची फजिती झाली, त्याचा दबदबा पार नाहीसा झाला आणि आजवर मोगल बादशाहीचे आधारस्तंभ असलेले राजपूत त्याचे कायमचे वैरी होऊन बसले. त्याच वेळी तिला मृत्यूची चाहूल लागली होती व ती त्याला म्हणाली होती की, "आपली ही भेट शेवटचीच. आता पुन्हा भेट होणार नाही." तेही तिचे शब्द खरे ठरले होते. औरंगजेब दक्षिण दिग्विजयास निघाला होता आणि सुरुवातीलाच ध्वजाची काठी मोडून पडावी, त्याप्रमाणे त्याची थोरली बहीण मृत्यु पावली होती. औरंगजेबाच्या विजय-यात्रेला हा मोठाच अपशकून झाला असे म्हटले पाहिजे.

औरंगजेबाला तसे वाटले काय ?

इतिहास असे सांगतो की, रशियाचा नायनाट करण्यासाठी पाच लाखांचे अवाढव्य सैन्य घेऊन नेपोलियनने रशियावर स्वारी केली, परंतु रशियात त्या वर्षी अकाली पडलेला हिवाळा आणि रशियन लोकांचा गनिमी कावा यांमुळे नेपोलियनच्या सैन्याची साफ वाताहत झाली, आणि तो स्वतः मोठ्या मुष्किलीने जीव बचावून पॅरिसला परत आला. नेपोलियनची ही रशियावरील स्वारी म्हणजे त्याच्या विनाशाची पूर्व सूचनाच होय. कारण पुढच्याच वर्षी लाइपझिग येथे त्याचा प्रचंड पराभव होऊन एल्बा बेटात एके काळच्या या फ्रान्सच्या सम्राटाची रवानगी करण्यात आली. या रशियावरील स्वारीपूर्वी चार वर्षे एक चमत्कारिक घटना घडून आली होती. रशियाचा बादशहा दुसरा अलेक्झांडर व नेपोलियन यांची जर्मनीत टिलसिट येथे भेट झाली होती. त्या वेळी दोघांचे संबंध खेळीमेळीचे होते. दोघांनी एकमेकांवर प्रेमाचा वर्षाव चालविला होता. दोघे एकमेकांना मेजवान्या करीत होते. मांडीला मांडी लावून जेवत होते व मांडीला मांडी लावून नाटके पाहत होते. अशा स्थितीत एके रात्री नेपोलियन झोपेतून किंचाळत उठला. नोकरांनी येऊन पाहिले तों त्याचे सारे अंग घामाने डबडबून गेले होते. मन थोडे शांत झाल्यावर नेपोलियनने त्यांना सांगितले की त्याला फार भयंकर स्वप्न पडले होते. एक अस्वल त्याच्या छातीवर बसले होते आणि त्याचे काळीज फाडून खात होते. पुढेही जेव्हा जेव्हा या स्वप्नाची आठवण येई तेव्हा त्याला मोठे चमत्कारिक वाटे. चार वर्षांनी या स्वप्नाची प्रचिती खरोखरच त्याला आली. रशियन अस्वलांनी त्याचे काळीज फाडून खाल्ले कारण रशियावरील स्वारीत नेपोलियनचा सर्वनाश झाला; आणि रशि-

याच्या ध्वजावरचे मानचिन्ह अस्वल हेच आहे. त्या दृष्टीने नेपोलियनला पडलेले स्वप्न हा भावी अनर्थाची सूचना देणारा अपशकूनच म्हणावा लागेल. जसे अशुभ स्वप्न, तसेच आदरणीय किंवा प्रिय व्यक्तीचे मरण म्हणावयाचे.

पण औरंगजेब नेपोलियनप्रमाणे जगज्जेता 'आलमगीर' असला तरी नेपोलियनप्रमाणे कवि नव्हता. त्याची छाती मर्दाची होती. शकुन अपशकुन, असल्या भावडचा गोष्टी त्याच्या खिजगणतीत नव्हत्या. असली कित्येक मरणे आणि असले कितीक अपशकून तो पचवून बसला होता. बाणाचे टोक आणि पक्ष्याचे मस्तक दिसणाऱ्या धनुर्धर अर्जुनाप्रमाणे त्यालाही आपल्या बाणांची टोके आणि दख्खनच्या मराठ्यांची डोकी दिसत होती. मेलेल्या बहिणीच्या सन्मानासाठी म्हणून त्याने तीन दिवस सैन्याचे कूच थांबविले. तिसरा दिवस संपल्याबरोबर ८ सप्टेंबर १६८१ रोजी औरंगजेबाने दक्षिणेकडे ढाला फिरविल्या !

अजमीरहून तो पुढे चालला. काय तो ऐट, काय तो आनंद ! केवढे ऐश्वर्य, केवढा दिमाख ! दिमाख हा मोगलांच्या हाडीमासी इतका खिळला होता की, मोगल हा 'दिमाख' शब्दाचाच दुसरा पर्याय शब्द होऊन बसला होता. पण या वेळी साधेपणाबद्दल त्रिखंडात डंका वाजत असलेल्या औरंगजेबाने सुद्धा दिमाखाच्या बाबतीत आपल्या पूर्वसूरींवर ताण करण्याचा जणू विडाच उचलला होता. दिल्लीच्या बादशहांनी यापूर्वी दक्षिणेवर स्वाऱ्या केल्या नव्हत्या असे नाही. अलाउद्दिन खिलजीपासून तो थेट जहांगीर-शहाजहानपर्यंत कधी स्वत: तर कधी स्वत:च्या हस्तकांच्या मार्फत ते दक्षिणेवर चालून येतच होते. पण 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' अशा दिल्लीश्वराची डोळे दिपविणारी विजययात्रा दक्षिणच्या लोकांनी आपल्या डोळ्यांनी या वेळपर्यंत कधी पाहिली नव्हती ती एकदा त्यांना दाखवावी आणि केवळ आपल्या दिमाखाच्या दबावाखालीच त्या दक्षिणच्या गांवढ्यांना चकित करावे अशी ईर्षा औरंगजेबाने मनात धरली असणे अगदी शक्य आहे. सतरा वर्षांपूर्वी जिवावरच्या दुखण्यातून उठल्यानंतर वैद्यांच्या सल्ल्यानुसार तो काश्मीरला हवापालट करण्यासाठी गेला होता. त्या वेळी त्याच्याबरोबर पस्तीस हजार घोडेस्वार, दहा हजार पायदळ, सत्तर अवजड आणि साठ हलक्या तोफा, असला भारी सरंजाम होता; आणि त्याचा हा सेनासमुदाय पाहून पुष्कळ शहाण्या लोकांनाही वाटले की, काश्मीरमध्ये हवा पालटासाठी जाणे ही औरंगजेबाने उठविलेली केवळ हूल आहे; त्या सबबीखाली तो कंदाहारवर स्वारी करायलाच निघाला आहे. काश्मीरच्या नंदनवनात केवळ विश्रांतीसाठी निघताना जी फौज औरंगजेबाने बरोबर घेतली, त्यामुळे लोकांना स्वारीची शंका आली. आता तर तो बोलून चालून दक्षिणच्या स्वारीवरच निघाला होता आणि पूर्वी एकदा दिल्लीहून दौलताबादला निघालेल्या महंमद तघलखप्रमाणे त्याने सारे जडजवाहीर, दप्तर, अठरा कारखाने बरोबरच घेतले होते. अशा स्थितीत त्याच्याबरोबर केवढा अफाट

सेनासमुद्र असेल याची केवळ कल्पनाच केली पाहिजे. अभ्यासू लोकांचे मत असे आहे की औरंगजेबाबरोबर या वेळी तीन लाख घोडेस्वार व चार लाख पायदळ होते, तीन हजार हत्ती आणि पन्नास हजार उंट होते. घोडे तर केवळ अगणित होते. यापलीकडे व्यापारी, सराफ, बाजारबुणगे, नोकरचाकर आणि नर्तकीसुद्धा म्हणजे कमीत कमी पांच लाख माणूस औरंगजेबाबरोबर दक्षिणची वाट चालत होते, जास्तीच, पण कमी नाही. एवढे लोक एकाच वेळेला बादशहाबरोबर उत्तरेतून दक्षिणेत यापूर्वी किंवा यानंतर कधी तरी गेले असतील काय ?

सर्वांच्या पुढे कुदळी, फावडी घेतलेले हजारो लोक रस्ता साफ करीत जात असत. त्यांच्या मागे बादशहाचा प्रचंड तोफखाना आणि घोडेस्वार चालत. अवजड तोफा साठ ते सत्तर असत. त्या इतक्या जड असत की एक तोफ ओढण्यास वीस वीस बैलांच्या जोड्या लागत; आणि रस्त्यावर चढ असे तेव्हा बैलांच्या जोडीला हत्ती जुंपत. लहान तोफा तीनशे असून त्या पितळेच्या होत्या आणि दोन घोड्यांच्या गाड्यावरून त्या वाहून नेत. प्रत्येक तोफ अगदी निवडक आणि उत्कृष्ट होती आणि तोफखान्यावर युरोपियन – म्हणजे इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, जर्मन – या गोलंदाजांची नेमणूक केली होती. घोडे स्वारांनंतर हजारो उंट, हत्ती व गाडे असून त्यावर बादशहाचे जडजवाहीर, खजिना, दप्तर, पिण्याकरिता गंगाजल, खाण्यापिण्याचे जिन्नस व इतर अनेक प्रकारचे सामान भरलेले असे. त्यांच्या मागे खुद्द बादशहा येई. कधी तो तख्ते–रवामध्ये म्हणजे छत्र-चामरे असलेल्या उघड्या पालखीत असे, कधी शृंगारलेल्या प्रचंड हत्तीवर अंबारीत असे, तर हवा चांगली असेल तर घोड्यावर असे. त्याच्यामागे मुख्य सरदार दरकदार चालत; त्यानंतर अनेक मनसबदार येत, त्यांच्याजवळ तलवार, धनुष्यबाण ही सारी शस्त्रास्त्रे असत. त्यानंतर बादशहाचा जनानखाना चाले. त्या राजस्त्रियाही कधी जाळीदार पडदे असलेल्या पालख्यांतून, मेण्यांतून किंवा हत्तीवरील पडदे लावलेल्या अंबारीतून प्रवास करीत. त्यांच्या भोवती काश्मिरी व तातार स्त्री सैनिकांची व काठ्या घेतलेल्या खोज्यांची एकच गर्दी उसळलेली असे. सोनेरी अंबारीत विराजमान झालेल्या त्या अप्सरांना वाहणारे ते पन्नास-साठ प्रचंड हत्ती एकामागून एक असे डौलदार आणि संथ गतीने समोरून जात तेव्हा पाहणारा आश्चर्याने थक्क होऊन गेल्याशिवाय राहत नसे. या जनानखान्यानंतर आणखी एक हलका तोफखाना चालत असे.

छावणीच्या मुक्कामाचे सर्व सामान म्हणजे पेशखाना–तंबू वगैरे दुहेरी असे. पुढील मुक्काम पडला म्हणजे मागचा मुक्काम उठत असे. छावणी हलली, म्हणजे प्रथम बादशहाचे सामान हलविण्यात येई. ते वाहून नेण्यासाठी एकशेवीस हत्ती, चौदाशे उंट आणि चारशे गाड्या लागत. नुसती त्याची निरनिराळी आसने नेण्यासाठीच मुळी आठ हत्ती नेमलेले होते !

बादशहाची छावणी पडली म्हणजे प्रथम सर्वांत उंच जागी आम-खासचा म्हणजे दरबाराचा तंबू उभारण्यात येई. त्यानंतर घुशलखाना व कोतवालखाना यांचे तंबू येत आणि नंतर बादशहाचा तंबू उभारला जाई. बादशहाचा तंबू नेहमी लाल रंगाचा असे; इतरांचे हिरव्या किंवा इतर रंगांचे असत. बादशहाच्या तंबूंना मच्छलीपट्टणच्या कापडाच्या कनाती असत. त्यावर चित्रविचित्र रंगांची हजारो फुले काढलेली असत. त्यानंतर बेगमांचे तंबू असत. प्रवेशद्वारापाशी तोफखाना असे. त्यापुढे चौकीखाना असे. तेथे आळीपाळीने प्रत्येक उमराव चोवीस तास पाहारा देई. प्रत्येक उमराव स्वतःच्या छावणीपुरते गस्तवाल नेमी. सबंध छावणीभोवती दर पाचशे कदमांवर पहारेकरी असतच. दरबारच्या तंबूपुढे चाळीस यार्ड उंचीच्या खांबावर दिवा लटकत असे, त्याला 'आकाशदिवा' म्हणत. वादळात चुकलेल्या बोटींना जसा समुद्रात दीपस्तंभ, तसा सैन्यात वाट चुकलेल्यांना हा जमिनीवरचा दीपस्तंभ असे. बादशाही बाजार असे, त्यात सर्व वस्तु मिळत; पण याशिवाय प्रत्येक अमीराचा स्वतःचा बाजार असे. असे बाजार एकंदर अडीचशे होते. बादशहा आणि शहाजादे यांच्या तळाचा घेर तीन मैल असे आणि छावणीचा एकंदर घेर सुमारे तीस मैलांचा असे, म्हणजे प्रत्येक मुक्कामावर चालते दिल्ली शहरच वसत असे.

उंच आणि धिप्पाड घोड्यांवर स्वार झालेले, तसेच उंच आणि धिप्पाड असलेले पंजाबी आणि पठाण सैनिक यांच्यावर बादशहाची सारी मदार होती. त्याचप्रमाणे दक्षिणच्या डोंगरांतल्या मावळ्यांशी लढण्यासाठी म्हणून बादशहाने मुद्दाम मेवाडी आणि बुंदेले सैनिक बरोबर घेतले होते. या सैनिकांनी अनेक उन्हाळे पावसाळे पाहिले होते आणि प्रांतोप्रांती तलवार गाजविली होती. या सैन्याबरोबरचे अधिकारीही तितकेच कसलेले झुंझार आणि अनुभवी होते. त्यांपैकी अनेक जण औरंगजेबाचे प्रत्यक्ष नातेवाईकच होते. शहाआलम व कामबक्ष हे मुलगे मुइजुद्दीन व बेदरबख्त हे नातू होते. वजीर आसदखान हा औरंगजेबाच्या मावशीचा नवरा, व त्याचा मुलगा झुलफिकारखान हा औरंगजेबाचा मावसभाऊ होता. बक्षी रुहुल्लाखान हा औरंगजेबाच्या मावसबहिणीचा मुलगा, त्याचा मुलगा रुहुल्लाखान हे नातलग आपापल्या परीने पराक्रमी होतेच, पण त्याही व्यतिरिक्त बक्षी बहरामदखान, हसन अलीखान, सलाबतखान, जाननिसारखान, तुहव्वरखान, मातबरखान, तरबियतखान, मुनीमखान हे मोगल सरदार व किशोरसिंग हाडा, सवाई जयसिंग, व दतियाचा राजा राव दलपत बुंदेला यांचाही पराक्रम सामान्य नव्हता. बाहुबळाप्रमाणे बंधुबळ हेही राजकारणात मोठे बळ मानले आहे. या प्रसंगी औरंगजेबाला ते सर्वस्वी अनुकूल होते.

बोलून चालून सगळा थाटच बादशाही. औरंगजेबाच्या एका हत्तीला दिवसाला सत्तर शेर धान्य खायला लागे आणि असे हत्ती सैन्यात तीन हजार होते. पण

पैशाचा प्रश्न मुळी औरंगजेबापुढे नव्हताच. आग्र्याहून दिल्लीला त्याने राजधानी पूर्वी नेली, तेव्हा नुसता खजिनाचे न्यायला चौदाशे गाड्या लागल्या ! या प्रसंगी त्याने बत्तीस कोटी रुपयांचा खजिना बरोबर घेतला होता असे म्हणतात. त्या शिवाय अकबर, जहांगिर, नूरजहान, शहाजहान यांनी साठविलेले अक्षरक्षः अनंत भांडार त्याच्यापाशी होतेच. त्याला लाखांची गोष्ट काय होय! पुढे घडलेल्या कथेप्रमाणे अहमदाबादचा सुभेदार शुजाअतखान याला त्याने त्याचा मुलगा नजर-अली याच्या बरोबर एक हजार स्वार तयार करून पाठविण्याची आज्ञा केली होती. शुजाअतखानाने मुलगाही पाठविला नाही व स्वारही पाठविले नाहीत. त्या ऐवजी बादशहाला दोन लाख रुपये पाठविले. तेव्हा औरंगजेबाने उपहासाने त्याला लिहिले की, "स्वार पाठविता आले नाहीत म्हणून तुम्ही अल्प रक्कम पाठविली आहे. ही रक्कम म्हणजे सूर्याला धूळ दाखविणे किंवा समुद्रात पाण्याचा एक थेंब घालण्यासारखे आहे. आमचे हिंदुस्थानचे साम्राज्य म्हणजे अथांग समुद्र आहे. प्रत्येक वर्षी आणि प्रत्येक महिन्यात कोटयवधि रुपये दाखल होतात आणि खर्च होतात." औरंगजेबाच्या लिहिण्यात एका अक्षराची सुद्धा अतिशयोक्ति नव्हती.

आलमगीर ! जगज्जेता ! होय, आलमगीरच ! ते कोटीकोटीचे सैन्य, ते उन्हात तळपणारे भाले, ते खिकाळणारे घोडे, धडधडाट करीत येणारे ते तोफांचे गाडे, ते डौलाने चालणारे पर्वतासारखे गजराज, तो अंबारीत बसलेला सम्राट् पाहून कोणालाही वाटले असते, कीं हा औरंगजेब आता जग जिंकल्याशिवाय राहात नाही. मग मराठ्यांच्या टीचभर जमिनीच्या तुकड्याची काय कथा ! रविवार दि. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी ध्वज फडकवीत आणि नगारे वाजवीत, बुऱ्हाणपूरच्या दिल्ली दरवाजातून ते अफाट सैन्य गर्जत आंत शिरले आणि उत्तरेकडचा घोंघावणारा पाणलोट त्या दक्षिणच्या दरवाजावर धडका देत आदळला !

१

महाराष्ट्रावर कोसळलेले हे संकट फार मोठे होते.

गेल्या पावणेदोन वर्षांत मराठी राज्यावर केवढी मोठी संकटपरंपरा कोसळली होती ! शिवाजी महाराज दिवंगत झाले होते. राज्यक्रांति होऊन संभाजी राज्यावर आला होता. त्याला गादीवर येऊन महिना होतो न होतो तोंच जंजिऱ्याच्या सिद्दीने आक्रमण सुरू केले होते. स्वराज्याच्या उत्तर सरहद्दीवर मोगलांचे हल्ले चालू होते. त्यातच औरंगजेबाचा मुलगा अकबर संभाजीच्या आश्रयाला येऊन आधीच गुंतागुंतीची झालेली राजकीय परिस्थिति अधिकच बिकट झाली होती. संभाजीच्या विरुद्ध कारस्थान केल्याच्या आरोपावरून अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद हे शिवाजी महाराजांच्या वेळेपासून राजकारण केलेले धुरंधर मुत्सद्दी हत्तीच्या पायी देण्यात आले होते, आणि पूर्वपरंपरा नसलेला कोठचा कोण कविकलश महाराष्ट्राच्या छत्रपतींच्या गळचातील ताईत होऊन बसला होता. आणि अकबराच्या आगमनाचा अपरिहार्य परिणाम म्हणून त्याचा पाठलाग करीत स्वतः औरंगजेब चतुरंग दलासहित दक्षिणेत उतरला होता, व 'इन्द्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायाने बंडखोर अकबर व त्याला आश्रय देणारा संभाजी या दोघांचाही नायनाट करण्याची त्याची प्रतिज्ञा होती.

'Miseries come in battalions' (संकटे कधींही एकेकटी येत नाहीत) असे म्हणतात ते खरे आहे. एवढचा संकटांनी पुरे झाले नाही म्हणूनच कीं काय आणखी एक मोठे संकट महाराष्ट्रावर कोसळले. श्रीसमर्थ रामदासस्वामी परळी-सज्जनगड मुक्कामी माघ वद्य नवमी शके १६०३, २२ जानेवारी १६८२ शनिवार दोन प्रहरी समाधिस्थ झाले आणि इतकी वर्षे स्निग्ध तेजाने प्रकाशत असलेला नंदादीप कायमचा मालवला गेला.

गेल्या चाळीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासाचे समर्थ हे केवळ तटस्थ साक्षीदार नव्हते, तर दुःख, दारिद्रच उद्वेग आणि इस्लामचे आक्रमण यांनी ऐहिक आणि पारमार्थिक दृष्टीने कंगाल बनलेल्या महाराष्ट्राला पुनरुत्थानाचा मार्ग दाखविणारे क्रांतीचे अग्रदूत होते. नाशिकला रामचंद्राचा साक्षात्कार संपादन करून जेव्हा काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत त्यांनी तीर्थयात्रेच्या निमित्ताने अवघे भरतखंड पायाखाली घातले, आणि भिक्षेच्या मिषाने लहानथोर परीक्षून सोडले, तेव्हा या टोकापासून त्या टोकापर्यंत मोडलेली तीर्थक्षेत्रे, भ्रष्ट झालेली ब्राह्मणस्थाने, उद्ध्वस्त मूर्ति, भ्रमिष्ट झालेले सामान्य जन आणि वेडचासारखे वागणारे शहाणे त्यांना दिसून आले. सामान्य लोक तर घर

नाही, दार नाही, अंथरूण नाही, पांघरूण नाही. असे अखंड चिंतेच्या प्रवाही पडले होते. आक्रमण आणि दुष्काळ या दोघांच्या जात्यामध्ये प्रजा भरडून निघत होती. "पदार्थमात्र तितुका गेला । नुसता देशचि उरला । येणें करिता बहुताला । संकट जाले." इस्लामच्या उत्कर्षाने हिंदु संस्कृतीची इतकी काही पायमल्ली झाली होती की वर्णाचे गुरु असलेले ब्राह्मण सुद्धा आचारापासून चेवले होते. पण तरीही त्यांचा अहंकाराचा मूर्ख अभिमान गळत नव्हता. "राज्य नेले म्लेंच्छक्षत्री । गुरुत्व गेले कुपात्री । आपण अरत्री ना परत्री । काहीच नाही ।" ही जर बुद्धिमत्तेचे गड्डे असलेल्या ब्राह्मणांची दशा, तर बिचाऱ्या प्राकृत जनांस काय बोल लावायचा?

"मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहतो ॥" अशा चतुर कोटीतले रामदास हे संत होते. त्यांना दिसत असलेल्या भ्रष्ट लोकांना परमार्थाचा काही अधिकार नाही. कारण " प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।" असा सिद्धान्त मनाशी बाळगून त्यांनी प्रथम "आधी प्रपंच करावा नेटका ।" असा प्रपंच विज्ञानाचा उपदेश धडधडीतपणे करण्यास सुरुवात केली. " यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे ।' असे सांगून व्यवहारातली बारीक सारीक चातुर्यलक्षणे मोठ्या साक्षेपाने सांगितली. पराभूत आणि बुद्रुक संसार करण्याऐवजी " उत्कट भव्य तेचि घ्यावे । मिळमिळीत अवघेचि टाकावे ॥" असे सांगून देवांना बंदीतून सोडविणाऱ्या रामचंद्राची व हनुमानाची उपासना रूढ केली आणि या रामकृष्णांचाच जयिष्णु हिंदुधर्म महाराष्ट्रधर्म या नावाने पुन्हा एकदा पुकारला. कारण महाराष्ट्रातच सहिष्णु हिंदुधर्माचे जयिष्ण व प्रतापी हिंदुधर्मात रूपान्तर होणे शक्य आहे असा त्यांना विश्वास होता.

सुदैवाने त्यांचा हा विश्वास अनाठायी ठरला नाही. या महाराष्ट्रभूमीतच शिवछत्रपतींच्या रूपाने त्यांचे मनोरथ पूर्ण करणारा महावीर त्यांच्या डोळ्यांदेखत निर्माण झाला. अफझुलखानाला ठार मारून गर्दीस मिळविल्यानंतर महाराजांचे अभिनंदन करताना समर्थांनी म्हटले की, "धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । जाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ॥" आपल्या राजकीय अनुभवाचे सारसर्वस्व म्हणून त्यांनी सांगितले की, " म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुता दिसांचे माजले बंड । या कारणे अखंड । सावधान असावे ॥" आणि फार थोडक्यात, पण फार समर्थपणे शिवछत्रपतींचे जीवितकार्य सांगितले की, " या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्रधर्म उरला काही । तुम्हा करिता ॥"

आणि ज्या वेळी आपल्या अतुल प्रतापाने आणि साक्षेपाने महाराष्ट्रधर्माची स्थापना करून शिवछत्रपतींनी एके काळी दैत्यांनी गांजलेल्या या अवनीचे 'आनंदवनभुवन' केले, तेव्हा समर्थांचा आनंद गगनात माईना. या स्वप्नाचा ध्यास रात्रंदिवस त्यांनी घेतला होता, आणि त्या महाकवीच्या क्रान्तदर्शी प्रतिभेला पडलेले

ते महान् स्वप्न त्या कर्मयोग्याने साकार केले होते. "स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते तैसेचि होतसे ।।" या भूमीमध्ये देवाचे लोक खवळून उठले आणि पूर्वी मारलेले जे राक्षस आता बळावले होते, त्यांचा त्यांनी संहार केला. देवालये बांधली, दीपमाळा बांधल्या, स्नानसंध्येला उदंड पाणी झाले. सर्व पापी बुडाले, आणि हिंदुस्थान बळावले. या आनंदवनभुवनात अभक्तांचा क्षय झाला. त्या रामवरदायिनी मातेने पूर्वीही भक्तांस रक्षिले आणि आताही ती रक्षीत आहे. येथे वैभव आणि प्रताप सीमेला पोचले, येथून धर्म आणि लक्ष्मी वृद्धिंगत झाली. "बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला । मोडिली मांडिली क्षेत्रें । आनंदवनभुवनी ।।" परमेश्वराने पूर्वी जे बोलले होते की "धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।" त्याचा प्रत्यय आला व मोठा आनंद झाला. परम कृतार्थतेने बाहू उंचावून समर्थांनी म्हटले की, "सामर्थ्य काय बोलावे । आनंदवनभुवनी ।।" मातीतून वीर निर्माण झाले. धुळीतले ध्वज गगनात डोलू लागले. कुऱ्हाडीचे घाव घातलेला अक्षयवट परत तरारून फुलला. गुलामांच्या देशात सिंहासनाधीश्वर छत्रपति निर्माण झाला. माणसाने यापेक्षा देवाला अधिक काय मागावे आणि देवाने तरी माणसाला अधिक काय द्यावे बरे? काही नाही. काहीही नाही. समर्थांच्या सर्व इच्छा आता पूर्ण झाल्या होत्या. त्यांनी तुळजाभवानीला प्रार्थना केली व म्हटले,

"येकचि मागणे आता द्यावे ते मजकारणे ।
तुझा तू वाढवी राजा सीघ्र आम्हासि देखता ।"

पण ते होणे नव्हते. तुळजामातेच्या मनात काय होते कोण सांगणार? पण समर्थांची ही शेवटची इच्छा काही पूर्ण झाली नाही. राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांचे भाग्य कळसास पोचले, पण नंतर लौकरच त्यास ओहोटी लागली. कर्नाटकाच्या स्वारीप्रमाणे त्यांना जय सर्वत्रच मिळत होते, पण त्यांच्या कौटुंबिक जीवनात आभाळे येऊ लागली. मातोश्री जिजाबाई मृत्यू पावली आणि त्याहीपेक्षा संभाजीच्या दुर्वर्तनाने महाराजांचे चित्त पराकाष्ठेचे व्यग्र झाले. तो मोगलाकडे गेला यापेक्षा त्यांच्या काळजाला मोठी जखम दुसरी झाली नाही. तो परत आला पण जिव्हारी बसलेला घाव कधी भरून मिळाला नाही. याचे करावयाचे तरी काय, हेच त्यांना कळेना. सगळे राज्य त्याच्या स्वाधीन करणे महाराजांना सुरक्षित वाटत नव्हते, त्याला ते दक्षिणेकडचे नवे राज्य देत होते. पण संभाजीला हा पर्याय साफ नामंजूर होता. बरे त्याला जन्मभर पन्हाळगडावर अटकेत ठेवणे हेही योग्य नव्हते आणि प्रत्यक्ष पोटच्या मुलाला ठार मारणे हा मोगली मार्ग हा महाराजांच्या रक्तातच नव्हता. समर्थांबरोबर या समस्येची त्यांनी बहुत वाटाघाट केली, पण गुरु आणि शिष्य दोघेही झाले तरी भवितव्यतेपुढे काय करणार ! शेवटी या प्रश्नाची कायमची सोडवणूक काहीच न करता रायगडावर ४ एप्रिल १६८० रोजी महाराजांनी आपला अवतार समाप्त केला.

महाराजांच्या मरणाची बातमी जामुदाने कळविली तेव्हा समर्थ इतकेच म्हणाले जशी श्रींची इच्छा! पण महाराजांच्या मरणाने त्यांना पराकाष्ठेचे दुःख झाले. त्या परमविरक्त वैराग्याचे अंतःकरण अगदी फाटून गेले. त्यांनी त्या दिवसापासून अन्न वर्ज्य केले. बाहेर जाणेही सोडून दिले. फक्त दुधावर असत. समर्थांच्या शिष्या अक्का म्हणाल्या, "महाराजांच्या मरणाने त्यांना अत्यंत वाईट वाटले." तेव्हा उद्धवगोसावी म्हणाले, "समर्थांचा अवतार केवळ राजश्रीकरिताच होता. आता हेही लवकरच समाप्त होतील." त्यांचे म्हणणे खरे होते. आपलीही वेळ आता जवळ आली हे समर्थांनी जाणले.

शके १६०३ च्या चैत्र महिन्यात समर्थ रामनवमीच्या उत्सवासाठी चाफळास गेले होते. चाफळास उत्सवाकरिता हे त्यांचे अखेरचे जाणे होते. चाफळहून जाताना श्रीरामाचे त्यांनी शेवटचे दर्शन घेतले व प्रार्थना केली, "हा देह उत्पन्न करून सेवा केली ती घेतली पुढे जे आपली सेवा करतील त्यांचे कल्याण व्हावे. या संप्रदायाचा अभिमान श्रीस आहेच." चाफळहून ते परळीला परत आले व महाराजांनी बांधलेल्या मंदिरात जाऊन राहिले.

परंतु पैलतीरावर नेत्र लागले असताही ऐलतीरावरची चिंता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. रायगडावर राज्यक्रांति होऊन संभाजी गादीवर आला होता. संभाजीबद्दल त्यांचे मत फारसे चांगले कधीच नव्हते. महाराजांची त्याने केलेली अवज्ञा, त्याचे मोगलाकडे पलायन, महाराजांना त्याच्यामुळे झालेला मनस्ताप या गोष्टी त्यांनी स्वतः पाहिल्या होत्या. त्यामुळे संभाजी दर्शनास सज्जनगडाखाली आला असता, "दर्शनास येण्याचे कारण नाही" असा त्यांनी त्याला निरोप पाठविला होता. त्याची उग्र प्रकृति आणि दुसऱ्याचे तंत्राने चालण्याची प्रवृत्ति यांमुळे या नवजात राष्ट्राचे भवितव्य त्याच्या हातांत कितपत सुरक्षित राहील याची त्यांना मोठी शंका होती. "मोठे ते पाप लोकांचे। प्रभू तो जाणता नव्हे॥ वर्ततो सिकविल्या बोले। तो काय म्हैसमंगळू॥' अशा या कारभारात "धणी तो राहिला. मागे। कारबारीच चोरटे" अशी बेदादी अंधेरनगरी माजेल अशी त्यांना चिंता होती. औरंगजेबाचा मुलगा अकबर संभाजीकडे आल्याचे त्यांना कळले, "ते समयी आता काय आला म्हणोनि बोलिले. परंतु याउपरीही ते प्रान्तीचे लोक अनुकूल करून घेतील तरी उभयता योगे कार्य सिद्धीच आहे. परंतु त्वरा पाहिजे" पण ही त्वरा तर राहिली बाजूलाच, उलट अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद यांच्यासारख्या महाराजांच्या सेवकांना संभाजीने देहान्त शासन केल्याची वार्ता त्यांच्या कानावर आली. आधीच महाराजांच्या निधनाचे दुःख ताजे होते, त्यांत संभाजी सुवृत्त असता तर त्यांना थोडे फार बरे वाटले असते. त्याऐवजी त्याच्या दुर्वर्तनाच्या बातम्या येऊ लागल्या. त्यामुळे महाराजांनी उभारलेली ही स्वराज्याची

इमारत खचते आहे असे वाटून ते अत्यंत उद्विग्न झाले व म्हणाले– " शिवाजी महाराजांच्या पोटी असा पुत्र झाला. कालमाहात्म्यास उपाय नाही."

पण अखेरचा उपाय म्हणून पौष महिन्यात म्हणजे डिसेंबर १६८१ मध्ये त्यांनी संभाजीस पत्र लिहिले. या वेळेपर्यंत संभाजीने आरंभिलेले चार महिन्यांचे संहार-सत्र पूर्ण होऊन त्यात अण्णाजी दत्तो पासून सोयराबाई पर्यंत साऱ्या मातबरांची आहुति पडली होती, त्याची आणि अकबराची भेट झाली होती, आणि औरंगजेब बऱ्हाणपुरास येऊन थडकला होता. या संकटाच्या छायेमध्ये हे पत्र समर्थांनी संभाजीस लिहिले.त्यात संभाजीने आपल्या उग्र आणि उद्दाम स्वभावाला आवर घालावा, क्षमाशीलतेने कार्यकर्ते एक करून कामास लावावेत, लोकांच्या मनात आपल्याविषयी धास्ती उपजू देऊ नये, सर्वांनी कष्ट करून म्लेंच्छांवर घसरावे आणि महाराष्ट्र राज्य जिकडे तिकडे करावे असा उपदेश केलेला आहे.

अखंड सावधान असावे। दुश्चित कदापि नसावे।
तजविजा करीत बसावे। एकांत स्थळी।।
काही उग्रस्थिति सांडावी। काही सौम्यता धरावी।
चिंता लागावी पराची। अन्तर्यामीं।।
आहे तितुके जतन करावे। पुढे आणिक मिळवावे।
महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे।।

इतके लिहून समर्थ थांबले. त्यांना शिवछत्रपतींची आठवण झाली. कारण या साऱ्या सद्‌गुणांची महाराज म्हणजे मूर्तिमंत प्रतिमा होते. त्यांचे भव्य व तेजस्वी रूप आठवले. त्यांची तीक्ष्ण व अंतरंगाचा ठाव घेणारी नजर आणि अखंड मंद स्मिताने उजळलेली चर्या आठवली. त्यांचा प्रताप आणि साक्षेप आठवला, जो त्यांचेच परमभक्त रामचंद्रपंत अमात्य यांनी वर्णन केला. "ज्या ज्या उपाये जो जो शत्रु आकळावा त्या त्या उपाये तो तो शत्रु पादाक्रांत करून सालेरी अहिवंतापासून चंजी–कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले तसेच जलदुर्ग, कित्येक विशाल स्थळे, चाळीस हजार पागा, साठसत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोटयवधि खजिना, तसेच उत्तम जवाहीर, सकळ वस्तुजात संपादिले, सिंहासनारूढ होऊन छत्र धरून छत्रपति म्हणविले. धर्मोद्धार करून देव ब्राह्मण संस्थाने स्थापून यजनयाजनादि षट्‌कर्मे वर्णविभागे चालविली. तस्करादि अन्यायी यांचे नांव राज्यात नाहीसे केले. देशदुर्गादि सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविले. केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली. औरंगजेबासारिखा महान् शत्रु परितापसागरी निमग्न करून दिगंत विख्यात कीर्ति संपादिली ते हे राज्य!" त्या प्रतापाबरोबरच ज्या मार्दवाने व जिव्हाळ्याने सलगी देऊन महाराजांनी आपणाभोवती तानाजी मालुसरे, हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर, येसाजी कंक, सूर्यराव काकडे, बाजी प्रभु देशपांडे, मुरारबाजी, प्रतापराव गुजर

यांसारख्या जिवास जीव देणाऱ्या सोबत्यांची प्रभावळ निर्माण केली, त्या त्यांच्या प्रेमळ वर्तनाचीही आठवण झाली. "राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे ।।" या समर्थांच्या सूत्राचे शिवाजीमहाराज हे मूर्तिमंत प्रतीक होते.

या सर्व बाबतीत संभाजीची स्थिति किती शोचनीय आहे, वादळात सापडलेल्या तारवाप्रमाणें तो कसा वाहवत चालला आहे, त्याच्यावर संकटेंही किती भयंकर कोसळू लागली आहेत याची त्यांना जाणीव झाली. या प्रसंगी त्यांनी स्वतःच पूर्वी गायिलेल्या शिवछत्रपतींच्या गुणसंपदेचे त्यांना स्मरण झाले.

संभाजीपुढे सर्वत्र दाटू लागलेल्या या अमावास्येच्या अंधकारात त्या पुण्यश्लोक शिवकल्याण राजाविना अन्य दीपस्तंभ, अन्य आदर्श कोणता असू शकणार? अशा भावनेने आपल्या पत्राच्या शेवटी उपदेशाचे सारसर्वस्व म्हणून समर्थांनी लिहिले–

शिवराजास आठवावे । जीवित्व तृणवत मानावे ।
इहलोकी परलोकीं राहावे । कीर्तिरूपें ।।
शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।।
शिवरायाचे कैसे चालणें । शिवरायाचे कैसे बोलणे ।
शिवरायाचे सलगी देणे । कैसे असे ।।
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधनाची लगबग । कैसी असे ।।
त्याहूनि करावे विशेष । तरीच म्हणवावे पुरुष ।
या उपरी आता विशेष । काय लिहावें ।।

संभाजीस लिहिलेले पत्र हे समर्थांचे शेवटचे ऐहिक व राजकीय कार्य होय. यावर फार दिवस गेले नाहीत. माघ कृष्ण नवमीच्या दिवशी समर्थ श्रीराम मूर्तीकडे ध्यान लावून बसले. त्यांच्या प्रयाणाचा समय जवळ आला हे पाहून शिष्य मंडळी अत्यंत व्याकूळ झाली, तेव्हा समर्थ म्हणाले, "इतके दिवस अध्यात्म ऐकून हेच फळ काय?" तेव्हा शिष्य म्हणाले, "परमार्थदृष्टीनें स्वामी जगदंतरी आहेत हे खरे परंतु आता प्रत्यक्ष भाषण व दर्शन होणार नाही म्हणून खेद वाटतो" तेव्हा समर्थ म्हणाले, "आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध । असता न करावा खेद । भक्तजनी ।।" नंतर समर्थांनी एकवीस वेळा 'हरहर' शब्द करून 'श्रीराम' असे म्हणून मूर्तीकडे अवलोकन केले तों त्यांच्या मुखातून दिव्य तेज निघून मूर्तीच्या मुखात प्रविष्ट झाले. अशा प्रकारे समर्थांचा अवतार समाप्त झाला. ही गोष्ट माघ वद्य नवमी, शके १६०३, २२ जानेवारी १६८२ रोजी घडली. त्या दिवशी शनिवार होता.

संभाजीला ही बातमी समजल्यानंतर समर्थांच्या उत्तर कार्यासाठी त्याने पुष्कळ द्रव्य देऊन रामचंद्रपंत अमात्य यांस पाठविले. दीड महिन्यानंतर स्वतः समाधीला भेट दिली व मोठे देवालय बांधवून मठाच्या खर्चाची सर्व व्यवस्था करण्याचा रामचंद्रपंत अमात्य व खंडोबल्लाळ यांस हुकूम केला. संभाजीवर समर्थांची विशेष प्रीति नसली तरी संभाजीच्या अंतःकरणात मात्र समर्थांबद्दल नितांत आदराचीच भावना होती.

समर्थांच्या निर्याणाने महाराष्ट्राच्या जीवनातील एक शुभशक्ति कायमची अंतर्धान पावली. प्रथम शिवछत्रपति गेले. आता समर्थ गेले. दोन वर्षांत दोन महापुरुष गेले. आता खराच कृष्णपक्ष सुरू झाला. क्षितिजाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत काजळासारखा अंधार दाटून भरून राहिला. एक म्हणजे एक तारासुद्धा दृष्टिपथात येईना. रायगडच्या माथ्यावर वादळी ढग जमा होऊ लागले होते. उत्तरेचे तुफानी वारे घोंघावू लागले होते, ढग गडगडत होते आणि विजा तळपू लागल्या होत्या.

आता काळ मोठा कठीण आला होता. खरोखर महाराष्ट्राच्या नव्या राज्याला आणि नव्या राजाला काळ तर मोठा कठीण आला होता.

छत्रपति संभाजी

(उत्तरार्ध)

(१३ नोव्हेंबर १६८१ ते ११ मार्च १६८९)

पडलीच उडी की तडितेचा आघात
उल्केपरि तळपत कण्यांत घुसले दांत ।
विळख्यांवर विळखे कसून चढवी सर्प
फुंफाट करी अन् पिशापरी त्वेषांत ।

– कुसुमाग्रज
(अहिनकुल)

१०

अठ्ठावीस वर्षे !

यापूर्वी औरंगजेब बुऱ्हाणपूरला आला होता त्याला आता अठ्ठावीस वर्षे उलटून गेलेली होती. एवढ्या प्रदीर्घ काळात बाहेरच्या जगात व त्याच्या स्वत:च्या जीवनात एखाद्या धरणीकंपाप्रमाणे केवढ्या प्रचंड उलथापालथी घडून आल्या होत्या ! त्या वेळी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत दिल्लीच्या शहेनशहाचा डंका वाजत होता; आज, त्या वेळेला कोणाच्या स्वप्नातही आले नव्हते ते मराठ्यांचे सिंहासन दक्षिणच्या कोपऱ्यात उभे राहिले होते. आणि दिल्लीच्या शाही तख्ताला बेदरकारपणे आव्हान देत होते, आकाशात दूर क्षितिजावर एक धूसर काळा ठिपका दिसला होता आणि आज पाहता पाहता त्याचा वादळी ढग होऊन तो गर्जू लागला होता. त्या वेळेला औरंगजेब शहाजादा होता; आज सम्राट् होता. त्या वेळेला दारा होता, शुजा होता, मुराद होता, शहाजहान होता, आज त्यांपैकी कोणीही नव्हते. आपल्या एका मुलाला व एका मुलीला तुरुंगांत टाकणारा, आणि उरलेल्या मुलाचा अहोरात्र संशय घेणारा तो हतभागी बाप आणखी एका बंडखोर मुलाचा काटा काढण्यासाठी दक्षिणच्या जंगलात निघाला होता. मुलाबाळांनी भरलेल्या संसारात आणि सेवकांनी गजबजलेल्या प्रासादात तो बिचारा अगदी एकटा होता. आपले म्हणण्यासारखे त्याला कोणीही नव्हते. त्या वेळी झैनाबादी होती. आज तिच्या फक्त आठवणी उरल्या होत्या. त्या वेळी तो तरुण होता. आज कृतांतकटकाची पांढरी ध्वजा मस्तकावर फडकू लागली होती.

पण सर्व गोष्टी बदलल्या तरी दोन गोष्टी बदलल्या नव्हत्या. बुऱ्हाणपूरच्या तापीचा तो प्रसन्न आणि गंभीर प्रवाह तसाच अखंड वाहत होता. आणि इस्लामचा सितारा दुनियेमध्ये बुलंद ठेवण्याची औरंगजेबाची जिद्द तशीच अजिंक्य राहिलेली होती. तेवीस वर्षांपूर्वी या बुऱ्हाणपुरातूनच तो दक्षिणेतून उत्तरेत राज्यपद मिळविण्यासाठी गेला होता, तो याच अनिवार इच्छेने. राज्यामध्ये इस्लामचे अधिराज्य स्थापन करण्यासाठी आणि अखेरच्या न्यायाच्या दिवशी परमेश्वरापुढे नि:शंक मनाने जाब देण्यासाठी केवळ नाइलाज म्हणून राजमुकुटाचे अवजड ओझे मी स्वीकारले असे उत्तर त्याने शहाजहानला दिले होते. इस्लामचा ध्वज उंच ठेवण्याच्या त्याच ज्वलंत आणि दुर्दम्य ईर्षेने आज, तेवीस वर्षांनंतर, जीवनाचा सूर्य पश्चिमेकडे ढळला असताना आणि संध्याकाळच्या सावल्या पडत असता, काफरांचा नि:पात करण्यासाठी तो उत्तरेतून दक्षिणेत उतरला होता. बुऱ्हाणपूरला आल्यानंतर औरंगजेबाने आपला गुरु शाह अब्दुल लतीफ याच्या दर्ग्याचे दर्शन घेतले; आणि

इस्लामच्या शत्रूंचा नाश करण्यात आपल्याला साहाय्य मिळावे म्हणून समाधीपाशी करुणा भाकली.

जिझिया कराची वसुली हा बुऱ्हाणपूर शहरात आणि परगण्यात मोठा कटकटीचा प्रश्न होऊन बसला होता. एक वर्ष असे गेले नव्हते, की ज्या वेळी हे काम सरळ रीतीने पार पडले. औरंगजेबाने आपल्या उस्तादाचा मुलगा मीर अब्दुल करीम याला या कामावर नेमले, त्याच्या दिमतीला स्वार–पायदळांचे पथक दिले आणि कोतवालाला आज्ञा केली की, कोणी कर देण्यात कुचराई केल्यास त्याला शिक्षा करण्यात यावी. स्वतः बादशहाने नेट लावल्यामुळे अब्दुल करीमचे काम फारच उत्तम प्रकारे पार पडले. ज्या बुऱ्हाणपुरातून आधीच्या वर्षी फक्त सव्वीस हजार रुपये वसूल झाले होते, तेथेच आणि तेही फक्त निम्म्या बुऱ्हाणपुरातून त्यात एक लाख आठ हजार रुपये अवघ्या तीन महिन्यांत खजिन्यात दाखल केले. औरंगजेबाने त्याची तारीफ केली आणि बढती देऊन आपणाबरोबर दक्षिणेत घेतले.

बुऱ्हाणपूरला औरंगजेबाचा मुक्काम १३ नोव्हेंबर १६८१ ते २८ फेब्रुवारी १६८२ पर्यंत म्हणजे साडेतीन महिने होता. औरंगजेब इतक्या जवळ आला म्हणून मराठ्यांच्या धामधुमीला आणि आसपासच्या अस्वस्थतेला काही पायबंद बसला असे मुळीच नाही. उलट धास्ती वाटावी अशाच काही घटना घडल्या. औरंगजेब बुऱ्हाणपूरला येण्यापूर्वी त्याच्या छावणीपासून अवघ्या चार कोसांवर असलेले एक ठिकाण मराठ्यांनी लुटले. जणू त्यांना दाखवायचे होते की प्रत्यक्ष दिल्लीपति जरी आला, तरी आम्ही त्याला भीत नाही. औरंगजेब बुऱ्हाणपूरला आल्यानंतर दहा दिवसांनीच लालबागेजवळ असलेल्या लुत्फुल्लाखान कोका याच्या तळावर दरोडा पडला. सहा माणसे मारली गेली, वीस जखमी झाली आणि मालमत्ता लुटण्यात आली. त्याच रात्री खुद्द औरंगजेबावरही कठीण प्रसंग आला होता. दैवयोग म्हणूनच केवळ तो बचावला. त्याचा मुक्काम राजवाड्यात होता, त्याला लागून असलेल्या दोन कोठारांत दारूचा स्फोट झाला. बरीच माणसे जळून ठार झाली. येथे सराई होती आणि तिच्यात बादशाही अन्न शिजत होते. स्फोटामुळे माणसे तर मेलीच, पण सराईचे छतही उडून गेले. घटना लहान असल्या तरी फार बोलक्या होत्या. गवतावरून वाऱ्याची दिशा कळते म्हणतात. त्याप्रमाणे या घटना कोठे घडल्या आणि केव्हा घडल्या यावरून ते अपघात होते की घातपात होते, याचा उलगडा होणे सोपे होते.

पण औरंगजेब अतिशय धीराचा माणूस खरा. त्याने साऱ्या प्रकाराची चौकशी केली तेव्हा त्याला समजले की तो झोपत असे, त्या महालाच्या तळघरात दारूचे तीस साठे होते. तो राज्यपद मिळविण्यासाठी बुऱ्हाणपुराहून गेला, तेव्हा राजवाड्याच्या आणि तोफखान्याच्या अधिकाऱ्यांनी ते साठे त्या तळघरात ठेवले ते आज तब्बल तेवीस वर्षे तसेच होते! बादशहाच्या राजवाड्याशेजारी दारुचा स्फोट

होत आहे, आणि बादशहाच्या महालाखाली दारूचे कोठार – ही अधिकाऱ्यांची बादशहाच्या सुरक्षिततेची काळजी ! औरंगजेब अतिशय चिडला पण त्याचे आत्मसंयमन जबर. त्याने फक्त त्या अधिकाऱ्यांच्या मन्सबी कमी केल्या व त्यांची कडक शब्दांत कान उघाडणी करून म्हटले, "जहांगीर बादशहा असता तर त्याने तुम्हा सर्वांना याच दारूच्या कोठारात घालून उडवून लावले असते!"

अजमीरहून निघण्यापूर्वी ३१ जुलै १६८१ रोजी औरंगजेबाने आपला मुलगा शहाजादा आज्जम याला प्रचंड सैन्यानिशी दक्षिणेवर पुढे रवाना केले होते. औरंगजेब बुऱ्हाणपुरास पोचण्यापूर्वी दोनच दिवस अगोदर म्हणजे ११ नोव्हेंबर १६८१ रोजी तो औरंगाबादेस पोचला. औरंगाबादेस असलेला दक्षिणचा सुभेदार खानजहान बहादुर याला औरंगाबादऐवजी भीमाकाठी बहादुरगड येथे ठाणे कायम ठेवण्याचा औरंगजेबाने हुकूम दिला. बुऱ्हाणपूरच्या वाटेवर असतानाच २४ ऑक्टोबर रोजी औरंगजेबाने निजामुल्मुल्काचा आजा व शिहाबुद्दीन ऊर्फ गाजिउद्दीन फिरोजजंग याचा बाप चिनकिलीजखान ख्वाजा आबिद याची दक्षिणेकडे रवानगी केली. तो स्वतः १३ नोव्हेंबर रोजी बुऱ्हाणपुरास पोचला. याशिवाय त्याने जंजिऱ्याच्या सिद्दीला हाताशी धरून त्याने आरमार वाढवून संभाजीवर स्वारी करण्याचा व शहाजादा अकबर कोकणात होता त्याला समुद्रमार्गाने पळून जाऊ न देता पकडण्याचा हुकूम केला. इतकेच नव्हे तर ७ नोव्हेंबर रोजी राजपुतान्याच्या युद्धात कर्तृत्व गाजविलेला मथुरेचा फौजदार हसन अलीखान बहादुर आलमगीरशाही याला चौदा हजार फौजेसह तळ कोकणात रवाना केले. त्यासाठी नियते खैरचा फातिहा पढून त्याला खिलत, दहा हजार रुपये किमतीचा एक हत्ती व तीनशे मोहरा किमतीच्या सोन्याच्या साजासह एक घोडा बक्षीस दिला. त्याच्याबरोबर त्याची मुले हुसैनअली वगैरेंना वाढ आणि बक्षीस देऊन बापाबरोबर रवाना होण्यास हुकूम दिला.

हसनअलीखान कोकणात आला, त्या वेळी संभाजी जंजिऱ्याच्या सिद्दीवरील मोहिमेत गढून गेला होता. सिद्दी इंग्रजांच्या मुंबई बेटात पाऊस काळात निवाऱ्यासाठी राही आणि आसपासच्या मराठ्यांच्या मुलखात जाळपोळ करी. संभाजीच्या तक्रारीमुळे अखेर इंग्रजांनी मराठी मुलुखात लुटालूट करणार नाही असा सिद्दीकडून करार करून घेतला तेव्हाच त्याला मुंबईला जागा दिली; पण असे करार करणे आणि मोडणे हा सिद्दीचा नेहमीचा खेळ होता. त्यात या वेळी त्याला औरंगजेबाची फूस होती. त्यामुळे १६८१च्या डिसेंबरात त्याने पनवेलपासून चौलपर्यंतचा मराठ्यांचा किनाऱ्यावरचा प्रदेश जाळून पोळून उद्ध्वस्त केला.

सिद्दीच्या या आक्रमणाने संभाजी इतका चिडून गेला की, दर्यासागर दौलतखान आणि मायनाक भंडाऱ्याचा मुलगा यांच्या नेतृत्वाखाली दीडशे गलबते आणि पाच हजार कसलेले खलाशी यांनी सुसज्ज असलेले आपले आरमार घेऊन त्याने सिद्दीच्या खुद्द दंडाराजपुरीलाच वेढा घातला. या वेढ्याचे काम त्याने दादजी प्रभु

महाडकर याच्याकडे सोपविले. हा शिवाजीमहाराजांच्या वेळी कर्नाटकांतील बेलवडीच्या लढाईंत प्रसिद्धीस आला होता आणि पश्चिम किनाऱ्याची त्याला उत्तम माहिती होती. त्याला संभाजीने सांगितले की जंजिरा घेऊन दिला तर तुम्हांस अष्ट प्रधानातील अमात्यपद देऊ. स्वत: तो शहाजादा अकबराबरोबर दंडराजपुरीवर वीस हजार सैन्यासह खुष्कीच्या मार्गाने चालून गेला आणि अहोरात्र पंधरा दिवस त्याने जंजिऱ्याच्या तटावर तोफखान्याचा भडिमार करून ते जमीनदोस्त करून टाकले.

सिद्दीला प्रसंग तर मोठा कठीण प्राप्त झाला. पण त्याने जंजिऱ्याचा बचाव फार चातुर्याने चालविला. जंजिरा काबीज करावा अशी संभाजीची इच्छा होती. जंजिऱ्याची सबंध खाडीच मुळी कापसाच्या गासडचा आणि लाकडाच्या ओंडक्यांनी भरून काढून पाण्यातून पायवाट तयार करण्याची अचाट कल्पना त्याने काढली. आणि दादजी प्रभु व इतर निधडच्या छातीचे चार हजार लोक यांच्याकडून जंजिऱ्याला वेढा घालविला. या कामात त्यांना हुरूप यावा म्हणून प्रत्येकाला संभाजीने अर्धा शेर सोने आणि चांदीची कडी बक्षीस दिली. पण यश आले नाही. सिद्दीने वेढा मारून काढला. माणसे फार मेली. अवघे पाचशे लोक बचावले. संभाजी पुढे काही करणार एवढ्यात हसनअलीखान कोकणात आल्याचे त्याला समजले. तेव्हा दहा हजार फौज बरोबर घेऊन त्याच्यावर तो तातडीने चालून गेला.

दादजी प्रभूने वेढा पुढे चालू ठेवला. पण संभाजीच स्वत: निघून गेल्यामुळे त्यात पूर्वीचा जोम राहिला नाही. पावसाळा लागल्यावर तुफानाच्या लाटांमुळे मराठ्यांचा जोर चालेना. त्यांना नाइलाजाने वेढा उठवावा लागला. त्यांचे दोनशे लोक सिद्दीने पकडले. लगेच सिद्दीने महाडपर्यंत दादजी प्रभूचा पाठलाग करून त्याची बायकोच पळवून नेली. पावसाळा कमी झाल्यावर पुन्हा मराठ्यांनी सिद्दीवर माजगाव येथे हल्ला चढविला पण त्यातही त्यांना अपयश आले. या साऱ्या प्रकरणात संभाजीला चांगले कळून आले की, ही लढाई केवळ सिद्दीशीच नाही, पोर्तुगीजांशी पण आहे. कारण पोर्तुगीजांनी सिद्दीला त्यांच्या चौल बंदरात राहून मराठी मुलुखात लूटमार करू दिली होती. या वेळीही त्याने त्यांना धमकी दिली होती, की जर त्याच्या माणसांना दंडाराजपुरीवर उतरविण्यात त्यांनी मदत केली नाही, तर तो खालच्या चौलाचे तट सर्व जमीनदोस्त करून टाकल्याशिवाय राहणार नाही. पण याच वेळी हसनअलीखान कोकणात येऊन थडकल्यामुळे संभाजीचे हात बांधले गेले, पण त्याने मनाशी पक्की खूणगाठ बांधली की या पोर्तुगीजांचा काटा केव्हा तरी काढलाच पाहिजे.

सिद्दीच्या या प्रकरणात मुंबईकर इंग्रजांचे धोरण हा आणखी एक संभाजीला मोठा त्रासदायक गुंता होऊन बसला होता. त्यांच्या मुंबई बंदराचा आसरा घेऊन तर सिद्दी संभाजीच्या मुलुखात जाळपोळ करीत असे, आणि इंग्रजांचे संभाजीशी जसे शत्रुत्व नव्हते तसे सिद्दीशीही नव्हते. संभाजीने फारच तक्रार केली तर ते

सिद्दीला तेवढ्यापुरती ताकीद देत एवढेच. त्यात पुन्हा मुंबईकरांना निर्णयस्वातंत्र्य काहीच नव्हते. त्यांचे वरिष्ठ सुरतकर इंग्रज ठरवतील ते धोरण त्यांना बिनतक्रार मान्य करण्यावाचून गत्यंतरच नसे. आणि सुरतकर इंग्रज हे सुरतेच्या मोगल सुभेदाराला बरेचसे अनुकूल होते. असा हा तिढा होता. त्यात पुन्हा कोकणात जमिनीवरून लढणाऱ्या मोगल सैन्याला जलमार्गाने रसद पुरविण्यासाठी आणि संभाजीचे पारिपत्य करण्यासाठी औरंगजेबाने प्रचंड आरमार तयार केले होते. या आरमारात बावीस जहाजे व एकशे दहा गलबते असून बारा हजार खलाशी होते. हेही आरमार वेळोवेळी मुंबईला येऊन संभाजीला उपद्रव देई. संभाजीची जिद्द अमर्याद असली तरी त्याच्याही नाविक सामर्थ्याला मर्यादा होत्या आणि त्यातही त्याच्या मुलुखावर केवळ जलमार्गानेच नव्हे, तर जमिनीवरूनही, आणि केवळ जमिनीवरूनच नव्हे तर कोकणाबरोबर देशावरूनही, औरंगजेबाने सर्व दिशांनी आक्रमण केले असल्यामुळे याची शक्ति शंभर ठिकाणी फाकली होती. अशा स्थितीत व्यक्तिश: संभाजी कितीही शूर असला तरी तो एकटा किती आघाड्यांवर लढणार होता ?

सुदैवाची गोष्ट अशी की, याच वेळी मुंबईकर इंग्रजांच्या अंतर्गत व्यवस्थेत बंडाळी निर्माण झाली आणि तिचा फायदा अकल्पितपणे संभाजीला मिळाला. मुंबई बेट हे मूळचे ब्रिटिश राजाच्या मालकीचे, ते कंपनीच्या ताब्यात गेले, हा प्रकार पुष्कळांना आवडला नव्हता. या असंतुष्ट लोकांनी रिचर्ड केग्विन नावाच्या गृहस्थाच्या नेतृत्वाखाली बंड करून प्रेसिडेंटला कैद केले आणि राजाच्या नावाने बेटाचा ताबा घेतला. या केग्विनने सत्ता हाती आल्याबरोबर पहिली गोष्ट कोणती केली असेल तर, सिद्दी आणि मोगली आरमार मुंबई बंदरात निवाऱ्यास येत असे. त्यांना येण्याची बंदी केली आणि संभाजीबरोबर मैत्रीचा तह केला. कॅ. गॅरी आणि विल्किन्स हे वकील संभाजीकडे आले. त्या संदर्भात संभाजीने रिचर्ड केग्विनला लिहिले, "तुम्ही तुमच्या कॅप्टनला मुद्दाम माझ्याजवळ सांगावयास सांगितले होते की, तुमचे व सिद्दीचे वैमनस्य आले आहे. तुम्ही त्याचा पाडाव करण्यात माझ्या मदतीची अपेक्षा करता. तशी मदत ताबडतोब देणे हे माझे कर्तव्यच आहे. तो माझाही मोठा शत्रू आहे, व तुम्ही आमचे मित्र आहात तरी मी आपणास असे सुचवितो की तुम्ही तिकडे त्याचा काटा काढा; मी माझ्या बाजूने काढतो. ज्या ज्या वेळी या कामात जी जी मदत लागेल, ती ती ताबडतोब दिली जाईल. त्याच्या योगाने या शत्रूचा संपूर्ण नाश होईल व आपली मैत्री दिवसेदिवस वृद्धिंगत होत राहील."

लंडनच्या अधिकाऱ्यांनीही केग्विनच्या या धोरणाला संपूर्ण पाठिंबा दिला. सुरतकरांना त्यांनी दुय्यम स्थान देऊन मुंबईकरांना मुख्य स्थान दिले व सूचना दिल्या की, "आमची अशी इच्छा आहे की, तुम्ही संभाजीशी संघटन राखावे व नेहमी घनिष्ठ मैत्री वाढवावी, व मग संभाजीचा प्रदेश आणि त्याचे सैन्य यांचे नेहमीच साहाय्य

असल्यावर, तुम्हांला मोगलांच्या किंवा पोर्तुगीजांच्या नाराजीला भीक घालण्याचे बिलकूल कारण नाही." याच पत्रात अधिकारी असेही लिहितात की, "संभाजी मोठा लढवय्या राजा आहे, आणि जरी तो आपले वचन पाळत नसला तरी, हे हिंदुस्थानातले राजे, त्यांच्या फायद्याचे असेल तोपर्यंत करार पाळतातच. हे काम तुमचे आहे की, आता व पुढेही वर्षानुवर्ष त्याला फायद्याचा वाटेल असा करार त्याच्याशी या वेळी करून घेणे. यासाठी, त्याला दरवर्षी हवी असलेली बंदुकीची दारू आणि बंदुका तुम्ही योग्य त्या किंमतीला पुरवाव्यात. आम्ही यासाठी या वेळी नेहमीपेक्षा दुप्पट बंदुकीची दारू पाठविली आहे." मोगल स्वराज्यावर घिरटचा घालीत असताना गेल्या दोन वर्षांत संभाजीने समुद्रावर जो पराक्रम गाजविला होता त्याला 'जलचर' इंग्रजांनी दिलेले हे प्रशस्तिपत्रक लक्षात ठेवण्यासारखे आहे.

'अंकानां वामतो गतिः!' अंकांप्रमाणे राजकारणाची गतीही वाम म्हणजे वक्रच असते. पूर्वी सिद्दीने आगळिकी केल्या म्हणून संभाजी इंग्रजांना पत्रांवर पत्रे पाठवीत होता. त्या वेळी त्यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. आता तेच इंग्रज सिद्दीच्या विरुद्ध त्याच्याशी मैत्री करण्यासाठी धडपडत होते. त्याच्या सामर्थ्याचा त्यांना साक्षात्कार झाला होता, पण संभाजीने त्यांच्याशी मुळी युद्ध केलेच नव्हते. इंग्रजांच्या अंतर्गत राजकारणात बंडाळी माजली आणि त्याची फलनिष्पत्ति सिद्दीला मुंबईतून हाकून देण्यात व संभाजीशी तह करण्यात झाली. या बंडाळीत संभाजीने कोणताच भाग घेतला नव्हता. भाग घेण्याचे त्याला कारणही नव्हते. पण स्वतः प्रयत्न करून जे त्याला मिळाले नसते, ते आपोआप त्याच्या घरी चालत आले.

पण या गोष्टी पुढील दोन तीन वर्षांत घडल्या. आज संभाजीला काय, किंवा सिद्दीला काय, किंवा इंग्रजांना काय, त्यांची कल्पना असणे शक्यच नव्हते. आज घटकेला संभाजीपुढे निकडीचा प्रश्न होता तो हसन अलीखान कोकणात येत होता, त्याचा समाचार घेण्याचा. त्यासाठी त्याने दहा हजार फौज बरोबर घेऊन घाईघाईने जंजिऱ्याहून प्रयाण केले, कारण, हसनअली थेट रायगडावरच हल्ला चढवील, अशी त्याला रास्त भीति होती.

हसनअलीखान काही सामान्य सरदार नव्हता. मथुरेचा फौजदार असताना त्याने गोकुळ जाटाच्या बंडाचा बीमोड केला होता आणि मथुरेच्या आसपासच्या खेड्यांत जाळपोळ करून हिंदूंचे बंड साफ मोडून काढले होते. प्रत्यक्ष गोकुळ जाटाला त्याने जिवंत पकडून आग्र्याला नेले होते. तेथल्या कोतवालीच्या चौथऱ्यावर त्याच्या शरीराचा एकेक अवयव तोडून त्याला ठार मारले होते, व त्याच्या बायकामुलांना जबरीने इस्लामची दीक्षा दिली होती. तीन वर्षांपूर्वी राजपुतान्याच्या युद्धात त्याने मेवाडच्या प्रत्यक्ष महाराण्याचा पराजय करून उदयपूरच्या परिसरातील एकशे त्र्याहत्तर देवळे उद्ध्वस्त केली होती. औरंगजेबाने त्याला स्वारीवा पाठविताना वेळही मोक्याची साधली होती. आणि प्रदेशही मोठ्या चातुर्याने निवड

डला होता. कारण, या वेळी संभाजी सिद्दीशी लढण्यात गुंतला असल्यामुळे उत्तर कोकण सबंध मोकळे होते व जुन्नरपासून कल्याणपर्यंतचा संभाजीचा उत्तर कोकणातला मुलूख जिंकावा, असा हसनअलीला औरंगजेबाचा हुकूम होता.

हसनअलीखान नाणेघाटातून उतरू लागला तेव्हा मराठ्यांनी त्याला अडविले. पण त्यांना न जुमानता वाटेने जाळपोळ करीत तो पुढे आला आणि त्याने ३० जानेवारी १६८२ रोजी कल्याण जिंकले. या जाळपोळीच्या सत्रात 'इन्द्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' या न्यायाने त्याने मराठी मुलुखातल्या म्हणून पोर्तुगीजांच्याही पाच सात वाड्या जाळून टाकल्या, पण हे केवळ अज्ञानाने घडले. या वाड्या पोर्तुगीजांच्या आहेत हे त्याला माहीत नव्हते. पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशी मोगलांचे वाकडे नव्हते, उलट चारच दिवसांनी मुंबईकर इंग्रजांकडे सिद्दीमहंमद नावाच्या इसमाला पाठवून हसनअलीने धान्य सामग्रीची मागणी केली होती.

हसनअलीने कल्याण सर केले खरे, पण त्याला तेथे टिकणे मुष्किल झाले. कारण धान्याचे दुर्भिक्ष्य त्याला जाणवत होतेच. त्यात जंजिऱ्याहून आलेल्या संभाजीने त्याच्यावर जबरदस्त हल्ला चढविला. या लढाईत हसनअली स्वतः व त्याच्या बरोबरचे दलपत बुंदेला, राजा महासिंग बहादुरिया, आणि हसनअलीचा मुलगा मेहमूद हे जखमी झाले आणि शिंदखेडचे जाधव हे समरांगणात ठार झाले. राणाजी आणि रावजी हे जखमी होऊन पडले असता मराठ्यांनी त्यांना उचलून नेले.

मराठ्यांचा प्रतिकार आणि धान्याची टंचाई यामुळे हसनअलीने माघार घेतली आणि कोकण सोडून फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात तो नासिकला पोचला. हसनअलीची पाठ वळताच मराठ्यांनी कल्याण परत ताब्यात घेतले. मिळून हसनअलीच्या मोहिमेची प्रत्यक्ष फलनिष्पत्ति शून्य झाली. एवढा पराक्रमी सरदार औरंगजेबाने वाजत गाजत मराठ्यांचा समाचार घेण्यासाठी पाठविला, पण मराठ्यांची थोडी चिल्लर खेडी जाळण्यापलीकडे त्याच्या पदरात काही पडले नाही. उत्तर कोकणाचे नाके जे कल्याण ते सर करूनही न केल्यासारखेच झाले. सह्याद्रीच्या माथ्यावर खंडोगणती पाऊस पडावा व तो वाहून जावा त्याला फळही येऊ नये आणि फूलही येऊ नये, तसे हे झाले.

११

२८ फेब्रुवारी १६८२ रोजी औरंगजेबाने बुऱ्हाणपूरचा मुक्काम हालविला आणि तो सरळ दक्षिणेकडे निघाला. २२ मार्च रोजी तो औरंगाबादेस पोचला. तेथून त्याने मराठ्यांवरील चढाईला नेटाने सुरवात केली. संभाजी आणि विजापूरचा आदिलशहा यांची युति होऊ नये म्हणून विजापूरच्या बाजूला शहाजादा आजम याला पाठविले. नगरकडे रुहुल्लाखानाची रवानगी केली; आणि नासिक जिल्ह्यातील रामसेजचा किल्ला जिंकून घेण्यासाठी कासिमखान किरमानी व निजामुल्मुल्काचा बाप शहाबुद्दीनखान याला रवाना केले. नासिक बागलाण भाग हा मोगलांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा होता. या भागात एक औरंगगड (मुल्हेर) वगळता बाकी सर्व किल्ले—अहिवंत गड, साल्हेर, त्रिंबक, पट्टा ऊर्फ विश्रामगड, रामसेज– मराठ्यांच्या ताब्यात होते. याच वाटेने मराठे सुरतेवर जात. सुरतेची व खानदेशची लूट मराठे येथेच आणून ठेवीत. संभाजीने बुऱ्हाणपूरची लूट साल्हेरलाच प्रथम आणून ठेविली. वेळो वेळी स्वतःच्या हक्काचा सुरक्षित निवारा म्हणून मराठ्यांना या किल्ल्यांचा उपयोग होई. जालनापूरची लूट करून येताना रणमस्तखानाने संगमनेरजवळ तीन दिवस अडवून धरल्यामुळे शिवाजी महाराजांवर मोठाच कठीण प्रसंग आला होता; प्रत्यक्ष तेच शत्रूच्या हातांत पडावयाचे, पण बहिर्जी नाईक याने डोंगरातील चोरवाटांनी त्यांना सुरक्षित पट्टा किल्ल्यावर आणवून त्यांचा बचाव केला. तेव्हापासून महाराजांनी त्या किल्ल्याला 'विश्रामगड' असे अन्वर्थक नाव दिले. कोकणात उतरण्याचा राजरस्ता हाच होता. याच नासिक त्रिंबक वाटेने शहाजादा अकबर कोकणात संभाजीकडे पळून गेला. त्याला उत्तरेकडे सुरत-अहमदाबादेकडे जावयाचे तर हाच मार्ग होता. म्हणून त्याला प्रतिबंध करण्यासाठी आणि मोगलांची कोणतीही कोकण-स्वारी यशस्वी होण्यासाठी हा प्रदेश व त्यातील किल्ले ताब्यात असणे अगदी अनिवार्य होते.

रामसेज हा किल्ला नासिकपासून चौदा मैलांवर आहे. किल्ला लहान असला तरी डोंगरी आहे, आणि पराक्रमी आणि हुशार किल्लेदार हेच खरे त्या किल्ल्याचे सामर्थ्य असल्यामुळे मोगलांच्या वेढ्यास त्याने दाद दिली नाही. कासीम खान किरमाणी हा शूर आणि तडफदार सरदार म्हणून प्रसिद्ध होता. त्याने किल्ल्यावर छापा घालण्याचा प्रयत्न केला, पण त्याला यश आले नाही आणि बादशहाही त्याच्यावर रुष्ट झाला. आपल्या कामगिरीचे वर्णन त्याने औरंगजेबाला लिहून कळविले की, "पूर्वी तोफांच्या माऱ्याने रामसेजच्या किल्ल्यातील बुरुजाची भिंत पाडली होती, म्हणून त्या वाटेने माझ्या माणसांना वर बाण फेकन किल्ल्यात जावे

असे मी ठरविले, व रात्रीच्या वेळी पांच सहाशे मेवाती व माझे लोक यांना किल्ल्यात जाण्यासाठी तयार करून हल्ला केला. शेवटी खंजरखानाच्या भाऊबंदांपैकी काही व माझे लोक किल्ल्याच्या दरवाज्यापाशी पोहोचून मोठ्याने ओरडले की, 'बेलदारांनी यावे.' त्या आवाजाने गनिमांचे लोक जागे होऊन त्यांनी दगड व बंदुकींचा मारा केला. बहुतेक सर्व बादशाही लोक कामास आले व जखमी झाले. काही प्रगति झाली नाही. सध्या हे काम हातचे गेले असे बादशाही लोक बोलतात. पण मला ते मान्य नाही. माझ्याबाबत हुकूम होईल त्याप्रमाणे करीन." कासीमखानाच्या या अर्जावर औरंगजेबाने हुकूम दिला की बरोबरच्या लोकांना शहाबुद्दिनाकडे सोडून स्वतः हुजूरास यावे. त्याप्रमाणे ९ सप्टेंबर १६८२ रोजी कासीमखान रामसेज सोडून औरंगाबादेस पोचला.

शहाबुद्दीनखान याने वेढ्याचे काम पुढे चालू केले. सुरुंग लावणे, वेढा घालणे, दमदमे तयार करून ते वर किल्ल्यावर चढविणे या बाबतीत त्याने फार मेहेनत घेतली. किल्ल्याच्या बुरुजासमोर त्याने फार खर्च करून एक प्रचंड लाकडी बुरूज तयार केला. त्यावर उभे राहून एका वेळी पांचशे माणसांनी गोळ्यांचा वर्षाव केला. पण रामसेजचा किल्लेदार हा सर्व मराठ्यांत सावध व अनुभवी होता. त्याने शहानुबुद्दीनखानाची डाळ शिजू दिली नाही. किल्ल्यात लोखंडी तोफ एकही नव्हती, पण कातडे बरेच होते. लोकांनी लाकडी तोफा बनविल्या. त्यात ते कातडे भरून तोफ उडवीत. असली एक तोफ दहा तोफांचे काम करी. शहाबुद्दीनखानाने हल्ला चढविला पण त्यात मोंगलांचीच बरीच माणसे मारली गेली आणि दतियाचा राव दलपत बुंदेला हा दगडाच्या माऱ्याने जखमी झाला. मे महिन्यात बाहेरून रूपाजी भोसले आणि मानाजी मोरे यांनी गणेशगावाजवळ शहाबुद्दीनखानावर हल्ला चढविला आणि त्याची पांचशे घोडी पाडाव केली. शेवटी औरंगजेबाने शहाबुद्दीनखानालाही परत बोलाविले. त्याने त्याला लिहिले की, " तू रामसेजचा किल्ला घेण्याबाबत खूप कष्ट घेतलेस. स्वतःचा जीव गमवण्यास देखील मागे पुढे पाहिले नाहीस. सध्या तो किल्ला खानजहान बहादुराच्या अधिकाराखाली दिला आहे. तो बादशाही अमलाखाली आणील. खानजहान बहादुराजवळ तोफखाना सोडून तू स्वतः आपल्या जमेतीसह अंतूरचा ठाणेदार अहमदयानजवळ पोहचावे " २६ सप्टेंबर १६८२ रोजी शहाबुद्दीनखानाला परत बोलावण्यात आले.

ज्या रामसेजपुढे कासिमखान आणि शहाबुद्दीनखान यांच्यासारख्या पराक्रमी सरदारांनी हात टेकले, तेथे खानजहान काय पराक्रम करणार ही गोष्ट उघड होती. खानजहान ऊर्फ बहादुरखान हा औरंगजेबाचा दूधभाऊ जरी असला तरी त्याच्या कर्तृत्वाबद्दल औरंगजेबाचे मत फारसे बरे नव्हते. संभाजीने बुऱ्हाणपूर लुटले त्या वेळी केवळ खानजहानच्या गलथानपणामुळे संभाजी सुरक्षित निसटला याबद्दल औरंगजेबाची खानजहानवर फार गैरमर्जी झाली होती. पुढेही वारंवार

आधी ताकीद देऊनही केवळ गाफीलपणामुळे खानजहानने अकबराला कोकणात निसटू दिले म्हणून औरंगजेब त्याच्यावर अतिशय संतापला होता, त्यामुळे रामसेजवर जरी पाठविले तरी खानजहान तेथे कितपत यश मिळवील याबद्दल औरंगजेबाला जबरदस्त शंका होती.

आणि झालेही तसेच. बिचाऱ्या खानजहानने आपल्या बाजूने चातुर्याची शर्थ केली पण त्याला यश लाभले नाही. एकदा त्याने रात्री किल्ल्यावर छापा घालण्याचा बेत केला. त्याने असे ठरविले की किल्ल्याच्या एका बाजूला आपण हल्ला करणार म्हणून पुकारा करावा. तिकडे तोफा, दारूगोळा, तोफखान्याची माणसे, बाजारबुणगे यांना नेऊन खूप गडबड उडवून द्यावी. म्हणजे किल्ल्यातील लोक तिकडे गोळा होऊन बंदोबस्त करू लागतील. त्याच वेळी किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस योग्य जागा शोधून शे दोनशे शूर आणि पटाईत शिपायांनी मशाली वगैरे न घेता दोराच्या साहाय्याने सापाप्रमाणे किल्ल्यावर पोचावे. बेत तर फार चातुर्याचा होता. पण दुर्दैव इतकेच की रामसेजचा किल्लेदार खानजहानपेक्षा थोडा अधिक चतुर होता. त्यामुळे ज्या बाजूला तोफा आणि बाजारबुणगे जमा करून खानजहानने गडबड उडवून दिली होती, तिकडे त्यानेही माणसे जमा करून गडबड सुरू केली व वरून दगडांचा आणि तेलाने माखलेल्या कपड्यांचा त्यांच्यावर पाऊस पाडला; आणि जेथून खानजहानची माणसे वर चढून येणार होती तेथे शूर व निवडक शिपायांना शस्त्रे सरसावून आवाज न करता बसवून ठेविले. ठरलेल्या वेळी मोगलांची दोन माणसे वर चढली. त्यांची डोकी दिसताच दबा धरलेल्या मराठ्यांनी आपल्या शस्त्रांनी त्यांच्यावर इतक्या जोराने आघात केला की त्यांचे डोळेच बाहेर आले. ते तर खाली फेकले गेलेच, पण मोठ्या कष्टाने त्यांच्या मागोमाग जी माणसे चढत होती, तीही खानजहानच्या बेताबरोबरच कोसळली.

शौर्य थकले व चातुर्यही कुंठित झाले, तेव्हा खानजहानने जादूटोण्याचा सुद्धा प्रयोग त्या दुष्ट किल्ल्यावर करून पाहिला. त्याचा मोतद्दार त्याला म्हणाला, "भुते वश करण्याच्या कामात मी पटाईत आहे. शंभर तोळे वजनाचा एक सोन्याचा साप तयार करून माझ्या हातात जर दिला व हल्ल्याच्या वेळी मला पुढे ठेवले, तर भुतांच्या मदतीने मी सहज किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत जाऊ शकेन." खानजहानने त्याप्रमाणे सोन्याचा साप करून त्याला दिला व हल्ल्यात आघाडीला ठेविले. इतक्यात किल्ल्यावरून गोफणींतून एक दगड इतक्या जोरात त्या मोतद्दाराच्या छातीत बसला की सोन्याचा साप तर त्याच्या हातातून उडालाच पण तो स्वतःही खाली कोसळला.

आपल्या दूधभावाच्या अचाट कर्तृत्वाच्या या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी औरंगजेबाला कळतच होत्या. या खानजहानने औरंगजेबाला मुचलका लिहून दिला होता की, " रामसेजास वेढा दिला आहे. बादशाही सुदैवाने तो लवकरच

जिकून बादशाही अंमलाखाली आणण्याची आशा करतो." पण तो मुचलका खरा ठरावा असे बादशाही सुदैव नव्हते. या मुचलक्यानंतर महिनाभर वाट पाहून औरंगजेबाने २६ ऑक्टोबर १६८२ रोजी खानजहानची रामसेजहून उचलबांगडी केली. रणमस्तखान तळ कोकणात रवाना झाला होता, त्याच्या मदतीसाठी त्याने स्वतः तळ कोकणच्या खोऱ्यातील घाटावर थांबून रणमस्तखानास फौजेसह सज्ज करून त्यास सदर खोऱ्याच्या वाटेस पोचवावे, असा त्याला हुकूम पाठविला. खानजहान साहजिकच फार दिलगीर झाला. त्याने कळविले की, "मला एक आठवडयाची मुदत मिळाली तर किल्ला बादशाही अमलाखाली आणीन. हुकूमाविरुद्ध सबब नाही." पण त्याच्या आश्वासनाचा औरंगजेबाला आता कंटाळा आला होता. त्याने त्याच्या विनंतीकडे बिलकूल लक्ष दिले नाही.

बिचारा खानजहान! केवढ्या इरेसरीने तो गड सर करायला आला होता, आणि केवढ्या नामुष्कीने तो परत चालला होता! जाताना निराशेने म्हणा की वैतागाने म्हणा, की याचा मराठ्यांना काही उपयोग होऊ नये या कावेबाज उद्देशाने म्हणा, त्याने शहाबुद्दीनखानाने गोळ्या मारण्यासाठी जो प्रचंड लाकडी बुरुज उभा केला होता, त्यात गवत आणि पेंढा घालून त्याला आग लावून दिली. तो भडका पाहायला किल्ल्यावरचे समस्त मराठी नगारे व चौघडे वडवीत तटावर जमा झाले होते. खानजहानने बुरुजाची व इज्जतीची होळी पेटविली होतीच. भरीला भर म्हणून गडावरच्या मंडळींनी त्या होळीला मुक्तकंठाने शंखवाद्याची साथ दिली. व खानजहानच्या नावाने अक्षरशः शिमगा साजरा केला. 'बहादुरखान म्हणजे पेंडोचे गुरु' अशी शिवाजी महाराज त्याची थट्टा करीत असत. ती रामसेजच्या मराठ्यांनी पुन्हा एकदा सार्थ केली. संभाजीने रामसेजच्या त्या पराक्रमी किल्लेदाराकडे मुद्दाम खिलतीचा पोषाख, रत्नजडित कडे व रोख रक्कम पाठवून त्याचा गौरव केला.

कथा अशी आहे की, पंचेचाळीस वर्षापूर्वी शहाजहानने दक्षिणेत स्वारी केली असता, प्रथम त्याने रामसेज सर केला, आणि नंतर बाकीचे किल्ले भराभर त्याच्या ताब्यात आले; त्या दृष्टीने रामसेज हा औरंगजेबाच्या मते 'शकुनाचा किल्ला' होता; म्हणून दक्षिणेत आल्यावर प्रथम त्याच किल्ल्याला वेढा घालण्याचा त्याने हुकूम केला, त्या शकुनाच्या किल्ल्यावरच 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' या न्यायाने असा अपशकुन झाल्यामुळे औरंगजेब फार कष्टी झाला, खानजहानला तर 'खाऊ का गिळू' असे त्याला झाले. त्या वेढ्यात खानजहानने खर्च केलेली सगळी रक्कम वसूल करण्याचा त्याने निश्चय केला. "रुहुल्लाखानास हुकूम झाला की खानजहान बहादुराने रामसेजचा किल्ला बादशाही अंमलाखाली आणीन असा मुचलका दिला होता; परंतु त्याप्रमाणे तो आणला नाही. त्यासाठी सरकारी रक्कम किती खर्ची पडली आहे त्याबाबत अर्ज करावा." त्याने अर्ज केला की, "रोख व

जिन्नस मिळून ३७६३० रुपये खर्च झाले. हुकूम झाला की ते खानाच्या मागण्यामध्ये दाखल करावे." या प्रकरणानंतर तीन महिन्यांनी खानजहान औरंगजेबाची भेट घेण्यासाठी औरंगाबादेपासून तीन कोसांवर आला असता, बादशहाने त्याला भेटीस येऊ दिले नाही. त्याचा मुलगा नुस्रतखान याच्याबरोबर त्याला वस्त्रे पाठविली व हुकूम धाडला की, "तुम्ही भेटीस येण्याचे कारण नाही. तुम्ही बिदरच्या दिशेने कूच करून तिकडेच तळ द्यावा. तो अपेशी अकबर जेथे जेथे म्हणून परागंदा होऊन भटकत आहे, असे तुम्हांला कळेल, तिकडे पोहोचून तुम्ही त्याचा पाठलाग करावा."

रामसेजची कथा ही अशी झाली. अकबराच्या पाठलागावर खानजहानला बिदरकडे पाठविले होते, त्याने एका महिन्याच्या आत औरंगजेबाला कळविले की, "बंडखोर अकबर हा दुष्ट संभाजीच्या राज्यातून बाहेर पडून जहाजावर स्वार होऊन पळून गेला." प्रतिपक्षाची बातमी ठेवण्याची ही खानजहानची दक्षता आजपर्यंतच्या त्याच्या लौकिकाला साजेशीच होती; त्यामुळे औरंगजेबाने त्याच्यावर नेहमीप्रमाणे विश्वास ठेवला नाही, हे सांगणे नकोच; कारण यानंतर चार वर्षे अकबर संभाजीच्या राज्यातच होता. पण मराठ्यांचा पाठलाग करताना नासिक व नांदेड भागात खानजहानच्या पायाचे तुकडे पडायची वेळ आली एवढे मात्र खरे. पाथरी भागात बादशहाचे व शाहजादा मुअज्जमचे हत्ती चारणीसाठी ठेवले होते, ते मराठ्यांनी हाकलून नेले अशी बातमी लागल्यावरून खानजहान झपाट्याने त्यांच्या पाठलागावर निघाला. त्याने मराठ्यांना गाठून हत्ती सोडविले खरे, पण या पाठलागात त्याला नांदेडपासून गोवळकोंड्याच्या सरहद्दीवरील तुरुकचांद्यापर्यंत दमछाक होईपर्यंत धावपळ करावी लागली. त्याचे जेवण्याखाण्याचे मनस्वी हाल झाले. खुद्द त्याचा तंबू त्याच्याबरोबर नव्हता. ही बादशाही मनसबदाराची कथा. मग इतरांची गोष्ट काय बोलावी!

नासिक, नगर, औरंगाबाद भागात मराठ्यांची फिरती सैन्ये धुमाकूळ घालीत होती. बहादुरगडाहून हसनअलीखान परिंड्याकडे मराठ्यांवर चालून जात असता फलटणजवळ मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला केला आणि त्याला जखमी केले. औरंगजेबाने जून महिन्यात शहाजादा आजम याला विजापूरच्या सरहद्दीवर पाठविले होते. त्यालाही मराठ्यांनी फार छळले. जुलै महिन्यात हंबीरराव मोहित्याने त्याच्यावर अठरा हजार सैन्यानिशी चाल केली. संभाजीच्या राज्यात एके ठिकाणी आपला तळ कायम करून तो पुढे गेला. मराठ्यांनी खुद्द त्याच्या तळावरच हल्ला करून मोठा कठीण प्रसंग आणला. या तळावर आजमची बायको जहांजेब बानू बेगम व तिच्या संरक्षणासाठी राव अनिरुद्धसिंह हाडा याच्या नेतृत्वाखाली रजपुतांचे सैन्य होते. बाई मोठी धीराची होती. मराठे चालून आल्याचे कळल्यावर ती स्वतः हत्तीवरून अनिरुद्धसिंह 'नको नको' म्हणत असता दोन मैल

पुढे चालून आली, तिने आपल्या हाताने रजपुतांना भाले दिले, व म्हणाली, "आपले सैन्य लहान आहे, परमेश्वराने आपल्याला जय मिळवून दिला तर चांगलेच आहे. नाही तर तुम्ही माझ्याबद्दल निश्चित रहा. मी आपले काम उरकून टाकीन." यानंतर मोठ्या निकराचे युद्ध झाले, त्यात अनिरुद्धसिंहाला जय मिळाला खरा पण त्याचे नऊशे रजपूत ठार झाले व स्वतः त्यालाही अनेक जखमा झाल्या. जहांजेब बानूने त्याचे समाधान केले. आणि आपल्या गळयातील चाळीस हजारांचा मोत्याचा कंठा स्वतः आपल्या हाताने त्याच्या गळयात घातला. आजमला जेव्हा आपल्या बायकोच्या पराक्रमाची हकीकत समजली तेव्हा त्याला धन्य धन्य वाटले. तो येऊ शकला नाही, कारण, तळावर छापा पडला, त्याच वेळी मराठयांच्या दुसऱ्या तुकडीने लढण्यात त्याला गुंतवून ठेवले होते. आजम लढाया करीत कोल्हापुरापावेतो आला पण मराठयांपुढे त्याचा टिकाव लागला नाही. फेब्रुवारी १६८६ मध्ये हंबीरराव मोहिते याने त्याला स्वराज्यातून घालवून दिले.

एक वर्ष झाले, कडेकोट तयारीनिशी संभाजीच्या राज्यावर हल्ल्यावर हल्ले औरंगजेब चढवीत होता, पण अजून लढाईचा पहिलाच दिवस होता. संभाजीच्या अंगावर पुसटता ओरखडा सुद्धा उमटला नव्हता. हे पाहून औरंगजेब संभाजीवर अतिशय चिडला. सहजासहजी मनाचा तोल जाऊ देणारा माणूस तो नव्हे, पण सगळीकडून कानावर आदळणाऱ्या अपयशाच्या या वार्तांनी त्याचेही देहभान हरपले. त्याने संतापाने आपला किमॉश म्हणजे शिरोभूषण जमिनीवर आपटलें व शपथ घेतली की, "संभाजीला मारल्याखेरीज किंवा त्याला राज्यातून हाकून लावल्याखेरीज तो परत डोक्यावर धारण करणार नाही!" सुरतेच्या इंग्रजांनीही लिहिले की, "मोगल संभाजीवर अत्यंत चिडलेला आहे; आणि तो त्याच्या राज्यावर घाला घालण्यासाठी आपले सर्व सैन्य रवाना करीत आहे. त्याने फार मोठे आरमारही तिकडे जाण्यासाठी तयार केले आहे, व ते एका महिन्याभरात येथून निघेल. अशा तऱ्हेने संभाजीच्या राज्यावर जमिनीवरून व समुद्रातून असे दुहेरी हल्ले होणार आहेत. संभाजीनेही आपली अगदी जय्यत तयारी ठेविली आहे." कितीही वादळे गरजली आणि गेली तरीही चेहऱ्यावरची सुरकुती ढळली नाही अशी ज्याची आख्या, त्या दिल्लीपति आलमगिराने संतापाने बेहोष होऊन डोक्यावरची टोपी आपटावी आणि संभाजीला बरबाद केल्याशिवाय ती घालणार नाही अशी कसम खावी ही संभाजीची केवढी बहादुरी म्हणावी बरे! "शिवाजीची चिंता उरी सोसवेना" अशी शिवाजीच्या बाबतीत औरंगजेबाची केविलवाणी दशा झाली होती. संभाजी हा शिवाजीचाच मुलगा होता हे औरंगजेबाला आता खरोखरच पटले.

औरंगजेबाच्या राजकीय कुंडलीत सारे ग्रह या वेळी असे नीचीचे असताना संभाजीचे ग्रह मात्र उच्चीचे होते. जात्याच तो धाडसी आणि निर्भय होता, आणि जसजशी मोगल सैन्याची गजान्तलक्ष्मी सह्याद्रीच्या पहाडावर टकरा घेताना

भग्नदन्त होऊ लागली, तसतसा त्याचा आत्मविश्वास दुणावला. त्याने या सुमारास जयपूरचा मिर्झाराजा जयसिंग याचा मुलगा रामसिंग याला लिहिलेल्या पत्रात त्याच्या या उत्तुंग आत्मविश्वासाची उदंड प्रतीति तर येतेच, पण त्याहीपेक्षा महाराष्ट्रावर आलेले हे मोगलांचे परचक्र केवळ राजकीय नाही तर सांस्कृतिक आहे हा त्याचा विशाल आणि व्यापक दृष्टिकोनही स्पष्ट होतो. या प्राचीन आणि पवित्र भूमीमध्ये सनातन कालापासून प्रतिष्ठित असलेली हिंदु संस्कृति आणि तिचा घास घेऊ पाहणारी इस्लामी संस्कृति यांच्यात लढले जात असलेले हे जीवन-मरणाचे युद्ध आहे; केवळ मराठा हिंदूंचेच नव्हे तर या भरतखंडात पसरलेल्या 'महा'-राष्ट्रातल्या राजपुतांसारख्या सर्व हिंदूंचे हे धर्मक्षेत्र आहे, कुरुक्षेत्र आहे, या विराट् कल्पनेला कवळू पहाणारी त्याच्या प्रतिभेची उत्तुंग झेप, 'हिंदवी स्वराज्या'चा भव्य संकल्प सोडणाऱ्या त्याच्या दिगंतकीर्ति पित्याच्या तोडीची आहे, असे संभाजीचे पत्र वाचल्यावर वाटल्याशिवाय राहात नाही. आपल्या पत्रात संभाजी म्हणतो,–

"राजकीय परिस्थितीचा पूर्ण विचार केल्यानंतर तुम्ही पुन्हा लिहिलेत ते असे. तुम्ही आपल्या राज्यात सुलतान अकबर यास आश्रय दिला ही फार चांगली गोष्ट झाली. तुम्ही जे काही धोरण अंमलात आणाल ते मला मान्य आहे. आपण सगळे हिंदू आहोत म्हणून या परिस्थितीत जे काही करणे योग्य आहे असे तुम्हांस वाटेल ते करण्यास मी तयार आहे.

"हा जर तुमचा उद्देश असेल तर या कामात तुम्हीच पुढाकार घेण्यास हवा. त्या यवनाधमाला (औरंगजेबाला) सांप्रत असे वाटू लागले आहे की, आम्ही हिंदु म्हणजे तत्त्वशून्य झालो आहोत. आम्हांला धर्माचा काहीच अभिमान राहिला नाही. बादशहाची ही वागणूक यापुढे आम्हांला सहन होणे शक्य नाही. आम्हा क्षत्रिय आहोत आमच्या क्षात्रधर्माला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट आम्ही मान्य करणार नाही. वेद, श्रुतिस्मृति इत्यादींनी धर्म आणि जाति यांच्यासंबंधी कर्तव्ये नेमून दिली आहेत. त्यांची पायमल्ली झालेली आम्हांला सहन होणार नाही. राजे म्हणून आमचा प्रजापालनाचा जो धर्म आहे, तो आम्ही टाकू शकत नाही. या दुष्ट यवनांशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ति, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश, सर्व काही पणास लावण्यास तयार आहोत. या दृढ उद्देशाने गेली दोन वर्षे आम्ही अकबर आणि दुर्गादास यांना आमच्या देशात आश्रय दिला आहे. आम्ही यवनाधिपतीच्या अनेक सेनानायकांचा वध केला, कित्येकांना कारागृहात टाकले, काहींना खंडणी घेऊन तर काहींना दयाबुद्धीने सोडून दिले. काहींनी लाच चारून आपली सुटका करून घेतली. अशा रीतीने बादशहाचे सेनानायक हे बिनकामाचे ठरले. आता अशी वेळ आली आहे की, त्या यवनाधमाला (औरंगजेबाला) पकडून कारागृहात घालणे शक्य होईल. मग आपल्याला देवतांची पुन्हा स्थापना करून

धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पडतील अशी व्यवस्था करता येईल. हे सगळे लवकरच करण्याचे आम्ही ठरविले आहे, याची आपण खात्री बाळगावी."

"पण आपल्या मानाने आम्ही अल्पवयी आणि अननुभवी आहोत. आपल्या धर्माभिमानाच्या आणि शौर्याच्या अनेक गोष्टी आम्ही ऐकल्या आहेत. तुम्ही या वेळी सप्तांगराज्यसंपन्न आहात. तुम्ही या वेळी धैर्य आणि साहस दाखविलेत तर आणि या यवनाची (औरंगजेबाची) शक्ति नष्ट करण्याच्या कामात आम्हांला मदत केलीत तर आपण काय करू शकणार नाही? या गोष्टीचा जेव्हा आम्ही विचार करतो, तेव्हा आपण धर्माभिमान सोडून अशा प्रसंगी गप्प बसून राहिला या गोष्टीचे आम्हांला आश्चर्य वाटते."

"आणखी एक गोष्ट. दुर्जनसिंह हाडा हा कशा प्रकारचा मनुष्य होता हे आपणा दोघांनाही माहीत आहे. त्याच्यापाशी किती संपत्ति होती हेही आपल्याला माहीत आहे. पण त्याने आपल्या संपत्तीवर पाणी सोडले. आणि आमच्या सूचनेस अनुसरून त्याने शौर्य गाजवून धामधूम उडवून दिली. तुम्ही तिकडच्या भागात असल्यामुळे तुम्हांला हे सर्व माहीतच असेल."

" इकडे आम्ही अकबर आणि दुर्गादास यांना गुजरातेत पाठविण्याच्या विचारात आहोत. या वेळी आपणही जे काही आवश्यक आहे ते धैर्यपूर्वक करावे. पठाणाधिप (इराणचा शहा अब्बास) याने आपण अकबराला मदत करू असे लिहिले आहे. पण या बाबतीत आपण यवनांची मदत घ्यावी व यशाचे श्रेय त्यांना मिळवून द्यावे हे मला अनुचित वाटते. आपले पिते (जयसिंग) यांनी यवनाधमाला (औरंगजेबाला) दिल्लीश्वर करून त्याचे श्रेय संपादिलेच ना. त्याप्रमाणे आपणही अकबराला मदत करून यशाचे धनी व्हावे. यवनांच्या मदतीने अकबराला राज्यपद लाभले तर त्यांना प्राधान्य लाभेल. ही गोष्ट आपण होऊ देऊ नये. आपण उभयतांनी एक होऊन अकबराला गादीवर बसविले तर धर्मरक्षणाचे कार्य होईल आणि आपल्या या कार्याने महाराज जयसिंह यांच्या वंशाला शोभा येईल."

१२

संभाजीने हे पत्र रामसिंगाला लिहिले तेव्हा त्याच्या प्रत्यक्ष राजधानीच्या परिसरात लढाईची ऐन रणधुमाळी माजली होती. हसन अलीखान कोकणातून मार खाऊन परत गेल्यानंतर सहाच महिन्यांत औरंगजेबाने पुन्हा कोकणावर चढाई केली होती. २८ सप्टेंबर १६८२ रोजी त्याने रणमस्तखान पन्नी याला 'बहादुरखान' असा किताब देऊन कोकणात रवाना केले होते, तो ज्या वेळी संभाजीने रामसिंगाला पत्र लिहिले तेव्हा म्हणजे डिसेंबरात जाळपोळ करीत कोकणात येऊन पोचला होता.

रणमस्तखान हा विशेष नामांकित सरदार होता. त्याचा बाप खिजरखान पन्नी हा विजापूरचा वजीर बहलोलखान याचा विश्वासू सहायक होता. विजापूर दरबारात दक्षिणी आणि अफगाण मुसलमानांत जी भांडणे होती, त्यांत शेख मिनहाज या दक्षिणी सरदाराने त्याचा खून केला. मूळचे हे विजापूरचे. पन्नी सरदार बहादुरखान ऊर्फ खानजहान याने फोडून मोगलांकडे आणले होते. रणमस्तखान व त्याचा भाऊ दाऊदखान हे दोघेही पराक्रमी होते. रणमस्तखानाने प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांना जालनापूर लुटून परत येत असताना संगमनेरजवळ लढाई करून तीन दिवस अडवून धरले होते. जेव्हा बहिरजी नाइकाने डोंगरातील आडवाटांनी त्यांना पट्टा किल्ल्यावर सुरक्षित नेऊन पोचविले तेव्हाच त्यांचा बचाव झाला. नाहीतर प्रत्यक्ष महाराजांनाच कैद करण्याची वेळ रणमस्तखानाने आणली होती. इतकी बहादुरी गाजविणारा सरदार खरोखरच 'बहादुरखान' या किताबाला पात्र होता यात शंका नाही. औरंगजेबाने त्याला इनाम देऊन तळ कोकणाच्या खोऱ्याकडे रवाना केले. रणमस्तखानास खिलत, सोन्याच्या साजाचा घोडा व हत्ती दिला. तो पांच हजारी होता. त्याचा भाऊ दाऊदखान यास खिलत व सोन्याच्या साजासह घोडा दिला. तो चार हजारी मनसबदार होता. त्याला पाचशे स्वारांची वाढ केली. निघताना औरंगजेबाने रणमस्तखानास थोडेसे विचित्र प्रश्न विचारले. बहादुरखानास (रणमस्तखानास) हुकूम झाला, "तू काही वाचले आहेस काय? त्याने अर्ज केला की मी कुराण वाचले आहे व संपूर्ण कुर्स माहिती असून ते उद्‌धृत करता येते. हुकूम झाला की, तुला किती मुले आहेत? अर्ज केला की तीन मुले आहेत. ऐकून बादशाह गप्प बसला. असल्या विक्षिप्त प्रश्नांवरून औरंगजेबाच्या मनात काय होते ते कळणे कठीण आहे. त्याला आपल्या सरदारांच्या पांडित्याचा ठाव पाहावयाचा असल्यास न कळे.

रणमस्तखान कोकणात आला, व त्याने सपाटयासरशी कल्याण काबीज केले पण मराठयांनी त्याला स्वस्थता लाभू दिली नाही. संभाजीने त्याच्यावर रूपाजी. भोसले, केसोपंत व निळो मोरेश्वर पेशवे यांना रवाना केले. वेळोवेळी रणमस्त-खानावर मराठयांचे लहान मोठे हल्ले होतच होते. ३ जानेवारी १६८३ ला त्याने औरंगजेबाला कळविले की " सध्या आणखी दोन वेळा शत्रूच्या लोकांनी बादशाही लष्करावर अचानक हल्ला केला. बादशाही सुदैवाने शत्रूच्या अनेक लोकांना ठार मारले व जखमी केले." आणखी पाच दिवसांनी म्हणजे ८ जानेवारी १६८३ रोजी संभाजीचा सरदार तुकोजी हा मोठया सैन्यासह रणमस्तखानावर चालून आला. कल्याण भिवंडीपासून चार कोसांवर येऊन तो मोर्चे लावीत असता, खानाने आपल्या फौजेच्या तीन तुकडया करून त्याच्यावर चालून घेतले. प्रथम बाणांची व बंदुकीची लढाई झाली. नंतर हातघाईचा सामना झाला. त्यात तुकोजी ठार झाला. उरलेले मराठे पळून गेले. त्यांचा खानाने पाच कोस पाठलाग केला.

रणमस्तखानाची रसद तोडण्याचा संभाजीने प्रयत्न केला. मागील अनुभवाने शहाणे होऊन औरंगजेबाने या वेळी मोगली आरमाराला सुरतेहून रणमस्तखानाला धान्य पुरविण्याचा हुकूम केलेला होता. ही धान्याची जहाजे आपल्या ठाणा खाडीतून पोर्तुगीज रणमस्तखानाकडे जाऊ देत. त्यामुळे संभाजीचा पोर्तुगीजांवर राग झाला होता. रणमस्तखानाने औरंगजेबास ८ फेब्रुवारी १६८३ रोजी लिहिले, " फिरंग्यांचे दोन किल्ले संभाने घेतले. त्याचा विचार आहे की तोफखाना तयार ठेवून सुरतेहून माझ्याकडे येणाऱ्या जहाजांस अडवावे. म्हणून मी सिद्दी याकूतखानास जमेतीसह तिकडे पाठविले. खानाने जाऊन एक किल्ला पाडून बहुतेक लोकांना मारले. परंतु किल्ला हाती आला नाही. म्हणून मी मोहरमच्या २७ तारखेस स्वारी केली. लढाई झाली. अनेकांना मारले. किल्ला घेऊन पाडून टाकला. नंतर कल्याण भिवंडीस आलो. माझ्याकडे जहाजांची ये-जा चालू आहे."

रणमस्तखानास जंजिऱ्याहूनही रसद येई. सुरतेहून येणारी किंवा जंजिऱ्याहून येणारी जहाजे ठाणे बंदरातून जाण्यास पोर्तुगीजांची परवानगी लागे. ती या वेळी पोर्तुगिजांनी दिली, इतकेच नव्हे, तर कल्याण भिवंडीकडे जाणाऱ्या सिद्दीच्या तारवांस प्रतिकार करण्यासाठी संभाजीने मुंबऱ्याजवळ समुद्रात जो पारसीकचा किल्ला नुकताच बांधला होता, तोही हल्ला करून ताब्यात घेतला. पाण्यापासून पंचवीस फूट उंचीच्या चोहोबाजूंनी सारख्याच तुटलेल्या खडकावर, हा किल्ला बांधला होता. किल्ल्यात जाण्याचा दरवाजा खाडीच्या बाजूस होता. वर जाण्यासाठी खडक फोडून पायऱ्या केल्या होत्या. बारा फुटांपासून वीस फुटांपर्यंत तटबंदी केली होती. नदीच्या बाजूस मेढेकोट होता, त्यात सहा तोफा ठेवण्याची व्यवस्था होती. बाकीच्या तटातून बंदुका मारण्यासाठी फक्त भोके होती. असा हा नुकताच बांधलेला सुसज्ज किल्ला पोर्तुगीजांनी हल्ला करून घेतला आणि रणमस्तखानास पत्र

पाठविले, की "आमचा ओढा तुमच्याकडे असल्यामुळे संभाजीच्या मदत देण्याच्या विनंतीला मान न देता आम्ही उलट त्यांचा पारसीकचा नवा किल्ला घेऊन त्याला अडथळा उत्पन्न केला आहे. आम्ही केलेल्या या साहाय्याबद्दल जो कोकणचा प्रदेश तुम्ही जिंकून घ्याल तो आम्हांस बहाल करावा व आपल्याला मदत करण्यासाठी सहा गलबते बांधून दिली आहेत त्यांचा खर्च द्यावा." पोर्तुगीजांच्या या 'अव्यापारेषु व्यापारा'ने संभाजी इतका खवळून गेला की त्याने दमणपासून वसईपर्यंत तारापूर, डहाणू, आसेरी, सैनाना इत्यादि पोर्तुगिजांचा मुलूख जाळून टाकला.

मराठ्यांचे हल्ले आणि रसदेची टंचाई यामुळे रणमस्तखान अगदी जेरीला आला. त्याने जरी किल्ले पाडल्याच्या, शत्रू मारल्याच्या व जहाजांची त्यांच्याकडे ये-जा चालू असल्याच्या कथा बादशहाला लिहून कळविल्या, तरी बादशहाचा आपल्या सरदारांवर विश्वास तितपतच होता. ८ फेब्रुवारीला रणमस्तखानाचे पत्र आल्यानंतर पंधरा दिवसांनी २३ फेब्रुवारीला औरंगजेबाने आपल्या मावस बहिणीचा मुलगा आणि मोगल सैन्याचा बक्षी रुहुल्लाखान याला रणमस्तखानाच्या मदतीसाठी कोकणात रवाना केले.

रुहुल्लाखान कोकणात उतरला खरा, पण मराठ्यांनी त्याच्यावर हल्ले चढवून त्याला सळो की पळो करून सोडले. १५ मार्च १६८३ रोजी औरंगजेबाला रुहुल्लाखानाने कळविले की संभाजीचा विठोजी नावाचा सरदार चार हजार स्वार व पायदळ यांच्यासह त्याच्यावर चालून आला. त्याने वाटा रोखून धरल्या होत्या. मराठ्यांचा व मोंगलाचा सामना झाला. मराठ्यांचे चारशे लोक मारले व जखमी केले. उरलेले पळून गेले. बहुधा याच लढाईत असेल, मराठ्यांच्या सेनापतीचा मुलगा जखमी होऊन रुहुल्लाखानाच्या हाती पडला. खानाने त्याला औषधोपचार करून 'तू कोणाचा कोण' म्हणून विचारले, पण त्या मुलाने बापाचे नाव म्हणून सांगितले नाही. त्याच्या सुटकेसाठी मराठ्यांनी दोन लाख रुपये खंडणी भरण्याची तयारी दाखविली. पण रुहुल्लाखानाने त्यास मान्यता दिली नाही.

२७ मार्चच्या सुमारास रुहुल्लाखान रणमस्तखानास कल्याण भिवंडीस जाऊन मिळाला. त्या वेळीही मराठ्यांनी त्याच्यावर हल्ले चढविलेच, पण त्यापूर्वीही रणमस्तखानावर १७ मार्च १६८३ च्या सुमारास हंबीरराव मोहित्याने चाल केली होती. या लढाईत हंबीररावास बाण लागून जखम झाली. तसेच त्याच्या बायकोचा भाऊ व इतर तीन सरदार मारले गेले. रणमस्तखानाने जरी बादशहास लिहिले की, "त्यांचा पराजय झाला, आम्ही काही कोस पाठलाग केला," तरी त्याने असेही लिहिले की, "बरेच बादशाही लोक कामास आले व जखमी झाले." रणमस्तखानाच्या या अर्जावर बादशहाने 'खास मनन केले.'

आता एप्रिल महिना आला होता. रणमस्तखान वगैरे बादशाही लोक कल्याण-भिवंडीस जाऊन पोचले होते. ते तेथे पावसाळ्यात राहू शकतील काय याची

औरंगजेबाने माहितगारांकडून चौकशी करविली, तेव्हा त्याला नकारार्थी उत्तर मिळाले. पावसाळी हवेमुळे घोडी जाया होतील आणि रसद मिळण्याचीही मोठी पंचाईत होईल असे समजल्यावर औरंगजेबाने रणमस्तखान व रुहुल्लाखान यांना परत फिरण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणे रुहुल्लाखान टिटवाल्याच्या घाटाने परत येऊ लागला असता मराठ्यांच्या पस्तीस हजार सैन्याने त्याची वाट अडवलेली दिसून आली. दुसरीकडे रणमस्तखानही अशाच अवघड वाटेत अडकून पडला. त्याला रुहुल्लाखानापाशी जाता येईना.

२ एप्रिल १६८३ रोजी औरंगजेबाकडे रुहुल्लाखानाचा अर्ज आला. त्यात म्हटले होते की कल्याणभिवंडीच्या जवळ हंबीरराव मोहिते याने वीस हजार स्वार व दहा हजार पायदळ यांच्यासह रुहुल्लाखानावर हल्ला चढविला. त्यात मोगलांचे अनेक मनसबदार जखमी झाले आणि मृत्यु पावले. भगवंतसिंग दखनी, रामसिंग राठोड, माधोराम सिसोदिया, राजा दुर्गसिंग इत्यादि रजपूत आणि दिलेरखान, अक्रमखान, इब्राहीम बेग इत्यादि मुसलमान लढवय्ये मारले गेले. पूरणसिंग बुंदेला याचा मुलगा हरिसिंग हा जखमी होऊन रणांगणावर पडला होता, त्याला मराठे घेऊन गेले. तो मृत्यु पावला. पद्मसिंग राठोड हा लढताना पस्तीस जखमा लागून धारातीर्थी पडला. पद्मसिंग हा बादशाहीचा फार जुना सेवक होता. बिकानेरचा राजा राव कर्ण याचा तो मुलगा. त्याच्या पराक्रमाची व वीरमरणाची हकीकत कळल्यावर औरंगजेब संतुष्ट होऊन म्हणाला की, "पद्मसिंगाच्या निमकहलालीबद्दल वाहवा ! हेच कष्ट करावयाचे ठिकाण होते ! बादशहा त्याची मुले व संबंधित यांचेवर कृपा करू इच्छितात." कोतवाल इहतिमामखान यास त्याने हुकूम दिला की, "त्याच्या बायकांना सती जावयाचे असल्यास त्यांना अडथळा करू नये. त्यांना अधिकार आहे." वस्तुतः ही लढाई रुहुल्लाखानाला फार महागात पडली. पण औरंगजेबाने त्याचीही प्रशंसा केली. कदाचित् रुहुल्लाखान हा औरंगजेबाच्या मावस बहिणीचा मुलगा असल्याचाही तो परिणाम असणे शक्य आहे. रुहुल्लाखानाने मराठ्यांच्या हातून या मोहिमेत सपाटून मार खाल्ला होता, पण त्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून औरंगजेबाने रुहुल्लाखानाची भलावणच केली की, "रुहुल्लाखानास दक्षिणी लोकांच्या लढाईची पद्धत माहिती नव्हती. तशाही परिस्थितीत तो टिकून राहिला. त्याने सरदारकीच्या कामामध्ये ढिलाई केलेली नाही."तो बारा कोस पुढे आला व बहादुरखानास (रणमस्तखानास) त्याने आपल्या फौजेबरोबर आणून शत्रूची माहिती करून दिली. शत्रूच्या लोकांनी खोड काढून त्याच्या पिछाडीवर हल्ला केला. त्यात पद्मसिंग वगैरे कामास आले." म्हणजे अपराध होता खोड काढणाऱ्या मराठ्यांचा! त्यांच्या मुलखात शिरून जाळपोळ करणारा रुहुल्लाखान मात्र शहाजोग आणि संभावित होता ! वाहवा हा खरा बादशाही न्यायाचा मोगलाई नमुना !

पण भाच्याची केलेली प्रशस्ति अस्थानी आहे हे लवकरच मामाच्या लक्षात आले. कोकणातल्या त्या अवघड घाटात मराठ्यांनी रुहुल्लाखानाचा रस्ताच नव्हे तर रसदही रोखून धरली, वसईच्या बंदरात पोर्तुगिजांची धान्याची जहाजे होती. रुहुल्लाखानाने पोर्तुगिजांना खिलतीचे पोषाख व पैसे देऊन थोडेबहुत धान्य आणले; पण ते किती पुरणार ? सैन्याची उपासमार होऊ लागली. त्याला पुढेही जाता येईना. मागेही फिरता येईना. तो टेकीला आला. आणि कुमक पाठवण्याबद्दल औरंगजेबाच्या त्याने विनवण्या चालविल्या. पण औरंगजेबाला त्याची बिलकूल दया आली नाही. त्याने त्याला कळविले–"तुमच्यापाशी आठ हजारांचे सैन्य आहे. तुम्हांला अधिक कुमकेची आवश्यकता वाटू नये. मराठ्यांच्या सेनापतीचा मुलगा तुमच्या ताब्यात आहे. त्याला सोडून देण्याच्या अटीवर तुम्ही सुलभपणे तेथून माघार घेऊ शकता." शेवटी मोठ्या शिकस्तीने रणमस्तखानासह रुहुल्लाखान एप्रिलअखेर बादशहाच्या छावणीत मराठ्यांच्या तावडीतून निसटून सुखरूप पोचला.

अशा प्रकारे औरंगजेबाची कोकणची दुसरी मोहीम संपली – किंवा फसली. मोगल कोकणात आले आणि गेले यापेक्षा या मोहिमेची कोणतीही निशाणी मागे उरली नाही. पाण्यावर किंवा वाऱ्यावर माणसांच्या पावलाचा ठसा जितका उमटावा तितकाच मोगलांच्या पावलांचा ठसा कोकणात उमटला आणि उरला. फलश्रुति इतकीच की बादशाही उमरावांना कोकणचे सृष्टिसौंदर्य पाहण्यास मिळाले व कोकणात मेलेल्या काही मोगल सैनिकांच्या कबरी कोकणात बांधल्या गेल्या. मोगलांनी कोकणचा डोंगर पोखरला पण त्यांना त्यातला उंदीरसुद्धा बाहेर काढता आला नाही !

कोकणच्या मोहिमेचा असा बोजवारा उडालेला पाहून औरंगजेब फार नाराज झाला. शहाजादा आज्जम याला त्याने विजापूर पन्हाळ्याकडे पाठविले होते, पण त्यालाही हंबीररावाने मार देऊन पिटाळून लावले होते. आजमने पन्हाळ्याच्या अलीकडे सहा कोसांवर असताना हंबीरराव वगैरे पाच हजार लोकांनी आपल्या डेऱ्याच्या पिछाडीवर हल्ला केल्याची व राव अनुपसिंग वगैरे लोकांनी त्यांचा मोड केल्याची हकीगत मोठ्या प्रौढीने लिहिली होती खरी; पण ती हकीगत ऐकून बादशाह गप्प बसला. त्याला हे लक्षण काही फारसे बरे वाटले नाही. खानजहान तर कुचर कामाचा माणूस, मराठ्यांच्या मागे नासिकपासून बेदरपर्यंत नुसता पळत होता. अकबराला पकडण्याच्या आणि संभाजीचा पाडाव करण्याच्या दुहेरी उद्देशाने औरंगजेब दक्षिणेत आला होता. दोन वर्षे उलटली पण दोन्हीपैकी एकही उद्देश दृष्टिपथात सुद्धा येण्याचे पुसटते चिन्हही दिसत नव्हते. एकदा त्याला असे वाटले की, हे दक्षिणेतले काम कोणावर तरी सोपवून आपण परत उत्तरेत जावे. पण पतकरणार कोण ? मोठा मुलगा शहाआलम याला त्याने हे काम पतकरण्याबद्दल गळ घातली

शहाआलमने सरळ नकार दिला नाही. तो म्हणाला, "अफगाणिस्तानात अमीरखान आहे त्याला माझ्या हाताखाली द्या म्हणजे मी हे काम पतकरतो." शहाआलमला पक्के माहीत होते की, अमीरखानाला अफगाणिस्तानातून हलवून महाराष्ट्रात आणले, तर महाराष्ट्र मिळेल की नाही हे जरी निश्चित नसले तरी अफगाणिस्तान मात्र हातचे जाईल हे नक्की होते. त्यामुळे औरंगजेब आपली अट कधीही कबूल करणार नाही. मिळून अशक्य अट घालून आपला तर मान राखायचा, नकार तर द्यायचा नाही पण होकारही द्यायची वेळ येऊ द्यायची नाही, असली शक्कल शहाआलमने लढविली.

हा काळ औरंगजेबाला फार कठीण गेला. अंधाऱ्या रात्रीतून त्याच्या आत्म्याचा प्रवास चालू होता. मराठ्यांच्या आघाडीवर पावलोपावली अपयश भेडसावीत होते आणि भीति आणि संशय यांनी त्याचे मन भांबावून गेले. जात्या तो संशयीच होता पण आता तर 'संशयकल्लोळा' ने त्याच्या जीवन-नाट्यात उच्चांक गाठला. त्याला स्वतःच्या जीविताचा संशय वाटू लागला. कोण केव्हा आपला जीव घेईल अशी धास्ती पडली. त्याला मोठ्या मुलाचा–शहाआलमचा–तो मराठ्यांना सामील आहे असा संशय येऊ लागला. अकबर तर त्याच्याविरुद्ध उठलाच होता. पण दुसरा मुलगा आजम व दिलेरखान त्याला मिळून आहेत या संशयाने त्याला पछाडले. त्याने त्या दोघांना ताबडतोब आपणाकडे बोलावले. त्यांना येण्यास उशीर झाला म्हणून दिलेरखानाला त्याने कडक शिक्षा केली. आजम बापावर संतापून गेला. त्याची समजूत काढता काढता औरंगजेबाची पुरेवाट झाली. बिचाऱ्या दिलेरखानाने विष घेऊन आत्महत्या केली. पंचवीस वर्षे त्याने पराकाष्ठेच्या नेकीने औरंगजेबाची सेवा केली त्याचे फळ त्याला असे मिळाले. दिलेरखान हा पराक्रमी होता. जेथे जाईल तेथे विजय संपादन करून येईल अशी त्याची कीर्ति होती. देवगड, चांदा, गोंडवन हे प्रदेश त्याने बादशहाला जिंकून दिले. जयसिंगाने शिवाजी महाराजांवर स्वारी केली त्यात त्याचा महत्त्वाचा भाग होता. विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये त्याने खिळखिळी केली. संभाजीला फोडून मोगलांकडे आणले. पण दिलेरखानाच्या या एकनिष्ठ सेवेबद्दल औरंगजेबाला फारशी कृतज्ञता वाटली नाही. मानभंगाच्या दुःखाने त्याने आत्महत्या केली. तेव्हा बादशाही शिरस्त्याप्रमाणे औरंगजेबाने त्याची मालमत्ता जप्त केली. तिची मोजदाद करू पाहता ती अपेक्षेपेक्षा कमी भरली तेव्हा संशय येऊन त्याचा अफगाण मुनशी पीरमहंमद याला कैदेत ठेवून त्याचे हालहाल केले. औरंगजेबाची कृतघ्नता पाहून खरोखरच दिलेरखानाला आठवा हेन्री याचा मंत्री कार्डिनल वूल्झी याच्याप्रमाणे वाटले असेल की, " ज्या निष्ठेने या राजाची मी सेवा केली. त्याच्या निम्म्याने जरी ईश्वराची मी सेवा केली असती तर त्याने मला या म्हातारपणात एकाकी शत्रूच्या तावडीत सोडले नसते !

('Had I but served my God with half the zeal
I served my king, he would not in mine age
Have left me naked to mine enemies !)

असा सगळा एकच गोंधळ औरंगजेबाच्या मनाचा उडालेला होता. सुरतेच्या इंग्रजांनी १९ जून १६८३ ला लिहिले –" मोंगल (औरंगजेब) अद्यापपावेतो तेथून (औरंगाबादेहून) हलला नाही. परंतु दाट वदंता आहे की तो परत दिल्लीत जाण्याच्या विचारात असून अकबर व संभाजी यांच्या बरोबरच्या लढाईची सूत्रे आपल्या उमरावांच्या हाती सोपवणार आहे. तो अतिशय चिडखोर झाला आहे. त्याच्या मनाची अस्थिरता सारखी वाढत आहे. त्यामुळे त्याचे उमराव फार नाराज झाले आहेत. जर त्याचे आयुष्य (म्हातारपणामुळे) लवकर संपले नाही तर त्याला ते फार काळ जगू देणार नाहीत, बहुतेक सर्वांची सदिच्छा अकबराकडेच आहे–" चार महिने गेले तरी औरंगजेबाची चित्तवृत्ति बावरलेलीच होती– "बादशहा केव्हा काय करील याचा नेम नाही. तो इतका चिडखोर बनला आहे की स्वतः तो कोणाचे काही ऐकून घेत नाही. रात्रंदिवस डोळ्यांपुढे अकबर उभा. कोणासही क्षणाचा भरवसा वाटत नाही. कदाचित् इतक्यात बादशहाला मृत्यु येईल तर सर्वत्र गोंधळ उडण्याचा संभव आहे."

पण औरंगजेब काही मेला नाही आणि गोंधळ काही उडाला नाही. त्याची जिद्द मोठी जबर. त्याने पुन्हा एकदा कोकणात स्वारी केली. अकबराच्या हालचालीकडे त्याचे अगदी बारकाईने लक्ष होते. १६८३ च्या जानेवारीत त्याला बातमी लागली की अकबर संभाजीच्या मुलूखातून बाहेर पडला आहे. त्याबरोबर त्याने उत्तरेचा त्याचा मार्ग रोखण्यासाठी व त्याचा पाठलाग करून कैद करण्यासाठी अहमदाबादेचा सुभेदार मुख्तावरखान, वऱ्हाडचा ईरजखान, माळव्याचा खानझमान व तेलंगणाचा इल्हामुल्हाखान यांना तातडीचे हुकूम पाठविले. त्याच्या हरकाऱ्यांचा दारोगा भास्करराय याने जेव्हा विनंती केली की, अकबराच्या येण्याबद्दल त्याच्या हरकाऱ्यांनी अद्याप काहीही त्याला कळविले नाही, तेव्हा त्याच्या गलथानपणाबद्दल संतापून औरंगजेबाने त्याची मनसब कमी केली व बोलला की "बंडखोर काफिर बच्चाच्या प्रांतातून बाहेर आला असून अजून काहीच कशी बातमी आली नाही?" जेव्हा भास्कररायाने अर्ज केला की हरकाऱ्यांनी बातमी आणली आहे की अकबराने मोहरमच्या १८ तारखेस संभाच्या मुलखातून निघून संभा आणि फिरंगी यांचा सरहद्दीच्या पायथ्याशी मुक्काम केला आहे; फिरंग्यांच्या मुलखात जावे असा त्याचा बेत आहे, तेव्हा त्यांची मनसब औरंगजेबाने परत वाढवली. २८ जानेवारी १६८३ रोजी पक्की बातमी आली की अकबर संभा व फिरंगी यांचा सरहद्दीजवळ गोव्यास जाऊन बसला आहे. त्याचा जहाजात बसण्याचा बेत आहे. जहाजांची तयारी होत आहे. कुठे जाणार ते समजत नाही. या बातमीमुळे या

वेळची कोकणातली मोहीम उत्तरेत कल्याणच्या बाजूने न होता सावंतवाडीच्या बाजूने दक्षिण कोकणात झाली. याच वेळी अकबराचा वकील व संभाजीचा वकील औरंगजेबास भेटण्यास आले. अकबराच्या वकिलापाशी त्याने अकबराची विचारपूस तरी केली, पण संभाजीच्या वकिलांनी आणलेला तहाचा अर्ज पाहिलादेखील नाही. तो म्हणाला "या काफिर बच्चाशी तह फक्त तलवारीनेच केला जाईल. त्यांना (वकिलांना) जाण्यासाठी दस्तक द्यावा. मलिकशहाने त्यांना गाजिउद्दीनखानाकडे न्यावे. वाटेत त्यांना कोणीही अडथळा करू नये. तेथून त्यांनी संभाकडे जावे."

१५ सप्टेंबर १६८३ रोजी शहजादा मुअज्जम ऊर्फ शहाआलम याची औरंगजेबाने कोकणाच्या या तिसऱ्या मोहिमेवर नेमणूक केली. त्या दिवशी शहाजाद्याचे तंबू औरंगाबादेच्या बाहेर लावण्यात आले आणि शहाजणे वाजविण्यात आली. जुन्नर येथे असलेल्या शहाबुद्दीनखानाने पुण्याच्या बाजूने मध्य कोकणात उतरावे आणि दक्षिण कोकणातून येणाऱ्या शहाआलमच्या सैन्याला कोकण जिंकीत मिळावे असा त्याला हुकूम दिला. नीरेच्या काठावर रुहुल्लाखानाला पाठविले. मामूरखान याला सुपे, बारामती, इंदापूर या परगण्यांत पाठविले. बहरादखानाला अष्टीकडे पाठविले. शहाजादा आजम याला नासिककडे अकबराला तिकडून निसटून न देण्यासाठी रवाना केले. विजापूरकडून संभाजीला मदत येऊ नये म्हणून त्या सरहद्दीवर खानजहानला नेमले; व गोव्याच्या पोर्तुगिजांना कळविले की, तुम्ही संभाजीशी कसून युद्ध करा. आमची फौज तुमच्या मदतीस येत आहे. शहाआलमचा पाठपुरावा करण्यासाठी औरंगजेबाने औरंगाबादचा मुक्काम हलविला व आणखी दक्षिणेत, अहमदनगर येथे १३ नोव्हेंबर १६८३ रोजी तळ दिला.

अशा प्रकारे चोहो बाजूंनी संभाजीची नाकेबंदी करून कडेकोट तयारीनिशी पुन्हा एकदा औरंगजेबाने संभाजीवर झडप घातली.

१३

ज्या वेळी औरंगजेबाने शहा आलमला संभाजीवर पाठविले तेव्हा संभाजी पोर्तुगिजांचा समाचार घेण्यात गुंतलेला होता. गेले कित्येक दिवस संभाजी आणि पोर्तुगीज याचे संबंध फार विकोपाला गेलेले होते. त्यांच्या चौल बंदराच्या आश्रयाने सिद्दी संभाजीच्या मुलखात लूटमार करीत असे तेव्हा संभाजीने त्यांनाही, मदत थांबवली नाही तर चौलच्या कोटाचे सर्व तट जमीनदोस्त करून टाकण्याची धमकी दिली होती. रणमस्तखानाची संभाजीने रसद बंद केली होती तेव्हा पोर्तुगिजांनी आपल्या ठाणा खाडीतून मोगलांच्या धान्याच्या जहाजांना मार्ग देऊन संभाजीच्या हातातला डाव पळविला होता; इतकेच नव्हे तर त्याने मुद्दाम बांधलेला पारसीकचा किल्ला बळकावला होता. कारवारच्या किनाऱ्यापासून दोन मैलांवर व गोव्याच्या आग्नेयेस एकावन्न मैलांवर असलेल्या अंजदीव बंदरावर कोट बांधण्याचा विचार शिवाजी महाराजांपासून होता. कारण गोव्यावर शह ठेवण्याच्या दृष्टीने ते बंदर महत्त्वाचे होते. संभाजीने हा कोट बांधण्यासाठी माणसे पाठविली. पण पोर्तुगिजांनी त्या बंदरावर झडप घातली व कोट बांधण्यास सुरुवात केली; आणि तेथील हिंदूंचे देऊळ मोडून त्याचे कॅथॉलिक चर्च केले. संभाजीने याबद्दल निषेध केला असता, आमच्या प्रदेशात आम्ही वाटेल ते करण्यास मुख्यत्यार आहोत असे उत्तर देण्यात आले.

पोर्तुगीज संभाजीशी असे वागत होते त्यात राजकीय महत्वाकांक्षेबरोबर व्यापारी राजकारणही होते आणि धर्मद्वेष तर नेहमीप्रमाणे होताच. पोर्तुगीज येण्यापूर्वी सर्व व्यापार अरबांच्या हाती होता. तो व्यापार पोर्तुगिजांनी मारला. त्यामुळे अरब आणि पोर्तुगीज यांच्यात हाडवैर होते. या अरबांना संभाजीने हाताशी धरले हे पोर्तुगिजांना आवडले नाही. त्याचप्रमाणे पोर्तुगिजांची जहाजे मराठे लुटीत हीही त्यांची तक्रार होती. संभाजीला मुलगा झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करीत असतानाच गोव्याच्या व्हाइसरॉयने संभाजीस लिहिले की, आमच्या राज्यातील मचवे उत्तरेत एका बंदरातून दुसऱ्या बंदरात माल घेऊन जातात तेव्हा तुमचे सुभेदार पकडतात. अरबांजवळ आपण जी मैत्री केली आहे त्याबद्दल आमची तक्रार तुमचे वकील येसाजी गंभीरराव यांजकडे दिली आहे. अरब आमचे शत्रू आहेत. त्यांना तुम्ही आपल्या चाकरीत घेत आहात. त्यांना तुमच्या मुलखात वखारीही उघडण्यास बोलावीत आहात आणि त्यांनी आमच्या शहरवासीय व्यापाऱ्यास लुटून जडजवाहीर घेतले ते आपण ठेवून घेत आहात— असे असूनही आपण आम्हास कळविता की आमची अरबांविषयीची माहिती

चुकीची आहे पण आमच्याकडे जी माहिती आली आहे ती आपल्या लिहिण्याच्या अगदी विरुद्ध आहे. पोर्तुगिजांची तक्रार त्यांच्या दृष्टीने अगदी रास्त होती. फक्त संभाजीसारख्या स्वतंत्र राजाने कोणाशी मैत्री ठेवावी आणि कोणाशी ठेवू नये या बाबतीत त्यांनी निषेध करणे हा शुद्ध राजकीय आगाऊपणा होता.

पोर्तुगिजांच्या या उपद्व्यापात औरंगजेबाने फूस दिल्यामुळे आणखी भर पडली. २६ जानेवारी १६८३ रोजी त्याचा वकील हा खास औरंगजेबाचे पत्र घेऊन गोव्यात आला. आधी आपणांकडे वकील आला आणि त्यातही पुन्हा मोगल बादशहाचा वकील आला याच गोष्टीचे व्हाईसरॉयला कौतुक वाटले. त्या वकिलाला नुसते पाहायलाच कितीतरी लोक जमले कारण पोर्तुगिजांची वसाहत झाल्यापासून गेल्या दोनशे वर्षात त्यांच्याकडे कोणीच कधीच वकील पाठविला नव्हता. या वकिलाबरोबर दिलेल्या पत्रात औरंगजेबाने लिहिले होते की, "संभाजीचा मुलूख तुम्ही खुशाल जिंका. तो आम्ही तुम्हास बहाल करू. दारुगोळा वगैरे त्यास बिलकूल पुरवू नका. तुम्ही जर युक्ति करून त्यास पकडाल किंवा ठार माराल तर आमचे मोठेच काम तुम्ही केले असे होईल." औरंगजेब राजकारणी होता तो असा. शत्रूचा शत्रू तो आपला मित्र, आपले सैन्य राखून ठेवून, परस्पर पाहुण्याच्या हातून साप मारण्याचा उद्योग औरंगजेबाच्या आजपर्यंतच्या धूर्त आणि कुटिल राजनीतीला शोभण्यासारखाच होता. आपली काठीही मोडायला नको आणि सापही वाचायला नको. औरंगजेबाच्या या वकिलातीचा परिणामही लगेच प्रत्ययाला आला. या गोव्याच्या व्हाईसरॉयने आपल्या उत्तरेकडच्या प्रमुखास व चौल, वसई, दमण येथील गव्हर्नरास हुकूम काढला की "संभाजीच्याविरुद्ध स्वारी करणाऱ्या मोगल सैन्यास पोर्तुगीज प्रदेशांतून अडथळा न करता जाऊ देण्यात यावे"

एप्रिल १६८३ मध्ये रणमस्तखान आणि रुहुल्लाखान याचे आक्रमण परतवून लावल्यानंतर संभाजीने फार दिवस भिजत पडलेले हे पोर्तुगिजांचे प्रकरण हातात घेतले आणि आपल्या नेहमीच्या तडफेने तो त्यांच्यावर तुटून पडला. त्याने तारापुरावर स्वारी करून दमणपासून वसईपर्यंतच्या पोर्तुगिजांच्या मुलखात लुटालुटीचा व जाळपोळीचा कहर उडवून दिला आणि उत्तर कोकणातला त्यांचा जो बालेकिल्ला चौल त्याला ३१ जुलैला वेढा घातला. आपला पेशवा निळो मोरेश्वर याची त्याने सहा हजार पायदळ व दोन हजार स्वार यांच्यासह चौलावर रवानगी केली.

८ ऑगस्टला मराठ्यांनी पहाटे चौलवर हल्ला चढविला. तटाला शिड्या लावून ते वर चढून येत होते. पण मराठ्यांना या हल्ल्यात यश आले नाही. त्यांची चाहूल लागताच किल्ल्यावरील कॅप्टन वगैरे सर्व धावून आले त्यांनी शिड्या फेकून दिल्या आणि बंदुकांचा असा भडिमार केला की मराठ्यांचे बरेच लोक मारले गेले. प्रत्यक्ष चौल जरी पेशव्याला घेता आले नाही तरी त्याने

जवळचे टेकाड ताब्यात घेऊन त्यावर धमधमे रचले. त्याचा उद्देश असा होता की त्यावरून तोफांचा मारा करून चौलाचा पाडाव करावा. तज्ज्ञांचा असा समज होता की, असा मारा झाल्यास पाच दिवसांपेक्षा चौलचा निभाव लागणार नाही. पण काय असेल ते असो, पेशव्याच्या हातून ते काही झाले नाही. पण चौल जरी मराठ्यांना घेता आले नाही तरी आसपासची पोर्तुगिजांची अनेक ठाणी जिंकून त्यांनी तेथे धुमाकूळ घातला. त्यांनी चेंबूर, तळोजे, कोळव, माहीम, उलवे, दंतोरा, सारगांव, सोपारा, कारंजा व एलिफंटा इत्यादि उत्तर कोकणातला पोर्तुगिजांचा बहुतेक सर्व मुलूख अवघ्या तीन महिन्यांत काबीज केला. मुंबईकर इंग्रजांनी उत्तर कोकणातल्या पोर्तुगिजांच्या दुर्दशेचे वर्णन करिताना लिहिले की, 'चाळीस मैल लांबीचा पोर्तुगीज मुलुख जाळून बेचिराख केला गेला आहे. ख्रिश्चन लोकांना आसरा राहिला नाही. पोर्तुगिजांचा गर्व पार उतरला आहे. धान्यसाठा इतक्या थराला गेला आहे की भुकेसाठी आईबाप मुले विकीत आहेत."

उत्तर कोकणात याप्रमाणे संभाजीचा पोर्तुगिजांशी झगडा चालला असताना दक्षिण कोकणात त्याच वेळी खुद्द गोव्याचा व्हाइसरॉय टाव्होरा कोंद द आलव्होर याने संभाजीविरुद्ध आघाडी उघडली आणि फोंडा किल्ल्याला वेढा घातला. इटालियन प्रवासी मनूची हा या वेळी गोव्यात होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे व्हाइसरॉय गोवा सोडून फोंडा घ्यायला बाहेर पडला ही सगळी संभाजीचीच कारवाई होती. त्याला गोवा घ्यायचे होते आणि व्हाइसरॉयला त्यासाठी गोव्यातून बाहेर काढावयाचे होते; म्हणून त्याच्या हेरांनी व्हाइसरॉयला भर दिली की फोंड्यावर संभाजीने फार मोठा धनसंचय करून ठेवला आहे. संभाजी या वेळी चौलला गुंतलेला असताना व्हाइसरॉयने चपळाई करून फोंडा घेतला तर हे सारे घबाड आयतेच त्याच्या हातात येईल. तेव्हा व्हाइसरॉयच्या तोंडाला पाणी सुटले. मनूचीने त्याला परोपरीने बोध करण्याचा प्रयत्न केला, पण व्हाइसरॉयच्या डोक्यात काही प्रकाश पडला नाही. औरंगजेबाचे खास पत्र आल्यानंतरही तो असाच हुरळून गेला होता. त्या वेळीही मनूचीने त्याला हितोपदेश केला होता की मोंगलांपेक्षा मराठेच आपणास बरे. कारण मराठ्यांशी युद्ध करून पोर्तुगिजांचा फायदा तर काही होणार नाहीच. उलट संभाजीच्या नाशानंतर मोंगल पोर्तुगिजांवर उलटल्याशिवाय राहणार नाहीत. मनूची चौदाव्या वर्षापासून पूर्वेत भटकत होता; मोंगलांची मनोवृत्ति त्याला जवळून माहिती होती; अक्षरशः बारा गावचे पाणी प्यायलेला तो व्यवहारातला पंडित होता. पण त्या वेळेला अधिकाराच्या मदाने आणि या वेळेला धनाच्या मोहाने व्हाइसरॉयने त्या शहाण्या माणसाचा सल्ला धुडकावून दिला; आणि १७ ऑक्टोबर १६८३ रोजी आठशे पोर्तुगीज, आठ हजार कानडी शिपाई आणि पाच तोफा अशा जंगी सरंजामासह गोवा सोडले. २२ ऑक्टोबरला त्याने फोंड्यास वेढा घातला आणि तोफांची सरबत्ती सुरू केली.

फोंडा हा मोठा बुलंद किल्ला होता. त्याच्या भिंती पंचवीस वीत रुंद होत्या; मध्ये मध्ये गोल बुरुज होते; किल्ल्याभोवती तट होता आणि खंदकही होता. त्यामुळे शिबंदी जरी किल्ल्यावर बेताचीच असली तरी तो किल्ला तसा अजिक्यच होता. तीन दिवसांच्या तोफांच्या भडिमारानंतर एका बुरुजाला लहानसे खिंडार पडले. पण त्यातून पोर्तुगीज शिरू लागताच किल्यांतील लोकांनी इतक्या जोराचा हल्ला केला की पोर्तुगिजांना परतावे लागले.

पांच दिवस झाले. पण फलप्राप्ति काही झाली नाही. व्हाइसरॉय इतका खिन्न झाला की तो कोणाशी काही बोलेना. ज्या गोव्यातील पाद्र्यांनी एका दिवसात किल्ला घेऊन दाखवतो म्हणून भर देऊन येथपर्यंत आणले होते ते आता परत जाण्याची भाषा बोलू लागले. व्हाइसरॉयची भिस्त पाद्र्यांच्या वचनापेक्षा तोफखान्यावर जास्त होती. आता आतल्या तटाला आणखी एक खिंडार पडले. तेव्हा व्हाइसरॉयने पुन्हा तेथे शिड्या लावून हल्ला चढविण्याचा निर्धार केला. या वेळी निसर्गही त्याच्याशी भांडत होता. वादळ, थंडी आणि पाऊस यांनी कहर उडवून दिला होता. पण तो मर्द माणूस त्याची तमा थोडीच बाळगतो ? त्याने हल्ला करण्याचा हुकूम दिला. एवढ्यात संभाजीचे प्रचंड सैन्य झपाट्याने येत असताना दिसले ते किल्ल्यातील लोकांनाही दिसले व व्हाइसरॉयलाही दिसले. त्यांनी प्रचंड जयघोष करून त्याचे स्वागत केले. समोर किल्ल्यातले मराठे व पिछाडीला संभाजीचे मराठे अशा मराठी कात्रीत व्हाइसरॉयची अगदी दैना उडाली.

आता परत फिरण्यावाचून अन्य पर्याय नव्हता कारण व्हाइसरॉयला रास्त भीति होती की पिछाडीच्या सैन्याने खाडीचा उतार एकदा का ताब्यात घेतला की परत काही नदी उतरून गोव्याचे दर्शन आपणाला होत नाही. त्यामुळे माघार घेतानाही त्याने नदी अलीकडच्या टेकडीवर पाठलाग करणाऱ्या मराठी घोडेस्वारांना अडवण्यासाठी लाकडी तटबंदी उभारली आणि तीन पोर्तुगीज तुकड्या ठेवून त्यांना निक्षून सांगितले की काही झाले तरी ही टेकडी सोडू नका--नाहीतर सर्वांचा नाश होईल.

पाठलाग करणारे मराठे त्या टेकडीपाशी आले व आपण भ्यालो असे दाखवून टेकडीवरच्या पोर्तुगीजांना त्यांनी आपल्या अंगावर घेतले. त्यांनी टेकडी सोडल्याबरोबर संभाजीच्या घोडेस्वारांनी बहुतेक पोर्तुगीज कापून काढले. त्यांच्या मदतीसाठी अवघ्या सतरा लोकानिशी व्हाइसरॉय स्वत: गेला. परिणाम इतकाच झाला की तो मरता मरता वाचला; त्याच्या बरगडीला तरवारीची जखम झाली व त्यालाही पळ काढावा लागला. पण तो खरा धीराचा माणूस म्हणावयाचा. सबंध दुपार व संध्याकाळ तो माणसे व युद्धसाहित्य नदीपार करीत होता सगळे पलीकडे गेले तेव्हाच तो कॅप्टनबरोबर नदी उतरून गेला. गोव्यात पोचल्यावर तो एका धर्मगुरूच्या मठात तोंड लपवून बसला. चार दिवस तो कोणाशी बोलला

नाही की कोणाची भेट घेतली नाही. एकटाच जिवाला खात बसला. कसला फोंडा आणि कसली संपत्ति ! फोंडा मिळायचे दूरच राहिले, हातचा गोवा गमावला नाही म्हणजे मिळवली असे म्हणायची त्याच्यावर वेळ आली.

फोंड्याची स्वारी हे संभाजीच्या जीवनातले एक तेजस्वी पर्व आहे. मुसळधार पावसात दोनदोनशे मैलांची घोडदौड करण्याची त्याची तडफ जशी या लढाईत दिसून आली त्याचप्रमाणे स्वामिकार्यावर कष्ट करणाऱ्या सेवकांचा परामर्श घेण्याची त्याची गुणग्राहक वृत्तीही व्यक्त झाली. या लढाईत शिवाजी महाराजांचा बालमित्र येसाजी कंक आणि त्याचा मुलगा कृष्णाजी कंक यांनी सक्त मेहेनत केली. दोघांनाही जखमा लागल्या. त्या संभाजीने स्वतः पाहिल्या. कृष्णाजी कंक नंतर जखमा फुटून मृत्यु पावला. संभाजीने मरणोत्तर त्याला इनाम दिलेच; पण येसाजी कंकालाही दिले; इतकेच नव्हे तर कृष्णाजी कंकाचा तीन वर्षांचा मुलगा कृष्णाजी याला त्याची सरदारी व वेतन देऊन, तो वयात येईपर्यंत त्याचा कारभार चाहुजी कंक याने पाहावा असा हुकूम दिला. संभाजी हा स्वतः मर्द माणूस होता आणि तो मर्दाची किंमत जाणणारा होता.

या संदर्भात संभाजीचे अस्सल पत्र विशेष बोधप्रद आहे.

"येसाजी कंक सरनोबत व कृष्णाजी येसाजी कंक पदाति नायक या दोघांनी फोंडाचे स्वारीस फिरंगियांसी गाठी पडिली तेव्हा बहुत कस्त केली आणि गनिम मारून काढिला. ते वख्ती दोघालाही जखमा लागोन चकचूर जाले. कठीण जखमा राजश्री स्वामींनी दृष्टीने पाहिल्या आणि घरास यावया आज्ञा दिली. त्या वारी कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटोन तो मयत जाला. हाली येसाजी कंक हे हुजूर येऊन आपले वर्तमान विदित केले. त्यावरून हे कामाचे, मर्दाने, स्वामी कार्यावरी तत्पर; आणि याचा पुत्रही स्वामीकार्यावरी मयत जाला. फोंडाचे बकसीस द्यावयाचे होते म्हणोन छ मजकुरी पारितोषिकाची मोईम केली. होन बादशाही बेरीज दोन सहस्र — खासा येसाजी कंक सरनोबत होन १०००, कृष्णाजी कंक स्वामी कार्यावरी पडिले म्हणोन १००० येणेप्रमाणे एकसाला ये वर्षी पारितोषिक द्यावयाचा नियत केला असे."

त्याचप्रमाणे पोर्तुगीजांचे आक्रमण आल्यावर फोंड्याचे जागृत देवस्थान जे पीर अब्दुल्लाखान याला किल्ल्यातील अधिकाऱ्यांनी यश मिळाल्यास सरंजाम संभाजीकडून देवविण्याचा नवस केला होता. संभाजीने हा पिरास केलेला नवस फेडला– " हजरत पीर अब्दुल्लाखान कोट फोंडा, बहुत जागृत स्थल. फिरंगि यांनी गनिमाई करून कोटास वेढा घातला, कोट बहुत जेर केला, तेव्हा कोट मजकूरच्या हवालदार, सरनोबत, सबनीस नाईकवाडी, लोकी प्रार्थना केली की गनिमाचा पराभव करणे. रा. छत्रपती स्वामी विनंति करून ऊर्जा चालेसारखी पोख्ती सरंजाम करून घेऊ. रा. स्वामींची फतेबाजी होऊ देणे म्हणोन नियत

केला. त्यावरी रा. स्वामींचे स्वारी कोटमजकुरी होऊन फिरंगी गनिम मारून काहाडले. रा. स्वामी जये आली. फत्ते जाली ऐसी पिराची करामती म्हणोनि तुम्ही व कोटकरी याही छत्रपती स्वामींस विनंती केली. त्यावरून नियत केला धर्मादाय देविला दरसाल नव होन ५० रास उदफूल दिवा देखील उरुस येकून नव होन २६ मु ॥ मुजावर नफर सालिना होन नव २४ येणे प्रा सुबे मजकुरी ऐवज देविला–"संभाजीचा हिंदुत्वाभिमान हा किती ज्वलंत होता हे निराळे सांगण्याची जरूर नाही. पण स्वधर्माचा अभिमान धरला म्हणजे परधर्माचा द्वेषच केला पाहिजे अशी त्याची धारणा नव्हती. तो उग्रप्रकृति असला तरी धर्मवेडा नव्हता. ज्या उदार धर्मातीत दृष्टीने त्याने मल्हार गोसाव्याला नाडोली गाव बहाल केला, त्याच वृत्तीने त्याने फोंड्याच्या पिराला नेमणूक करून दिली. कारण सत्पुरुष हे धर्मातीत असतात, हीच परळीचे रामदास आणि केळशीचा बाबा याकूत यांना सारखेच भजणाऱ्या शिवाजी महाराजांप्रमाणे त्याचीही निष्ठा होती.

फोंड्याचे आक्रमण परतवून लावण्यासाठी संभाजी आला होता. पण तेवढेच त्याचे उद्दिष्ट नव्हते. या खेपेला पोर्तुगीजांची त्याला पुरतीच खोड मोडावयाची होती. त्याने फोंड्यावरून तडाक्याने गोव्यापासून दोन मैलांवर असलेला सेंट स्टीफनचा किल्ला घेतला. किल्ल्यावर चाळीस मराठे गेले व त्यांनी आपल्या सोबत्यांना बोलाविण्यासाठी तोफा उडविल्या तो तोफांचा गडगडाट व्हाइसरॉयला ऐकू गेला. त्याबरोबर जेंवढे मिळाले तेवढे – म्हणजे तीनशे लोक घेऊन तो सेंट स्टीफन परत घेण्यासाठी चालून गेला. जाताना त्याने आसपासच्या शेतांचे बांध फोडून सर्वत्र पाणीच पाणी करून टाकले. हेतु हा की किल्ल्यावरच्या मराठ्यांना कुमक मिळू नये.

त्या कठीण आणि खडकाळ चढावरून थोड्या लोकांनिशी व्हाइसरॉय किल्ल्याच्या पायथ्याशी पोचला. त्याबरोबर मराठे पळून गेले. इतक्यात संभाजीचे तीनशे घोडेस्वार तेथे आले आणि फोंड्याप्रमाणेच येथेही व्हाइसरॉयला माघार घेण्यावाचून गत्यंतर राहिले नाही. माघार घेण्याचा हुकूम त्याच्या तोंडून निघण्याचा अवकाश की त्याचे लोक बाजारबुणग्यांसारखे सैरावैरा धावू लागले. त्याने डोळ्यात पाणी आणून अशा बेशिस्तीने न वागण्याची त्यांची विनवणी केली. पण ऐकतो कोण ? पळणाऱ्या त्या झुंडीबरोबर त्यालाही पळावे लागले. पण पळता पळता का होईना, त्याने चार गोळ्या झाडून तीन मराठे मारले. या झटापटीत त्याच्याही दंडाला बंदुकीची गोळी लागली. पळणाऱ्या पोर्तुगिजांवर किल्ल्यातल्या मराठ्यांनी दगडाचा वर्षाव केला. त्याने कित्येकांची टाळकी फुटली व कित्येक जन्माचे जायबंदी झाले. पाठीवर दगड आणि मराठे घेत घेत ही पोर्तुगीजांची पोळजत्रा पडत झडत कशीबशी मांडवी नदीच्या तीरावर आली.

नदीला भरती आली होती. कांठावर चिखल झाला होता. पाठीवर स्वत: संभाजी सैतानासारखा घोड्यावर स्वार होऊन दौडत येत होता. पुढे व्हाइसरॉयसाहेब पळत होते. मोठ्या शर्थीने ते एका मचव्यात बसले व पळाले, बाकीचे चिखलात रुतले; किंवा भरतीबरोबर वाहून गेले. उरलेले मराठ्यांच्या तरवारीला बळी पडले. नदीच्या तीरावर उभे राहून हजारो लोक हा प्रसंग पाहात होते. पण एकानेही मदतीसाठी हात पुढे केला नाही. पोर्तुगीज वसाहत होऊन दोनशे वर्षे झाली पण असा भयंकर आकांत कधीही त्यांच्यावर कोसळला नव्हता.

संभाजीची ईर्ष्या इतकी अनावर की तशा त्या भरतीच्या पाण्यात आपला घोडा घालून पळणाऱ्या पोर्तुगीजांवर तो त्वेषाने तुटून पडला. पण पाण्याचा जोर जबर त्यामुळे घोडा वाहून जाऊ लागला. अशा प्रसंगी किनाऱ्यावर उभ्या असलेल्या खंडो बल्लाळाने घोड्यावरून पाण्यात उडी ठोकली, घोड्यास धरून पोहत तो किनाऱ्यावर आला आणि त्याने संभाजीचे प्राण वाचविले. या खंडोबल्लाळाचा भाऊ आबजी बल्लाळ, त्याचा काका श्यामजी आणि त्याचा बाप बाळाजी आवजी चिटणीस या सर्वांना संभाजीने हत्तीच्या पायी दिले होते. अशा स्वामीचा जीव वाचविणारा स्वामीनिष्ठ खंडो बल्लाळ आणि बापाचा राग मुलावर न ठेवता त्याला अंगावरचा पोषाखही बक्षीस देणारा संभाजी यांपैकी कुणाची तारीफ करावी हे सांगणे फार कठीण आहे. किनाऱ्यावर पोचताक्षणी संभाजीने अत्यंत संतुष्ट होऊन खंडो बल्लाळाला आपला बसता घोडा, अंगावरचा पोषाख मोत्याचा कंठा व तुरा तर दिलाच; पण स्वारी संपल्यावर त्याला पालखीचा बहुमानही दिला.

नदी मातेने या वेळी कृपा करून व्हाइसरॉयचा बचाव केला. पण आता मात्र कठीण प्रसंग आला. २६ नोव्हेंबर १६८३ रोजी संभाजीने खुद्द गोव्यावरच स्वारी केली. व्हाइसरॉयचे धाबे दणाणले. गोव्यात लढण्यासारखे होते कोण? सारे उपाय हरले. तेव्हा गोव्याचा आश्रयदाता संत झेवियर याची शवपेटिका उघडून त्याच्या चरणाशी आपला राजदंड, आपली अधिकारपत्रे आणि पोर्तुगालच्या राजाच्या वतीने अर्ज ठेवून व्हाइसरॉयने करुण प्रार्थना केली की, "हे राज्य तूच निर्माण केलेस. आता तूच त्याचा सांभाळ कर.' असे म्हणताना त्याच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा चालल्या होत्या. त्याचेही खरे होते. मानवी प्रयत्नांची शर्थ झाली. आता ईश्वरी कृपेशिवाय दुसरे काय त्याच्या हाती होते?

आणि चमत्कार झाला. व्हाइसरॉयची प्रार्थना संपली आणि तोफांचा गडगडाट ऐकू आला. त्या मराठ्यांच्या तोफा नव्हत्या. त्या तोफा जाहीर करीत होत्या की, मराठे परत गेले. व्हाइसरॉयला वाटले ही संत कृपा झाली. वस्तुस्थिति अशी होती की घाटावरून मोगलांचे प्रचंड सैन्य येत होते. व्हाइसरॉयला पाहिजे होता तेव्हा आणि संभाजीला नको होता तेव्हा, औरंगजेबाने रवाना केलेला शहाआलम

नेमका या वेळी नजीक येऊन थडकला होता. एकाच वेळी दोघांशी झगडा नको म्हणून संभाजीने गोव्यावरची स्वारी तूर्त आवरती घेतली. जे संभाजीचे राजकारण होते ते व्हाइसरॉयला संतकृपेचे वैभव वाटले. हा त्याच्या भाविक वृत्तीचा पुरावा असेल. कठीण काळी सारेच आस्तिक होतात असे म्हणतात त्याचाही पुरावा असेल.

शहाआलम जवळ आलेला पाहून संभाजीने आपली छाप कायम ठेवून पोर्तुगिजांशी मिळते घेण्याचा विचार केला. अकबराच्या मार्फत गोव्याच्या व्हाइसरॉयला त्याने पत्र लिहविले की, तो संभाजी आणि पोर्तुगीज या दोघांचाही मित्र आहे. लवकरच तो इराणला कायमचा जात असल्यामुळे जाण्यापूर्वी या दोघांचा समेट करून देण्याची त्याची फार इच्छा आहे. तरी एखादा प्रतिष्ठित माणूस व्हाइसरॉयने त्याच्याकडे पाठवावा. त्याप्रमाणे व्हाइसरॉयने मनूचीला पाठविले. या प्रसंगी संभाजीची आणि मनूचीची भेट झाली. संभाजी त्याच्याशी फार सौजन्याने वागला. पोर्तुगालच्या राजाच्या आज्ञेविरुद्ध व्हाइसरॉयने आपणांशी युद्ध पुकारले त्यामुळे तो अतिशय संतापून बोलत होता. बोलता बोलता आवेशाच्या भरात त्याने आपली तलवार उपसली आणि म्हणाला– "पहा ही माझी तलवार. या तलवारीने माझ्या स्वतःच्या हाताने माझ्याविरुद्ध बंड करणाऱ्या मंत्र्यांची डोकी मी उडविली आहेत!"

संभाजीने विचारले होते की, "पोर्तुगिजांना खरोखरच सलोखा पाहिजे काय व ते खंडणी देण्यास तयार आहेत काय?" यावर व्हाइसरॉयचे उत्तर असे होते की, "सलोखा करण्यास ते तयार आहेत पण खंडणी मात्र मिळणार नाही." या उत्तरावरून उघड होते की इतका मार खाऊनही, शहाआलम जवळ आल्यामुळे पोर्तुगिजांची गुर्मी अजून उतरली नव्हती. तेव्हा संभाजीने गोव्याच्या दक्षिणेचा साष्टी आणि उत्तरेकडचा बारदेश या प्रांतांवर स्वारी केली व जाळपोळ आणि लुटालूट करण्याचा तडाखा लावला. बारदेशमधील चारही किल्ले त्याने घेतले आणि किल्ल्यावरच्या पाद्र्यांचे वरचे झगे काढून घेऊन आणि हात मागे बांधून त्यांची गावातून धिंड काढली. या प्रसंगाचे वर्णन करिताना एक पोर्तुगीज लेखक कळवळून लिहितो– "यापेक्षा अधिक दुःखद घटना असू शकेल काय? ज्या पोर्तुगिजांनी राजे सिंहासनावर चढविले आणि उतरविले त्या पोर्तुगिजांवर इतक्या अपकीर्तीच्या गर्तेत पडण्याची वेळ यावी ना! आणि याचा सूड घेण्यास एकही सुपुत्र असू नये! यापेक्षा मोठी हानि ती कोणती!"

त्याचा हा तळतळाट योग्यच आहे. पण ज्या धर्मगुरूंची संभाजीने धिंड काढली त्यांच्यापाशी धर्म नव्हता आणि गुरूंचे चारित्र्यही नव्हते. संभाजीचे पोर्तुगीजांशी युद्ध जितके राजकीय होते तितकेच धार्मिकही होते; आणि या धर्मगुरूंनी हिंदूंना

....१०

बाटविण्याचा, जे बाटण्यास तयार होणार नाहीत त्यांना जिवंत जाळण्याचा आणि लोकांपासून पैसा उकळण्याचा सपाटा लावला होता. पोर्तुगीजांच्या वसाहतीचा कारभार राजाच्या किंवा व्यापारी कंपनीच्या हाती नसून या धर्मगुरूंच्या किंवा फादर्सच्या कंपनीकडे असे; आणि या कारभारात आपल्या पायघोळ झग्यांचे खिसे त्यांनी भरपूर भरून घेतले होते. वसाहतीचे संरक्षणच ज्यांवर अवलंबून त्या तोफा व दारूगोळा यांवर या फादर्सची करडी नजर असे. त्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही अधिकाऱ्याला तोफा उडविता येत नसत; आणि तोफा उडविण्यासाठी परवानगी त्यांच्याकडून मिळणे अशक्य असे. कारण जितक्या तोफा कमी उडतील तितकी दारूची बचत जास्त आणि जेवढी दारूची बचत जास्त तितकी पैशाची प्राप्ति अधिक असा त्यांचा सरळ हिशेब असे. चौलच्या किल्ल्यावर पांच तोफा होत्या, पण पहिली तोफ उडविल्याबरोबर तोफांचा गाडा कोसळला व त्या खाली पडल्या. दारू पाहिली तर ती पंधरा वर्षांची जुनी आणि निकामी. त्या कठीण प्रसंगी फादर्संना दारूगोळा आणण्यासाठी पैसे मागितले पण त्यांनी साफ कानावर हात ठेवले. शेवटी लोकांनी वर्गणी करून मुंबई व वसई येथून दारुगोळा आणविला. अशा प्रकारे या संत मंडळींच्या हस्तक्षेपामुळे पोर्तुगिजांचे सगळे राजकारण नासून गेले होते. संभाजीच काय, पण त्यांच्या राज्यातील प्रजाही त्यांच्यावर चिडली होती. सेंट इस्टोव्हहून व्हाइसरॉय पळून येत असताना व मराठ्यांनी पोर्तुगिजांची लांडगेतोड चालविली असताना हजारो लोक पलीकडच्या तीरावरून ही गंमत पाहात होते पण एकानेही मदतीसाठी बोट उचलले नाही. कारण इतकी वर्षे पाद्र्यांनी जे पेरले होते ते आता उगवत होते. त्यांची चर्चेस संभाजीने लुटली कारण ती धनाची आणि धान्याची कोठारे होती. कोणत्याही धर्माबद्दल द्वेष असण्याचे संभाजीला कारण नव्हते. त्याने केले ते इतकेच की इतके दिवस कोकराची कातडी पांघरून हिंडणाऱ्या या लांडग्यांचे यथार्थ दर्शन लोकांना घडवून दिले; व त्यांच्या खऱ्या स्वरूपाची प्रतीति आणून दिली. नैतिक म्हणा, राजकीय म्हणा आजपर्यंत पोर्तुगिजांचा व त्यांच्या धर्मगुरूंचा जो थोडाफार दबदबा होता त्याचे या गोव्याच्या स्वारीत संभाजीने सपशेल दिवाळे वाजविले

ही गोष्ट व्हाइसरॉयच्याही लक्षात आली आणि आता मात्र मनापासून तहाच्या वाटाघाटी त्याने सुरू केल्या. या तहाप्रमाणे वसई आणि दमण प्रदेशातील गावखंडी व चौथाई कर संभाजीस देण्याचे त्याने मान्य केले आणि आपल्या प्रदेशांतून मोगल सैन्यास धान्य व दारूगोळा पोचवू देणार नाही अशी हमी घेतली. संभाजीला गोवा मिळाला नाही पण त्याच्या स्वारीचा उद्देश सफल झाला. हत्तीच्या आडोशाने भुंकणाऱ्या कुत्र्याप्रमाणे मोगलांच्या आश्रयाने संभाजीला पोर्तुगीज चावे घेत होते, ते कायमचे गप्प झाले. इतकेच नव्हे, तर पोर्तुगिजांना लागलेली ठेच पाहून इंग्रजही शहाणे झाले. यापुढे संभाजीचा रोष ओढवून घेऊन सिद्दी

आणि मोगलांचे आरमार यांना मुंबईच्या बंदरात आसरा देण्याचे धाडस त्यांना झाले नाही.

संभाजी गेला आणि शहाआलम आला- म्हणजे दुष्काळ जावा आणि प्लेग यावा तसे पोर्तुगिजांना झाले. शहाआलमचा प्रत्यक्ष उपयोग असा त्यांना काहीच झाला नाही. त्याच्या दडपणामुळे संभाजीच्या लोखंडी पकडीतून गोव्याची सुटका झाली आणि त्यांना श्वास घेण्यास थोडीशी फुरसत मिळाली इतकेच. पण शहाआलमने त्यांना तेवढेही सुख मिळू दिले नाही. आल्याबरोबर आपला वकील त्याने गोव्याला पाठविला आणि संभाजीच्या तावडीतून सोडविल्याबद्दल भरमसाट खंडणीची त्यांच्याकडे मागणी केली. त्या मागणीला अर्थातच नकार मिळाला. त्यामुळे शहाआलम संतापला. त्यात आगीत तेल पडण्यास कारण असे झाले की सुरतेहून शहाआलमच्या सैन्याला रसद म्हणून धान्याची एकशेवीस गलबते आली होती, व ती समुद्रात उभी होती, ती रसद गोवेकरांनी शहाआलमला मिळू दिली नाही. आणि उत्तरही मोठे मासलेवाईक दिले– "आम्ही तुम्हांस धान्य पोचविले तर संभाजी आमचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही." पोर्तुगिजांच्या या उत्तरापेक्षा संभाजीच्या गोव्यावरील स्वारीचे साफल्य झाले या गोष्टीला दुसऱ्या पुराव्याची जरूर नाही.

बिचारा शहाआलम! रामदऱ्याच्या घाटाने तो कोकणात उतरला, तेव्हाही त्याचा मार्ग फार खडतर होता. त्या भागात किर्र जंगले व वाटा अवघड आणि अरुंद. जागोजाग मराठ्यांनी त्याच्यावर छापे घातले. शत्रूवर टेहळणी करणारी आणि फौजेसाठी लाकूडफाटा, घासदाणा आणणारी आघाडीची पथके कापून काढली. तेथून पडत झडत कसेबसे घाटातून खाली सावंतवाडीच्या प्रदेशात उतरतो तो त्याच्यावर अकबर आणि संभाजी यांनी प्रचंड सैन्यानिशी हल्ला केला; पण लढाई हातघाईची होऊनही निर्णय असा काहीच लागला नाही. लढाईनंतर संभाजी रायगडाकडे गेला आणि अकबर डिचोलीला गेला. अकबराला पकडण्यासाठी म्हणून शहाआलम डिचोलीवर चालून गेला पण अकबर फोंड्याला पळून गेला. तेव्हा अकबर व संभाजी यांनी डिचोलीला बागा आणि वाडे बांधले होते तेच जमीनदोस्त करण्यावर शहाआलमला समाधान मानून घ्यावे लागले. डिचोलीनंतर तो गोव्याकडे आला, तेव्हा धान्याची टंचाई त्याला जाणवू लागली. आणि त्या वेळी आलेले धान्यसुद्धा पोर्तुगिजांनी त्याला मिळू दिले नाही. पेला ओठाला लागावा पण दैवाने सोटा मारावा तसे झाले. असे उत्तर मिळावे व ते पोर्तुगिजांसारख्या सर्वस्वी क्षुल्लक आश्रिताकडून मिळावे, ते संभाजीच्या धास्तीने मिळावे व ते आपल्यासारख्या शहाजाद्याला मिळावे यापैकी प्रत्येक गोष्टसुद्धा त्याला संताप आणण्यास पुरेशी होती. मग सर्वच गोष्टी एकत्र आल्यावर त्याच्या संतापाचा भडका केवढा उडाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

शहाआलम इतका संतापला की हा आता प्रत्यक्ष गोवे घेऊन जाळून टाकतो की काय अशी लोकांना धास्ती पडली पण त्याने गोव्यावर चाल केली नाही. गोवा खरोखरच सुदैवी ! आधी संभाजीच्या तावडीतून ते सुटले आणि आता शहाआलमच्या तडाख्यातून ते वाचले. शहाआलमने आपला मोर्चा संभाजीच्या प्रदेशाकडे वळविला. मालवण, कुडाळ, बांदा, वेंगुर्ला हा प्रदेश त्याने जाळून पोळून उद्ध्वस्त केला.

हे सर्व ठीक झाले पण आता उन्हाळा सुरू झाला. संभाजी रायगडाकडे गेला. अकबर फोंड्याला पळाला. दोघांचाही काहीही पाडाव झाला नाही. पूर्वीच्या योजनेप्रमाणे उत्तरकोकण जिंकीत शहाबुद्दीनखान त्याला येऊन मिळणार होता, तोही आला नाही. त्याला संभाजीने परस्पर घाटावर फिरवून लावले. आहे त्या कोकणात राहावे तर धान्याचा एक कण मिळण्याची आशा नाही. रागाने प्रदेश जाळला हे खरे, पण प्रदेश जाळला म्हणून त्यातून भाकरी थोडीच निर्माण होणार होती ! शहाआलमपाशी सैन्य काही थोडे नव्हते साठ हजार पायदळ, चाळीस हजार घोडेस्वार, तीस हजार उंट आणि एकोणीसशे हत्ती होते. यांना खायला घालणार काय? जंजिऱ्याच्या सिद्दीने दोन वेळा रसद पाठविली. पण समुद्रकिनाऱ्यावर मराठ्यांचे किल्ले होते. रसद निघाल्याची वार्ता कळल्याबरोबर ते पाळतीवर राहिले आणि बरीचशी रसद त्यांनीच पळविली. फार थोडी रसद शहाआलमच्या छावणीत पोचली. आता एवढ्याशा या धान्यात माणसांनी काय खायचे, उंटांनी काय खायचे आणि हत्तींनी काय खायचे!

शेवटी शहाआलमने नाइलाजाने परतण्याचा विचार केला. पण परतीचा मार्ग जास्त कठीण होता. येताना शहाआलमने त्या मार्गावर जी जाळपोळ केली होती तिचे चटके त्यालाच आता जाताना भोगावे लागले. खायला अन्न नाही, प्यायला पाणी नाही, कोकणातला कडाक्याचा उन्हाळा, घाटातली अवघड चढण, तहानेमुळेच कितीतरी माणसे व जनावरे मेली. त्यात मराठ्यांचे चोरटे हल्ले चालू होतेच. आणि आता निसर्गाप्रमाणे परमेश्वरही मोगलांवर कोपला. मोगल सैन्यांत साथीचा रोग पसरला. या रोगाने पछाडलेला माणूस सात दिवसांत मरे. या रोगाने माणूस व पशु असा भेदभाव दाखविला नाही. घाटातल्या या प्रवासात शहाआलमचे एकतृतीयांश सैन्य मृत्युमुखी पडले. अनेक शिपायांचे घोडे मेले. घोडे घेण्यास अनेकांजवळ पैसे नव्हते. आणि ज्यांच्याजवळ घोडे होते, ते घोडे विकायला तयार नव्हते. बहादुरखानाचा मुन्शी भीमसेन याने या सैन्याला घाट चढून इंदीच्या जवळ आलेले पाहिले, तेव्हा त्या सैन्यात घोडेस्वार फारसे नव्हतेच, बहुतेकजण पायीच चालत होते.

औरंगजेबाला जेव्हा ही वार्ता समजली तेव्हा त्याने बख्शी रुहुल्लाखान याला मोठे सैन्य देऊन शहाआलमकडे पाठविले. वीस हजार अश्रफ्या, शंभर घोडे, पाचशे उंट, पंचवीस खेचरे, हत्ती, जवाहीर, खिलतीची वस्त्रे त्याच्याबरोबर देण्यात आली.

रुहुल्लाखानाबरोबर शहाआलम अहमदनगरला बादशहाकडे परत आला. त्याला खिलतीची वस्त्रे, तीन लाख रुपयांचे अलंकार आणि नव्वद हजार रुपये रोख औरंगजेबाने दिले. बहुधा कोकणच्या स्वारीत त्याची फजिती झाली त्याबद्दल त्याचे सांत्वन करण्याचा हा शाही रिवाज असेल; किंवा कोकणच्या जंगलांतून तो सुखरूप परत आला याबद्दल आनंद व्यक्त करण्याचा हा प्रकार असेल. कारण कोकणातली गावे जाळण्यापलीकडे पराक्रम असा शहाआलमने काहीच केला नाही. आठ महिन्यांपूर्वी ज्या छावणीतून तो वाजत गाजत मोहिमेवर बाहेर पडला, त्याच छावणीत तो हात हलवीत परत आला होता. कोकणात जाताना त्याला त्रास झाला, राहताना त्रास झाला, येतानाही त्रास झाला. त्याचे दुर्दैव पाहिले म्हणजे शंभर वर्षांनंतर होऊन गेलेल्या त्याच्याच नावाच्या दिल्लीच्या दुसऱ्या एका बादशहाप्रमाणे हा शहाआलमही दुर्दैवी होता असे म्हणावेसे वाटते. पण हे फक्त काही प्रमाणातच; कारण उपमा सहसा पूर्णोपमा नसतेच ती 'साधर्म्यमुपमा भेदे'– अशी भेदातल्या साधर्म्यावर आधारलेली असते.

या प्रसंगी वाईच्या देशमुखांना कोकणात उतरलेल्या गनिमांचा समाचार घेण्यासाठी, हशमांचा जमाव करून पाठवून देण्याबद्दल संभाजीने पत्र लिहिले होते. त्यात म्हटले होतें "या संगी जरी हशमाचा पोख्त जमाव जाला तरी गनिमाचा काय गुमान लागला. बुडविलाच जातो." संभाजीच्या म्हणण्याप्रमाणे त्याने खरो-खरच, या वेळी गनिम साफ बुडवून काढला.

सूर्याचा उदय झाला म्हणजे अंधाराच्या मुखाला काळोखी लागते हे खरेच आहे. संभाजीच्या या विजयाने औरंगजेबाचा अगदी तिळपापड झाला. त्याच्या कोत-वालीत संभाजीचे कोकणात पकडलेले सैनिक आणि अधिकारी असे एकशेबारा कैदी होते. औरंगजेबाने त्या सर्वांचा शिरच्छेद केला. पण हे वड्याचे तेल वांग्यावर काढण्याचे औरंगजेबाचे वर्तनसुद्धा बालिशपणाचे होते. बाहेर फजिती झाली म्हणजे घरातला मोठा माणूस मुलांच्या पाठीत धपाटे घालतो. औरंगजेब बादशहा होता म्हणून त्याने पळून न जाऊ शकणाऱ्या कैद्यांची मुंडकी उडविली इतकाच फरक बाकी दोघेही सारखेच.

१४

१५ सप्टेंबर १६८३ रोजी औरंगजेबाने जेव्हा शहाआलमला संभाजीवर दक्षिण कोकणात पाठविले तेव्हाच त्याने जुन्नरला असलेला शहाबुद्दीन याला उत्तर कोकणात रवाना केले. संभाजी या वेळी पोर्तुगिजांशी लढत असल्यामुळे एक प्रकारे अडचणीतच सापडला होता. औरंगजेबाचा उद्देश असा होता की शहाआलमने दक्षिण कोकण आणि शहाबुद्दीनने उत्तर कोकण उद्ध्वस्त करावे. शहाबुद्दीनने खाली सरकत शहा-आलमला मिळावे; पण संभाजोने आपल्या चातुर्याने दोघांवरही मात केली. त्याने पोर्तुगिजांचा पुरा मोड केला. शहाआलमची रसद तोडून उपासमार करून त्याला हैराण केले आणि तातडीने दक्षिण कोकणातून रायगडाकडे प्रयाण करून शहा-बुद्दीनखानाचा समाचार घेतला. त्याने शहाबुद्दीन आणि शहाआलम यांची गाठच पडू दिली नाहो.

संभाजी रायगडापासून दूर गोव्याकडे आहे या अपेक्षेने उत्तर कोकणात उतर-लेल्या शहाबुद्दिनाची संभाजीच्या येण्यामुळे बरीच निराशा झाली. पहिला त्याचा बेत बहुधा रायगडावर हल्ला चढविण्याचाच होता. पण रायगडाजवळ पाचाड आणि निजामपूर येथे खुद्द संभाजीच्याच नेतृत्वाखाली मराठ्यांनी त्याचा निकराने प्रतिकार केला. त्यामुळे रायगडावर चढाई करणे तर दूरच राहिले, फक्त निजामपूरची जाळपोळ करून त्याला समाधान मानून घ्यावे लागले. पण औरंगजेबाकडे आपल्या पराक्रमाचा वृत्तान्त लिहून कळविताना शहाबुद्दीनने मोठ्या प्रौढीने लिहिले कीं, ‘मी संभाच्या मुलुखातील किल्ले, रायरीच्या भोवतालचा प्रदेश व कसबे निजाम-पूर लुटले. दोन हजार लोक व सहा हजार जनावरे हाती आली.’ ही लढाई २७ डिसेंबर १६८३ रोजी झाली. त्यानंतर शहाबुद्दीन हा उत्तर कोकणातून निघून पुरंदरकडे रवाना झाला. शहाआलमला मिळण्याचा त्याचा पूर्वसंकल्प संभाजीने सिद्धीस जाऊ दिला नाही. पण कोकणात केलेल्या पराक्रमाबद्दल औरंगजेबाने त्याला ‘गाजीउद्दीन खानबहादुर’ अशी पदवी बहाल केली

गेली चार पाच वर्षे औरंगजेबाच्या फौजा मराठ्यांकडून सारख्या मार खात होत्या, पण त्याची ईर्ष्या मोठी दांडगी म्हणावयाची. पुढील वर्षी म्हणजे १६८४ मध्ये पुन्हा त्याने मराठ्यांवर सर्व बाजूंनी चढाई केली. मामूरखान याने सुपे; बारामती व इंदापूर येथे ठाणी स्थापन केली. १३ फेब्रुवारी १६८४ रोजी शहाजादा आजम व त्याचा मुलगा बेदरबख्त यांना बहादुरगडाकडे रवाना केले. ३१ मार्च रोजी शहाबुद्दीन याला पुणे आणि गढ नमुना या प्रदेशाकडे रवाना करण्यात आले त्याला दोन मण सोने, धनुष्य बाण आणि दहा हजार रुपये रोख देण्यात आले.

ऑक्टोबर १६८४ मध्ये फखरुद्दीन यास सुप्याच्या ठाणेदारीवर, अब्दुल्हाखान यास चाकणच्या फौजदारीवर आणि नामदारखानाचा मुलगा मरहमतखान यास गढनमुन्याच्या ठाणेदारीवर नेमण्यात आले. पंचवीस ऑक्टोबर १६८४ रोजी बख्शी रुहुल्लाखान याची रवानगी केली. पारनेर आणि संगमनेर या भागात पसरलेल्या मराठ्यांचा मोड करण्यासाठी एतिकादखानाला पाठविण्यात आले. पैठण भागात पसरलेल्या मराठ्यांवर बहरामंदखानाला रवाना केले. २७ जानेवारी १६८४ रोजी खानजहान बहादुर याने कृष्णेच्या काठावर तीस कोसांची दौड करून मराठ्यांना गाठले व त्यांचा धुव्वा उडविला. अशा प्रकारे नीराकाठ ते कृष्णाकाठ पुन्हा एकदा मराठ्यांची नाकेबंदी करण्याचा प्रयत्न औरंगजेबाने करून पाहिला. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून २१ सप्टेंबर १६८४ रोजी पुन्हा एकदा शहाबुद्दीनला रायगड घेण्यासाठी कोकणात रवाना केले.

बावीस जानेवारी १६८५ रोजी औरंगजेबाकडे बातमी आली की, शहाबुद्दि-नाने रायरीच्या पायथ्याशी असलेली वाडी जाळली. मराठ्यांचे अनेक पुढारी ठार मारले, त्यांची मालमत्ता लुटली आणि त्यांची बायका माणसे कैद केली. शहा-बुद्दीनाचा गुरु सय्यद ओघलान याने ही आनंदवार्ता आणली तेव्हा त्याला एक हत्ती बक्षीस देण्यात येऊन त्याचा गौरव करण्यात आला. शहाबुद्दीनचा चोपदार शाह महंमद हा कपडे न बदलताच तातडीने ही बातमी घेऊन आला होता, त्याला दोनशे रुपये आणि वस्त्रे देण्यात आली. खुद्द शहाबुद्दीन याला पूर्वी 'गाजीउद्दीन' असा किताब बादशहाने दिलाच होता, आता या पराक्रमाबद्दल ' फिरोजजंग ' हा नवा किताब देण्यात येऊन शिवाय नगारे-नौबतीचा मानही देण्यात आला. बादशाही छावणीत सर्वांची भावना अशीच झाली की शहाबुद्दिनाने रायरीच्या पायथ्याची वाडी जिंकली म्हणजे रायगडच जिंकला. वस्तूतः रायगडचा पायथा आणि रायगड यांच्यात अनेक अर्थांनी अंतर फार मोठे आहे; आणि ते पार करताना शहाबुद्दीनच्या नाकात केवळ शारीरिक अर्थानेच नाही तरी राजकीय अर्थाने सुद्धा दम आला असता. कारण रायगड हा केवळ उंच डोंगरावरचा किल्ला नसून ज्यासाठी मराठे प्राण देतील व प्राण घेतील असा त्यांचा मानबिंदु होता; ती त्यांच्या पुण्यश्लोक शिवछत्रपतींनी उभारलेली मराठ्यांची राजधानी होती. पण हे मोगलांना उमज-लेले दिसत नाही. त्यांना रायगडचा पायथा व रायगड एकच वाटला व म्हणून ते आनंदित झाले. यालाच म्हणतात अज्ञानाचे सुख.

रायगडवरील या हल्ल्यांचे सविस्तर इतिवृत्त शहाबुद्दीननेच औरंगजेबाला लिहून कळविले; ते एकतर्फी असले तरी वाचण्यासारखे आहे–" मी बादशाही सुदैवाने संभाच्या तालुक्यातील निजामपूर वगैरे तीन ठिकाणे जमीनदोस्त करून जाळून टाकली. बंदी व जनावरे हाती येऊन मला विजय मिळाला. त्यानंतर किल्ले राहेरी येथील वाडीत संभा होता तेथे पोहोचलो व ती लुटून जाळली. संभा, बादशाही

फौजेबद्दल बातमी मिळाल्यावर आपल्या नातेवाइकांसह किल्ल्यावर गेला. येथे जवळपासचा वस्ती असलेला भाग लुटीत आहे." आणखी तीन दिवसांनी त्याने औरंगजेबाला कळविले की, "मी मौजे पाचोरीवाडी, किल्ले राहिरी वगैरेवर हल्ले करून त्या किल्ल्यापासून दोन कोस अंतरावर डेरा दिला होता. तेव्हा संभाने हंबीरराव व रूपा भोसले यांना पंधरा हजार फौजेसह पाठविले. बाण व बंदुका यांची लढाई झाली. आम्ही चारी बाजूंनी शत्रूशी छोटया हत्यारांनी लढाई केल्यामुळे त्यास निभावणे अशक्य होऊन त्याने पळ काढला. आम्ही सात कोसपर्यंत पाठलाग केला. त्याचे अनेक लोक मारले व जखमी केले आणि बादशाही फत्ते झाली. आम्ही परत येऊन डेऱ्यास मुक्काम केला. तेथे सुबत्ता होती तिची लूट केली. एक महिन्याची तरतूद होती ती खर्च झाली तेव्हा कूच केले व मिफ्ताहुल फुतूह दरीच्या परिसरात गेलो. या महिन्याच्या (जानेवारी) २९ ला घाटावर पोहोचू."

नाना फडणिसाचा वकील गोविंदराव काळे याने महादजीने उत्तरेत केलेल्या अतुलनीय पराक्रमाबद्दल संतोष व्यक्त करताना म्हटले होते–"अगर मुसलमान कोणी असते तरी मोठमोठे तवारीखनामे जाले असते. यवनांच्या जातीत तिळाइतकी चांगली गोष्ट जाल्यास गगनाबराबर करून शोभवावी; आमचे हिन्दूंत गगनाइतकी झाली असता उच्चार न करावा हे चाल आहे." शहाबुद्दिनाचे बढाईखोर पत्र वाचले म्हणजे गोविंदरावांच्या या मार्मिक उद्गाराची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. केले काय आणि गृहस्थ लिहितो काय ? शहाबुद्दिनाच्या वृत्तान्ताइतके सविस्तर उल्लेख मराठी साधनांत नाहीत. पण 'जेधे शकावलीत एकच उल्लेख आहे, तो मात्र, 'सौ सोनारकी और एक लोहारकी' या न्यायाने लेखणीच्या एकाच फटक्यात शहाबुद्दिनाच्या पल्लेदार प्रौढीला सपशेल गारद करणारा आहे. "१४ जानेवारी १६८५ शाहादीखान पुण्याहून दऊड करून बोरघाटे उतरोन गांगोलीस आला. कविकलशे जाऊन भांडण दिल्हे. फिरोन घाटावरी घातला' या नोंदीप्रमाणे शहाबुद्दिनाला रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पांच सहा मैलांवरील गांगोली गांवापासूनच कविकलशाने लढाई करून परत फिरविले; रायगडापर्यंत येऊच दिले नाही. शहाबुद्दीन मात्र आपण पाचाडवाडी जाळली म्हणतो. खरे खोटे कविकलशाला माहीत की शहाबुद्दिनाला माहीत ! एवढे खरे की रायगड घेण्याचा मनसुबा तसाच सोडून शहाबुद्दिनाला परतावे लागले. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याला लढून परतवून लावण्याचा पराक्रम कविकलशाने केलेला आहे. संभाजीजवळ शहाजादा अकबर होता. त्याने या विजयाबद्दल संभाजीचे अभिनंदन करताना कविकलशाच्या विषयी जे उद्गार काढले ते चिंतनीय आहेत. "छत्रपति संभाजीराजे यास विदित व्हावे. मोगल घाटाखाली उतरून आले या वेळी कविकलश यांनी ठाण मांडून झुंज दिली हे महमूदखान व

खिदमद परस्तखान यांच्या लिहिण्यावरून कळले. कविकलश हा आपला उत्कृष्ट एकनिष्ठ सेवक आहे. कुणाच्या मत्सराने त्याचा नाश होईल असे परमेश्वर न करो. कविकलशावर आपली कृपा राहावी व आपण त्याचे कल्याण करावे हे योग्य होय."

केवळ प्रदेश गमाविण्यापेक्षा जास्त बिकट प्रश्न शहाबुद्दिनच्या आक्रमणामुळे संभाजीपुढे उभा राहिला. तो म्हणजे माणसे गमावण्याचा. जसजसा शहाबुद्दीन पुण्याकडून मावळातून रायगडाकडे येऊ लागला तसतसा धाकाने किंवा प्रलोभनाने संभाजीचे वतनदार फोडण्याचा त्याने पद्धतशीर सपाटा लावला. हे वतनदार ही मराठ्यांची मोठी शक्ति होती. वतनाची आसक्ति मराठ्यांच्या बाबतीत प्रसिद्धच आहे. त्यांना संभाजीबद्दल मोठा द्वेष होता किंवा औरंगजेबाबद्दल मोठे प्रेम होते असे नाही. त्यांची खरी निष्ठा वतनावर होती व मराठी छत्रपतीबद्दल त्यांची वृत्ति 'Not that I loved Caesar less but that I loved Rome more' अशा प्रकारची होती. त्यांचे वतन हेच त्यांचे रोम, त्यांची मक्कामदिना, त्यांची काशी होती. या मराठ्यांच्या वृत्तीचा पुरेपूर फायदा घेऊन शहाबुद्दिनाने त्यांना संभाजीपासून फोडण्याचा निकराचा उद्योग या वेळी केला. त्याच्या बाहेरच्या आक्रमणापेक्षा आतून वतनदारांच्या निष्ठा पोखरणारा कर्करोग हेच संभाजीपुढे मोठे संकट होते. रायगडकडे येतानाच त्याने पदाजी, एकोजी, मल्हार, राव सुभानचंद यांना आपणाकडे वळवून घेतले. संभाजीची माणसे फोडण्याच्या आपल्या उद्योगाबद्दल शहाबुद्दिनानेच औरंगजेबाला अर्ज केला की, "(१) माझ्या मालकाकडे (शहाबुद्दिनाकडे) संभाजीकडील चाकर नोकरीच्या आशेने आले आहेत. हुकूम झाला की त्यांना मनसब देईतो रोजीना नेमावा. (२) आशा करतो की यांना पगार देण्यासाठी काही रक्कम मिळावी. हुकूम झाला की पन्नास हजार रुपये पाठवावे. (३) संभाचे ५००० स्वार माझ्या मालकास (शहाबुद्दिनास) भेटून हुजूर येत आहेत. त्यांना स्वार होण्यासाठी घोडे व घोड्या पाहिजेत. आशा करतो की अर्धा हिस्सा व दंड माफ व्हावा. हुकूम झाला की मंजूर आहे." यातील अर्ज शहाबुद्दिनाचा व हुकूम औरंगजेबाचा. शहाबुद्दिनाने संभाजीच्या माणसांना पैसे दिले, घोडे दिले, घोड्या दिल्या. माणसाने माणसाला आणखी काय द्यावे?

संभाजीने आजपर्यंत अनेक आक्रमणे पचविली होती. त्याने याही आक्रमणाला तोंड दिले. पण येथे तलवारीचे काम नव्हते, तर लोकांच्या पोटात शिरून त्यांचे मन सांभाळण्याचे चातुर्य हवे होते. संभाजीने याही बाबतीत आपली शिकस्त केली. त्याची या बाबतीतली पत्रे वाचली म्हणजे त्याने आपल्या मूळच्या उद्दाम व उग्र प्रकृतीला आवर घालण्यात बरेच यश मिळविले असावे असे वाटू लागते. 'Office shows the man' (जबाबदारी आली म्हणजे शहाणपणा येतो) असे ग्रीकांनी म्हटले आहे, ते खरेच आहे.

देशमुख हे पिढ्यानुपिढ्याचे वतनदार असत. सैन्य जमविणे ही त्यांच्या हातची गोष्ट असे. आता शत्रु दारात आला असता, त्यांना कोणत्याही कारणाने नाराज ठेवू नये अशी जावळी प्रांताचा देशाधिकारी विठ्ठल शंकर याला आज्ञा देताना संभाजी म्हणतो – " दत्ताजी केशवजी पिसाळ देशमुख तर्फ जोरखोरें यांसी कै. स्वामींनी हक्कवतन करून दिल्हे आहे. त्याप्रमाणे मोईन चालत आले. हल्ली कुसूर होतो. तरी हे दिवसात गनीम कोकणात पेशक. या प्रसंगे हशमाचा जमाव करावया देशमुख मशार निल्हेस आज्ञा केली असे व पुढे कित्येक कामे याचे हातून घेणे असता उगेच माणूस दिलगीर करावे आणि स्वामी कार्याचा नाश करावा हे कोण कारकुनी? हे गोष्टीने स्वामीचा तरी फायदा ? तरी कौडी इतकी गोष्ट नाही. ऐसे असता असे करावया गरज काय ? या उपरी तरी देशमुख रंजीस न करणे त्याचा हक्क सालाबादप्रमाणे चालवणे. कसूर काडीइतकी न करणे. पुढे बोभाट आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहीत. हे नेमस्त समजणे."

हे पत्र ३ जानेवारी १६८४ चे आहे. ३ ऑगस्ट १६८४ रोजी कविकलशाने कानद खोऱ्याच्या देशमुखांना पत्र लिहिले. गेल्या वर्षी या देशमुखांच्या तक्रारी निवारण करण्यासाठी छत्रपतींनी बकाजी नावडीकर याला पाठविले होते पण देशमुखांच्या मर्जीप्रमाणे तोड निघू शकली नाही व ते मोठे दिलगीर झाले. हे कळल्यावर कविकलशाने संभाजीस विनंति करून सदर देशमुखांना समक्ष भेटीस बोलाविले. "मुद्दा मनास आणून तदनुसार पारपत्य करून देऊ. या प्रसंगे अवघे वतनदार एकमते राहोन गनिमास सजा द्यावी. आपली सरफराजी करून घ्यावी." या कठीण प्रसंगी सर्वांनी एक होऊन शत्रूचा मोड करावा हीच ईर्ष्या संभाजी, कविकलश यांच्याप्रमाणे शंकराजी नारायण सचिव याच्याही पत्रात दिसते. ३० मे १६८५ रोजी कारीच्या कृष्णाजी दादाजी प्रभुदेशपांडे यास पाठविलेल्या पत्रात तो म्हणतो – ' मावळप्रांती गनिमांनी चाल केली आहे म्हणोन समजले त्यास कोरळखिंड व ढवळाघाट व मांढरदेवचा सडा येथील जागाजागा चौक्या घालून गनिमाची खबर ठेवून कमकसूर खास बातमी पावती करणे. तुम्ही राजगडी कळविताच तुमची कुमक रोहिड वगैरे जागाहून होईल. तुम्ही शिरवळी मर्दुमी चांगली केली ही खबर येथे समजली. या वेळी गनिम नामोहरम सर्वांनी करावा. तुम्ही जमेदार व सरचाकर महाराजांच्या वेळेचे करोन दाखवितील हा भरंवसा आहे."

पण स्वराज्याच्या आवाहनाने किंवा थोरल्या छत्रपतींच्या नावाने वळतील इतके सरळ सर्वच वतनदार असते तर काय पाहिजे ! तसे होणेही मनुष्य स्वभावाच्या विरुद्धच आहे; कारण स्वार्थ ही वस्तूच अशी आहे की काँग्रेस गवताप्रमाणे ती उपटली तरी नष्ट होत नाही. त्यामुळे संभाजीपेक्षा औरंगगेब बरा असे म्हणून त्याच्याकडे काही वतनदार जात. काही यांच्यापेक्षाही अधिक प्रयोगशील होते. संभाजीकडून औरंगजेबाकडे व परत औरंगजेबाकडून संभाजीकडे असे त्यांच्या

स्वार्थाचे गलबत वारा येईल तसे वाहात असे. निष्ठांचा बाजार करणाऱ्या या आयाराम-गयारामांची निपज ही भ्रष्ट आणि प्रक्षुब्ध राजकारणाची नेहमीचीच विकृति आहे. संभाजीच्याही काळी ती होतीच. अशा बेइमान लोकांच्या बाबतीत 'इन्द्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' असे कठोर धोरण संभाजीचे होते. हीच शिवाजी-महाराजांचीही राजनीति होती – "गनिमाकडे जाणारा उपाये मारवावा, त्याचे लेक गुलाम करावे, बायका बटकी कराव्या."

कारीचा शिवजी जेधे हा मोगलांकडे गेला. त्याच्या मागोमाग त्याचा भाऊ सर्जेराव हाही मोगलांकडे गेला. पुढे त्याने आपणाबद्दल संभाजीकडे रदबदली करावी म्हणून रोहिड्याचा किल्लेदार संताजी निंबाळकर यास विनंती केली. संताजीने त्याप्रमाणे संभाजीस लिहिले. त्यावर संभाजीने दिलेले उत्तर त्याचे जबर शासन व उदंड आत्मविश्वास यांवर उत्तम प्रकाश टाकते. पत्र सर्जाराव जेध्याला लिहिले आहे– "तुम्ही संताजी निंबाळकर मुद्राधारी विचित्रगड यासी पत्र लिहून मुद्दा सांगोन पाठविला की आपला भाऊ शिवजी जेधा याने हरामखोरी करून शिरवळास गेला. त्याने आपली गुरेढोरें वळून नेली. पुढे आपणास बरे पाहणार नाही. याबद्दल आपणही उठोन शिरवळास आलो आहे. ऐसीयासी आपण रा. स्वामींच्या पायाशी एकनिष्ठच आहे. स्वामी कृपाळू होऊन आपले वतन देशमुखी आपले स्वाधीन करतील आणि अभयपत्र सादर होईल तरी आपण सेवेसी येऊन एकनिष्ठ होऊन सेवा करीन म्हणून. तरी तुमचा मुद्दा माइले हवालदार एही स्वामीचे सेवेसी हुजुरास लिहिला त्यावरून हे आज्ञापत्र तुम्हांस लिहिले आहे. तरी आधी तुम्हीच सरासरी हरामखोरी केली की वतनदार होऊन इमाने इतबारे वर्तावे ते गोष्ट न करिता स्वामीचे अन्न बहुत दिवस भक्षिले त्याचे सार्थक केलेत की स्वामींच्या पायाशी दुर्बुद्धि धरून दोन दिवसांचे मोगल त्याकडे जाऊनु राहिलेस. तुमचा भाऊ शिवजी गनिमाकडे गेला तो आम्हास बरे पाहेना. ऐसे होते तरी तुम्ही स्वामी संनिध हुजूर यावे होते. म्हणिजे तुमचे इतबार पण कळोन एक-निष्ठता कळो येती. ते केले नाही. तरी बरीच गोष्ट जाली. या उपरीही गनिमा-कडेच राहणेच असेली तरी सुखेच राहणे. तुमचा हिसाब तो काय ? ए क्षणी स्वामी आज्ञा करितात तरी गनिमादेखील तुम्हास कापून काढवीतच आहेत हे बरे समजणे."

या पत्रात व्यक्त झालेला संभाजीचा उग्र आत्मप्रत्यय म्हणजे पोकळ वल्गना नव्हती. गेली चार वर्षे मोगल फौजा त्याच्यावर कोसळत होत्या आणि त्यांच्याशी तो रात्री बेरात्री वाऱ्यावादळात बेदरकारपणे झुंजत होता. गोव्याच्या भेटीत मनुचीला संभाजी म्हणाला – "ही पहा माझी तलवार. या माझ्या तलवारीने माझ्या बंडखोर मंत्र्यांची मी मुंडकी उडविली आहेत.' गेल्या चार वर्षांत त्याच्या तलवारीने केवळ स्वकीय बंडखोरांचाच नव्हे तर परकीय शत्रूंचा निःपात केला

होता. म्हणून शाईने लिहिलेल्या या आज्ञापत्रात संभाजीच्या तलवारीचे तिखटपाणी तळपते आहे असे म्हटले तर ते केवळ काव्य वाटू नये.

त्या तिखट पाण्याची चव शहाबुद्दिनाने चाखली होती. आणि औरंगजेब तर गेली पांच वर्षे आस्वादतच होता. १६८१ च्या नोव्हेंबरात तो बुऱ्हाणपूरला आला आणि तेव्हापासून त्याने मराठ्यांवर नेटाने आक्रमण करण्यास प्रारंभ केला. १६८२ च्या एप्रिलात किल्ले घेण्याचा मुहूर्त त्याने रामसेजला वेढा घालून केला. पण तो मुहूर्त त्याला फळला नाही. रामसेजलाच त्याला सपाटून मार खावा लागला. पांच वर्षांनंतरही परिस्थिति होती तीच होती. रामसेजच काय पण मराठ्यांचा बहुधा एकही किल्ला मोगलांना समोरासमोर लढाई करून मिळाला नाही. रामसेज हाती आला तो फितुरीने. रामसेजच्या पूर्वीचा किल्लेदार बदलून त्या जागी दुसरा किल्लेदार आला. त्याला मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याने रामसेज भागातील अब्दुल करीम नांवाच्या जमिनदाराच्या मार्फतीने वश करून घेतले व किल्ला पदरात पाडून घेतला. त्याचप्रमाणे साल्हेरचा किल्ला जिंकण्यासाठी शहाजादा आजमची नेमणूक झाली होती, पण तो येण्याआधीच सहा कोसांवरील मुल्हेरच्या नेकनामखानाने साल्हेरच्या मराठा किल्लेदारावर पैशांचा पाऊस पाडून किल्ला जिंकला. तळ कोकणातला कोथळागड अशाच प्रकारे घातपात व फितुरी यांच्या जोरावर कडुसचा ठाणेदार अब्दुल कादिर, शिक्रापूरचा ठाणेदार माणकोजी पांढरे व काझी हैदरचा पुतण्या काझी मुहम्मद यांनी जिंकला. "त्यांनी तळ कोकणातील तेल्या घाटात असलेल्या कोथळा किल्ल्याच्या परिसरात राहणार जमिनदार रामाजी याशी संगनमत केले आणि हेरगिरीने माहिती मिळविली की, किल्ल्यातील लोक जवळच्या खेड्यांत धान्य गोळा करण्यासाठी येत असतात. तेव्हा त्यांनी कोथळागडापाशी पोचून जमधर, तलवारी वगैरे हत्यारे तीनशे बंदुकधाऱ्यांबरोबर कोथळ्यास पाठविली. अब्दुल कादिरने त्यांना आपल्या फौजेसह डोंगराच्या पायथ्याशी लपवून ठेविले व किल्ल्याच्या कसरकोट दरवाजाजवळ जाऊन त्याने ओरडा केला की, 'दरवाजा उघडा, लोकांनी धान्य आणले आहे.' आपलीच माणसे समजून आतील लोकांनी दरवाजा उघडला. माझे लोक आत गेले. हत्यारे आणली. नंतर लढाई झाली. तेव्हा अब्दुल कादिर देखील आत गेला. मोठा विजय मिळाला." अब्दुल कादिर आणि काझी मुहम्मद यांनी लिहिलेल्या पत्रावरून काझी हैदर याने हा औरंगजेबास अर्ज केला आहे. मराठ्यांचे किल्ले सर करण्याचा मोगलाई कावा हा असा होता. इतके करूनही पांच वर्षांच्या शेवटी पाच किल्ले तरी त्यांच्या खरोखर ताब्यात आले की नाही याची शंकाच आहे. जे आले त्याची कथा कशी आहे हे पाहिलेच.

किल्ला एका जागी स्थिर तरी असतो त्यामुळे तो जिंकता तरी येतो. पण गेली पाच वर्षे पळणाऱ्या मराठ्यांना जिंकणार म्हणजे काय करणार? बुऱ्हाणपूर ते

सोलापूर, गोवा ते सुरत, कल्याण ते विजापूर मराठे दौडत होते व मोगल त्यांच्यामागे पळत होते. पण नोराकांठ, भीमाकांठ, कृष्णाकांठ, गोदाकांठ, यांच्या काठावरील हा शिवाशिवीचा खेळ किती काळ चालणार याला काळाची काहीच मर्यादा नव्हती. त्यांची शहरे जिंकणे याला काही अर्थच नव्हता. दोन वेळा मोगलांनी कल्याण घेतले व मोगल परत फिरले की मराठ्यांनी ते परत घेतले. त्यामुळे पांच वर्षांनंतरही पाण्यावर काठ्या माराव्यात तसा हा औरंगजेबाचा खटाटोप चालला होता. संभाजी कायम होता, अकबर कायम होता, मराठे कायम होते. कायम नव्हती ती फक्त औरंगजेबाची इभ्रत. 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' असा त्याचा केवढा दबदबा. तो हजरत. तो जिल्हे सुभानी. पण या दख्खनच्या कंगाल आणि भुरट्या मराठ्यांनी बोल बोल म्हणता त्याची सारी इज्जत घेऊन टाकली; आणि औरंगजेबाला याचे मोठेच दुःख झाले.

औरंगजेबाने मराठ्यांवर आजपर्यंत पाठवलेले सर्व सरदार मोठे नामांकित होते. पण मराठ्यांनी त्याची सपशेल फजिती केली. ती खुद्द औरंगजेबाचीच फजिती होती. चाकराची अब्रू जाते आणि धन्याची राहते असे कसे होईल? 'ज्याचा सेवक गांजला त्याचे जालेपणाची निर्फळता' हे भाऊसाहेब पेशव्यांचे उद्गार खरेच आहेत. खानजहान हा औरंगजेबाचा दूधभाऊ, पण मराठ्यांनी आपणामागे त्याला इतके पळायला लावले की पळून पळून त्याचे पाय मोडून आले. हसन अलीखान केवढा मोठा सरदार, जाटांचे पारिपत्य करताना व राजपूत युद्धात त्याने केवढी मर्दुमकी गाजविली. पण कोकणातून एका महिन्यात त्याला काढता पाय घ्यावा लागला. रणमस्तखान शिवाजीच्या वेळेपासून औरंगजेबाची सेवा करीत होता, व रुहुल्लाखान तर त्याचा प्रत्यक्ष मावसभाऊ. पण मराठ्यांनी त्यांना अन्न मिळू दिले नाही, शहाजादा शहाआलम औरंगजेबाचा साक्षात मुलगा, उद्यांचा दिल्लीपति, त्याच्यावर छापे घालून मराठ्यांनी त्याची लांडगेतोड केली आणि रसद तोडली. शेवटी पुत्राच्या मदतीसाठी खुद्द रुहुल्लाखानाला औरंगजेबाने पाठविले तेव्हा त्याच्या शाही फौजेतल्या कंगाल झालेल्या स्वारांना बसायला घोडे मिळाले! गोव्याचे पोर्तुगीज औरंगजेबाचे मित्र, पण संभाजी गोव्याचा दरवाजा ठोठावू लागल्यावर व्हाइसरॉयची गाळण उडाली आणि डोळ्यांत पाणी आणून त्याला सेंट झेवियरची करुणा भाकावी लागली. शिहाबुद्दिनवर औरंगजेबाचा केवढा इतबार. त्याला त्याने 'खान' गाजीउद्दीन' व 'फिरोजजंग' असे किताब दिले होते. यांतला प्रत्येक किताब म्हणजे त्याच्या एकेका पराक्रमाचे विजयचिन्ह होते. राजपूत युद्धात उदयपूरच्या वायव्येच्या जंगलात अडकलेल्या हसन अलीखानाची बातमी जिवावर उदार होऊन अवघ्या दोन दिवसांत त्याने काढून आणिली. तेव्हा संतुष्ट होऊन औरंगजेबाने त्याला 'खान' असा किताब दिला व म्हटले, की, 'माणकाप्रमाणे जो संकटांतून धैर्याने जातो तो दैवाच्या

मुकुटमालेचा अलंकार होतो-' आणि शेवटचे दोन किताब त्याने रायगडजवळ गाजविलेल्या पराक्रमाबद्दल दिले. मराठ्यांची राजधानी सर करण्यासाठी दोन वेळा औरंगजेबाने शिहाबुद्दिनाची निवड करावी, यातच शिहाबुद्दिनाचे कर्तृत्व दिसून येते. हे सर्व खरे असले तरी शिहाबुद्दीनच्याही हातून फारसे काही झाले नाही ही गोष्ट औरंगजेबाच्या नजरेतून सुटली नाही.

औरंगजेबाचा स्वभाव जात्याच संशयी होता. आपले सरदार खाल्ल्या मिठाचे चीज करीत नाहीत असा त्याला जबर अंदेशा होता. खानजहानने गाफीलपणाने अकबराला नासिकहून निसटून जाऊ दिले याबद्दल त्याचा त्याच्यावर फार राग होता. औरंगाबादला खानजहान त्याची भेट घेण्यासाठी आला असता सहा मैलांवरून औरंगजेबाने त्याला निरोप पाठविला की, "तुम्ही भेटीस येण्याचे कारण नाही. तुम्ही बीदरच्या दिशेने कूच करून तिकडेच तळ द्यावा. तो अपेशी अकबर जेथे जेथे म्हणून परागंदा होऊन भटकत आहे असे तुम्हाला कळेल तिकडे पोचून तुम्ही त्याचा पाठलाग करावा.' कोथळागड ऊर्फ मिफ्ताउल फुतूह जिंकल्यानंतर त्या कामात कष्ट केलेल्या लोकांनी साहजिकच बक्षिसाची मागणी केली. तेव्हा आधी हा कोथळागड अस्तित्वात तरी आहे कीं नाही याचीच औरंगजेबाला शंका आली. त्याने आतिशखानाला मुद्दाम तो किल्ला पाहून येण्यास सांगितलें व 'काझी हैदराने वर्णिल्याप्रमाणे खरोखरच तो किल्ला आहे. तो हाती आल्यामुळे संबंध तळ कोकणच बादशाही अमलाखाली येईल' असा आतिशखानाचा अर्ज आला तेव्हा कोठे औरंगजेबाची खात्री पटली.

सरदारांवर विश्वास नव्हता, त्याप्रमाणे औरंगजेबाच्या हातून पैसाही लवकर सुटत नसे. कोथळागड घेणाऱ्या मावळ्यांच्या पायदळाचा जमादार गोविंदराव याने औरंगजेबाकडे अर्ज केला की, मिफ्ताहुल फुतूह गड घेतल्याबाबत मी व माझे पायदळ मनसबीची आशा धरून होतो आता प्रतिमास प्रत्येकी तीन तीन रुपये देत जावे, तसेच मनसब देऊन ऊर्जित कराल व चाकरीची जागा द्याल अशी आशा करितो. त्यावर औरंगजेबाने हुकूम दिला की, "आहे त्यात संतुष्ट रहावे."

'न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्ते नातिविश्वसेत् ।' आणि 'अर्थमूलो व्यवहारः । अर्थ एव प्रधानः ।' या न्यायाने अविश्वास व काटकसर हे राजकारणात दोष नसून गुणच आहेत; म्हणून वेळेचा, पैशाचा, माणसाचा हिशेब करता मराठ्यांशी झालेल्या या पंचवार्षिक झगड्यात फायदा तर काही झालाच नाही, उलट तोटाच झाला, अशा निष्कर्षाप्रत औरंगजेब येऊन पोचला तर त्यात नवल नाही. आता काही काळ मराठ्यांकडे पाठ फिरवायची व गोवळकोंडा व विजापूर ही राज्ये जिंकावयाची असा त्याने विचार केला.

विजापूर-गोवळकोंडा जिंकण्याचे त्याचे स्वप्न जुनेच होते. मराठ्यांच्या युद्धात आर्थिक दृष्ट्या तूट आली होती, तीही भरून काढण्यास या स्वारीइतका उत्तम उपाय नव्हता. कारण विजापूर व गोवळकोंडा या सोन्याच्या आणि हिऱ्यांच्या खाणी होत्या. त्याहीपेक्षा विशेष म्हणजे या दोन दक्षिणेतील मुसलमान पातशाह्या संभाजीच्या मराठी राज्याशी संगनमत करून आपल्या उत्तरेतील पातशाहीला आव्हान देत आहेत याबद्दल औरंगजेबाचा त्यांच्यावर अतिशय राग होता. त्यांच्याकडून होणारा संभाजीचा उपराळा तोडावा, त्यांना जमीनदोस्त करावे व मग परत संभाजीचा समाचार घ्यावा अशा उद्देशाने औरंगजेबाने अहमदनगरचा आपला मुक्काम हलविला व विजापूरला जाण्यासाठी तो सोलापूरकडे रवाना झाला. २४ मे १६८५ रोजी तो सोलापूरला पोचला.

औरंगजेबाने अजमीरहून दक्षिणेकडे प्रयाण केले तेव्हा त्याच्या मनात विजापूरकरांविरुद्ध चढाई करण्याचे नव्हते. त्या घटकेला तरी अकबर आणि त्याला आश्रय देणारा संभाजी यांचा समूळ नायनाट करण्याचाच मर्यादित उद्देश त्याच्यापुढे होता, आणि मनात जरी विजापूरचा घास घेण्याचे पुढे मागे असले तरी ते मनात ठेवण्याइतका राजकीय शहाणपणा त्याच्यापाशी जरूर होता. त्यामुळे विजापूरचा सरदार शर्झाखान याला अजमीरहून निघण्यापूर्वी त्याने पत्र पाठविले की, संभाजीला शिक्षा करण्यासाठी आणि विजापूरकरांचे त्याने घेतलेले किल्ले त्याच्यापासून काढून घेण्यासाठी बादशहा दक्षिणेत जात आहे. तुम्ही घाबरू नये; उलट या बाबतीत खानजहानला मदत करावी. औरंगजेबाची सून आणि आझमची बायको शहरबानु ही विजापूरची राजकन्या होती. तिनेही या प्रसंगी खास पत्र शर्झाखानाला लिहिले की, "विजापूर राज्याच्या कल्याणासाठी शाही फौजांना एकनिष्ठपणाने मदत करावी. काफराचे प्रदेश जिंकून घ्यावेत."

परंतु औरंगजेबाचे सहकार्य मिळविण्याचे हे सारे प्रयत्न वाया गेले. कारण सौजन्याचा कितीही आव आणला तरी औरंगजेब हे काय प्रकरण आहे हे विजापूरकरांना चांगलेच माहीत होते. विजापूर घशात घालण्याची त्याची अभिलाषा ही किती जबर आहे हे १६५८ सालीच त्यांना समजून चुकले होते. त्या वेळी सुदैवाने शहाजहान आजारी पडला आणि राज्य मिळविण्यासाठी औरंगजेबाला घाईघाईने उत्तरेकडे कूच करावे लागले. त्याचमुळे केवळ त्याच्या मगरमिठीतून त्याची सुटका झाली. तरी आठ वर्षांनी जयसिंगामार्फत विजापूरवर औरंगजेबाने स्वारी केलीच होती. त्याही नंतर दिलेरखानाने विजापूरला वेढा घातला होता आणि केवळ शिवाजी महाराजांच्या मदतीमुळे विजापूर वाचले होते. त्यामुळे औरंगजेबाने कितीही सांगितले तरी विजापूरकरांना पक्के माहीत होते की या उत्तरेच्या आक्रमणाविरुद्ध आपला एकमेव आधार शिवाजी आणि संभाजी यांच्या मराठी राज्याचा आहे. त्यामुळे संभाजीला मदत करण्याचे त्यांनी मुळीच बंद केले नाही.

औरंगजेबाच्या लक्षात ही गोष्ट आल्यानंतर त्याने मराठ्यांबरोबर विजापूरकरांशीही युद्ध सुरू केले. या वेळी त्याचा मुख्य उद्देश विजापूरच्या मदतीने चाललेल्या संभाजीच्या परिंडा आणि सोलापूर या भागातील हालचालींना पायबंद घालावा इतकाच होता. त्याचे मुख्य युद्ध मराठ्यांशीच होते. त्या दृष्टीने १६८२च्या जानेवारीत रुहुल्लाखानास आणि १६८२ च्या मे महिन्यात आझमला विजापूरवर त्याने रवाना केले. रुहुल्लाखानाने काही खेडी जाळली आणि आझमने धारूरचा

किल्ला घेतला. पण थोडचा फार जाळपोळीपलीकडे या आक्रमणाची व्याप्ति गेली नाही. १६८४ पासून मात्र औरंगजेबाने विजापूरचा मोड करण्याचा निर्धार केला. बहादुरगड येथे आझमने आपले मुख्य ठाणे केले आणि त्याने व खानजहानने विजापूरचा मुलूख उद्ध्वस्त करण्याचा सपाटा लावला. खानजहानने मंगळवेढे आणि सांगोला ही स्थळे जिंकली. विशेषतः या वर्षी शहाआलमची जी कोकणात फजिती झाली होती त्यामुळे औरंगजेबाचा विजापूरकर हे संभाजीशी मिलाफी आहेत असा जो संशय होता, तो बळकट झाला होता. त्यामुळेही त्याने संभाजीचा नाद काही काळ सोडून विजापूरचा समूळ उच्छेद करावयाचा निर्धार केला होता.

३० मार्च १६८४ रोजी औरंगजेबाचे फर्मान विजापूरचा बादशहा सिकंदर आदिलशहा याला आले की "त्याने सर्व प्रकारच्या रसदेचा पुरवठा मोगल सैन्यास तत्परतेने करावा; मोगल सैन्यास त्याच्या मुलखातून जाण्यास मार्ग द्यावा, मराठ्यांबरोबर चाललेल्या लढाईत औरंगजेबास मदत म्हणून पाच ते सहा हजार स्वारांची तुकडी पुरवावी, संभाजीशी अंतर्बाह्य सख्य समूळ सोडावे आणि शर्जाखानाला हद्दपार करावे." या पत्राला सिकंदर आदिलशहाने तितकेच सडेतोड उत्तर पाठविले कीं "मोगलांनी पूर्वी घेतलेली खंडणी आणि ठाणी परत करावीत, सांगोला व मंगळवेढे ही ठाणी मोकळी करावीत, त्यांच्या स्वतःच्या म्हणजे पुणे चाकण भागातून त्यांनी संभाजीवर चालून जावे. संभाजी आणि शिवाजी यांनी घेतलेला आदिलशाहीचा सर्व मुलूख परत मिळेपर्यंत मोगलांनी संभाजीशी तह करू नये, आणि शर्जाखानाला हद्दपार करणे शक्य होणार नाही." जितके उद्दाम औरंगजेबाचे पत्र तितकेच उद्दाम सिकंदराचे उत्तर. औरंगजेबाच्या पत्राचे आश्चर्य वाटत नाही. आपल्या पत्रातली एकही अट सिकंदर मान्य करणार नाही हे तो पक्के ओळखून होता. युद्धाला निमित्त हवे म्हणूनच केवळ खुसपट काढण्यासाठी त्याने हे पत्र लिहिले. कौतुक वाटते ते सिकंदराचे. त्याचे वय अठरा वर्षांचे, कारभाराचा अनुभव शून्य, त्याच्या मंत्रिमंडळात बजबजपुरी माजलेली, वजीर सिद्दी मसूद कंटाळून अदोनीला पळून गेलेला, दुसरा वजीर अगदी नवा, भिस्त ठेवण्यासारखा सेनापति फक्त शर्जाखान. राज्य सगळे मोडकळीला आलेले. जिकडे पहावे तिकडे अंधार पसरलेल्या परिस्थितीत हा अठरा वर्षांचा मुलगा दिल्लीपतीला आव्हान देतो ही नवलाची गोष्ट आहे खरीच.

औरंगजेबाचा सवाल आणि सिकंदराचा जबाब यामुळे युद्धाला हिरवा कंदील दाखविल्यासारखे झाले. ताबडतोब औरंगजेबाने आपल्या सरदारांना विजापूर मुलुखात ठाणी बसविण्याचा हुकूम दिला आणि १ एप्रिल १६८५ रोजी प्रत्यक्ष विजापूरला वायव्येकडून शहापूरच्या बाजूने खानजहान व पश्चिमेकडून रसूल-

पूरच्या बाजूने रुहुल्लाखान यांनी वेढा घातला. १४ जूनला शहाजादा आझम आल्यानंतर सैन्याची संपूर्ण हुकुमत त्याने आपल्या हातांत घेतली. खुद्द औरंगजेब वेढयावर नजर ठेवण्यासाठी अहमदनगरहून निघून २४ मे रोजी सोलापूरला येऊन राहिला.

मोगलांचा फास विजापूरभोवती असा आवळला जात असताना सिकंदर आदिल-शहानेही त्याला तोंड देण्याची सर्व व्यवस्था केली होती. किल्ल्याचे संरक्षण त्याने चितू चिमा नावाच्या ब्राह्मणावर सोपविले आणि प्रत्यक्ष लढाईचे काम अब्दुर-रझाक व शर्जाखान यांना सांगितले. वाकिन खेडयाचा पामनायक याला त्याच्या कुशल बर्कंदांजासह मदतीला बोलाविले. याहीपेक्षा विशेष म्हणजे गोवळकोंडयाचा कुतुबशहा, आपला पूर्वीचा वजीर सिद्दी मसूद आणि संभाजी यांच्याकडे मदतीची मागणी केली. त्याप्रमाणे प्रत्येकाने मदत केली. सिद्दी मसूदने सैन्य पाठविले. कुतुबशहाने अंबाजी पंडिताच्या हाताखाली सैन्य पाठविले आणि संभाजीने एकदा फेब्रुवारीत मेलगिरी पंडित व एकदा डिसेंबरात हंबीररावाच्या नेतृत्वाखाली सैन्य धाडले.

पण या मदतीपेक्षाही ज्या प्रवृत्तीने ही मदत करण्यात आली ती महत्त्वाची आहे. गोवळकोंडा, विजापूर व मराठी राज्य ह्या दक्षिणी राज्यांची उत्तरेच्या आक्रमणाविरुद्ध 'दक्षिणीयांची पातशाही दक्षिणीयांच्या हाती राहे' या व्यापक भावनेने जी एकजूट शिवाजी महाराजांनी आपल्या जीविताच्या अंतिम पर्वात केली होती, तिचीच परंपरा या प्रवृत्तीच्या रूपाने प्रकट होत होती. कुतुबशहाने आदिल-शहाला लिहिलेले पत्र या दृष्टीने मोठे उद्बोधक आहे. "आलमगीर बादशहा दौलताबादेस आल्यानंतर त्याने आमच्याकडे एक हेजीब पाठविला. आम्ही छत्रपति संभाजीवर डोळा ठेवून आलो आहोत, तरी आपण आपला फौजफाटा आमच्या मदतीस द्यावा असा त्याने निरोप दिला. त्यावर आम्ही उत्तर पाठविले की दक्षिणेची पादशाही बाब व आमची पादशाही निराळी नाही. तेव्हा मुघल आपले-वर चालून आला असला तरी सुद्धा भिण्याचे कारण नाही. आम्ही पैसे पुरवू. आपण शर्जाखानास दिलदिलासा देऊन सरसुभा त्याला देऊन मुघलावर रवाना करावा. महाराज संभाजी राजाकडे एक पत्र हेजिबांबरोबर देऊन मुघलांचा फन्ना उडविण्या-साठी घोडदळाची मदत मागावी. आम्ही खासे कंबर बांधून गुलबर्ग्यास जात आहोत. तुम्हीही कंबर बांधून तयार राहा. संभाजीराजे सज्ज होऊन आले म्हणजे तिथे मिळोन मुघलावर तुटून पडू. यात तुमच्या राज्यास धक्का लागणार नाही. संभाजी राजांनी आमच्याकडे रामचंद्रपंत हेजीब पाठविला आहे. त्याने अनेक गुप्त गोष्टी सांगितल्या. त्या सर्व ऐकून आम्ही त्यास तुमच्याकडे पाठविला आहे. ते ज्या गोष्टी सांगतील त्यावरून तुम्ही खूष व्हाल."

संभाजीने विजापूरला जी मदत केली ती केवळ स्वतःच्या बुद्धीने नव्हे. तो बुद्धिमान् होताच, पण कुतुबशहा आणि आदिलशहा यांच्याशी औरंगजेबाविरुद्ध अभेद्य मित्रसंघ स्थापना करण्यात शिवाजी महाराजांचेच धोरण तो पुढे चालवीत होता. हंबीररावाने आझमची रसद मारून त्याच्या सैन्याची जी उपासमार केली, त्याचे वर्णन वाचताना सहा वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांनी याच पद्धतीने दिलेर-खानाच्या आक्रमणापासून आपण विजापूर कसे वाचविले याचे व्यकोजीला पत्राने जे निवेदन केले होते त्यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. दिलेरखानाच्याऐवजी आता त्याचा मालक औरंगजेब आला होता. एवढा फरक सोडला तर इतिहासाची पुनरावृत्ति होते हे खरे वाटते. विजापूरची दुबळी स्थिति तीच, मोगलांचे शिरजोर आक्रमण तेच आणि मराठ्यांची मदत तीच. फक्त शिवाजी महाराजांच्या ऐवजी संभाजी आणि दिलेरखानाच्या ऐवजी औरंगजेब एवढाच फरक पडला होता. महाराज आपल्या पत्रात म्हणतात– "दिलेरखान विजापूरची बादशाही कमकुवत देखोन जोरावरी धरून विजापूर घ्यावे या मतलबे विजापुरावरी चाल केली हे वर्तमान खान अलीशान मसऊदखान यांणी आम्हांस लिहिले की गनिमे जोरावरी बहुत धरली आहे. एहून मदत केली पाहिजे. त्याजवरून आम्ही तेच क्षणी स्वार होऊन ······ सारी कुल जमेती करून खासा लष्करानिसी विजापूरासंनिध गेलो. विचारे पाहता गनीम कट्टा, त्याहीमध्ये पठाण जाती हट्टी याशी हुन्नरेच करून खजिल होऊन नामोहरम होय, तो हुन्नर करावा म्हणून ऐशी तजवीत केली की त्याचे मुलखांत फौजांचा पैसावा करून ओढा लावावा. त्यावरून भीमा नदी उतरून तहत जालनापूर पावेतो मुलूख ताख्तताराज करीत चाललो. तो खान अलीशानाची किताबती आली की, तुम्ही कितेक गनिमाचे मुलकात स्वारी करून खराब केला, ओढा लाविला परंतु या जागाहून गनिम उखळत नाही. बहुतच बळ धरून कोटा-नजिक भिडला आहे. ऐसमयी येऊन मदत करून पादशाही रक्षिली पाहिजे.··· ये जातीने मुलुक खराब करून गड कोट व देश कबज करुन वोढा लाविला आणि लवाजमा धरून वरच्यावरी कहीकबाड मारून गनिम जेरा केला. ···· आम्ही या प्रकारे विजापुरीचे साहाय्य द्रव्याने व सेनेने करून ज्या उपाये गनिम उखळू ये त्या उपाये उखळून विजापुरीचे आरिष्ट दूर करून विजापूर रक्षिले. गनिमास ऐसे केले जे मागती विजापुरची वाट न धरावो."

तंतोतंत शिवाजी महाराजांचे डावपेच संभाजीने या वेळी अमलात आणले. फेब्रुवारी १६८५ मध्ये मराठ्यांनी खानदेशात आक्रमण करून धरणगाव लुटले, जसे पूर्वी शिवाजीमहाराजांनी जालनापूर लुटले होते. औरंगजेबाचा नगरचा मुक्काम हलला ही संधि साधून त्यांनी नगरावर हल्ला चढविला आणि किल्ल्याला शिड्या लावून तटावर येण्याचा प्रयत्न केला. खुद्द विजापूर भोवतालचा प्रदेश त्यांनी उद्ध्वस्त केला. विजापूरचे तीस हजार सैन्य आणि हंबीररावाचे मराठे

यांनी मोगलांचे कही कावाड मारून रसद तोडली. त्यात पावसाळा सुरू झाल्यामुळे कोठूनही धान्य येणे मुष्किल झाले. आझमच्या छावणीत पंधरा रुपयाला शेरभर धान्य मिळू लागले. शिपायांनी घोडे व गुरे कापून खाल्ली.

वेढा घालून पंधरा महिने झाले पण आझम होता तेथेच होता. मोर्चे उभारणे आणि सुरुंग खणणे हे काम काही सोपे नव्हते. कारण विजापूरची जमीन फार खडकाळ. 'ज्या जमिनीत विजापूरचा किल्ला बांधला आहे, ती जमीन अर्धी गज खणिली तथापि काळे धोंडे निघतात.' वेढा इतका भोंगळ होता की आतले लोक केव्हाही बाहेर जाऊ शकत व बाहेरचे आत येऊ शकत. तीस हजार कजाख शिपाई आत होते ते वेढा घालणाऱ्या सैन्यावर बंदुकांचा भडिमार करीत. पुढे किल्ल्यातला गोळीबार, मागे मराठ्यांची लांडगेतोड, वरून आकाशातून मुसळधार पाऊस, खायला अन्न नाही, शत्रूच्या धास्तीने झोपायचीही सोय नाही असे सगळ्या बाजूंनी स्वतःच वेढ्यात सापडलेले आझमचे सैन्य म्हणजे शुद्ध पागलखाना होऊन बसले त्याची स्थिति इतकी दारुण झाली की खुद्द औरंगजेबाने त्याला परत बोलाविले;

हा जितका निसर्गाच्या प्रकोपाचा आणि विजापूरकरांच्या कर्तृत्वाचा परिणाम होता तितकाच मराठ्यांनी ऐनवेळी केलेल्या मदतीचाही परिणाम होता. विजापूर व गोवळकोंडा यांच्याबद्दल जे ममत्वाचे राजकारण शिवाजी महाराजांनी केले होते त्याची ही फलश्रुति होती. विजापूर पडल्यावरही ही जिद्द संपली नव्हती. हंबीर-, रावाने एका पत्रात म्हटल्याप्रमाणे– "आम्ही सेनेसमुदायनिसी गनिमाचे पाठीवरी अहो. गनीमाचा हिसाब धरीत नाही. येक विजापूर जाले तरी काय जाले. विजापूर हा जागा पहिलेपासून आमचाच आहे. त्याची मदत हर बाबेने अम्हांस करणे लागते."

पण औरंगजेबाने परत बोलाविले म्हणून परत जाणारा माणूस आझम नव्हता. तोही तिरसट आणि जिद्दीचा होता, आणि गेल्या वर्षी आपल्या मोठ्या भावाची –शहाआलमची–कोकणस्वारीत जी फटफजिती झाली होती, त्यामुळे तर त्याला ईर्ष्या चढली होती. त्यामुळे 'मेलो तरी आपण विजापूरहून हटणार नाही' असा निर्धार त्याने व्यक्त केला. त्याबरोबर औरंगजेबाने स्वतःच्या छावणीतल्या पाच हजार बैलांवर धान्य लादून गाजीउद्दीन फिरोजजंगाबरोबर त्याच्याकडे पाठविले. आझमला धान्यही मिळाले व फिरोजजंगासारखा धुरंधर मदतनीसही मिळाला. त्यामुळे मराठ्यांचा उपद्रव बराच कमी झाला. आणखी एक अनुकूल गोष्ट याच वेळी घडली. शहाआलमने कुतुबशहाचा पाडाव केला. गोवळकोंड्याची विजापूरला यापुढे होणारी मदत कायमची बंद पडली. विजापूर एकाकी पडले.

विजापूरवर चढाईला सुरुवात करितानाच औरंगजेबाने विजापूरला कोठल्याही प्रकारची मदत न करण्याबद्दल कुतुबशहाला निक्षून बजावले होते. पण त्याच्या

धाकदपटशांना भीक न घालता कुतुबशहाने विजापूरला मदत करण्याचा आपला क्रम चालूच ठेवला. अखेर औरंगजेब सोलापूरला असता १६८५ च्या मे महिन्यात त्याच्या छावणीत असलेल्या कुतुबशहाच्या वकिलांना आलेले गुप्त पत्रच औरंगजेबाने पकडले. या पत्रात कुतुबशहाने लिहिले होते की, " बादशहा थोर आहेत. आतापर्यंत मी त्यांच्या थोरपणाचा मान राखला. पण विजापूरचा सिकंदर आदिलशहा हा अनाथ आणि दुबळा आहे हे जाणून त्यांनी विजापूरला वेढा घातला आहे आणि सिकंदर आदिलशहावर कठीण प्रसंग आणला आहे. आता विजापूरचे सैन्य तर आहेच. राजा संभाजीने आपले अगणित सैन्य घेऊन त्या अनाथ बादशहाची मदत करण्याची पराकाष्ठा करावी. मी खलीलुल्लाखान याच्या नेतृत्वाखाली चाळीस हजारांचे सैन्य तयार ठेवतो. आम्हीही पाहू बादशहा कुठे कुठे लढेल ते." औरंगजेबाच्या हातात कधीही पडू नये अशा प्रकारचे हे पत्र होते. त्या पत्रातले कुतुबशहाने राजकारण आणि आव्हानाची भाषा यांनी औरंगजेब ताबडतोब सावध झाला व त्याने शहाआलमच्या नेतृत्वाखाली प्रचंड सैन्य हैदराबादवर २९ जून १६८५ रोजी रवाना केले. विजापूरचा वेढा चालविण्यासाठी असतील तेवढी माणसे थोडीच असताना एवढा मोठा सैन्याचा भाग काढून घेणे नुकसानीचे होते हे त्याला कळत नव्हते असे नाही. पण त्याची त्याने पर्वा केली नाही. शहाआलमने आपली कामगिरी चोख बजावली. त्याने कुतुबशहाचा सरसेनापति मीर मुहम्मद इब्राहिम याला फोडले ८ ऑक्टोबर १६८५ रोजी हैदराबाद जिंकले आणि कुतुबशहाला शरण आणले. औरंगजेबाच्या अटी मान्य करण्यात आल्या. पूर्वीच्या खंडणीबद्दल जवळजवळ दीडकोटी रुपये व दरवर्षी दोन लाख होन देण्यात यावेत व संभाजी व विजापूर यांच्याशी राजकारण करणारे ब्राह्मण मंत्री आकण्णा व मादण्णा यांना कामावरून कमी करण्यात यावे अशा औरंगजेबाच्या अटी होत्या. आकण्णा व मादण्णा हे कुतुबशहाच्या गळयातील ताईत होते. त्यांना तो काही केल्या दूर करीना तेव्हा ते काम त्याच्या मातोश्रींनी केले. तिने आकण्णा व मादण्णा यांचा शिरच्छेद केला आणि त्यांची मुंडकी औरंगजेबाकडे पाठविली. गोवळकोंड्याचा वकील औरंगजेबाची भेट घेण्यासाठी तिष्ठत उभा राहिला. बरोबर त्याने कुतुबशहातर्फे सातशे हत्ती भेट म्हणून आणले होते. औरंगजेब तरी आता अटी काय घालणार व हट्ट कशाचा धरणार? पाया पडून पडूनच कुतुबशहाने औरंगजेबाला जेरीला आणले होते. ही कणा मोडलेली कुतुबशाही विजापूरला मदत ती काय करणार ? म्हणून औरंगजेबाने तात्पुरती कुतुबशहाला क्षमा केली व सर्व लक्ष विजापूरवर केंद्रित केले.

पण कुतुबशाही पडली तरी आदिलशाही हिंमत हरली नाही. ते किल्ल्यातून जिद्दीने लढतच होते. वेढा चालून दीड वर्ष होत आले तरी अद्याप आझमच्या दृष्टिपथात यश नव्हते. मोगलांचा कारभार आधीच सुस्त आणि गलथान; आणि

विजापूरची टणक जमीन आणि विजापूरची टणक माणसे यांच्याशी त्याची झुंज चालली होती. त्यात पुन्हा आपापसात त्यांची झुंज सुरू झाली. शेवटी औरंगजेबाने सोलापूरचा मुक्काम उठविला आणि तो विजापूरला आला. मुलाच्या अंदाधुंद कारभारावर तो बहुत नाराज होऊन बोलला, "मला फार आशा होती की माझ्या मुलांपैकी कुणीतरी विजापूर घेईल. पण ते काही होत नाही. आता मला स्वतःच तेथे जाऊन इतके दिवस खाणारे विजापूर हे काय प्रकरण आहे हे पाहणे भाग आहे." औरंगजेब आल्यानंतर अर्थातच वेढ्याच्या कामाला गति आली. थोड्याच दिवसांत मोर्चे खंदकाला जाऊन भिडले. पण खंदक मातीने भरून काढणे फार दुर्घट झाले. खंदकाच्या काठावर माणसाचे डोके दिसले रे दिसले की किल्ल्यातील लोक गोळ्यांचा पाऊस पाडीत. औरंजेबाने मग मातीची टोपली टाकली तर चार आणे मिळतील अशी दवंडी पिटविली. पण काही दिवसांनी चार आणे देऊनही लोक तयार होईनात. मग एक रुपया एका टोपलीला जाहीर झाला. त्यानेही माणसे वळेनात. तेव्हा औरंगजेबाने एक टोपली माती जो खंदकात टाकील त्याला एक सोन्याची मोहोर मिळेल असे जाहीर केले. तेव्हा मात्र लोक तयार झाले. त्यांनी जिवावर उदार होऊन खंदक भरून काढला. ते स्वतःच्या जिवावर उदार झाले इतकेच नव्हे तर दुसऱ्याच्या जिवावरही उदार झाले. कारण खंदक भरताना त्यांनी मातीच्या टोपल्या तर टाकल्याच, पण तेथे गफलतीने रेंगाळणारी जिवंत माणसेही फेकली. नरबलीने वास्तुदेवता संतुष्ट होते असे म्हणतात ते खरे असावे असे यावरून म्हणावेसे वाटते.

'निश्चयाचे बळ तुका म्हणे तेंचो फळ–' औरंगजेबाच्या निश्चयाने आता मात्र विजापूरवर मोठा कठीण प्रसंग आणिला. त्या वर्षी दक्षिणेत दुष्काळ पडला, खुद्द मोगलांनाच खाण्याची पंचाईत होती तर वेढ्याचा फास गळ्याभोवती करकचून आवळलेल्या किल्ल्यातल्या लोकांच्या हालांची कथा काय सांगावयाची? किती माणसे व किती जनावरे मेली त्याची मोजदाद नव्हती. अशा दारुण परिस्थितीत, विजापूरच्या मुस्लिम राजवटीविरुद्ध औरंगजेबासारख्या इस्लामच्या कैवाऱ्याने लढणे हे धर्मविरुद्ध, शास्त्रविरुद्ध, न्यायविरुद्ध व नीतिविरुद्ध आहे असा बुद्धिवाद सांगून औरंगजेबाचे हृदयपरिवर्तन करण्याच्या उदात्त उद्देशाने विजापूरच्या धर्माचार्यांचे एक शिष्टमंडळ औरंगजेबाकडे पाठविण्यात आले. पंडितांच्या या गृहीतकृत्यात एकच लहानशी चूक होती. ती म्हणजे परिवर्तन करण्यास औरंगजेबाला हृदय आहे, हे त्यांनी गृहीत धरले ही होय. पंडितांना व्यवहार कळत नाही असे म्हणतात ते काही खोटे नाही.

औरंगजेब साधा होता पण साधा नव्हताही. साधी होती ती त्याची राहणी; त्याची सरणी आणि करणी साध्याहून फार फार निराळी होती. तो पंडितही

होता आणि तो व्यवहारही खूप जाणत होता. ज्याने तोफांच्या भडिमाराला आणि बंदुकीच्या फैरींना दाद दिली नाही, तो पुस्तकांच्या बातेऱ्यांना आणि वावदुकांच्या तोंडपाटिलकीला काय भीक घालतो ? त्याचे उत्तर तयारच होते. तो बोलला– "जे तुम्ही बोललात ते खरे आहे व दुरुस्त आहे. यात काही एक अमान्य होण्याची जागा नाही. आम्हास तुम्हासी व तुमचे शहरासी व तुमचे मुलकासी काही एक गरज नाही. तुम्हासी तोडातोडी व लढाई आम्ही करीत नाही. परंतु हे आहे की बेमान हिंदु निर्दैवीचा पुत्र निर्दैवी म्हणजे शिवाजीचा पुत्र संभाजी तुमचा आश्रय धरून राहिला आहे आणि तुमचे आधाराने बहुत फंदफितूर व खराबी करीत आहे. जागोजागचे शहरातील मुसलमान लोक व मुलखामुलखांतील व गांवोगावचे गोरगरीब लोक दिल्लीचे दरवाजापर्यंत संभाजीचे पीडेने अतिपीडा भोगून त्रासून रात्रंदिवस आरडा ओरडा करीत आहेत. स्वधर्माचा रस्ता केरकचऱ्यापासून निर्मूळ करावा म्हणजे असे पीडक लोक मुसलमानी धर्मांत राहू देऊ नयेत व त्याचा समूळ फडशा करणे पादशाहास प्राप्त आहे. आम्हीही पातशाहाचे जमातीपैकीच आहोत. यास्तव आम्हांस हे करणे योग्य आहे. आम्ही आपले वतन सोडून या सरहद्दीत आमचे येण्याचे तात्पर्य यापरते म्हणजे संभाजीला पकडण्यापरते, दुसरे काही एक नाही. तो संभाजी तुमचे आश्रयात आहे. तो आमचे हवाली करून द्यावा हे तुम्हांस मागतो. संभाजी आमचे हाती आला म्हणजे याच घटकेस आम्ही निघोन जातो आणि आमचा दिल्लीचा मार्ग स्वीकारतो."

औरंगजेबाचे हे उत्तर त्याच्या स्वभावाप्रमाणे अतिशय गुंतागुंतीचे होते. त्यात धर्मकारण होते की राजकारण होते की वैयक्तिक महत्त्वाकांक्षा होती, की हे सर्वच होते हे सांगणे फार कठीण आहे. पण त्याचे ते चुणचुणीत म्हणा की चरचरीत म्हणा उत्तर ऐकून विजापूरचे पंडित काही बोलेनात. बोलणार काय? औरंगजेबाला धर्म शिकवणार कोण ? तो स्वतःच बहुत धर्मशास्त्र पढून जाडा पंडित झाला होता. 'फतवा–ए–आलमगिर' रचणाऱ्या आलमगिराला धर्मशास्त्राचा फतवा सांगणार कोण! जो आधीच शहाणा त्याला शहाणा करायचे कुणी ! विजापूरचे धर्मशास्त्री खूप विद्वान् असतील पण ते विजापुरात औरंगजेबासारख्या तेजःपुंज धर्ममार्तंडापुढे पुस्तकी पोपटपंची करणारे हे शास्त्री म्हणजे बुद्रुक काजवे होते. सूर्य उगवल्यावर कुठला चंद्र व कुठला काजवा ? 'उदिते तु पुनर्भानौ न खद्योतो न चंद्रमा!' त्यामुळे औरंगजेबाने सुनावलेले चार खडे तात्त्विक बोल ऐकून विजापूरचे फुरफुरणारे बोलघेवडे पंडित चूप बसले व तोंडात मारल्यासारखे चेहरे करून परत गेले. औरंगजेबाने बाहुबळात विजापूरला चीत केले होते. आता बुद्धिबळात मात केली. त्याच्यापुढे शस्त्र बोथट झाले, शास्त्र कुंठित झाले. आता पर्याय एकच उरला – सपशेल शरणागति !

१२ सप्टेंबर १६८६ हा दिवस विजापूरच्या इतिहासातला काळाकुट्ट दिवस ठरला. त्या दिवशी विजापूरच्या सौभाग्यसूर्याचा अस्त झाला. आपल्या पूर्वजांच्या पुरातन महालाकडे शेवटचा दृष्टिक्षेप टाकून त्या दिवशी विजापूरचा अखेरचा आदिलशहा सिकंदर आपल्या पायांनी चालत औरंगजेबाच्या छावणीत दाखल झाला. गेल्या पाच वर्षांत औरंगजेबाने मिळविलेला हा नेत्रदीपक विजय असल्यामुळे त्याने आपला दोवानेखासचा तंबू शृंगारण्यात पराकाष्ठा केली होती, तंबूच्या दाराशी सिकंदर आल्याबरोबर त्याच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठीच की काय, विजयगीते निनादू लागली. रुहुल्लाखानाने त्याला औरंगजेबापुढे नेले व सिकंदरने त्याला लवून कुर्निसात केला. त्या क्षणी आदिलशाहीचे स्वातंत्र्य समाप्त झाले. सिकंदर दिसायला इतका देखणा होता व त्याच्या वागण्या बोलण्यात अशी काही खानदानी ऐट होती की त्या राजबिंडचा पुरुषाचे ते दुर्दैव पाहून औरंगजेबाच्या दरबारातल्या करडचा उमरावांचीही निर्ढावलेली अंत:करणे कळवळली. फार काय सांगावे, पाषाणालाही पाझर फुटावा त्याप्रमाणे औरंगजेबाच्या चित्ततही क्षणभरच का होईना पण कालवाकालव झाली. तो सिकंदराला म्हणाला "देव तुझ्यावर दया करो. तू शहाण्यासारखा वागलास व तुझ्या हिताचे तेच तू पत्करलेस. मी तुला वैभवाला चढवीन. काही काळजी करू नकोस." त्याने त्याला आपल्या उजव्या हाताला नातवाच्या जवळ बसविले, पोषाख दिला, खंजीर दिला, मोत्याची माळ दिली. एक लाखाचा वार्षिक तनखा दिला व आपल्या जवळच्याच तंबूत त्याची राहण्याची सोय केली.

जे शहर जिंकावयाचे औरंगजेबाचे जुने स्वप्न होते व जे जिंकण्यासाठी त्याने एवढा जिवाचा आटापिटा केला, त्या विजापूर शहराला त्याने एका आठवडचाने भेट दिली. ज्या मंगळी दरवाजातून मोगल सैन्याने हल्ला चढविला होता. त्याच दरवाजातून त्याने प्रवेश केला. तो दरवाजा आधीच प्रचंड, औरंगजेबाने तो आणखी मोठा केला व त्याला 'फत्ते दरवाजा' असे सार्थ नांव दिले. तो तख्तेखांवर बसला होता. रस्त्यावरून जाताना डाव्या उजव्या बाजूला मुठीमुठींनी तो सोन्यारुप्याची नाणी उधळीत चालला होता. शहराचे निरीक्षण केल्यानंतर तो जामा मशिदीत गेला व आपणास विजय मिळाल्याबद्दल गुडघे टेकून परमेश्वराची त्याने प्रार्थना केली. तेथून तो आदिलशहांच्या राजवाडचात गेला. विजापूर हे कलेचे माहेरघर होते व सारे आदिलशहा हे कलेचे रसिक आश्रयदाते होते. त्या ऐश्वर्यशाली राजमंदिराच्या भिंतीवर चित्रकला सोळा कलांनी फुलली होती. तैल रंगाने रंगवलेली कितीतरी चित्रे होती. गारवेलीच्या निळसर फुलांची चित्रे तर चित्रे वाटतच नव्हती; ती निळी फुलेच वाटत होती. पण माणसाने चित्रे काढणे म्हणजे सृष्टि रचणाऱ्या ईश्वराशी स्पर्धा करणे आहे हे कुराणाचे मत मानणाऱ्या औरंगजेबाला ही सारी कला साफ नामंजूर होती. त्याने चित्रातल्या सुंदरींचे मुखवटे

फोडून त्यांत चुना भरला आणि त्या चितारलेल्या भिंतीवर या टोकापासून त्या टोकापर्यंत पांढरा रंग फासून कलेच्या 'रंगे'ल कलंकाने रंगलेली ती भिंत आपल्या अंगावरच्या सदऱ्याप्रमाणे आणि चारित्र्याप्रमाणे 'सफेत' करून टाकली. विजापूरचे 'स्थावर' वैभव जी मुलुख मैदान तोफ तिलाही औरंगजेबाने भेट दिली. हे वैभव खरोखरच स्थावर होते, कारण पंचावन्न खंडीची ही प्रचंड तोफ दिल्लीला नेण्यासाठी औरंगजेबाच्या बापाने म्हणजे शहाजहानने जंगजंग पछाडले. पण ती तोफ तसूभरही हलली नाही. औरंगजेबालाही ती हलवता आली नाही. पण तो जात्याच चतुर. त्या अचल तोफेवर त्याने आपली प्रशस्ति कोरून ठेवली; त्याचा अंदाज खरा ठरला. आदिलशहा गेला, त्याला बुडविणारा औरंगजेब गेला; पण मुलुख मैदान अजून आहे. व तोंडात हत्ती धरलेल्या सिंहाच्या जबड्याचा आकार असणाऱ्या त्या तोफेच्या डोक्यावर ठसठशीत अक्षरात कोरलेला औरंगजेबाचा विजयलेख अजून जशाचा तसा आहे– 'जो आलमगीर बादशहा बहादूर धर्मरक्षक त्याने सन तारीख हिजरी १०९७ मध्ये विजापूर फत्ते केले व इन्साफीने बादशाहाचा मुलुख घेऊन आपल्या दैवाने प्रसिद्ध मुल्कमैदान तोफ काबीज केली!

'शाहे आलमगीरगाजी बादशाहे दीपनाह
फतह विजापूर कर्दब हरे तारिखे जाफर
आकेदा दोअदलदाद मुल्कशहांगिरफ्त्
रूनमूद एक बालगुफ्तामुल्कमैदान गिरफ्त्

औरंगजेब पैशाच्या बाबतीत महा कद्रू होता असे म्हणतात. पण द्रव्याप्रमाणे दयेच्याही बाबतीत तो तसाच कृपण होता. सिकंदरच्या दुर्दशेने तो कळवळला आणि त्याने दिलासा दिला हे खरे. पण ते तितक्यापुरतेच. दयेने अंतःकरण विरघळणे हे त्याच्या रक्तातच नव्हते. त्याला तो काय करणार ? साखर दुधात विरघळते हा साखरेचा गुण नव्हे आणि दगड दुधात विरघळत नाही हा दगडाचा दोष नव्हे. हा प्रत्येकाचा प्रकृतिधर्म आहे. औरंगजेबाची मोठी दया एवढीच की त्याने सिकंदराला जिवे मारले नाही. काही दिवस आपल्या छावणीत 'गुलालबार' मध्ये' ठेविले, नंतर दौलताबादला पाठविले; नंतर मराठ्यांचे' किल्ले घेण्यासाठी त्याने मोहीम काढली तेव्हा परत सिकंदरला छावणीत आणले. औरंगजेब गावोगाव हिंडे तेव्हा त्याच्या मागोमाग सिकंदरलाही उन्हापावसात, दऱ्या खोऱ्यात व थंडीवाऱ्यात हिंडावे लागे. अशाच स्थितीत औरंगजेब सातारा किल्ल्याच्या पायथ्याशी असताना १७०० मध्ये अवघ्या बत्तिसाव्या वर्षी सिकंदरचे देहावसान झाले. त्याच्या अखेरच्या इच्छेप्रमाणे त्याचे प्रेत विजापुरात त्याचा गुरु शहा नइमुल्ला याच्या कबरीच्या पायथ्याशी पुरण्यात आले. त्याची कबर अगदी साधी मातीची आहे. तिच्यावर आच्छादन घुमट वगैरे काही नाही. ज्या दिवशी शेवटच्या आदिलशहाचे प्रेत विजापुरात आणण्यात आले, त्या दिवशी

शहरात हाहाकार उडाला आणि हजारो बायकांनी आपले कपाळ फुटले या आकांताने कडाकड बांगड्या फोडून घेतल्या.

सिकंदरच्या प्रजेच्या त्या स्वयंस्फूर्त कृतीत केवढा अर्थ व केवढे कारुण्य भरले होते ! आदिलशाही गेली आणि विजापूरची राज्यलक्ष्मी अक्षरशः अनाथ झाली. कला परागंदा झाली, विद्या निर्वासित झाली, 'विद्यानगर' केवळ नांव राहिले. औरंगजेबाने केलेला संहार पुरला नाही म्हणूनच की काय प्लेग, महामारी आणि दुष्काळ यांनी त्या दुर्दैवी नगराची पाठ पुरवली. हजारो लोक देशोधडीला लागले. फार काय सांगावे, पाण्याने तुडुंब भरलेल्या विहिरी सुद्धा कोरड्या ठणठणीत पडल्या. जिकडे पाहावे तिकडे उद्ध्वस्त राजवाडे, पडकी घरे, भकास खिंडारे, बेशिस्त माजलेली रानटी झुडपे दिसू लागली आणि या विनाशाला उजळा देण्यासाठीच की काय काळाच्या तावडीतून चुकून सुखरूप राहिलेली एखादी सुरेख इमारत, एखादे उत्तुंग शिल्प मधूनच उठून दिसे. भर्तृहरि म्हणतो त्याप्रमाणे ती रम्य नगरी गेली, तो महान् राजा गेला, ते सामंतांचे मंडल गेले; ती विद्वज्जनांची परिषद गेली, त्या चंद्रमुखी गेल्या, तो उन्मत्त राजपुत्रांचा संघ गेला, ते भाट गेले. त्या कथा गेल्या. हे सारे ज्याच्या प्रतापाने स्मरणशेष झाले त्या काळाला नमस्कार असो ! 'सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः' !

विजापूर गिळंकृत केल्यानंतर औरंगजेबाने गोवळकोंड्याकडे मोर्चा वळविला. वस्तुतः गोवळकोंड्यावर पुन्हा स्वारी करणे म्हणजे मेलेल्याला परत मारण्यासारखे होते. गेल्या वर्षीच गोवळकोंड्याचा अबुल हसन कुतुबशहा याने औरंगजेबाच्या सर्व अटी मान्य करून त्याच्यापुढे सपशेल लोटांगण घातले होते. त्याच्या मागण्याप्रमाणे सेरम व कोहीर हे प्रांत त्याला दिले होते, आपल्या जवळचा सर्वांत बहुमोल हिरा त्याला अर्पण केला होता, आणि कुतुबशहाच्या नाखुषीला न जुमानता त्याच्या आईने का होईना, पण आकण्णा आणि मादण्णा या ब्राह्मण मंत्र्यांच्या मस्तकाचा नैवेद्य दाखवून औरंगजेबाची संतापशांति केली होती. औरंगजेबाने त्याला क्षमाही केली होती. पण औरंगजेबाच्या क्षमाशीलतेपेक्षा त्याच्या खुनशीपणाचीच कुतुबशहाला खात्री जास्त वाटत असल्यामुळे त्याने गोवळकोंड्याच्या बळकट किल्ल्याचा आसरा सावधगिरी म्हणून पक्का घेऊन ठेवला होता. त्याची ती सावधगिरी आता फळाला आली. औरंगजेबाचा फेरा आता खरोखरच गोवळकोंड्यावर आला. तो येतो हे ऐकल्यावर कुतुबशहाच्या तोंडचे अक्षरशः पाणी पळाले आणि पुन्हा त्याने क्षमायाचना केली. पण औरंगजेबाने ती धुडकावून लावली आणि आणखी तीन नवे आरोप कुतुबशहावर लादले : (१) त्याने नास्तिक आणि कमनशिबी संभाला मदत करण्याची शक्य तेवढी कोशीस केली त्यामुळे तो ईश्वराच्या व आमच्या लोकांच्या असंतोषाला कारण झाला आहे. (२) आम्ही फर्माने काढून व चांगले लोक पाठवून सल्ला दिला तरी त्याने

तो धुडकावून लावला. (३) अगदी थोड्याच दिवसांपूर्वी संभास एक लाख होनांची नवी मदत पाठविली.

औरंगजेबाच्या त्या सर्व तक्रारी फार विचार करण्यासारख्या होत्या. शिवाजी महाराजांनी आपल्या उत्तरायुष्यात उत्तरेच्या मोगली आक्रमणाविरुद्ध दक्षिणी राज्यांचा जो मित्रसंघ उभारण्याचे राजकारण केले, आणि ज्याचा एक उद्देश मराठ्यांचे म्हणजे हिंदूंचे गोमटे करण्याचा होता, त्या राजकारणात गोवळ-कोंड्याच्या कुतुबशहाने फार मोठा कार्यभाग केला होता. दक्षिणदिग्विजयास जाताना महाराजांनी कुतुबशहाची भेट घेतली व हे राजकारण पक्के केले. मालोजीराजे घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात : "सांप्रति राजकारणी वर्तमान तरी दक्षणेचे पादशहा तीन निजामशाह, आदिलशाह, कुतुबशाह. त्यामध्यें निजामशाही पादशाही बुडाली. हाली आदिलशाही बहलोलखान पठाणी घेतली. एशियास दक्षणचे पादशाही पठाण जाला. हे गोष्टी बरी नव्हे! पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणीयांची घरे बुडवील. कोण्हास तगो देणार नाही. ऐसे आम्ही समजोन हजरत कुतुबशहा पादशाहा यांसी पहिलेपासून रुजुवात राखली होती. आम्ही येऊन हजरत कुतुबशहाची भेटी घेतली. या उपरी राजकारणविषई हजरत कुतुबशहानी महादण्णा पंतांस व आम्हांस एकचित करून ऐसा तह केला की, जो काय उभयवर्गी तह द्यावा तो आपण कबूल करावाच, ऐसा कुलमनसबा व मदार आम्हांवरी टाकिला आहे की, "आपली पादशाही जितकी वाढवू ये तितकी वाढवणे; पठाणाची नेस्त नाबूद करणे; दक्षणची पादशाही आम्हा दक्षिणियांच्या हाती राहे ते करावे म्हणून त्यास हा मनसुबा आमचे हातास आलिया उपरी आम्ही हाच विचार केला की, जे काही आपले जातीचे मराठे लोक आहेती ते आपले कटात घेऊन कुतुबशहासी त्याची रुजूवात करावी, दौलत देवावी, त्यांचे हाते पादशाही काम घेऊन पादशाहाची पादशाही दराज करावी, आणि तुम्हा लोकांच्या दौलताही चालेत. घरे राहेत ते करावे. आपल्या जातीच्या मराठिया लोकांचे बरे करावे हे आपणांस उचित आहे."

महाराजांच्या या पत्रात त्यांचे राजकारण दिसते, पण औरंगजेबाच्या दृष्टीने हे पत्र म्हणजे काफीर हिंदूंशी हातमिळवणी करणाऱ्या कुतुबशहाच्या पातकाची जंत्रीच म्हणावी लागेल आणि हे राजकारण आकण्णा आणि मादण्णा ह्या दक्षिणी ब्राह्मणांच्या विद्यमाने झाले. औरंगजेबाचा जात्याच हिंदूंवर राग असे हे प्रसिद्धच आहे. पण हिंदूंमध्येही ब्राह्मण आणि ब्राह्मणांतही पुन्हा दक्षिणी ब्राह्मण हे त्याच्या द्वेषाचे खास विषय असत. त्यांच्याच तालमीत राहून शहाणा झालेला त्याचा कल्याण-शिष्य जो हैदराबादचा निझाम, त्याने आपल्या गुरूची मते जशीच्या तशी उचलली होती. आणि आपल्या मृत्युपत्रात आपल्या वारसांना दक्षिणी ब्राह्मणांपासून

सावध राहण्याचा इशारा दिला, इतकेच नव्हे तर आप्तवाक्य म्हणून औरंगजबाचे उदाहरण दिले होते. " दक्षिणी ब्राह्मण जरी हुषार असले तरी त्यांच्या खोडसाळ-पणामुळे तुरुंगांत ठेवण्याच्या फक्त लायकीचे आहेत. हा माझा स्वतःचा अनुभव आहे व हजरत खुल्द मकान (औरंगजेब) याचाही अनुभव तोच होता. ' पंडितखाना म्हणजे ' बंदीखाना ' जेथे ही मंडळी ठेवलेली असतात. आलमगीर बादशहापासून कायमची आज्ञा अशी चालत आली आहे की, कोठेही उपद्व्यापी ब्राह्मण आढळला की त्याला सरळ तुरुंगांत अडकवायचे," औरंगजेबाच्या या मताप्रमाणे आकण्णा व व मादण्णा हे खोडसाळ ब्राह्मण या नाटकाचे सूत्रधार होते. आधीच कुतुबशहा वेडा माणूस. राज्य कसे करावे व कसे राखावे हे त्याला माहीत नव्हते. रणांगण त्याला माहीत नव्हते. मदिरा आणि मदिराक्षी यांच्या आस्वादात रंगलेल्या त्या वेड्या माणसाला या ब्राह्मणांनी इतके वेडे केले की शिवाजी गोवळकोंड्याला आला, तेव्हा त्या काफराच्या घोड्याच्या गळ्यात रत्नांची माळ खुद्द कुतुबशहाने स्वतःच्या हातांनी घातली. याच्यापेक्षा मुसलमान बादशहाचा अधःपात तो आणखी काय असणार असे औरंगजेबाला वाटले तर ते बरोबरच आहे. आकण्णा व मादण्णा तर नरकाला गेलेच होते. आता राहिला होता फक्त कुतुबशहा.

' नक्रः स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति ।' आपल्या जागी रोवून बसलेली सुसर हत्तीला सुद्धा ओढून नेते—असे कवीने म्हटले आहे. कुतुबशहा हा चिल्लर प्राणी असला तरी ज्या गोवळकोंड्याच्या किल्ल्यात तो दडी मारून बसला होता, तो किल्लाच इतका बळकट होता की, त्याच्या त्या स्थानमाहात्म्यामुळे, वेढ्यात सापडलेल्या कुतुबशहापेक्षा वेढा घालणाऱ्या औरंगजेबालाच ' दे माय धरणी ठाय ' झाले. किल्ल्यात दारूगोळा भरपूर भरला होता, धान्याची कोठारे शिगोशीग भरली होती, विहिरी पाण्याने काठोकाठ भरल्या होत्या, शिपाई कजाख होते आणि उडत्या पाखराला टिपतील असे बाके बरकंदाज होते. याउलट औरंगजेबाच्या तोफखान्या-वरचे अधिकारी आपापसांतच भांडत तरी होते किंवा सुस्त तरी होते. तोफ-खान्याचा दारोगा सफशिकनखान हा इराणी होता आणि तुर्क असलेल्या फिरोज जंगाच्या मत्सराने तो जळत होता. केवळ बादशहाच्या कृपेला पात्र झालेल्या फिरोजजंगाचे नाक कापण्यासाठी त्याने जागेचा राजीनामा दिला. त्याच्या जागेवर आलेला घैरतखान हा तर इतका झोपाळू होता कीं त्याची झोपेच्या नादांत ब्रह्मानंदी टाळा लागली असतानाच शत्रूंनी त्याला पळवून नेले. त्याच्या-नंतर नेमलेला सलाबतखान याने प्रामाणिकपणाने किंवा निर्लज्जपणाने कबूल केले की तोफांच्या धडधडाटाने आपल्या कानठळ्या बसत असल्यामुळे आपण पिछाडीला राहू आणि सारे काम आपल्या नायबाकरवी करवून घेऊ. अखेर सफशिकनखानाला परत विनवण्या करून तोफखान्याचे काम पत्करण्याची औरंग-जेबालाच गळ घालावी लागली.

बादशाही तोफखान्याची ही कथा झाली. पण मोगल फौजेचा महारोग घरभेदेपणा होता. कुतुबशहा शिया होता व औरंगजेबाच्या सैन्यात अनेक मोठे अधिकारी शिया होते. त्यांची सारी सहानुभूति कुतुबशहाकडे होती. फार काय सांगावे, अनेक कट्टर सुन्नी शिपायांना औरंगजेबाने एका इस्लामी बादशहाला नेस्तनाबूद करण्याचा चालवलेला हा खटाटोप बिलकूल मान्य नव्हता. त्यामुळे हे लोक केवळ लढाईच्याच कामात कुचराई करीत असे नव्हे तर औरंगजेबाचे अनेक महत्त्वाचे बेत वेळेवर कुतुबशहाला जाऊन कळवीत. औरंगजेबाच्या सैन्यातला हा घरभेदेपणा इतका कळसास पोचला होता, की खुद्द औरंगजेबाच्या घरापर्यंत त्याची अमंगल सावली येऊन भिडली होती. ज्या वेळेला एकीकडे औरंगजेब कुतुबशहाला पायांशी खेचून आणण्याचा इरेसरीने कमर बांधून खटाटोप करीत होता, त्याच वेळी त्याचा ज्येष्ठ मुलगा शहाआलम हा सन्मानपूर्वक तडजोड करून कुतुबशाही कशी जिवंत राखता येईल याच्या कुतुबशहाशी गुप्त वाटाघाटी करण्याचे उपद्व्याप करीत बसला होता. औरंगजेबाला हे समजल्यावर त्याने ताबडतोब शहाआलमला त्याची बायको नूरुन्निसा, त्याची मुले यांसह ‘ सहकुटुंब सहपरिवार जी बंदीखान्याची हवा दाखविली ती तब्बल सात वर्षे.

बिचारा औरंगजेब ! त्याला गोवळकोंड्याशीही झगडावे लागत होते. आणि स्वत:च्या पोरांशीही झुंजावे लागत होते. एवढ्यानेच भागले नाही. म्हणून की काय त्या वर्षी पावसाने डोळे वटारले. ज्वारी व बाजरी ही पिके आलीच नाहीत. वस्तुत: गोवळकोंड्याची भूमि म्हणजे भाताचे कोठार. पण लढाईच्या धामधुमीमुळे यावर्षी शेतीची लागवडही झाली नाही. जे थोडे धान्य उपलब्ध होते ते मराठे मिळू देईनात. संभाजीने मैत्रीच्या तहाला जागून बारा हजार घोडेस्वार व पन्नास हजार पायदळ पाठवले होते. त्याच्या जोडीला गोवळकोंड्याचा शेख मिनहाज चाळीस हजार घोडेस्वारांसह मोगलांच्या छावणीवर छापे घालीत व रसद तोडीत फिरत होता. त्यात आता अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला. आधी अनावृष्टीमुळे तोंडचे पाणी पळाले होते, आता अतिवृष्टीमुळे जगबुडीची वेळ आली. मोगलांचे मोर्चे व धमधमे सारे वाहून गेले, त्यांच्या कष्टांवर अक्षरश: पाणी पडले, छावणीत पाणीच पाणी होऊन त्यात मोगलांच्या राहुट्या पांढऱ्या नावाप्रमाणे तरंगू लागल्या. मोगलांची अशी आतून व बाहेरून समोरून व मागून, कुतुबशहाकडून व मराठ्यांकडून, दुष्काळाकडून व पावसाकडून त्रेधा उडाली असताना किल्ल्यावरून बर्कंदाजांचा गोळीबार व तोफांचा भडिमार अहोरात्र बिनचूक चालत होता.

त्यांची खोड मोडण्यासाठी औरंगजेबाने एक नव्हे, दोन नव्हे चांगले तीन सुरुंग गोवळकोंड्याच्या बुरुजाखाली पेरून ठेवले होते. पहिल्या सुरुंगाला बत्ती देण्याच्या वेळी औरंगजेब मुद्दाम उपस्थित राहिला. मैदानात हजारो सैनिकही उभे

होते. आता थोडयाच वेळात सुरुंग उडेल आणि हे उद्दाम बुरुज आणि त्यांच्यावरचे हे दुष्ट शिपाई अस्मानात ठिकऱ्या होऊन उडतील अशा उत्सुकतेने ते सुरुंगाच्या स्फोटाची वाट पहात होते. औरंगजेबाने इशारा दिला. सुरुंगाची वात सरसर पेटली. कानांचे दडे बसविणारा स्फोट झाला. अवघी धरणी हादरली. हजारो दगडांचे तुकडे उडाले आणि काय आश्चर्य, गंमत पहायला जमलेल्या मोगलांवर ते आकाशीच्या कुऱ्हाडीप्रमाणे कोसळले. एका क्षणात अकराशे सैनिक ठार झाले. उरलेल्यांना दुःख करायलाही किल्ल्यावरच्या लोकांनी उसंत मिळू दिली नाही. ससाण्याने चिमणीवर झडप घालावी त्याप्रमाणे त्यांनी मोगलावर हल्ला चढविला. पण औरंगजेब हताश झाला नाही, अद्याप दुसरा सुरुंग बाकी होता, तो मोठ्या आशेने पेटविला पण औरंगजेबाच्या सैन्यातल्या घरभेदेपणाच्या रोगाने सुरुंगालाही पछाडले होते असे वाटते. कारण हाही सुरुंग मोगलांच्यावरच उलटला आणि पुन्हा अकराशे स्वजनांचा त्याने बळी घेतला. परंतु आणखी एक सुरुंग शिल्लक होता. औरंगजेबाने सुरुंगाची आणि आपल्या नशिबाची त्रिवार परीक्षा पाहण्याचा निर्धार केला होता. पुन्हा औरंगजेब आला. पुन्हा सुरुंगाला बत्ती दिली. आता आपण मरतो की किल्ल्यावरचे लोक मरतात याची मोगल वाट पाहू लागले. आणि – – –आणि कसचे काय ? काहीच झाले नाही. सुरुंग उडालाच नाही. पाण्यात टाकलेल्या मातीच्या ढेकळाप्रमाणे औरंगजेब विरघळला आणि कोणाशी काही न बोलता आपल्या तंबूत चालता झाला. खरी गोष्ट अशी होती की औरंगजेबाने पेरलेल्या सुरुंगाची बातमी आधीच मोगल फौजेतल्या हितचिंतकांनी कुतुबशहाला दिली होती. त्याच्या लोकांनी रातोरात पहिल्या दोन सुरुंगांतील दारू आतल्या बाजूने काढून त्या कपारी पाण्याने भरून टाकल्या पण बाहेरच्या बाजूची दारू तशीच कोरडी ठेवली त्यामुळे ते सुरूंग बाहेरच्या बाजूला उडाले आणि मोगलांची टाळकी सडकून निघाली; पण बुरुजाचा दगडसुद्धा निखळला नाही तिसऱ्या सुरुंगांतली दारू सगळीच काढून तेथे फक्त पाणी भरून ठेवले त्यामुळे तो उडालाच नाही. औरंगजेबाची फजिती मोठीच झाली हे खरे, पण ती गोवळकोंड्याच्या लोकांनी केली नाही. तो घडवंचीवर मोठ्या ऐटीत चढला होता खरा, पण आधीच तिचा एक पाय मोडून ठेवून त्याला पाडण्याचा स्तुत्य उद्योग त्याच्याच लोकांनी करून ठेवला होता, हे दुर्दैवाने बिचाऱ्याच्या लक्षात आले नाही.

हे औरंगजेबाचे मोठे दु:ख होते की एवढा खटाटोप करून त्याचा कुतुबशहावर काडीइतकाही परिणाम होत नव्हता. एकदा तर कळसच झाला. मुसळधार पावसाने अंधारलेल्या एका रात्री कुतुबशहाच्या लोकांनी मोगलांच्या मोर्चावर छापा घातला. त्यांनी गोलंदाजांना कापून काढले. पूर्वीचे तोफखान्याचा दारोगा सफशिकनखान याने चिखलात उडी घेतली म्हणून तो बचावला; परंतु सध्याच

दारोगा घैरतखान याने चिखलाने सर्वांग बरबटून घेऊन मेल्याचे सोंग घेतले तरी तो सुटला नाही. त्याला शत्रूने ओळखले, व चिखलाने लडबडलेल्या तशाच प्रेक्षणीय अवस्थेत त्याला, व औरंगजेबाचा गुलाम सरबराहखान याला आणखी तेरा मोठ्या अधिकाऱ्यांसह कैद करून ते घेऊन गेले. औरंगजेबाच्या त्या दुर्दैवी मानकऱ्यांना कुतुबशहाने कमालीच्या सौजन्याने वागविले, त्यांना आपली धान्याची आणि दारूची कोठारे दाखवून अजून लढायचे असले तरी आपली तयारी आहे असे सांगितले; पण त्याचबरोबर मुसलमानांनी मुसलमानांचे रक्त सांडण्याचा हा उद्योग सोडून देऊन तह करण्याबद्दल औरंगजेबाची प्रार्थनाही केली. इतकेच नव्हे, तर औरंगजेबाला लढाईचीच खुमखुमी असेल तर दुष्काळाने गांजलेल्या त्याच्या सैन्याला सहा लाख मण धान्यसुद्धा आपण देण्यास तयार आहोत असा निरोप पाठविला. याला कुतुबशहाचा दिलदारपणा म्हणायचा की कोडगेपणा म्हणायचा हा ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न आहे. स्वतः औरंगजेबाला मात्र कुतुबशहाने त्याच्या दोन तोंडात मारल्या असत्या तरी जितका संताप आला नसता तितका त्यांच्या सौजन्याने त्याच्या अंगाचा तिळपापड उडाला. वड्याचे तेल वांग्यावर काढायचे या न्यायाने कुतुबशहाचा पाहुणचार घेऊन आलेल्या आपल्या नादान मानकऱ्यांची त्याने प्रथम यथास्थित संभावना केली. घैरतखानाची त्याने तोफखान्यावरून हकालपट्टी करून तळावर बदली करून टाकली आणि आधी गुलाम असलेला आणि मग सरदार केलेला सरबराहखान याला परत गुलाम करून टाकले. आधी तो वाघ्या होता आणि दैवयोगाने पाग्या झाला होता, पण जेव्हा त्याचा मूळ स्वभाव जाईना, तेव्हा त्याची मूळपदावर स्थापना करण्याशिवाय औरंगजेबाला गत्यंतर राहिले नाही. आणि कुतुबशहाला औरंगजेबाने कळविले की, त्याला जर शांततेची इतकी तळमळ असेल तर त्याने रुमालाने हात बांधून व गळ्यात गुन्हेगाराप्रमाणे दोरखंड अडकवून माझ्या पायाशी यावे. मग मला वाटले तर मी त्याच्यावर दया करीन. कुतुबशहाचे सलोख्याचे सारे प्रयत्न असे ठोकरून लावल्यानंतर एकच मार्ग होता की किल्ल्याला वेढा घालून आतल्या लोकांची उपासमार करणे व त्यांना शरण येण्यास भाग पाडणे. तेच औरंगजेबाने केले.

अखेर, विजापूरनंतर एका वर्षाने २१ सप्टेंबर १६८७ रोजी गोवळकोंडा पडले. पण ते औरंगजेबाच्या पराक्रमामुळे नव्हे की किल्ल्यातील लोकांच्या उपासमारीने नव्हे. किल्ल्यात धनधान्याचा सुकाळ होता. पण इमानाचा दुष्काळ होता. हा चारित्र्याचा दुष्काळ पावसालाच काय पण परमेश्वरालाही निवारता येत नाही. याने बंदुकीची कोरडी दारू ओल्या दारूहून निकामी होते आणि बुलंद बुरुज पत्त्याच्या घरांप्रमाणे धडाधड कोसळतात. औरंगजेबाची भेदनीति कुतुबशहाचे सैन्य आतून पोखरत होती. शेख मिनहाज, शेख अब्दुल्ला, शेख निझाम असे सारे नामांकित सरदार

औरंगजेबाने फोडले. फार काय कुतुबशहाचा भाचा सुद्धा फितूर केला. अब्दुर्रझाक आणि अब्दुल्ला पन्नी हे दोघेच नामवंत मानकरी कुतुबशहापाशी राहिले होते. त्यापैकी अब्दुर्रझाकवर कोणत्याही प्रलोभनांचा परिणाम झाला नाही. तो विकला जाईना. पण दुसऱ्या अब्दुल्ला पन्नी मात्र गळाला लागला. ह्या माणूस प्रथम विजापूरकराकडे होता, त्यांना सोडून तो औरंगजेबाकडे आला, त्याला सोडून तो कुतुबशहाकडे आला, व आता कुतुबशहाकडून परत ओरंगजेबाकडे चालला होता. आपले वीतभर पोट जाळण्यासाठी धन्याला विकणे हाच या उलट्या काळजाच्या इसमाचा धंदा होता असे वाटते. त्याने एका उत्तररात्री किल्ल्याचा 'खिडकी दरवाजा' उघडून दिला आणि त्यातून रुहुल्लाखान व मुख्तारखान यांच्या नेतृत्वाखाली मोगलांचे सैन्य किल्ल्यात घुसले.

अब्दुर्रझाकला जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा तो संतापाने आणि विस्मयाने बेभान झाला, आणि 'जोपर्यंत मी जिवंत आहे, तोपर्यंत निदान एक तरी माणूस कुतुबशहासाठी प्राणार्पण केल्याशिवाय राहणार नाही.' असे गर्जत तो एकटा त्या लाखांवर तुटून पडला. हजार धारांनी कोसळणाऱ्या पाणलोटाला दोन बाहूंनी रोखण्याचा आटापिटा करण्यासारखेच ते वेडे साहस होते. त्याच्या शरीरावर सत्तर जखमा झाल्या; त्याच्या कपाळाचे कातडे डोळ्यावर पडल्यासारखे लोंबू लागले, एक डोळा जायबंदी झाला, नुसत्या तोंडावरच बारा जखमा लागल्या; फार काय त्याच्या घोड्याला सुद्धा इतक्या जखमा झाल्या की रक्तस्रावामुळे स्वाराप्रमाणे त्यालाही चक्कर येऊ लागली. पण रणांगणाच्या त्या कोलाहलातून जन्मजात चातुर्याने त्याने आपल्या मालकाला दूर एका नारळीच्या शीतल सावलीत जेव्हा आणून पोचविले, तेव्हांच धन्याप्रमाणेच इमानाला जागणारे ते जनावर एकदाचे थांबले. औरंगजेबाला जेव्हा हे समजले तेव्हा अब्दुर्रझाकची त्याने खास वैद्याकरवी शुश्रूषा करविली आणि त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली – तो म्हणाला "जर अब्दुर्रझाक सारखा आणखी एक जरी सेवक लाभण्याचे सुदैव कुतुबशहाचे असते तर हा किल्ला जिंकायला आणखी किती दिवस लागले असते कोणास माहीत !" सुदैव औरंगजेबाचे व दुर्दैव कुतुबशहाचे की अब्दुर्रझाक एकुलता एक निघाला. कोटीची बरसात करणाऱ्या कुतुबशहावर कोसळलेल्या त्या कठीण समयी गोवळकोंड्याने फक्त दोन इमानी जीव पहिले–अब्दुर्रझाक आणि त्याचा घोडा –– एक माणूस आणि एक पशु.

आपल्या महालात कुतुबशहा या अनाहूत पाहुण्यांची वाटच पाहत बसला होता. बक्षी रुहुल्लाखान इतर अधिकाऱ्यांसह महालात घुसल्यानंतर कुतुबशहाने त्याचे दरबारी स्वागत केले व जेवण मागवून आपणास त्याच्या पंक्तीचा लाभ देण्याची विनंती केली. रुहुल्लाखान वेड्यासारखा कुतुबशहाकडे क्षणभर पाहतच राहिला. आणि मग म्हणाला–' ही काय जेवायची वेळ आहे ?' त्याच्या बोलण्यातली खोच

कळण्याइतका कुतुबशहा चाणाक्ष होता; तो मुद्दामच म्हणाला, ' होय, ही माझी जेवणाचीच वेळ आहे.' त्यावर रुहुल्लाखान म्हणाला 'नाही; ते मला समजले पण मला असे विचारायचे आहे की ह्या असल्या प्रसंगी आपणाला जेवणखाण सुचते तरी कसे ?' रुहुल्लाखानाच्या या प्रश्नावर कुतुबशहा फार शहाण्यासारखे बोल बोलला–' मला आपले म्हणणे समजले. जरी मी राजकुळात जन्माला आलो असलो तरी माझे तारुण्य दारिद्र्यात गेलेले आहे; आणि सुख आणि दुःख या दोन्ही देवाच्या देणग्या म्हणून समबुद्धीने त्यांचा स्वीकार करण्यास मी शिकलो आहे. ईश्वराने प्रथम मला भिकारी केले, नंतर राजा केले, नंतर आज परत भिकारी केले. माझा विश्वास आहे की तो आपल्या भक्तांची चिंता वाहतो आणि त्याच्या नशिबात असलेला अन्नाचा वाटा त्यांना पोचविल्याशिवाय राहत नाही. माझ्या पातकांची शिक्षा म्हणून त्याची आज माझ्यावर अवकृपा झालेली आहे. पण मला या घटकेला भीतिही वाटत नाही व पश्चात्तापही वाटत नाही. मी कोटींची खैरात केली आणि कोटींची उधळपट्टी केली. आणि माझे जीवन संपत आले असताना आलमगिरासारख्या धर्मशील बादशाहाच्या हाती मला त्याने सोपवावे ही ईश्वराची केवढी दया म्हणावयाची ! ' कुतुबशहाचा राजसंन्यास हा आजपर्यंतच्या त्याच्या विलासी जीवनाला पावन करणारा विरक्तीचा प्रसाद आहे. राज्याने त्याला सोडण्याच्या आधीच परमतृप्तीने त्याने राज्याला सोडले. राज्य कमवावे कसे हे त्याला कळले नाही, राज्य राखावे कसे हे त्याला कळले नाही. पण राज्य सोडावे कसे हे त्याच्याइतके कोणालाही कळले नाही. ' I have warmed my both hands before the fire of life; It sinks and I am ready to depart. (' जीविताच्या शेकोटीवर मी दोन्ही हात शेकून घेतले, ती शेकोटी आता विझत आलेली आहे. मी जाण्यास तयार आहे – ! ') हे इंग्रज कवीचे जीवनभाष्य कुतुबशहालाही तितकेच लागू आहे.

जेवण झाल्यानंतर मोगल मनसबदारांसह घोड्यावर स्वार होऊन कुतुबशहा औरंगजेबाच्या छावणीत दाखल झाला. औरंगजेबाने त्याला वर्षाला पन्नास हजार रुपयांचा तनखा नेमून दिला आणि दौलताबादच्या किल्ल्यात त्याची रवानगी केली. निळ्या, पिवळ्या, पांढऱ्या आणि रंगीबेरंगी चिनी फरशांच्या तुकड्यांनी सजविलेल्या तेथील रमणीय चिनी महालात हा रसिकांचा बादशहा तानाशाह कुतुबशाह चौदा वर्षे नंतर जिवंत होता.

विजापूर आणि गोवळकोंडा काबीज केल्यानंतर औरंगजेबाला जी धन्यता वाटली ती व्यक्त करण्यास शब्द नाहीत. दिल्लीच्या मोगलाचे चार पिढ्यांचे स्वप्न त्याने साकार केले. विजापूरप्रमाणे हैदराबाद हेही दक्षिणचे भूषण होते. ते पृथ्वीवरचे केवळ नंदनवन होते. त्या एका नगरीत वीस हजार नर्तिका होत्या

आणि मदिरागृहांची तर मोजदाद नव्हती. कलावंतांची ती उतारपेठ होती. तेथला राजा तानाशाह हाच मुळी संगीताचा दर्दी होता, मग प्रजेची कथा काय सांगावयाची ? हिऱ्याच्या आणि लोखंडाच्या खाणी व मसुलीपट्टणचे व वेरूळचे विणकाम, यांनी गोवळकोंडयाला कलेचे व लक्ष्मीचे माहेर बनविले होते. पावलापावलावर पाण्याने तुडुंब भरलेली तळी आणि हिरव्यागार पिकांनी नटलेलीं शेते, मैलोमैल पसरलेली घनदाट अरण्ये त्यात स्वच्छंदाने विहार करणारे हत्तींचे कळप, किनारपट्टीवर डोलणारी नारळीची श्यामल बने ही गोवळकोंडयाच्या 'सुजलां सुफलां सस्यश्यामलां' भूमीची गजान्तलक्ष्मी औरंगजेबाने तीस वर्षांपूर्वीच डोळे भरून पाहिली होती, त्याने गोवळकोंडयाला वेढाही घातला होता, त्याने विजापूरही जिंकीत आणले होते. पण ऐनवेळी शहाजहानने त्याला मोडता घातल्यामुळे त्याचा नाइलाज झाला. तीस वर्षे अपुरे राहिलेले ते स्वप्न आज समूर्त झाले होते.

पण औरंगजेब काही केवळ स्वप्ने पाहणारा कवि नव्हता. व्यवहाराच्या खाचाखळगा जाणणारा तो पक्का राजकारणी होता. औरंगजेबाची एक सून, आझमची बायको, शहरबानू ही विजापूरची राजकन्या होती. त्याची दुसरी सून सुलतान महमदची बायको ही गोवळकोंडयाची राजकन्या होती. हा नियतीचा कठोर उपरोध म्हटला पाहिजे की जे ना नात्याचे ना धर्माचे, त्या मराठ्यांनी विजापूर व गोवळकोंडा राखण्यासाठी प्राणाची बाजी लावावी व जो नात्याचा व धर्माचा, त्या औरंगजेबाने त्या इस्लामी राजवटीवरून गाढवाचा नांगर फिरवावा. शिवाजी महाराजांनी हलक्या हाताने बांधीत आणलेली आदिलशाही, कुतुबशाही व मराठे या दक्षिणी राज्यांची स्नेहाची इमारत औरंगजेबाने तलवारीच्या एका फटक्यात जमीनदोस्त करून टाकली. राजकारण असेच निर्घृण असते.

कुतुबशहा, आदिलशहा व संभाजी या त्रिकूटांपैकी कुतुबशहा व आदिलशाहा नेस्तनाबूत केल्यानंतर औरंगजेबाने आपला मोहरा संभाजीकडे वळविला. शहाजादा आझम व शेख निझाम हैदराबादी यांच्या हाताखाली प्रचंड फौजा त्याने महाराष्ट्रात रवाना केल्या. कुतुबशहा ज्या वाटेने गेला, आदिलशहा ज्या वाटेने गेला त्याच वाटेने संभाजी जाईल आणि सात वर्षांपूर्वी जो उद्देश धरून आपण अजमीरहून दक्षिणेकडे कूच केले तो उद्देश संपूर्ण साध्य करून लवकरच आपण दिल्लीस परत जाऊ याबद्दल त्याला काडीची शंका नव्हती. २४ जून १६८८ रोजी त्याने दिल्लीचा नाझीम आकीलखान याला कळविले की, विजापूर हैदराबाद जिंकून बंडखोर अकबरास देशाबाहेर घालवून संभाजीस तंबी पोहचवून साबान महिन्यात आपण हिंदुस्थानकडे परतणार आहोत. उंट सामानासाठी मागविले. रस्ता दुरुस्तीचा हुकूमही दिला. लोक म्हणतात, 'देहली तो बहोत दूर है !' पण औरंगजेबाला ते मान्य नव्हते असे दिसते. 'असाध्य ते साध्य करिता

सायास ' हे तुकारामाचे वचन अध्यात्माप्रमाणे राजकारणातही खरे आहे. विजापूर आणि गोवळकोंडा येथील विजय औरंगजेबाला तसे पाहिले तर महागातच पडले. लढाईमध्ये त्याची किती माणसे मेली याचा हिशेब करण्याचे कारण नाही कारण लढाईचा उद्योगच मुळी माणसे मरण्याचा आणि माणसे मारण्याचा आहे तरीही गोवळकोंड्याच्या वेढ्यात औरंगजेबाची कधी भरून न येणारी एक हानि झाली. त्याचा उजवा हात, चिनकिलीजखान हा किल्ल्यावर हल्ला चढवीत असताना तोफेचा गोळा लागून प्राणांतिक जखमी झाला व तिसऱ्या दिवशी मरण पावला. धर्मतच्या लढाईत, सामूगढच्या लढाईत, राजपूत युद्धात, मराठ्यांच्या युद्धात, विजापूरच्या वेढ्यात आणि आता गोवळकोंड्याच्या वेढ्यात एकंदर तीस वर्षे मोठ्या निष्ठेने चिनकिलीजखानाने औरंगजेबाची सेवा बजावली होती. स्वतःच्या सावलीचा सुद्धा संशय घेणाऱ्या दुराराध्य औरंगजेबाचा विश्वास त्याने संपादन केला हीच त्याची खरी बहादुरी, त्याच्या समाचाराला औरंगजेबाने आपला वझीर आसदखान याला पाठविले व त्याचा मुलगा फिरोझजंग याला लिहिले– ' मला स्वतःला त्या राज्याच्या हितचिंतकाच्या समाचाराला येण्याची इच्छा होती. पण त्याच्या वेदना मला पाहवणार नाहीत असे मला वाटले म्हणून मी आसदखानाला पाठवले आहे. सध्या मिळण्यासारखी फळे फक्त द्राक्षे आहेत. पण ती या स्थितीत त्याला कुपथ्यकारक आहेत असे हकीमाचें मत आहे. मीही स्वतः द्राक्षे खायची नाहीत असा निश्चय केला आहे. ईश्वराची इच्छा असेल तर पूर्ण बरा झाल्यानंतर आम्ही दोघेही बरोबरच द्राक्षे खाऊ. पण दोघांनी द्राक्षे बरोबर खावी अशी ईश्वराची इच्छा नव्हती असे दिसते. कारण चिनकिलीजखान लवकरच मेला. औरंगजेबाचे असे शब्द वाचले म्हणजे त्याला हृदय नव्हते असे म्हणतात ते खोटे वाटू लागते. त्याला हृदय होते व ते बरेच वेळा योग्य ठिकाणी होते. निदान काही वेळा तरी.

गोवळकोंड्याच्या वेढ्यातच औरंगजेबाच्या जीवनातील एक हृदयद्रावक शोकांतिका घडून आली. त्याचा मोठा मुलगा शहाआलम याने गोवळकोंड्याच्या कुतुबशहाशी गुप्त वाटाघाटी चालू केल्यामुळे औरंगजेबाने त्याला इतक्या कडक कैदेत ठेवले की काही दिवस त्याला केस कापायला, नखे कापायला, मिष्टान्न खायला व चांगले कपडे वापरायला सुद्धा त्याने बंदी केली. कठोर कर्तव्य म्हणून त्याने हे केले पण त्या वेळेला एकीकडे त्याचे हृदय खरोखर रडत होते; कारण ज्याच्यावर त्याची फार आशा, जो उद्याचा वारस, जो आजचा आधार त्या मुलानेही त्याला अखेर फसवले होते. हिंदुस्थानचा सम्राट असलेला हा आलमगीर कौटुंबिक प्रेमाच्या बाबतीत कंगालाहून दिवाळखोर होता. त्याचा मोठा मुलगा सुलतान महंमद कैदेत मेला. मोठी मुलगी झेबुन्निसा सालिमगडच्या कैदेत काळ कंठीत होती. अकबर बापाशी द्रोह करून संभाजीकडे भटकत होता. आणि आता हा शहाआलम त्याच्याच

पावलावर पाऊल टाकून बापाविरुद्ध कारस्थाने करीत होता. शहाआलमला शिक्षा सुनावल्यावर औरंगजेबाने घाईघाईने दरबार बरखास्त केला व आपली बेगम औरंगाबादी महलाकडे येऊन मुक्तकंठाने आपल्या दुःखाला त्याने वाट करून दिली– 'हाय हाय, गेली चाळीस वर्षे जे मी उभारीत आलो ते आज मी जमीनदोस्त करून टाकले!' तो बादशहाचा शहाजाद्याबद्दलचा आक्रोश नव्हता. मुलाबद्दलच्या मनोरथाचा चक्काचूर झाल्यामुळे भ्रमनिरास झालेल्या बापाचे ते अश्रु होते. औरंगजेब बादशहा होता, पण त्याहीपेक्षा तो बाप होता आणि म्हणून तो माणूस होता.

गोवळकोंड्याहून औरंगजेब बिजापूरला परत आला तेव्हा तेथे प्लेगची साथ जोरात चालू होती. तिचा झपाटा इतका विलक्षण होता की, एक लाख माणसे मृत्युमुखी पडली. लागण अशी होई की रात्री दार लावून लोक झोपले तर सकाळी ते उघडायला कोणी जिवंत राहत नसे. प्लेगाबरोबर महामारीही आली. प्रेताच्या अंगावर कफन घालून व प्रेते पुरुन लोक इतके थकले की शेवटी नांगराने प्रेते ते कबरस्थानात नेऊन टाकू लागले. या साथीने अनेकांचे डोळे गेले व कान गेले. अनेकांची वाचा गेली. रोग हा भिकाऱ्याला धरतो आणि राजाला सोडतो असे काही नाही. त्याने औरंगजेबाकडे मोर्चा वळविला. औरंगजेबाचा आवडता सरदार, राजपुताना, विजापूर व गोवळकोंडा या लढायातला वीरमणी, ज्याला त्याने गाझीउद्दीन, फिरोजजंग व खान असे किताब दिले होते, ज्याला तो 'फर्झंद अर्जुमान' म्हणजे स्वतःचा पुत्र म्हणत असे, तो शियाबुद्दीन या प्लेगच्या तावडीत सापडला आणि दोन्ही डोळयांनी आंधळा झाला. औरंगजेबाचा काझी फाझीलखान या साथीला बळी पडला. खुद्द त्याची बायको औरंगाबादी महल मेली. खवासपुरच्या राजवाड्यांतून स्मशानाकडे तिचे प्रेत नेताना सोळा ओझीवाले जागोजाग महामारीने मरण पावले असा एकच कहर झाला.

म्हणून औरंगजेबाच्या या दक्षिणेकडील विजयात त्याची आसवे व त्याचे निश्वासही मिसळले आहेत हे विसरता येत नाही.

पण औरंगजेब खरा धीराचा मनुष्य. एवढा प्रलय उडाला पण ईश्वरावर भरवसा टाकून तो विजापुरातच ठाण मांडून बसला होता. अखेर त्याच्या धर्मशास्त्र्यांनी त्याला फार आग्रह केला तेव्हा शुक्रवार १४ डिसेंबर १६८८ रोजी विजापुरातून अकलूजच्या दिशेने त्याने कूच केले.

'एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतेष्वपि।' – माणूस जिवंत राहिला तर त्याला शंभर वर्षांनी का होईना आनंद भेटतो–असे कवीने म्हटले आहे. तोफांचा भडिमार, बंदुकांच्या फैरी, प्लेगचा कहर, महामारीचा प्रलय या सर्वांना धीराने तोंड देऊन औरंगजेब जिवंत राहिला होता. गोवळकोंड्याच्या वेढ्यात आग ओकणाऱ्या तोफांच्या समोर औरंगजेब वावरत होता. एका तोफेच्या गोळ्याने प्रत्यक्ष

त्याच्या जवळच्या रक्षकाचा एक हात उडवला. पण औरंगजेबाच्या चेहऱ्यावरची सुरकुती हलली नाही. विजापूरला प्रत्यक्ष त्याची बायको मेली, पण मरणाच्या भीतीने औरंगजेब गांगरला नाही. इतक्या धैर्याने जो जगला त्याचा आनंदावर आता अधिकारच होता. आणि तसेच झाले, अकलूजच्या वाटेवर औरंगजेब असताना शेख निझाम हैद्राबादी याने संगमेश्वर मुक्कामी, संभाजीला जिवंत पकडल्याची आनंदवार्ता त्याच्या कानावर पडली पडली. तो दिवस ६ फेब्रुवारी १६८९ हा होता.

१६

'ईश्वर जेव्हा एखाद्याला देतो, तेव्हा तो त्याला छप्पर फाडफाडून देतो' अशा अर्थाची हिन्दीत एक म्हण आहे. औरंगजेबाचे ग्रह या वेळेला त्याच्या कुंडलीत इतके उच्चीचे पडले होते, की या म्हणीची प्रचिती घटकोघटकी त्याला यावी. त्याने बोलावे आणि त्याप्रमाणे घडावे. त्याने हट्ट करावा आणि परमेश्वराने तो पुरवावा अशा प्रकारची वाचासिद्धीच जणू त्याला प्राप्त झाली होती. त्याच्या लोकांत त्याला 'जिन्दा पीर' म्हणजे चालता बोलता सिद्ध पुरुषच समजत असत. त्याची ती कीर्ति केवळ दंतकथा नसून वस्तुस्थिति असावी असे नास्तिकालाही वाटावे इतक्या विस्मयकारक प्रकाराने एकंदर घटना घडत होत्या. त्याने अजमीरहून निघताना मनात इच्छा धरली की विजापूर व गोवळकोंड्याच्या पाखंडी राज्यांचा पाडाव करावा. त्याने इच्छा धरली की दक्षिणच्या काफरांचा बंदोबस्त करावा. ख्वाजा मोइनुद्दीन चिस्तीच्या दर्ग्यापाशी त्याने या मनीषा प्रकट केल्या व करुणा भाकली. ख्वाजा साहेबांच्या दर्ग्याची कीर्ति अशी आहे की त्या ठिकाणी व्यक्त केलेली इच्छा सफल झाल्याशिवाय राहात नाही. त्याप्रमाणे विजापूर व गोवळकोंडा सर झाले. संभाजीचा पाडाव झाला. पण संभाजी जेरबंद झाल्याची शुभवार्ता येण्यापूर्वीच औरंगजेबाची आणखी एक मनःकामना पूर्ण झाली होती. बंडखोर अकबराला देशाबाहेर घालविण्याची त्याची इच्छा होती. त्यासाठीच तो दक्षिणेत आला होता. म्हातारपणी ज्याने बापाला आपल्यामागे दक्षिणच्या दऱ्याखोऱ्यात भटकायला लावले तो अकबर अखेर १६८७ च्या फेब्रुवारीमध्ये इराणला पळून गेला. आणि औरंगजेबाने अकबराप्रमाणेच सुटकेचा निःश्वास सोडला. त्याचा एक मोठा हृद्रोग कायमचा मिटला.

१६८१ च्या जूनमध्ये अकबर संभाजीच्या आश्रयास आला पण अकबर व संभाजी यांचा संबंध फारसा सुखकर झाला नाही. अकबर फार मोठ्या अपेक्षा धरून संभाजीकडे आला होता. तो वारंवार संभाजीला सांगत होता की उत्तरेत जाऊन बादशहाशी सामना करावा किंवा जुन्नर, नगर, औरंगाबाद, बुऱ्हाणपूर अशा एखाद्या मोठ्या शहरावर हल्ला करून ते ताब्यात घ्यावे म्हणजे सगळा डाव बादशहावर उलटेल. रामदासांचाही हाच अभिप्राय होता–' उत्तरेकडील राजपुत्राचे आगमन झाले म्हणून ऐकिले. ते समयी बोलिले, ते प्रांतींचे लोक अनुकूल करून घेतील तर उभयता योगे कार्यसिद्धीच आहे. पण त्वरा पाहिजे.' पण अकबरासाठी का होईना पण आपला महाराष्ट्राचा सुरक्षित डोंगराळ प्रदेश सोडून उत्तरेकडच्या मैदानात औरंगजेबाशी झुंजण्याचा धोका संभाजीने काय म्हणून पत्करावा ?

तशात अकबर यायला आणि त्याच्या मंत्रिमंडळांतल्या अण्णाजी दत्तो प्रभृतींचे कारस्थान व्हायला एकच गाठ पडली. घरच्या राजकारणात त्याचा पाय गुंतून पडला व तीन महिने गेले. त्याच्यापुढे तो त्वरा करणार तर औरंगजेबाने त्याच्याही पेक्षा जास्त त्वरा केली व १६८२ च्या मार्चमध्ये तो स्वतःच औरंगाबादेत येऊन बसला. एवढा प्रबळ शत्रु उरावरतीच येऊन बसल्यानंतर आधी महाराष्ट्राचे रक्षण हेच संभाजीचे पहिले कर्तव्य होते. उत्तरेवरील आक्रमणाची गोष्ट नंतरची होती.

तरीही संभाजीने उत्तरेतील राजपुतांनी औरंगजेब दक्षिणेत गुंतला आहे या संधीचा फायदा घेऊन उत्तरेत अकबराच्या बाजूने उठाव करावा असा प्रयत्न केला. त्याने जयपूरचा राजा रामसिंग याला पत्रात लिहिल्याप्रमाणे तो स्वतः हिंदुधर्माच्या रक्षणासाठी झगडताना त्याचे दुर्ग, त्याचा देश, त्यांची संपत्ति सर्व काही पणास लावण्यास तयार होता. त्याने औरंगजेबाच्या अनेक सेनानायकांचा वध केला. काहींना कारागृहात टाकले, काहींना दंड घेऊन सोडून दिले. आता अशी वेळ आली आहे की त्या यवनाधमाला पकडून कारागृहात घालणे शक्य होईल. संभाजीची अपेक्षा अशी होती की त्याच्यापेक्षा अनुभवाने व वयाने ज्येष्ठ असलेल्या, सप्तांगसंपन्न राज्याने युक्त असलेल्या रामसिंगासारख्या राजपुतांनी या वेळी औरंगजेबाची शक्ति नष्ट करण्यात त्याला मदत करायला पाहिजे. त्याने औरंगजेबाविरुद्ध बंड करणाऱ्या व नंतर मारल्या गेलेल्या बुंदीच्या दुर्जनसिंग हाडाचेही उदाहरण रामसिंगाला दिले. इराणचा राजा शहा अब्बास याने अकबराला मदत करण्याचे वचन दिल्याचा निर्देश करून संभाजीने अकबर प्रकरणातले आपले राजकारण स्पष्टपणे रामसिंगाला कळविले की 'पण या बाबतीत आपण यवनांची मदत घ्यावी व यशाचे श्रेय त्यांना मिळवून द्यावे हे मला अनुचित वाटते. यवनांच्या मदतीने अकबराला राज्यपद लाभले. तर त्यांना प्राधान्य लाभेल ही गोष्ट आपण होऊ देऊ नये. आपण उभयतांनी एक होऊन अकबराला गादीवर बसवले तर धर्मरक्षणाचे कार्य होईल व आपल्या या कार्याने महाराज जयसिंह यांच्या वंशाला शोभा येईल.'

पण महाराज जयसिंग याच्या वंशाला शोभा यावी असा योग नव्हता. कारण कोणत्याच राजपुताने किंवा मोगलाने संभाजीच्या सल्ल्याप्रमाणे औरंगजेबाविरुद्ध उठाव केला नाही. एक तर राजपूत औरंगजेबाशी झगडून कंटाळले होते. जोधपूर-मारवाडात त्यांचा झगडा चालूच होता. व दुसरे म्हणजे औरंगजेबाची अखंड सावधानता सगळ्या हिंदुस्थानवर करडी नजर ठेवून होती. ज्यांच्यापासून औरंगजेब शेकडो मैल दूर होता, त्या राजपुतांनी काही करायचे नाही आणि ज्याच्या दारात औरंगजेब येऊन ठेपला आहे, त्या संभाजीने मात्र उत्तरेत जाण्याचा नसता खटाटोप करायचा ही कल्पनाच मुळी हास्यास्पद होती.

तेव्हा संभाजीपुढे दोनच पर्याय होते. अकबराला संभाजीने आमंत्रण पाठवून बोलाविले नव्हते. त्याच्या पत्राला त्याने उत्तरही दिले नव्हते. त्याला आश्रय देऊन सगळ्या हिंदुस्थानात कोणी न पतकरलेले हे नसते घोंगडे आपल्या गळ्यात अडकवून घ्यावयाची संभाजीची मुळीच तयारी नव्हती. त्याला आश्रय द्यावा हे कवि कलशाचे मत होते. संभाजीचे नव्हते. पण कविकलशाच्या आग्रहाखातर संभाजीने त्याला आश्रय दिला तर त्याची शक्य तितकी चांगली व्यवस्था ठेवणे व प्राणपणाने रक्षण करणे ते मात्र संभाजीने शक्य तितक्या चांगल्या प्रकाराने केले. अकबराची व्यवस्था रायगडापासून जवळच पालीला केली. त्याला मोठे घर दिले. त्या घराला कॅलिको कापडाचे पडदे आणि छत लावले. हिरोजी फर्जंदाबरोबर त्याला भेट म्हणून एक हजार पागोडे, रत्नजडित कंठा व हिरेजडित तुरा दिला. धान्याची व्यवस्था केली. दररोज साठ होनाचा रोजमुरा देऊ केला. दिल्लीच्या शाही पाहुण्याचे कोकणच्या मराठी माणसाने केलेले हे साधे आतिथ्य होते. त्याच्यात अगत्य होते, जिव्हाळा होता पण बडेजाव नव्हता, व खुषामत तर नव्हतीच नव्हती.

आता अकबराला ते खुपू लागले तर तो काही संभाजीचा दोष नव्हता. दिल्लीतल्या भव्य इमारती तेथे नव्हत्या. तेथे संगीत नव्हते. तेथे मोगली आदब नव्हती. भात आणि नाचणी खाणारे लंगोटी लावलेले मावळे आसपास वावरत होते. वेड्यासारखा पाऊस कोसळे. उन्हाळ्यात घामाच्या धारा चालत. त्या माणसांची भाषा अकबराला येत नसे, त्याची त्यांना येत नसे. हा अक्षरशः 'वनवास' होता. तो कंटाळला. त्याला तेथली हवा मानवेना म्हणून तिकोन्याला ठेवले, तेथेही मानवेना म्हणून जैतापूरला ठेवले. पण जेथे महाराष्ट्रच त्याला मानवेना त्याला संभाजी काय करणार?

अकबराचा स्वभाव थोडासा विक्षिप्त होता. आपण कोण आहोत, आपली परिस्थिति काय आहे, आपण कसे वागले पाहिजे याचे फारसे तारतम्य त्याला नव्हते. त्याने बापाविरुद्ध बंड करून स्वतःला बादशहा म्हणून जाहीर केले होते. राज्याभिषेकही करून घेतला होता. त्याचा जुलूस शकही प्रचारात आणला होता. पण या गोष्टी दंतकथेत किंवा इतिहासात आता जमा होण्याच्या लायकीच्या झाल्या होत्या. 'राजा' म्हणवून घेतल्याने कोणी राजा होत नसतो. 'राजाऽहमिति शब्दान्नो राजा भवितुमर्हति !' हे कठोर सत्य अकबराच्या पचनी पडले नव्हते. आपण 'बादशहा' आहोत याच भ्रमात तो मशगूल असे. स्वतःचा राजशक घालून तो कडक फर्माने काढी—आणि कुणाला तर संभाजीला ! तळकोकणातील बातम्यावरून मुर्शदजाद्यांना (अकबर) कळले की तुमचा नोकर नारो कोन्हेर हा चौल परगण्याच्या आपटे या गावाहून निघून दापोली या गावी येऊन राहिला आहे. दंडाराजपुरीची प्रजा तेथून पळून चौलच्या आश्रयाला येत आहे. नारो कोन्हेर हा या प्रजेला लुटतो. लोकांची मालमता घेऊन त्यांना तो तुमच्याकडे

पाठवतो. अशा गोष्टीमुळे प्रजा हैराण होते. या पत्राबरोबर हरकाम्याकडून आलेले हे बातमीपत्र पाठवीत आहे. त्यावरून सर्व हकीकत कळेल. आज्ञा (अकबराची) झाली आहे की तुम्ही आपली माणसे दापोलीहून काढून घ्यावीत, आणि लोकांची मालमता घेण्यात आली आहे तो कोकणचा दिवाण करीमबेग याच्याद्वारे त्या लोकांना परत करण्यात यावी. प्रजेपैकी कोणालाही पीडा देण्यात येऊ नये. अशी ताकीद तुम्ही यापुढे द्यावी. याप्रमाणे अमल केल्याची हकीकत आपण कळवावी म्हणजे बादशहा (अकबर) समोर मांडण्यात येईल'

विसंगति हा विनोदाचा आत्मा आहे असे म्हणतात. हे पत्र हा विसंगतीचा उत्तम नमुना आहे. पत्र लिहिणारा अकबर पळून आलेला निर्वासित आहे. पण तो स्वतःला बादशहा समजतो. तो ताकीद देतो आहे ज्याच्या मर्जीशिवाय त्याचे पान हालणार नाही त्या संभाजीला इतकेच नव्हे तर ज्या झोपडीत बसून तो हे फर्मान लिहीत आहे ती झोपडीही संभाजीनेच कृपावंत होऊन त्याला दिलेली आहे! संभाजीला विनोदबुद्धि कितपत होती हे माहीत नाही, पण जर असली तर हे पत्र वाचून तो फक्त हसला असेल, 'It would be an argument for a week, laughter for a month and a good jest forever!' (ही गोष्ट वादाला आठवडाभर पुरेल, हसण्यास आठवडाभर पुरेल, थट्टेसाठी कायम पुरेल!') हे फर्मान पुन्हा २७ डिसेंबर १६८१ ला–म्हणजे जेव्हा लिहावयाला नको होते. तेव्हा–अकबराने लिहिले आहे. महाराष्ट्रावर चालून येणारा औरंगजेब या वेळेला बुऱ्हाणपूरपर्यंत येऊन ठेपला होता. अकबराच्या पत्राने संतापून संभाजीने त्याला आपल्या राज्यातून हुसकावून दिले असते तर तो कोठे गेला असता?

पण दरवेळी इतका चांगुलपणा दाखवणे संभाजीला शक्य होत नसे. कारण तोही माणूसच होता. अकबर स्वतःची फौज जमा करू लागला. स्वार व प्यादे यांची वाढ झाली. त्याच्याबरोबर दोनशे स्वार व आठशे प्यादे असून इतर लोकही त्याच्याकडे रुजू झाले. ही बातमी ऐकून संभाजीने त्याला निरोप पाठवला की तू लोक जमा करीत असशील तर दुसऱ्या मुलखात जा. नाहीतर आहेस त्याचप्रमाणे माझ्या मुलखात राहावे. जे लोक रुजू झाले आहेत त्यास मना करावे. दुसऱ्या मुलखात जाणे अकबरास शक्य नव्हते. चुळबुळत त्याला संभाजीचे म्हणणे मान्य करावेच लागले.

पण अकबर महाराष्ट्रात राहाण्यास कंटाळला होता. संभाजीच्या पुढे दुसरा पर्याय होता. तो जर उत्तरेत जात असेल तर त्याला मदत करणे. म्हणूनच रामसिंगाला त्याने लिहिले होते की आम्ही अकबर व दुर्गादास यांस गुजरातेत पाठविण्याच्या विचारात आहोत. समुद्रमार्गाने गुजरातेतून अहमदाबादच्या मार्गाने त्याने राठोडांच्या मुलखात जावे अशी ही योजना होती. पण औरंगजेबाच्या सावधपणामुळे ती फसली. त्याने रुहुल्लाखानाकडून बडोदा व अहमदाबादच्या

सुभेदारांना अकबराची वाट अडवून त्याला कैद करण्याचा हुकूम दिला. त्याचप्रमाणे अहमदाबाद, सुरत, बडोदे, थालनेर, नंदुरबार, रावेर, माळवा इत्यादि ठिकाणच्या फौजदारांना अकबराला पकडण्याचा हुकूम देण्यात आला. उत्तरेकडे जाता येत नाही, महाराष्ट्रात राहण्याचा वीट आला--तिकडे जावे तर औरंगजेब जीव घेणार, इकडे तर कुचंबून तिळातिळाने मरावे लागणार अशा विवंचनेत अकबर जवळ जवळ वैतागाने वेडा झाला.

अशा स्थितीत एक लहानसा प्रसंग घडला आणि संभाजी व अकबर यांचे संबंध आणखी दुरावले. संभाजीने अकबराला एक माळ व एक हत्ती भेट म्हणून दिला होता. ती माळ अकबराने आपल्या एका पूर्वीच्या हिंदु पण आता मुसलमान केलेल्या रखेलीला देऊन टाकली. संभाजीला ही गोष्ट समजल्यावर तो संतापला व अकबराला त्याने निरोप पाठविला की, 'तुझ्या सन्मानासाठी मी तो कंठा तुला दिलेला होता.' अकबराने उलट उत्तर पाठविले की, 'मी बादशहा आहे. माझ्या मनासारखा मी वागेन.' तेव्हा संभाजीने त्याच्या दिमतीला दिलेले दोन हजार घोडदळ व दोन हजार पायदळ परत बोलाविले, त्याला खर्चाला रक्कम देणेही बंद केले. तेव्हा अकबराने वैतागाने आपल्या तंबूंना व घरांना आग लाविली व फकीराचा वेष धारण करून गोव्याचा मार्ग धरला.

उत्तरेत जाण्याचा मार्ग खुंटला तर गोव्यातून समुद्रमार्गाने इराणला जावे असा अकबराचा बेत होता. गोव्याच्या गव्हर्नरला त्याच्या वकिलाने सांगितले की, 'आमचे यजमानाचे व संभाजीराजांचे बिलकूल पटत नाही. म्हणून दख्खन सोडून बाहेर निघून जाण्याचा विचार त्यांनी केला आहे. या कामी आपले साहाय्य आम्हांस पाहिजे आहे.' त्याने काही भारी जवाहीरही गव्हर्नरास विकले. अकबर मंगळूरहून मक्केस जाणार होता. म्हणून गव्हर्नरने मंगळूर येथील आपल्या वखारीस अकबरास पाच गलबते देण्याविषयी हुकूम दिला. पण परत अकबरास बाप आडवा आला. औरंगजेबाचा वकील शेख महंमद गोव्यातच बसला होता. त्याने ही सर्व वाटाघाट औरंगजेबाला तर कळवलीच, पण जंजिऱ्याच्या सिद्दी याकूतलाही कळविले की, 'अकबर असा पळून जात आहे त्यास अटकाव करावा.' औरंगजेबाने अशी जबर तंबी गोव्याच्या गव्हर्नरला दिली की पुन्हा म्हणून अकबराच्या जलप्रवासाची सोय करण्यास तो धजला नाही. पण त्याने सिद्दीच्या हालचालीची गुप्त बातमी अकबराला दिल्यामुळे तो बांदा सोडून पोर्तुगीजांच्या हद्दीत डिचोली येथे येऊन राहिला. येथे संभाजी व अकबर यांची परत गाठ पडली. दोघांनी मिळून औरंगजेबाच्या छावणीवर हल्ला करण्याचे ठरविले, पण तयारीस विलंब लागू लागला. तेव्हा वैतागाने अकबर वेंगुर्ल्यास गेला. त्याने एक जहाज खरेदी केले व जहाजावर चढणार इतक्यात कविकलश तेथे आला. त्याने त्याची प्रयासाने समजूत घातली व परत आणले.

हा काळ म्हणजे पोर्तुगीज मराठे युद्धाचा ऐन अटीतटीचा काळ होता. अशा आणीबाणीच्या प्रसंगी अकबर पोर्तुगीजांकडे असू नये या राजकारणी दृष्टीनेही संभाजीने त्याला आपणांकडे वळवून आणले असणे शक्य आहे. तहाच्या वाटाघाटीत संभाजीच्या बाजूने कविकलशाबरोबर अकबरही वाटाघाटीत भाग घेत होता. पुढील सबंध वर्ष त्याने मलकापूर–साखरपा भागात काढले. मराठ्यांच्या मंत्रिमंडळात फक्त कविकलशाशीच त्याचा पत्रव्यवहार होता. कदाचित् दोघेही येथे परदेशी होते म्हणूनही असेल.

उत्तरेत जाऊन आक्रमण करणे, समुद्रमार्गाने इराणात पळून जाणे आणि औरंगजेबापुढे सपशेल शरणागति पतकरणे हे तीन पर्याय होते. यातील शरणागतीच्या पर्यायाचा मलकापूरला असताना त्याने विचार केला. पूर्वीही केला होता. त्याचप्रमाणे त्याला परत आणण्याचा औरंगजेबाने व त्याची मुलगी झीनतुन्निसा हिने वेळोवेळी प्रयत्न केला. हा पर्याय यशस्वी झाला नाही एवढेच ह्या दुर्दैवी अकबराचे सुदैव होय.

झीनतुन्नीसेने अकबराला एक उपदेशपर पत्र लिहिले. त्याला उत्तर देताना अकबराने आपल्या अपराधाची क्षमा मागितली. औरंगजेबाने त्याला उत्तर पाठवून तुम्ही निःशंकपणे आमच्याकडे यावे असे कळविले. पुन्हा १६८४ च्या डिसेंबरात झीनतुन्निसेने अकबराची विचारपूस केली. फेब्रुवारी १६८५ मध्ये त्याच्या शिक्षकास त्याच्याकडे खिलत देऊन पाठविले. बरोबर अकबराने परत यावे अशा अर्थाचे फर्मान औरंगजेबाने पाठविले. पुन्हा सैफुल्लाखानाबरोबर खिलत देऊन तसेच फर्मान पाठविले. अकबरानेही औरंगजेबाला एकदा दोन सुंदर घोडे भेट म्हणून पाठवले. क्षमायाचनेची पत्रे तर नेहमी चालूच होती. पण अकबर काही परत आला नाही. बादशाही सैन्याशी मुकाबला होऊन पराभव झाला म्हणजे परत तो संभाजीच्याच मुलखात घुसत असे. एकदा अशाच प्रसंगी औरंगजेब म्हणाला– 'त्याच्या नशिबी भटकणेच आहे!' औरंगजेबाचे शब्द किती खरे होते!

औरंगजेबाविरुद्ध जाहीरनामा काढण्यात आणि बंड करण्यात अकबराने मूर्खपणा केला असला तरी त्याच्याकडे परत जाऊन त्या मूर्खपणावर त्याने कळस चढविला नाही ही मोठी गोष्ट आहे. क्षमेच्या गोष्टी औरंगजेब बोलत असला तरी तो शब्द त्याच्या कोशात नाही हे त्याला उत्तम माहीत होते. आपली खोडी काढणाऱ्या कोणत्याही माणसाला– मग तो बाप असो की भाऊ असो की मुलगी असो– औरंगजेबाने आयुष्यात क्षमा केली नव्हती. 'विसरा आणि क्षमा करा' हे मुळी त्याचे ब्रीदच नव्हते. शेपटीवर पाय दिला की जीवघेणा दंश करणे एवढेच तो जाणत होता. तो क्षमेच्या गोष्टी बोलला म्हणून काही साधु झाला नव्हता. नागाला गांडूळ म्हटल्याने तो निर्विष होत नाही. गांडूळाला नाग म्हटल्याने तो

सविष होत नाही. (न हि सर्पो वा डुण्डुभः इत्यादिना निर्विषो भवति । नहि डुण्डुभो वा सर्प इत्यादिना सविषो भवति ।) आपण ज्याच्या शेपटीवर पाय दिला ते गांडुळ नसून तो नाग होता हे अकबराला समजले आणि गांडूळ व नाग यांच्यातला फरक त्याला समजला हे त्याचे भाग्य होय. या ज्ञानामुळेच त्याला मुक्ति मिळाली. 'सा विद्या या विमुक्तये !' अकबराला प्राणिसृष्टीप्रमाणे मानव-सृष्टीचेही बऱ्यापैकी ज्ञान होते असे यावरून दिसते; प्राण्यांप्रमाणे माणसातही गांडूळ आणि नाग असतात या त्याच्या शहाणपणाबद्दल त्याची तारीफ करावी तेवढी थोडीच होय.

१६८६ मध्ये औरंगजेब विजापूरला स्वारीवर गेला. त्याच्याबरोबर उत्तरेकडचा अहमदनगरच्या नाक्यावर ठेवलेला गाझीउद्दीन फीरोजजंग आणि रुहुल्लाखान हे नामांकित सरदारही विजापुरकडे गेले. ही संधि साधून अकबराने मराठ्यांच्या मुलखांतून बाहेर पडून उत्तरेकडे जाण्याचा अगदी जिवाच्या कराराने प्रयत्न केला. कारण त्याला माहीत होते की विजापूर व गोवळकोंडा पडल्यावर औरंगजेबाच्या सर्व विजयी फौजा मराठ्यांच्या मुलखावर कोसळणार आणि अकबराचा छडा लावण्यासाठी तो दुर्गम मुलूखसुद्धा कापसाप्रमाणे पिंजून काढणार, म्हणून बाहेर पडण्याची संधि ही एवढीच आणि अखेरचीच आहे. त्यांच्याबरोबर संभाजीने बरेच सैन्य दिले आणि अहमदनगरच्या मार्गाने उत्तरेकडे तो निघाला. तो गंगापुरापर्यंत पोचलाही. पण औरंगजेब अकबराचा बाप होता. तो त्याच्या बारशाला अक्षरशः जेवला होता. अकबर उत्तरेकडे जातो आहे या बातमीची कुणकूण लागण्याचा अवकाश, त्याने शहाजादा आझमबरोबर तीस हजारांचे सैन्य देऊन त्याची वाट अडवायला व त्याचा पाठलाग करून त्याला कैद करायला रवाना केले. अकबर साल्हेरला पोचला तो त्याच्या पुढेच अहिवंत गडापाशी आझम त्याची वाट अडवून उभा होता. अकबर घाबरला व साल्हेरवरून कोकणात उतरला व माहुलीच्या किल्ल्यात जाऊन राहिला. पुन्हा एकदा तो उत्तरेकडे निघाला. संभाजीने त्याच्याबरोबर दहा हजार मराठ्यांचे सैन्य दिले. या वेळी अहमदनगरला गाझीउद्दीन व रुहुल्लाखान नव्हते. बादशहाही दूर विजापुरात होता म्हणून अकबर थोडा निर्धास्त होता. पण औरंगजेबाने महाराष्ट्राकडे पाठ वळविली असली तरी त्याच्या पाठीलाही डोळे होते हे त्याला कोठे माहीत होते ? अहमदनगरला जाफरखान वजीराचा नातू मरहमतखान याला औरंगजेबाने ठेवले होते. त्याने त्या प्रांतांतील फौजदारांना बोलावून घेतले व चाकण येथे अकबराला त्याने गाठले. प्रखर युद्ध झाले, आणि अकबराचा पराजय होऊन पुन्हा त्याला संभाजीच्या मुलुखाकडे निघून जावे लागले.

सर्वच मार्ग खुंटले. तेव्हा अकबराने समुद्रमार्गाने इराणला जाण्याचे ठरविले. देवालाही त्या दुर्दैवी राजपुत्राची आता दया आली, तो राजापूरला गेला. त्याने

दोन जहाज विकत घेतली. त्यांच्यावर बेंडाल नावाचा इंग्रज माणूस कॅप्टन होता. आणि आपल्या पंचेचाळीस अनुयायांबरोबर या जहाजात बसून १६८७ च्या फेब्रुवारीत तो इराणला रवाना झाला. आझमच्या सैन्यातील हरकाऱ्याने ही बातमी औरंगजेबाला दिली. इस्फाहान येथे इराणच्या शहाच्या दरबारी जानेवारी १६८८ मध्ये अकबर पोचला. इराणच्या शहाने त्याला आश्रयही चांगला दिला. तेथेच १७०४ मध्ये अकबर मृत्यु पावला.

विजापूरचा सुप्रसिद्ध सरदार अफझलखान याची विजापूरच्या सरदारांनासुद्धा एवढी धास्ती होती की, सीदी अंबर नावाच्या एका पराक्रमी पण बंडखोर सरदाराला कैद करण्यासाठी तो एकदा चालून गेला असता, अफझलखान आपणास धरायला येतो आहे, ह्या कल्पनेनेच सीदी अंबर इतका घाबरला की त्याने स्वतः होऊनच स्वतःच्या हाता पायात बेडया घालून घेतल्या व तो अफझलखानापुढे हजर झाला. त्याचप्रमाणे केवळ औरंगजेबाच्या धास्तीनेच, त्याने हिंदुस्थानातून हद्दपार करण्याची शिक्षा सुनावण्याच्या आधीच, अकबराने स्वतःच स्वतःला हद्दपार करून घेतले. बंडखोर अकबराला देशा बाहेर घालवून देण्याचा औरंगजेबाचा उद्देश आता खरे म्हणजे सफल झाला होता. पण धापा टाकीत पळणाऱ्या हरणाचा निर्दय पाठलाग करणाऱ्या वाघाप्रमाणे इराणातही अकबराचा पाठलाग करण्याची औरंगजेबाला नशा चढली होती. त्याने इराणचा शहा सुलेमान याला पत्र लिहिले. मला खात्रीलायक बातमीदाराकडून समजले आहे की बंडखोर अकबर तुमच्याकडे आहे. हे पत्र पाहताच त्याला बेडया घालून माझ्याकडे रवाना करावे. माझ्या आज्ञेप्रमाणे तुम्ही वागला नाहीत तर दाराला ज्याप्रमाणे मी कडक शासन केले तसेच तुम्हांलाही करीन. वजीराने पत्र लिहिले, बंद केले व औरंगजेबापुढे ठेवून म्हटले, 'हे आपल्या हुकूमाप्रमाणे लिहिलेले पत्र. आता हे पत्र न्यायचे कुणी हे आपण सांगावे. फक्त या पत्राचे उत्तर कोण आणील हे मला सांगता येत नाही.' वझीर आसदखान शहाणा होता असे औरंगजेबाचे मत होते, शहाण्या वझीराच्या या उत्तराने, खाडकन् तोंडात मारल्यानंतर दारुडयाची धुंदी उतरावी तशी औरंगजेबाची नशा उतरली, व त्याच्या लक्षात आले की इराण म्हणजे हिंदुस्थान नव्हे. हिंदुस्थानात आपली हुकुमत चालत असली तरी इराणात आपणाला कुत्रेसुद्धा विचारीत नाही. इराणचा शहा अब्बास हे काय प्रकरण होते हे औरंगजेबाला चांगले माहीत होते. औरंगजेबाच्या वकिलाचा त्याने अपमान केला होता, त्याच्या समक्ष हिंदुस्थानवर स्वारी करण्याच्या धमक्या दिल्या होत्या, औरंगजेबाच्या 'आलमगीर पदवीची थट्टा करून म्हटले होते की, तुम्ही फक्त 'पिदरगीर' म्हणजे बापाला जिंकणारे आहात, तुमच्या दुबळेपणामुळे शिवासारखे काफीर जमीनदार बळावले आहेत. तुमचा पूर्वज हुमायून याला आम्ही जशी मदत केली तशी तुम्हालाही मदत करण्यासाठी मी स्वतः माझे प्रचंड सैन्य घेऊन हिंदुस्थानात येतो.

तुमच्या दुर्दैवापासून देवच तुमचे रक्षण करो!' शेवटच्या भेटीत तर शहाच्या एका नोकराने औरंगजेबाच्या वकिलाच्या दाढीला आग लावली, व 'हिंमत असेल तर काबुलावर येऊन युद्ध करा' असा निरोप देऊन वकिलाला रजा दिली. शहाने केलेला अपमान औरंगजेबाने मुकाट्याने गिळला. 'तुम्ही शहाचा तेथल्या तेथे खून कां केला नाही? असे उलट आपल्या वकिलालाच बोलून त्या बिचाऱ्याला साप चाववून औरंगजेबाने ठार मारले. पण शहाचा खून करण्याची तर राहोच, पण त्याच्या अंगावरचे झुरळ मारण्याचीही औरंगजेबाची छाती नव्हती. कारण औरंगजेब हा एक राक्षस होता तर इराणचा शहा त्याच्यापेक्षा सवाई राक्षस होता हे सर्व शहाणपण वझीराच्या एका चतुर उत्तराने औरंगजेबाला शिकविले त्याचमुळे केवळ अकबर इराणात तरी सुखाने मरू शकला. हिंदुस्थानात संभाजी आणि इराणात शहा सुलेमान यांचा आश्रय निवडण्यात 'शत्रूचा शत्रू तो आपला मित्र' या तत्त्वाची जाण लहान वयात अकबराने दाखवली ती खरोखर राजकारणी पंडिताच्या तोडीची म्हटली पाहिजे. अकबर मेल्याची बातमी औरंगजेबाला कळली तेव्हा त्याला अत्यंत दुःख झाले—निदान तसे त्याने बाहेर दाखविले तरी व तो बोलला—'दूर देशी त्याचा मृत्यु व्हावा ही खरोखर मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. पण त्याच्या स्वतःच्याच इच्छेने तो हिंदुस्थान सोडून गेला. बापाचा उपदेश न ऐकल्याबद्दल आणि कुराणाच्या आज्ञेविरुद्ध वागल्याबद्दल परमेश्वरानेच त्याला ही शिक्षा केली!'

पण अकबर हिंदुस्थानातून परागंदा झाला आणि औरंगजेबाला अहोरात्र व्यग्र करणारी एक समस्या कायमची मिटली. गोवळकोंडा जिंकलेच होते. विजापूरचाही पाडाव झाला होता. आता एकटा संभाजी तेवढा उरला होता. तो एकाकी होता. त्याला कुणाचीही मदत करण्याची छाती नव्हती. त्याचे राज्य टीचभर होते. औरंगजेबाच्या मागे सबंध हिंदुस्थान उभा होता. न संपणारा खजिना होता. कसलेले विजयी सैन्य होते. जंगलात भटकणाऱ्या वाघाच्या मागावर शिकारी कुत्रे सोडावेत त्याप्रमाणे औरंगजेब केव्हाही आपल्या फौजा मराठ्यांवर सोडू शकत होता.

तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्राकडे पाठ फिरवून विजापूरकडे वळणारा औरंगजेब तो हा नव्हता. आता तो पार बदलला होता, विजयामागून विजय मिळत गेल्यामुळे त्याचा आत्मविश्वास कल्पनातीत वाढला होता. चाळीस हजारांचे सैन्य देऊन त्याने आझमला राजगडला वेढा घालण्यासाठी रवाना केले होते. शेख निजाम हैद्राबादी याला कोल्हापूर—पन्हाळा भागात पाठविले होते. इतिकदखानाला रायगडाला वेढा घालण्यासाठी निरोप दिला होता. स्वतः तो शुक्रवार १४ डिसेंबर १६८८ रोजी विजापुरातून बाहेर पडला होता व अकलूज मार्गाने आझमच्या मागोमाग जात होता. ज्याप्रमाणे गोवळकोंड्यासह कुतुबशहा, विजापूरसह सिकं-

दर आदिलशहा पाडाव केला त्याप्रमाणे रायगडाबरोबर संभाजीलाही गिळंकृत करावे, राजा आणि राजधानी यांचा एकच घास घ्यावा या ईर्षेने तो धगधगत होता–एक इंग्रज पत्रात लिहितो ते अगदी खरे आहे–संभाजीच्या मदतनिसाचा काटा काढल्याने व त्याचा समूळ नाश झाल्याने आपणास आता खास आपल्यावर होणाऱ्या औरंगजेबाच्या स्वारीला कसे तोंड देता येईल या चिंतेने राजा अगदी व्यग्र होऊन गेला आहे. मोगलांच्या छावणीतून भवानीदास नावाचा एक नागर ब्राह्मण येथे आला आहे. तो सांगतो की औरंगजेब तर संभाजीला जिवंतच पकडण्याची भाषा बोलत आहे.'

संभाजीवर व स्वराज्यावर फार मोठे संकट कोसळले होते. इतकी आणीबाणीची परिस्थिति थोरल्या महाराजांच्या वेळीही निर्माण झाली नव्हती.

ही गोष्ट खरी की मोगलांचे महाराष्ट्रावर आक्रमण हे मराठ्यांना नवे नव्हते. त्याचा प्रतिकार ही ही नवी गोष्ट नव्हती. १६८६ साली विजापूर पडल्यापासूनच मोगलांच्या फौजा महाराष्ट्राच्या पूर्व दक्षिण व आग्नेय सरहद्दीवर कोसळत होत्या आणि त्याच्याशी अनेक मराठे निष्ठेने व प्राणपणाने झुंजत होते.

विजापूर जिंकल्यावर औरंगजेबाने रुहुल्लाखान यास तेथील सुभेदार नेमले. तो कृष्णेपलीकडील मुलखाचा बंदोबस्त करण्यात गुंतला असताना संभाजीचा सरदार आनंदराव हा बादशाही मुलखात चौथ वसूल करण्यासाठी मोठे सैन्य घेऊन आला, रुहुल्लाखानाने आपला मुलगा खानाजादखान यास त्याच्याविरुद्ध पाठविले. दोघांची लढाई होऊन आनंदराव पळून गेला. रहीमदादखान नावाचा विजापूरचा सरदार औरंगजेबाकडे आला. तेथून तो संभाजीकडे आला आणि त्याच्यातर्फे पंचमगडचा इलाखा त्याने सर केला. शेवटी औरंगजेबाने त्याच्यावर इहतिशामखान व नारोजी राणे यांना पाठविले. निकराची लढाई होऊन दोन्हीकडची दोन हजार माणसे ठार झाली, शेवटी रहीमदादखान कैद झाला व त्याला औरंगजेबाकडे रवाना करण्यात आले. इंदापूरचा ठाणेदार हबीबुल्लाखान याची शहापूरचा किल्लेदार म्हणून नेमणूक झाली होती. पण तो किल्ल्याजवळ येतो न येतो तोच मराठ्यांनी त्याला कैद करून नेले. सांगोल्याचा ठाणेदार नूरमहंमद याच्यावर मराठ्यांनी हल्ला करून त्याला पकडले व त्याला ते बरोबर घेऊन गेले. १६८६ च्या नोव्हेंबरात रणमस्तखान व रुहुल्लाखान मिरजेहून पन्हाळ्यापर्यंत आले होते, पण हंबीरराव मोहिते याने त्यांच्याशी सामना देऊन त्यांना माघारे परतविले. या प्रसंगी हुकेरीचा अलगौडा देसाई याला हंबीररावाने पत्र लिहिले आहे त्यात त्याचा जो हुरूप दृष्टीस पडतो, त्यावरून या बिकट प्रसंगी सेनापती होण्यास तो किती योग्य होता याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. गनीम रोहिलाखान व रणमस्तखान ऐसे मिरजेहून पनालेपावेतो आला होता, अमचे फौजेसी व गनिमासी बरा मुकाबला होऊन भांडण जाले, ते जागा गनिमाची बहूत खस्ता जाली. गनीम

खटा होऊन कोल्हापुरावरून बेळगावचे रोखे जात आहे. आम्ही सेनेसमुदायेनसी गनिमाचे पाठीवर आहो. गनिमाचा हिसाब धरीत नाही. येक विजापूर जाले तरी काय जाले. विजापूर हे जागा पहिलेपासून आमचाच आहे. त्याची मदत हरबाबेने आम्हास करणे लागते. असदखान किल्लेदार मिरजेचा याने उतावली करून मिरज गनिमास दिधली, त्याकरिता गनिमास राहावयास जागा होऊन पैस मडिळला आहे. हल्ली बेळगावकराने कोट देऊ केला म्हणऊन तिकडे गनीम जातो त्यास आम्ही खानेअजम मुरादखान यास कागद पाठविले आहेत की गनिमास आसरा न देणे. तुम्ही अम्ही येके जागा होऊन गनिमास सजा पावितो ऐसे लिहून पाठविले आहे. पहिले या मुलकात राजश्री गोपालराऊ होते ते लस्करास सामील झाले आहेत. यानी तुमचे विशई कितेक रदबदल केली की आपणासी येक खुसीने चालत आहेत तरी हे गोस्टी बहूतच उत्तम आहे. गनीम वाटेने जात आहे. तुम्हास कागद पत्र पाठवील तरी येकंदर गनिमास न भेटणे. आसेरा न देणे. अम्ही लस्करानिसी या प्रांते असता तुम्हांस कोण्हे गोस्टीचे काही भये नाही. आम्ही राजश्री रूपाजी भोसले व राजश्री संताजी जगताप यासिही बोलाविले आहे. येके जागे होऊन गनीम मारून गर्दस मेळवीतच अहो –

पण मराठ्यांचे दुर्दैव असे की, असे बाणेदार पत्र लिहिणारा हंबीरराव मोहिते पुढच्याच वर्षी १६८७ च्या ऑक्टोबरात वाईच्या लढाईत सर्जाखानाशी लढताना गोळा लागून ठार झाला. त्या लढाईत जय मराठ्यांचा झाला, त्यांना लूटही मोठीच मिळाली पण सेनापती गमवावा लागला. हंबीरराव जितका शूर तितकाच निर्लोभी होता. अफरातफर केल्यावाचून लुटीचा ऐवज तो धन्याकडे पोचता करी. संभाजीला राज्यपद मिळवून देण्यात त्याचा कार्यभाग मोठा होता. त्यानंतरही कल्याण, भिवंडी, पन्हाळा इत्यादी अनेक ठिकाणी त्याने मोगलांशी निकराचा सामना दिला. प्रतापराव गुजराच्या मृत्युनंतर शिवाजी महाराजांनी त्याला सेनापतिपद दिले ते त्याने सोळा वर्षे सांभाळले. तो असेपर्यंत संभाजीला लष्करीबाबतीत फारसे पाहावे लागत नसे. त्याच्या मृत्यूमुळे संभाजीचा आणि स्वराज्याचा मोठाच आधार तुटला—आणि तोही अशा वेळेला की जेव्हा त्याची फार फार जरूर होती.

महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकातही मराठे आणि मोगल यांच्या चकमकी चालू होत्या. गोवळकोंडा जिंकून घेतल्यानंतर कुतुबशाहीचा कर्नाटकातील प्रदेश जिंकून घेण्यासाठी औरंगजेबाने कासीमखान याला रवाना केले व त्याच्या मदतीला माचप्पा नायक, इस्माइल खान मका व महंमद सादिक यांना पाठविले. कर्नाटकचा सुभेदार हरजीराजे महाडिक व संभाजीने त्याच्या मदतीस पाठविलेला केसो त्रिमल यांच्यात भांडणे चालू होती, पण ती बाजूला ठेवून ते मोगलांशी झुंजत होते. कासीमखानाने बंगलोर, दोड्डबाळापूर, शिवगुंडाकांची, चंद्रगिरी, पेनुकोंडा, तुमकुर, चिकमहळ्ळी ही शहरे घेतली. पण मराठ्यांचा प्रतिकार चालूच होता. त्यांनी अर्काटच्या

मोगल सुभेदाराला ठार मारून अर्काट सर केले, कावेरीपाक येथील कापसाची व्यापारी पेठ जाळून टाकली, सैदापेट लुटले, जिंजी, सेंट थोम व त्या भोवतालचा प्रदेश ताब्यात ठेवला. कर्नाटकात मराठे व मोगल तुल्यबळ ठरले होते व त्यांच्या संघर्षाला निर्णायक वळण मिळाले नव्हते.

तशी स्थिति महाराष्ट्रात नव्हती. जरी हंबीरराव मोहिते, रूपाजी भोसले, संताजी जगताप, रायाजी सामराज इत्यादि नेत्यांनी मोगलांचा शर्थीने प्रतिकार चालविला होता, जरी वऱ्हाड, बागलाण व खानदेश या प्रांतांतून औरंगजेबाला बातम्या कळविण्यात आल्या होत्या की-- संभाजी आणि हंबीरराव हे आपल्या सैन्यासहित बादशाही मुलखात पसरले. त्यांनी गावेच्या गावे उद्ध्वस्त केली. विशेषतः त्यांनी मुसलमानांतील सय्यद, शेख, विद्वान् मुल्ला मौलवी यांची फारच दुर्दशा केली. पुष्कळ प्रतिष्ठित माणसे कोकणात जाऊन राहिली होती, त्यांचा छळ करण्यात आला. मोगल अधिकारी हे त्यांच्याशी लढले पण त्यांपैकी कित्येकांना पकडण्यात आले. रस्ते बंद करण्यात येऊन, अनेकांना कैद करून व किल्ल्यात नेऊन त्यांना छळण्यात आले. सारांश, मराठ्यांचा उच्छाद अतिशय झाला. तरी खुद्द महाराष्ट्रात एक मोठा वर्ग असा होता की या संघर्षात त्याच्या दृष्टीने मराठी राज्याचे भवितव्य अत्यंत चिंताजनक होते-नव्हे त्याला भवितव्यच नव्हते. हा वर्ग म्हणजे मराठी वतनदारांचा आणि मनसबदारांचा.

औरंगजेबाला मानवी स्वभावाचे आणि त्यातही मराठ्यांच्या स्वभावाचे फार उत्तम ज्ञान होते. वयाच्या विसाव्या वर्षापासून आज पन्नास वर्षे तो याच भागात वावरत होता. मराठ्यांना वतनाची आसक्ति केवढी आहे आणि मनसब असो की वतन असो, त्याच्या शाश्वतीची तळमळ माणसाच्या स्वभावात किती खोल रुजली आहे हे तो उत्तम जाणत होता. मनसबी व वतने यांचे आमिष दाखवून माणसे फोडण्याच्या भेदनीतीचा तो केवळ उस्ताद होता. या मराठ्यांना मराठी राज्यातही मनसबी व वतने होती. पण धरणीकंपात हादरू लागलेल्या घरातल्या काचेच्या भांड्याइतकीच 'अभंग' शाश्वती त्या मानमतराबांना होती. त्यामुळे मनसबींचे प्रलोभन दाखवून त्याने अनेक नामांकित माणसे तर संभाजीपासून फोडलीच, पण कितीतरी अजिंक्य किल्ले रक्ताचा एक थेंब न सांडता त्याने बसल्या जागी सर केले. तो महाराष्ट्रात आल्यापासून हे थोड्याफार प्रमाणात चालूच होते, पण विजापूर व गोवळकोंडा घेऊन तो पुन्हा महाराष्ट्राकडे वळल्यावर तर ह्या फितुरीची महामारी फारच बळावली.

६ एप्रिल १६८२ रोजी खड्गगडचा जमीनदार चिमणाजी बादशाही सेवेत रुजू झाला. १८ ऑगस्ट १६८२ रोजी संभाजीचा मेव्हणा, शिवाजी महाराजांचा जावई गणोजीराजे शिर्के व येसूबाईचा चुलतभाऊ कान्होजी शिर्के बादशहाला

भेटले. त्यांना पांच हजारी व पाच हजार स्वारांचा मनसबदार करण्यात आले. शिवाजी महाराजांचा दुसरा जावई सखूबाईचा नवरा महादजी निंबाळकर हा पूर्वीपासूनच औरंगजेबाकडे होता. २९–६–१६८३ रोजी शिवाजी महाराजांचा मुन्शी काझी हैदर हा औरंगजेबाकडे आला. १–८–१६८४ रोजी संभाजीचा खास नोकर पुरषा याने मोगलांची चाकरी धरली. ३०–४–१६८५ रोजी संभाजीचा चुलतभाऊ अर्जुनजी भोसले याला दोन हजारी आणि एक हजार स्वार यांचा मनसबदार करण्यात आले. १६८६ च्या सुरुवातीस शिवाजी महाराजांचा तिसरा जावई अचलोजी राजे महाडिक याला पाच हजारी व दोन हजार स्वारांचा मनसबदार करण्यात आले. त्याला नगारे नौबतीचा मान, ध्वज, रत्नजडित अलंकार आणि एक हत्ती या वस्तु भेटीच्या वेळी देण्यात आल्या. बरोबरच आहे आधी शिवाजी महाराजांचा जावई आणि त्यात औरंगजेबाच्या सेवेत सादर झालेला, त्याचे करावे तेवढे कौतुक थोडेच म्हटले पाहिजे.

हे मनसबदार औरंगजेबाकडे गेले आणि राहिले इतकेच. त्यांनी मराठी राज्याचे मुद्दाम नुकसान असे काही केले नाही. नुकसान केले ते मनसबीच्या मोबदल्यात किल्ले विकणाऱ्या किल्लेदारांनी ज्या रामसेजच्या किल्ल्यापुढे खानजहान, शहाबुद्दीन, कासीमखान अशा नामांकित बादशाही सरदारांना नामुष्की पतकरावी लागली, तो रामसेजचा किल्ला नव्या किल्लेदाराला फितुर करून अब्दुल करीम या त्या भागातल्या जमीनदाराने औरंगजेबाला १६८७ मध्ये मिळवून दिला. १६८६ च्या अखेरीस मुल्हेरचा किल्लेदार नेकनामखान याच्या मध्यस्थीने साल्हेरचा किल्लेदार असोजी कृष्णाजी याने साल्हेर मोगलांना दिला. त्याला तीन हजार स्वार आणि दोन हजार जात याची मनसब व त्याच प्रांतांत जहागीर देण्यात आली. औरंगजेबाने त्याला खिलतीची वस्त्रें, नगारे, झेंडा, घोडा, हत्ती व रोख वीस हजार रुपये बक्षीस दिले. नासिक – बागलाण भागात मातबरखानाने १६८८–८९ मध्ये पट्टा, त्रिंबक, हरिशगड त्रिगलवाडी, मदनगड, मोरदत्त, औंढा, कवनी, माहुली इतके किल्ले सर केले. यातला फक्त पट्टा किल्ला तेवढा जिंकून घेतला. बाकी सगळे किल्लेदारांना मनसबी व पैसे देऊन घेतले. 'माहुलीचा किल्ला म्हणजे तळकोकणची राजधानीच' असे मातबरखान म्हणतो. या किल्ल्याचा किल्लेदार द्वारकोजी म्हणाला– 'साल्हेरचा किल्लेदार असोजीप्रमाणे मला मनसब दिली तर मी किल्ला खाली करीन व ४०००० रुपये रोख, १० घोडे, खिलअत इनाम व राहण्यासाठी जुन्नरजवळची दोन गावे वतन म्हणून दिली तर मी स्वत: दरबारात हजेरी देण्यास येईन.' औरंगजेबाने या अटी मान्य केल्या हे सांगणे नकोच. एकूण वतनासाठी इमान विकताना का होईना, हरामखोरीची बिदागी जी एकाला मिळाली तीच दुसऱ्याला मिळाली पाहिजे इतका आग्रह

धरण्याइतकी तरी तत्त्वनिष्ठा माहुलीच्या किल्लेदारात जीव धरून होती याबद्दल त्याचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच.

अचलोजी राजे महाडिक यांच्यासारखे मनसबदार आणि असोजी कृष्णाजी यांच्यासारखे किल्लेदार यांची जी गोष्ट तीच जेधे, सीलीमकर, यांच्यासारख्या छोटया वतनदारांची —कऱ्हेपठार भागात मोगलांच्या सेना आल्यावर चिंचवडकर देवांनी पहिली गोष्ट कोणती केली असेल तर जुन्या आदिलशाही व मोगली सनदांच्या आधारे इनाम मुकरर करून घेतले ही होय. देवाच्या सेवेस वाहिलेल्या चिंचवडकर देवांसारख्या पारमार्थिकांची संचिताबद्दलची ही उदंड आस्था पाहिल्यानंतर जेधे सीलीमकर यांची कथा काय बोलावी ? ते तर बोलून चालून पोटाचे पाईक असलेले प्रापंचिक होते. सर्जेराव जेधे मोगलाकडे गेल्याबद्दल संभाजीने त्याची कान–उघाडणी करणारे कडक पत्र त्याला पाठविले होते व 'एच क्षणी गनिमाबरोबर तुम्हांलाही स्वामी कापून काढतात ' असा दम दिला होता. पण स्वराज्यावर चौफेर मोगलांचा घेरा आला. त्यामुळे आता तोडून लिहून निभणार नव्हते. म्हणून संभाजीने त्याला पुन्हा मवाळीने लिहिले, "तुम्ही गनिमाकडे जाऊन शेवा करिता. कोण्या भरास भरून गेलेत. बरे जे जाले ते फिरोन न ये. परंतु मुसलमानाची सेवा करिता. तुम्हांस कष्ट होतात. सांप्रत स्वामीचे सेवेसी येऊन कार्यभाग करावा. कष्टाची मजुरा होईल. सरफराजी करून घ्यावी. म्हणोन कलो आले. तरी तुम्ही कदीम लोक तुमचा भरवसा. स्वामीचे बहुत अन्न भक्षिले आहेत. क्रिया धरून आणि यावयाचे केले तरी बहुत उत्तम केले. कदाचित गनिमाकडे गेले होतेस त्या गोष्टीकरिता यावयाचा अनमान कराल तरी सर्वस्वी न धरने. बेशक येणे." या पेक्षा मालकाने सेवकाची समजूत किती घालायची आणि नाकदुराया किती काढायच्या !

पण जेधे आला नाही. तो कदीम माणूस. स्वामीचे अन्न त्याने बहुत भक्षिले होते. त्याचा भरवसा. पण तो आला नाही. संभाजीच्या पूर्वीच्या धमकीच्या पत्रानेही आला नाही व आताच्या आर्जवाच्या पत्रानेही आला नाही. त्याला व त्याच्यासारख्या वतनदारांना औरंगजेबाच्या सेनासागरात डळमळणारे मराठी राज्याचे तारू टिकेल असा भरवसा वाटत नव्हता. जहाज बुडू लागले म्हणजे त्याच्यावरचे उंदीर पहिल्याप्रथम पटापट उडया मारून बाहेर पडतात व दुसऱ्या सुरक्षित जहाजावर चढून बसतात. जेधे व त्यांच्यासारखे वतनदार हे या उंदरासारखेच शहाणे व वेळेवर पळ काढणारे होते.

पण किल्लेदारांनी मनसबींसाठी किल्ले विकले आणि वतनदारांनी वतनासाठी मराठी राज्याची सेवा सोडली तरी त्यांनी मराठी राज्याचे एका मर्यादेपलीकडे जाऊन मुद्दाम असे नुकसान तरी केले नाही. ते केवळ तटस्थ आणि उदासीन तरी राहिले. औरंगजेबाच्या पोखरणाऱ्या भेदनीतीचा त्यातल्या त्यात हा सात्त्विक

आविष्कार म्हणावयाचा. पण त्या भेदनीतीचे उग्र आणि तामसी रूप प्रकट झाले ते वाडीकर खेमसावंत, शृंगारपूरचा राम दळवी, फोंडयाचा सावंत आणि कारवार-जवळील काद्रयाचा देसाई यांच्या बाबतीत. पोर्तुगीज-मराठे युद्धानंतर गोव्याच्या गव्हर्नरने संभाजीच्या विरुद्ध असलेले दक्षिण कोकणातील साखळी, पेडणे, डिचोली, फोंडा येथील देसायांना हाताशी धरले. कुडाळचा खेम सावंत हा यांचा पुढारी. यांच्या पदरी सर्वांपेक्षा जास्त म्हणजे दोन हजार सैन्य होते. त्यांत परस्परांच्या साहाय्याने संभाजीच्या प्रदेशावर आक्रमण करावे, व बांद्यापासून अंकोल्यापर्यंतचा जो प्रदेश हस्तगत होईल त्यातले दोन हिस्से पोर्तुगिजास व एक हिस्सा सावंतास मिळावा; तसेच कुडाळपासून चौलपर्यंतचा प्रदेश हस्तगत होईल त्यातील दोन हिस्से सावंतास व एक हिस्सा पोर्तुगीजास मिळावा; सावंताचे मदतीस पोर्तुगीज आरमार जाईल असे ठरले. या कराराप्रमाणे १२ फेब्रुवारी १६८५ रोजी या देसायानी उठाव केला व एकाच वेळी निरनिराळ्या भागात छापा घालून लूट मिळविली. त्यांनी संभाजीची अतोनात नुकसानी केली; व फोंड्याशिवाय दुसऱ्या ठिकाणी त्याचा अंमल राहिला नाही. तोही किल्ला १६८९ च्या जानेवारीत मोगलांनी दुलबा नाईक वगैरे कोकणांतील देसायांच्या साहाय्याने जिंकून घेतला. १६८८ च्या १३ ऑगस्टला हे सारे खेम सावंत, राम दळवी, दुलबा नाईक वगैरे कोकणांतले देसाई औरंगजेबाच्या सेवेत दाखल झाले. खेमसावंताला औरंग-जेबाने १५ डिसेंबर १६८८ रोजी पाच हजार जातीचे व चार हजार स्वार व त्याच्या मुलास दोन हजार जातीचे व हजार स्वार अशी मनसब दिली. आसदखान वजीराने त्याला पाठविलेले फर्मान उल्लेखनीय आहे – "बहादरखान यांनी बादशहा यांच्या मजालसीत विनंति केली, जे संभा खोटा व हरामी याच्या किल्ल्यास व तालुक्यास वेढून यत्न प्रयत्न करून ठाणी तळकोकण आदिलखानी स्थापावयास तुम्ही उमेदवार आहा व सरदेशमुखी परगणे कुडाळची पुरातन प्रमाणे बहाल व्हावी यास्तव ···कृपाळू होऊन पावाल. करार केलेप्रमाणे आपले बरवेपणासाठी ठाणी बसवणे व बादशाहीनिशाणी फत्ते लष्करास खर्चामाफक रसद पोहचविणे आणि आरमारी जहाजाने जलमार्गे नीट येण्याकरिता कोकणामधी बहूत मेहनत करणे." खेमसावंताचे मन औरंगजेबाच्या चाकरीकडे वळविण्याचे महत्कार्य शिवाजीमहाराजांचे जावई व संभाजी महाराजांचे मेव्हणे महादजी निंबाळकर यांनी केले. सावंताला लिहिलेल्या पत्रात महादजी निंबाळकराने 'यासमान दुसरा कोणी नाही' अशी औरंगजेबाची तारीफ केलेली आहे; इतकेच नव्हे तर औरंगजेबाने विजापूरच्या राज्याची जी गत केली तीच मराठी राज्याचीही तो करणार आहे आणि गोवळकोंडयाच्या किंवा भागानगरच्या मोहिमा संपल्या म्हणजे संभाजीचीही खोड तो मोडणार आहे, तेव्हा त्यापूर्वीच खेम सावंत बाद-शहाला मिळाला तर त्याचा फायदा होईल असाही पोक्तपणाचा सल्ला त्याला

दिलेला आहे. त्याप्रमाणे सावंत बादशहाला मिळालाच. त्याचा फायदा कितपत झाला हे माहीत नाही. पण संभाजीचे मात्र अनन्वित नुकसान झाले.

कारण १६८४ त गोव्याच्या गव्हर्नरचा पाठिंबा मिळाल्यापासून कुडाळचा खेमसावंत, शृंगापूरचा राम दळवी व फोंड्याचा दुलबा नायक यांनी पंधरा हजारांजा जमाव करून कारवार व दक्षिण कोकणच्या प्रदेशांत लूटमारीचे सत्र सुरू केले होते. त्यांना काद्रयाचा देसाई मिळाला. त्याने व्यापाऱ्यांना लुटले आणि घरे जाळली. त्यांना आता औरंगजेबाची फूस मिळाल्यानंतर ते फारच बळावले. संभाजीचा अजिंक्य फोंडा किल्ला तर त्यांनी मोगलांना मिळवून दिलाच, पण रस्त्यावरची लूटमार व दरोडेखोरी यांनी व्यापार करणेच अशक्य करून सोडले. पश्चिमेकडचे व्यापारी आपले पदार्थ संभाजीच्या राज्यात विक्रीस आणण्यास भिऊ लागले. कारण अधिकारी जकात तर वसूल करीतच पण त्यांची सरबराई करताना व्यापारी टेकीला येत. इतकेही करून संभाजीच्या राज्यात बंडखोर इतके मातले होते की काडीचीही सुरक्षितता कोणास वाटत नव्हती. व्यापार साफ बसला. प्रजा इतकी हैराण झाली होती की या अभागी देशाला कोणी शास्ता आहे की नाही याचीच शंका येऊ लागली होती. कारवारच्या इंग्रजांनी तर मोठ्या गंभीरपणाने लिहिले की—" संभाजीबद्दल उलट सुलट बातम्या येत आहेत. काही म्हणतात तो जिवंत आहे. कोणी म्हणतात, तो मेला. आमचे मत असे आहे की तो खास मेला असावा. नाहीतर त्याच्या मुलखाचा नाश करणाऱ्या बंडखोरांचा बीमोड करण्यासाठी तो यापूर्वीच इकडे आला असता.' संभाजीविरुद्ध बंड करणारे पुंड लोक आता इतके बळावले आहेत की त्याचा अधःपात जवळ आला आहे असे वाटू लागते." खरे आहे. मराठ्यांचे राज्य, निदान परकीयांच्या दृष्टीने तरी या घटकेला अराजकाच्या उंबरठ्यावर उभे होते. आणि ज्या राष्ट्रात अराजक माजते ते मृतवत् होते हा सिद्धान्त आहे. " मृतं राष्ट्रमराजकम् !"

संभाजी जिवंत आहे की मेलेला आहे असा संभ्रम भल्याभल्यांना पडावा असेच दुर्दैव बिचाऱ्या संभाजीच्या वाट्याला या वेळी आले होते. बाहेरचे अराजक काहीच नव्हे, एवढे अराजक आणि असंतोष त्याच्या मंत्रिमंडळात माजलेला होता. ही गोष्ट संभाजीच्या बाजूने सांगणे न्यायाचे होईल की मुद्दाम आपण होऊन असा अगदी कुलशीलपरंपरा नसलेला मंत्री त्याने मंत्रिमंडळात नेमला नाही. पदांत थोडा फार फरक केला तरी माणसे तीच शिवाजीमहाराजांच्याच वेळची, ती जर मृत्यु पावली —निसर्गनियमाने किंवा राजदंडाने—तर त्यांच्या जागी बहुधा त्यांचे पुत्र किंवा पुतणे नेमले जात. याप्रमाणे पेशवा मोरोपंत पिंगळे मृत्यु पावल्यानंतर त्याचा मुलगा निळो मोरेश्वर याला पेशवा करण्यात आले; फार काय, हे दोघे तुरुंगात असताना सर्व कारभार मोरोपंताच्याच शिक्क्याने त्याच्या मुतालिकामार्फत करवून घेण्याची खानदानी रीत संभाजीने सांभाळली होती. अण्णाजी दत्तो प्रथम

शिवाजी महाराजांच्या वेळेस सचिव होता, त्याला बंधमुक्त केल्यानंतर मज्मू ऊर्फ अमात्यपद देण्यात आले. बाळाजी आवजीकडे वंशपरंपरा चिटणीसपद होते ते तसेच राहिले. हंबीरराव मोहिते याच्याकडे शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून सेनापतिपद होते ते तसेच ठेवण्यात आले. निळो सोनदेव हा शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून राज्यात खपत होता, तो मेला तेव्हा त्याचा मुलगा रामचंद्र नीलकंठ याला सचिवपद देण्यात आले. दत्ताजी त्रिमल यांच्या मृत्यूनंतर त्याची वाकेनिसी त्याचा मुलगा रामचंद्र याला दिली. जनार्दनपंत हणमंते याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा वासुदेव जनार्दन याला सुमंत व डबीर पद दिले. त्याचा दुसरा मुलगा गंगाधर जनार्दन हा शिवाजी महाराजांच्या वेळेपासून कामावर होता. त्याला संभाजीने तसेच कामावर ठेविले. अण्णाजी दत्तोच्या मृत्यूनंतर अमात्यपद रघुनाथ नारायण हणमंते याच्याकडे व त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा नारायण रघुनाथ याच्याकडे दिले. रघुनाथ नारायण हा पंडितराव होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मोरेश्वर रघुनाथ याला ते पद दिले. शिवाजी महाराजांच्या वेळी निराजी रावजी व नंतर त्याचा मुलगा प्रल्हाद निराजी हे न्यायाधीश होते. ते पद त्याच्याकडे संभाजीच्या अखेरीपर्यंत चालू होते. तात्पर्य, मुद्दाम आडवाटेला जाऊन, रूढीला सोडून व परंपरेला धक्का देऊन संभाजीने अगदी नवा असा माणूस अष्ट प्रधानमंडळात नेमला नाही. सामान्यतः बापामागून मुलगा असाच नैसर्गिक क्रम त्याने अबाधित ठेवला. अगदी नवा माणूस त्याने नेमला, तो कविकलश. त्याची नेमणूक त्याने छंदोगामात्य पदावर केली. छंदोगामात्य हा काही राजकीय हुद्दा नव्हे. छंदोगामात्य म्हणजे सामवेदाध्यायी प्रधान...म्हणजे सामवेदाध्यायी ब्राह्मणांची व्यवस्था करणारा अधिकारी याशिवाय वेळ प्रसंगी हरजीराजे महाडिक व केसो त्रिमल पिंगळे हे कर्नाटकातले अधिकारी. केशव भट्ट पंडित व बाल ज्योतिषी संगमेश्वरकर, कवि महेशदास व सोमनाथ भट्ट, रघुनाथ कोरडे व अंतोपाध्ये धर्माधिकारी इत्यादि मंडळींचा संभाजीच्या कारभारात संबंध येत असे. पण त्यांना प्रधानमंडळात अधिकार असे नव्हते. सामान्यतः कुणाच्या भावना न दुखविता, व कुणाच्या वाजवी हक्कास न डावलता संभाजीने रचलेले हे मंत्रिमंडळ त्याच्या व राज्याच्या स्वास्थ्यास पोषक व्हायला वस्तुतः हरकत नव्हती. प्रधान "म्हणजे प्रजापालन धर्मसंरक्षणाचे अध्यक्ष. राजमदजनित अन्यायसागराची मर्यादा. नृपाची विश्रांति व राजबंधू" होत. पण दुर्दैवाने तसे काहीच झाले नाही. त्याचे मंत्रिमंडळ म्हणजे आतल्या आत उफाळणारा वडवानल होता. त्याचा मंत्र्यावर विश्वास नव्हता. मंत्र्यांचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. उलट पराकाष्ठेची धास्ती होती.

कारण, राज्यावर आल्यापासून संभाजीचे आपल्या मंत्र्यांचे बाबतीतले वर्तन त्याच्याबद्दल विश्वास निर्माण करणारे उरलेले नव्हते. पहिल्या फटक्यात त्याने मोरोपंत पिंगळे व निळोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांना तुरुंगात टाकले. पुढे

हरजीराजे महाडिक वगैरे आप्तांनी बोध केला की, 'साहेब सिंहासनाधीश होणार आणि प्रधानांच्या घरी चौक्या' हे विहित नव्हे. तेव्हा संभाजीला ते पटले आणि या बंदिवान् मंत्र्यांना बंधमुक्त करून परत स्थानापन्न केले. पण एका वर्षातच कविकलशाचे बोलणे त्याला पटले आणि अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, शामजी आवजी, आवजी बल्लाळ, सोमाजी दत्तो, व हिरोजी फर्जंद यांना त्याने हत्तीच्या पायी दिले. पण त्या वेळी येसूबाईने केलेल्या कानउघाडणीचा परिणाम त्याच्या मनावर झाला व बाळाजी आवजीचे मुलगे खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ यांना केवळ जीवदानच मिळाले नाही तर खंडो बल्लाळाला वडिलोपार्जित चिटणीशीही मिळाली. गोव्याच्या स्वारीत तर आपला जीव वाचविल्याबद्दल संभाजीने खंडो बल्लाळला अंगावरचा पोषाख, बसता घोडा व पालखी बहाल करून टाकली. राहुजी सोमनाथ, मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत ही मंडळी शिवाजीमहाराजांपासून कारभारात वावरलेली होती. संभाजीच्याही कारभारात होती. पण संभाजीला संशय आल्याबरोबर या मंडळींची तुरुंगात रवानगी झाली ती मरेपर्यंत. प्रल्हाद निराजी हा न्यायाधीश पण कविकलशाने सांगितल्यावरून संभाजीने त्याला पन्हाळ्याला तुरुंगात टाकले. त्याचीही मुक्तता संभाजीच्या मृत्यूनंतर झाली. हे लोक भाग्यवान् म्हणावयाचे की अण्णाजी दत्तो प्रमाणे हत्तीच्या पायाखाली त्यांची मस्तके नारळाप्रमाणे ताडकन् फुटली नाहीत व तुरुंगातल्या बेड्यांच्या 'अलंकारांवरच त्यांची सुटका झाली. पण मागील मंत्र्यांच्या उदाहरणावरून संभाजीबद्दल अशी काही धास्ती त्यांच्या मनाने खाल्ली होती की आपले पद, आपली, प्रतिष्ठा, आपली संपत्ति, आपले जीवित हे आज असले तरी उद्या असेलच याची काही एक शाश्वती वाटत नव्हती. आज अष्टप्रधानांत असलेला अण्णाजी दत्तो उद्या हत्तीच्या पायी जातो, आज सैन्याच्या आघाडीवर दौडणारा मानाजी मोरे उद्या बंदीखान्यात खितपत पडतो–संभाजीची मर्जी क्षणोक्षणी इतकी बदलणारी होती की साबणाने थबथबलेल्या सरळसोट खांबावर चढलेल्या माणसाइतकीच त्याच्या मंत्र्यांना स्वतःच्या भवितव्याबद्दल खात्री वाटत होती. केव्हा तो खूष होईल, केव्हा त्याची मर्जी खप्पा होईल, याचा काही नियमच नव्हता. अशा माणसाने कृपा केली तरी लोक घाबरतात, मग कोप केला तर काय बोलायचे आहे! अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयंकरः!' (ज्याचे चित्त अस्थिर आहे त्याची कृपा सुद्धा भय उत्पन्न करते.)

मंत्र्यांचा ज्याप्रमाणे संभाजीवर विश्वास नव्हता त्याचप्रमाणे संभाजीचाही मंत्र्यांवर काडीमात्र विश्वास नव्हता. विशेषतः शिवाजीमहाराजांच्या परंपरेत वाढलेले मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, प्रल्हाद निराजी, गंगाधर वासुदेव, वासुदेव जनार्दन, जनार्दनपंत हणमंते, रघुनाथपंत हणमंते, राहूजी सोमनाथ यांच्यासारखे जे कारभारी होते, त्यांच्याबद्दल तर त्याचा संशय कधीही मनातून

गेला नाही. कारण आपणाला राज्य मिळू नये, पन्हाळ्यावर बंदिवासात ठेवावे अशा प्रकारच्या योजनेत यांच्यापैकी अनेकांचा उघड व काहींचा प्रच्छन्न भाग होता हे त्याला माहीत होते. यांना अवदाने देऊन आपण संतुष्ट केले तरी यांच्या निष्ठा विकत घेता येणार नाहीत, त्या मनातून आपणाकडे नाहीत हे त्याला माहीत होते. मग असा प्रश्न आहे की इतके माहीत असून संभाजीने या लोकांना मंत्रिमंडळात स्थान कां दिले? तो राजा होता, सेनापति व सैन्य त्याच्या बाजूला होते. या लोकांना मंत्री केलेच पाहिजे अशी काही त्याच्या डोक्यावर कोणी गोणी दिली नव्हती. मर्जीला आले तर तो या सर्वांचे जीव घेऊ शकता किंवा त्यांना आजन्म तुरुंगात ठेवू शकता. मग यातले काहीच न करता त्यांना त्याने मंत्री केलेच का ?

तर्कदृष्टया पाहता, या प्रश्नांची उत्तरे अनेक शक्य आहेत. एकतर संभाजीचा राग मनातून कितीही असला तरी कारणाशिवाय या माणसांची अप्रतिष्ठा करण्यात संभाजीचीच अप्रतिष्ठा जास्त झाली असती. कारण आजपर्यंतची त्यांची पुण्याई एवढी जबर होती की केवळ संभाजी म्हणतो म्हणून लोकांनी त्यांना राजद्रोही म्हटले असते इतके ते सोपे नव्हते. लोकमताचा कल, संभाजीलासुद्धा, राजा झाला तरी पाहणे भाग होते. दुसरे असे की, संभाजी हा उग्रप्रकृति असला तरी क्रूर नव्हता. आरोप सिद्ध झाल्याशिवाय, निदान त्याला तसे वाटल्याशिवाय, केवळ द्वेष किंवा लहर म्हणून त्याने कोणाचाही जीव घेतला नाही. ती मराठ्यांची परंपराच नव्हती. "मराठियांच्या राज्यात तो दगा होणार नाही." आणखी असे की संभाजी हा स्वभावतःच दिलदार व उदार होता. खंडो बल्लाळाच्या बापाला त्याने हत्तीच्या पायी दिले, पण त्याच्या मुलाला अंगावरचा पोषाख सुद्धा बक्षीस दिला. जातिवंत शिपाईगडी असलेला हा संभाजी दोन घ्यावे दोन द्यावे अशा क्षमाशील वृत्तीचाच होता. म्हणूनही त्याने या मंत्र्यांना परत पूर्वपदे दिली. पण तरीही त्याच्या मनातला संशय कधी गेला नाही. मंत्री तर आहेत, कामे तर त्यांच्याकडून करवून घेत आहोत, त्यांची योग्यता तर मान्य आहे, पण त्यांच्या-बद्दलचा संशय तर जात नाही अशी संभाजीची अत्यंत अस्वस्थ मनोवृत्ति असावी असा तर्क आहे. धड जोडता येत नाही, धड तोडता येत नाही, या यातना केवढ्या असाव्यात ! 'But, O, what damned minutes tells he o'er who dotes yet doubts suspects yet strongly loves !' ('किती दुर्दैवी त्याचे क्षण जात असतील की जो प्रेम करतो पण संशयही घेतो, संशय घेतो तरीही प्रेम करतो.') अशा विचित्र परिस्थितीत संभाजीपुढे मंत्री तर ठेवायचे, पण त्यांच्यावर विश्वास तर ठेवायचा नाहीं एवढा एकच पर्याय होता. रूढीही सांभाळायची व स्वतःलाही सांभाळायचे तर 'न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्ते नातिविश्वसेत् ।' या शहाण्या उपदेशाप्रमाणे वागण्याशिवाय उपायच नव्हता. पण माणूस पोकळी सहन

करू शकत नाही. तो एकाकी राहू शकत नाही. त्याला अंतःकरण उघडे करायला, आधार घ्यायला, विश्वास ठेवायला माणूस लागतो. संभाजीच्या बाबतीत असा माणूस म्हणजे कविकलश होता.

संभाजीच्या जीवनात कविकलशाचे स्थान केवळ अनन्यसाधारण आहे. १६७८ साली शृंगारपूरला संभाजी असताना कविकलशाने त्याला राज्यप्राप्तीसाठी 'कलशाभिषेक' केला. तंत्रमार्गात तो संभाजीचा गुरु होता. त्याच्या उपदेशामुळे व तंत्रमार्गामुळे आपणाला राज्यप्राप्ति झाली व तांत्रिकांची आराध्यदेवता काली हिच्या आराधनेमुळे आपणास पुत्रप्राप्ति झाली असा संभाजीचा दृढ विश्वास होता. ह्या तंत्रमार्गावरील श्रद्धेमुळेच राज्यप्राप्ति झाल्याबद्दल संभाजीने कुडाळचे श्रेष्ठ मांत्रिक महाशय बाकरे यांना दहा हजार सुवर्णमुद्रांचे वंशपरंपरा दान दिले. ज्या संगमेश्वर शृगारपूरच्या परिसरांत तांत्रिकांची व कविकलशाची वसती होती, त्यातल्या केशवभट पुरोहितासारख्या आपणास कलशाभिषेक करणाऱ्या तांत्रिकांना संभाजीने आश्रय दिला. या मार्गाकडे प्रवृत्त करणारा कविकलश हा संभाजीचा धार्मिक व आध्यात्मिक मार्गदर्शक होता.

एवढेच नव्हे. तो त्याचा मित्र आणि सल्लागारही होता. दिलेरखानाविरुद्ध संभाजीचे मन प्रोत्साहित करण्यात कविकलशाचा भाग मोठा होता असे खुद्द संभाजीनेच बाकरे महाशयांना दिलेल्या दानपत्रात नमूद केले आहे. स्वतः राजा झाल्यानंतर संभाजीने छंदोगामात्याचे पद देऊन कविकलशाला अष्टप्रधानात स्थान दिले. पण एवढ्याने संभाजीला मित्रऋण म्हणा किंवा आचार्यऋण म्हणा पुरेसे फिटले असे वाटले नाही. त्याने त्याला वाकेनिसी दिली व दाभोळचा सुभा त्याचेकडे ठेविला.

एवढ्यावरच भागले नाही. संभाजीच्या कारकिर्दीतील असा जवळजवळ एकही महत्त्वाचा प्रसंग नाही की ज्यात कविकलशाचा संभाजीने मुद्दाम समावेश केलेला नाही. १६८० च्या जूनमध्ये संभाजीने स्वतःला रायगडावर राज्याभिषेक करून घ्यावा असा सल्ला कलशाने त्याला दिला. १६८२ मध्ये जंजिऱ्याच्या सिद्दीवर स्वारी करण्याची कारवाई कविकलशाची होती असे बखरी म्हणतात. जंजिरा घ्यावा हा मनोदय संभाजीचा, तेव्हा "ते समयी कबजीचे मारफतीने दादजी रघुनाथ देशपांडचे प्रभू महाडकर यांणी जंजीरा घेऊन देतो म्हणून बोलणे लाविले. तेव्हा जंजीरा घेणेविशी मसलत करावी हा मनातला खंबीर, त्यात कबजीचे राजकारण, जंजीरा घेऊन दिला म्हणजे मजमू अमात्यपद द्यावे असा यादीवर करार करून देऊन....दादजी देशपांडचे रवाना केले." १६८२ च्या डिसेंबरात संभाजीने जयपुरच्या रामसिंगास पत्रे लिहिली त्यांतही अकबराच्या बाबतीत पुढील उठावणीविषयी लिहिताना संभाजी म्हणतो– 'माझे मंत्री कविकलश व जनार्दन पंडित हे तुम्हांला सविस्तर असे वेगळे लिहीत आहेत.' अकबराला आश्रय

देण्याची संभाजीला मुळीच इच्छा नव्हती. त्याच्या पत्रांना त्याने उत्तरेही पाठवली नाहीत. पण कविकलशाने संभाजीस सांगितले की औरंगजेबाचा मुलगा आपल्याकडे आला आहे तेव्हा त्याचा आपण फायदा घ्यावा. तेव्हा संभाजी रागावून म्हणाला, 'तुम्हांला योग्य वाटेल ते करा.' पुढे संभाजीने कविकलशाला जे योग्य वाटेल ते केले म्हणजेच अकबराला आश्रय दिला हे प्रसिद्धच आहे. इंग्रजांशी १६८४ च्या मेमध्ये संभाजीने मैत्रीचा तह केला, तेथेही कविकलश आहेच– 'ज्या ज्या वेळी आमचे प्रीतीतील कविकलश किंवा आमचे वकील तुम्हांस लिहितील त्या त्या वेळी आपण त्याची नीट दखल घ्यावी.' १६८३ च्या डिसेंबरात पोर्तुगीजाशी तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या तेव्हाही त्याचे सर्वाधिकार कविकलशाकडेच सुपूर्द केले होते– 'संभाजीराजे रायगडास गेले व कविकलशास 'कुल येख्तियार' दिला !'– 'कविकलश अकबरास घेऊन भीमगडाचे झाडीत गेले. फिरंगीयासी सल्ला केला.' कविकलश रायगडच्या बचावासाठी रणांगणही गाजवी. '१६८५ जानेवारी १४– शाब्दीखान पुण्याहून दौड करून बोरघाट उतरून गांगोलीस आला. तेथे कविकलशाने जाऊन भांडण दिल्हे. फिरोन घाटावरी घातला.' विजापूरला मदत करण्याचा प्रश्न आला· तेथेही पुन्हा कविकलशच– 'संभाजीराजे यांनी विजापूरचे मदतीस कवजीस पाठविले. ते जाऊन पनाळा राहून फौजा रवाना केल्या.' फार काय सांगावे, मोरेश्वर रघुनाथ मेल्यानंतर केशवभट पुरोहितास 'पंडितराव' पद मिळाले, तेही त्याच्याबरोबर कविकलश पाहू लागला.

बखरीत म्हटले आहे – 'दिवसेंदिवस कबजीचे स्वाधीन अधिकच होत चालले इतबार मनसबा सर्व त्याचेच स्वाधीन, कोणीही पुरातन राज्यातील इतबारी त्याची प्रतिष्ठा ठेवावी अथवा मसलतीत घ्यावा हे गोष्ट राहिली·' बखरकार म्हणतो ते सर्व अप्रमाण कारण त्याचा उद्देशच मुळी बिचाऱ्या संभाजीची बदनामी करण्याचा आहे, असे जरी क्षणभर धरून चालले, तरी आतापर्यंत दिलेले अस्सल पुरावे काय बरे दर्शवितात? त्यातही काही तर खुद्द संभाजीच्या स्वदस्तुरच्या पत्रांतील वाक्ये आहेत. ते हेच दर्शवितात की इंग्रजांसारख्या परक्या लोकांना शुद्ध व्यवहारी पत्र लिहिताना ज्याचा 'आमच्या प्रीतीतील कविकलश' असा काहीसा भावनोत्कट उल्लेख संभाजी करतो, ज्याला तो तहाच्या वाटाघाटीच्याही बाबतीत 'कुल येख्तियार' देतो; ज्याला तो विजापूरला फौजा पाठवायला सांगतो, तो कविकलश हा संभाजीचा केवळ कंठमणि होऊन बसला होता. तो त्याचा गुरु होता, तो त्याचा मित्र होता, तो त्याचा सचिव होता सेनापति होता. छंदोगामात्य होता, विदेशमंत्री होता आणि स्वदेशमंत्रीही होता. तो संभाजीचा खरोखर काय नव्हता हेच सांगणे कठीण आहे.

इतका विश्वास संभाजीने कविकलशावर कां टाकावा किंवा निराळ्या भाषेत तो त्याच्या इतक्या आहारी कां गेला हे समजणे तर्कशक्तीच्या पलीकडे आहे.

शक्यता आहे की कविकलश हा महाराष्ट्राला सर्वस्वी परका होता म्हणूनच संभाजीला तो सर्वस्वी आपला वाटला. तो उत्तर प्रदेशातला कनोजी ब्राह्मण, हिंदी कवि, शाक्तपंथाचा उपासक, त्याची जात, त्याची भाषा. त्याची उपासना या सर्व गोष्टी मराठी संस्कृतीला परक्या होत्या. अगदी खालपासून संभाजीने त्याला वर आणले होते. त्याला दाभोळचा सुभा, अष्ट प्रधानांतले स्थान हे सारे संभाजीने दिले होते, संभाजीला जितके कवि कलशाने घडविले होते तितकेच संभाजीने कवि कलशाला घडविले होते. अशा माणसाच्या निष्ठा दुभंगलेल्या नसतात. कारण तो एकाकी असतो व त्याला दुसरा आधार नसतो. अगदी कविकलशासारखीच अशी स्थिति संभाजीची त्याच्या मंत्रिमंडळाच्या बाबतीत होती. दोघांनाही कोणीच नव्हते म्हणून दोघेही एकमेकांच्या जवळ आले. संभाजीचे इतर मराठी मंत्री असे नव्हते. त्यांची मुळे मराठी मातीत खोलवर रुजलेली होती. त्यांना काही संभाजीने वर आणले नव्हते. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून ते किंवा त्यांचे वाडवडील स्वराज्यात अधिकारावर होते. त्यांना लोकांत निश्चित स्थान होते. त्यांच्या निष्ठा संभाजीच्या दृष्टीने तरी संशयातीत नव्हत्या. म्हणून आपण वाढवलेला माणूस म्हणून कविकलशाबद्दल संभाजीला 'आपलेपणा' वाटणे साहजिक आहे. यातच कविकलशाभोवती असलेले तंत्रमार्गाचे गूढ वलय मिळविले म्हणजे तरुण संभाजीच्या भावनाप्रधान व श्रद्धाशील मनावर कविकलशाचे वर्चस्व कसे बसले याची काहीशी उपपत्ति लागू शकते.

पेशवाईत पेशव्याला लिहिताना छत्रपति 'समस्त कार्यधुरंधर विश्वासनिधि असा मायना वापरीत असत. तो एक प्रधात होता. आणि तो एक शिरस्ता होता. पण संभाजीच्या बाबतीत लक्ष्यार्थाने नव्हे. पण व्यङ्ग्यार्थाने नव्हे तर अगदी वाच्यार्थाने कविकलश हा 'समस्त कार्यधुरंधर आणि विश्वासनिधि" होता. आत खरोखरच तो 'समस्त कार्यधुरंधर' होता काय, त्याला मराठ्यांची भाषा व पूर्वपरंपरा यांचे कसलेही ज्ञान नसताना, तो रणांगणावरच्या सेनापतीचे, परराष्ट्रमंत्र्याच्या पत्रव्यवहाराचे, आणि तहाच्या वाटाघाटीचे काम सारख्याच साक्षेपाने करण्याइतका सर्वज्ञ होता काय हा एक मोठा प्रश्न आहे, या प्रश्नाचे वस्तुनिष्ठ उत्तर अर्थातच नास्तिपक्षी आहे; कारण 'न हि सर्वः सर्वं जानाति' (सर्वांना सर्वच येत नाही) हा नियम प्रसिद्ध आहे व म्हणूनच मंत्र्यांमध्ये निरनिराळी खाती वाटून दिलेली असतात. पण संभाजीची कविकलशाकडे पाहण्याची दृष्टि मुळी तो जसा आहे तसा पाहणारी वस्तुनिष्ठ नव्हतीच. ती सर्वस्वी व्यक्तिनिष्ठ होती. तो त्याला जसा वाटला तसा तो होताच असा त्याचा ग्रह होता. 'यदेव रोचते यस्मै भवेत् तत्तस्य सुन्दरम् ।' (ज्याला जे आवडेल ते त्याच्या दृष्टीने सुंदरच असते.) सौंदर्याप्रमाणे प्रीतीही व्यक्तिनिष्ठच असते, म्हणूनच 'आमच्या प्रीतीतील कविकलश' हा संभाजीच्या प्रीतीचे, भक्तीचे, आदराचे स्थान होऊन बसला होता. यामुळेच

संभाजीनें त्याच्याजर जितका विश्वास टाकला तितका कोणावरही टाकला नाही. 'दर्शितानि कलत्राणि गृहे भुक्तमशङ्कवत् । कथितानि रहस्यानि सौहृद किमतः परम् ॥' 'घरातल्या स्त्रिया दाखविल्या. घरी निःशंक मनाने भोजन केले, रहस्ये सांगितली. मैत्री ती यापेक्षा जास्त काय असायची ?' असे अनन्यसामान्य सौहृद कविकलशाबद्दल संभाजीस वाटत होते.

असा हा राजा आणि असा हा त्याचा मंत्री—यांच्याबद्दल इतर मंत्र्यांना काय वाटत असेल याची सहजच कल्पना करता येईल. ज्या प्रमाणात संभाजीने कवि कलशावर विश्वास टाकला, त्याच प्रमाणात इतर मंत्र्यांवर अविश्वास दाखविला. आणि आपणावर राजाचा विश्वास नाही याचा इतर मंत्र्यांना केवढा अपमान वाटला असेल याची कल्पनाच केलेली बरी. एवढच नव्हे तर, कविकलशाबद्दल त्यांच्या मनात पराकाष्ठेची असूया निर्माण होणे साहजिक आहे. आमच्यात असे काय कमी आहे व या कनोजा भिक्षुकात काय असे जास्त आहे की काही पूर्वपरंपरा नसताना याने एकदम यावें व राजाच्या गळ्यातील ताईत बनावे आणि आम्ही मात्र सदैव उपेक्षितच राहावे ? ही गोष्ट लक्षणीय आहे. की या कारभाऱ्यांपैकी अनेकजण—शकराजी नारायण, रामचंद्र निळकंठ, प्रल्हाद निराजी—यांनी संभाजीनंतरच्या काळात कर्तृत्वाचे पर्वत करून दाखविले. पण संभाजीच्या काळात त्या मानाने त्यांनी फारसे उल्लेखनीय कार्य केले नाही. कविकलशाच्या 'सावटा'मुळे जणू काही सर्व मंत्रिमंडळाच्या कर्तृत्वावर एक प्रकारचा 'कालिमा' आलेला होता. त्यांचे कर्तृत्व दडपून गेले होते. हे कर्तृत्ववान् मंत्री आपणास वाव नाही म्हणून कविकलशावर जळफळत नसतील काय ? इतकेच नव्हे, ज्या प्रमाणात कविकलश संभाजीची निरनिराळी कार्ये करू लागला. त्या प्रमाणात इतर मंत्र्यांच्या कार्यक्षेत्रात त्याची ढवळाढवळ वाढू लागली. राजा रामसिंगाला पत्रे लिहिण्याचे काम, इंग्रजांशी तह करण्याचे काम वस्तुतः डबीर किंवा सुमंत—जनार्दनपंत हणमंते किंवा त्याचा मुलगा वासुदेव जनार्दन याचे होते. तेथे कविकलश कशाला हवा? जंजिऱ्यावरची स्वारी हे पेशव्यांचे, सुमंताचे, सेनापतीचे काम. तेथे कविकलशाची काय जरूर ? विजापूरला सैन्य पाठविण्याचे काम पेशवा व सेनापती यांचे; तेथे कविकलशाची ढवळाढवळ कशाला ? पोर्तुगीज—मराठे संग्रामात लढला पेशवा निळोपंत पिंगळे, पण तहाच्या वाटाघाटी करण्याचा 'कुलयेख्तियार' मात्र संभाजीने दिला कविकलशाला ! कोणत्याही स्वाभिमानी माणसाला असल्या वाहचात हस्तक्षेपाची चीड आली नाही तरच नवल. 'कविकलश व शहाजादा अकबर यांनी फिरंग्याशी संभाजीतर्फे केलेला तह पेशव्यास मुळीच रुचला नाही. पेशवा कविकलशाचा अंतःस्थ द्वेष करी व सदरहू तह कविकलशाच्या प्रेरणेने झाल्यामुळे तो पाळला जाऊ नये अशी पेशव्यांची इच्छा असावी !' असे एका तत्कालीन पोर्तुगीज सरदाराने लिहिले आहे. कविकलशावरील आपल्या विश्वासाचे व प्रेमाचे अस जाहीर प्रदर्शन

करताना आपण आपल्या इतर सहकाऱ्यांना किती दुखवीत आहोत याचा विचारही संभाजीच्या मनात येऊ नये, याचा मोठा चमत्कार वाटतो.

एवढेच नव्हे, याहूनही अधिक आहे आणि ते जास्त गंभीर आहे. संभाजीच्या मंत्र्यांना कविकलशाबद्दल केवळ मत्सर किंवा असूया नव्हती, तर द्वेष आणि भीति होती. आपल्या हालचालींवर पाळत ठेवायला हा हेर संभाजीने नेमलेला आहे आणि हा संभाजीला काय जाऊन सांगेल आणि कोणत्या क्षणी आपण स्वातंत्र्याला, संपत्तीला आणि जीविताला मुकू याची विवंचना केसाने टांगलेल्या तलवारीप्रमाणे, अहोरात्र त्यांच्या मस्तकावर, लटकत होती. कारण कविकलशाचे पूर्व चरित्रच तसे होते. त्याच्या शब्दाने भल्याभल्यांचे सर्वस्व जाऊन ते प्रसंगी प्राणालाही मुकले होते. कारण कलशाचा शब्द हे संभाजीला वेदवाक्य होते, आप्तवाक्य होते. १६८१ च्या ऑगस्टात 'संभाजीराजांनी कविकलशाच्या बोले अण्णाची दत्तो सचीव याजवर इतराजी करून मार दिल्हा त्या माराने राजश्री अण्णाजीपंत व बाळप्रभु, सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जद परळीखाले कैद करून मारिले.' यानंतर तीन वर्षांनी परत संभाजीचा रुद्रावतार प्रकट झाला. १६८४ ऑक्टोबर २९ मानाजी मोरे व गंगाधर पंत व वासुदेवपंत, राहुजी सोमनाथ यांस संभाजीराजांनी कैद केले. यांची कैद संभाजीच्या मृत्युपर्यंत होती. याही प्रसंगी प्रेरणा कविकलशाची असावी असा संशय येतो. बहुधा इतर मंत्री व कविकलश यांचा संघर्ष असेल किंवा यापेक्षा आणखी काही खोल कारण असेल. कारण यानंतर तीनच महिन्यांनी संभाजीला पाठविलेल्या पत्रात अकबराने कविकलशाबद्दल जे उद्‌गार काढले आहेत ते चिंतनीय आहेत – "मोगल उतरून आले. या वेळी कविकलश यांनी ठाण मांडून झुंज दिली हे महमूदखान व खिदमत फरस्तखान यांच्या लिहिण्यावरून कळले. कविकलश हा आपला उत्कृष्ट एकनिष्ठ सेवक आहे. कुणाच्या मत्सराने त्याचा नाश होईल असे परमेश्वर न करो. कविकलशावर आपली कृपा राहावी व आपण त्याचे कल्याण करावे हे योग्य होय,' महाराष्ट्रात सर्वस्वी परका असलेल्या कविकलशाची संभाजीकडे शिफारस करायला एकही मराठी मंत्री तर राहोच पण मराठी माणूसही मिळू नये, ते काम त्याच्या सारखाच परदेशी व वनवासी अकबराच्या वाट्याला यावे या गोष्टीत बराच अर्थ आहे. अकबराच्या पत्रावरून त्याचा कोणी मत्सर करीत होते, व त्याच्या नाशाची खटपट करीत होते, पण संभाजीने त्याच्यावर कृपा केली असे दिसते. संभाजीला हा सल्ला देण्याचे अकबराला मुळी कारणच नव्हते. कारण अशा संघर्षात संभाजीचा संरक्षण करणारा अभयहस्त नेहमी कविकलशासाठी सिद्धच असे म्हणून असा तर्क करावासा वाटतो की प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत, राहुजी सोमनाथ या प्रतिष्ठित कारभाऱ्यांना बंदिखान्याची हवा खाण्याचा सुयोग पुन्हा 'कविकलशाच्या बोले' आला असावा. यानंतरचा प्रल्हाद निराजी न्यायाधीश याच्या अटकेबद्दलचा उल्लेख स्पष्टच

आहे – ' १६८८ नोव्हेंबर-डिसेंबर. संभाजीराजे यांनी कलशाच्या बोले प्रल्हादपंत व सर कारकून व कितेक लोकांस धरले.' अशाप्रकारे अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद, सोमाजी दत्तो यांच्यासारखे धुरंधर कारभारी केवळ कवि कलशाच्या सांगण्यामुळे संभाजीने जिवे मारले. गंगाधरपंत, वासुदेवपंत, मानाजी मोरे, राहुजी सोमनाथ व प्रल्हाद निराजी यांच्या सारख्यांना त्याच्या सांगण्यावरून कैदेत टाकले. सदैव आपणाविरुद्ध राजाच्या कानात विष ओतणारा हा 'कर्णेजप' माणूस मंत्रिमंडळाच्या दृष्टीने त्याच्या राशीला आलेला पापग्रह होता. एक अकबर सोडला तर संभाजीच्या एकाही मंत्र्याचा एकही चांगला उद्‌गार कवि-कलशाबद्दल नमूद नाही.

'न क्षमं भवति तत्त्वविचारे मत्सरेण हतसंवृत्तिचेतः ।' (मत्सराने विवेक नष्ट झाला म्हणजे खऱ्याखोटयांचा निवाडा करता येत नाही.) या न्यायाने मंत्री केवळ मत्सराने अंध झाले होते असे म्हणून या प्रकरणाची वासलात लावता येणार नाही. कारण ऐतिहासिक नोंदीसुद्धा हीच वस्तुस्थिति दाखवितात. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यावर आलेले सर्वांत मोठे संकट म्हणजे औरंगजेबाच्या आक्र-मणाचे होते; आणि त्याची जबाबदारी औरंगजेबावर नव्हती किंवा संभाजीवरही नव्हती; ती जबाबदारी होती कविकलशावरती. महाराष्ट्रावर आक्रमण करण्याची औरंगजेबाची केवढीही इच्छा असली तरी, रजपुतांशी चाललेले युद्ध तडकाफडकी बंद करून तो काही महाराष्ट्रात आला नसता; कारण आरंभलेले कार्य शेवटास नेणे– 'आरब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम्' हे बुद्धिलक्षण औरंगजेबात पुरेपूर भिनले होते. तो आला तो अकबराला संभाजीने स्वराज्यात आश्रय दिला म्हणून, आणि 'इन्द्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायाने आश्रित अकबर आणि आश्रय-दाता संभाजी या दोघांचीही आपल्या क्रोधाग्नीत आहुति द्यावी म्हणून. पण अकब-राला आश्रय द्यावा हे संभाजीचे मत नव्हतेच. त्याने अकबराच्या दोन पत्रांना उत्तरेच दिली नाहीत. आपल्या राज्यांत त्याचे आगंतुक पाहुण्याप्रमाणे येणे त्याला बिलकूल आवडले नाही. कारण 'अज्ञातकुलशीलस्य वासो देयो न कस्यचित्' ही राजनीति त्यालाही कळत होती. अकबराला आश्रय द्यावा ही मसलत कविकल-शाची होती. ती ऐकून संभाजी फार रागावला. पण कविकलश त्याच्या 'फार प्रीतीतला' त्यामुळे अखेर संभाजीचे सारे शहाणपण त्याच्यापुढे पेंड खाऊ लागले. तात्पर्य, कविकलशाचा बदसल्ला आणि संभाजीची परप्रत्ययनेय बुद्धि यामुळे स्वराज्यावर हे घोर संकट ओढवले गेले.

'अजितोदय' या समकालीन संस्कृत ग्रंथात म्हटले आहे की,' अकबराच्या दोन्ही पत्रांना संभाजीने उत्तर धाडले नाही. तो आपल्या राज्यात आल्याचे कळताच त्याला आश्रय द्यावयास संभाजी तयार नव्हता. औरंगजेबाचा मुलगा आपल्याकडे आला आहे तेव्हा त्याचा आपण फायदा घ्यावा असे कविकलशाने

संभाजी महाराजांस सांगितले. कविकलशाचा हा सल्ला संभाजीस पसंत नव्हता· ते रागावून त्यास म्हणाले, की तुम्हांस योग्य वाटेल ते करा.'

बरे, दुर्दैवाने संकट ओढवून घेतले तर निदान त्याचा मुकाबला करण्यात तरी शहाणपणा असावा ! तो मार्ग रामदासस्वामींनी सांगितला होता. बहुत लोक मिळवावे । एक विचारे भरावे । कष्ट करोनी घसरावे । म्लेंच्छावरी ।। पण संभाजीच्या कारभारात त्याची प्रचीती यावी तशी येत नव्हती. त्याचे निरनिराळे मंत्री होते आणि त्यांच्याकडे तो कामेही देत होता, पण प्रत्येक मंत्र्याची तंगडी सामान्यतः कविकलशाच्या तंगडीत अडकवून ठेवली होती; मग तो परराष्ट्र मंत्री म्हणजे सुमंत असो, पेशवा असो, मुजुमदार असो की सेनापति असो. याचा स्पष्ट अर्थ असा होता की संभाजीचा आपल्या मंत्र्यांवर विश्वास नव्हता, म्हणून त्याच्या डोक्यावर तो कविकलशास बसवीत होता; कविकलश त्यांच्या कामात ढवळाढवळ करीत होता व संभाजीला ते चालत होते.

उदाहरणार्थ, १६८२ त जयपूरच्या रामसिंगाला पत्र लिहिले त्यात संभाजी म्हणतो– 'माझे मंत्री कविकलश व जनार्दन पंडित (सुमंत) हे तुम्हांस सविस्तरपणे वेगळे पत्र लिहीत आहेत.' १६८३ डिसेंबर पोर्तुगीजांशी वाटाघाटी करण्याच्या बाबतीत कलशास कारभाराचा अध्यक्ष म्हणजे 'कुलयेख्तियार' नेमले. हे पेशवा निळो मोरेश्वर याला बिलकूल आवडले नाही. पोर्तुगीजांच्या उत्तरेकडील अधिकाऱ्यांनी लिहिले की 'कविकलशाने ठरविलेला तह मान्य होऊ नये म्हणून पेशव्याने काही प्रश्न उपस्थित केले आहेत त्याने उत्तरेकडील जिंकून घेतलेला प्रदेश अद्याप सोडलेला नाही.' १६८४ एप्रिल इंग्रजांशी तह करिताना, प्रल्हाद निराजी व कविकलश यांची नेमणूक केली होती. पण त्याही वेळी संभाजी मुंबईचा गव्हर्नर केजविन यास लिहितो– 'ज्या ज्या वेळी आमचे प्रीतीतील कविकलश किंवा आमचे वकील तुम्हांला भेटतील त्या त्या वेळी आपण त्यांची नीट दखल घेत जावी.' कविकलश सेनापतीचीही कामे करीत असत. १६८५ जानेवारी कविकलशाने शाबदीखानास गांगोलीहून माघारी परतविले. जून/जुलै १६८५ त संभाजीने आदिलशहास मदत करण्यास कविकलशास पाठविले. त्याने पन्हाळचास जाऊन तेथून फौजा रवाना केल्या. अर्जोजी यादवांच्या कऱ्हाड उंब्रजच्या देशमुखी वतनाचे काम सचिवाचे किंवा मुजुमदाराचे. पण तेथेही जळी स्थळी काष्ठी पाषाणी असल्याप्रमाणे कबजीबाबा आहेतच ! अर्जोजी यादव म्हणतो– (संभाजीराजे म्हणाले– 'कैलासवासी स्वामींनी वतन दिले ते आम्हीही दिल्हे असे. राजश्री कबजीबाबा पन्हालेस आहेत. त्यांची व साहेबांची भेट जालियावरी पत्रे करून देऊ म्हणोन बक्षिसाचे होन ५००० पोता घेतले.' अशा प्रकारे राजाला व आपणाला सारखेच निर्माल्यवत् करून टाकणारे हे राजश्री कबजीबाबा हेच राज्यावरचे मोठे संकट आहे असे मंत्र्यांस वाटले तर त्यात नवल काय !

एवढेच नाही 'वर्ततो सिकविल्या बोले । तो प्राणी म्हैसमंगळू' असा आपला राजा आणि त्याचा सल्लागार कविकलश यांच्यामूळे आपले कार्यक्षेत्रच नव्हे तर जीवित सुद्धा धोक्यात आहे असे मंत्र्यांना वाटले, तर ते वाजवी होते कारण पूर्वानुभव तसाच होता– '१६८१ ऑगस्ट सप्टेंबर– कविकलशाच्या बोले मागती अण्णाजी दत्तो सचीव याजवर इतराजी करून मार दिल्हा त्या माराने राजश्री अण्णाजी पंत, बाळ प्रभु व सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जंद परळीखाले कैद करून मारिले.'.... '१६८८ नोव्हेंबर– संभाजीराजे यांनी कलशाच्या बोले प्रल्हादपंत व सरकारकून व कित्येक लोकांस धरिले.'

म्हणून, आपले राज्य, आपला राजा आणि आपण स्वत:, या सर्वांवर ही जी अनर्थ परंपरा कोसळली आहे, तिचे मूळ दुसरे तिसरे कोणी नसून, हा कविकलश आहे, आणि त्याचा समूळ उच्छेद केला पाहिजे असे जर मंत्र्यांना वाटले, तर त्यात मनुष्यस्वभावाविरुद्ध किंवा राजनिष्ठेविरुद्ध काही आहे, असे नाही.

तात्पर्य, ह्या माणसाच्या संगतीने संभाजी अनेक अर्थांनी वाममार्गाला लागलेला आहे, याच्या हातात आपले जीवित, वित्त व प्रतिष्ठा यांची क्षणाचीही शाश्वती नाही, या भावनांच्या पोटी कविकलशाबद्दल पराकाष्ठेचा द्वेष व पराकाष्ठेची भीति हीच मंत्र्यांची भावना होती. भर्तृहरीच्या शब्दात कविकलश हा 'नृपांगण-गत: खल:' (राजाच्या परिसरातला दुष्ट) होता.

संभाजी हा जात्या उग्र प्रकृति होता. संशय व संताप यांच्या आवेगात तो सापडला म्हणजे त्याचा सारासार विचार पार नष्ट होत असे व माणसाचे वय, त्याचे कर्तृत्व, त्याची प्रतिष्ठा यांचा कसलाही मुलाहिजा न ठेवता तो त्याची इज्जत घेत असे, प्रसंगी जीवही घेत असे. रघुनाथपंथ हणमंते, कर्नाटकाचा सुभेदार याची केवढी प्रतिष्ठा खुद्द शिवाजी महाराजांनी राखली. 'वरकड मनुष्ये आमचे संपादिल्याची परंतु तुम्ही वडिलोपार्जित सेवक. आम्ही चुकलो असता शासन करून सन्मार्गास लावणार. अशी योग्यता व उपमा दुसरियांस येणे नाही. आपण आम्हांस महाराजांचे ठायी म्हणोन आमचे कल्याणाची इच्छा ठेवता. वर-कडास हे इच्छा ठेवणे कारण काय? आपणासारिखे आपण एक' असे शिवाजी महाराजांचे त्यांच्या विषयी उद्‌गार आहेत. पण आपल्याला राज्य मिळू न देण्याचा कट करण्यात रघुनाथपंताचे अंग आहे असा संभाजीला नुसता संशय येण्याचा अवकाश, आपला प्रत्यक्ष बाप ज्याला बापाच्या ठिकाणी मानत होता, त्या या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध सेवकाला त्याने जिंजोला दोन वर्षे कैदेत ठेवून दिले. पुढे त्याला सोडले, मजमू दिली, पण पंताला काय कमी होते की जे संभाजी त्याला देईल? त्याला चिंता होती स्वराज्याची त्याच्यासाठी तो आला होता– 'राज्य दिवसेंदिवस वृद्धी व्हावी ते कमीच होत चालले याचे

कारण काय? हबशी वगैरे पुंड पाळेगार बळावत चालले हे काय? लोक बेदील, कित्येक ब्राह्मण वगैरे सरदार अन्यायी तरी त्यास बेडचा घालून किल्ल्यावर ठेवून मारावे ते शिरच्छेद करून कर्ते मारिले. असो. पुढे सबळ शत्रु औरंगजेब येऊन भिडला याचा विचार काय केला आहे?' पण पंतांच्या प्रश्नांना द्यायला संभाजी-पाशी उत्तरच नव्हते. रघुनाथपंत बिचारा 'कबजीसारखे प्रमख तेव्हा राहणे ठीक नाही' म्हणून दुःखाने परत कर्नाटकाकडे निघाला. पण वाटेतच मृत्यु पावला. रघुनाथपंताप्रमाणे त्याचा भाऊ जनार्दनपंत हणमंते हाही कर्तृत्ववान् होता. कारवार, कोप्पळ, पन्हाळा हे सुभे त्याने सांभाळले होते. शिवाजी महाराजांनी त्याला प्रथम वाकेनीस व नंतर सुमंत ही अष्टप्रधानांतली पदे दिली. पण संभाजीने सत्ता हातात आल्यावर जनार्दनपंत आपणावर नजर ठेवण्यास बापाने नेमला याचे शासन म्हणून, पहिली गोष्ट केली की जनार्दनपंताला तुरुंगात ठेवले. पुढे त्याला सोडले व त्याचे पदही त्याला दिले. पण त्यात स्वारस्य नव्हते. आधी लाथ मारून मग नमस्कार करण्यासारखे ते होते. संभाविताला अपमान हा मरणापेक्षा दुःख-दायक असतो असे म्हणतात ते खरे. ज्या मोरोपंत पिंगळे पेशव्याने तीस वर्षे शिवाजीमहाराजांची सेवा केली, ज्याने बागलाण व कोळवण जिंकले, ज्याने साल्हेरचा घनघोर संग्राम जिंकला, त्या सर्व प्रधानांच्या मूर्धस्थानी असलेल्या पेश-व्याला संभाजीने तुरुंगात टाकले. त्या मानहानीच्या दुर्धर दुःखाने तो बिचारा चार महिन्यांत मृत्यु पावला.

१६८४ च्या ऑक्टोबरात संभाजीने राहुजी सोमनाथ, मानाजी मोरे, गंगाधरपंत व वासुदेवपंत यांना तुरुंगात टाकले. यातील वासुदेवपंत व गंगाधरपंत हे जरी कारभारात थोडे अलीकडे आले असले, तरी संभाजीने त्यांची अप्रतिष्ठा करावी इतके काही ते सामान्य खास नव्हते. ते जनार्दनपंत हणमंत्याचे मुलगे व रघुनाथपंत हणमंत्याचे पुतणे होते. भोसले कुलाची सेवा करण्याचे व्रत या घराण्यात रघुनाथ-पंताचा बाप नारो रघुनाथ याच्यापासूनच जणू काही कुलव्रतासारखे चालत आले होते. नारो रघुनाथाने शहाजी राजांची सेवा केली, रघुनाथ नारायण व जनार्दन नारायणाने शिवाजी महाराजांची व एकोजी राजांची सेवा केली व तिसरी पिढी गंगाधर जनार्दन व वासुदेव जनार्दन व तिमाजी रघुनाथ संभाजीच्या सेवेत खपत होती. या गंगाधरपंताला गुणज्ञ शिवाजी महाराजांनी रघुनाथपंताकडून मुद्दाम कर्नाटकातून आपणाकडे मागून घेतले होते. "राजश्री रघुनाथपंत कर्नाटकी ठेविले आहेती. त्याचे (मजमूच्या) कार्यावरी फडी आम्हांपाशी मनुष्य पाहिजे. राजश्री जनार्दनपंतासही स्वतंत्र दर्बारीचे कार्य सांगितले आहे. त्याकरिता राजश्री गंगाधर-पंतहि आम्हांपाशी पाहिजेत." १६७९ साली कर्नाटकातून परत येताना गंगाधर-पंताला महाराजांनी मुद्दाम आपणाबरोबर आणले ते त्याची गुणसंपदा हेरूनच. त्या

....१४

गंगाधरपंताला व त्यांच्या भावाला, त्याच्या बापाप्रमाणे व काकाप्रमाणेच संभाजीने तुरुंग दाखविला.

तीच गोष्ट गंगाधरपंत व वासुदेवपंत यांच्याबरोबर कैदेत पडलेल्या मानाजी मोऱ्याची. हा शिवाजी महाराजांच्या वेळेपासूनच स्वराज्यात कामगिरी करीत होता. १६७२ साली प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांनी साल्हेरच्या संग्रामात दिलेरखानाचा पाडाव केला, त्या प्रसंगी रूपाजी भोसले व मानाजी मोरे यांनी मोठा पराक्रम केला. शिवाजी महाराज कर्नाटकात गेले तेव्हा त्यांनी मानाजी मोऱ्याला बरोबर घेतले होते. संभाजीच्या कारकीर्दीतही रामसेजला शिहाबुद्दीन खानानें वेढा घातला, तेव्हा गणेशगावापाशी मानाजीने त्याच्यावर हल्ला करून त्याची पांचशे घोडी पाडाव करून नेली. तोच शिहाबुद्दीन रायगडावर १६८४ मध्ये जेव्हा चालून आला, तेव्हा रायगडच्या रक्षणाचे काम संभाजीने कविकलशाला सांगितले आणि मानाजी मोऱ्याला मात्र तुरुंगात टाकले.

पण राहूजी सोमनाथ या थोर मुत्सद्द्याची कथा तर फारच हृदयद्रावक आहे. शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून म्हणजे १६६१ पासून राहुजी सोमनाथ राजापूर, सावंतवाडी व कुडाळ सुभा सांभाळीत होता. तो जसा लष्करी कामात प्रवीण होता तसाच मुलकी कामातही तज्ज्ञ होता. तो अष्टप्रधानांत नव्हता, पण त्यांच्या इतकाच त्याचाही अधिकार होता. महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी राजाचा खास चिटणीस म्हणून इंग्रजांनी त्याला दोन रेशमी वस्त्रे नजर केली. त्याचा शहाणपणा, सचोटी, निःस्पृहपणा यांवर महाराजांचा इतका विश्वास होता की कर्नाटकात जाताना आपणामागे आपला प्रतिनिधि म्हणून राहुजी सोमनाथाची त्यांनी रायगडावर नेमणूक केली—युवराज संभाजीची नाही. त्याला त्यांनी शृंगारपुराला ठेवले व राहुजी सोमनाथाकडे राजधानी रायगड व महाराणी सोयराबाई यांची जबाबदारी सोपविली. महाराजांच्या अंतकाळी जे थोडे कर्ते लोक रायगडावर होते, त्यांत राहुजी सोमनाथ होता. शिवाजी महाराजांच्या वेळेस राहुजीची एवढी इभ्रत होती. पण संभाजीची कारकीर्द सुरू झाली व राहुजीचे ग्रह पालटले. संभाजीचा पक्षपाती देवदत्त कवीने आपल्या काव्यात राहूजीचा उल्लेख 'राहुप्रतिनिधि' म्हणजे राहूसारख्या पापग्रहासारखा माणूस असा करून त्याची वाङ्मयीन अप्रतिष्ठा केलीच, पण कविकलशानेही त्याला उपद्रव दिला. त्याचे चिपळूणचे देशकुलकर्ण्याचे वतन न्याय देण्याचा नस्ता उपद्व्याप करून कृष्णाजी सोमनाथाला देऊन टाकले. पुढे राजारामाच्या कारकीर्दीत जेव्हा राहुजीच्या मुलांनी त्याच्यापुढे ही तक्रार गुदरली तेव्हा ते वतन परत मिळाले व राजाराम अचंब्याने उद्गारला, 'दाजीने एकाचे वतन काढून दुसऱ्यास काय समजोन दिल्हे?' पण राहुजीला मरणोत्तर हा न्याय मिळाला. जिवंत असताना त्यांची विटंबना एवढ्यावर थांबली नाही. १६८४ च्या ऑक्टोबरात संभाजीस त्याचा संशय आला. तेव्हा 'त्यास दस्त करून घर

नागविले, अटकेत ठेविले, पुनः त्यावरी कृपाळू होऊन कार्यभाग सांगितला. पुढे संभाजीमहाराजांवर संगमेश्वरी धामधूम झाली त्या उपरी राउजीपंतास वैकुंठवास जाला. राज्यातील कदीम सेवक, बहूत दिवस कष्ट-मेहनत केली!' त्याचा शेंवट असा झाला.

राहुजी सोमनाथाप्रमाणेच प्रल्हाद निराजी हा प्रतिष्ठित कारभारी होता. अष्ट-प्रधानांतले न्यायाधीशाचे पद शिवाजी महाराजांपासून त्याच्याकडे चालत आले होते. शिवाय तो व त्याचा बाप निराजी रावजी शहाजी राजापासूनच कारभारात होते. त्या दोघांइतके परराष्ट्राशी व्यवहार करणारे चतुर वकील मिळणे कठीण होते. म्हणूनच शिवाजीमहाराजांनी त्याला गोवळकोंड्याला वकील म्हणून ठेविले होते. कुतुबशाहीचे राजकारण जुळवून आणण्यात प्रल्हाद निराजीचा मोठाच भाग होता. संभाजीच्या काळातही इंग्रजांकडे बोलणी करण्यासाठी तो गेला होता. अशा या कर्तृत्ववान् माणसाला कवि कलशाच्या सांगण्यावरून संभाजीने १६८८ मध्ये पन्हाळ्याला तुरुंगात टाकले! त्याची सुटका राजारामाने पुढे केली. संभा-जीच्या तडाख्यात जिवंत राहिलेल्या मंत्र्याची कथा ही अशी होती. बाकी अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद हे तर प्राणालाच मुकले. आता जे जिवंत राहून अप्रतिष्ठा भोगीत क्षणाक्षणाने जळत राहिले ते राहुजी सोमनाथासारखे लोक आणि निमिषार्धात मदोन्मत्त हत्तीच्या पदाघाताने मस्तकाचा चेंदामेंदा झाल्यामुळे क्षणात मेलेले अण्णाजी दत्तो सारखे लोक यांच्यात अधिक सुदैवी किंवा अधिक दुर्दैवी कोण हे ठरविणे मानवी बुद्धीच्या आटोक्याच्या बाहेर आहे.

निझामुलमुल्काने आपल्या प्रसिद्ध मृत्युपत्रात म्हटले आहे, की गुणी माणसे म्हणजे कणसे नव्हेत, की दर पावसाळ्यांत नवी येतील. ते अगदी खरे आहे. ही माणसें शिवाजीमहाराजांनी मोठ्या साक्षेपाने, जिवाला जीव लावून जोडली होती. या वडिलोपार्जित सेवकांच्या संभाजीने अगदी निर्दयपणे अप्रतिष्ठा केल्या, पण त्यामुळे त्याच्याबद्दलच मंत्र्यांत व लोकांतही तिरस्कार व धास्ती निर्माण झाली. आज कामावर घ्यायचे, उद्या बंदीत टाकायचे, परवा परत कृपाळू होऊन कार्यभाग सांगावयाचा, तेरवा डोकेच मारायचे हे वागणे जबाबदार राजाचे नव्हे, ते दिलदारीचे व खानदानीचे नव्हे, शिवाजीमहाराजांच्या मुलाचे नांव सांगणाऱ्या माणसाचे तर नव्हेच; ते एका स्वच्छंदी, निरंकुश, लहरी, असंस्कृत, तामसी व अव्यवस्थितचित्त इसमाचे होते असा लहानापासून मोठ्यापर्यंत जर ग्रह झाला तर त्यात अनैसर्गिक काय आहे? संभाजीच्या या विचित्र वागण्यामुळे त्याचे मंत्री तर त्याला वचकून असतच, पण असा तर्क शक्य आहे की त्याच्या कृपेच्या व अव-कृपेच्या सारख्याच उत्तान आविष्कारामुळे विस्मयचकित झालेला कविकलशही त्याला मनातून बहुधा घाबरतच असावा.

म्हणून आधीच संशयी स्वभाव, त्यात रात्रंदिवस कानाशी ‘ हितचिंतक ’ कवि कलशाची चाललेली कुजबूज यामुळे संशयकल्लोळाच्या आवर्तात सापडलेल्या बिचाऱ्या संभाजीला राज्य मिळाले तरी नऊ वर्षांत राज्याचे सुख कसे ते स्वप्नातही मिळाले नसेल असे वाटते. अशान्तस्य कुतः सुखम् ! (अशान्त माणसाला सुख कोठचे ?)

संभाजी स्त्री लंपट होता आणि मद्यपी होता असा त्याच्याबद्दल प्रवाद आहे. या बाबतीत कविकलशाचा परिणाम चांगला किंवा वाईट त्याच्यावर कितपत झाला असेल ? त्यालाही व्यसने नसतील तर ती लावण्यास, आणि वाढविण्यास किंवा असतील तर त्या व्यसनाबद्दल त्याची कानउघाडणी करून त्यांच्यापासून पराङ्मुख करण्यात कविकलशाने काही केले होते काय ? पहिल्याप्रथमच हे स्पष्ट केले पाहिजे की संभाजीच्या दुराचारीपणाबद्दल निर्विवाद असा पुरावा उपलब्ध नाही; पण त्याच्या सदाचरणाबद्दलही पुरावा नाही; सदाचरणाप्रमाणे त्याच्या दुराचरणाबद्दल मुळीच उल्लेख नसता, व समकालीनांनी मौन पाळले असते, तर संभाजीला संशयाचा फायदा देता आला असता. पण तसे नाही. त्याच्या सदाचरणाबद्दल उल्लेख नाही पण दुराचरणाबद्दल मात्र निश्चित स्वरूपाचे उल्लेख आहेत. अर्थातच ते उल्लेख म्हणजे शिवाजीमहाराजांसारख्या अधिकारी पुरुषाने लिहिलेल्या अस्सल पत्रातील उल्लेखासारखे नाहीत हे खरे आहे. ते उल्लेख थोरातांच्या कमळेच्या कथेसारखे दंतकथेच्या स्वरूपाचे, ‘एका ब्राह्मण तरुणीवर हात टाकल्याचा’ बोभाटा शिवाजीचे कानावर जाऊन त्याने त्यास पन्हाळगडावर अटकेत ठेवल्याच्या स्वरूपाचे आहेत. लोककथेप्रमाणेच, समकालीन मुंबईकर इंग्रजांच्या पत्रव्यवहारात हे उल्लेख आहेत–“ शिवाजीच्या एका मुख्य ब्राह्मणाच्या मुलीशी संभाजीने व्यभिचार केला–तिला भेटण्यासाठी रात्री गडाखाली जाण्याचे त्याने न सोडल्यास त्याचा कडेलोट करण्याचा हुकूम शिवाजीने दिल्याचे ऐकून संभाजीने त्यास विषप्रयोग केला असे लोक बोलतात.” यानंतर मल्हार रामराव चिटणिसासारखे बखरकार या गोष्टीचा उल्लेख करतात– “कोण्हे एके दिवशी हळदकुंकू समारंभ, शीतला गौरी यास सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यात येणार त्यात कोण्ही रूपवान् स्त्री आली. तिजला महालात नेऊन बलात्कार–अविचार झाला हे वृत्त महाराजांसही समजले. ते समयी बहुत तिरस्कार येऊन बोलिले. जे ‘ राज्याचे अधिकारी हे, अगम्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायी जाले, सर्व प्रजा हे राजाचे कुटुंब, हे पुत्र जाले तरी काय करावयाचे ? यांचा त्याग करीन, शिक्षा करीन, ऐसे आग्रह करून बोलले.” मराठी बखरकार व इंग्रज व्यापारी यांच्याप्रमाणेच मुसलमान इतिहासकार या गोष्टीचा निर्देश करितात– ‘ बुसातीन–उस–सलातीन ’ या विजापूरची आदीलशाही सांगणाऱ्या इतिहासाचा कर्ता म्हणतो– “ या दिवसांत शेरेनवीस (सुरनीस–सचिव) याचे कन्येवर संभाजी फार आषक

होता म्हणजे लुब्ध झाला होता. येणे करून संभाजीविसी सिवाचे मनांत फारच वाकडेपणा येऊन शिवाजी अत्यंत त्रासला होता–" हा सचिव म्हणजे अर्थातच अण्णाजी दत्तो होय. विजापूरच्याच मुसलमानी इतिहासांत म्हटले आहे– "त्याच्या-मागून त्याचा बदफैली पुत्र संभाजी बापाच्या स्थानी विराजमान झाला " खाफी-खानाने म्हटले आहे– "संभाजीचा बाप हा श्रमसाहस करणारा व काटक होता. संभाजीची वागणूक त्याच्या अगदी उलट होती. दारू पिणे आणि पुष्पासारखे गाल असलेल्या आणि चंद्राप्रमाणे ज्यांचा भालचंद्र आहे अशा स्त्रियांचा सहवास याची त्याला फार आसक्ति होती." साकी मुस्तैदखान म्हणतो–"संगमेश्वर येथे तो विला-सात दंग झाला आहे." मुसलमान इतिहासकारांप्रमाणेच मनूची ही समकालीन प्रवासी हाच अभिप्राय प्रकट करतो–"संभाजी मनावर वा संवयीवर ताबा राखू न शकणारा तरुण असून तो दुसऱ्यांच्या बायका पळवी. लोकांच्या बायकांवर बद-नजर ठेवती म्हणून संभाजीचे अंमलदार त्याच्यावर अत्यंत नाराज झाले. शत्रूंना तोंड देण्याची निकडीची वेळ आली असता दुसऱ्यांच्या बायकांशी दुर्वर्तन करण्याची त्याला जडलेली खोड नाहीशी होईना. तेणे करूनच तो आपल्या स्वातंत्र्यास व प्राणास मुकला." 'रॉबर्ट ऑर्म याने म्हटले– "संभाजीला विविध स्त्रियांचा भोग घेण्यात विशेष आनंद वाटत असे. चांगल्या स्त्रीची माहिती कळली की ती आपल्याला केव्हा मिळेल याकडे तो लक्ष देत असे. असे करताना तो आपले कूळ, धर्म काय आहे हे पाहत नसे.– कविकलशाबद्दल ऑर्म म्हणतो–"पूर्वी सांगितल्या-प्रमाणे कविकलश संभाजीला स्त्रिया पुरवीत असे. त्यामुळे अंगांत कर्तृत्व नसताना संभाजीच्या राज्यकारभारात त्याला महत्त्वाचे स्थान मिळाले."

तेव्हा मुद्दा आहे तो असा की थोरातांच्या ' कमळे' सारख्या दन्तकथा, चिटणिसा-सारखे मराठी बखरकार, खाफीखानासारखे मुसलमान इतिहासकार, इंग्रजांसारखे परदेशी व्यापारी व मनुचीसारखे परकीय प्रवासी या सगळ्यांच्या लिखाणांतून एकच खेदकारक उल्लेख येत आहे– तो म्हणजे संभाजीच्या दुराचरणाचा. दन्तकथा; बखर किंवा मुसलमान लेखकांचे लिखाण म्हणून या पुराव्याची उपेक्षा करणे पूर्णतः योग्य वाटत नाही. कारण, शिवाजी महाराज सदाचरणी होते या विधा-नाच्या पुष्टीसाठी कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेच्या कथेसारखी दन्तकथा, बखर आणि खाफीखानाच्या उल्लेखासारखे पुरावे आपण प्रमाण मानतो, पण शिवाजी महाराजांच्या शुद्धाचरणासाठी जो पुरावा आपण ग्राह्य मानतो, त्याच लेखकांचा तोच पुरावा मात्र, संभाजीचे दुराचरण त्यांतून प्रतीत होऊ लागल्याबरोबर डावलून टाकायचा याला पुराव्याकडे सोयीस्कर डोळेझाक करणे म्हणावे लागेल असे म्हटल्यास ते फारसे चूक ठरू नये. विरुद्ध बाजूचा सबळ म्हणजे संभाजीच्या सदाचरणाचा तुल्यबल पुरावा उपलब्ध असल्याशिवाय त्याच्या बाबतीत उपलब्ध असलेला पुरावा नाकारणे कठीण दिसते. संभाजी चारित्र्यसंपन्न ठरावा यासारखी

मराठी माणसाला समाधान देणारी घटना नाही; पण त्यासाठी तो आधी चारित्र्य-संपन्न होताच हे गृहीत धरावयाचे हा मार्ग प्रशस्त वाटत नाही. कमीत कमी हे आहे की शिवाजी महाराजांप्रमाणे त्याचे चारित्र्य संशयातीत व शत्रूच्या पुराव्यानेही सिद्ध झालेले नव्हते. संभाजीच्या चारित्र्याची चर्चा करताना हे लक्षात घेतले पाहिजे की, तो मद्यमांसादि सेवन करीत होता म्हणूनच केवळ दुराचारी होता असे नव्हे; कारण या नैसर्गिक मानवी प्रवृत्ति आहेत. उपलब्ध उल्लेखांवरूनच पाहावयाचे झाले तर संभाजीचा दोष इतकाच – आणि तो मोठा होता – की, त्याला या सेवनात संयम आणि मर्यादा राखता आली नाही. त्याचा कार्याकार्यविवेक, सूक्तासूक्त विचार, विधिनिषेधचिंता लयास गेली. या बाबतीत कविकलश कितपत जबाबदार आहे असा प्रश्न आहे. तो त्याचा गुरु होता, मित्र होता, सल्लागार होता. संभाजीला उपदेश करून सन्मार्गावर आणणे हे त्याचे कर्तव्य नव्हते काय? या बाबतीत पहिली गोष्ट अशी आहे की कविकलश हा त्याचा मित्र असला तरी संभाजीच्या हितासाठी का होईना चार कडू गोष्टी त्याला सुनवाव्यात इतकी काही कविकलशाची पुण्याई नव्हती. संभाजीची मर्जी सांभाळून, त्याच्या कलाने घेऊन आपला स्वार्थ साधण्यापलीकडे राज्याचे तर राहोच पण राजाचेही व्यापक हित कविकलशाला समजण्याइतकी त्याच्या बुद्धीची ऐपत होती याचा पुरावा नाही. तो म्हणजे काही चंदीचा रघुनाथपंत हणमंते नव्हता की संभाजीच्या आज्ञेवरून दोन वर्षे बंदीखान्यातल्या यातना भोगल्यानंतरही परत त्याच्या तोंडावर राज्याच्या हितासाठी सर्वांसमक्ष त्याची कडक शब्दांत हजेरी घेईल! हणमंत्याप्रमाणे कविकलशही स्वामीनिष्ठच होता, पण स्वामीचे खरे हित – जे प्रारंभी विषासारखे कडू पण अंती अमृतासारखे गोड – पाहण्याची 'दूरदृष्टि' जी ऐंशी वर्षांच्या हणमंत्यात होती ती त्याच्यापेक्षा तरुण असलेल्या कविकलशात नव्हती. त्याला काय करणार!

आता कविकलश हा संभाजीचा गुरु म्हणून त्याने संभाजीच्या डोळ्यांत अंजन घालावयाचे तर कविकलश हा संभाजीचा तंत्रमार्गातला गुरु होता. या वामाचारात मद्यमांसादि पंचमकारांनी तर मुळी इष्ट देवतेची तांत्रिक पूजा करावयाची असते. या पंचमकारांवाचून केलेली पूजा निष्फळ होते असे वामाचारी पंथाचे स्पष्ट मतच आहे. अर्थातच सत्त्वगुणी 'दिव्य' भावातील साधक आध्यात्मिक दृष्टीने त्यांचे सेवन करीत असल्यामुळे, वास्तव स्वरूपात ह्या पंचमकारांचा उपयोग फक्त रजोगुणी 'वीर' भावातील साधकांना सांगितलेला आहे व तमोगुणी 'पशु' भावातील साधकांना सांगितलेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. कारण काट्याने काटा काढावा या न्यायाने विषयांच्या साहाय्याने विषयातीत होण्याचे हे दुर्घट शास्त्र आहे. म्हणूनच अनधिकारी माणसापासून हे शास्त्र गुप्त ठेवावे असा सक्त निर्बंध तंत्राचार्यांनी घालून ठेवला. पण हा निर्बंध सुटला, संगमेश्वराच्या परिसरात तंत्र-

विद्येचा सुकाळ झाला, व निदान लोकसमजुतीप्रमाणे जे लोकाचारास निषिद्ध तेच वामाचारास विहित होऊन बसले. त्यामुळे तंत्रविद्येच्या भ्रष्टाचाराबरोबर चारित्र्याचाही भ्रष्टाचार उदंड माजला. पंचमकारांच्या सेवनाच्या बाबतीत सगळेच दिव्य, सगळेच वीर, सगळेच पशु होऊन बसले. वामाचारी कविकलशाचा पट्टशिष्य असलेल्या संभाजीने कोणती प्रगति तंत्रमार्गात केली हे उपलब्ध नाही ; पण त्या साधनेने आधीच उद्दाम असलेल्या त्याच्या भोगप्रवृत्ति अधिकच अनावर झाल्या असाव्यात हे तर्कसंगत वाटते. संभाजीसारख्या वासनांध माणसाला तंत्रमार्ग म्हणजे केवळ कुपथ्य होते. म्हणून ज्याने त्याला ह्या मार्गास लावले, त्या कविकलशाची या बाबतीतील जबाबदारी ही अशी आहे, कमी नाही आणि जास्त नाही असे वाटते.

तेव्हा असा हा मंत्री आणि असा हा त्याच्या तंत्राने चालणारा 'कामक्रोधवशानुग' राजा – यांचे आणि इतर मंत्र्यांचे कितपत रहस्य असेल हे न सांगताही समजण्यासारखे आहे. यातले बहुतेक सर्व मंत्री आणि योद्धे यांनी शिवाजी महाराजांची कारकीर्द पाहिलेली होती, आणि त्यांचे आर्जव, त्यांचे मार्दव, त्यांचा संयम, त्यांचे चारित्र्य, त्यांचा हुन्नरीपणा, त्यांचे माणसे पारखण्याचे आणि जोडण्याचे चातुर्य हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले होते. त्यांनी जोडलेली मोरोपंत पिंगळ्यांसारखी शहाणी माणसेही त्यांना माहीत होती. जेव्हा जेव्हा त्याचे मन शिवाजीमहाराजांशी संभाजीची तुलना करू लागे आणि अशी तुलना अगदी अपरिहार्य होती, कारण संभाजी हा शिवाजी महाराजांचा मुलगा व त्यांच्याच नंतर लगेच छत्रपति झालेला होता – तेव्हा त्यांच्या दृष्टीने तरी, त्याचा एककल्ली स्वभाव, त्याची चारित्र्यहीनता, त्याचा सारासार विवेकाचा अभाव, त्याचे कविकलशासारख्या माणसाच्या तंत्राने चालणारे वर्तन या बाबतीमुळे तो शिवाजीमहाराजांच्या तुलनेने हिणकस ठरला तर नवल नाही. जेथे संभाजीची ही स्थिति तेथे बिचाऱ्या कविकलशाची काय कथा ! कोठे पेशवा मोरोपंत पिंगळे किंवा अण्णाजी दत्तो किंवा रघुनाथपंत हणमंते आणि कोठे कविकलश ! या तुलनेचा साहजिकच परिणाम असा होई का संभाजीच्या व कविकलशाच्या हातांत मराठी राज्याचे भवितव्य सुरक्षित नाही, तेव्हा संभाजीचे राज्यावरून उच्चाटन केले पाहिजे आणि राजाराम किंवा शाहू यांना राज्याधिकार दिले पाहिजेत असे मंत्र्यांपैकी कित्येकांना प्रामाणिकपणे वाटू लागले.

संभाजी व त्याच्या मंत्र्यांच्या संबंधाचा विचार करताना एक फार चमत्कारिक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे त्याच्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत त्याच्याविरुद्ध चार वेळा कट झाले. या कटांचे स्वरूप सामान्यत: त्याला राज्य मिळू न देण्याचे, किंवा राजारामाला कैदेतून सोडविण्याचे किंवा कविकलशाचे पारिपत्य करण्याचे होते या चारही कटांत जबाबदार कारभारी गुंतलेले होते. पहिला कट १६८० च्या मे–जूनमध्ये झाला. त्यात अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे, प्रल्हाद निराजी व

राहुजी सोमनाथ होते. यांचा पाडाव करणारा हंबीरराव मोहिते याने जो उपरोधिक निरोप यांना पाठविला म्हणून 'अनुपुराण'कार म्हणतो त्यात या चौघांची नांवे आली आहेत– 'अण्णाय च मयूराय प्रह्लादाय च राहवे। सद्यः संदेशमेनं च मदीयं विनिवेदय ॥' यापैकी प्रल्हाद निराजी व राहुजी सोमनाथ हे त्या वेळी तरी सुटले आणि मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांना बंदीत पडावे लागले. या कटाचे स्वरूप राजारामाला महाराष्ट्राचे व संभाजीला कर्नाटकाचे राज्य द्यायचे किंवा राजारामाला राज्य देऊन संभाजीला पन्हाळ्यावर बंदिवासात ठेवायचे असे होते. दुसरा कट संभाजी छत्रपति झाल्यावर १६८१ च्या ऑगस्टमध्ये झाला. यात अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद, सोमाजी दत्तो, सोयराबाई ही प्रमुख मंडळी होती. या कटाचा उद्देश, जमल्यास संभाजीस विषप्रयोगाने ठार मारावे, नाहीतर पदच्युत करावे व राजारामास राज्य द्यावे असा होता. या कटातल्या मंडळींना संभाजीने देहान्त शासन दिले. तिसरा कट १६८४ च्या सप्टेंबर ऑक्टोबरात झाला. या कटात पुढे शासन भोगावे लागलेले, राहुजी सोमनाथ, मानाजी मोरे, वासुदेवपंत व गंगाधरपंत होते. या कटाच्या स्वरूपाचा पुरावा उपलब्ध नाही. पण तो तर्काने जुळविता येणे काहीसे शक्य वाटते. एकतर हा कट गंभीर स्वरूपाचा असला पाहिजे, अन्यथा अशा मातबर इसमांना तुरुंगात टाकण्यासारख्या कठोर उपायांची उपपत्ति लागत नाही. दुसरे असे की कविकलशाच्या उच्चाटनाशी याचा संबंध असावा, कारण या माणसांच्या अटकेनंतरचे लगेचचे अकबराचे पत्र आहे त्यात त्याने स्पष्ट म्हटले आहे– " कविकलश हा आपला उत्कृष्ट एकनिष्ठ सेवक आहे. कुणाच्या मत्सराने त्याचा नाश होईल असे परमेश्वर न करो. कविकलशावर आपली कृपा राहावी आणि आपण त्याचे कल्याण करावे हे योग्य होय." कविकलशाचे उच्चाटन म्हणजे संभाजीचे उच्चाटन ओघाने आलेच. पण या बाबतीत तर्काला पुष्टि देणाऱ्या या प्रसंगास समकालीन बातम्या आहेत––२ मार्च १६८५ रोजी कारवारकर इंग्रज लिहितात–"काही काळ इकडे खात्रीपूर्वक कळविण्यात आले आहे की संभाजीला त्याच्याच लोकांनी ठार मारले." परत एप्रिल १६८५ मध्ये याचीच पुनरावृत्ति ते करतात–"कोणी म्हणतात की रामराजा व हंबीरराव तुरुंगात होते ते पळाले व शर्जाखानाकडे गेले." ३० ऑगस्ट १६८५ च्या औरंगजेब दरबारचे अखबारात नोंद आहे की–"रामराजा बादशहाकडे ेत आहे. त्यास मनसब मिळेल व तुझ्यावर मेहरबानी होईल असे कळविण्यास सांगितले." २१–९–१६८५ च्या बातमीने असे समजले की "राजारामास शिरवळ जवळून संभाजीने वाटेतूनच कैद करून नेले" राहुजी सोमनाथ वगैरे मंडळींना तुरुंगवास १६८४ च्या ऑक्टोबरात झाला व या बातम्या १६८५ च्या मार्चपासून सप्टेंबरपर्यंतच्या कालावधीत पसरलेल्या आहेत. पण बोलून चालून तो कट होता. त्याच्या या बातम्या वा त्याबद्दल अफवा – तेव्हा क्षणभर त्यांच्या तारखांच्या

बिनचूकपणाकडे दुर्लक्ष करण्याचा दोष पत्करला तर या बातम्यांतून व अकबराच्या पत्रांतून एकंदर कटाचे स्वरूप स्पष्ट होते की (१) कविकलशाचे उच्चाटन करणे (२) संभाजीस पदच्युत करणे किंवा ठार मारणे (३) राजारामास सोडवणे (४) त्याची व बादशहाची तडजोड घडवून आणणे. याही कटवाल्यांना संभाजीने व्यवस्थित शिक्षा केल्या. चवथा कट १६८८ च्या नोव्हेंबरात झाला. शिर्के हे कविकलशावर पारखे झाले. दुसऱ्या वृत्तांताप्रमाणे शिर्क्यांचा मनोदय कविकलशाला ठार मारणे, संभाजीला पदच्युत करणे, शाहूला छत्रपति करणे व राजारामास बंधमुक्त करून कारभारी करणे असा होता. याही कटवाल्यांना संभाजीने उग्र शासन केले.

या कटांच्या बाबतीत दोन गोष्टी लक्षणीय आहेत. या सर्व कटांच्या वेळी राजाराम हा तुरुंगात होता. सावत्र भाऊ असून आणि त्याला हाताशी धरून कटवाले आपल्याविरुद्ध कारस्थाने करतात याची जाणीव असून संभाजीने राजारामाला प्रेमळपणाने वागविले हे त्याला निःसंशय भूषणास्पद आहे. पण राजकीय गरज म्हणून अनिच्छेने का होईना, राजारामाला नजरकैदेत ठेवण्यापलीकडे त्याला अन्य पर्याय नव्हता हेही तितकेच खरे. दुसरी गोष्ट अशी की हे सर्व कट परकीय आक्रमण स्वराज्याच्या सीमेवर उभे असताना करण्यात आले होते. १६८० साली मोगलांशी लढाया चालूच होत्या. १६८१ सालच्या ऑक्टोबर–नोव्हेंबरात कटाचा बीमोड करून संभाजी अकबरास भेटण्यास पालीस आला तेव्हा औरंगजेब बुऱ्हाणपूरला येऊन ठेपला होता. १६८४ च्या आक्टोबरातील कटाच्या वेळेस फिरोजजंग शिहाबुद्दीन रायगडावरच चालून आला होता. १६८८ च्या कटाच्या वेळेस औरंगजेब विजापुराहून महाराष्ट्राकडे निघाला होता. आझम चाकणला, मुकर्रबखान बऱ्हाळघाला व इतिकदखान रायगडाकडे आले होते. परकीय आक्रमणाचे वेळी त्याच्याशी प्राणपणाने झगडणाऱ्या संभाजीच्या पाठीशी एकदिलाने उभे राहण्याऐवजी हे कटवाले त्याला पदच्युत करण्याचा कट करीत होते. ते कचदिल होते, भ्याड होते, त्यांना माघार घ्यावयाची होती, ते फितूर होते, ते राजद्रोही व राज्यद्रोही होते, अशा हरामखोरांना संभाजीने कडक शासन केले ते योग्यच होते, असा एक निष्कर्ष या बाबतीत संभवू शकेल.

पण या प्रश्नाला दुसरीही बाजू आहे आणि तिचाही विचार निर्विकार बुद्धीने व्हावयास पाहिजे. संभाजीला न्याय देण्याच्या गडबडीत त्याच्या मंत्र्यांना कुमंत्री ठरवलेच पाहिजे असाच काही नियम नाही. केवळ संभाजीने शासन केले म्हणून हे लोक भ्याड, माघार घेणारे, तडजोड करू पाहणारे, फितूर ठरतील इतकी त्यांची पुण्याई तोकडी नाही. कारण या तथाकथित हरामखोरांच्या यादीत फार मातबरांची नावे आहेत. त्यात अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, मोरोपंत पिंगळे, राहूजी सोमनाथ, हिरोजी फर्जंद, गंगाधर जनार्दन, वासुदेव जनार्दन, प्रल्हाद

निराजी यांच्यासारखे धुरंधर कारभारी आहेत आणि शिर्क्यांसारखे प्रत्यक्ष संभाजीचे आप्त आहेत. एवढे लोक विरुद्ध जातात त्या अर्थी संभाजीचीच काही तरी बरीच मोठी चूक होत होती असे मानावे लागले तर ते फारसे चूकच होईल असे नाही. बहुमताचा कौल ' किंवा 'पाचामुखी परमेश्वर ' म्हणतात त्याचा अर्थ मग काय ? ' आपण येकाएकी येकला । सृष्टीत भांडत चालला । बहुतांमध्ये येकल्याला । यश कैचे ॥' असे समर्थांनी म्हटले आहे त्यात अर्थ आहे.

यात पुन्हा सुसंगति नाही. शिवाजी महाराजांच्या काळापर्यंत जे हे लोक देशभक्त होते ते संभाजीच्या काळात तावडतोब देशद्रोही झाले हे पटणे कठीण आहे. हे सारे लोक मुत्सद्दी होते, वीर होते, स्वामिनिष्ठ होते. औरंगजेबाशी लढण्यात व विजापुरकर, सिद्दी, इंग्रज यांच्याशी झगडण्यात त्यांची उभी हयात खर्ची पडली आजच असे काय घडले की औरंगजेबाच्या नावाने त्यांना कापरे भरले व ते तडजोडीची भाषा बोलू लागले ? याचे उत्तर हे आहे की हा भीतीचा प्रश्न नव्हता. हा नीतीचा, विशेषत: राजनीतीचा प्रश्न होता. औरंगजेबाचे अपार सैन्य महाराष्ट्रावर कोसळत असताना मूठभर मराठ्यांचे शौर्य ते रोखू शकणार नव्हते. तेथे शौर्याचे काम नव्हते. तेथे चातुर्याचे, शहाणपणाचे, सारासारविवेकाचे, शक्याशक्यतेच्या विचाराचे काम होते आणि जर शौर्य काम देत नसेल तर प्रसंग ओळखून माघार घेणे, तडजोड करणे, हे जरूर होते. प्राण गेला तरी बेहत्तर पण माघार घेणार नाही या विचारात उदात्तता जरूर आहे पण त्यात विवेकीपणा नाही. असला हेकटपणा शिवाजीमहाराजांच्या राजनीतीत वसत नव्हता. ' बहुतचि करता हट । तेथे येऊनि पडिले तट । तेथे कोणा एकाचा सेवट । जाला पाहिजे ॥' 'या काफीरबच्च्याशी तह तलवारीनेच केला जाईल ' हा औरंगजेबाचा हट्ट प्रसिद्धच होता. संभाजीचा पाडाव केल्याशिवाय परत डोक्यावर टोपी घालणार नाही अशी त्याची मुळी प्रतिज्ञाच होती. याच्या तोडीला तोड म्हणून संभाजीचा हट्ट ठेवला तर शेवट कोणाचा लागणार या प्रश्नाचा निर्णय निदान त्या काळी तरी उघड होता.

' कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् । अतः सिद्धिसमेताभ्यामुभाभ्यामन्वियेषः सः ॥ (केवळ नीति हा भ्याडपणा आहे, केवळ शौर्य हे पशूचे कर्म आहे, म्हणून या दोघांच्या समन्वयाने त्याने यश मिळविले.) या कालिदासाच्या गंभीर श्लोकात ग्रथित केलेली राजनीति ही शिवाजीमहाराजांची राजनीति होती. केवळ नीति हा भ्याडपणा, केवळ शौर्य हे पाशवी बळाचे प्रदर्शन—दोघांच्या योग्य समन्वयाने सिद्धि मिळवावी असा या श्लोकाचा इत्यर्थ आहे. जमेल तेव्हा आक्रमण, नाही तर छापा, नाही तर समोरासमोर वध, नाही तर तात्पुरती माघार व तडजोड—स्थळकाळ व्यक्तिपरत्वे पराकाष्ठेची लवचिक असलेली ही नीति मराठी नीति होय. या नीतीत बहलोलखानच्या लाख सैन्यावर सात स्वारांनिशी तुटून पडणाऱ्या (व मरणाऱ्या)प्रतापराव गुजराचा वेडा पराक्रम वसत नाही. प्रताप-

राव मेल्याबद्दल महाराजांना अत्यंत दुःख झाले हे नमूद आहे. पण त्याच्या मृत्यू-इतकेच त्याच्या वाया गेलेल्या शौर्याबद्दलही ते दुःख असावे असे वाटते.

ज्या माघारीची व तडजोडीची भाषा हे मंत्री करीत होते, ती स्वतः शिवाजी महाराजांनी केली नव्हती काय? त्या वेळची परिस्थिति संभाजीच्या वेळेच्या परिस्थितीपेक्षा किती तरी चांगली होती. विजापूर होते, गोवळकोंडा होते, महाराज होते, मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर, जिजाबाई यांच्यासारखी शहाणी माणसे होती. फक्त जयसिंग आणि दिलेरखान आले होते. तरीही महाराजांनी प्रसंगावर नजर देऊन शरणागति पत्करली, आग्र्याला गेले, औरंगजेबाला मुजरा केला, तेवीस किल्ले दिले. ही तडजोड करताना महाराजांना काय कमी यातना झाल्या असतील? पण कोणतीही तडजोड ही दुःखदायक असतेच. पुढे त्याचा वचपा काढता येतो व महाराजांनी तसा तो काढलाही. आता संभाजीच्या वेळी तर त्यापेक्षा हजार पट कठीण परिस्थिति होती. महाराज नव्हते, धुरंधर मंत्री नव्हते, संभाजी अल्पवयी होता, विजापूर नव्हते, गोवळकोंडा नव्हते, स्वतः औरंगजेब पाच लाख फौजेनिशी महाराष्ट्रात उतरला होता. अशा परिस्थितीत शिवाजीमहाराज असते तरी त्यांनी माघार घेतली नसती असे त्यांच्या पूर्वीच्या वर्तनावरून म्हणता आले असते काय? "आत्मा संरक्षितः सुह्मैः वृत्तिमाश्रित्य वैतसीम्।' (लव्हाळ्याची वृत्ति धारण करून सुह्मांनी जसे आत्मसंरक्षण केले) तसे आज प्रथम 'किंचित् कोन्यात स्वराज्यरक्षण करणे' आवश्यक होते.

वेळेवर माघार घेणे हा आक्रमणाप्रमाणेच युद्धनीतीचा भाग असू शकतो. 'प्रत्येक ठिकाणी घोडा दौडविणे शक्य होईलच असे नाही. काही ठिकाणी ढाली टाकून देणेच इष्ट ठरते' असे शिवाजीमहाराजांचेच शब्द— पण निराळ्या संदर्भात—आहेत. 'उत्तम प्रकारे गाठ पडिली तरी झुंज द्यावे नाहीतर पळोन जावे. हा मराठी धर्म पुरातन चालत आहे. तेणे करूनच पृथ्वीस पालाण घातले होते.' असे भाऊसाहेबांचा बखरकार मराठ्यांच्या युद्धनीतीचे वर्णन करतो. The better part of valour is discretion In which better part I have saved myself (विवेक हा शौर्याचा मुख्य भाग आहे त्या मुख्य भागावर नजर ठेवूनच मी स्वतःस वाचविले.) या शेक्सपियरच्या फालस्टाफच्या शब्दात व 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः।' या संस्कृत वचनात हीच आत्मसंरक्षक राजनीति प्रतीत झाली आहे. ही राजनीति शिवाजीमहाराजांच्या सर्व कारभाऱ्यांच्या रोमारोमांत भिनली होती, म्हणून त्यांना प्रामाणिकपणे असे वाटत होते की या प्रसंगी औरंगजेबाशी वेड्या हट्टाने झुंजणे म्हणजे आत्मघात करून घेणे आहे.

पण हा मार्ग संभाजीला मान्य नव्हता. नमते घेणे, माघार घेणे, तडजोड करणे या गोष्टीच सामान्यतः त्याच्या एकंदर वृत्तीशी विसंगत होत्या. त्याच्या पराक्रमाबद्दल व राज्याच्या कळकळीबद्दल प्रश्नच नव्हता. त्याचा शत्रूही त्या बाबतीत

शंका घेऊ शकला नसता. "दुष्ट संभाजी हा धामधूम आणि उच्छाद करण्यात नरकवासी शिवाजीपेक्षा दहापटीने अधिक तापदायक ठरला. तो स्वत:ला सवाई शिवाजी म्हणवून घेत असे. धामधुमोच्या बाबतीत त्याच्या दुष्ट बापापेक्षाही अधिक असा संभाजीचा दुर्लौकिक झाला होता." ही खाफीखानाची साक्ष त्या बाबतीत अगदी पुरेशी आहे. पण दु:खाची गोष्ट इतकीच की विवेकाची जोड नसलेल्या पराक्रमाने राज्ये मिळत नसतात व टिकतही नसतात. संभाजीची ही 'मारीन किंवा मरेन' ही प्रवृत्ति 'तुटेल इतके ताणू नये' हे व्यवहाराचे सूत्र सावधपणाने संभाळणाऱ्या मराठी युद्धनीतीपेक्षा रणात प्राणार्पण करणाऱ्या रांगड्या राजपूत नीतीशी जास्त जवळची वाटते. तो 'रांगडी मसलत' वाटते. "पंतप्रधान बाजीराव पुणे सोडून निघण्याची मसलत जहाली. ते समयी श्री सरकारने (म्हणजे पटवर्धनांनी) विनंती केली जे पुणे सोडून जाऊ नये. पुण्यात कायम राहावे. असे म्हणताच श्रीमंतांनी आज्ञा केली की, इंग्रजांनी कैद केल्यास कसे? म्हणोन त्यांची विनंती. तसे जाहल्यास घोडी चालवीन मरून जाऊ म्हणून. तेव्हा श्रीमंत बोलले जे ही 'रांगडी मसलत' म्हणोन"—ह्या सांगलीकर चिंतामणराव पटवर्धनांच्या दैनंदिनीतील उताऱ्यात 'रांगडी मसलती' चा मराठी अर्थ आला आहे.

अशा प्रकारचा बेहिशेबी पराक्रम मराठी नीतीप्रमाणे गुण नसून अवगुण आहे तो तमोगुण आहे. समर्थ म्हणतात – 'दुसऱ्याचा प्राण घ्यावा। की आपण स्वये द्यावा। विसरवी जीवभावा। तो तमोगुण॥ डोळा युद्धचि पहावे। रण पडिले तेथे जावे। ऐसे समई घेतले जीवे। तो तमोगुण॥ युद्ध देखावे ऐकावे। स्वये युद्धचि करावे। मरावे की मारावे। तो तमोगुण॥' संभाजी हा तामसी प्रकृतीचा मनुष्य होता, परकीय आक्रमणाच्या डोंगर लाटेवर स्वराज्याचे चिमुकले तारू हेलकावे खात असता, त्याचे सुकाणू संभाजीसारख्या भडक डोक्याच्या माणसाच्या हाती असणे धोक्याचे आहे असे मंत्र्यांचे मत होते. त्याला बोध करून तो ऐकेल अशी सुतराम् आशा नव्हती. कविकलशाच्या तो ऐकण्यात होता. पण अप्रिय पण पथ्यकर उपदेश कविकलश त्याला कशाला करील? तेव्हा नाइलाज म्हणून संभाजीला पदच्युत करणे—परत पन्हाळ्यावर त्याला बंदीत ठेवणे, व राजारामाला किंवा शाहूला नेतृत्व देणे एवढा एकच पर्याय मंत्र्यांपुढे होता.

'संभाजी महाराज यांची उग्र प्रकृति, यांस राज्य आवरणार नाही. सर्वांचा नाश करून आपणही नाश पावतील.' हा अभिप्राय अक्षरश: खरा आहे. शिवाजी महाराजांचेही मत असेच असावे "वडील पुत्र संभाजीराजे जाणता आहे पण बुद्धि फटकळ आहे. यास काय करावे?" असे त्यांचे अखेरचे शब्द सभासदाने नमूद केलेले आहेत. म्हणून संभाजीला राज्य देऊ नये – निदान महाराष्ट्राचे तरी मुळीच देऊ नये अशी त्यांची इच्छा होती—हेही सभासदाने म्हटले आहे व ती त्यांची इच्छा

या मंत्र्यांना बहुधा माहिती असली पाहिजे. एरवी अण्णाजी दत्तोसारखे लोक प्राणास मुकत असता दोन तीन वर्षांनी हे लोक पुन्हा पुन्हा उचल खातात व संभाजीविरुद्ध कट करतात याचा उलगडा होत नाही. ही सुद्धा गोष्ट महत्त्वाची आहे की शिवाजी महाराजांच्या अंतकाळी त्यांच्याजवळ बाळाजी आवजी, राहुजी सोमनाथ, प्रल्हाद निराजी, गंगाधरपंत, वासुदेवपंत, हे हजर होते. महाराज त्यांच्याशी बोलल्याविना कसे राहतील? राहुजी सोमनाथावर त्यांचा केवढा विश्वास होता हे मागे सांगितलेच.

म्हणून निष्कर्ष असा की संभाजीला देशरक्षणाची जितकी पोटतिडीक होती तितकीच त्याच्या मंत्र्यांनाही होती. त्यांचे मार्ग भिन्न होते म्हणून ते स्वराज्यद्रोही ठरत नाहीत. देशभक्ति ही काही कोणाची मक्तेदारी नाही. ईश्वरभक्तीप्रमाणे स्वदेशभक्तीचेही अनेक मार्ग असतात – 'बहुधाप्यागमैर्भिन्ना: पन्थान: सिद्धिहेतवः । त्वय्येव निपतन्त्योघाः जाह्नवीया इवार्णवे ॥ (निरनिराळ्या आगमांमुळे भिन्न असलेले सिद्धीचे मार्ग, गंगेचे ओघ जसे समुद्रात, तसे तुझ्यातच विलीन होतात) या श्लोकात कालिदासाने वर्णन केलेली ईश्वर-भक्तीच्या मार्गांची विविधता देशभक्तीमध्येही स्वभावभेदाप्रमाणे व विचारभेदा-प्रमाणे अवश्य असू शकते. संभाजी जेवढा देशभक्त तेवढाच त्याने हत्तीच्या पायी दिलेला अण्णाजी दत्तो किंवा तुरुंगात टाकलेला राहुजी सोमनाथही देशभक्तच म्हटला पाहिजे. नाही तर त्यांच्यावर विश्वास टाकून स्वराज्यात त्यांना मोठी पदे देणाऱ्या शिवाजीमहाराजांना माणसांची पारख नव्हती आणि संभाजीला मात्र ती होती असा अनवस्था प्रसंग पत्करण्याची आपत्ति येईल.

असो. १६८८ चा पावसाळा संपून मोगलांच्या फौजा महाराष्ट्राकडे नव्या दमाने वळल्या; तेव्हा संभाजीची परिस्थिति ही अशी होती. त्याच्या राज्याच्या सरहद्दीवर चाकणला आजम, कोल्हापूरला शेख निजाम, रायगडाकडे इतिकदखान, विजापूर-हून स्वतः औरंगजेब चालून येत होते. दक्षिण कोकणात खेमसावंत, राम दळवी, काद्रचाचा देसाई यांनी बंडाळी माजविली होती. राज्याच्या अंतरंगात मंत्रिमंडळात खळबळ माजली होती. पेशवा निळोपंत व कविकलश यांच्यात वैमनस्य माजले होते. अकबर निघून गेल्यानंतर एक संभाजी सोडला तर कविकलशाचा पाठपुरावा करणारे कोणीच राहिले नव्हते. संभाजीचा मेव्हणा अचलोजीराजे महाडिक, चुलत भाऊ अर्जुनजी भोसले हे मोगलांना जाऊन मिळाले होते. त्याच्या सासुरवाडीच्या मंडळींपैकी त्याचा सावत्र मेव्हणा व चुलत सासरा गणोजी शिर्के हा, व कान्होजी शिर्के १६८२ सालीच औरंगजेबाच्या सेवेत दाखल झाले होते. त्याचा खाजगी नोकर पुरषा हा सुद्धा मोगलांकडे निघून गेला होता. १६८७ च्या ऑक्टोबरात वाईच्या लढाईत सेनापति हंबीरराव मोहिते ठार झाल्यामुळे संभाजीची ती एक बाजू कायमची लंगडी झाली होती. संभाजीला पदच्युत करून राजारामाला बंध-मुक्त करावे असे कट शिजत होते. ही सगळी परिस्थितीच मुळी इतकी भीषण होती

की स्थितप्रज्ञालासुद्धा गोंधळल्यासारखे झाले असते. वातावरणात भीति, फितूर, संशय इतका भरला होता की, संभाजीच्या राजकीय जीवनाचा मार्ग पावला-पावलावर सुरुंग पेरल्यासारखा धोक्याचा झाला होता.

अशा आणीबाणीच्या परिस्थितीत संभाजीविरुद्ध आणखी एक कट झाला. या वेळी कट करणारी माणसे फार मोठी होती. त्यात प्रल्हाद निराजीसारखा न्याया-धीशाचे काम करणारा अष्ट–प्रधानांतला एक प्रधान होताच, पण त्याहीपेक्षा खुद्द संभाजीच्या सासुरवाडीची, बायकोच्या नात्यातली शिर्के मंडळी होती. ही शिर्के मंडळी रायगडच्या भोवतालच्या प्रदेशात पिढयान्‌पिढया वतनदारी करून राहत होती. शृंगारपूर, संगमेश्वर, दाभोळ, कुटरे ही सर्व यांची गावे. हे शृंगारपूरच्या सूर्व्यांचे कारभारी. यांच्यातील पिलाजीराजे शिर्के यांना शिवाजी महाराजांनी १६६१ साली पदरी घेतले व तेव्हापासून ही शिर्के मंडळी स्वराज्यात खपत होती. शिर्के यांच्याशी शिवाजी महाराजांनी आप्तसंबंधही केले. पिलाजीची मुलगी येसूबाई ही संभाजीला करून घेतली. आपली मुलगी राजकुंवर ऊर्फ नानीबाई ही गणोजीला दिली. पिलाजी, गणोजी, देवजी व तानाजी शिर्के हे भाऊभाऊ. यांपैकी पिलाजी पूर्वीच वारला होता. गणोजी शिर्के १६८२ च्या ऑगस्टात औरंगजेबाकडे गेला. जाताना बरोबर तानाजीचा मुलगा कान्होजी यालाही तो घेऊन गेला. हा काळ कविकलशाच्या बोले अण्णाजी दत्तो प्रभृतींना संभाजीने देहान्तशासन दिल्यानंतरचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ज्याप्रमाणे कविकलशाचे वर्चस्व वाढलेले पाहून रघुनाथपंत हणमंते चंदीला चालता झाला, त्याचप्रमाणे गणोजी व कान्होजी मोगलाईत गेले, तसाच अचलोजी राजे महाडिक गेला असा तर्क वाहतो. कारण हा जो कट करण्यास शिर्के यांनी हिय्या केला – हे बहुधा देवजी, तानाजी व कान्होजीचा मुलगा – दौलतराव–असावेत – त्याचेही कारण कविकलशाचे वर्चस्व त्यांना असह्य झाले हेच होय.

शिर्के यांनी असा विचार केला की कविकलशाने राजास वेडे केले. 'शिर्के' हे महाराजांचे आप्त. यांणी राजा वेडा झाला, कबजीने वश केले, राज्य बुडते या अर्थी हिय्या करून शिवाजीराजे, शिर्के यांचे भाचे, यांस घेऊन राज्यावर बसवावे, राजाराम काढून त्याचे हाते कारभार चालवून राज्य रक्षावे, 'ऐसे राजकारण केले.' दुसऱ्या एका वृत्तान्ताप्रमाणे – 'शिर्के याणी विचार केला की या कलशाने राज्य बुडविले, यासि नेऊन मारावे म्हणोन पंचवीस हजार इसम मेळविले.' पण हा कट केवळ कविकलशाचा काटा काढण्यापेक्षाही संभाजीला पदच्युत करून राजारामाला बंधमुक्त करून कारभारी करण्याचा असावा असे वाटते. कारण संभाजीला पदच्युत केल्यानंतर कलशाला निराळे पदच्युत करण्याचे कारणच नव्हते. निमित्त नष्ट झाले म्हणजे नैमित्तिकही नष्ट आपोआपच होते. झाड तोडले म्हणजे त्याच्या आसऱ्याने माजलेली बांडगुळेही आपोआपच तुटली जातात. या विचाराला काहीशी

पोषक अशी त्या वेळची लोकवार्ता मुंबईकर इंग्रजांनी ९ मे १६८९ ला लंडनला कळविली–'रामराजा, हा संभाजीचा भाऊ आहे. एका फितुराने तीन महिन्यांपूर्वी त्याला मोगली उमरावांच्या हाती देण्याचा प्रयत्न केला. परंतु या राजद्रोह्याला संभाजीने ठार मारिले.' हा कट राजारामाला अनुकूल होता. या तर्काला पुष्टि देणारा आणखी एक पुरावा असा आहे की या कटात भाग घेतल्याबद्दल ज्या लोकांना संभाजीने शिक्षा केल्या होत्या त्यांना पुढे राजारामाने माफी दिली. विठ्ठल नारायण याची मौजे पाडली ऊर्फ देवळे येथे खोती होती, तो शिर्क्यांना मिळाला म्हणून कविकलशाने त्याची खोती काढून त्याला खेळण्यावर अटकेत ठेवले व त्याची खोती खेळण्याचा हवालदार कृष्णाजी कोंडा यास दिली. पुढे राजारामाने त्यास मुक्त करून त्याची खोती त्यास परत दिली. तसेच प्रल्हाद निराजीलाही या प्रकरणी अटकेत टाकण्यात आले होते, त्यालाही नंतर मुक्त करण्यात आले.

असो. १६८८ ऑक्टोबर-नोव्हेंबरात शिर्के व कविकलश यांचे भांडण झाले. कविकलश या वेळी पन्हाळा, खेळणा, मलकापूर यांच्या दरम्यान राहत होता. मलकापूरला त्याची पागा होती व प्रभावळीचा सुभा बहुधा त्याच्याकडे असावा. शिर्क्यांशी भांडणे हे सोपे काम नव्हते. कारण शिर्के हे प्रत्यक्ष संभाजीचे आप्त होते. त्यामुळे कविकलशाने हे सर्व वृत्त संभाजीला कळविले. कविकलशाची अवहेलना ती आपलीच अवहेलना असे संभाजी मानीत असल्यामुळे तो ताबडतोब रायगडाहून खेळण्याकडे निघाला. निघताना त्याने अगदी मोजकेच लोक आपणाबरोबर घेतले होते.

कुठे रायगड आणि कुठे अकलूज ! पण संभाजी शिर्क्यांच्या पारिपत्यासाठी रायगडाहून निघाला आहे, त्याच्याजवळ इतके थोडे लोक आहेत की तो जवळ जवळ एकटाच आहे ही बातमी बारीकसारीक तपशीलासह विजापूरहून अकलूजच्या वाटेवर असलेल्या औरंगजेबाला ताबडतोब कळली ! ही काय संभाजीच्या आसपास वावरणाऱ्या औरंगजेबाच्या हरहुन्नरी हेराच्या चातुर्याची कमाल म्हणायची की संभाजीच्या मुलखातल्या मराठी घरभेद्यांच्या हरामखोरीची हद्द समजायची ? ते कसेही असो. पण 'राज्याची बारीकसारीक बातमीही मिळविण्यात दक्षता बाळगणे हाच राज्याचा मुख्य आधारस्तंभ आहे–' (The main pillar of government is to be well informed in the news of the kingdom.')– राज्याचा मुख्य आधार म्हणजे राज्याची बितंबातमी बरोबर माहीत असणे हा आहे.) हे आचारसूत्र मानणाऱ्या औरंगजेबाचे श्रम या बातमीने सफल झाले आणि संभाजीला जिवंत पकडण्याच्या त्याच्या आशेला पालवी फुटली. आपला वजीर आसदखान त्याला त्याने ताबडतोब लिहिले की–" तुम्ही ज्या मुकर्रबखानाला पन्हाळा घ्यावयास पाठविला आहे त्याला तातडीने कळवा की त्याने ताबडतोब तेथील जहागिरदारावर(संभाजीवर) चालून जावे. तो जहागिरदार

रायरीहून एकटाच खेळण्याला गेला आहे. त्याचे जाण्याचे कारण म्हणजे शिर्क्यांशी भांडणे देणे आहे. बहुत करून खान त्या जमीनदाराला कैद करू शकेल. आणि मुसलमानांची छळणूक करणारा व दुराचारो यावर सूड घेईल.' ईश्वर आम्हांस क्षमा करो. खान काय करू शकणार ? ईश्वरालाच जे करावयाचे असते ते तो करतो. फक्त ईश्वरच माणसाला त्याच्या दुष्कृत्याबद्दल शासन करतो···' आपल्या बारीकसारीक हालचाली इतक्या दुरून औरंगजेब बहिरीससाण्याच्या थंड आणि धारदार डोळ्यांनी न्याहळत असेल याचे स्वप्न तरी, रायगडाच्या दुर्गम प्रदेशात स्वैर संचार करणाऱ्या बिचाऱ्या संभाजीला पडले असेल काय ? पूर्वीच्या कटाप्रमाणे याही कटाचा बीमोड संभाजोने अगदो निर्दयपणे केला. या कटात भाग घेणाऱ्या शिर्के मंडळींची पाळेमुळे त्याने पार खणून काढली. त्यांच्या मुलखाची नासाडी केली, जाळपोळ केली, घरे लुटली. शिर्के बहुत पिढ्यांचे या भागातले वतनदार. त्यांची सरदेशमुखीची वतने जप्त करून सरकारजमा केली. आणि त्यांना देशोधडीला लावले. त्याचा रायगडाभोवतालचा दाभोळ, संगमेश्वर, शृंगारपूर, कुटरे, प्रभावली या भागातला मुलूख म्हणजे 'शिर्काण' हा मुलूख मारला व त्यांना त्या भागातून काढून लावले. संभाजीने या वेळी शिर्क्यांच्या प्रदेशाची जी खांडववनासारखी जाळपोळ केली, तिचे चटके शिर्क्यांना बराच काळ बसत होते. प्रभावतीच्या देसाईपणाचा तिसरा भाग ५००१ होनांस विकताना जोगण प्रभु या प्रकारानंतर चार महिन्यांनी लिहितो की, 'ऐसीयासी भोसले यांनी मुलूख लुटून खराब केला. याकरिता हक्क लाजिमा सेत बाग कुल. बुडाले. बहुत नातवान जाहलो.···पुढे कीर्दीत आबादाणी करावी यास आपणांस कुवत नाही.' प्रभावलीप्रमाणेच कोतळूक व मासू या दोन गावांची गोष्ट होती. हे दोन्ही गाव संभाजीने विठोजी शिर्के याची भावजय काशीबाई हिला मोकासा म्हणून दिले होते. तेथे शिर्क्यांची पागा होती. मासू हा गाव हरबा देसाई याजकडे खोती हक्काने होता देसाई व शिर्के यांच्या राउतात कटकटी होऊ लागल्या तेव्हा देसायाने शिर्क्यांचा रखवालदार धर्मा महार कवठेकर होता त्याला पेंढ्यात घालून आग लावून दिली; व शिर्क्यांची पागा मोडून टाकली. हे सर्व वृत्त संभाजीला त्याने सांगितल्यावर त्याने शिर्क्यांकडील मोकासा काढून घेतला व गाव सरकारात ठेवले. तात्पर्य, संभाजीने या प्रसंगी शिर्क्यांना शिरकाणातून साफ उठवून लावले, त्यांचा वृत्तिच्छेद केला व त्यांना निर्वासित केले.

शिर्क्यांचे पारिपत्य केल्यावर संभाजी पन्हाळ्याला गेला. तेथे त्याने नरहर मल्हारचा चलतभाऊ कृष्णाजी कोन्हेर यांची तक्रार समक्ष ऐकली व तिचा निवाडा करण्याची प्रल्हाद निराजीस आज्ञा केली. पण थोड्याच दिवसांत म्हणजे डिसेंबर १६८८ मध्ये 'कविकलशाचे बोले' प्रल्हाद निराजी व इतर काही सरकारकून धरले व पन्हाळ्याला तुरुंगात टाकले. पन्हाळ्याच्या आसपास कोल्हापूरला मुकर्रब-

खानाच्या फौजा आलेल्या होत्या. तेव्हा कोल्हापुराहून कऱ्हाड, सातारा, वाई, महाड मार्गे रायगडावर जाणे सुरक्षित न वाटल्यामुळे संभाजी व कविकलश पन्हाळ्याहून पस्तीस मैलांवर असलेल्या खेळण्याला गेले. संभाजीने खेळण्याची डागडुजी केली, व बंदोबस्ताची पाहणी केली. तेथून तो संगमेश्वर मार्गाने रायगडला जाण्यास निघाला. तो दिवस माघ वद्य सप्तमी शुक्रवार १ फेब्रुवारी १६८९ होता. खेळण्याहून संगमेश्वर पंचवीस मैल होते. बहुधा संभाजी त्याच दिवशी संध्याकाळी तेथे मुक्कामास पोचला. संगमेश्वरला जाताना त्याच्यावरोबर चारपाचशे स्वाराहून अधिक लोक नव्हते. बरोबर कविकलश, सेनापति मालोजी घोरपडे, त्यांचा मुलगा संताजी घोरपडे, खंडो बल्लाळ, व समर्थांचे शिष्य पालीमठाचे महंत रंगनाथस्वामी होते. जास्ती सैन्याची आवश्यकताच नव्हती. कारण एक तर प्रदेश सगळा राजधानीच्या परिसरातलाच होता; दुसरे, तो पराकाष्ठेचा दुर्गम होता. तिसरे, प्रसंगच आला तर अवघ्या पंचेचाळीस मैलांवर मलकापूर येथे कविकलशाची स्वारांची पागा जय्यत तयार होती आणि सर्वांत महत्त्वाचे कारण प्रवास तातडीचा होता. कारण रायगडला इतिकदखानाने वेढा घातल्याची बातमी नुकतीच येऊन पोचली होती.

संभाजीला प्रवासाची घाई होती हे खरे आहे, पण त्याच्यापेक्षाही जास्त घाई आणखी एका व्यक्तीला होती. ती व्यक्ति म्हणजे पन्हाळा घेण्यासाठी पंचवीस हजार फौज देऊन औरंगजबाने पाठविलेला शेख निझाम हैद्रावादी ऊर्फ मुकर्रबखान. औरंगजबाच्या आज्ञेप्रमाणे आसदखानाने तातडीने संभाजीला पकडण्याचा औरंगजेबाचा हुकूम मुकर्रबखानाला कळविला. तो झपाट्याने कोल्हापुरहून निघाला. त्याने बरोबर एक हजार पायदळ व दोन हजार स्वार घेतले. पण संभाजीची बित्तंबातमी त्याच्या हेरांनी त्याला दिली होती. संगमेश्वराला त्याचा मुक्काम जास्त होणार नव्हता. आणि सरळ मार्गाने मुकर्रबखान गेला असता तर संभाजी त्याच्या हातातून केव्हाच निसटून गेला असता. कारण सरळ मार्गाने कोल्हापुरावरून संगमेश्वर नव्वद मैल आहे. तेव्हा वेळ वाचविण्यासाठी व गुप्तता राखण्यासाठी तो आडवाटांनी व चोरमार्गाने गेला. संगमेश्वरचा राजरस्ताच मुळी निबिड जगलांनी भरलेला आहे; मग आडवाटांची कथा काय सांगावी? ज्या मार्गाने मुकर्रबखान गेला त्याचे वर्णन मुस्तैदखानाने व खाफीखानाने केले आहे. ते असे : 'त्या वाटा अतिशय अवघड होत्या. दऱ्याही तशाच होत्या. इतक्या भयंकर आणि संकटपूर्ण वाटा जग फिरलेल्या प्रवाशांना कुठेच दिसल्या नसतील.' त्याच्या सोबत्यांनी त्याला मना केले रस्ता दुर्गम आहे. वाटेत अंबाघाट यासारख्या खोल दऱ्या आहेत. अशा ठिकाणी तीस चाळीस पायदळ शिपायांनी वाट अडवून दगडांचा वर्षाव केला तर मोठमोठी सैन्ये घाट उतरून जाणे कठीण आहे. या सर्व अडचणी त्याच्या सोब-

त्यांनी त्याच्यासमोर मांडल्या. पण तो शूर शिपाई जिहादच्या उद्देशानेच निघाला होता. तो तडक मजला मारीत निघाला. अवघड वाट दिसली की तो पायउतारा होऊन चाले. घनदाट वृक्षांनी भरलेल्या अरण्यांतून तो व त्याचे सहकारी विजेसारखे पार झाले...' हे सर्व कशामुळे झाले बरे? केवळ मुकर्रबखानाच्या धैर्यामुळे?

केवळ धैर्याच्या रांगड्या मात्रेने वळणारी वाट ही नव्हती. तीनशे वर्षांपूर्वी याच संगमेश्वरच्या घनदाट जंगलामध्ये मुकर्रबखानाचा पूर्वावतार असलेला बहामनी बादशहाचा प्रसिद्ध सेनापति मलिक उत्तुजार याची त्याच्या सात हजार सैन्यासह भीषण शोकांतिका घडून गेलेली होती. आणि ही शोकांतिका शिर्क्यांनीच घडवून आणलेली होती. मलिक उत्तुजारने शिर्क्यांना जिंकून मुसलमान होण्याचा आग्रह धरला तेव्हा त्यांनी तो ताबडतोब मान्य केला; फक्त एकच अट घातली की आपण दोघे आधी खेळण्याच्या शंकरराय मोऱ्यावर स्वारी करून त्याला मुसलमान करू. या स्वारीत संगमेश्वर ते खेळणा या मार्गाचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिर्के यांनी आनंदाने स्वीकारली – वाट सह्याद्रीच्या भयंकर पहाडांतून व जंगलांतून होती. पहिले दोन दिवस शिर्क्यांनी सरळ व त्यांतल्या त्यांत सोप्या वाटेने मलिक उत्तुजारला व त्याच्या सैनिकांना नेले. पण तिसऱ्या दिवशी त्यांना अशा एका भयंकर बिकट वाटेने नेले की फेरिस्त्याच्या शब्दांत 'त्या घोर अरण्याला भिऊन मर्द वाघही गर्भगळीत व्हावा!' घाटांतील वाटा इतक्या वाकड्यातिकड्या होत्या की त्यांची तुलना केसाच्या कुरळेपणाशी केली तरीही ती अपुरी ठरेल. तो पर्वताचा भयंकर देखावा पाहून प्रत्यक्ष राक्षस व भुतेही तेथील कड्यांपाशी व गुहांपाशी आल्यावर दचकून जावीत. या अरण्यात कधींही सूर्याचा कवडसासुद्धा पडत नसेल. तेथे वाढलेले गवतही सर्पाच्या विषारी दाताप्रमाणे तीक्ष्ण होते. हवा तर अजगराच्या श्वासासारखीच. वाऱ्याची प्रत्येक झुळूक विषारी वाटे. अशा भयंकर ठिकाणी गेल्यावर मलिक उत्तुजारचे सैनिक भिऊन गेले. शिर्क्यांने तर नंतर त्यांना याहूनही घोर व गडद अरण्यात नेले. तेथील वाट तर अशी बिकट होती की तेथे वाऱ्यालाही मोकळेपणाने वाहता येत नव्हते. तिन्हीही बाजूंनी अस्मानाला भिडलेले पहाड होते. सैन्याला धड चालताही येत नव्हते. हुकूम देणेही कठीण होऊन गेले. त्यांना तंबू ठोकायलाही जागा मोकळी सापडत नव्हती. ते तसेच जमिनीवर पडले. याप्रमाणे थकून भागून अव्यवस्थित रीतीने मलिकची फौज विश्रांति घेत पडली असता, तो विश्वासघातकी नीच शिर्का खेळण्यावर शंकररायाकडे गेला आणि त्याने शंकररायाला सांगितले की मलिक उत्तुजारास सर्व फौजेनिशी तुझ्या जबड्यात आणून सोडले आहे. लगेच शंकरराय मोठी फौज घेऊन निघाला. अशा या पराधीन व दुर्बल स्थितीत उत्तुजारच्या फौजेला मेंढ्याप्रमाणे कट्यारींनी व तलवारींनी सात हजार शिपायांसह मराठ्यांनी कापून काढले! या वेळी वारा जोराचा सुटला होता. त्यामुळे झाडांच्या फांद्या एकमेकांवर आदळून जो मोठा

गोंगाट चालला होता त्यात त्या शिपायांच्या किंकाळ्या एकमेकांससुद्धा ऐकू आल्या नाहीत ! ' खेळणा ते संगमेश्वरची बिकट वाट व आडवाट ही अशी होती.

अशा या बिकट वाटेने तीन दिवस व तीन रात्री मुकर्रबखान प्रवास करीत होता. तो कोल्हापूरकडच्या भागाचा उत्तम माहीतगार होता म्हणूनच औरंगजेबाने त्याला कोल्हापुराकडे रवाना केले होते. पण तो इतका काही उत्तम माहीतगार नव्हता, की खेळणा ते संगमेश्वर मार्गातल्या अवघड वाटा त्याला माहीत असतील. ही गोष्ट उघड आहे की, पिढ्यान्‌पिढ्या या भागात राहणाऱ्या, हा मुलुख ज्यांच्या पायाखालचा झालेला होता अशा स्थानिक रहिवाशांचे त्याला मार्गदर्शन मिळाले असले पाहिजे. हे वाटाडे कोण असतील बरे ? तर्क असा आहे की हे शिर्के असावेत. कारण असे की, सात वर्षांपूर्वीच गणोजी व कान्होजी शिर्के मोगलांकडे गेले होते. जे उरले ते, म्हणजे, बहुधा, तानाजी, देवजी, दौलतराव हे शिर्के आता मोगलांकडे गेले असावेत; कारण मराठी राज्यात त्यांनी राहावे असे संभाजीने काही ठेवलेच नव्हते. संभाजीने त्यांची घरेदारे लुटली होती, जाळपोळ केली होती, वतने जप्त केली होती, त्यांना निर्वासित केले होते. वतनाइतके मराठ्याला प्रिय काय आहे ? ज्या संभाजीने आपले एवढे तळपट केले त्याचा सूड घेण्यासाठी मोगलांना सामील झालेले समस्त शिर्के तळमळत असतील तर ते अगदी नैसर्गिक आहे. ते जर असे वागले नसते, व संभाजी कसाही असला तरी शिवाजीचा पुत्र व मराठ्यांचा छत्रपति आहे, शत्रूला मिळून मराठ्याचा मराठ्यानेच घात करू नये असा विवेक जर त्यांनी दाखविला असता तर ते अलौकिक ठरले असते यात शंका नाही. पण आपल्या कुळातले तीन पुरुष ज्या संभाजीने हत्तीच्या पायी दिले तो घोड्यासकट समुद्रात वाहत चालला असता त्याला ओढून वर काढणारा स्वामीनिष्ठ खंडो बल्लाळ लाखात एखादाच निघतो. म्हणूनच त्यांची अपूर्वाई. 'साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने। (साधु सर्वत्र नसतात. चंदन जंगलो जंगली नसते.) म्हणूनच त्याची अपूर्वाई.

संभाजीने आजवर जे पेरले होते ते आता उगवले होते. जे उग्र शासन त्याने शिर्क्यांना केले त्याची ती अपरिहार्य परिणति होती. म्हणून एका विशिष्ट मर्यादेपलीकडे जे शिर्क्यांनी केले त्या बाबतीत त्यांना दोष देता येईल असे वाटत नाही. शिर्के हे संभाजीचे सासरे व संभाजी त्यांचा जावई याही नात्यासाठी फार हुंदके देण्यात अर्थ नाही. एक तर सासऱ्याच्या वतनवाडीची जाळपोळ करताना संभाजीने सासऱ्याचा किती मान ठेवला होता तर आता सासऱ्याला जावयाबद्दल पाझर फुटावा? उलट या खेपेला संभाजीचे शिर्क्यांशी वर्तन इतके बेमुर्वतपणाचे होते की 'जामातो दशमो ग्रहः।' (जावई हा दहावा ग्रह आहे.) या वचनाची आठवण शिर्क्यांना व्हावी. राजकारण आणि क्षत्रिय धर्म या गोष्टीच अशा आहेत की त्यात या नाजूक नात्याचा चुराडा होऊन जातो. परशुराम व भीष्म

गुरु-शिष्य होते; कंस व कृष्ण मामे-भाचे होते; कौरव पांडव सावत्र असले तरी भाऊ भाऊ होते. पण त्यांच्यातले संघर्ष टळले नाहीत. हे पुराणान्तरीचे दाखले सोडले तरी खुद्द संभाजीच्याच भोसले कुळात, सरदार खंडागळयांच्या हत्तीच्या प्रकरणात, आपला मुलगा दत्ताजी जाधवराव याच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी सूडाच्या आवेशात, लखुजी जाधवराव यांनी प्रत्यक्ष जावयावर म्हणजे शहाजीवर तलवारीचा घाव घालून त्याला बेशुद्ध पाडले. थोडक्यात चुकले, नाहीतर पोटच्या प्रत्यक्ष मुलीचेच कुंकू बापाच्या हाताने पुसले गेले असते. म्हणून भीष्म म्हणतो तेच खरे 'रौद्रः क्षत्रियधर्मोऽयं गुरुणा यदयुध्यत !' (हा क्षत्रिय धर्म किती उग्र आहे की ज्यात गुरूबरोबरही लढावे लागते !)

संगमेश्वर हे गाव अलकनंदा व वरुणा या नद्यांच्या संगमावर वसलेले आहे संभाजीच्या जीवनात संगमेश्वरचे स्थान केवळ अविस्मरणीय आहे. त्याच्या वादळी जीवनातले ते एकमेव काव्यस्थळ होते. याच संगमेश्वरपासून चौदा मैलांवर असलेल्या शृंगारपुरी अकरा वर्षांपूर्वी त्याचे वास्तव्य झाले होते. येथेच त्याचे पहिले अपत्य भवानीबाई हिचा जन्म झालेला होता. याच शृंगारपुरी शिवयोगी व कविकलश या तंत्राचार्यांच्या मार्फत त्याचा तंत्रमार्गात प्रवेश झालेला होता. येथेच केशवभट्ट पुरोहित व गणेश भट्ट जांभेकर या तांत्रिक पुरोहितांनी त्याला कलशाभिषेक केला होता. संगमेश्वरच्याच केशवभट्टाकडून त्याने संपूर्ण रामायण श्रवण केले होते. त्याने दिलेल्या राजाश्रयामुळे संगमेश्वर शृंगारपूरचा परिसर म्हणजे तंत्रविद्येचे काशी रामेश्वर होऊन बसले होते. छत्रपति झाल्यानंतरही संभाजी संगमेश्वरला वारंवार येऊन राहात असे. संगमेश्वरापासून दोन मैलांवर असलेल्या नावडी बन्दराजवळची एकान्त व रमणीय जागा कविकलशाने मुद्दाम आपल्या तांत्रिक पुरश्चरणासाठी निवडली होती. संगमेश्वरला संभाजी आला म्हणजे तो नेहमी रंगोबा नायक सरदेसाई यांच्या वाड्यात उतरत असे. या वाड्याच्या पश्चिमेला दोनशे पावलावर संभाजीची उतरण्याची जागा होती. त्या जागेला त्या वेळेप्रमाणे अद्यापही 'गढी' असेच म्हणतात. 'संभाजी महाराज संगमेश्वरी आले ते उन्हाळी (सरदेसायांच्या) वाड्यानजीक होते. पर्जन्यकाळ आला तेव्हा सरदेसायांचा वाडा मोठा पाहोन मागोन त्यात अडीच तीन महिने राहिले. कृष्णाबाई व तिचा पुत्र रंगोबा नायक सरदेसाई यांनी राजे धनी, प्रसंगे करून आले, जागा मागतात हे समजोन, राहवयासी जागा वाड्यात दिली.' हा प्रसंग १६८८ च्या उन्हाळ्यातला आहे. त्या वेळी संभाजी अडीच तीन महिने तेथे राहिला होता.

या वेळी मात्र संभाजीचा मुक्काम एक दोन दिवसांपेक्षा जास्त काळ झाला नाही. या दोन दिवसांत त्याने काही महत्त्वाच्या तक्रारी ऐकल्या आणि त्या निकालात काढल्या. त्यातली विशेष महत्त्वाची म्हणजे अर्जोजी यादवाची औन्ध–कऱ्हाडच्या देशमुखीची तक्रार होय. ही तक्रार शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून चालत आलेली होती. कऱ्हाडची देशमुखी यादवाची पूर्वापार होती पण त्यांच्या वाडवडिलांनी बंडखोरी केल्यामुळे

आदिलशहाने ते वतन जप्त करून प्रथम रणदुल्लाखानास आणि नंतर शहाजी राजांस दिले. शहाजीकडून ते वारसा हक्काने शिवाजीमहाराजांकडे आले. अर्जोजी यादव त्यांच्या पदरी होता; त्याने ते वतन मिळावे म्हणून फार प्रयत्न केले. पण वतन सामान्यतः द्यावयाचे नाही हा महाराजांचा दंडक. त्यामुळे कऱ्हाडची देशमुखी तर त्यांनी त्याला दिली नाहीच, उलट जनार्दनपंत हणमंते यांचा अधिक्षेप केल्याच्या गुन्ह्यावरून त्याची औंधची देशमुखीही सरकारजमा केली. अखेर अर्जोजी यादवांच्या प्रयत्नांना यश येऊन महाराजांनी वतन देण्याचे कबूल केले पण वतनपत्रे होण्यापूर्वीच महाराज कैलासवासी झाले. पण अर्जोजीने प्रयत्न सोडले नाहीत. संभाजीच्या कारकिर्दीत आपल्या स्थापत्यकौशल्याने त्याने संभाजीला संतुष्ट केले. त्याने बक्षीस म्हणून दिलेले पाच हजार होन सेरणी म्हणून संभाजीला त्याने परत केले व वतनपत्रे देण्याची विनंती केली. तेव्हा संभाजी म्हणाला, 'कैलासवासी स्वामींनी वतन दिले ते आम्हीही दिले असे.' कबजीबाबा पनालेस आहेत त्यांची व साहेबाची भेटी जहालियावरी पत्रे करून देऊ.' त्याप्रमाणे कबजीबाबाची व संभाजीची पन्हाळच्यास भेट झाल्यावर अर्जोजीने परत अर्ज केला. पण त्यांत कऱ्हाडच्या देशमुखीवर असलेल्या तुळाजी कडून विघ्न आणले व समक्ष तक्रार केली की, यादवांना कऱ्हाडची देशमुखी दिली तर औंधची देशमुखी जाईल असे त्याने कविकलशाला सांगितले. त्यामुळे त्याने वतनपत्रे देणे लांबणीवर टाकले. पुढे अकबराचे प्रकरण उपस्थित झाले. त्याची संभाजीने राजापूरला रवानगी करून दिली, व तो रायगडाला व कबजी पन्हाळच्याला गेला. पण अर्जोजीची चिकाटी जबर. त्याने शेवटी संगमेश्वराहून रायगडाकडे जाताना संभाजीची भेट घेतली व संभाजीचाही मोठेपणा असा की एवढ्या घाईतही त्याने अर्जोजीचे काम करून दिले. संभाजीला अर्जोजी व त्याचा भाऊ गिरजोजी यादव यांनी दोन हजार होन सेरणी दिली. त्यांना पत्रे द्यावयाची परवानगी मिळाली. त्याप्रमाणे वतनपत्रे सिद्ध झाली. त्यावर राजमुद्राही झाल्या व सरकारकुनाच्या शिक्के निशाणीसाठी पत्रे गेली.

अर्जोजी यादवाच्या प्रमाणेच मासू गावच्या हरबा देसाई खोताच्या तक्रारीचा निवाडा संभाजीने या दोन दिवसांच्या मुक्कामात केला. कोतळुक व मासू ही गावे विठोजी शिर्के याची भावजय काशीबाई हिच्याकडे मोकाशाने चालत होती; व मासू गावाची खोती हरबा देसायाकडे होती. या देसायाची व शिर्के याची पागा होती. त्यांची नेहमी कटकट चाले. तेव्हा देसायांनी शिर्क्यांची पागा मोडून टाकली, त्यांचा रखवालदार धर्मा महार कवठेकर याला पेंढ्यांत घालून जाळून टाकले व ही सारी तक्रार सांगण्यास तो संभाजीकडे संगमेश्वरास आला. संभाजीने शिर्क्यांचा मोकासा काढून घेतला व गाव सरकारजमा केला. ही अशी प्रकरणे निकालात काढण्यात माघ वद्य ८, ९ हे दोन दिवस गेले. दुसऱ्या दिवशी रायगडकडे कूच

करण्याचे संभाजीने ठरविले होते. त्याप्रमाणे बरोबर असलेले काही सैन्य पुढे रवाना झालेही होते.

ती माघ वद्य दशमीची उत्तररात्र होती. उत्तुंग वृक्षांनींच गजबजलेल्या संगमेश्वराच्या त्या परिसरावर वद्य पक्षांतील चंद्रमा स्निग्ध चांदण्याची बरसात करीत होता. वातावरणात गाढ आणि नीरव शांतता काठोकाठ भरून राहिली होती. ती हिरवी वनराजी चंदेरी स्वप्नरंजनात मग्न झाली होती. या क्षणी ती निःसीम शांतता हेच सत्य वाटत होते आणि माणसांच्या सृष्टीतले कोलाहल, किंकाळ्या व संघर्ष हेच भास वाटत होते. संभाजी आणि त्याचे अन्तेवासी यांनी रायगडच्या प्रवासाचे प्रस्थान ठेविले होते. कविकलशाची पूजा चालली होती, तिची सांगता होण्याचीच ते वाट पाहत होते. एवढ्यात प्रचंड आरडाओरडा झाला आणि मुकर्रबखानाचे लोक विजेसारखे त्यांच्यावर कोसळले. गेले तीन दिवस व तीन रात्र कष्टांची तमा न बाळगता त्याने केलेले श्रम सफल झाले होते. संभाजीला त्याने अगदी निसटता निसटता गाठले होते.

संभाजीच्या हेरांनी त्याला वारंवार मोगल फौज येत असल्याची सूचना दिली होती. पण काय असेल ते असो, त्याचा विश्वासच त्या वार्तांवर बसला नाही. एवढ्या दुर्गम प्रदेशात मोगल येऊ शकतील हे त्याला खरेच वाटले नाही. पण सत्य हे कादंबरीपेक्षाही चमत्कारिक असते याची त्याला आता प्रतीति आली. जे खरे वाटले नाही ते प्रत्यक्ष डोळ्यांपुढे उभे राहिले होते. मुकर्रबखानाचे लोक समोर आले होते. आता वेळ घालविणे शक्य नव्हते. होते तेवढे लोक बरोबर घेऊन संभाजी सामना देण्यास उभा राहिला.

पण सामना विषम होता. मुकर्रबखानाच्या दोन हजार लोकांबरोबर संभाजीचे चारपाचशे लोक किती वेळ टिकाव धरणार ? दोन अडीचशे लोक मारले गेले. त्यात संभाजीचा सेनापति मालोजी घोरपडे या प्रसंगी धारातीर्थी पतन पावला. त्याचे तीन मुलगे संताजी, पिराजी व बहिरजी घोरपडे व खंडो बल्लाळ मोठ्या शिकस्तीने रणातून बाहेर पडले. त्यांचा पाठलाग मुकर्रबखानाने केला नाही. त्याला संभाजी हवा होता म्हणून हे बचावले. पुढे पानपतावर भाऊसाहेब मेले पण नाना फडणीस व महादजी शिंदे वाचले व त्यांनी नवा इतिहास घडविला. त्याचप्रमाणे संताजी घोरपडे व खंडो बल्लाळ यांच्या बाबतीत घडले. इतिहासाची पुनरावृत्ति होते असे म्हणतात, ते कांही खोटे नाही.

लढाईच्या प्रारंभीच दुर्दैवाने कविकलशाच्या उजव्या हाताला बाणाची जखम झाली व तो हात निकामी झाला. तो घोड्यावरून खाली आला. संभाजी पळून जाण्याच्या विचारात होता, पण कविकलशाला तशा स्थितीत टाकवून त्याला जाववेना. त्याने घोड्यावरून खाली उडी घेतली व म्हणाला – 'पंडितजी, मी पण थांबतो.' कविकलश व संभाजी वाड्यात येऊन तळघरात लपले पण मुकर्रबखानाच्या

माणसांनी त्यांना वाड्यात शिरताना पाहिले होते. त्यांनी वाड्याला गराडा घातला. मुकर्रबखानाचा मुलगा इखलासखान हा काही शूर सहकाऱ्यांसह जिनः उतरून तळघरात शिरला. त्याने लपून बसलेल्या संभाजीचे व कविकलशाचे हात बांधले व केस धरून त्यांना फरफटत ओढीत वाड्याच्या बाहेर आणले. तेथे मुकर्रबखान हत्तीवर होताच. ताबडतोब त्याने संभाजीला आपल्या हत्तीवर घेतले. इतरांच्या गळ्यात व पायात बेड्या अडकवून काहींना हत्तीवर घातले व काहींना घोड्यावर स्वार केले, आणि जसा विजेच्या वेगाने तो आला तसाच वावटळीच्या वेगाने संभाजीला घेऊन तो परत गेला. जाताना मागे राहिलेल्या मोगलांनी संगमेश्वर-मधील सरदेसायांचा वाडा जाळून टाकला व देवळे फोडली. मोठा प्रलय झाला.

संगमेश्वर ते कोल्हापूर व पुढे कोल्हापूर ते बहादुरगड हे एकंदर दोनशे तीस मैलांचे अंतर आहे. हा सगळा मराठ्यांचा मुलूख आहे. या मराठ्यांच्या मुलखातून मराठ्यांच्या छत्रपतीला आपल्या हत्तीवर बांधून घालून मुकर्रबखान, एक नव्हे दोन नव्हे, अकरा दिवस प्रवास करीत होता. पण या प्रदीर्घ कालात व प्रदीर्घ प्रवासात संभाजीला सोडविण्याचा एकही प्रयत्न झाल्याचे नमूद नाही ! कोल्हापुरानंतर तर मुकर्रबखानाच्या प्रचंड फौजेच्या गराड्यातच संभाजी होता. त्यामुळे त्याला सोड-विण्याचा प्रयत्न करणारा माणूस दीपशिखेवर झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणेच प्राणास मुकला असता. पण असल्या वेड्या पतंगाचे उदात्त शहाणपणही कोणी दाखविले नाही. संभाजीच्या जीवनात कित्येक न सुटलेली कोडी आहेत त्यांपैकी हे एक आहे. हजार मैलांवरच्या मुसलमानी मुलखात गेलेले शिवाजीमहाराज सहस्रबाहु सहस्रनेत्र अशा औरंगजेबाच्या तावडीतून सुखरूप परत येतात आणि संभाजी मात्र त्याच्याच मुलखात पकडला जातो, व त्याला सोडविण्याचा एकही प्रयत्न होत नाही यांतला विरोध केवळ दिङ्मूढ करणारा नाही तर खिन्न करणारा आहे. असे कां बरे झाले असावे ?

असे वाटते, की प्रजेचा अनुराग संपादन करण्यात संभाजीला अपयश आले असावे. तो शूर होता. तो पराक्रमी होता, तो स्वराज्यासाठी प्राणपणाने लढत होता, तो दिलदार होता. पण या सर्व गुणांवर त्याच्या कविकलशाच्या आहारी जाण्यामुळे, त्याच्या तंत्रमार्गावरील आसक्तीमुळे, त्याच्या उग्र प्रकृतीमुळे व त्याच्या चारित्र्यहीनतेने पाणी पडले होते. त्यामुळे सामान्य जनतेपासून संभाजी दुरावला होता. आणि आपत्प्रसंगी शौर्य नव्हे, सामर्थ्य नव्हे तर प्रजेचा अनुराग हाच राजाला तारणारा किंवा मारणारा ठरत असतो. संभाजीने आपल्या वर्तनाने अनेकांना दुखवून ठेवले होते. त्यांचा अनुराग या कठीण प्रसंगी त्याला मिळेल ही अपेक्षा मुळातच चूक होती.

मुकर्रबखानाने संभाजीला पकडले हे अर्धसत्य आहे त्याला पकडले खरे शिर्क्यांनी. संगमेश्वरला येताना व परत जाताना शिर्क्यांचे मार्गदर्शन नसते तर मुकर्रबखान

काय करू शकला असता ? संगमेश्वरापासून पन्हाळ्यापर्यंत संभाजीच्या मदतीस कोणी येऊ शकले नाही. कारण त्याला नेलेच इतक्या आडवाटेने की कोणालाही कळू नये. हा सारा मुलूख शिर्क्यांचा होता. हे शिर्के संभाजीचे आप्त, पण आता त्यांचे हाडवैर झाले होते. हे संभाजीच्याच कर्तृत्वाचे भोक्तृत्व नव्हते काय ?

खाफीखान हा रायगडला शिवाजीमहाराजांच्याच वाड्यात काही काळ राहत होता. त्या वेळी त्या भागात ऐकलेली एक गोष्ट त्याने दिलेली आहे. 'उन्हाळ्यात तेथे पाण्याची फारच टंचाई भासते. त्या वेळी तेथील लोकांना अतिशय त्रास होतो. नरकवासी शिवाजीने आपल्या वाड्याला लागून एक विहीर बांधली होती. विहिरीला लागूनच त्याने एक दगडाची बैठक तयार करविली होती. तेथे तो बसत असे. विहिरीवर सावकारांच्या बायका व इतर गरीब स्त्रिया पाणी भरण्यास येत. त्यांच्या मुलांना तो त्या त्या मोसमातील फळे देत असे. आपण आपल्या आईशी किंवा बहिणीशी ज्या प्रकारे बोलतो त्या प्रकारे तो त्या बायकांशी बोलत असे.'

'पुढे त्या अपवित्र संभाजीला राज्यपद प्राप्त झाले. तोही विहिरीजवळच्या बैठकीवर बसत असे. प्रजाजनांच्या वधू आणि इतर स्त्रिया निरुपाय होऊन विहिरीवर पाणी भरण्यास येत. त्या विहिरीवर पाणी भरीत. घागरी डोक्यावर घेऊन एक हात घागरीवर तर एक हात कमरेवर ठेवून विहिरीच्या पायऱ्या चढून त्या दुष्ट नशिबाच्या कुत्र्याच्या बैठकीजवळून जात.

'तो हीन आणि नालायक मनुष्य त्यांच्यावर हात घाली. घडी दोन घडी त्यांना तो सोडीत नसे. बायका काकुळतीला येत. डोक्यावरच्या घागरी फेकून देत आणि पूर्णपणे फजीत पावून त्याच्या हातून सुटत.

'त्याच्या बापाने रयत आणून बसविली होती. पण शेवटी ती (रयत) जवळच असलेल्या फिरंग्यांच्या मुलखात पळून गेली. स्वतः संभाजीला त्याच्या कर्माची फळे भोगावी लागली.'

शिवाजीमहाराज व संभाजी यांच्या चारित्र्यातील व तिच्या फलश्रुतीतील फरक सांगणाऱ्या खाफीखानाच्या या बोलक्या उताऱ्यावर अधिक भाष्याची गरज नाही.

मुकर्रबखानाने खंडूजी नामक एका आपल्या विश्वासू दूताकरवी संभाजीला पकडल्याची बातमी तावडतोब औरंगजेबाला कळविली. विजापूरहून कूच करून औरंगजेब ६ फेब्रुवारी १६८९ रोजी अकलूजला आला, त्या दिवशी त्याला ही आनंदवार्ता समजली व आपल्या साऱ्या श्रमाचे सार्थक झाले असे त्याला वाटले. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।' (फळ मिळाले म्हणजे क्लेशाला टवटवी येते)

१७

दु:खाप्रमाणे आनंदामुळेही निद्रानाश होऊ शकतो. मुकर्रबखान कैद्यांना घेऊन येत आहे, या बातमीने औरंगजेबाच्या छावणीत खरोखरच लहानापासून मोठ्यां-पर्यंत सर्वांना हर्षवायु होण्याची वेळ आली. खुद्द औरंगजेबाला तर हा ईश्वरी प्रसादच वाटला आणि ज्या दिवशी ती बातमी आली, त्याच दिवशी त्याने गुल-बर्ग्याचा साधु गेसूदराज बंदेनवाज याच्या दर्ग्यास दहा हजार रुपयांची देणगी पाठविली. उद्या ज्या अपूर्व दृश्याने आपल्या डोळ्यांचे पारणे फिटणार आहे, त्याच्या कल्पनेनेच संभाजीला छावणीत आणण्याच्या आदल्या रात्री आनंदाने कोणाचाही डोळ्याला डोळा म्हणून लागला नाही. खाफीखानाच्या शब्दात ती रात्र म्हणजे शबे बरात होती व तो दिवस म्हणजे ईदचा महोत्सव होता.

शुक्रवार दिनांक १५ फेब्रुवारी १६८९ रोजी औरंगजेबाची छावणी अकलूजहून बहादुरगडला आली. त्याच दिवशी मुकर्रबखान कैद्यांना घेऊन छावणीत येत आहे असा निरोप आला. औरंगजेबाने लष्कराचा नायब व्यवस्थापक हमीदुद्दीनखान यास मुकर्रबखानाच्या स्वागतासाठी पुढे पाठविले. लष्करापासून अर्ध्या कोसावर औरंगजेबाच्या हुकुमाने संभाजी व कविकलश यांच्या अंगावर विदूषकाचे झगे चढ-विण्यात आले. त्यांच्या डोक्यावर इराणात गुन्हेगारांच्या डोक्यावर घालतात त्या-प्रमाणे लाकडी फळीच्या लांबट टोप्या घालण्यात आल्या. त्यांना उंटावर बसविण्यात आले. आणि शिंगे, कर्णे, ढोल, तुताऱ्या यांच्या कर्कश कोलाहलात त्यांची सगळ्या लष्करातून धिंड काढण्यात आली. ज्या उंटावर संभाजीला बांधून घालण्यात आले होते, त्या उंटाला मुद्दामच खोडसाळपणे इतक्या झपाट्याने गर्रकन वळवीत, की वर बसलेला संभाजी एकाएकी एका बाजूला भोवळ आल्याप्रमाणे कलंडे आणि खाली कोसळतो की काय असे वाटे. तो खाली कोसळणे शक्यच नव्हते, कारण त्याला इकडची मान तिकडे वळविता येऊ नये अशाच प्रकारे करकचून उंटावर आवळण्यात आले होते. पण वारंवार अचानक बसणाऱ्या त्या हादऱ्यांनी व त्या कलंडण्याने त्याला अतिशय यातना होत होत्या हे स्पष्ट दिसत होते. अशा त्याला यातना झाल्या म्हणजे तो तमाशा पाहणारांना धन्य धन्य वाटे; ते टाळ्या पिटीत, मोठ्यांदा खिदळत, त्याला दगड मारीत, त्याच्यावर थुंकत, त्याला गलिच्छ शिव्या देत. कारण संभाजीची नाना प्रकारे विटंबना व फजिती करून त्याला दरबारात आणावा अशी खुद्द औरंगजेबाची सक्त आज्ञा होती. मुकर्रबखानाने शिकार तर मोठा नामी मारली होती. सह्याद्रीच्या कडेकपारीत भटकणारा ढाण्या वाघ त्याने काढण्या लावून औरंगजेबापुढे जिवंत हाजीर केला होता. त्यात पुन्हा बादशहाची

खास आज्ञा. मग सापळयात सापडलेल्या वाघाला खडे मारण्याची हौस बायका-पोरांनीही मनसोक्त फेडून घेतली तर त्यात नवल कसले ? दोन लाखांच्या त्या छावणीत तंबूत बसून राहिला असा त्या दिवशी जवळजवळ एकही माणूस नव्हता. कारण 'वारंवार कोठुनी असे दिसणार ?'

पण हे कवीचे वचन आहे. आणि कवीच्या बहुतेक साऱ्याच वचनांप्रमाणे ते रमणीय असले तरी पूर्णपणाने सत्य नाही, ते अर्धसत्य आहे. कारण, माणसाला काळ खातो हे जरी खरे असले तरी माणसाची कला काळावर मात करते हेही तितकेच खरे आहे, ते याही बाबतीत प्रचीतीला आल्याशिवाय राहात नाही. तो उंट गेला, त्या उंटावर बसलेला संभाजी गेला, त्या संभाजीची गंमत करणारे ते दोन लाख लोक गेले. सारे सारे गेले, गंभीर कालसागरात निमग्न झाले, पण त्या दोन लाख गमत्या प्रेक्षकांत एक चित्रकार होता. त्या चित्रकाराने त्या प्रसंगी संभाजीला पाहून चित्र काढले ते अजून आहे. त्या चित्राच्या रूपाने तो अनामिक चित्रकार आणि संभाजी आजही आपल्या डोळ्यापुढे उभा राहू शकतो.

चित्रकार मुसलमान होता. चित्र रंगीत आहे. चित्राच्या डाव्या कोपऱ्यात उर्दूत 'संभा' असे शब्द आहेत. चित्रात संभाजी उंटावर बसलेला आहे. तो अनवाणी आहे. डोक्यावरचे त्याचे उभे हात निःशस्त्र आहेत. ते हात आणि त्याची मान खोड्यात अडकविली आहे आणि खोड्याच्या लोखंडी कड्या पक्क्या केल्या आहेत. त्याला हलता येत नाही की वळता येत नाही, कारण हालचाल केली की त्या खोड्यांच्या कड्या आपोआप घट्ट होत जातात. त्याच्या डोक्यावर विदूषकाची उंच लाकडी टोपी आहे आणि त्या टोपीवर व खोड्यावर छोटी छोटी भगवी निशाणे आहेत. एक माणूस उंट धरून चाललेला आहे आणि दुसरा माणूस संभाजीच्या कमरेला विळखा घालून बसलेला आहे. कारण उंट तिरपा भेलकांडत चालतो, व संभाजीला हाताचा आधार घेणे शक्य नाही; तो पडू नये यासाठी ही तजवीज आहे. उंटावर बसल्यामुळे त्याला लाथही मारता येत नाही. संभाजीच्या चेहऱ्यावर भीति नाही, धास्ती नाही, प्रक्षोभ नाही, लाचारी नाही, तो उग्र आणि गंभीर आहे, त्याची नजर थेट समोर लागलेली आहे. डोळे वटारलेले आहेत आणि रोखलेले आहेत....

ज्याने हे चित्र रेखाटले तो खरोखर मोठा प्रतिभासंपन्न कलाकार असला पाहिजे यात शंका नाही. त्याने चित्र काढले ते अर्थातच औरंगजेबाच्या जीवनातील विजयानंदाच्या क्षणाचे हे उघडच होते. केवळ त्याबद्दलच त्याला दोष देण्याचे काहीच कारण नाही. पण त्याला न कळत, त्या चित्रकाराने, संभाजीच्या जीवनातल्या अखेरच्या पर्वातला एक उज्ज्वल क्षण अमर केलेला आहे, इतकेच नव्हे, तर मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमरातील एक उत्कट व भव्य टप्पा ....Climax....काळाच्या पटावर कुंचलीने कायमचा रंगवून ठेवलेला आहे.

कवीचे शब्द खरे आहेत–की, 'हे चित्र पहा आणि ते चित्र पहा.' फक्त आठच वर्षांपूर्वी याच माघ महिन्यात रायगडावर संभाजीचा राज्याभिषेक झाला होता. त्या वेळी त्याची मिरवणूक निघाली होती. त्या मिरवणुकीत व या मिरवणुकीत केवढे अंतर होते ! त्या वेळी तो महाराष्ट्राचा छत्रपति होता. या वेळी तो औरंगजेबाचा कैदी होता तेव्हा तो शृंगारलेल्या गजराजावर सुवर्णाच्या अंबारीत विराजमान झाला होता, आज त्याला ओंगळ आणि कुरूप उंटावर जेरबंदांनी आवळून बांधून घातले होते. त्या वेळी त्याच्या मस्तकावर कांचनाचा किरीट शोभत होता. आज त्या जागी वेडगळ लाकडी टोकदार टोपी येऊन बसली होती. तेव्हा त्याने भरजरी आणि रेशमी राजवस्त्रे परिधान केली होती. आज त्याच्या अंगावर विदूषकाचा पायघोळ डगला होता. त्या वेळी त्याने रत्नाचे आणि मोत्याचे अलंकार धारण केले होते, आज त्याच्या हातापायात फार निराळ्या प्रकारचे लोखंडी 'अलंकार' खळखळत होते. तेव्हा त्याच्यावर छत्रचामरे धरली होती, आज त्याच्या उघड्या माथ्यावर माघांतला निर्दय सूर्य आग ओकत होता. त्या वेळी धनुष्यबाण व ढालतलवार चिलखत यांच्यामुळे तो करोल पंचहत्यारी सजला होता, आज तो सर्वस्वी असहाय व निःशस्त्र होता. त्या वेळी सुवासिनींनी त्याला नीरांजनांनी ओवाळले होते व त्याच्यावर फुले उधळली होती. आज त्याच्यावर खेटरांचा व दगडांचा वर्षाव होत होता. त्या वेळी त्याच्या जयजयकारांनी दिशा बधिर झाल्या होत्या, आज त्याच्या धिक्काराच्या आरोळ्यांनी कानठळ्या बसत होत्या. त्या वेळी त्याच्या मार्गावर गुलाबाचा सडा पडत होता, आज त्यावर पावलो पावली धगधगणारे निखारे पसरले होते. ती विजययात्रा होती, ही मरणयात्रा होती. आपल्या प्रेतयात्रेचा तो भेसूर सोहळा जिवंतपणीच संभाजी पहात होता. त्या वेळो त्याच्या अंतःकरणात भावनांचे जे वादळ उसळले असेल ते एक त्याच्या अंतरात्म्याला माहीत की त्या परमात्म्याला माहीत!

त्या अफाट मैदानात पहावे तिकडे द्वेषाने बरबटलेले चेहरे पाहत असताना, त्याला रायगडावर आपली वाट पाहून शिणलेल्या व आपल्या दुर्दैवाच्या वार्तेने आसवांनी डोळे डबडबलेल्या येसूबाईचे व शाहूचे स्निग्ध चेहरे आठवले असतील काय ? की एकदा आग्र्याला तो गेला असताना व नंतर दिलेरखानाकडे पळाला असताना, मगराच्या जबड्यातून माणिक खेचून काढावे, त्याप्रमाणे औरंगजेबाच्या मरणमिठींतून आपल्या अकलेच्या जोरावर शर्थीने त्याला ओढून काढणाऱ्या शिवाजी महाराजांची आठवण येऊन त्याचा ऊर भरून आला असेल ? कीं, करुणा, कृतार्थता, काळजी यांनी ओथंबलेले त्यांचे शब्द त्या कोलाहलांतही सनईच्या सुराप्रमाणे त्याच्या अंतरंगात निनादत असतील ! "लेकरा, मला सोडू नको. औरंगजेबाचा आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता. पण श्रीने कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जाले ' कीं 'सावधपणे नृपवर तुच्छ केले' असा ज्याचा

महिमा त्या आपल्या शहाण्या बापाचा अखंड सावधनतेचा उपदेश आपण विसरलो व गफलतीने पुन्हा औरंगजेबाच्या जाळ्यात सापडलो म्हणून पश्चात्तापाचे त्याला कढावर कढ येत होते ? कीं आपली बिटंबना करणाऱ्या भणंग अधमांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी स्फुरणारे आपले वज्रबाहू बेड्यांनी जखडलेले पाहून मंत्रसामर्थ्याने गति कुंठित केलेल्या पन्नगाप्रमाणे असहाय फूत्कार करीत तो संतापाने आतल्या आंत जळत होता ? कीं पराकाष्ठेच्या शोकाने आणि संतापाने त्याचे अंत:करण बधिर होऊन गेले होते व दगडी पुतळ्याप्रमाणे निश्चलपणे तो आपली विटंबना पहात होता ? कीं बालपणापासून आतापर्यंतचा जीवनाचा चित्रपट त्याच्या डोळ्यापुढे उभा राहून, बंदिवास, कट, कारस्थाने, विवंचना, संशय, कष्ट, मनस्ताप आठवून त्याला असे वाटले काय कीं हे जीवन हीच एक घोर विटंबना व क्रूर वंचना आहे व ती संपत आली याबद्दल त्याच्या मनाने सुटकेचा नि:श्वास सोडला काय ?

त्या क्षणी संभाजीच्या मनात काय विचार चालले होते हे इतिहासाने नमूद केलेले नाही. ते शक्यही नव्हते. महाकवीची प्रतिभा आणि संताची सहानुभूति हीच संभाजीच्या अंत:करणात त्या वेळी धडाडत असलेल्या ज्वालामुखीची कल्पना करू शकतील. एखाद्या मिल्टन, एखादा शेक्सपीयर, कालिदास किंवा भवभूति यांचेच ते लीलाकैवल्य आहे.

'अपथे पदमर्पयन्ति हि श्रुतवन्तोऽपि रजोनिमीलिता: ।' (मोहाने मलिन झाली म्हणजे शहाणी माणसे सुद्धा जाऊ नये त्या मार्गावर पाऊल घालतात) असे कालिदासाने म्हटले आहे. औरंगजेब हा अतिशय शहाणा आणि विचारी पुरुष होता. अगदी कोवळ्या वयापासून आचार, विचार व उच्चार यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची साधना त्याने मोठ्या दक्षतेने केली होती. सुखात व दु:खात, यशात व अपयशात त्याच्या मनाचा तोल कधी ढळला नव्हता. रेखीव व मोजके बोलण्याच्या बाबतीत त्याच्या प्रदीर्घ आयुष्यात त्याच्या वाचेने त्याला कधीही दगा दिला नाही. आणि नेटके व देखणे वागण्यात तो कधी उणा पडला नाही. अशा शहाण्या आणि सुसंस्कृत सम्राटाने संभाजीची इतकी हिडीस विटंबना करण्याचा मुद्दाम हुकूम द्यावा आणि आपल्या आनंदाचे व द्वेषाचे इतके उत्तान, प्रदर्शन करावे ही जितकी आश्चर्याची तितकीच खेदाचीही गोष्ट आहे. त्यात मनाचे औदार्यही नाही व राजनीतीचे चातुर्यही नाही. शत्रू झाला व तो तावडीत सापडला म्हणजे त्याची विटंबना केलीच पाहिजे असा काही नियम नाही. आपला हाडवैरी असलेला तुर्कस्तानचा सुलतान बाजाझेट याला पकडून आणल्याचे कळल्यावर त्याच्या स्वागतासाठी लंगडा तैमूरलंग स्वत: उठून तंबूच्या दारापाशी गेला, त्याला त्याने आपणाजवळ बसवून घेतले व त्याचे सांत्वन केले. कैदी म्हणून धरून आणलेल्या पोरसाला सिकंदराने विचारले की, 'मी तुला कसे वागवावे ?' तेव्हा पोरस म्हणाला, की'

'मी राजा आहे; तू मला राजासारखे वागवावेस.' आणि शहाण्या सिकंदराने खरोखरच त्याला राजासारखे वागविले. महाराणा प्रतापाने अकबराशी झगडण्यात आयुष्य वेचले पण उभ्या आयुष्यात अकबराने प्रतापाबद्दल एकही अनुदार उद्गार काढला नाही; उलट मुक्तकंठाने त्याची स्तुतीच केली. याच चातुर्याने व औदार्याने अकबर व जहांगीर यांनी वैरी असलेल्या रजपुतांना मोगल सलतनतीचे आधारस्तंभ बनविले. कारण द्वेषाच्या दोरखंडांनी नव्हे तर स्नेहाच्या रेशमी पाशांनी शत्रूंना बांधण्याची राजनीतीतील कोमल तरी कठीण कला त्यांना अवगत होती. या राजनैतिक चातुर्याचा व औदार्याचा नामगंधही औरंगजेबाने संभाजीला दिलेल्या वागणुकीत आढळत नाही.

असे कां व्हावे? जीवनाप्रमाणे राजकारणातही सुदैवाचे व दुर्दैवाचे रहाटगाडगे फिरतच असते. ज्या औरंगजेबाने संभाजीला आज पकडले होते, त्यालाच सहा वर्षांपूर्वी संभाजीने इतके 'सळो की पळो' करून सोडले होते की त्याचा मोड झाल्याशिवाय 'मी डोक्याला टोपी घालणार नाही.' असे म्हणून संतापाने औरंगजेबाने आपली टोपी जमिनीवर आपटली होती. फार काय, आज या उंटावर बांधून आणलेल्या संभाजीलाच खुद्द औरंगजेबाला पकडण्याचा हुरूप तेव्हा नव्हता काय? रामसिंगाला लिहिलेल्या पत्रात त्याने म्हटले नव्हते काय की, 'आता लवकरच अशी वेळ येईल की त्या यवनाधमाला पकडून कारागृहात घालणे शक्य होईल.' आज संभाजी बंदीवान् झाला यात मुकर्रबखानाच्या करामती इतकाच औरंगजेबाच्या सुदैवाचा व संभाजीच्या दुर्दैवाचा भाग होताच. या गोष्टी औरंगजेबाला कळत नव्हत्या असे थोडेच आहे?

पण विजयाचा उन्माद ही वस्तूच अशी आहे की त्याच्यामुळे भल्याभल्यांची बुद्धि चळते. औरंगजेब मदिरेच्या थेंबाला शिवत नव्हता हे त्रिवार सत्य आहे. पण मदिरेपेक्षा मादक असलेल्या विजयाच्या नशेने तो या वेळी बेहोश झाला होता. म्हणूनच 'विजयकाल हा पापकाल' आहे असे म्हटले जाते. शहाण्यांना वेडे करणाऱ्या औरंगजेबाचा हा विजयोन्माद पाहिला म्हणजे शेक्सपिअरच्या शब्दांची आठवण येते.

'but man, proud man,
Drest in a brief little authority
Most ignorant of what he's most assured
His glassy essence, like an angry ape
Plays such fantastic tricks before heaven
As make the angels weep!'

(पण माणूस, उन्मत्त माणूस,
क्षणभंगुर सत्तेने झपाटलेला, आणि जे माहीत नाही
त्याची खात्री बाळगणारा, तो माणूस,
संतापलेल्या माकडाप्रमाणे परमेश्वरापुढे अशा विलक्षण चेष्टा करतो
की देवदूतही रडू लागतात!)

औरंगजेबाची छावणी अकरा मैल पसरली होती. त्या सबंध छावणीचा फेरा पूर्ण करून संभाजीची ती धिंड वाजत गाजत औरंगजेबाच्या तंबूपाशी येऊन थांबली. तेथे आल्यावर संभाजी व कविकलश यांना उंटावरून खाली उतरविण्यात आले आणि तंबूच्या दाराशी उभे करण्यात आले.

संभाजीची व औरंगजेबाची दृष्टादृष्ट झाली.

१८

त्या प्रसंगाला आज तेवीस वर्षे होऊन गेली होती. शिवाजीमहाराजांबरोबर संभाजी आग्र्यास आला होता तेव्हा त्याने औरंगजेबास पाहिले होते. काळाच्या ओघात अटळ असलेले बदल सोडले तर औरंगजेबाच्या सडसडीत आणि ताठ शरीरावर वार्धक्याचा कोणताही परिणाम झालेला दिसून येत नव्हता. गव्हासारखा गोरा पान रंग तसाच होता. तीच रुंद छाती. तेच गरुडासारखे लांब व धरधरीत नाक. तेच घुमटासारखे भव्य कपाळ आणि समोरच्या माणसाच्या काळजाचा ठाव घेणारी तीच थंड, धारदार करडी नजर. औरंगजेब होता तसाच होता. वारा खात, गारा खात, ते बाभूळ झाड तसेच उभे होते. फक्त वयाची सत्तर वर्षे पूर्ण करून औरंगजेबाने नुकतेच ऐंशीच्या घरात पाऊल टाकले असल्यामुळे त्याच्या मस्तकावरील व दाढीचे सर्व केस पांढरे झाले होते. पण त्या पांढऱ्या केसामागचें मन मात्र श्रावणमासातल्या हिरवळीप्रमाणे हिरवे आणि टवटवीत होते. तीच तरुणाला लाजविणारी ईर्ष्या आणि जिद्द, तोच उदंड उत्साह आणि अखंड उद्योग औरंगजेबाच्या शिशिरातला हा पराक्रमाचा वसंत ऋतु होता.

ऋग्वेदांत म्हटल्याप्रमाणे औरंगजेब खरोखरच आशिष्ठ होता, बलिष्ठ होता, दृढिष्ठ होता आणि युवाही होता आणि सध्या तरी धनधान्याने भरलेली पृथ्वी त्याच्या चरणांशी लोळण घेत होती.

तंबूच्या दाराशी उभ्या केलेल्या संभाजीकडे औरंगजेबाने पाहिले. या संभाजीने त्याच्या लाडक्या बुऱ्हाणपुराची राखरांगोळी केली होती. याने औरंगाबादपासून सोलापूर–विजापुरापर्यंत जाळपोळीचा कहर उडवून दिला होता. हसनअलीखान, रणमस्तखान, रुहुल्लाखान यांच्या एकामागून एक येणारे स्वाऱ्यांचे पाणलोटासारखे लोंढे याने शर्थीने परतवून लावले होते. यानेच गोव्याची दारे ठोठावली होती आणि पोर्तुगीज गव्हर्नरच्या काळजाचा थरकाप उडविला होता. कोकणच्या जंगलांत यानेच शहाआलमच्या शूर सैनिकांची टिपून पारध केली होती. तो हा संभाजी! तो शिवाजीचा मुलगा होता आणि अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा छत्रपती होता! कोकणच्या किर्र जंगलांत रायगडच्या गगनचुंबी पर्वतावर गरुडाप्रमाणे हा विहार करीत होता व वाघाप्रमाणे स्वैर संचार करीत होता! तो हा संभाजी. डोक्यावर लाकडी टोपी आणि अंगात विदुषकाचा झगा अशा अवस्थेत जेरबंद होऊन आपल्या सिंहासनाच्या पायाशी आणला जावा ही औरंगजेबाला खरोखर ईश्वराची अगाध लीला वाटली, मुकर्रबखानाने संभाजीला धरावे अशा अर्थाचे पत्र आसदखानाला लिहिताना, खान काय करू शकणार ? जे काही करा-

वयाचे ते परमेश्वरच करू शकतो असे त्याने उद्‌गार काढले होते. त्याच्या स्वतःच्याच उद्‌गारांची त्याला आता प्रतीति आली. तो सिंहासनावरून उतरला. तो गालिचावर गुडघे टेकून बसला. त्याने डोळे मिटले व बाहू उभारून सद्‌गदित अंतःकरणाने ईश्वराला दुवा दिला. त्याच्या भावना त्याला इतक्या अनावर झाल्या की त्याच्या डोळ्यांतून घळघळा आसवे वाहू लागली.

चित्रात रेखल्याप्रमाणे जमलेली सर्व मंडळी हा प्रकार पाहात होती. त्या ठिकाणी संभाजीजवळच कविकलशही उभा होता. त्याचे हातपाय वगैरे सारे अवयव असे करकचून जखडले होते की त्याला इकडची मान तिकडे वळविता येत नव्हती. पण कविकलश प्रत्युत्पन्नमति खराच. त्याने औरंगजेबाची ती कृति पाहून, तशाही अवस्थेत संभाजीला डोळ्यांनी संकेत केला व ताबडतोब एक हिंदी कविता त्याला उद्देशून रचली आणि म्हणून दाखविली – 'हे राजन्, तुला पाहून बादशाहाला दिमाखाने व वैभवाने सिंहासनावर बसण्याचे भान राहिले नाही. त्याचे भान हरपून तुला ताजीम देण्याकरिता तो सिंहासनावरून खाली आला आहे.' कविकलशाच्या काव्यात कल्पनेइतकेच सत्य खरोखरच होते. कारण संभाजी हा पहिलाच कैदी, की जो समोर आणला गेला असता, त्या निमित्ताने ईश्वराला दुवा देण्यासाठी का होईना, पण आपल्या शाही रुबाबाचा विसर पडून औरंगजेब सिंहासनावरून खाली उतरला. औरंगजेबाच्या या एका स्वयंस्फूर्त व नेणिवेने केलेल्या कृतीनेच संभाजीचा आजपर्यंतचा पराक्रम सफल झाला व आजच्या त्याच्या पराजयातही तो अपराजितच राहिला कविकलश बोलला ती स्तुति नव्हती तर वस्तुस्थिति होती. 'भूतार्थव्याहृतिः सा हि न स्तुतिः परमेष्ठिनः!' (तो घडलेला इतिहास होता; ती परमेश्वराची स्तुति नव्हती.)

प्रार्थना आटोपल्यावर औरंगजेब गालिचावरून उठला आणि संभाजीजवळ जाऊन उभा राहिला. संभाजीजवळ या वेळी मुकर्रबखानाचा मुलगा इखलासखान व हमीदुद्दीनखान उभे होते. या इखलासखानाने संभाजीचे केस धरून त्याला संगमेश्वरला तळघरातून ओढत बाहेर मुकर्रबखानाचे हत्तीपाशी आणले होते. त्याने व हमीदुद्दीनखानाने संभाजीला औरंगजेबाला ताजीम देण्याबद्दल पुष्कळ समजावून सांगितले. पण संभाजीवर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. औरंगजेबाला पाहून त्याने मान मुळीच लवविली नाही की डोळे खाली वळविले नाहीत. तो तसाच औरंगजेबाच्या डोळ्याला डोळा भिडवून त्याच्याकडे पाहात बेडरपणे उभा राहिला,–वाकला नाही, हालला नाही की चळला नाही. जणू सह्याद्रीचा बेलाग सुळकाच! दिवसभर झालेली त्याची विटंबना, त्याचा विदूषकाचा डगळ डगला, त्याची ती शंकूसारखी लाकडी टोपी, त्याचा तो उन्हाने रापलेला चेहरा, त्याच्या अस्ताव्यस्त केसात आणि दाढी मिशात साठलेली धूळ या सर्वांवर मात करून औरंजेबाकडे रोखून पाहत होते ते त्याचे वाघाच्या डोळ्यांप्रमाणे धगधगणारे

हिऱ्यासारखे, व अंगारासारखे तेजस्वी डोळे – आणि त्यांच्यात भडकलेला संतापाचा, तिरस्काराचा, तुच्छतेचा, ईर्ष्येचा, अभिमानाचा वणवा !

ते पाहून औरंगजेब मनातल्या मनात खरोखरच थिजला असेल. त्याने थोडा वेळ बंदिवानांचे निरीक्षण केले आणि त्यांना कैदखान्यात नेण्याची आज्ञा दिली. औरंगजेबाच्या काही अधिकाऱ्यांनी त्याला सल्ला दिला की संभाजीला जीवदान द्यावे. त्याच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात किल्ले होते. त्यांच्या किल्ल्या संभाजीमार्फत मागवून घ्याव्यात. किल्ल्यावर बादशाही किल्लेदार नेमावेत व नंतर संभाजीला आमरण कैदेत ठेवण्यात यावे. पण औरंगजेबाला ही मसलत मानवली नाही. त्याने रुहुल्लाखानाला आज्ञा केली की, 'तुम्ही जाऊन संभाजीपाशी चौकशी करावी की, तुझे खजिने, जडजवाहीर आणि इतर संपत्ति कोठे आहे ? तसेच बादशाही सरदारांपैकी कोण कोण तुझ्याशी पत्रव्यवहार करून संबंध ठेवीत होते ?'

परंतु रुहुल्लाखानाने विचारावे व संभाजीने उत्तर द्यावे इतके हे प्रकरण सोपे नव्हते. एक तर स्वभावतःच संभाजी हा 'मोडेल पण वाकणार नाही' अशा प्रवृत्तीचा माणूस होता. औरंगजेबाबद्दल त्याचे मत काय होते हे गेली आठ वर्षे त्याने त्याच्याशी जी प्राणपणाने झुंज घेतली होती तिच्यावरून स्पष्टच होत होते. औरंगजेब हा हिंदुधर्माचा व हिंदुसंस्कृतीचा घास घेण्यास अधीर झालेला आपला हाडवैरी आहे, तो यवनाधम आहे, असेच संभाजीचे मत होते. या दुष्ट यवनाधमाला पकडून कारागृहात घालावयाचे व मग आपल्या देवतांची पुन्हा स्थापना करून धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पाडण्याची व्यवस्था करावयाची हे उत्तुंग ध्येय त्याच्या डोळ्यापुढे होते. रामसिंगाला पाठविलेल्या पत्रात म्हटल्याप्रमाणे – 'या दुष्ट यवनाशी युद्ध करण्यात आमची संपत्ति, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश आम्ही सर्व काही पणास लावावयास तयार आहोत.' आणि बोलल्याप्रमाणे खरोखरच सर्व काही पणास लावल्यानंतर संभाजीने आज घटकेला आपले प्राणही पणास लावले होते. छत्रपति असताना संभाजीची वृत्ति ही होती. त्यात आज कैदी म्हणून अनन्वित विटंबना झाल्यानंतर आगीत तेल पडल्याप्रमाणे आधीच अग्नीप्रमाणे उग्रप्रकृति असलेला संभाजी किती भडकला असेल याची कल्पनाच करावी. अशा स्थितीत कुठला औरंगजेब आणि कुठला रुहुल्लाखान ! कसली शरणागति आणि कसला कबुलीजबाब ! महाभारतात म्हटल्याप्रमाणे – 'उद्यच्छेदेव न नमे दुद्यमो ह्येव पौरुषम् । अप्यपर्वणि भज्येय न नमेय कदाचन ॥' (ताठ राहावे, वाकू नये. उद्योग हाच पुरुषार्थ आहे. मोडावे पण कधीही वाकू नये.)

रुहुल्लाखानाला संभाजीने जी उत्तरे दिली ती इतकी उद्दामपणाची आणि तिरस्कारपूर्ण होती की, रुहुल्लाखान औरंगजेबाचा बक्षी आणि मावसभाऊ पण त्यालाही ती जशीच्या तशी औरंगजेबाला सांगण्याची काही छाती झाली नाही.

त्याने फक्त मुद्द्याचा आशय तेवढा औरंगजेबाला कळविला. पण तेवढ्यावरूनही संभाजीच्या संतापाचे चटके औरंगजेबाला चांगलेच बसले. औरंगजेबाला काय वाटले हे नमूद नाही. खाफीखान म्हणतो, 'बादशहाला चीड आली.' पण शक्य आहे की तेवीस वर्षांपूर्वी त्याने दिलेला मानाचा पोषाख झिडकारून देऊन भर दरबारातून संतापाने ताडताड निघून जाणाऱ्या संभाजीच्या बापाची आठवण औरंगजेबाला नक्कीच आली असेल; त्याला हेही आठवले असेल की ह्याच संभाजीने आग्र्याच्या दरबारात नवव्या वर्षी आपण मल्लयुद्धाची केलेली आज्ञा बेडरपणाने धुडकावून लावला होती. आठवले असेल यात शंकाच नाही, कारण औरंगजेबाची स्मरणशक्ति इतकी अद्‌भुत होती की एकदा पाहिलेली व्यक्ति किंवा ऐकलेला शब्द तो कधीही विसरत नसे. आज रुहुल्लाखानाने सांगितलेली संभाजीची उद्दाम उत्तरे ऐकताना त्याला खरोखरच वाटले असेल की, संभाजी कितीही गाफील आणि बेहोष वाटला तरी त्याच्या शब्दाशब्दातून प्रतीत होत असलेली दुर्दम्य अस्मिता तो शिवाजीला शोभणारा मुलगा आहे हेच सांगते आहे.

पण शत्रूचे कौतुक करीत बसण्याचा औरंगजेबाचा स्वभाव नव्हता व त्याला वेळही नव्हता. त्याने ताबडतोब आज्ञा दिली की 'संभाच्या डोळ्यात सळई फिरवून त्याला नवी दृष्टि देण्यात यावी.' त्याच रात्री तापलेल्या सांडसाने संभाजीचे डोळे फोडण्यात आले. दुसऱ्या दिवशी कविकलशाची जीभ उपटण्यात आली.

त्या दिवसापासून संभाजीने जेवणखाण अजिबात सोडले. त्याच्या पहारेकऱ्यांनी त्याला अन्न सेवन करण्याबद्दल पुष्कळ सांगून पाहिले पण त्याचा काही उपयोग झाला नाही. संभाजीला उपास पडू लागले, शेवटी त्या पहारेकऱ्यांनी ही गोष्ट औरंगजेबाच्या कानावर घातली, तेव्हा औरंगजेबाने संभाजीच्या बाबतीत अखेरचा निर्णय घेण्याचे ठरविले. तो अखेरचा निर्णय खरे म्हणजे संभाजीला धरून आणले तेव्हाच औरंगजेबाने मनाशी घेऊन ठेवला होता. आणि तो संभाजीला देहान्त-शासन देण्याचाच होता हे उघड आहे. पण औरंगजेबाचा नेहमीचा शिरस्ताच मुळी असा होता की त्याच्या मनातल्या संकल्पाला तो धर्मशास्त्रज्ञाकडून धर्माज्ञेचे व कायद्याच्या अंमलबजावणीचे स्वरूप देववून घेई; व आपल्या मनात गुन्हेगाराला द्यावयाची असलेली शिक्षा त्यांच्या मुखातून तो वदवून घेई. असे केले म्हणजे त्याच्या कृतीला वैयक्तिक सुडाचे स्वरूप न येता धर्माज्ञेच्या निर्विकार कार्यवाहीचे उदात्त स्वरूप येई. असा प्रयोग औरंगजेबाने पूर्वी दाराच्या बाबतीत, व मुरादच्या बाबतीत केला होताच. आता संभाजीच्या बाबतीत हा प्रयोग करण्यासाठी त्याने इस्लामी धर्मपंडिताची समिति नेमली. त्यांनी अर्थातच एकमुखाने औरंगजेबाला पाहिजे होता तसाच निर्णय दिला की, ज्या अर्थी संभाजीने मुसलमानांना अनन्वित पीडा दिली होती आणि इस्लामी राज्यातील नगरे गारद केली होती, त्या अर्थी त्याला देहान्तशासनाशिवाय दुसरे शासन नाही. असा निर्णय देताना शास्त्र औरंग-

जेबाच्या सत्तेपुढे वाकले असे समजू नये. कारण जो स्वतःच सारी धर्मशास्त्रे पढून बसलेला होता, आणि 'फतवा ए-आलमगीर' रचण्याची ज्याची योग्यता, त्याच्यापेक्षा निराळा निर्णय शास्त्री पंडित झाले तरी काय देणार ?

ही सर्व चर्चा चालू असताना औरंगजेबाची छावणी बहादुरगडाहून हालली व तुळापूरच्या दिशेने तिचे कूच चालू झाले. रविवार ३ मार्च १६८९ रोजी औरंगजेब तुळापूरला दाखल झाला. या सबंध प्रवासात कविकलश व संभाजी यांचे अतोनात हाल करण्यात येत होते. तुळापूरला आल्यानंतर आठ दिवसांनी सोमवार ११ मार्च १६८९ रोजी संभाजी व कविकलश यांच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यात आली.

तुळापूर येथे भीमा व इंद्रायणी या दोन नद्यांचा संगम झालेला आहे. खुद्द औरंगजेबाची छावणी तुळापूर संगमाच्या उत्तरेकडील या दोन नद्यांच्या मध्यावरील मैदानात होती. तुळापूरच्या पूर्वेस नदी–पलीकडच्या भागात थेट आपटी, वढू, कोरेगावपर्यंत त्याच्या अफाट सैन्याची छावणी पसरली होती. त्या सैन्याची प्रचंड बाजारपेठ वढू गावी होती. या छावणीच्या बाजारात ११ मार्च रोजी अंधळा केलेला संभाजी व जीभ उपटलेला कविकलश यांना आणण्यात आले. त्यांच्या अंगावरचे विदूषकाचे डगले, डोक्यावरच्या लाकडी टोप्या आणि हातापायांत खळखळणारे साखळदंड अद्याप तसेच होते. त्यांना आणल्यानंतर तलवारीने त्यांचा एकेक अवयव तोडून त्यांचे मांस कुत्र्यांस खाण्यास देण्यात आले. आणि शेवटी त्यांचा शिरच्छेद केला. त्यांच्या मस्तकात पेंढा भरून ती दुरुस्त करण्यात आली आणि शिंगे, कर्णे, ढोल यांच्या कडकडाटांत दक्षिणेतल्या प्रमुख शहरांतून ती मिरवण्यात आली आणि नंतर ती फेकून देण्यात आली.

अशा प्रकारे संभाजीचे जीवन संपले. त्याच्या धडाचे तुकडे फेकून दिले ते हाती लागले नाहीत. त्याचे मस्तक मात्र वढूच्या लोकांनी आणून त्याला तुळापूरसंगमावर विधिपूर्वक अग्नि दिला. शाहू आणि येसूबाई यांनी तेथे वृंदावन बांधले वढू गावात आज दोन वृंदावने आहेत. एक संभाजीचे व दुसरे कविकलशाचे आहे. कविकलशाने संभाजीला अखेरपर्यंत सोबत केली. जो जीवनात बरोबर होता, जो मरणात बरोबर होता, तो मरणानंतरही वृंदावनाच्या रूपाने बरोबरच असावा हे किती यथार्थ आहे बरे! 'राजद्वारे स्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः!'(दरबारात व स्मशानात बरोबर असतो तोच मित्र होय.)

दुर्दैव माणसाची किती कठोर पारध करू शकते याचे मनाला चटका लावणारे संभाजीइतके दुसरे उदाहरण शोधूनही सापडणे कठीण आहे. वयाच्या अवघ्या दुसऱ्या वर्षी संभाजी आपल्या आईला आंचवला आणि आजीने आईची जागा भरून काढण्याचा जरी प्रयत्न केला, तरी उरलेल्या माता सगळ्या सावत्र असल्यामुळे आणि बाप सारखा मोहिमांमुळे घराबाहेर असल्यामुळे, आईच्या मृत्यु-

नंतर संभाजीच्या अंतःकरणात निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघाली नाही. तिच्या सहानुभूतीच्या आणि प्रेमाच्या अभावाने सुकलेले त्याचे मन रूक्ष, एककल्ली, हट्टी आणि स्वच्छंदी बनू लागले. त्याने गोळा केलेले कविकलशासारखे तंत्रमार्गातले सोबती, त्याची सचिवांशी होणारी भांडणे आणि त्याच्या चारित्र्याला मिळत असलेले चमत्कारिक वळण यांमुळे उतारवयात शिवाजी महाराजांना संभाजी हा आधार न वाटता समस्याच वाटू लागली आणि मोगलांना जाऊन तो मिळाल्यानंतर व भूपाळगड त्याने जमीनदोस्त केल्यानंतर तर, केवळ त्याच्या चारित्र्यालाच कलंक लागला नाही, तर प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांनाच त्याच्या व स्वराज्याच्या भवितव्याची धास्ती वाटू लागली. तो परत आल्यानंतर त्याला महाराष्ट्राचे राज्य न देण्याकडेच त्यांचा कल झाला. दक्षिणेकडील राज्य त्याला देऊन त्याची ते समजूत करू पाहात होते. पण कशाही माणसाला मंत्रमुग्ध करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या चातुर्याने सुद्धा शेवटी संभाजीपुढे हात टेकले.

महाराजांची उत्तरक्रिया करण्याचे भाग्य संभाजीला लाभले नाही ! त्या वेळी तो पन्हाळ्याला नजर कैदेत होता. त्याला कैदेत ठेवू पाहणाऱ्या मंत्र्यांशी झगडूनच त्याला राज्य मिळवावे लागले आणि नंतरही अनेकांचा त्याला शिरच्छेद करावा लागला. पण इतक्या सायासाने मिळविलेल्या राज्यलक्ष्मीचा उपभोग त्याला पुरते चार दिवस सुद्धा घेता आला नाही. त्याचा राज्याभिषेक झाला आणि अकबराचे पांढरे पाय त्याच्या राजधानीला लागले. त्यानंतर औरंगजेबाशी नऊ वर्षे संग्राम करण्यात त्याला घटकेचीही उसंत मिळाली नाही एवढ्यावर भागले नाही म्हणून की काय, त्याच्या दुर्दैवाने दावा साधला आणि कोणाही छत्रपतीच्या वाट्याला आली नाही अशी विटंबना व असा मृत्यु त्याला भोगावा लागला. आईचे प्रेम नाही, बापाचा विश्वास नाही, मित्रांचे साहाय्य नाही, भावाचा पाठिंबा नाही, एकुलता एक मित्र येऊन जाऊन काय तो कविकलश की जो त्याच्या जातीचा नव्हे की मातीचा नव्हे. जीवनात आनंद नाही व मरणात कृतार्थता नाही, ऐन तारुण्यात मरण आले व तेही समरांगणात पतन पावणाऱ्या वीराचे नव्हे, तर उभा दावा धरणाऱ्या हाडवैऱ्याचा कैदी होऊन. बालपणापासून मरणापर्यंत संभाजीच्या जीविताची ही करुण कथा पाहिली म्हणजे बिचाऱ्याचा जन्म केवळ दुःख भोगण्यासाठीच झाला होता असे वाटू लागते. 'दुःखसंवेदनायैव रामे चैतन्यमाहितम् ।' ('केवळ दुःखाची संवेदना होण्यासाठीच रामचंद्रात चैतन्य ठेवले आहे!') हे भवभूतीचे उद्‌गार संभाजीच्या बाबतीत किती सार्थ आहेत !

पण 'Tribulation alone makes us know what we really are' (आपण कोण आहोत हे आपत्तींतच आपणास कळते.) असे मेरी अँन्टॉनिएटने म्हटले आहे ते खरे आहे. ढगांवर ढग आदळून त्याचा परस्परांशी संघर्ष होतो

तेव्हाच त्यांच्यात सुप्त असलेल्या तडितेचा डोळे दिपविणारा साक्षात्कार होतो संभाजीवर संकटे कोसळली म्हणूनच, इतका दीर्घकाळ शमीवृक्षात गुप्त असलेल्या अग्नीप्रमाणे त्याच्यात असलेले शौर्य त्याच्या व इतरांच्या प्रतीतीला आले. नर्मदेचा लोंढा आपल्या हजार हातांनी मागे रेटणाऱ्या सहस्रार्जुनाप्रमाणे, हसनअलीखान, रणमस्तखान, रुहुल्लाखान, शहा आलम, फिरोजजंग यांच्या सैन्याच्या एका पाठोपाठ येणाऱ्या डोंगरलाटा संभाजीने आपल्या बाहूंचा बंध घालून शर्थीने अडवून धरल्या. त्याने गोव्याच्या दरवाजावर दिलेली धडक आणि रात्री बेरात्री वादळवाऱ्यात फोंड्यावर केलेली घोडदौड खरोखरच त्याच्या दिगंतकीर्ति पित्याची आठवण करून देणारी होती. म्हणूनच त्याचे धैर्य, त्याचे शौर्य, त्याचे चापल्य या बाबतीत, त्याची निंदा करणाऱ्या खाफीखानानेही शिवाजी महाराजांशी त्याची तुलना केली आहे – 'दुष्ट संभाजी हा धामधूम आणि उच्छाद करण्यात नरकवासी शिवाजीपेक्षा दहापटीने अधिक तापदायक ठरला. तो स्वत:ला सवाई शिवाजी म्हणवून घेत असे. धामधुमीच्या बाबतींत त्याच्या दुष्ट बापापेक्षाही अधिक असा संभाजीचा दुर्लौकिक झाला होता.' शत्रूने तुलना करावी आणि ती शिवाजीमहाराजांशी करावी यापेक्षा संभाजीचा बहुमान कोणता–आणि तेही शत्रु असे की, ज्यांची निंदा ही स्तुतीसारखीच वाटावी ?

'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे–' हा शिवाजी महाराजांचा हिंदवी स्वराज्यामागील संकल्प होता, व त्यांना हे राज्य हिंदुत्वाच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठी उभारावयाचे होते. तीच हिंदुत्वाच्या रक्षणाची व संवर्धनाची प्रेरणा संभाजीच्या पराक्रमामागे होती व म्हणूनच औरंगजेबाबरोबर त्याने गोव्याच्या फिरंग्यांशीही प्राणपणाने झगडा केला. हा बाहेर संघर्ष करीत असताना पायाखाली फुटणाऱ्या सुरुंगाप्रमाणे घरात त्याच्या पाठीमागे कारस्थाने करणाऱ्या स्वजनांबरोबरही त्याला झगडावे लागले व त्यामुळे या नऊ वर्षांत त्याच्या शरीराला काय किंवा मनाला काय क्षणाचीही विश्रांति लाभली नाही. ती विश्रांति त्याला अखेर त्याच्या मृत्यूनेच मिळाली. तोपर्यंत 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' हेच संभाजीचे भागधेय होते.

'माणूस म्हणजे दिव्यता आणि पशुता यांचा विलक्षण संगम होय' असे कार्लाईलने एके ठिकाणी म्हटले आहे. संभाजी माणूस होता व त्यामुळे माणसाला स्वाभाविक असलेल्या पाशवी वासना व रागद्वेषादि विकार त्याच्यात काहीसे अनावर प्रमाणातच होते. पण परिसाचा स्पर्श झाल्यावर लोखंडाचे सोने व्हावे. त्याप्रमाणे मृत्यूचा अमृत स्पर्श झाल्याबरोबर त्याच्यातील साऱ्या पाशवी प्रवृत्ति नि:शेष झडून गेल्या आणि केवळ निर्भेळ दिव्यता तेवढी शिल्लक राहिली. हंबीरराव मोहित्याप्रमाणे संभाजी समरांगणात पडला असता तर तो मृत्यु त्याला केव्हाही भूषणास्पदच झाला असता. पण वीरात्म्याच्या या मृत्यूपेक्षाही अधिक

कठीण व म्हणूनच अधिक धन्य असा हुतात्म्याचा मृत्यु नियतीने त्याच्या ललाटी लिहिला होता. 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः' या न्यायाने क्षणात तळपून जाणारी विद्युल्लता कौतुकास्पद आहे यात शंकाच नाही, पण त्याहीपेक्षा खरी धन्य आहे ती चितेवर आरूढ झालेल्या सतीप्रमाणे क्षणाक्षणाने, कणाकणाने, तिळातिळाने जळणाऱ्या त्या दीपज्योतीची. O dark, dark, dark amid the blaze of noon (मध्यान्हाच्या प्रकाशातही अंधार अंधार दिसतो !) या कविवचनाप्रमाणे डोळे फोडल्यामुळे भर मध्यान्ही 'तिमिरातून तिमिराकडे' अशी अंधारयात्रा करण्याची आपत्ति ओढविली असता, आणि जिवंतपणी देहाची खांडोळी उडविली जात असता हालाहल पचविणाऱ्या रुद्राप्रमाणे, ज्या दुर्दम्य धैर्याने संभाजीने त्या यातनेवर मात केली त्याला इतिहासात तोड नाही.

आजपर्यंत समरभूमीवर संभाजीने जे शौर्य दाखविले त्यापेक्षा मरणभूमीवरचे हे धैर्य वेगळे आहे. हे शौर्य केवळ वीरात्म्याचे नव्हे. हे हुतात्म्याचे धैर्य आहे. त्या एका क्षणी संभाजीच्या व्यक्तिमत्त्वातले सारे हीण जळून खाक झाले व उरले ते धगधगीत निष्कलंक सोने – 'दग्धं दग्धं पुनरपि पुनः काञ्चनं कान्तवर्णम् !' (सोने परत परत जाळले तरी ते तेजस्वी राहते.)

हुतात्मा हा कधी मरत नसतो. तो मृत्युंजय असतो. तो चिरंजीव असतो. शालिवाहनाने मातीतून वीर निर्माण केले. त्याप्रमाणे संभाजीच्या हौतात्म्याने मराठी मातीतून वीर निर्माण झाले. आपल्या जीवनाने, आपल्या मरणाने व आपल्या स्मरणाने संभाजीने, औरंगजेबावर मराठ्यांनी पुकारलेल्या महायुद्धात अखंड संघर्ष केला हे त्याचे कर्तृत्व आहे. मिल्टनने म्हटल्याप्रमाणे संभाजीसारखे हुतात्मे अपयशातही चिरयशस्वीच असतात व दंतकथेतल्या स्फिनिक्स पक्ष्याप्रमाणे आपल्या मरणानंतरही आपल्या राखेतून ते परत जिवंत होतात–

'So Virtue, given for lost,
Depressed and Overthrown as seemed,
Like that self–begotten bird
In the Arabian woods embost,
That no second knows nor third,
And lay erewhile a holocaust,
From now her ashy womb now teemed.
Revives, reflourishes, then vigorous most
When most inactive deemed
And thou' her body die, her fame survives
A secular bird ages of lives.

कथा अशी आहे की तुळापूरचे मूळचे नाव नागरगाव होते. या ठिकाणी नदीमध्ये हत्तोची तुला विजापूरच्या बादशहाला शहाजीराजांनी करून दाखविली म्हणून त्या गावाला 'तुळापूर' म्हणू लागले. आजाच्या चातुर्याचे स्मारक असलेले तुळापूर नातवाच्या हौतात्म्याचेही स्मारक व्हावे हा एक अपूर्व ऐतिहासिक योगायोग म्हणावा लागेल. भीमा आणि इंद्रायणी या लोकमातांच्या संगमामुळे तुळापूरला तीर्थाचे प्रसन्न पावित्र्य लाभले होते. संभाजीच्या उग्र आत्मार्पणामुळे त्या स्थानाला धारातीर्थाची दाहक शुचिता प्राप्त झाली.

संभाजीचा शिरच्छेद केल्यानंतर औरंगजेबाला पराकाष्ठेची कृतकृत्यता वाटली. विजापूर पडले, गोवळकोंडा जिंकले, अकबर परागंदा झाला, संभाजीला डोळ्यांदेखत ठार मारले. जे संकल्प मनात धरून तो अजमीर सोडून इतक्या दूर आला होता ते त्याच्या अपेक्षेपेक्षाही पूर्ण झाले होते. संभाजीला पकडून आणण्याची बहादुरी करणारा मुकर्रबखान आणि त्याचे सहकारी यांच्यावर त्याने मानसन्मानाचा वर्षाव केला. मुकर्रबखानाला खानझमान फतेहजंग ही पदवी, सात हजारी मनसब, पन्नास हजार रुपये रोख, सोनेरी साजाने युक्त असलेला घोडा, हत्ती, जडावाचा खंजीर, तलवार, पोषाख देण्यात आला. त्याचा शूर मुलगा इखलासखान याला खाने आलम हा किताब, पाच हजारी मन्सब, देण्यात आली, मुकर्रबखानाचे इतर मुलगे, नातेवाईक व सहकारी या सगळ्यांना बक्षिसे व मन्सबी देण्यात आल्या. पण सर्वांत विशेष म्हणजे औरंगजेबाने मुकर्रबखानाची मुक्तकंठाने स्तुति केली. तो म्हणाला – 'खानझमान ऊर्फ शेखनिझाम याने त्या दुष्ट संभाजीला मुलामाणसासहित पकडून उत्कृष्ट कामगिरी केली. श्रमसाहसाची कामे करून त्या सरदाराच्या घराण्याने तैमूरच्या घराण्याला ॠणी करून ठेवले आहे.' पैसा खर्च करण्याप्रमाणे स्तुति करण्याच्या बाबतीतही औरंगजेब सामान्यतः कृपणच होता. अशा माणसाच्या तोंडून असे शब्द वदविले ही मुकर्रबखानाची संभाजीला पकडण्याच्या तोडीची बहादुरी म्हटली पाहिजे.

औरंगजेबाने संभाजीचा वध केला त्या दिवशी फाल्गुनी अमावास्या होती. दुसऱ्या दिवशी चैत्र शुद्ध प्रतिपदा. गुढीपाडवा. शालिवाहन शकाचा नव्या वर्षाचा पहिला दिवस. या 'शकारि' शालिवाहनाने आपल्या देशावर उत्तरेकडून चालून आलेल्या शकांचा पराजय केला व त्या विजयाच्या स्मरणार्थ आपल्या नावाने शालिवाहन शक सुरू केला अशी लोक समजूत आहे. प्रतिष्ठानला निवास करणारे हे शालिवाहन मराठी सम्राट् होते.

आजही उत्तरेकडचा यवन सम्राट महाराष्ट्रावर चालून आला होता. शालिवाहनाच्या त्या गौरवशाली इतिहासाची पुनरावृत्ति याही वेळी होणार होती काय ?

शालिवाहनाप्रमाणेच चालुक्य वंशातल्या पुलकेशी या प्रतापी सम्राटाने उत्तरेकडून आलेल्या हर्षवर्धनाच्या आक्रमणाला नर्मदेच्या तीरावरूनच मागे रेटले होते

व महाराष्ट्राचे स्वातंत्र्य निष्कलंक राखले होते. तोही इतिहास पुन्हा याच महाराष्ट्राच्या भूमीत घडणार होता काय?

या घटकेला तरी तशी सुतराम् शक्यता नव्हती. निरङ्कुश कवीचे ते केवळ स्वप्नरंजन होते. अश्वमेधातल्या घोड्याप्रमाणे औरंगजेबाचा विजयी घोडा मराठी मुलुखात चौखूर दौडत होता.

इतिहासाची पुनरावृत्ति होते हे खरे आहे. पण ती होत नाही हेही तितकेच खरे आहे. कितीतरी शालिवाहन शक यापूर्वी आले आणि गेले. त्या वेळी कोठे इतिहासाची पुनरावृत्ति झाली म्हणून आता होण्याची शक्यता होती ?

पण म्हणून ती पुनरावृत्ति होण्याची शक्यताच नव्हती असे तरी कोणी म्हणावे ? आज मराठ्यांचे स्वराज्य धुळीत पडले होते आणि औरंगजेब अंबारीत मिरवत होता. पण सर्वसाक्षी आणि अघटित घटनापटु काळाच्या उदरात काय होते हे त्या मराठ्यांना तरी काय माहीत व त्या औरंगजेबाला तरी काय माहीत ? रुद्रस्वरूप असलेल्या त्या काळाच्या लीलाकैवल्याने आजचे जित व जेते यांच्या स्थितीची कवीने गायिल्याप्रमाणे उलटापालट झालीच नसती असे तरी कसे म्हणता येईल ?

‘पाड सिंहासनें दुष्ट हीपालथी
ओढ हत्तीवरुनी मत्त नृप खालती
मुकुट रंकासि दे करटि भूपाप्रति
झाड खटखट् तुझे खड्ग रुद्रा!’